Das, Debasis and Chatterjee, Pernab[10] **(2015)** overviewed in the paper, library automation and the changing scenario of library management. ICT impact has changed the library operation and its functionality in to a fast to faster mode. User gets direct their required documents sitting in front of a desktop. Automation of the library has reduced the man power.

The present study of research article is carried out in all the 19 degree college libraries located in Ratnagiri District. In this article, collected data has been analysed and interpreted to fulfil the objectives of the study.

1.6 Data Collection, Analysis and Interpretation

1.6.1Details of Colleges

Details of 19 degree colleges in Ratnagiri District are listed following:

Table - 1.1: List of Degree Colleges in Ratnagiri District

Sr. No.	Name of the College
	Arts Colleges
01	Arts College, Sawarde
	Arts and Commerce Colleges
01	Arts and Commerce College, Sakharpa
02	MohiniMurariMayekar Arts and Commerce College, Chafe
03	N. K. Varadkar Arts and R. V. Belose Commerce College, KalkaiKond, Dapoli
04	Shri. ManoharHariKhapane College of Arts and Commerce, Pachal- Raypatan
05	TatyasahebNatu College of Arts and Senior College of Commerce, Margtamhane
	Arts, Commerce and Science Colleges
01	AbasahebMarathe Arts and new Commerce, Science College, VikhareGothane, Rajapur
02	Arts Commerce and Science College, Lanja
03	Athalye Sapre-pitre College of Arts, Commerce and Science, Devrukh
04	D B J College or Dr Datar Science, Dr Behere Arts, and Shri. Pilukaka Joshi Commerce College, Chiplun,
05	D. J. SamantCollege of Arts, Commerce and Science, Pali
06	Gogate – Jogalekar College, Ratnagiri
07	I. C. S. College of Arts Commerce and Science, Khonde, Khed
08	Khare-DhereBhosale College of Commerce, Arts and Science, Guhagar
09	L. G.Munde Arts, Commerce and Science College, Mandangad
10	LokneteShamraojiPeje Arts, Commerce and Science Senior College, ShiwarAmbere
11	Patpanhale Education society's Patpanhale Arts, Commerce and Science College, Patpanhale
12	S. P. Hegshetye College of Arts, Commerce and Science Ratnagiri
13	T. B. Kadam college of Arts, Science and Commerce College, Bharne

Out of total 19 colleges, all degree colleges have library and it play an important role as a central library for all faculties in the college. Among these 19 colleges, all 19 college libraries are selected for the study but 01 library has not collected their response, 18 libraries collected their responses for the study.

percent needs the training in computer application.

1.6.4Computer Technology Available at Work Place

1.6.4.1 Status of Automation in Library

Details reported by 18 libraries on status of automation are shown in Table-1.5 in percentage:

Table – 1.5 Status of Automation in Library

Status of Library Automation	Percentage Reporting
Complete	16.66
Partial	72.22
No Automation	11.11

All 18 college libraries responded that 72 percentage college libraries are automated partially, 16 percentage are automated completely and 11 percentage college libraries are not automated yet.



1.6.4.2 Library Software Package Use

Information on use library software package in 18 college libraries is presented in Table- 1.6 in percentage

Table – 1.6: Use of Library Software Package in College Library

Type of Library Software Package	Use in Percentage
Commercial	83.33
Developed	5.55
No Software package in Use	11.11

From 18 college libraries, 83 percent libraries are used commercial library software package and 11 percent libraries are not using any kind of software package.



Observation of fig. 1.5 shows that, 83 percent college libraries use commercial software, 5 percent libraries uses developed software, 11 percent libraries are not used any kind of library software package.

1.6.5 Attitude and Opinion on Computer Technology

1.6.5.1 Computer Technology helps Professional Career

Information reported by all 18 respondents, 100 percent respondents think Computer Technology helps in developing the professional career.

1.7 Findings

100 percent librarian uses computers in the library.

CD-ROM and DVDs uses 91 Percentage and OPAC 72 perentage.

72 percentage college libraries are automated partially, 16 percentages are automated completely.

83 percet libraries uses commercial software package.

88 percent librarians responded on the needs of training in use of library software package.

83 percentages librarians undergone computer course for acquiring computer skills.

100 percent librarians responded computer technology helps in developing the professional career.

1.8 Conclusion:

Modern libraries are changed the definition where unlimited information accessed in many forms and from many sources. The library use is not limited in the room, it is accessed in the world by computer technology.

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL



ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - X Issue - II April - June - 2021

ENGLISH PART - III / MARATHI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Professor and Head,
Dept. of Management Studies
University of Madras, Chennai

School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded

EDITORIAL BOARD

Dr. Jagdish R. Baheti
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

Dr. Sadique Razaque
Univ. Department of Psychology.
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

Prof. Ram Nandan Singh
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

Dr. Safiqur Rahman
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

Dr. Deepak Raverkar
Principal, Sundarrao More Arts, Commerce and
Science College, Poladpur, Dist-Raigad.

Prof. Sunil Balkhande
Vice Principal, Associate Professor,
Head, Department of Economics
Sundarrao More Arts, Commerce and Science
College, Poladpur, Dist-Raigad.

Dr. Sameer Butala
Associate Professor, Head, Department of Geography
Sundarrao More Arts, Commerce and Science
College, Poladpur, Dist-Raigad.

Prof. Mahesh Walle
Assistant Professor, Department of Chemistry
(IQAC Coordinator)
Sundarrao More Arts, Commerce and Science
College, Poladpur, Dist-Raigad.

Prof. Snehal Kamble
Assistant Professor, Department of Chemistry
Sundarrao More Arts, Commerce and Science
College, Poladpur, Dist-Raigad.

Dr. Mangesh Gore
Assistant Professor Head, Department of English
Sundarrao More Arts, Commerce and Science
College, Poladpur, Dist-Raigad.

Dr. Sudarshan Dawane
Assistant Professor, Department of Commerce
Sundarrao More Arts, Commerce and Science
College, Poladpur, Dist-Raigad.

Dr. Ram Barkule
Assistant Professor, Head, Department of Physics
Sundarrao More Arts, Commerce and Science
College, Poladpur, Dist-Raigad.

PUBLISHED BY
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

CONTENTS OF MARATHI

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	भारतातील आरोग्य पर्यटन **प्रा. डॉ. अनिल निवृत्ती शिंदे**	१-५
२	कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर प्लेग या साथीच्या आजाराचा इतिहास **प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील**	६-९
३	कोविड-१९ चा आंतरराष्ट्रीय संबंधावर परिणाम **डॉ. प्रा. किशोर कल्लापा म्हेत्री**	१०-१३
४	कोविड-१९ चा सामाजिक आर्थिक परिणाम **प्रा. डॉ. नाथिराम लक्ष्मण राठोड**	१४-१८
५	कोविड-१९ चे भारतावर झालेले परिणाम **डॉ. परदेशी सुनील लक्ष्मण**	१९-२१
६	कोरोना महामारीचा विविध घटकांवरील मानसिक परिणाम **डॉ. सुधाकर शिवाजी जाधव**	२२-२९
७	साथीचे इतर आजार आणि कोरोना यांचा तुलनात्मक फरक **डॉ. प्रभाकर गणपत गावंड**	३०-३६
८	कोरोना साथीचा आजार आणि मानसिक आजार आणि उपाय **डॉ. पुरूषोत्तम परीट** **डॉ. पराग पाटील**	३७-४०
९	आत्मनिर्भर भारत अभियानाचा विश्लेषणात्मक अभ्यास **डॉ. पराग वसंतराव पिंपळापुरे**	४१-४८
१०	कोव्हीड काळातील शिक्षण पद्धती शिक्षक आणि साहित्य **प्रा. डॉ. रवींद्र सोमोशी**	४९-५३
११	कोवीड १९ चे भारतीय समाजावरील परिणाम **प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे**	५४-५७
१२	कोव्हीड १९ चा शासकीय आश्रय शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर झालेला परिणाम **डॉ. शिवाजी टाकळकर** **श्री. संतोष लांडे**	५८-६२

Estd. 1994

॥ विद्या अमृतम अश्नुते ॥
Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal's
SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL
At/Post – Raypatan, Tal – Rajapur, Dist – Ratnagiri – 416 704
First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994
❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956
❖ Best NSS Unit Award at University Level for the year 2017-2018 ❖ ISO 9001:2015 Certified

Principal Dr. M. A. Yellure
M.A., M.Phil, Ph.D. DIHT
Cell No. 9403392105, 9834468690

Telefax – 02353-299181
E-Mail – mhkcollegepachal@gmail.com
Web – www.khapnecollege.com

Permanent Affiliation No.
Aff-II./ICD/2015-2016/1121
dated 16th September 2015

3.3 Research Publication and Awards.

3.3.1. Number of research papers published per teacher in the journals as notified as on UGC CARE LIST during the last five years.

YEAR 2020-21

Yours Faithfully

Principal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

२. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर प्लेग या साथीच्या आजाराचा इतिहास

प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील
श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालय पाचल.

प्रास्ताविक

एकाच गावात राहणाऱ्या लोकांना जेव्हा एकच आजार होतो तेव्हा त्याला साथीचा आजार असे म्हणतात. इ.स. २०२० मध्ये जगावर कोरोनाचे महाभयंकर संकट कोसळले आणि पुन्हा एकदा साथीच्या आजारांचा इतिहास जाणून घेण्याची वेळ मानवावर आली. कारण कोरोना महामारीने जगातील मानवाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक जीवनावर अतिशय विपरीत परीणाम घडवून आणले आहेत. या महामारीतून मानव जातीला वाचवण्यासाठी प्रत्येक देश प्रयत्नशील आहे. अशा वेळी यापूर्वी मानव जातीवर कोरोनासारखी कोणती संकटे आली होती आणि त्यावर मानवाने कशा प्रकारे विजय मिळविला हे पाहणे आवश्यक वाटते. अशा अनेक साथींच्या आजारापैकी प्लेग या साथीच्या आजाराचा इतिहास जाणून घेण्याकरीता या शोधनिबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

आज ज्याप्रमाणे कोरोनामुळे दररोज जगभरातील लाखो लोक मृत्यूमुखी पडत आहेत त्याचप्रमाणे पूर्वीच्या काळी साथीच्या आजारांना तोंड देताना असंख्य लोकांना आपला जीव गमवावा लागत होता. मात्र वैद्यकशास्त्रात प्रगती होत गेल्याने साथीच्या आजारांची कारणे आणि त्यावरील उपाय उपलब्ध होत गेले. असे आजार प्रामुख्याने दुषित पाणी, हवा, डास, पाळीव प्राणी, उंदिर, इ. मार्फत पसरतात. साथीचा आजार झालेली व्यक्ती दुसऱ्या व्यक्तींच्या संपर्कात आल्याने दुसऱ्या व्यक्तीला व त्या दोघांमार्फत पुढे अनेक लोकांपर्यंत हा आजार पसरतो. अशा प्रकारे आजाराचे रूग्ण वाढत जावून त्याचे रूपांतर महामारीमध्ये होते. एका गावामध्ये किंवा एका शहरामध्ये उदभवलेला हा आजार हळूहळू त्या देशामध्ये आणि पुढे पूर्ण जगामध्ये पसरतो. अशा साथीच्या आजारामध्ये प्लेग, क्वॉलरा (पटकी), मलेरिया, देवी, चिकुनगुनिया, ड़ेंगू, पोलिओ, नारू, कोराना, इ. आजारांचा समावेश होता. व्यापार, धर्म प्रसार व राजकीय वर्चस्वासाठी प्राचीन काळापासून लोक एका देशातून दुसऱ्या देशामध्ये प्रवास करीत असत. त्यांच्या मार्फत एका देशात उदभवलेला आजार दुसऱ्या देशात जात होता. या साथीच्या आजारांवरती विविध शास्त्रज्ञांनी संशोधन करून प्रतिबधंक उपाययोजना शोधून काढल्या. त्यामुळे पोलिओ, देवी यासारखे साथीचे आजारांचे उच्चाटन झाले. देवी या रोगावरती डॉ. एडवर्ड

जेन्नर यांनी इ.स. १७९६ मध्ये लस शोधून काढली. त्यानंतर जगभरामध्ये लसीकरणाची मोहिम सुरू झाली. भारतामध्ये १८०४ मध्ये दुसरे बाजीराव पेशवे यांनी स्वतः आणि त्यांच्या कुटूंबाने ती लस एका इंग्रज डॉक्टराकडून टोचून घेतली. तेव्हापासून इंग्रज सरकार आणि भारत सरकार यांनी केलेल्या सततच्या प्रयत्नामुळे १९७५ मध्ये

भारतातून आणि १९७७ मध्ये संपूर्ण जगातून देवीचे निर्मुलन झाले. अशा प्रकारे प्रत्येक आजारावर मात करण्यासाठी मानव प्रयत्न करीत आला आहे.

प्लेगच्या साथीचा इतिहास

जगाच्या इतिहासातील कमी काळात सर्वाधिक बळी घेणारा आजार म्हणून प्लेग हा आजार ओळखला जातो. येर्सिनिया पेस्टिस या जीवाणूद्वारे निरोगी व्यक्तीमध्ये या आजाराचा संसर्ग होतो. प्लेगबाधीत रूग्णाच्या शिंकण्यामुळे, येर्सिनिया पेस्टिस जीवाणू बाधीत दूषित अन्न किंवा पाणी सेवन केल्यामुळे, किटकांमार्फत व अन्य प्राण्यांमार्फत मानवात येतो. खास करून उंदिरामार्फत प्लेगचा प्रसार मोठ्या वेगाने होतो. महत्वाचे म्हणजे प्लेगचा वाहक उंदिर नसून प्लेगबाधीत उंदिरावर वाढलेली पिसू जेव्हा मनुष्याला दंश करते तेव्हा मनुष्यामध्ये या रोगाचे संक्रमण होते. ऐतिहासिक कालखंडामध्ये प्लेगच्या तीन मोठ्या साथी जगामध्ये येवून गेल्या. तसा प्लेग अनेकदा जगामध्ये उदभवला असला तरी या तीन साथीमध्ये अनेक देशातील लाखो लोक बळी गेले. जगाच्या इतिहासामध्ये आणि मानवजातीचा चेहरा मोहरा बदलून टाकणाऱ्या या प्रमुख तीन साथींचा आढावा पुढील प्रमाणे –

१. जस्टिनाईनचा प्लेग (सहावे शतक)

प्लेग या रोगाच्या साथी प्राचीन काळापासून येत असल्याचा उल्लेख वैद्यकशास्त्राच्या इतिहासात येतो. इ.स. २ ऱ्या शतकामध्ये सर्वप्रथम प्लेगची साथ उदभवली होती. मात्र त्याचे महाभयंकर परीणाम इ.स. सहाव्या शतकात पहावयास मिळाले. बायझान्टाईन सम्राट जस्टाईन याच्या नावाने हि साथ ओळखली जाते. ही साथ उद्भवली तेव्हा बायझान्टाईन या युरोपमधील वैभवशाली साम्राज्याचा तो सम्राट होता. उत्तम प्रशासक म्हणून तो ओळखला जात असून त्याने अनेक सुधारणा करून आपले नाव अजरामर केले होते. मात्र त्याच्या राज्यात प्लेगची साथ पसरली आणि हळू हळू ती सर्व जगामध्ये पोहोचली. धान्यासोबत आलेल्या उंदिरांनी व त्यांच्यावरील पिसवांनी ही साथा पसरवण्याचे काम इ.स. ५४१मध्ये केले. य़ा साथीचा प्रसार यरोप, उत्तर अमेरिका व अरेबियामध्ये झाला. तिच्यामध्ये सुमारे तीन त पाच कोटी लोकांचा बळी गेला. काही अभ्यासकांनी जगाची निम्मि लोकसंख्या या आजारामध्ये मृत्यूमुखी पडली. असे म्हटले आहे. यावरून या महामारीचे भयंकर स्वरूप लक्षात येते.

सम्राट जस्टिनाईन या महत्वाकांक्षी सम्राटाला विभागलेले रोमन साम्राज्य एकत्र करावयाचे होते. मात्र महामारीमुळे त्याच्या साम्राज्याला मोठा आर्थिक धक्का बसला आणि त्याचे स्वप्न भंग पावले. युरोपमध्ये ख्रिश्चन धर्म वाढण्याच्या दृष्टिने पुरक परिस्थिती या महामारीमुळे निर्माण झाली. या महामारीबद्दल प्रा. थॉमस मॉकेंटिस म्हणतात की, 'या रोगाशी कसे लढायचे याबाबत लोकांना काहीच कल्पना नव्हती. लागण झालेल्या रूग्णांपासून दूर राहणे एवढेच काय ते माहित होते. ज्या लोकांमध्ये या रोगाची प्रतिकारक्षमता विकसित झाली ते जगले आणि बाकीचे मृत्यूमुखी पडले.'

२. द ब्लॅक डेथ (चौदावे शतक)

सहाव्या शतकातील जस्टीनाईनच्या प्लेगने जगाला मोठा धक्का देवून महामारी काय घडवू शकते हे दाखवून दिले होते. मात्र प्लेगवर परिपूर्ण उपाय न निघाल्याने सतत हि साथ उदभवत राहिली. सहाव्या शतकानंतर

पुढे आठशे वर्षांनी युरोपमध्ये पुन्हा प्लेगची साथ उदभवली. ही साथ इतकी महाभयंकर होती की रस्त्यावर पडलेल् मृतदेहाकडे लक्ष देण्यासही मानवाला वेळ नव्हता. अवघ्या चार वर्षात या महामारीमध्ये सुमारे वीस कोटी लोकांच मृत्यू झाला त्यामुळे प्लेगच्या या साथीला द ब्लॅक डेथ या नावाने ओखळले जाते. या रोगाच्या प्रसाराबद्दल माहित मिळत नसल्याने एवढे लक्षात आले होते की रूग्णाच्या संपर्कात आल्यामुळे या आजाराची लागण होते. त्यामुळ व्हेनिस राज्यात प्लेगच्या संसर्गापासून बचावासाठी रागुसा या बंदर शहराने एक उपाय शोधून काढला होत परदेशातून किंवा इतर बंदरातून आलेल्या जहाजांना तीस दिवसांपर्यंत बंदरापासून काही अंतरावर नांगरून ठेवण त्यानंतर त्या जहाजावरील कोणीही व्यक्ती आजारी पडली नाही तरच त्या जहाजाला रागुसा बंदरात प्रवेश दिला जाई म्हणजे जहाजांना क्वॉरंटाईन करण्यात पद्धत सुरू करण्यात आली. हा कालावधी तीस दिवसांऐवजी पुढे चाळी दिवस ऐवढा करण्यात आला. त्यामुळे क्वॉरंटाईन हा शब्द ईटालियन भाषेतून आला असून 'quaranta giorin म्हणजे चाळीस दिवस अशी पद्धत युरोपात स्विकारली गेली.

प्लेगच्या या दुसऱ्या महामारीचे युरोपिय देशावर गंभीर परिणाम झाले. इंग्लंड आणि फ्रान्स हे बलाढ्य दे इतके हतबल झाले की त्यांच्यामध्ये सुरू झालेले युध्द थांबले. इंग्लंडमध्ये बदलेली आर्थिक परिस्थिती आणि लोकसंख्येचे बदलेले प्रमाण यामुळे जुनी सरंजामी व्यवस्था कोलमडून पडली. तेथे नवी समाजव्यवस्था उभ राहण्याच्या दृष्टिने पुरक परिस्थिती निर्माण झाली. ग्रीनलँडमधील लढवय्ये म्हणून ओळखली जाणारी वायकिंग र जमातीचेही प्लेगमुळे मोठे नुकसान झाले.

३. लंडन प्लेग (सतरावे शतक)

चौदाव्या शतकानंतर पुन्हा सतराव्या शतकामध्ये लंडन शहरामध्येच प्लेगची महाभयंकर साथ येवू त्यामध्ये वीस टक्के लोकांचा मृत्यू झाला. या साथीपासून जनतेचे रक्षण करण्याकरीता सरकारने रूग्णांन इतरांपासून वेगळे ठेवण्याचा (विलगीकरणाचा) कायदा केला. ज्या घरात प्लेगचा रूग्ण असेल त्या घरावर खूण करू त्या घरातील लोकांना सार्वजनिक ठिकाणी जाताना पांढऱ्या रंगाची काठी सोबत न्यावी लागत होती. पाळी प्राण्यामुळे हा रोग पसरतो अशा समजुतीमुळे लाखो प्राण्यांची यावेळी कत्तल झाली. या साथीच्या कालखंडा अवघ्या सात महिन्यात लंडनमधील एक लाख लोकांचा मृत्यू झाला. साथ रोखण्यासाठी सार्वजनिक कार्यक्रम समारंभावर बंदी घालून प्रसार करणाऱ्या रूग्णांना घरी कोंडण्यात आले. ज्या घरामध्ये प्लेगचे रूग्ण आहेत त्यांच्य घरावर पुढे लाल रंगाची फुली मारण्यात येवू लागली. साथीच्या आजारात मोठ्या प्रमाणात लोक मृत्यूमुखी पड असल्याने एकत्रित दफनविधी हा मार्ग स्विकारण्यात आला.

प्लेग रोगावरील लस आणि प्रतिबंधक उपाय

१८९७ मध्ये मुंबईत वॉल्डेमार हाफकिन या रशियन वैद्याने ब्युबॉनिक प्लेग या रोगावरील लस प्रथ शोधून काढली. प्लेग या रोगावर प्रतिजैविकांचे उपचार अधिक प्रभावी ठरतात. या रोगाच्या निर्मुलनासाठी काह उपाय आवश्यक आणि उपयुक्त आहेत. उदा., उंदिर व घूस या प्राण्यांची बिळे होऊ न देणे किंवा खाद्य मिळणार याच काळजी घेणे. मृत प्राण्यांवर किंवा उंदरावर किटकनाशकांचा वापर करून पिसवा होऊ न देणे. आपला परीसर स्वच्

ठेवल्यास प्लेगसारख्या साथीच्या रोगांचे प्रमाण आपोआपच आटोक्यात येईल. भारतामध्ये १९९४ नंतर आजपर्य पुन्हा प्लेगची साथ आलेली नाही.

सारांश

एकाच गावात राहणाऱ्या लोकांना जेव्हा एकच आजार होतो तेव्हा त्याला साथीचा आजार असे म्हणता आज ज्याप्रमाणे कोरोनामुळे दररोज जगभरातील लाखो लोक मृत्यूमुखी पडत आहेत त्याचप्रमाणे पूर्वीच्या का साथीच्या आजारांना तोंड देताना असंख्य लोकांना आपला जीव गमवावा लागत होता. मात्र वैद्यकशास्त्रात प्रग होत गेल्याने साथीच्या आजारांची कारणे आणि त्यावरील उपाय उपलब्ध होत गेले. असे आजार प्रामुख्याने दुषि पाणी, हवा, डास, पाळीव प्राणी, उंदिर, इ. मार्फत पसरतात. वैद्यकशास्त्रामध्ये झालेल्या प्रगतीमुळे या साथीच आजारावर प्रतिबंधात्मक लसींची निर्मिती होवून तो आजार आटोक्यात आणला जात होता. उदा., देवी या रोगावर डॉ. एडवर्ड जेन्नर यांनी इ.स. १७९६ मध्ये शोधून काढली. त्यानंतर जगभरामध्ये लसीकरणाची मोहिम सुरू झाल भारतामध्ये १८०४ मध्ये दुसरे बाजीराव पेशवे यांनी स्वतः आणि त्यांच्या कुटूंबाने ती लस एका इंग्रज डॉक्टराक टोचून घेतली. तेव्हापासून इंग्रज सरकार आणि भारत सरकार यांनी केलेल्या सततच्य प्रयत्नामुळे १९७५ मध भारतातून आणि १९७७ मध्ये संपूर्ण जगातून देवीचे निर्मुलन झाले. अशा प्रकारे प्रत्येक आजारावर मात करण्यासा मानव प्रयत्न करीत आला आहे.

प्लेगच्या साथीचा विचार करता इ.स. दुसऱ्या शतकापासून जगामध्ये हा साथीचा आजार उदभवत आ इ.स. सहाव्या शतकात त्याचे महाभयंकर रूप पहावयास मिळाले. त्याला जस्टानाईनचा प्लेग म्हणून ओळखता हि साथ हळूहळू अनेक देशात पसरली होती. या साथीमध्ये जगातील सुमारे तीन ते पाच कोटी लोक बळी गेले हो त्यानंतर चौदाव्या शतकामध्ये अशीच महाभयंकर प्लेगची महामारी आली होती. तीच्यामध्ये सुमारे वीस को लोकांचा बळी गेला होता. सतराव्या शतकात प्लेगच्या महामारीमध्ये एकट्या लंडन शहरातील वीस टक्के लोकां मृत्यू झाला होता. यावरून साथीचे आजार व त्याचा मानवी जीवनावर होणारा परीणाम लक्षात येतो. प्लेग प्रमाणे इतर साथींच्या आजारातही प्राचीन काळापासून अशाच प्रकारे कोट्यावधी लोकांचा बळी गेलेला आहे.

संदर्भ

१. पेन्डॅमिक दॅट चेंज हिस्टरी लेख; हिस्टरी.कॉम, मराठी अनुवाद – टिम भवताल
२. **Pandemic: Tracking Contagions, from Cholera to Ebola and Beyond Book b Sonia Shaha.**
३. **Marathivishwakosh.org**
४. **mr.wikipedia.org**
५. दैनिक सकाळ

IQAC - Coordinator
i- M. H. Khapane College of
rts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

AJANTA

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

ISSN - 2277 - 5730
Volume - IX, Issue – II, April - June - 2020
Impact Factor 2019 - 6.399 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. प्रमोद एस. मेश्राम

In Recognition of the Publication of the Paper Titled

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर

Ajanta Prakashan,
Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877 Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

Printed by

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Printed by

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877
E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399 (www.sjifactor.com)

CONTENTS OF MARATHI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेती आणि शेतकरी विषयक विचारकार्ये **प्रा. डॉ. दशरथ धर्माजी आदे**	१-५
२	डॉ. बाबासाहेब आंबेउकर यांचे कामगार चळवळी विषय विचार **डॉ. आप्पाराव रामराव वागडव**	६-१०
३	डॉ. बाबासाहेब आंबेडरांची धर्म चिकित्सा **प्रा. डॉ. अप्पाराव चंद्रराव गायकवाड** **प्रा. डॉ. आदमाने भाऊसाहेब बंकट**	११-१७
४	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाकिस्तानसंबंधी विचार **प्रा.हिवाळे मधुकर लक्ष्मण**	१८-२२
५	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल आणि वीज निर्मिती विषयक विचार **डॉ. अरुण योगेश्वर जाधव**	२३-२६
६	डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्थापित समाज समता संघ आणि जातीनिर्मुलन **प्रा. डॉ. किशोर कोंडूबाजी काजळे**	२७-३५
७	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेली वृत्तपत्रे **डॉ. अनिल कठारे**	३६-३९
८	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल **प्रा. लक्ष्मण एफ. शिराळे**	४०-४५
९	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणासाठी योगदान **डॉ. पौर्णिमा शिरिष कोल्हे**	४६-४८
१०	समाजवादासबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका : ऐतिहासिक मागोवा **प्रा. डॉ. प्रकाश फड**	४९-५२
✓ ११	डॉ. वावासाहेव आंबेडकर आणि धर्मांतर **प्रा. प्रमोद एस. मेश्राम**	५३-५६
१२	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य **प्रा. डॉ. प्रतिभा शंकर घाग - सोनी**	५७-६१
१३	डॉ. वावासाहेव आंबेडकर यांचे वर्तमान स्थितीत महिला सक्षमीकरणावद्दलचे विचार **प्रा. डॉ. रामकुमार एम. प्रधान**	६२-६९

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर

प्रा. प्रमोद एस. मेश्राम
सहयोगी प्राध्यापक, श्री मनोहर हरी खापणे कॉलेज, पाचल.

प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वात महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे बौद्ध धम्म दीक्षेची चळवळ होय. भारतात त्यांनी सम्राट अशोकानंतर महत्वपूर्ण कार्य केले. म्हणूनच त्यांना आधुनिक काळातील विचारवंत बौद्ध धम्माचे थोर उपासक, बौद्धधम्म प्रवर्तक, पुनरूत्थान, आधुनिक काळातील सम्राट अशोक अशा वेगवेगळ्या उपमांनी संबोधतात. जागतिक दृष्टीकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, धम्मदीक्षा किंवा धम्मचक्र प्रवर्तन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. कुठल्याही रक्तपाताविना केलेली ती एक सामाजिक क्रांती होती. लाखो अनुयायांनी आपल्या मुक्तीदात्यावर विश्वास ठेवून बौद्ध धम्माचा स्वीकार करणे ही क्रांतीकारक घटना होती.

ज्यांनी-ज्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला त्यांनी एका फटक्यात आपल्या पूर्वीच्या परंपरा, तिरस्कारयुक्त जीने, जातीयता, देव-देवस्की सोडून देऊन स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणायला सुरूवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमवेत ज्यांनी-ज्यांनी 'नवयान' बौद्धधम्म स्वीकारला त्यांच्यात अनुलनीय परिवर्तन घडून आल्याचे दिसून आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'महापरिनिर्वाणानंतर'ही 'मी सारा भारत बुद्धमय करेन' या त्यांच्या घोषणेला 'भैयासाहेब आंबेडकरांनी गती देऊन संपूर्ण भारतात 'बौद्धधम्म दीक्षेची' चळवळ सुरू केली. कधिही न संपणारी ही क्रांती आजही लक्ष्मण माने, हनुमंतद उपरे व इतरांनी चालू ठेवलेली असल्याचे दिसून येते.

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य

मध्यप्रदेशातील महू येथे 14 एप्रिल 1891 साली भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म झाला. सातारा येथे वास्तव्याला आल्यानंतर त्यांनीही अस्पृश्यतेचे चटके अनुभवलेले होते. यासंबंधी धनंजय कीर म्हणतात, 'अस्पृश्यतेच्या दंशाची जाणीव बाळ भीमाच्या मनाला बालवयातच झाली. बाजारात दुकानदार आईपुढे दुरून कापड टाकताना त्याने पाहिले होते. शालेय जीवनात छोट्या भीमाला अस्पृश्येच्या कलकांची जाणीव होऊ लागली. त्याच्या बालमनांवर आघात व्हायला आरंभ झाला.(1) अशी अस्पृश्यता त्यांनी बौद्धधम्म दीक्षेच्या समारंभापर्यंत अनेक प्रकारे सहन केली होती. त्यामुळे त्यांनाही हिंदू समाजातील अस्तित्वात असलेल्या अनेक रूढीपरंपरांचा जवळून अनुभव आलेला होता.

अस्पृश्य समाजाची स्थिती हिंदू समाजात असलेल्या अनेक परंपरामुळे जाचक, नरकयातनेसारखी बनलेली होती आणि म्हणूनच अस्पृश्यांच्या चळवळीनंतर समाजात जागृती निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1920 पासून सामाजिक, राजकीय चळवळीला सुरूवात केली. त्यासाठी त्यांनी 20 जुलै 1924 रोजी मुंबई येथे 'बहिष्कृत हितकारिणी सभेची' सुरूवात केली.

हिंदू समाजव्यवस्थेने अस्पृश्यांचे जींवन गुलामगिरी, वेठबिगारी, भेदभाव, जातिव्यवस्था यांसारख्या अनेक प्रथांमुळे नरकयातनेसारखे झाले होते. त्यांना 'स्पृश्य-अस्पृश्यतेमुळे खालच्या दर्जाची कामेसुद्धा मिळत नव्हती. त्यामुळे गावात भीक मागून जगण्यापलीकडे दुसरा कोणताच मार्ग नव्हता.'(2) सर्वच ठिकाणी त्यांचा भेदभाव केला जात असल्यामुळे त्यांनीही आपली स्वत:ची वेगळी संस्कृती निर्माण केली होती. गावाबाहेरचे जीनं ते जगत होते. हिंदू व्यवस्थेतील या सर्व बाबींमुळे अस्पृश्य समाजाला सोसाव्या लागणाऱ्या

नरकयातना पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मन उद्विग्न झाले होते. म्हणूनच त्यांनीही तेवढ्याच प्रखरतेने अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी न्यायाचा, सत्याग्रहाचा लढा सुरू केला.

सी. के. बोले यांच्या मुंबई विधिमंडळातील ठरावानुसार महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला 19 व 20 मार्च 1927 रोजी सुरूवात केली. ही मानवमुक्तीची सुरूवात होती. 20 मार्च 1927 रोजी आपल्या हजारो अनुयांया समवेत चवदार तळ्यातील पाणी आपल्या ओंजळीने प्राशन करून आम्ही अस्पृश्य नाहीत हे सिद्ध केले. नंतर हा लढा न्यायालयात गेला. या चवदार तळ्याचा निकाल 17 मार्च 1937 रोजी लागला. या निर्णयामुळे चवदार तळे अस्पृश्यांना खुले झाले. यासंबंधात एलिनार झोलियट म्हणतात, ‘The mahad satyagraha failed to achieve its specific purpose of the time, but was successful as a rellying point for the internal reform of the Depressed classes and the public expression of their grievances and the stimulation of a sense of Unity.’(3)

या सत्याग्रहाचे दुरगामी परिणाम दिसू लागले. अस्पृश्य समाजात जागृतीची भावना निर्माण झाली. सामाजिक न्यायाच्या लढ्यानंतर धार्मिक क्रांतीला सुरूवात झाली. 2 मार्च 1930 पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रहाला सुरूवात झाली. हा लढा 1935 पर्यंत सुरू होता. पाच वर्षाच्या संघर्षानंतर 1935 ला सरकारच्या हस्तक्षेपामुळे नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले झाले. सत्याग्रहाची चळवळ हळूहळू सर्वत्रच सुरू झाली होती. अमरावती येथील अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह पुणे येथील पर्वती मंदिर सत्याग्रह, मुखेडचा सत्याग्रह व इतरही सत्याग्रह झालेत. आतापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात अस्पृश्यांनी सनदशीर मार्गाने देवांचे दर्शन घेण्यासाठी सत्याग्रह केले होते. मात्र हिंदू समाजाकडून अस्पृश्यांच्या चळवळींना विरोध झाला होता. त्यामुळे अस्पृश्यांनाही हिंदू धर्मात मानाचे स्थान मिळेल अशी आशा लोप पावली होती. या सत्याग्रहानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिंदू धर्माप्रती असलेला आशावाद संपला असल्याचे दिसून येते.

2) येवला परिषदेत धर्मांतराची घोषणा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चालविलेल्या सत्याग्रहामुळे अस्पृश्य समाज जागृत होत होता. सत्याग्रहाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्यांचे मानवीय अधिकार मिळवून द्यायचे होते. परंतु ते स्पृश्यांच्या सनातनी वृत्तीमुळे शक्य झाले नाही. त्यामुळेच या सर्व घटनांचा त्यांच्यावर प्रतिकूल परिणाम झाला आणि म्हणूनच त्यांच्या मनात धर्मांतराचा विचार बळावत गेला.

13 ऑक्टोबर 1935 रोजी येवला येथे अस्पृश्य वर्गाच्या गेल्या दहा वर्षाच्या चळवळींचा आढावा घेण्यासाठी तसेच माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणेच्या दृष्टीने आपले धोरण ठरविण्याच्या उद्देशाने भरविण्यात आली होती. अध्यक्षपदावरून बोलताना ते या परिषदेत म्हणाले, ‘दुर्दैवाने अस्पृश्य हिंदू असा डाग घेऊन मी जन्माला आलो, पण ती गोष्ट माझ्या स्वाधीन नव्हती. तथापि, हा नीच दर्जा झुगारून देऊन ही स्थिती सुधारणे मला शक्य आहे आणि मी ते करणारच याबद्दल मुळीच शंकाच नको. मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की, हिंदू म्हणवून घेत मी मरणार नाही.’(4) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या घोषणेचा सर्वांना आनंद झाला. मात्र या वेळी आपण कोणता धम्म स्वीकारणार हे निश्चित केले नव्हते. या घोषणेचा अस्पृश्यांवर दूरगामी परिणाम दिसून आला. त्यांनी हिंदूचे सण, उत्सव, देवपूजा व त्यांच्या चालीरीतींचा त्याग करायला सुरूवात केली, दुसरा परिणाम असा दिसून आला की, हिंदूनी प्रतिकूल मते नोंदवायला सुरवात केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या घोषणेनंतर त्या घोषणेचे जागतिक परिणाम दिसून आले. भारतातील ख्रिस्ती, हिंदू, मुस्लीम, बौद्ध धर्मांच्या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटी घ्यायला सुरवात केली. अस्पृश्यांना आपल्या धर्मात घेण्यासाठी सर्वप्रथम ख्रिस्ती लोकांनी जाहीर चळवळ सुरू केली. त्यासाठी लंडनमधील मि. गॉडफ्रे या धर्मप्रचारकाने हजारो पौंड गोळा केले होते. डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांच्या या घोषणेचा हिंदूवर असा परिणाम झाला की, 'हिंदू धर्मात व सामाजिक आचार-विचारात कितपत सुधारणा केल्या, तर अस्पृश्य लोक हिंदू धर्मात राहतील, असा अंदाज बांधणारा एक वर्ग हिंदू समाजात उत्पन्न झाला. अस्पृश्यांनी धर्मांतर तर करावे, पण त्यांनी मुसलमान धर्म स्वीकारू नये अशी विचारसरणी व्यक्त करणारा दुसरा सवर्ण वर्ग हिंदूत उत्पन्न झाला.'(5) धर्मांतराबाबत हिंदू समाजात दोन परस्परविरोधी भूमिका निर्माण झाल्या होत्या.

3) मुक्ती कोण पंथे?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येवला येथे केलेल्या धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा देणाऱ्या एकूण तीन परिषदा भरवल्या होत्या. त्यामधील 'मुंबई इलाखा महार परिषद' ही अत्यंत महत्वपूर्ण होती. 30 मे 1936 ला परिषद भरली होती. सर्वांनी एकत्र जमून धर्मांतरासंबंधी निर्णयात्मक चर्चा करण्यासाठी ही परिषद आयोजित केली होती. त्यामुळे अस्पृश्यांच्या मनात उत्साह होता. याच परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात दोन ठराव पास झाले.

'मुंबई इलाखात्यातील महार जातीची ही परिषद पूर्ण विचारांती असे जाहीर करते की, महार जातीला समाजात समता, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी धर्मांतर करणे हा एकच उपाय आहे. ही परिषद आमचे एकमेव परमपूज्य पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निश्चयपूर्वक असे जाहीर आश्वासन देते की, महार समाज सामुदायिकरीत्या धर्मांतर करण्यास तयार आहे.'(6) याच परिषदेतून धर्मांतर का करायचे याची अनेक कारणे सांगितली गेली म्हणून ही परिषद अत्यंत महत्वाची असल्याचे मानले जाते.

4) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध धर्मांविषयीचे चिंतन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेला विरोध होत होता आणि त्यामुळेच त्यांनी घाई केली नाही. याच काळात त्यांनी भारतातील विद्यमान धर्मांचा अभ्यास करायला सुरवात केली. त्यासाठी त्यांनी ईस्लाम, शिख, ख्रिश्चन आणि बौद्ध धर्मांचा अभ्यास केला. शेवटी बौद्ध धर्मांकडे त्यांचा अधिक कल दिसू लागला. यासंबंधी 6 जून 1950 च्या कोलंबो येथील भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'जगातील सर्वधर्मांचा मी अभ्यास केला आणि आज शेवटी एका अपरिहार्य निर्णयापर्यंत येऊन पोहोचलो आहे. बौध्द धर्मांशिवाय अस्पृश्यांना दुसरा कोणताही मुक्तीचा मार्ग नाही. फक्त बौद्ध धर्मातच अस्पृश्यतेच्या निवारणाचा चिरकालीन उपाय आहे. जर तुम्हास समेतेचे तत्व हवे असेल आणि आर्थिक दास्यातून मुक्तता करारयाची असेल तर बौद्धवादाशिवाय कोठेच दुसरा आश्रय नाही.'(7) धर्मांतराच्या बाबतीत त्यांच्या मनात बौध्द धम्माशिवाय इतर कोणताही धर्म नव्हता.

5) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामुदायिक धर्मांतर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण जगातील धर्मांचा अभ्यास केल्यानंतर स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय असलेला बौध्द धम्म स्वीकारण्याचे निश्चित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वपत्नीसह 2 मे 1950 रोजी दिल्लीच्या बौध्द विहारात बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. यासंबंधी डॉ. प्रदीप आगलावे म्हणतात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 2 मे 1950 ला आपली पत्नी डॉ. माईसाहेब सोबत दिल्लीच्या बौद्ध विहारात बौद्धधम्माची दीक्षा घेतली होती.'(8) परंतु सामुदायिक बौद्धधम्माची दीक्षा घेण्यासाठी बुद्धगया, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, सारनाथ, कुशीनगर अशी ठिकाणे ही त्यांच्या मनात होती. मात्र या सर्वांमध्ये नागपूरचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेऊन नागपूर शहराची निवड सामुदायिक धर्मांतरासाठी निश्चित केली. या समारंभासाठी देशातील लाखो अस्पृश्य बांधव आले होते. त्यांच्यात कमालीचा उत्साह होता.

'ता. 14/10/1956 नागपूर येथे, अंबाझरी रोडवरील भव्य मंडपात सकाळी 9.30चे सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सौ. माईसाहेब आंबेडकर यांचा बौद्ध दीक्षा विधी पूज्य चंद्रमणी महास्थवीर यांच्या शुभहस्ते पार पडला. प्रथम चंद्रमणी महाथेरो यांनी डॉ.

बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब यांचा दीक्षा विधी केल्यानंतर पुन: त्याच मंडपात, खुद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुमारे पाच लाखापेक्षा अधिक अस्पृश्य बांधवांना स्वत: बौद्धधम्म दीक्षा दिली.'(९) बावीस प्रतिज्ञाही दिल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित 'नवयान' बौद्ध धम्म पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांनी स्वीकारलेला होता. याशिवाय इतर अनेक स्पृश्य व्यक्तिनींही (हिंदूनी) बौद्धधम्माची दीक्षा घेतलेली होती. ही अस्पृश्यांतील बदलाची क्रांती समजली जाते.16 ऑक्टोबरला चंद्रपूर येथेही तीन लाख लोकांना बौद्धधम्माची दीक्षा दिली. 16 डिसेंबर 1956 रोजी मुंबईत सामुदायिक बौद्धधम्म दीक्षेचा कार्यक्रम घडवून आणायचा होता. मात्र त्या अगोदरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'महापरिनिर्वाण' झाले. त्यामुळे मुंबईतील बौद्धधम्म दीक्षा समारंभाचा कार्यक्रम झाला नाही. त्यानंतर भैयासाहेब आंबेडकरांनी बौद्धधम्म दीक्षेची चळवळ संपूर्ण भारतात घडवून आणली.

सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात अस्पृश्यांनी केलेले धर्मांतर, धम्मक्रांती, धम्मचक्र प्रवर्तन, ही अभूतपूर्व घटना आहे. अस्पृश्यांनी कोणत्याही प्रलोभनाशिवाय, बळजबरीशिवाय स्वयंप्रेरणेने आपल्या मार्गदर्शक उद्धारकर्त्यांवर विश्वास ठेवून एका झटक्यात अस्पृश्यता टाकून देत बौद्धधम्माचा स्वीकार केला होता. यामुळे अस्पृश्यांना बौध्द ही नवी ओळख मिळाली. बौध्द झोलेल्या समाजाने पूर्वीची घाणेरडी कामे करण्याचे सोडून देऊन स्वत:मध्ये परिवर्तन करायला सुरूवात केली. बौद्धधम्माच्या स्वीकारामुळे स्वत:मध्ये शिक्षणाची कास धरून, शिक्षीत होऊन मोठमोठ्या पदांवर आरूढ झाले. याशिवाय जुन्या परंपरा सोडून दिल्या.

संदर्भ

1) किर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन, प्रा. लि. 35, ताडदेव मुंबई सहावी आवृत्ती, 1989, पृ. 17
2) खरात शंकरराव (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार', इंद्रायणी प्रकाशन पुणे, 2008, पृ. 14
3) Zeliot Eleanar, 'From Untouchables to Dalit, Manohar Publication , Ansari Road, New Delhi, Reprint 2005, Page 27
4) मून वसंत, नरके हरी (संपा.); 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे', खंड 18 भाग 1, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरीत्र प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई 2002, पृ. 432
5) खैरमोडे चां. भ., 'डॉ. भीमराव व रामजी आंबेडकर' खंड 6, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे, दुसरी आवृत्ती 1988, पृ. 69
6) मून वसंत, हरी नरके (संपा.), पूर्वोक्त, पृ, 490
7) कित्ता पृ. 217
8) आगलारे प्रदीप, 'धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन', आयुक्त महानगरपाकि औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2009, पृ. 44
9) प्रबुद्ध भारत, दीक्षा विशेषांक, पृ. 06

Jawahar Education Society's

VAIDYANATH COLLEGE

Parli Vaijnath, Dist-Beed. (M.S.)

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad affiliated and Department of History, Sociology & Zoology, Vaidyanath College, Parli-Vaijnath organized Two Days National Level Interdisciplinary Online Seminar on

THOUGHTS OF DR. BABASAHEB AMBEDKAR

Certificate

This is to certify that प्रा. प्रमोद एस. मेश्राम, सहयोगी प्राध्यापक, श्री मनोहर हरी खापणे कॉलेज, पाचल. has participated and presented a paper titled ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर'' in the Two Days National Level Interdisciplinary Online Seminar on "Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar" organized by Dept. of History, Sociology & Zoology, Vaidyanath College, Parali-Vaijnath, Dist.-Beed (M.S.) on 06 & 07 June, 2020.

His/her paper has been published in UGC Referred Journal No.- 40776 - Ajanta - ISSN - 2277 - 5730 with Impact Factor - 6.399

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratna

Gaikwad

Dr. B. K. Shep
Convener

Dr. R. D. Rathod
Convener

Dr. V. B. Gaikwad
Convener

Dr. R. K. Ippar
Principal

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

AJANTA

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

ISSN - 2277 - 5730
Volume - IX, Issue – II, April - June - 2020
Impact Factor 2019 - 6.399 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रमोद एस. मेश्राम

In Recognition of the Publication of the Paper Titled

भारतातील सामाजिक जीवन व मानवी हक्क

Editor : Vinay S. Hatole

Ajanta Prakashan,
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com,

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - I / HINDI

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

CONTENTS OF HINDI

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	मानव अधिकार और कोविड-१९ **डॉ. विद्या शशीशेखर शिंदे**	१-४
२	Challenges and Significance of Human Right **Dr. Binay Kumar Singh**	५-९
३	महामारी की स्थिती में मानव अधिकार विशेष संदर्भ भारत **प्रा. डॉ. संतोष शिवकुमार खत्री**	१०-१५
४	कोविड-१९ वैश्विक महामारी और मानवाधिकार **Prof. V. K. Gupta**	१६-२२
५	मानवाधिकार : एक विशलेषण **प्रकाश चन्द्र दास**	२३-२७
६	मानव अधिकार एवं राजनीतिक स्थिति **मनीष महन्त**	२८-२९
७	बदलते परिवेश में भारत के सामने मानवाधिकार चुनौतियां व समाधान **आशा राजपुरोहित**	३०-३२
८	मानवाधिकार तथा उसका अवधारणात्मक विकासक्रम **डॉ. गौरव कुमार मिश्र**	३३-३५
९	वर्तमान परिवेश में मानवाधिकार : एक विश्लेषणात्मक अध्ययन **डॉ. शिखा जैन**	३६-३९
१० ✓	भारतातील सामाजिक जीवन व मानवी हक्क **प्रमोद एस. मेश्राम**	४०-४५

१०. भारतातील सामाजिक जीवन व मानवी हक्क

प्रमोद एस. मेश्राम
सहयोगी प्राध्यापक, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल.

प्रस्तावना

मानवी जीवनात मानव हा जन्मतः स्वतंत्र असून समाजातील प्रत्येकालाच प्रतिष्ठित जीवन जगण्याचा अधिकार भारतातील लोकांना भारतीय संविधानाने दिलेले आहेत.या मानवी हक्कामुळे समाजातील खालच्या स्तरातील समूहांना सूरक्षिततेची हमी मिळाली आहे. असे जरी असले तरी या हक्कांची अंमलबजावणी पूर्णतः होत नसल्यामुळे लोकांना अनेक प्रकारच्या अत्याचारांचा सामना करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. भारतात मानवी हक्कांची पूर्णपणे अंमलबजावणी झाल्यास अनेक प्रकारच्या अत्याचारांना थांबविता येइल. मानवी हक्कांचा उद्देश नागरिकांना सूरक्षितता प्रदान करणे हा असतो. परंतु इथे कितेकवेळा सरकारकडूनच त्या हक्कांवर गदा आणली जाते. लोकशाही प्रदान देशामध्ये अनेक प्रकारचे भ्रष्टाचार, खून, बलत्कार घडत असताना सरकारच्या राजकीय हस्तक्षेपामुळे नागरिकांच्या हक्कांवर अतिक्रमण होत आहे. कैंद्राप्रमाणे प्रत्येक राज्य सरकारानी मानवी हक्कांचे रक्षण करणे अपेक्षित आहे पण तसे न झाल्यामुळे समाजाला अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते.

१० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसभेने " मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा " स्वीकृत करून संमत केला. त्याच्या जाहीरनाम्याच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, सर्व मानवांना समान हक्क मिळणे आणि त्यांच्या प्रतीष्ठेचे रक्षण करणे हा जगातील स्वातंत्र, न्याय व शांतता यांचा पाया आहे. जगाच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात एक महत्त्वाचे बिरूद म्हणून मानवी हक्क संकल्पनेचा उदय झालेला दिसून येतो. येतो. तथापि दुसऱ्या महायुद्धानंतर उदयाला आलेल्या मानवी हक्क संकल्पनेने राष्ट्र-राज्याच्या सीमा ओलांडून हक्कविषयक चर्चा विश्वाला वेगळे परिणाम दिले. आज राष्ट्र राज्याच्या कार्यक्षेत्रातील व्यक्तीला जन्मतःच काही हक्क प्राप्त होतात, ही संकल्पना मान्य झालेली आहे. आज राष्ट्र-राज्याच्या कार्यक्षेत्रातील व्यक्तीच्या मानवी हक्कांबरोबर आपण कोणत्याही, राज्यहीन, विस्थापित व निर्वासितांच्या हक्कांची चर्चा करून शकतो आणि म्हणूनच मानवी हक्कांचे उल्लंघन हा कळीचा मुद्दा बनला आहे. आज एखाद्या राज्यात राज्यात किंवा राष्ट्रात मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्यास राष्ट्रीयत्वच नाही, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर पातळीवर टिकेला सामोरे जावे लागते. मानवी हक्क हे नागरी हक्क, राजकीय हक्क व आर्थिक आणि सामाजिक हक्क समाजाला प्रदान करते. यातील नागरी हक्कांमध्ये समानतेचा हक्क, भाषण स्वातंत्र, देशात कुठेही वास्तव्य करण्याचा हक्क , शांततेसाठी संगठना स्थापन्याचा हक्क, धार्मिक स्वातंत्र, जगण्याचा हक्क संपत्ती जमा करण्याचा हक्क इत्यादी हक्क प्रदान केले जातात. या हक्कांची कायदेशीर

पणे अंमलबजावणी केली तर शासनाच्या परिभाषेत अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना कदाचित न्याय मिळू शकेल.

मानवी हक्क म्हणजे काय?

कोणत्याही राष्ट्राची प्रतिष्ठा त्याने आपल्या नागरिकांना दिलेल्या हक्कांवरून ओळखली जाते. माणसाला माणूस म्हणून समाजामध्ये वावरण्यासाठी आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी आणि आपली सर्वांगीण प्रगती व विकास साधण्यासाठी मानवी हक्कांची गरज असते. थोडक्यात असे की, व्यक्तीला कोणत्याही अडथळ्याविना स्वतःचा विकास साध्य करता यावा यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे म्हणजे हक्क होय. याचाच अर्थ असा की, मानवी हक्कांची संकल्पना राज्याच्या सीमेपलीकडे जाऊन मानवाच्या वैश्विक हक्काची परिभाषा मांडते. मानवी हक्क संकल्पनेचे गृहितक असे आहे की, 'सर्व मनुष्य मात्र हे समान आहेत, म्हणून त्यांना प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्यासाठी काही समान हक्क उपलब्ध असले पाहिजेत. कोणतीही जात, वंश, भाषा, वांशिकता, धर्म, संस्कृती आणि राष्ट्रीयता यामध्ये भेदभाव न करता स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी काही हक्क उपलब्ध असले पाहिजेत'१.

जगातील सर्व मानव समान आहेत व जगातील सर्व मनुष्यांना काही समान मूलभूत गरजा असतात या दोन पायाभूत गृहितकांवर मानवी हक्कांची संकल्पना उभी आहे. मानवाच्या प्रागैतिहासिक काळापासून हक्कविषयक संकल्पनेचे संकेत मिळतात. 'ज्यामध्ये पश्चिम युरोपातील उरचा नम्मू (उरचा राजा) याने स्थापन केलेली कायदेसंहिता (बी.सी.२०५०), प्राचीन भारतात अशोकच्या काळात नागरी हक्कांची पायाभूत तत्वे निर्माण करण्यात आली. ज्याने कलिंगच्या युद्धानंतर बौद्धधर्माचा स्वीकार करून अहिंसा, सहिष्णुता, पालक, गुरुजन सर्वांप्रती आदर, मैत्रीभाव या तत्वांचा अंगीकार केला. वेद, बायबल, कुराण यामध्येही लोकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सांगितल्या आहेत. आधुनिक काळात अमेरिका व फ्रेंच राज्यक्रांतीने मानवाच्या अभिन्न अशा नैसर्गिक हक्कांची क्रांतिकारी संकल्पना मांडलेली आढळते'२ .

ज्यामध्ये गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्यामध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेने जोर धरल्याने दक्षिण अमेरिका, आफ्रिका व आशियाई खंडातील अनेक वसाहती स्वतंत्र बनल्या. या बहुतांश राष्ट्रांनी आपल्या राष्ट्रीय संविधानामध्ये लोकशाही शासनप्रणालीचा स्वीकार करून आपल्या नागरिकांना काही मूलभूत हक्क बहाल केले. यातूनच मानवी हक्कांचा पाया रचला गेला.

भारतीय संविधानातील मानवी हक्क

भारतीय घटनेच्या सरनाम्यातच मानवी हक्कांची आधारशिला असणाऱ्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय याप्रती निःसंदिग्ध स्वरूपात बांधिलकी व्यक्त करण्यात आलेली आहे. घटनेच्या विभाग ३ मधील १२ ते ३५ ही कलमे व्यक्तींच्या मूलभूत हक्कांशी संबंधित आहेत. ज्यामध्ये भारतीय सहा प्रकारचे हक्क भारतीय नागरिकांना प्रदान केलेले आहेत.

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग कायदा १९९३ मध्ये स्थापन करण्यात आला. ज्यात नागरीकांच्या जीवित, स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याच्या मानवी हक्कांचे योग्य रीतीने संरक्षण केले जाते की नाही हे बघण्यासाठी आयोग महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो.

भारतातील मानविधकारासंबंधी कळीचे मुद्दे

राज्यघटनेची चौकट असूनही अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या मानवी हक्कावर घाला घालण्याचे काम उच्च वर्गीयाकडून फार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. भारतात स्थानिक पातडी वर मानवाधिकारांचे उल्लंघन फार मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. त्यामुळे या लोकांच्या जीवनावर त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. त्यातील महत्त्वपूर्ण घटक पुढीलप्रमाणे:

१) पोलीस, सुरक्षा व लष्करी दले यांच्या दमनकारी कारवाया:

अनेकवेळा शासकीय यंत्रणाकडून निरपराध व्यक्ती व गटांना लक्ष केले जाते. समाजातील विघातक कृतींचा बीमोड करण्यासाठी केवळ लष्करी उपाययोजनांवर भर दिल्यामुळे सामान्य जनजीवन दुरापास्त होते. परिणामी शासकीय यंत्रणा दमनकारी बनून मानवी हक्कांच्या उल्लंघनास जबाबदार असते. अलीकडे अनेक घटनांतून पुढे आलेल्या खोट्या पोलीस चकमकी मानवी हक्कांचे उल्लंघन करताना दिसतात. प्रभावी प्रसार माध्यमे व न्यायव्यवस्था असतानादेखील प्रशासन मानवी हक्कांची अर्थपूर्ण हमी देण्यास अपयशी ठरले आहे.

२) कैद्यांचा छळ:

कैद्यांच्या हक्कासंबंधी वेगळा कायदा अजूनही स्वीकारण्यात आलेला नाही. परिणामी असलेली यंत्रणा कैद्यांशी मनमानी व अमानवी स्वरूपाची वर्तणूक देताना आढळून येते.

३) फाशीची शिक्षा:

मानवी हक्कांमध्ये प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याचा अधिकार बहाल केलेला आहे. त्यामुळे अमनेस्टी इंटरनॅशनल या संस्थेच्या मते फाशीची शिक्षा ही मानवी हक्कांच्या कल्पनेशी विसंगत ठरते.

४) स्त्रीविरोधी हिंसा:

स्त्री व पुरुष हे भारतीय घटनेनुसार समान असताना देखील खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रात स्त्रीला समानतेची वागणूक दिली जात नाही. त्यामुळेच स्त्री-भ्रूण हत्या, बालविवाह, लैंगिक छळ-अत्याचार, बलात्कार, हुंडाबळी यांसारख्या समस्यांना सामोरे जावेच लागते. आधुनिक भारताने जागतिकीकरणाची भूमिका स्वीकारली असली, तरी स्त्रीकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन बदलेला नाही. स्त्रियांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. दिवसेंदिवस लैंगिक शोषणाच्या घटनांमध्ये वाढ होतांना दिसून येत आहे. देश्यात प्रत्येक दोन तासाला एक घटना घडून येत आहे. मात्र, अश्या घटना लाजेस्तव त्या स्त्रिया नोंद पोलीसांकडे करीत नाहीत. १६ डिसेंबर २०१२ रोजी दिल्लीत चालत्या बसमध्ये

सामुहिक बलत्कार करून त्या मुलीची हत्या करण्यात आली. भारतात मध्यप्रदेश व दिल्लीत अश्या घटना अधिक प्रमाणात घडून येताना दिसून येत आहे. तरीही इतर प्रदेश्यात अश्या घटना होत नाहीत असा त्याचा अर्थ नाही.

५) दुर्बल घटकांवरील अत्याचारः

भारतीय घटनेने जरी जात, धर्म, लिंग, अस्पृश्यता यांसारख्या सर्व बाबी कालबाह्य ठरवलेल्या असल्या तरी आजही आधुनिक भारतात जातीवास्तव्याचे नकारात्मक, विषम व शोषणकारी परिणामच भोगावे लागत आहेत. ग्रामीण भागात अत्याचार, अन्याय व हालअपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. ही स्थिती भारत, आज महासत्तेकडे झुकलेला असतानादेखील आजही भारतातील संपूर्ण राज्यात दिसून येते. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी प्रबोधनाची पार्श्वभूमी असलेल्या राज्यात तीव्र पडसाद दिसून येतात. याचे जिवंत उदाहरण म्हणजे खैरलांजी येथे झालेले प्रकरण होय. ही केवळ सामाजिक, आर्थिक वंचितांच्याच वाटेला आलेली दिसते. त्यातही शिक्षणाचा अभाव, कनिष्ठ प्रतीचे काम, बेकारी, दारिद्र्य यामुळे प्रतिष्ठापूर्वक जीवन जगणे अशक्य झालेले आहे. प्रत्येक क्षेत्रात दुय्यमत्व वाट्याला आल्यामुळे स्त्रिया लैंगिक शोषणाच्या बळी पडताना दिसत आहेत.

उत्तरप्रदेश्यातील हाथरस येथील अनुसूचित जातीच्या मुलीवर तेथील नराधमांनी बलत्कार केला. तिचा मृत्यू झाला. हा गंभीर गुन्हा तेथील उच्चभ्रू लोकांनी घडवून आणला हे तेथील सरकारला माहित होते. या लोकांना वाचविण्यासाठी राजकीय हस्तक्षेप फार मोठ्या प्रमाणात झाला. अनेक बातमीदारांना, विरोधी पक्षातिल राजकीय लोकांना त्या पिडीतांना भेटण्यापासून वचित ठेवण्यात आले. ही घटना मानवी हक्कांचे उल्लघन करणारी आहे. संपूर्ण भारतभर या घटनेचा राजकीय लोकांनी , सामाजिक कार्यकर्त्यांनी निषेध केला असला तरी त्या पिडीत लोकांना न्यायाची अपेक्षा असूनदेखील न्याय मिळेल किवा नाही हा प्रश्नच आहे. कारण महाराष्ट्रातील वरील घटना बघितली तर असे दिसून येते की, भंडारा जिल्ह्यातील भोतमांगे कुटुंब न्यायाविना संपला. मग या लोकांना न्याय मिळेलच याची शास्वती देता येत नाही. याचे मुळ कारण राजकीय अनास्था आहे. एवढे निश्चित की, राज्यघटनेची चौकट ही यंत्रणा मोडून काढीत आहे. मानवी हक्कापासून या लोकांचे हणन करीत आहे.

६. बालमजुरीः

भारतातील अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांकडे आर्थिक पाठबळ फार अधिक प्रमाणात नाही. या समुदायातील कित्येक लोक अजूनही दारिद्र्य रेषेच्या खालीच आहेत. अश्या लोकांना भीख मागण्यास प्रवृत्त करणे, बळजबरीने हक्कांचे कामगार म्हणून वाईट कामाला लावणे असे प्रकार सर्हास होतांना दिसून येत आहेत. एका पाहणीनुसार ८७ कामगार हे अनुसूचित जाती जमाती मधील आहेत हे दिसून आले.

बालमजुरी ही एक भारतीय समाजातील महत्वाची समस्या बनलेली आहे. दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता या समस्यांच्या चक्रातून बालमजुरीची समस्या उद्भवलेली आढळते. कुटुंबात उत्पन्नाचे साधन

नसल्यामुळे व मुलांना शिक्षण देणेही शक्य नसल्यामुळे मुलांना बालमजुरीवर पाठविले जाते. सुशिक्षित समाजही स्वस्त दराने कामगार उपलब्ध होतो म्हणून या प्रथेला खतपाणी घालतो. ही बालमजुरीची प्रथा मानवी अधिकाराचे उल्लंघन करणारी ठरते. तरी आजही यासारख्या समस्या कायदे असूनही पूर्णपणे संपल्याचे दिसत नाही. आजही ही समस्या तीव्र स्वरूपाचीच असल्याचे दिसून येते.

भारताने जागतिकीकरणाच्या रेट्यात पाऊल टाकल्यानंतर जवळपास सर्वच क्षेत्रावर त्याचा कमी-अधिक प्रमाणावर प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यातच सक्तीच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने झटकलेली आहे. डॉ. आनंद तेलतुंबडे यांच्या मते 'शिक्षणाच्या बाबतीत जागतिकीकरणाच्या चळवळीच्या काळात मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण, व्यापारीकरण व अभिजातीकरण झालेले आहे. विशेष महत्त्वाचे म्हणजे खाजगी संस्थांमध्ये जागतिकीरणाच्या कृतीमुळे दलितांना आरक्षणसुद्धा नाकारण्यात आलेले आहे. त्याची झळ अन्य जातीतल्या उतरंडीवरील दुर्बल घटकांना बसेल हे निश्चितच यातून स्पष्ट होते'[३] .

'१९९० च्या दशकात जमातवादाची समस्या पुढे आली ज्यामध्ये मुंबईची दंगल (१९९२-९३), गुजरातमधील नरसंहार (२००२) यांसारख्या घटनांनी अल्पसंख्याकांच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आणलेला आहे. महाराष्ट्रातील खैरलांजी हत्याकांडाने अत्याचाराची कटू वास्तवता उघडकीस आणलेली आहे'[४] . परंतू असे प्रकरण नष्ट केले जातात किंवा त्यांना न्यायचं मिळत नाही हेही वास्तव आहे.

सारांशः

मानवी हक्कांचे हणन होऊ नये म्हणून भारत सरकारने मानवी हक्कांचे संरक्षण करणारा कायदा १९९३ साली संमत केला याच कायद्यानुसार राज्य मानवी आयोग व मानवी हक्क न्यायालये स्थापित करण्यात आलीत. यामार्फत मानवी हक्कांची जपणूक केली जाते असे जरी असले तरी राजकीय हस्तक्षेपमुळे या प्रवर्गातील लोकांना मरेपर्यंत न्याय मिळत नाही. प्रत्येक राज्यामध्ये असी न्यायालये आहेत.

आजही मानवी हक्क आयोगाने अनुसूचित जाती-जमाती यांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जे-जे कायदे केले ते सर्व फोल ठरताना दिसून येतात. जोपर्यंत समाजातील दारिद्र्य, विषमता, अत्याचार, शोषण, धार्मिक व सामाजिक अंधश्रद्धा संपणार नाहीत. तोपर्यंत मानवी हक्कांचे उल्लंघन अधिक ठळकपणे व राजरोसपणे आपल्या निदर्शनास येताना दिसेल, यात तीळमात्र शंका नाही. यासाठी शासनाने त्या गंभीर समस्याकडे तेवढ्याच तीव्रतेने बघण्याची गरज आहे व त्यासंबंधी तसे कठोर निर्णय घेण्याची गरज आहे. केवळ घटनात्मक तरतुदी करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण होणार नाही, तर त्यासाठी विकास कार्यक्रमांचीही अंमलबजावणी केली जावी नाही तर मिळालेल्या स्वातंत्र्याला काहीही अर्थ उरणार नाही.

संदर्भः

- कदम ये. ना., '२०व्या शतकातील जगाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, १४ मे २००३, पृ. २०३.
- प्रा. कऱ्हाडे, 'जागतिकीकरण व भारतासमोरील आव्हाने', डायमंड प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल २००७, पृ. ७४.
- कुलकर्णी अ. ना., 'भारतातील स्थानीक स्वशासन', विद्या प्रकाशन, नागपूर, ४ मे २००४, पृ.१०३.
- संपादक मंडळ, एम.पी.एस.सी. राज्यसेवा परीक्षा मार्गदर्शन, पुणे, मे २००५, पृ. ८३.

Vidyawardhini Sabha's

Arts, Commerce and Science College,

Dhule (Maharashtra)

Department of Political Science

Organising

ONE DAY MULTIDISCIPLINARY NATIONAL WEBINAR ON

CHALLENGES AND SIGNIFICANCE OF HUMAN RIGHTS IN PRESENT SITUATIONS

Certificate

This is to certify that **प्रमोद एस. मेश्राम, सहयोगी प्राध्यापक, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल.** has participated / presented research paper entitled **''भारतातील सामाजिक जीवन व मानवी हक्क''** in the one day Multidisciplinary National Webinar on **"CHALLENGES AND SIGNIFICANCE OF HUMAN RIGHTS IN PRESENT SITUATIONS"** organised by Department of Political Science, Vidyawardhini Sabha's Arts, Commerce and Science College, Dhule (Maharashtra) on 27 July 2020.

His/her paper has been published in **UGC Referred Journal No.- 40776 - Ajanta - 2277 - 5730 with Impact Factor - 6.399**

Convener
Dr. Santosh S. Khatri
Dept. of Political Science

Chief Organiser
Dr. Shubhada G. Thakare
Principal,
Head of Dept. of Political Science

CO-ORDINATORS

Dr. V. M. Bhujade
Dr. P. R. Pawar
Prof. R. R. Gavit
Dr. S. C. Amrutk
Dr. S. G. Joshi

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PACHAL

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPAN
COLLEGE OF ARTS & COM.PAC
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratna

UGC CARE LI
ISSN No.2

संशोधक

● वर्ष : ९० ● मार्च २०२२ ● पुरवणी मराठी विशे



स्थापना : १ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

अनुक्रमणिका

१ स्वतंत्रता के बाद बौद्धो कें जीवन में सामाजिक परिवर्तन
- डॉ.प्रमोद मेश्राम, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ✓ ---------------------- १०

२ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्य प्रवाहाची वाटचाल ✓
- डॉ. विकास पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी -------------------- १५

✓ ३ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक
- डॉ.बळवंत दाभाडे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ----------------------- २१

४ स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) - डॉ.सुधीर वाघमारे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ✓-------- २६

५ स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळीचा विकास ✓
- डॉ.अशोक पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------------------- ३१

६ भारतीय स्वातंत्र्योत्तरकालीन ग्रंथालयातील नवे प्रवाहः एक अभ्यास
- डॉ.जयंत मेश्राम, रिसोड, जि.वाशिम ------------------------------- ३६

७ स्वांतत्र्योत्तर काळातील वाढते शहरीकरण
- डॉ. प्रतिभा देसाई, गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर -------------------- ३८

८ स्वातंत्र्योत्तर कालखंडात सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास
- डॉ. शशिकांत वानखडे, आर्णी, जि.यवतमाळ -------------------------- ४२

९ स्वातंत्र्योत्तर हिंदी पत्रकारिता
- डॉ.संतोष रायबोले, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग ---------------------------- ४७

१० स्वातंत्र्यप्राप्ती आणि सुरेश भट
- डॉ. चैनलाल राणे, गोरेगाव, जि.गोंदिया ---------------------------- ५१

११ डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्राच्या पाचव्या सिद्धांतानुसार महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथसंख्येत झालेली वाढ : एक अभ्यास
- अंबादास खिलारे, डॉ.दिलीप मेस्त्री, पनवेल, नवी मुंबई --------------------- ५५

१२ मानवी हक्क व दलित कविता
- डॉ. नरेंद्र घरत, डॉ.कविता लुटे, नागपूर-------------------------------- ५८

१३ स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण व्यवस्थेवर महात्मा गांधींचा प्रभाव
- डॉ.नंदकिशोर मने, गडचिरोली ---------------------------------- ६४

१४ भारतीय ग्रंथालय कायदे : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ चे सार्वजनिक ग्रंथालय विकासात महत्त्व - अनंत थोरात, रोहा, जि.रायगड ---------------------- ६८

१५ स्वातंत्र्योत्तर काल मे महिला सशक्तिकरण एवं शिक्षा का महत्व
- डॉ.रजनी वाढई, गडचिरोली ------------------------------------ ७५

१६ स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत दैनिक संचार'चे संपादक रंगा वैद्य यांचे योगदान
- शंकर पवार, कोल्हापूर --------------------------------------- ७९

१७ स्वातंत्र्योत्तर भारतातील आदिवासींची स्थिती, संविधानिक तरतुदी व कायदे
- डॉ.नरेश मडावी, गडचिरोली. ----------------------------------- ८४

ISSN No. 2394-5990

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक

प्रा. डॉ. बळवंत तुकाराम दाभाडे

एम.ए.,पीएच.डी.

श्री मनोहर हरी कला व वाणिज्य महाविद्यालय,

पाचल, ता. राजापूर, जि. रत्नागिरी – ४१६ ७०४

ई–मेल– balwant.dabhadegmail.com

भ्रमणध्वनी – ९४२११४२७५५

सारांश :

स्वातंत्र्योत्तर काळात दलित नाट्यलेखनाचे जे विविध प्रवाह निर्माण झाले त्यामागे कोणत्या प्रेरणा होत्या, कोणत्या प्रवृत्ती निर्माण झाल्या याचा शोध घेण्याचा यत्न आहे. विषयाच्या दृष्टीने जेवढा गुंतागुंतीचा आहे, तितकाच अधिकच नाटक – रंगभूमी यांच्या संदर्भातही गुंता निर्माण करणारा आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील रंगभूमीने अनुभवलेले काही प्रवाह आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, अशा विविध जीवनाशी निगडित असल्याने अथवा तीच त्या साहित्य निर्मितीची प्रेरणासामग्री असल्याने ते सारे परिणाम या साहित्यावर झाले. नाट्यलेखनातील विविध प्रेरणा – प्रवृत्तींचा वेध घेताना काही ठिकाणी या नाट्यकृतीचे रंगभूमीवर कोणते परिणाम घडले किंवा त्याहून कोणते वाद निर्माण झाले याचाही अगदी मर्यादित उल्लेख केलेला आहे. कोणत्याही नाट्यलेखनाचा जसा वाड़मयीन स्तरावर विचार करता येतो तसाच त्याच्या प्रयोगाचाही विचार करता येतो. दलित नाटकातील सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. लोककलेच्या माध्यमातून उदयास आलेली ही रंगभूमी तमाशा, एकांकिका, पथनाट्य, नमोनाट्य इत्यादी अंगाने विकसित होत गेली. नाटक म्हणजे आनंद देणारी कला किंवा क्षणिक मनोरंजनाचे साधन हा विचार काळाच्या ओघात मागे पडला. आणि हे जीवनगर्भ जाणिवांच्या अविष्कारासाठी, कारुण्य, दुःख, नैराश्य, पीडा जाचातून मुक्त होण्यासाठी आणि दलितांचे संसारचित्र मांडण्यासाठी एक साधन आहे, हा विचार दलित रंगभूमीने पुढे आणला. ‘आज जगाला युद्धाची नाही, तर बुध्दाची गरज आहे’ मानवातील माणूसपणाचा संकोच होतो आहे. माणसातील माणूसपणाला जागे करून मानवजातीच्या समग्र परिवर्तनाचा ध्यास आणि आस दलित रंगभूमीला आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित नाटकांमधील उपेक्षितांचे वास्तव मांडले आहे.

प्रस्तावना :

मराठी नाटक रंगभूमीची परंपरा दीर्घकालीन अशी आहे. कालखंडाप्रमाणे मराठी नाट्य लेखनाचे स्वरूप अधिक विस्तारीत आणि विविध स्तरांवर होत राहिले. त्यातून अनेक प्रवाह निर्माण झाले. व्यवसायिक नाट्य लेखनाबरोबर प्रायोगिक, बाल, कामगार, पथनाट्य इत्यादी अनेक प्रकारचे नाट्यलेखन प्रवाहानी आपले अस्तित्व सिद्ध केले. त्यातून नाटक आणि रंगभूमी संकल्पना पुन्हा नव्याने तपासून पाहण्याची स्थिती निर्माण झालेली होती. मराठी साहित्यातील स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी दलित नाटक वाङ्मयाचा आढावा घेत असताना मराठी नाटक परभृत– प्रवृत्तीचे आहे. या मातीतील, जीवनातील अनेक प्रश्न घेऊन ते उभे राहत नाही, असा एक गंभीर आरोप केला जातो. ज्यामध्ये तत्य निश्चितपणे पाहावयास मिळते. हे मराठी नाटक जसे बव्हंशी परभृत जातीचे, वृत्तीचे आहे, तसेच ते कलावादी आणि मध्यमवर्गीय जीवन जाणिवांच्या आवर्तात रुतलेले आहे असाही आरोप दीर्घकाळ होत राहीलेला पाहायला मिळतो. त्याची प्रतिक्रिया स्वातंत्र्योत्तर काळात काही प्रमाणात आली. केवळ नाटकाच्या संदर्भात नव्हे तर एकूणच मराठी साहित्याच्या संदर्भात असे प्रश्न विचारले गेले! त्या प्रश्नांतूनच अथवा नकारातूनच दलित साहित्याचा जन्म झाला.

अभ्यासाचे उद्दिष्टे :

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटकांचा केलेला सर्वच प्रश्नांचा संशोधनामध्ये उहापोह केल्यामळे दलित नाटकांचे वास्तव समजते. या विषयावरील संशोधन करताना, दलित नाटककारांच्या सामाजिक, सांस्कृतिक जाणिवा, हेतू, प्रेरणा याचे साधक – बाधक विश्लेषण केले आहे. दलित रंगभूमीचे वाड़मयीन मूल्यमापन करताना प्रस्थापित मराठी साहित्यातील सर्व निकष त्याला लावून मोजमाप केले तर त्या निकषांना ती नाटके उतरतीलच असे ठामपणे सांगता येत नाही. एकूणच मराठी साहित्याला आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण विषय – आशयाने

समृद्ध बनविण्याचा प्रयत्न होतो आहे. कथा, कादंबरी, काव्य, आणि नाटक इत्यादी अनेक प्रकारात विपूल प्रमाणात दलित लेखकांनी लेखन केले परंतु नाटक या साहित्य प्रकाराची ताकद मोठी आहे याचे भान ठेवून अनेक दलित नाटककारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून नाट्य लेखनाचा सुरुवात केली. समाजातील सर्वच शोषित घटकांचे जीवन खऱ्या अर्थाने नाटककारांनी जगासमोर मांडले. दलित शब्दाची व्याप्ती वाढवली गेली. याचे कारण वर्ग, वर्ण, जात विरहित समाज निर्माण करण्यासाठी हे नाटक कटिबद्ध आहे. चिरंतन मानवी मूल्यांची म्हणजेच सत्य, अहिंसा, समता, बंधुता, मानवता, धर्मनिरपेक्षता, न्याय या मूल्यांची समाजात वाढ करण्यासाठी दलितांच्या नाटकांमधील नायक पुढाकार घेताना दिसतो आहे. आत्मशोध आणि अस्तित्वाचा शोध घेणारी अनेक नाटके आहेत. माणूस म्हणून जगण्यासाठी मानसिकता तयार करणे. दलित नाटककारांनी नाटक कलेच्या माध्यमातून उपेक्षितांचे खरे यातनामय जीवन चित्रण चित्रित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यांनी हा केलेला प्रयत्न संशोधनाचे उद्दिष्टे आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक :

गेल्या वीस-पंचवीस वर्षांमध्ये दलित कविता, कथा, आत्मकथने यांचे लेखनाचे प्रमाण वाढलेले आहे. त्यांची संख्यात्मक आणि गुणवत्ता दोन्हीही लक्षवेधी आहेत. तुलनेने दलित नाटक उतरत्या क्रमाने आणि गुणवत्तेने लिहिले गेले आहे. इ. स.१८८० सुमारास दलित नाटक आपल्यासमोर आलेले असले तरी या नाट्यप्रवाहाचा आरंभ १९५६ मध्ये म.भी. चिटणीस यांच्या 'युगयात्रा' नाट्यलेखनाने झाला. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रत्यक्ष होते. यासंदर्भात काही समीक्षक असे सांगतात की, 'मिलिंद महाविद्यालयामध्ये (औरंगाबाद) एका महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आले होते. त्यावेळी जी नाटके सादर झाली होती ती तेव्हाच्या व्यवसायिक रंगभूमीशी संबंधित होती. ही नाटके पाहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर बोलण्याच्या ओघात असे म्हणाले की, 'तुमच्यापैकी कोणी नाटक का लिहीत नाही?' त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ असा होता की, तुम्ही तुमच्या अनुभवाचे, जीवनातील विविध प्रश्नांवरचे नाटक का लिहीत नाही.' त्यांच्या या बोलण्याचा परिणाम नक्की झाला आणि त्यातूनच 'युगयात्रा' नाट्यकृतीचा जन्म झाला. याच नाटकाचा प्रयोग १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षा भूमीवर झाला. प्राचीन काळापासून वर्तमान क्षणापर्यंत दलित समाजावर होणाऱ्या अत्याचाराचे चित्र या नाटकांमध्ये पाहायला मिळते. त्यामुळे नाटक पुढील नाट्यलेखनासाठी खऱ्या अर्थाने प्रेरक ठरले. आणि त्यातूनच त्या काळामध्ये वि. तु. जाधव यांचे 'राजा सुदास', नामदेव व्हटकर यांचे 'वाट चुकली', मा. का. कारंडे यांचे 'नवी वाट' इत्यादींबरोबरच 'बुद्धं शरणं गच्छामि', 'बुद्धीभेद', 'सम्राट अशोक' ह्याही नाट्यलेखनांचा समावेश करावा लागेल.

दलित नाटक :

स्वातंत्र्यपूर्व काळातील 'आंबेडकरी जलसे' आणि 'सत्यशोधक जलसे' या माध्यमातून दलित जाणीव व्यक्त होत होती. या जलशांना लोककलेचा गाभा आणि परंपरेचा वारसा होता. ग्रामीण भागामधील जनमानसात या जलशांना एक विशेष महत्त्व आणि स्थानही होते. पण आधुनिक युगात अनेक जीवन प्रणालीमध्ये ज्या लोककलांचा, लोकतंत्रांचा, प्रसार माध्यमांचा अस्त झाला त्यामध्ये हे जलसेही क्षीण होत गेले. अपवादाने त्याचे प्रयोग होत असतीलही, पण त्यातले चैतन्य उरले नाही असे म्हणावेसे वाटते. तरीही ही दलित नाट्य लेखनाची एक प्रेरणा झालेली होती तसेच चिटणीस आदींनी केलेले नाट्य लेखनाची एक प्रेरणाच म्हणावी लागेल. या लेखामध्ये केवळ दलित जीवनाच्या दुःखद कहाण्या सांगितल्या नाहीत, तर परिवर्तनाची दिशा सूचित केली आहे. पण दोन्ही धारांमधून पुढची दलित नाटक - रंगभूमी उभी राहिलेली दिसत नाही. दलित कविता आणी आत्मकथने यांचे जे स्वागत सर्व स्तरातून झाले त्याचाही एक परिणाम आहे असे म्हणावेसे वाटते. तसेच चळवळीतील परिवर्तनवादी कार्यकर्त्यांना असे वाटले असेल की, आपल्याला समाजासमोर जे मांडायचे सांगायचे आहे त्याला रंगमाध्यम प्रभावी आहे. या मराठी समाजाला नाट्यमाध्यमांचे आकर्षण आहे. जसे मध्यमवर्गीय जाणिवेच्या नाट्यलेखकांनी आणि कलावंतांनी या माध्यमातून काही सांगायचा मनोरंजन करून घेण्याचा यत्न केला, तसा आपणही करून पहावा अशीही सुप्त प्रेरणा असू शकेल असे वाटते. ही वेदना कशाची आहे? तर ती हजारो वर्षे या देशातील सवर्ण समाजाने दलित समाजाचा जो मानसिक, शारीरिक असा सर्वंकष स्वरूपाचा छळ केला, त्यांना माणूस म्हणून वागू दिले नाही. ती वेदना आहे. हे घडण्याचे मूळ कारण समाजव्यवस्थेतील वर्णव्यवस्था. वास्तविक ही अवस्था समाजसोयीसाठी तत्कालीन मनुष्यसमूहाने निर्माण केलेली. पण ती तशी न

[illegible] धर्मचर्चेच्या स्तरांवर नेऊन एक [illegible] केले. परिणामी ती व्यवस्था जन्माशी निगडित [illegible] आणि नीच असे भेद निर्माण झाले. माणूसच [illegible] करू लागला. त्याचे माणूसपण हरवून [illegible] मिरासदारी सुवर्णांकडे आली. ज्ञानाबरोबर [illegible] अधिकार आले. ज्यांना शिक्षण, ज्ञान मिळाले [illegible] जीवन हेच मरण झाले! गेल्या तीस-चाळीस [illegible] दलित समाजाला शिक्षणाच्या प्रकाश - वाटा [illegible] होऊ लागल्या तसतशा जीवनजाणिवाही वेगळ्या [illegible] घेऊ लागल्या. मूळच्या वेदनेची ठसठस वाढू लागली. त्या वेदनेतून विद्रोहाचा हुंकार निर्माण झाला. त्यातून कविता, कथा, आत्मकथने आणि नंतर नाटक जन्माला आले. त्या प्रवाहाचा खरा आरंभ झाला होता.

भि. शि. शिंदे हे आधुनिक दलित नाट्यलेखन प्रवाह [illegible] एक महत्त्वाचे आणि अग्रेसर लेखक आहेत. त्यांच्या 'काळोखाच्या गर्भात' या नाट्यकृती मध्ये दलित जीवनावरील अन्याचाराचे चित्रण त्यांनी केलेच, पण त्यातून एक दिशा, मार्ग दाखवण्याचा, अन्यायाला सामोरे जाण्याचा मार्गही स्पष्ट केला. त्याच दिशेने आणि एक दलित नाट्य लेखनाचा प्रवास सुरू झाला. टेक्सास गायकवाड यांनी 'आम्ही देशाचे मारेकरी' यामध्ये हिंदुत्ववादी निष्ठा असणाऱ्या लोकांची देश - धर्मविषयक संकुचित दृष्टी कशी आहे. याबाबत तपशीलवारपणे प्रतिक्रियात्मक लेखनपद्धती वापरलेली आहे. त्याचबरोबर कमलाकर डहाक यांनी 'नरबळी' नाटकामध्ये अंधश्रद्धेमुळे दलितांना कोणत्या प्रकारचे अत्याचार भोगावे लागतात त्याचे वास्तव चित्रण केले आहे. अरुणकुमार इंगळे यांनी 'काय रं' मध्ये दलितांमधील अनेक पुतळ्यांवरच्या आंतरिक संघर्ष उभा केलेला आहे. म्हणजेच माणूस आणि संस्कृती यांचे परस्पर संबंध कसे दाहक आहेत याचेही चित्रण परिणामकारक रीतीने व वास्तवाचे भान ठेवून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. रामनाथ चव्हाण यांनी 'साक्षीपुरण' या नाटकामध्ये सोनाक्षीपुरममध्ये काही वर्षांपूर्वी घडलेल्या घटनांच्या संदर्भात हिंदू - मुसलमान आणि दलित यांच्यावरील तणावाचे, त्या निमित्ताने निर्माण झालेल्या धर्म-विषयक प्रश्नांचे विदारक व वास्तव चित्र उभे केले आहे. याच लेखकाचे 'बामनवाडा' हे नवे नाटक रंगमंचावर सादर झाले. आंतरजातीय विवाह होऊन, शिक्षित असूनही सवर्ण समाज दलित समाजाला आपला मानीत नाही, त्यांच्या मनातून अजूनही दलित - सवर्ण हा भेद जात नाही. हे वास्तव, भेदक सत्य, या नाटकामध्ये मांडले आहे. प्रकाश त्रिभुवन यांनी 'थांबा रामराज्य येतंय' या नाटकामध्ये सत्ता आणि संपत्ती यांच्या बळावर दलित समाजातील एक दलित तरुण नेतृत्वाला संपवून टाकण्याची वृत्ती कशी बळावत आहे, हे पौराणिक नाट्यप्रसंगाच्या आधारे वास्तव मांडले आहे. या लेखनामधील असणारी भेदकता परिणामकारकता लक्षवेधी असल्याचे जाणवते. त्याचबरोबर संपत जाधव यांचे 'पोतराज' गोपाळ सोनारीकरांचे 'धोक्यात हरवलेले सुख', रुस्तम अचलखांब यांचे 'कैफियत', हेमंत खोब्रागडे यांचे 'सूर्यास्त', भि. शि. शिंदे यांचे 'आयोग' अशी आणखी नाट्यलेखने दलित साहित्यातील प्रसिद्ध आहेत.

शिल्पा मुंब्रसकर यांनी लिहिलेले 'झाडाझडती' हे महत्त्वपूर्ण असे नाट्यलेखन आहे. समाजातील दलित असलेला समाज आणि स्त्री तर त्याहून दलित अशी स्थिती असल्याचे वास्तव आहे. अशा दलित स्त्रियांचे विविध प्रश्न घेऊन हे नाटक आकाराला आले आहे. स्त्रीच्या जीवनातील नेमकी व्यथा या नाटकामध्ये मांडली आहे. अशा भयाण वास्तवाचा अनुभव भवतालच्या जगात लेखिकेने घेतला आहे. तो अनुभव असणारा अनुभव किती प्रत्ययकारी असू शकतो, याचा प्रत्यय या लेखनातून येतो. दलित नाट्य लेखकांमध्ये पहिली स्त्री नाटककार म्हणून शिल्पा मुब्रंसकर यांचा उल्लेख करावा लागतो. दलित नाट्यलेखनाच्या विविध प्रवाहाला दिशा देण्याचे कार्य जसे भि. शि. शिंदे यांनी केले तसे या प्रवाहाला धन्यता देण्याचा, त्यातली परिमाणे शोधण्याचा प्रयत्न प्रेमानंद गज्वी आणि दत्ता भगत यांनी ही केलेला आहे. प्रेमानंद गज्वींनी आरंभीच्या काळामध्ये एकांकिका लेखन केले होते. ते मान्य झाले होते. जेव्हा 'देवनवरी', 'किरवंत', 'जय जय रघुवीर समर्थ' इत्यादी नाट्यलेखने समोर आणली तेव्हा त्यातली गुणवत्ता जाणू लागली. 'देवनवरी' मध्ये सांस्कृतिक स्तरावरून समाजातील दलितांवर कसे अत्याचार होतात याचे वास्तव दर्शन मांडले आहे. तर 'किरवंत' या नाटकांमध्ये समाजव्यवस्था आणि व्यवहार यामधून येणारे भीषण अनुभव व्यक्त केलेले आहेत. 'जय जय रघुवीर समर्थ' यामध्ये वारकरी पंथ आणि रामदासी पंथ यांच्यातील संघर्षचित्र आहे. यामध्ये दलित विषयाचा संदर्भ नाही. दत्ता भगत यांनी 'खेळिया' या नाटकामध्ये दलितांमधील मानसिक गुलामगिरी कशी हानिकारक आहे हे दाखवले आहे. त्याहीपेक्षा अधिक गुणवत्तेचे नाटक म्हणजे 'वाटा-पळवाटा' या नावाचे होय! डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या तत्त्वावर चळवळ उभी केली ती

निरनिराळ्या स्तरावर कशी विभागली गेली आहे, त्यातले ताण कशाने निर्माण झाले ते चित्रित केले आहे. त्यामुळे या नाटकाची खऱ्या अर्थाने वैचारिक बैठक खूप मोठी आहे.

दलित नाटकाचा खऱ्या अर्थाने प्रवाह १९८० ते १९९० याच दशकात आरंभीच झाला. एकावर आवर्तात फिरत राहिल्याने निस्तेज वाटू लागला. असे का झाले असावे? याला अनेक कारणे झाली असावीत. दलित नाटक रंगभूमी ही केवळ प्रतिक्रियात्मक नाही हे अनेकांच्या लक्षात आले नाही. पारंपरिक रंगभूमीला केवल शह देणे, तिच्याविषयी वाईट प्रतिक्रिया व्यक्त करणे हे मुळातच प्रयोजन नव्हते. पण ते आहे असे काहींना वाटले! प्रस्थापित पारंपरिक रंगभूमीवरील नाटकांमधून आपले जीवनानुभव, जीवनातील संघर्ष मांडले जात नाहीत हे आपण मांडले पाहिजेत ही मूळ प्रेरक सूत्र होते याचा विसर पडत गेला. जे जीवन आपल्या वाट्याला आले, त्याचा आपण साक्षात अनुभव घेतला तो रंगमाध्यमातून मांडावा अशी प्रेरणा महत्त्वाची होती. प्रस्थापित रंगभूमीवरील नाट्यलेखन हे मध्यमवर्गीय जीवनाच्या परिघातच होत असल्याने, दलित विषयावरचे नाट्यलेखन आले नाही, ते आपण आणावे यासाठी दलित नाट्यलेखन आरंभित झाले. त्यामध्ये स्वाभाविकपणे आपल्या जीवनातील अनाचार, अत्याचार, सवर्णांकडून मिळणारी हीन दर्जाची वागणूक हे सारे दाहक रितीने व्यक्त होऊ लागले. लेखनामध्ये प्रयोगपद्धतीतही आली. प्रस्थापित नाटक जसे विषय- आशय यांच्या संदर्भात मध्यमवर्गीय जाणिवेतून आले, तसेच ते कलावादी भूमिकेतून केले गेले. दलित नाटक हे जीवनवादी आहे. सामाजिक जाणिवेतून किंवा सामाजिक बांधिलकीच्या प्रेरणेतून व्यक्त झालेले आहे. या दोन वेगळ्या धारणा आहेत, दृष्टीकोण आहे. त्यांना परस्पर छेद गेला. असा गेला की प्रतिक्रिया येते, अशी प्रस्थापितांकडून ती आली. काहींनी 'दलित रंगभूमी' यातल्या 'दलित' शब्दाला आक्षेप घेतला. समाज दलित असू शकतो, पण नाटक किंवा रंगभूमी, अभिनय कशी दलित असेल असेही विचारले गेले!

पहिले दलितनाट्य संमेलन १९८४ मध्ये पुण्यामध्ये भरले, तेव्हा अध्यक्ष पदावरून भि. शि. शिंदे मनोगत व्यक्त करताना म्हणाले होते, 'दलित रंगभूमी ही समग्र दलित मुक्ती व दलितोन्नती या महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा एक भाग आहे... नाटक व चित्रपट या माध्यमांचा उपयोग करून त्यांच्या मनात क्रांतिकारक, नवसमाजनिर्मितीस पोषक व लोकशाहीवादी विचार रूजवले पाहिजेत. त्यांच्यात सदभिरूची वाढावी, त्यांची वैचारिक पातळी उंचावर व त्यांना एका अत्युच्च सांस्कृतिक पातळीवर न्याचे असाच दलित रंगभूमीचा कलात्मक प्रयत्न असला पाहिजे. दलित रंगभूमीच्या प्रत्येक कलावंताला या सामाजिक बांधिलकीची जाणिव आहे. कारण तो नुसता कलावंत नाही, अभिनेता व अभिनेत्री नाही, तर सामाजिक जाणिवेने भारलेला तो एक कार्यकर्ता कलाकर आहे. अशी शिंदे यांनी आपली भूमिका सविस्तर आणि नेमकेपणाने मांडली आहे. त्यांनी 'कार्यकर्ता कलावंत' ही संकल्पना सांगितली आहे. दलित रंगभूमीच्या संदर्भात मर्म सांगणारी संकल्पना आहे. अशाप्रकारे जरी दलित नाट्यलेखनाचे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भूमिका प्रयोजनही आहे तर तो प्रचार कलात्मक स्तरांवर यायला हवा.

निष्कर्ष :

मराठी साहित्यातील दलित वाङ्मयीन निष्कर्षाप्रत जाणे शक्य आहे. ते निष्कर्ष अंतिम असणार नाहीत. दलित नाटककारांची नाटके वैज्ञानिक, आधुनिक, पुरोगामी समतेच्या विचाराची कास धरतात तर दलितेतर नाटककारांची अनेक नाटके रुढी, परंपरा, धर्म, देव, कर्मठपणा, अंधश्रद्धा आणि विषम संस्कृतीच्या चाकोरीत अडकून पडल्याचे चित्र दिसते. त्यामुळे अशी नाटके अनेकवेळा पुरोगामी विचाराला स्वीकारताना दिसत नाहीत. दलित लेखकांच्या नाटकातील नायक हे समाजातील अज्ञान, दारिद्र्य, बेकारी, सरंजामशाहीवृत्ती आणि भुकेचा प्रश्न घेऊन शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करताना दिसतात. तर दलितेतर लेखकांच्या नाटकातील नायक जातीय अभिमान घेऊन धनदांडग्यांनी साथ देत या देशात सर्व काही आलबेल आहे. या वृत्तीतून प्रस्थापित वर्गाच्या हक्कांसाठी, वर्चस्व आबाधित ठेवण्यासाठी प्रयत्नशील दिसतात. दलित रंगभूमीवरील नाटकांमधील नायक मानव मुक्तीसाठी शांततेच्या तर कधी हिंसेच्या मार्गाने जाताना दिसतो. त्यांच्या सामाजिक लढ्याला फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा आहे. त्यांच्या विश्वातील दुःख नाहिसे व्हावे ही आस आहे. 'धांदात खैरलांजी' या नाटकातील वैशाली म्हणते, ''मला असंच वाटलं ना अमूक की माझा संघर्ष सुरेखासारखाच आहे पण आम्हा दोघींच्या वाट्याला जे जे आलं त्याची तुलनाच होऊ शकत नाही. बघ ना रणजितकाकांनी एक फोन काय केला आणि सगळा प्रश्न सुटला पण खैरलांजींच काय?'' वैशालीचे हे बोल या

देशातील जातीयतेच्या वणव्यात होरपळून निघालेल्या त्या दलितांच्या वास्तव जीवनाला मांडणारे आहेत. एकंदरीत दलित नाटक, रंगभूमीचा सर्वांगीण विचार करता देशभरातून दलित नाटक रंगभूमीचा प्रचार झाल्याचे चित्र दिसते. या रंगभूमीवर आलेली नाटके डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन लिहिलेल्या नाटककारांची नाटके आहेत. त्यात विचार, आंदोलन, सामाजिक जाणिव, सामाजिक बांधिलकी आणि चळवळींना गतिमान करण्याची शक्ती दिसते तसेच समुहमनाचा आविष्कार प्रकट होतो.

संदर्भ ग्रंथसूची :

१) डॉ. बालाजी वाघमारे, मराठी नाटकातील दलित जीवन, नवनरेंद्र प्रकाशन, कणकवली, प्रथम आवृत्ती - २०११

२) वि.भा. देशपांडे, मराठी नाटक : स्वातंत्र्योत्तर कालखंडातील, व्हिनस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती - १९९२

३) लांजेवार ज्योती, दलित साहित्य समीक्षा, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती - १९९२

४) बागूल बाबूराव, दलित साहित्य : आजचे क्रांती विज्ञान, दिशा प्रकाशन, नाशिक, व्दितीय आवृत्ती - २००४

५) मोकाशी मधुकर, दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती - २०००

६) दत्ता प्रा. भगत, दलित साहित्य दिशा आणि दिशांतर, अभय प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती - १९९२.

● ● ●

Estd. 1994

॥ विद्या अमृतम अश्नुते ॥

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE
OF ARTS & COMMERCE, PACHAL

At/Post – Raypatan, Tal – Rajapur, Dist – Ratnagiri – 416 704
First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994
❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956
❖ Best NSS Unit Award at University Level for the year 2017-2018 ❖ ISO 9001:2015 Certified

Principal Dr. M. A. Yellure M.A., M.Phil, Ph.D. DIHT Cell No. 9403392105, 9834468690	Telefax – 02353-299181 E-Mail – mhkcollegepachal@gmail.com Web – www.khapnecollege.com	Permanent Affiliation No. Aff-II./ICD/2015-2016/1121 dated 16th September 2015

3.3 Research Publication and Awards.

3.3.1. Number of research papers published per teacher in the Journals as notified as on UGC CARE LIST during the last five years.

YEAR 2021-22

Yours Faithfully

Principal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

II विद्या अमृतम अश्नुते II

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal Pachal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL – RAYPATAN

At Post – Raypatan, Tal. – Rajapur, Dist. – Ratnagiri, 416 704

First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994

Permanent Affiliation No. Aff-II./ICD/2015-16/1121 dated 16.09.2015, ISO 9001:2015 Certified

❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

I.Q.A.C., Department of History, Marathi, Hindi, English and Commerce

Organize

One Day Interdisciplinary National E-Conference

On

75 years of India Independence

Sponsored by

Indian Council of Social Science Research, Mumbai

Indian Council of Social Science Research

In Collaboration with

Department of History, University of Mumbai, Mumbai

Date: 15 March, 2022, Time : 10.30am To 4.00pm

CERTIFICATE

This is to certify that, Dr./Prof./Mr./Miss. **Balwant Tukaram Dabhade of Shri. Manohar Hari Khapane College of Arts and Commerce, Pachal** actively participated & presented a paper entitled **स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक** in One Day Interdisciplinary National Level E-Conference held on 15/03/2022 at Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerce, Pachal-Raypatan.

Dr. Prakash Masaram
I/c Head,
Department of History,
University of Mumbai

Prof. Smita Shukla
Honorary Director,
ICSSR (WRC),
Mumbai

Sanjay V. Nimbalkar
Asst. Prof.
IQAC Coordinator
Shri. M. H. K. College of Arts & Commerce, Pachal-Raypatan

Dr. Pramod. S. Meshram
I/c Principal,
Shri. M.H.K.College of Arts & Commerce, Pachal-Raypatan

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACH
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnag

UGC CARE LI
ISSN No.2

संशोधक

● वर्ष : ९० ● मार्च २०२२ ● पुरवणी मराठी विशे



स्थापना : १ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

अनुक्रमणिका

१ स्वतंत्रता के बाद बौद्धो कें जीवन में सामाजिक परिवर्तन
- डॉ.प्रमोद मेश्राम, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- १०

२ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्य प्रवाहाची वाटचाल
- डॉ. विकास पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- १५

३ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक
- डॉ.बळवंत दाभाडे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- २१

४ स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) - डॉ.सुधीर वाघमारे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- २६

५ स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळीचा विकास
- डॉ.अशोक पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- ३१

६ भारतीय स्वातंत्र्योत्तरकालीन ग्रंथालयातील नवे प्रवाह: एक अभ्यास
- डॉ.जयंत मेश्राम, रिसोड, जि.वाशिम ---------- ३६

७ स्वातंत्र्योत्तर काळातील वाढते शहरीकरण
- डॉ. प्रतिभा देसाई, गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर ---------- ३८

८ स्वातंत्र्योत्तर कालखंडात सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास
- डॉ. शशिकांत वानखडे, आर्णी, जि.यवतमाळ ---------- ४२

९ स्वातंत्र्योत्तर हिंदी पत्रकारिता
- डॉ.संतोष रायबोले, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग ---------- ४७

१० स्वातंत्र्यप्राप्ती आणि सुरेश भट
- डॉ. चैनलाल राणे, गोरेगाव, जि.गोंदिया ---------- ५१

११ डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्राच्या पाचव्या सिद्धांतानुसार महाविदयालयीन ग्रंथालयातील ग्रंथसंख्येत झालेली वाढ : एक अभ्यास
- अंबादास खिलारे, डॉ.दिलीप मेस्त्री, पनवेल, नवी मुंबई ---------- ५५

१२ मानवी हक्क व दलित कविता
- डॉ. नरेंद्र घरत, डॉ.कविता लुटे, नागपूर ---------- ५८

१३ स्वातंत्रोत्तर भारतीय शिक्षण व्यवस्थेवर महात्मा गांधींचा प्रभाव
- डॉ.नंदकिशोर मने, गडचिरोली ---------- ६४

१४ भारतीय ग्रंथालय कायदे : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ चे सार्वजनिक ग्रंथालय विकासात महत्त्व - अनंत थोरात, रोहा, जि.रायगड ---------- ६८

१५ स्वातंत्रोत्तर काल मे महिला सशक्तिकरण एवं शिक्षा का महत्व
- डॉ.रजनी वाढई, गडचिरोली ---------- ७५

१६ स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत दैनिक संचार'चे संपादक रंगा वैद्य यांचे योगदान
- शंकर पवार, कोल्हापूर ---------- ७९

१७ स्वातंत्रोत्तर भारतातील आदिवासींची स्थिती, संविधानिक तरतुदी व कायदे
- डॉ.नरेश मडावी, गडचिरोली. ---------- ८४

2)

स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवारी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५)

प्रा.डॉ. वाघमारे सुधीर सोपान
श्री मनोहर हरी खापणे कला वाणिज्य महाविद्यालय
पाचल-रायपाटण, तालुका-राजापूर जिल्हा-रत्नागिरी
मोबाईल नंबर -९४२२३५६५३४ , ईमेल - sudhirsadhana1376gmail.com

१.१ सारांश :

विविधता हे भारतीय समाजाचे महत्त्वाचे असे वैशिष्ट्य सांगितले जाते. या भारतीय समाजाचे शहरी समुदाय, ग्रामीण समुदाय व आदिवासी समुदाय असे तीन गटात वर्गीकरण केले जाते. यापैकी स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही आदिवासी समुदाय विकासापासून वंचित राहिला आहे. या आदिवासी समाजापैकीच फक्त महाराष्ट्रात आढळणारा ठाकर समाज याला अपवाद नाही. तर या ठाकर समाजाला देखील आपले दैनंदिन जीवन जगताना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी त्याला धडपडावे लागते आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येशी तुलना करता आदिवासी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण ८.६० %, तर महाराष्ट्राचा विचार करता या आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९.३५ % इतके आहे. तर रायगड जिल्ह्याचा विचार केल्यास रायगड जिल्ह्यातील एकूण आदिवासींची लोकसंख्या ३०५१२४ इतकी असून एकूण लोकसंख्येशी तुलना करता हे प्रमाण ११.५७ % इतके आहे. आदिवासी जमातीपैकी कातकरी, ठाकर व महादेव कोळी या तीन जमाती या जिल्ह्यात आढळतात. रायगड जिल्ह्यात एकूण १५ तालुके असून त्यापैकी रोहा, सुधागड (पाली), पेन, खालापूर, पनवेल व कर्जत या सहाच तालुक्यात ठाकर समाज आढळतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आर्थिक नियोजनाचा अवलंब करून त्याद्वारे आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना, कायदे केलेले आहेत. पण त्या योजनांचा कायद्यांचा कितपत फायदा झाला? हा प्रश्न निर्माण होतो. भारतीय राज्यघटनेने देशातील सर्व नागरिकांना समान हक्क/अधिकार दिले आहेत. परंतु आजही समाजातील विशिष्ट जाती, जमाती यापासून वंचित आहेत. यापैकीच एक म्हणजे ठाकर जमात होय. अशा उपेक्षित राहिलेल्या ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन होणे गरजेचे वाटले. त्यादृष्टीने संशोधकाने स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) या संशोधन विषयाची निवड केली आहे. व त्याची सैद्धांतिक मांडणी प्रस्तुत शोधनिबंधात संशोधनकर्त्याने केली आहे.

१.२ संकल्पना :- प्रस्तुत संशोधनामध्ये ज्या संज्ञांचा वारंवार उल्लेख आलेला आहे. त्यांचे या संशोधना पुरते मर्यादित अर्थ व्याख्या लक्षात घेतल्याशिवाय संशोधन पेपर वाचताना त्या स्पष्ट होणार नाहीत. म्हणून त्या संज्ञांच्या खालील व्याख्या लक्षात घेणे आवश्यक आहे.

वर्गीकृत जमाती-आदिवासी :- भारतीय राज्यघटनेत कलम ३४१ व ३४२ (१) नुसार राष्ट्रपतींच्या आदेशानुसार अधिसूची तयार केली आहे. त्यामध्ये समाविष्ट समुदाय म्हणजे अनुसूचित जमाती किंवा आदिवासी होय.

ठाकर :- प्रस्तुत संशोधनात ठाकर म्हणजे महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात स्थायिक झालेले ठाकर लोक होत.

आर्थिक स्थिती :- आर्थिक स्थिती म्हणजे ठाकर समाजाच्या रोजगाराची स्थिती, त्यांना मिळणाऱ्या मोबदल्याची स्थिती, व्यवसायाचे स्वरूप, त्यांचे मासिक उत्पन्न,त्यांचा दैनंदिन खर्च थोडक्यात त्यांची आर्थिक आवक व जावक किंवा उत्पन्न व खर्च दर्शवणारी स्थिती होय.

१.३ प्रस्तावना :- आजचे जग हे अतिशय वेगवान झाले आहे. निरनिराळ्या ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात प्रचंड प्रमाणात आणि वेगाने भर पडत आहे. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमुळे जग जवळ आले, पण माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात तर याची खात्रीच पटते. अनेक जाती-धर्माचे लोक भारतात राहतात. विविधतेतून एकता निर्माण करण्यासाठी सर्वधर्म समभाव या सारख्या कल्पनाही काही काळ चमकतात. पण तरीही धर्मा-धर्मात दुरावा हा राहतोच. जाती-जाती मध्ये दुरावा राहतो. शिक्षणाच्या प्रसारामुळे खरे तर हा दुरावा कमी व्हायला हवा होता. पण शिक्षणामुळे

[illegible] मात्र दिसत नाही. त्याचबरोबर शिक्षण [illegible] पोहोचते असले, तरी गिरीजनांपर्यंत पोहोचले [illegible] ठामपणे सांगता येत नाही. वास्तविकतः [illegible] शिक्षणावरच आपली आर्थिक व सामाजिक [illegible] अवलंबून असते. ज्या समाजाने हे [illegible], तो समाज आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या [illegible]. तर शिक्षणापासून जे वंचित राहिले. त्यांची [illegible]-सामाजिक परिस्थिती ही दुर्बल राहिली. यापैकीच [illegible] समाज म्हणजे आदिवासी समाज होय.

आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती खालावलेली आहे त्यांना राहण्यासाठी स्वतःच्या मालकीची घरे नाहीत, [illegible] बांधण्यासाठी जमीन नाही, महत्त्वाचे म्हणजे स्वातंत्र्याच्या [illegible] वर्षांनंतरही त्यांच्या वस्तीपर्यंत/गावापर्यंत पक्के रस्ते, वीज. आरोग्य विषयक सुविधा पोहोचल्या नसल्यामुळे हा समाज आजही विविध समस्यांना तोंड देत जीवन जगतो आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आर्थिक नियोजनाचा अवलंब करून त्याद्वारे आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना आणल्या कायदे केले. पण त्या योजनांचा कायद्यांचा कितपत फायदा झाला? हा प्रश्न प्रत्यक्ष आदिवासीवाडी वर गेल्यावर पडतो. भारतीय राज्यघटनेने देशातील सर्व नागरिकांना समान हक्क/अधिकार दिलेले आहेत परंतु आजही समाजातील विशिष्ट जाती जमाती या पासून वंचित आहेत. अशा उपेक्षित राहिलेल्या आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा सखोल अभ्यास करता यावा या दृष्टीने संशोधन कर्त्याने स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) या संशोधन विषयाची निवड केली आहे.

१.४ संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे :-

१) रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाला शासनाच्या आदिवासी विकास योजनांचा मिळणाऱ्या लाभांचा अभ्यास करणे.

३) रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाच्या आर्थिक मागासलेपणाची कारणे शोधणे.

४) रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाच्या विकासाकरिता उपाय सुचविणे.

१.५ नमुना निवड :- रायगड जिल्ह्यात एकूण १५ तालुके असून त्यापैकी पेन पनवेल खालापूर कर्जत सुधागड (पाली) व रोहा या सहा तालुक्यांमध्ये ठाकर समाज आढळतो. या सहा तालुक्यातील एकूण ५०६५ ठाकर कुटुंबांपैकी ४५६ (९%) कुटुंबांची नमुना म्हणून निवड केली आहे. नमुना निवडीसाठी साधा यादृच्छिक नमुना निवडीतील कोटा पद्धतीचा अवलंब केला आहे.

रायगड जिल्ह्यातील ठाकर कुटुंबाची नमुना निवड दर्शविणारा तक्ता सोबत दिला आहे.

२) पंचायत समिति अहवाल – २०१०-११ :

१.६ तथ्य संकलन :- प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी अनुसूची,प्रश्नावली व निरीक्षण इत्यादी पद्धतीचा तर दुय्यम तथ्य संकलनासाठी सर्व प्रकाशित साहित्य आणि इंटरनेटचा वापर केला आहे.

१.७ संशोधन विषयाचे महत्त्व :- भारतीय समाजाचे शहरी समुदाय,ग्रामीण समुदाय आणि आदिवासी समुदाय असे तीन गटात वर्गीकरण केले जाते. यापैकी काळाच्या ओघात शहरी आणि ग्रामीण समुदाय यांचा विकास झाला आहे. पण या विकासापासून आदिवासी समुदाय मात्र वंचित राहिला आहे. आजही या आदिवासी समाजातील जमातींना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. ठाकर समाज देखील याला अपवाद नाही. संबंधित संशोधनामुळे ठाकर समाजाचे व्यवसाय, त्यांना मिळणारे उत्पन्न, रोजगाराची स्थिती, मागासलेपणाची कारणे, त्याचबरोबर शासनाच्या विकासात्मक योजनांचा ठाकर समाजाला कितपत लाभ मिळाला, आजही ठाकर समाज विकासापासून वंचित का आहे.? इत्यादी प्रश्नांची उत्तरे प्रस्तुत संशोधनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे ठाकर समाजाच्या आर्थिक विकासाला साठी प्रस्तुतचे संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे.

१.८ संदर्भ साहित्याचा आढावा :-

१) प्रा.सुनील पंढरीनाथ उगले यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासात 'बायफ' या संस्थेच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास या विषयावर आपला पीएचडी प्रबंध सादर केला आहे

२) प्रा.डॉ. नलिनी पिचड यांनी पश्चिम व उत्तर महाराष्ट्रातील महादेव कोळी समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास या विषयावर आपला पीएचडी प्रबंध सादर केला आहे.

३) श्री.मारुती वीरभद्र यांनी किनवट तालुक्यातील आदिवासी

KHAPANE COLLEGE OF ARTS & COM. PACHAL

अ.नं.	तालुका	एकूण लोकसंख्या	एकूण आदिवासी लोकसंख्या	एकूण आदिवासी कुटुंबे	एकूण ठाकर कुटुंबे	नमुना निवड कुटुंबे	टक्केवारी
०१	सुधागड	६२८५२	१५५८२	३४०२	९११	८२	९
०२	रोहा	१६१७५०	२४९६४	५४६३	६०७	५४	९
०३	कर्जत	१८४४२०	४०९१४	८०११	१२९५	११७	९
०४	खालापूर	१८३६०४	२५४३७	५३४७	६१५	५५	९
०५	पेन	१७६६८१	२७६७६	६१५२	१०१८	९२	९
०६	पनवेल	४२२५२२	३६५७५	७७१५	६१९	५६	९
	एकूण	११९१८२९	१७११४८	३६०९०	५०६५	४५६	९

संदर्भ :- १)वार्षिक आदिवासी उपयोजना -२०११-१२ ,महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग पृ.४३५

उपयोजनेचे मूल्यमापन या विषयावर आपला पीएचडी प्रबंध सादर केला आहे.

४) प्रा.डॉ. नंदा पांगुळ यांनी कोलाम आदिवासी स्त्रियांचे आरोग्य आणि समाज कार्य मध्यस्थी या विषयावर संशोधन पेपर तयार केला आहे.

५) प्रा.फारुक के. शेख यांनी नाशिक जिल्ह्यातील पेठ व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आदिवासी समुदायातील व्यसनाधीनता या विषयावर संशोधन पेपर तयार केला आहे.

१.९ रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाची आर्थिक स्थिती :- कोणत्याही समाजाची आर्थिक स्थिती ही त्यांच्या व्यवसायावर अवलंबून असते. याबाबत रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाचा विचार केल्यास हा समाज ज्या भागात वास्तव्यास आहे. त्यावरून त्यांची व्यवसाय निश्चिती झालेली आहे. म्हणजेच सर्वच ठाकर जमातीचा एक सारखा व्यवसाय आढळत नाही. त्यामध्ये विविधता आढळते. याबाबत रायगड जिल्ह्यातील ४५६ कुटुंबांकडून त्यांच्या व्यवसायाची माहिती घेतली असता त्यांच्याकडून जे विविध व्यवसाय केले जातात ते खालील प्रमाणे

१.९.१ ठाकर समाजाचे व्यवसाय :- आदिवासी समाजातील लोकांच्या व्यवसायवर निसर्गाचा प्रभाव जाणवतो. तसाच तो रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाच्या बाबतीतही खरा ठरतो. हे त्यांच्या विविध व्यवसायावरुन स्पष्ट होते.

शेती :- रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजातील १८.२० %(८३) कुटुंबाचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे तर ६.७९% (३१) कुटुंबाचा शेती हा दुय्यम व्यवसाय आहे. त्याचप्रमाणे ३.९४% (१८) ठाकर कुटुंबे प्रमुख व्यवसाय म्हणून शेती खंडाने करतात.

मोलमजुरी :- रायगड जिल्ह्यातील ठराविक ठाकर समाजातील कुटुंबांकडेच शेती असल्याने इतर कुटुंबीयांना आपल्या जीवनाचा गाडा चालविण्यासाठी मोलमजुरी शिवाय पर्याय असत नाही. रायगड जिल्ह्यातील नमुना निवड कुटुंबापैकी ५९.६४% लोकांचा मोलमजुरी हा प्रमुख व्यवसाय आहे.

नोकरी :- इतर आदिवासी समाजाप्रमाणेच रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाची देखील शैक्षणिक बाबतीत म्हणावी तेवढी प्रगती झालेली नाही. त्यामुळेच ठाकर समाजात शैक्षणिक गळती व उच्च शिक्षणाचा अभाव असल्यामुळे रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजातील नमुना निवड कुटुंबापैकी फक्त ०.९% लोकांचा नोकरी हा उत्पन्न मिळवून देणारा मार्ग आहे.

किराणा दुकान :-रायगड जिल्ह्यातील काही ठाकर लोकांनी स्वतः भांडवल उभारून किराणा दुकान ठाकरवाडी वर सुरू केले आहे. तर काही ठाकर लोकांनी शासनाच्या कर्ज पुरवठा योजनेचा लाभ घेऊन किराणा दुकान हा व्यवसाय सुरू केला आहे. एकूण नमुना निवड कुटुंबापैकी ४.१६% ठाकर कुटुंबानी आपला उदरनिर्वाह करण्यासाठी हा व्यवसाय सुरू केला आहे.

याबरोबरच निवड कुटुंबापैकी ९.८७% कुटुंबांचा भाजीपाला विकणे हा प्रमुख व्यवसाय आहे. ३.२९% कुटुंबांचा गवंडीकाम हा मुख्य व्यवसाय आहे. या व्यवसायाबरोबरच जंगलातील फाटी विकणे, करवंद विकणे आंबे, जांभूळ विकणे, काजूबिया विकणे, रानभाज्या विकणे

समाजाकडून केले जातात.

तयात येते की, रायगड जिल्ह्यातील एका व्यवसायात गुंतलेला नाही. भरण्यासाठी या ठाकर कुटुंबाकडून व्यवसाय केले जातात. मात्र त्यापासून अल्प असल्यामुळे आजही रायगड समाजाची आर्थिक स्थिती बिकट आहे.

ठाकर समाजाला विविध मार्गाने मिळणारे :- रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजात जुरी, किराणा दुकान, भाजीपाला विकणे, व इतर विविध व्यवसाय केले जातात. या व्यवसायांपासून या समाजाला मिळणाऱ्या वार्षिक चा विचार केल्यास, पाच ते सात हजार वार्षिक मिळणाऱ्या कुटुंबाचे शेकडा प्रमाण ८.७७%, सात हजार वार्षिक उत्पन्न मिळणाऱ्या कुटुंबाचे शेकडा २३.४६%, दहा ते पंधरा हजार वार्षिक उत्पन्न ाऱ्या कुटुंबाचे शेकडा प्रमाण ५३.२९%, पंधरा ते हजार वार्षिक उत्पन्न मिळणाऱ्या कुटुंबाचे शेकडा १२.०७% तर वीस हजाराच्या पुढे वार्षिक उत्पन्न ाऱ्या कुटुंबाचे शेकडा प्रमाण १.७६% आहे.

यावरून असे लक्षात येते, की कायमस्वरूपी रोजगाराचा , मिळणारा मोबदला कमी, ऋतुमानानुसार बदलणारे साय इत्यादी मुळे ठाकर समाजाची वार्षिक उत्पन्न ळी कमी असल्याचे दिसते. त्यामुळे त्यांची राहणीमान ळी देखील निकृष्ट प्रतीची आहे.

१.९.३ ठाकर समाजातील उत्पन्न आणि खर्च तची स्थिती :- रायगड जिल्ह्यातील नमुना म्हणून डलेल्या ४५६ ठाकर कुटुंबांना मिळणाऱ्या वार्षिक न्नातून घर खर्च भागतो काय? याबाबत माहिती ारण्यात आली असता, ४०.३५% कुटुंबाच्या मते पैसा नाही, ४१% कुटुंबाच्या मते रोज कमवायचे मग चे, १.५५% कुटुंबाच्या मते महिन्याची तोंडमिळवणी . १६% कुटुंबाच्या मते बरे चालते तर १.१०% ुंबाच्या मते घर खर्च भागून थोडीफार बचत होते.

यावरून ठाकर समाजाला विविध मार्गाने मिळणारे घर खर्च भागविण्याच्या दृष्टीने पुरेसे होत नाही हे होते.

१.९.४ ठाकर समाजाच्या शेतीची स्थिती :- रायगड ातील नमुना निवड कुटुंबापैकी किती कुटुंबाकडे ची शेती आहे याबाबतची माहिती घेतली असता, ७०.८३% कुटुंबांकडे स्वतःची शेती नाही, तर २९.१७% कुटुंबांकडे स्वतःची शेती आहे. म्हणजेच रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजात भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे त्यांची उत्पन्न पातळी कमी राहते.

१.९.५ ठाकर समाजातील जोड व्यवसायाची स्थिती:- जोड व्यवसायाबाबत रायगड जिल्ह्यातील नमुना निवड ४५६ कुटुंबापैकी किती ठाकर कुटुंबाकडून जोड व्यवसाय केले जातात याबाबत माहिती घेतली असता, ८७.०६% कुटुंबे जोडव्यवसाय करत नाहीत तर १२.९४% ठाकर कुटुंबाकडून जोड व्यवसाय केला जातो.

म्हणजेच ठाकर समाजात जोडव्यवसाय न करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक आहे

१.९.६ ठाकर समाजातील दारिद्र्य रेषा :- रायगड जिल्ह्यातील नमुना निवड केलेल्या कुटुंबाकडून तुमचे नाव शासनाच्या दारिद्र्य रेषेखालील यादीत आहे का? याबाबत माहिती घेतली असता. ७८.२९% ठाकर कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली तर २१.७१% दारिद्र्य रेषेच्या वर आहेत.

म्हणजेच ठाकर समाजात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे हे स्पष्ट होते.

एकंदरीत वरील विश्लेषनावरून असे लक्षात येते की, रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाची आर्थिक स्थिती बिकट आहे हे स्पष्ट होते. म्हणून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना करणे गरजेचे आहे.

१.१० रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना :-

१) रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाकडून विविध व्यवसाय केले जातात. परंतु हे व्यवसाय उदरनिर्वाह हा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून केले जातात. हा दृष्टिकोन बदलून आर्थिक उन्नतीसाठी व्यवसाय प्रशिक्षण, व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजना, इत्यादीचा ठाकर समाजातील लोकांना अधिकाधिक लाभ द्यावा.

२) ठाकर समाजात नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. ते वाढविण्यासाठी शासनाने ठाकर समाजातील मुले-मुले शिक्षणाच्या प्रवाहात अधिकाधिक कशी येतील. त्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

३) रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजाची वार्षिक उत्पन्न पातळी अतिशय कमी आहे. ती वाढविण्यासाठी शेतीविकास, नरेगा योजनेची प्रभावी अंमलबजावणी, व्यवसाय प्रशिक्षण, कर्ज सुविधा इत्यादी मुळे

व्यवसायाला चालना मिळून त्यांचे उत्पन्न पातळी वाढवण्याचा प्रयत्न करावा.

४) ठाकर समाजात जोड व्यवसायाला चालना देण्याच्या दृष्टीने मोफत शेळ्या वाटप, कुक्कुट पालना बाबत जनजागृती, जोड व्यवसायाचे महत्त्व इत्यादीबाबत समाजात ग्रामसभा, कार्यशाळा इत्यादिद्वारे जनजागृती करावी. जेणेकरून ठाकर समाजातील जोड व्यवसायाला चालना मिळेल.

५) रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजातील लोकांना त्यांच्या गावातील/वाडीतील गायरान किंवा शासनाकडे असणाऱ्या जमिनीचे वाटप करावे जेणेकरून त्यांना हक्काचे उत्पन्नाचे साधन प्राप्त होईल.

६) आदिवासी योजना फक्त कागदावर न ठेवता त्या सर्वच आदिवासी लोकांपर्यंत कशा पोचतील त्यांचा लाभ आदिवासी समाजातील लोकांना कसा मिळेल त्या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे.

१.११ समारोप :- भविष्यकाळातील एक महासत्ताक अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहिले जात असले तरी, याच भारतीय समाजातील शहरी आणि ग्रामीण समुदाय काळाच्या ओघात विकासाच्या दिशेने वाटचाल करतो आहे. पण स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही विकासाची फळे मात्र आदिवासी समाजापर्यंत पोहोचलेली दिसत नाहीत. हे वरील संशोधनात्मक मांडणीवरुन स्पष्ट होते. म्हणूनच फक्त रायगड जिल्ह्यातील ठाकर समाजालाच नव्हे ,तर संपूर्ण भारतातील आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फक्त अंदाजपत्रकात आदिवासी विकास निधीची तरतूद किंवा फक्त कागदावर आदिवासी विकास योजना राबवून चालणार नाही, तर आदिवासी विकास निधी संपूर्ण खर्च कसा होईल. आणि आदिवासी विकास योजनांची तत्परतेने अंमलबजावणी कशी होईल त्या दृष्टीने शासन, स्वयंसेवी संस्था, प्रशासनातील कर्मचारी वर्ग व सर्वसामान्य नागरिक या सर्वांनी एकत्रित प्रयत्न केल्यास नक्कीच आदिवासी समाजातील सर्व जमातींना विकासाची फळे प्राप्त होऊन तो समाजदेखील मुख्य प्रवाहात येऊन त्यांच्या समस्या सुटतील पण त्याचबरोबर भारताच्या विकासाला देखील चालना मिळेल.

संदर्भ सूची :

१) आगलावे प्रदीप (२००७)- आदिवासी समाजाचे समाजशास्त्र - साईनाथ प्रकाशन, नागपूर

२) आगलावे प्रदीप (२०००) - संशोधन पद्धती शास्त्र तंत्र - विद्या प्रकाशन, पुणे

३) गारे गोविंद (२००२)- महाराष्ट्रातील आदिवासी जमार्त - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

४) गारे गोविंद (२००२)- सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकूर (ठाकर) आदिवासी - विद्या प्रकाशन पुणे

५) नाडगोंडे गुरुनाथ(२००३)- भारतीय आदिवासी- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

६) वार्षिक आदिवासी उपयोजना (२०११-१२)- महारा शासन, आदिवासी विभाग

७) रोहा, सुधागड (पाली), पेन, पनवेल, खालापूर कर्जत पंचायत समिती आदिवासी कुटुंब सर्वेक्षण अहवा २०१०-११

८) Censes of India -2011 Government of India

● ● ●

II विद्या अमृतम अश्नुते II

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal Pachal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL – RAYPATAN

At Post – Raypatan, Tal. – Rajapur, Dist. – Ratnagiri, 416 704
First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994
Permanent Affiliation No. Aff-II./ICD/2015-16/1121 dated 16.09.2015, ISO 9001:2015 Certified
❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

I.Q.A.C., Department of History, Marathi, Hindi, English and Commerce
Organize
One Day Interdisciplinary National E-Conference
On

75 years of India Independence

Sponsored by
Indian Council of Social Science Research, Mumbai
In Collaboration with
Department of History, University of Mumbai, Mumbai
Date: 15 March, 2022, Time : 10.30am To 4.00pm

CERTIFICATE

This is to certify that, Dr./Prof./Mr./Miss. **Sudhir Sopan Waghmare** of **Shri. Manohar Hari Khapane College of Arts and Commerce, Pachal** actively participated & presented a paper entitled स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) in One Day Interdisciplinary National Level E-Conference held on 15/03/2022 at Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerce, Pachal-Raypatan.

Dr. Prakash Masaram
I/c Head,
Department of History,
University of Mumbai

Prof. Smita Shukla
Honorary Director,
ICSSR (WRC),
Mumbai

Sanjay V. Nimbalkar
Asst. Prof.
IQAC Coordinator
Shri. M. H. K. College of Arts &

Dr. Pramod. S. Meshram
I/c Principal,
Shri. M.H.K.College of Arts &
Commerce, Pachal-Raypatan

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

संशोधक

• वर्ष : ९० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०७



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

अनुक्रमणिका

१ स्वतंत्रता के बाद बौद्धो कें जीवन में सामाजिक परिवर्तन
- डॉ.प्रमोद मेश्राम, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- १

२ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्य प्रवाहाची वाटचाल
- डॉ. विकास पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- १५

३ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक
- डॉ.बळवंत दाभाडे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- २१

४ स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) - डॉ.सुधीर वाघमारे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- २६

५ स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळीचा विकास
- डॉ.अशोक पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- ३१

६ भारतीय स्वातंत्र्योत्तरकालीन ग्रंथालयातील नवे प्रवाह: एक अभ्यास
- डॉ.जयंत मेश्राम, रिसोड, जि.वाशिम ---------- ३६

७ स्वांतत्र्योत्तर काळातील वाढते शहरीकरण
- डॉ. प्रतिभा देसाई, गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर ---------- ३८

८ स्वातंत्र्योत्तर कालखंडात सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास
- डॉ. शशिकांत वानखडे, आर्णी, जि.यवतमाळ ---------- ४२

९ स्वातंत्र्योत्तर हिंदी पत्रकारिता
- डॉ.संतोष रायबोले, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग ---------- ४७

१० स्वातंत्र्यप्राप्ती आणि सुरेश भट
- डॉ. चैनलाल राणे, गोरेगाव, जि.गोंदिया ---------- ५१

११ डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्राच्या पाचव्या सिद्धांतानुसार महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथसंख्येत झालेली वाढ : एक अभ्यास
- अंबादास खिलारे, डॉ.दिलीप मेस्त्री, पनवेल, नवी मुंबई ---------- ५५

१२ मानवी हक्क व दलित कविता
- डॉ. नरेंद्र घरत, डॉ.कविता लुटे, नागपूर ---------- ५८

१३ स्वातंत्रोत्तर भारतीय शिक्षण व्यवस्थेवर महात्मा गांधींचा प्रभाव
- डॉ.नंदकिशोर मने, गडचिरोली ---------- ६४

१४ भारतीय ग्रंथालय कायदे : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ चे सार्वजनिक ग्रंथालय विकासात महत्त्व - अनंत थोरात, रोहा, जि.रायगड ---------- ६८

१५ स्वातंत्रोत्तर काल मे महिला सशक्तिकरण एवं शिक्षा का महत्व
- डॉ.रजनी वाढई, गडचिरोली ---------- ७५

१६ स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत दैनिक संचार'चे संपादक रंगा वैद्य यांचे योगदान
- शंकर पवार, कोल्हापूर ---------- ७९

१७ स्वातंत्रोत्तर भारतातील आदिवासींची स्थिती, संविधानिक तरतुदी व कायदे
- डॉ.नरेश मडावी, गडचिरोली. ---------- ८४

ISSN No. 2394-5990

स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळीचा विकास

डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील
श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालय,
पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी.
मो.९४२३८३१८१२, ईमेल : Email adpatil24gmail.com

गोषवारा :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये अनेक चळवळींचा उदय झाला त्यापैकी शेतकरी चळवळ ही एक महत्त्वाची चळवळ आहे. भारतातील शेतकरी आंदोलने किंवा शेतकरी चळवळी या अचानक उद्भवलेल्या नसून त्या पाठीमागे शेती क्षेत्रातील असंख्य समस्या कारणीभूत ठरलेल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात मुख्यतः १९७० नंतर भारतात मोठ्या प्रमाणात शेतकरी आंदोलने झाली. या आंदोलनामधून शेतकऱ्यांनी प्रभावीपणे आपल्या मागण्या राजकीय पातळीवर मांडुन नव्या बदलाला चालना देण्याचे काम केले. हरित क्रांती व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होऊन उत्पादनामध्ये चांगली वाढ झाली, मात्र केवळ उत्पादन वाढून चालणार नव्हते तर शेतकऱ्यांच्या आधुनिक काळाबरोबर उदयास आलेल्या नवीन समस्या सोडवणे तितकेच गरजेचे होते. याकडे सरकारने लक्ष न दिल्यामुळे सुरुवातीपासूनच सरकारच्या विरोधात आपल्या विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी चळवळी केल्या. १९७३ मध्ये डाव्या पक्षांनी शेतकऱ्यांना संघटित करून आंदोलने सुरू केली. त्यासाठी त्याने शेतकरी आंदोलनामध्ये ग्रामीण जनता आणि कामगारांना एकत्र आणण्याचे काम केले. केरळमधील काही भागात औद्योगीकरणातील कामगार संघटनांनी शेतकरी चळवळीला पाठिंबा दिल्याचे दिसून येते. गिरणी कामगार आणि शेतमजूर यांच्यामध्ये संघटना बांधण्याचे प्रयत्न तेलंगणा आणि नक्स लाईट चळवळीमध्ये झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भारतामध्ये सुरू असलेल्या या शेतकरी चळवळीत महिलांचा सहभाग बहुसंख्येने होता. सरकारकडे या संघटनांनी केलेल्या मागण्यापैकी काही मागण्या मान्य झाल्या तर काहींकडे सरकारने दुर्लक्ष केले. अलीकडील काळातील शेतकरी संघटना राजकीय पक्ष्यांच्या आश्रयाने उदयास येऊन त्यांची वाटचाल सुरू झाली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा खरा आधार म्हणून शेतकरी कामगार पक्ष उदयास आला होता. १९८०च्या दशकामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी संघटना जास्त आक्रमक होऊन त्यांनी आपल्या मागण्यांसाठी आंदोलनाचे स्वरूप बदलले. शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे अनेक नेते १९८० ते ९० या काळात महाराष्ट्रात उदयास आले. महाराष्ट्रातील सहकार उद्योगांनी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात चाललेली पिळवणूक थोपवण्यासाठी व शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळवून देण्यासाठी या आंदोलनाचा उपयोग झाला. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतीय शेतकरी केवळ उदरनिर्वाहासाठी शेती हा व्यवसाय करत होता मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतकरी चळवळीमुळे शेतीकडे भारतीय शेतकरी व्यवसाय म्हणून पाहू लागला. त्यामुळे त्याची थोड्याफार प्रमाणात आर्थिक प्रगती सुरू झाली होती. शेतकरी संघटनेच्या निमित्ताने अनेक संघटनेचे नेते राजकीय जीवनामध्ये पदार्पण करू शकले, याचे उत्तम उदाहरण म्हणून राजू शेट्टी या शेतकरी नेत्याकडे पाहता येईल. गेले अनेक शतके असंघटित असलेल्या शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या श्रमाला किंवा कष्टाला योग्य मोबदला मिळवून देण्याचे काम शेतकऱ्यांच्या विविध संघटना करत आहेत. अन्यायी सरकार शेतकऱ्यांची आंदोलनही कशाप्रकारे चिरडून टाकण्याचा प्रयत्न करते हे गेल्या वर्षभर दिल्लीमध्ये सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने जगभरातील जनतेला पहावयास मिळाले आहे. असे असले तरी कृषी कायदे मागे घेण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागला हे शेतकरी आंदोलनाचे यश आहे असे म्हणावे लागेल. भारतामध्ये शेतकऱ्यांची चळवळ उदयास आली असली तरी ती अजून भक्कम पायावर उभी राहण्याची गरज आहे असे वाटते.

बीज शब्द : शेतकरी चळवळ, शेतकरी आंदोलने, भारतातील शेतकरी

विषय परिचय :-

प्राचीन काळापासून भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो मात्र या देशांमध्ये शेती करणाऱ्या शेतकरी समाजाची परिस्थिती प्राचीन काळापासून ते स्वातंत्र्यापर्यंत अतिशय दयनीय असलेली दिसून येते. प्राचीन व मध्ययुगीन काळात तत्कालीन राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे त्यांना तत्कालीन राज्यकर्त्यांच्या विरोधात संघर्ष करावा लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात सुमारे ७० ते ७५ टक्के लोकांचा उदरनिर्वाह शेती या

व्यवसायावर अवलंबून होता मात्र या व्यवसायाकडे अपवादात्मक राज्यकर्त्यांनी लक्ष दिले. त्यामुळे त्यांची परिस्थिती फारशी सुधारली नाही. इंग्रज राजवटीच्या काळात ६५ ते ७० टक्के असलेला शेतकरी समाज अनेक समस्यांना तोंड देत होता. इंग्रजांनीही शेतकऱ्यांच्या दु:खाकडे कधी पाहिले नाही इ. स. १९४७ मध्ये आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि भारतीय शेतकर्यांच्या आशाकांक्षा पल्लवित झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारेल असे शेतकऱ्यांची भावना होती, मात्र शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच आली. देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशके झाली आणि देशाची औद्योगिक प्रगती नोंद घेण्याइतपत झाली असली तरी देशातील ६३% जनता मात्र आजही जगण्यासाठी शेती उत्पादनावरच अवलंबून आहे १९६० नंतर शेतकरी बाजाराच्या मागणीनुसार शेती उत्पादन घेऊ लागले तेव्हापासून त्यांच्यापेक्षा वाढण्यास सुरुवात झाली. देशाचे पहिले पंतप्रधान पं.नेहरू व त्यांच्यानंतर शास्त्रीजीनी केलेल्या प्रयत्नाने शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात मुख्यत: १९७० नंतर भारतात मोठ्या प्रमाणात शेतकरी आंदोलने झाली. या आंदोलनामधून शेतकऱ्यांनी प्रभावीपणे आपल्या मागण्या राजकीय पातळीवर मांडुन नव्या बदलाला चालना देण्याचे काम केले. १९७० पासून सुरु असलेली हे आंदोलन आजही उग्र रूप धारण केलेली पहावयास मिळतात. कारण शेती क्षेत्रात दिवसेंदिवस नवनवीन समस्या उदयास येत असून असून त्या समस्यांचा शेतकऱ्यांच्या जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाला चळवळ किंवा आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही.

संशोधन लेखाची उद्दिष्टे :-

१. भारतीय शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणे.
२. भारतीय शेतकरी चळवळीचा इतिहास समजून घेणे.
३. शेतकरी चळवळीचा समाजावर समाजावर झालेला परिणाम अभ्यासणे.

शेतकरी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

मध्ययुगाच्या अखेरीला भारतावर ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित झाले होते. व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांनी या देशावर आपली राजकीय सत्ता स्थापन करून भारताचे आर्थिक शोषण चालविले होते. त्यांच्या आर्थिक शोषणाला मोठ्या प्रमाणात या देशातील शेतकरी वर्ग बळी पडला, त्यामुळे त्यांनी इंग्रजांच्या विरोधात अनेक उठाव केले. या उठावांचे उद्दिष्ट हे ब्रिटिशांची हकालपट्टी करून पूर्वीचे सरकार परत आणणे किंवा पूर्वीचे शेती व्यवहार पुनर्स्थापित करणे असे होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून सारा वसुलीच्या निमित्ताने शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक केली जात होती. त्यामुळे इंग्रजांच्या विरोधात शेतकऱ्यांनी केलेल्या सुमारे २९ उठावाची नोंद ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये पहावयास मिळते. आयोध्या प्रांत, उत्तर कर्नाटक, मलबार, महाराष्ट्र, बंगाल, बिहार, हरियाणा, इत्यादी प्रांतांमध्ये इंग्रज राज्यकर्त्यांच्या विरोधात शेतकऱ्यांनी सामूहिक उठाव केले होते.

महाराष्ट्रामध्ये पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटिश राजवट उदयास आली होती. या राजवटीच्या काळात शेतकरी व आदिवासी यांनी ब्रिटिशांच्या विरोधात सशस्त्र उठाव केले. त्याची सुरुवात उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्ह्याच्या दक्षिण भागात झालेल्या रामोशाच्या बंडाने झाली. पुणे जिल्ह्यात सुरू झालेली ही चळवळ हळूहळू संपूर्ण महाराष्ट्रात पसरली, मात्र ब्रिटिश आणि ही चळवळ मोडून काढण्यात यश मिळवले. महाराष्ट्रात पडणाऱ्या दुष्काळामुळे सारा वसुलीच्या विरोधात शेतकऱ्यांनी सरकारच्या विरोधात उठाव केले. पुण्यामध्ये स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्यांचे आसूड हा ग्रंथ लिहिला. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक हिताला विरोध करणाऱ्या सरकार व सावकार वर्गाला जागृत केले, तरीदेखील शेतकऱ्यांचा प्रश्न सुटला नाही. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात शेतकरी वर्ग गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार व सविनय कायदेभंग चळवळीत सामील झाला. जंगल सत्याग्रह करून ब्रिटिश सरकारला त्याने विरोध केला होता. ब्रिटिश राजवटीच्या काळात शेतीचे व्यापारीकरण, दुष्काळ, अन्यायी सारावसुली, सरकार व सावकारांकडून होणारे शोषण याविरोधात आवाज उठवण्यासाठी शेतकरी चळवळ उदयास आली होती.

स्वतंत्र भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये अनेक चळवळींचा उदय झाला त्यापैकी शेतकरी चळवळ ही एक महत्त्वाची चळवळ आहे. ही चळवळ ग्रामीण चळवळ ग्रामीण चळवळ म्हणूनही ओळखली जाते. भारतातील शेतकरी आंदोलने किंवा शेतकरी चळवळी या अचानक उद्भवलेल्या नसून त्या पाठीमागे

ISSN No. 2394-5990

शेती क्षेत्रातील असंख्य समस्या कारणीभूत ठरलेल्या आहेत. शेतकरी चळवळीला जरी खुप मोठा इतिहास लाभला असला तरी स्वातंत्र्यानंतर मुख्यता १९७० नंतर भारतात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची आंदोलने झालेली पहावयास मिळतात. शेतकरी चळवळीचे मुख्य कारण म्हणजे शेतकऱ्यांच्या समस्या हे होय. खास करून शेतकऱ्यांमधील अज्ञान, दारिद्र्य, दुष्काळ, पाणीपुरवठ्याची समस्या, कर्जबाजारीपणा, अंधश्रद्धा, निसर्गावर आधारलेली शेती, असंघटित पणा, शेतीमालाच्या साठवणुकीच्या समस्या, नाशवंत शेतीमालाचा प्रश्न, वाढती लोकसंख्या व अपुरी जमीन, नव्या तंत्रज्ञानाचा अभाव व प्रसार, वाढती महागाई, जागतिकीकरण शेतीपूरक व्यवसायाकडे दुर्लक्ष, दलालांकडून होणारी पिळवणूक, बाजार भाव, विजेचा प्रश्न, शासनाची उदासीनता इत्यादी समस्यांनी भारतीय शेतकरी ग्रासलेला आहे. त्यामुळे त्याला सतत आंदोलने करून मार्ग शोधावा लागतो.

स्वातंत्र्योत्तर काळातील प्रमुख शेतकरी चळवळी :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय शेतकऱ्यांच्या सरकारकडून मोठ्या प्रमाणात अशा अपेक्षा वाढलेल्या होत्या. शासनाकडून शेतकऱ्यांच्या समस्या सहजगत्या सोडवल्या जातील आणि शेतकरी वर्गाला सुखाचे दिवस पहावयास मिळतील अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती, मात्र सत्तेवर आलेल्या कॉंग्रेस सरकार कडून जमीन सुधारणा व शेती विकासासाठी चे मर्यादित प्रयत्न केले गेले. इंदिरा गांधींच्या काळात झालेल्या हरित क्रांतीमुळे शेतीक्षेत्राचा चांगला विकास झाला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होऊन उत्पादनामध्ये चांगली वाढ झाली, मात्र केवळ उत्पादन वाढून चालणार नव्हते तर शेतकऱ्यांच्या आधुनिक काळाबरोबर उदयास आलेल्या नवीन समस्या सोडवणे तितकेच गरजेचे होते. याकडे सरकारने लक्ष न दिल्यामुळे सुरुवातीपासूनच सरकारच्या विरोधात आपल्या विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी चळवळी केल्या. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कारकिर्दीत म्हणजेच १९४७ ते १९६४ पर्यंत शेतकऱ्यांची देशाच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात आंदोलनं झाली. त्यापैकी पश्चिम बंगालमधील आंदोलन हे प्रमुख आंदोलन म्हणून ओळखले जाते महाराष्ट्रामध्ये १९७० नंतर शेतकरी चळवळीने मोठ्या प्रमाणात जोर धरला होता. १९७३ मध्ये डाव्या पक्षांनी शेतकऱ्यांना संघटित करून रोजगार हमी योजना, कर्ज पुरवठा, गरिबांना घरे, शेतीमालाला योग्य किंमत या मागण्यांसाठी आंदोलने सुरू केली. त्यासाठी त्याने शेतकरी आंदोलनामध्ये ग्रामीण जनता आणि कामगारांना एकत्र आणण्याचे काम केले. मात्र सरकारने त्याला फारशी दाद दिली नाही. केरळमधील काही भागात औद्योगीकरण आतील कामगार संघटनांनी शेतकरी चळवळीला पाठिंबा दिल्याचे दिसून येते. गिरणी कामगार आणि शेतमजूर यांच्यामध्ये संघटना बांधण्याचे प्रयत्न तेलंगणा आणि नक्स लाईट चळवळीमध्ये झाल्याचे दिसून येते ग्रामीण भारतामध्ये सुरू असलेल्या या शेतकरी चळवळीत महिलांचा सहभाग बहुसंख्येने होता मात्र त्याकडे विद्वानांनी फारसे लक्ष दिलेले दिसून येत नाही केरळमधील शेतमजुरांच्या चळवळीमध्ये महिलांनी दिलेल्या योगदानाची दखल श्री. के. पी. कन्नन याने घेतली आहे. हरित क्रांतीनंतर भारतीय शेतीला भांडवलशाही पद्धतीची साथ मिळाल्यामुळे आर्थिक बाजारात शेती क्षेत्राने चांगली मुसंडी मारण्याचा प्रयत्न केला त्यामुळे शेतकरी चळवळी नवे बदल दिसून येऊ लागले. Likadil kalat शेतकरी संघटना राजकीय पक्ष्यांच्या आश्रयाने उदयास येऊन त्यांची वाटचाल सुरू झाली. उदा महाराष्ट्रातील शेतकरी संघटना उत्तर प्रदेशातील किसान युनियन गुजरात मधील खेडूत समाज तामिळनाडू व पंजाब मधील संघटना इत्यादी या संघटनांनी शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावा शेतीला वेळेवर वीज पुरवठा व्हावा वीज दर माफी मिळावी पाणीपट्टीत माफी मिळाली शेतीला नेहमी पाणी मिळावे सवलतीच्या दारामध्ये कर्जपुरवठा व्हावा शेतकरी कर्जमाफी हवी इत्यादी मागण्या सरकारकडे या संघटनांनी केल्या होत्या त्यापैकी काही मागण्या मान्य झाल्या तर काहींकडे सरकारने दुर्लक्ष केले.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा खरा आधार म्हणून शेतकरी कामगार पक्ष उदयास आला होता. या पक्षाने रायगड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, इत्यादि जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या समस्या घेऊन सरकारच्या विरोधात मोठी आंदोलने केली. इ.स. १९८० नंतर पुढील काळात महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीला खऱ्या अर्थाने भक्कम पणा आला असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

शेतकरी संघटनांची विविध आंदोलने :-

१९८०च्या दशकामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी संघटना जास्त आक्रमक होऊन त्यांनी आपल्या मागण्यांसाठी आंदोलनाचे स्वरूप बदलले. शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे अनेक नेते १९८० ते ९० या काळात महाराष्ट्रात उदयास आले त्यांनी विविध प्रकारचे आंदोलने करून सरकारवर दबाव आणण्याचे काम केले. महाराष्ट्रातील प्रमुख पीक

असलेल्या उसाच्या भावाचा प्रश्न उचलून धरून आंदोलनाला प्रारंभ केला. ऊस आंदोलना बरोबरच कांदा आंदोलन, दूध आंदोलन, कापूस आंदोलन, कर्जमुक्ती आंदोलन, विजमाफी इत्यादी आंदोलनातून महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ भक्कम होत गेली. शरद जोशी, रघुनाथ दादा पाटील, राजू शेट्टी, सदाभाऊ खोत यांच्यासारखे शेतकरी नेते या आंदोलनातून पुढे आले आणि त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर आणि सहकार उद्योगावर आपला प्रभाव निर्माण केला. महाराष्ट्रातील सहकार उद्योगांनी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात चाललेली पिळवणूक थोपवण्यासाठी आंदोलनांचा चांगला उपयोग झाला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळवून देण्यासाठी या आंदोलनाचा उपयोग झाला.

शेतकरी चळवळीचा परिणाम :-

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतीय शेतकरी केवळ उदरनिर्वाहासाठी शेती हा व्यवसाय करत होता मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतकरी चळवळीमुळे शेतीकडे भारतीय शेतकरी व्यवसाय म्हणून पाहू लागला. त्यामुळे त्याची थोड्याफार प्रमाणात आर्थिक प्रगती सुरू झाली होती. आधुनिक तंत्रज्ञानाचा, विज्ञानाचा व रासायनिक खतांचा उपयोग सुरू होऊन शेती उत्पादनात प्रचंड वाढ झाली. भारतातील अनेक शेतकरी कुटुंबे शेती व्यवसायातच अडकून पडल्यामुळे त्याचा कुटुंबव्यवस्थेवर ताण पडू लागला. कारण कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढत गेली आणि जमिनीचे क्षेत्र मात्र आहे तेवढेच राहिले, त्यामुळे मिळणाऱ्या शेती उत्पादनातून कुटुंब चालवणे शेतकऱ्यांना अशक्य झाले. परिणामी शेतकऱ्यांच्या जीवनात अनेक सामाजिक व कौटुंबिक समस्या उभ्या राहिल्या. त्या सोडवण्यासाठी शेतकऱ्यांना शेतकरी चळवळीची मदत घ्यावी लागली. शेतकरी चळवळ उदयास आल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चांगला बाजार भाऊ मिळू लागला आहे. शेतकऱ्यांची व्यापारी व सावकार व कारखानदारांकडून होणारी पिळवणूक केवळ शेतकरी चळवळीमुळे थांबण्यास मदत झाली आहे. शेतकरी संघटनेच्या निमित्ताने अनेक संघटनेचे नेते राजकीय जीवनामध्ये पदार्पण करू शकले, याचे उत्तम उदाहरण म्हणून राजू शेट्टी या शेतकरी नेत्याकडे पाहता येईल. त्याने आपल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून सहकारी साखर कारखानदारांना व दूध संघांना शेतकऱ्यांची ताकद दाखवण्याचे काम केले. परिणामी उसाला आणि दुधाला चांगला दर मिळण्यामध्ये यश आले आहे. अलीकडील काळात शेतकऱ्यांची वीज बिले साखर कारखान्याकडून कापून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्या विरोधात महाराष्ट्रातील शेतकरी संघटना आक्रमक झाल्याचे पहावयास मिळते. अशाप्रकारे गेले अनेक शतके असंघटित असलेल्या शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या श्रमाला किंवा कष्टाला योग्य मोबदला मिळवून देण्याचे काम शेतकऱ्यांच्या विविध संघटना करत आहेत. त्यामुळेच शेतकऱ्यांना आपल्या जीवनामध्ये थोड्याफार प्रमाणात आशेचा किरण दिसतो आहे. असे असले तरी अन्यायी सरकार शेतकऱ्यांची आंदोलनही कशाप्रकारे चिरडून टाकण्याचा प्रयत्न करते हे गेल्या वर्षभर दिल्लीमध्ये सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने जगभरातील जनतेला पहावयास मिळाले आहे. टीकेत यांच्या नेतृत्वाखाली झालेले आणि दीर्घ काळ चाललेले शेतकरी आंदोलन सरकारला अखेरीस मोडून काढता आले नाही. तसेच कृषी कायदे मागे घेण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागला हे शेतकरी आंदोलनाचे यश आहे असे म्हणावे लागेल. सर्व प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या भक्कम संघटना असतात आणि त्या आपले प्रश्न सोडविण्यासाठी चांगले व्यासपीठ तयार करतात. भारतामध्ये शेतकऱ्यांची चळवळ उदयास आली असली तरी ती अजून भक्कम पायावर उभी राहण्याची गरज आहे असे वाटते.

निष्कर्ष :-

१. भारतातील शेतकरी वर्गाला आपल्या समस्या किंवा प्रश्न सोडविण्यासाठी चळवळ किंवा आंदोलन करण्याशिवाय पर्याय नाही.

२. शेती उत्पादनाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी शेतकरी चळवळीचे योगदान मोठे आहे.

३. शेतकऱ्यांनी केलेल्या चळवळीमुळे चळवळीमुळे सरकारला त्यांच्या अनेक मागण्या मान्य कराव्या लागल्या आहेत.

४. अनेकदा भारतातील शेतकरी चळवळीला चळवळीला कामगार वर्गाचा पाठिंबा मिळाला आहे.

५. शेतकरी चळवळीत शेतकरी चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी देखील यांनी देखील सहभाग घेतला आहे.

६. शेतकरी चळवळीचे भारताच्या राजकारण व सहकार उद्योगावर परिणाम झाला आहे.

७. राजकीय पक्षांच्या आश्रयाने अनेक शेतकरी संघटना अलीकडील काळात उदयास आले आहेत.

८. शेतकरी चळवळीतील काही नेत्यांनी राजकारणात प्रवेश करून यश मिळविले आहे.

९. भारतातील इतर इतर चळवळी प्रमाणे शेतकरी चळवळ भक्कम पायावर उभी राहण्याची गरज आहे.

संदर्भ साधने :-

१. Dhanagare D., 1983, Peasant Movements in India, 1920-50, Oxford University Press, Delhi.

२. Kannan K. P., 1998, Rural Proletarian Struggles: Mobilisation and Organisation of Rural Workers in South-West India, Oxford University Press, Delhi.

३. Narain V. A., 1972, Social History of Modern India, Meerut Meenakshi Prakashan.

४. डॉ. अनिल कठारे, २००९, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

५. एम. एस. राव, २०००, भारतातील सामाजिक चळवळी, मनोहर पब्लिकेशन.

६. घनश्याम शहा (अनु.) प्राची चिकटे, २००८, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड प्रकाशन, पुणे.

●●●

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक ।।

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ७

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक :

● डॉ. प्रमोद एस. मेश्राम ● डॉ.बळवंत टी. दाभाडे ● श्री.मनोहर आर. कोंडागुर्ले

⁂ प्रकाशक ⁂

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळवणी : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१ स्वतंत्रता के बाद बौद्धो के जीवन में सामाजिक परिवर्तन
- डॉ.प्रमोद मेश्राम, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- १०

२ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्य प्रवाहाची वाटचाल
- डॉ. विकास पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- १५

३ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक
- डॉ.बळवंत दाभाडे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- २१

४ स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) - डॉ.सुधीर वाघमारे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- २६

५ स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळीचा विकास
- डॉ.अशोक पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- ३१

६ भारतीय स्वातंत्र्योत्तरकालीन ग्रंथालयातील नवे प्रवाह: एक अभ्यास
- डॉ.जयंत मेश्राम, रिसोड, जि.वाशिम ---------- ३६

७ स्वांतत्र्योत्तर काळातील वाढते शहरीकरण
- डॉ. प्रतिभा देसाई, गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर ---------- ३८

८ स्वातंत्र्योत्तर कालखंडात सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास
- डॉ. शशिकांत वानखडे, आर्णी, जि.यवतमाळ ---------- ४२

९ स्वातंत्र्योत्तर हिंदी पत्रकारिता
- डॉ.संतोष रायबोले, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग ---------- ४७

१० स्वातंत्र्यप्राप्ती आणि सुरेश भट
- डॉ. चैनलाल राणे, गोरेगाव, जि.गोंदिया ---------- ५१

११ डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्राच्या पाचव्या सिद्धांतानुसार महाविदयालयीन ग्रंथालयातील ग्रंथसंख्येत झालेली वाढ : एक अभ्यास
- अंबादास खिलारे, डॉ.दिलीप मेस्त्री, पनवेल, नवी मुंबई ---------- ५५

१२ मानवी हक्क व दलित कविता
- डॉ. नरेंद्र घरत, डॉ.कविता लुटे, नागपूर ---------- ५८

१३ स्वातंत्रोत्तर भारतीय शिक्षण व्यवस्थेवर महात्मा गांधींचा प्रभाव
- डॉ.नंदकिशोर मने, गडचिरोली ---------- ६४

१४ भारतीय ग्रंथालय कायदे : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ चे सार्वजनिक ग्रंथालय विकासात महत्त्व - अनंत थोरात, रोहा, जि.रायगड ---------- ६८

१५ स्वातंत्रोत्तर काल मे महिला सशक्तिकरण एवं शिक्षा का महत्व
- डॉ.रजनी वाढई, गडचिरोली ---------- ७५

१६ स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत दैनिक संचार'चे संपादक रंगा वैद्य यांचे योगदान
- शंकर पवार, कोल्हापूर ---------- ७९

१७ स्वातंत्रोत्तर भारतातील आदिवासींची स्थिती, संविधानिक तरतुदी व कायदे
- डॉ.नरेश मडावी, गडचिरोली. ---------- ८४

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्य प्रवाहाचा वाटचाल

डॉ. विकास शंकर पाटील
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय,
पाचल- रायपाटण, ता. राजापूर,जि. रत्नागिरी.
मो. नं.८७९३५१७६१४
ई मेल- vikaspatil997gmail.com

प्रस्तावना : मराठी साहित्य हे मध्ययुगीन कालखंडापासून लिखित स्वरूपात असल्याचे दिसते. मराठी साहित्य प्रारंभीच्या कालखंडात पंथीय साहित्य म्हणून निर्माण झाल्याचे दिसते. त्याचबरोबर भक्ती परंपरेतून हे साहित्य निर्माण झाल्याचे दिसते. इ. स.१८१८ मध्ये पेशवाई स्ताला गेल्यानंतर इंग्रजी साहित्याशी मराठी भाषिकांचा परिचय झाला. मराठी भाषेतही इंग्रजीप्रमाणे साहित्य निर्माण व्हावे ही प्रेरणा वाढीस लागली. त्यातूनच इंग्रजी भाषेतील साहित्याप्रमाणे मराठीत साहित्य निर्मिती होऊ लागली. इंग्रजीतल्या कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक गद्य अशा अनेक साहित्य प्रकारांनी मराठीत प्रवेश केला. मराठीत हे सर्व साहित्य प्रकार आले पण प्रारंभीच्या कालखंडात ते रूपांतरित साहित्य म्हणूनच मराठीत अवतरले. प्रारंभीच्या कालखंडात मराठीवर या इंग्रजी साहित्याचा खूप मोठा प्रभाव असल्याचे दिसते. नंतरच्या कालखंडात मराठी लेखक, कवी, नाटककार यांनी आपली स्वतःची लेखनाची नवी वाट निर्माण केली. तूनच मराठी साहित्याची वेगळी वाटचाल सुरू झाली. मराठीत सुरु झालेल्या नियतकालिकांच्या चळवळीने मराठीत कथा, कादंबरी, नाटक, निबंध, चरित्र-आत्मचरित्र इत्यादी साहित्य प्रकारांची संख्या वाढवली. विविध मराठी साहित्य प्रकार इ.स.१९२० ते इ.स.१९४७ या कालखंडात देशभक्तीपर साहित्य तयार झाले तसेच औद्योगीकरण आणि दोन्ही जागतिक महायुद्धांचा मानवी जीवनावर झालेला परिणाम यावर आधारलेल्या साहित्याची निर्मिती ही मोठ्या प्रमाणात झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात वेगवेगळ्या सामाजिक चळवळींचा झालेला समाजावरील परिणाम, देशभक्ती ऐवजी स्वार्थ लोलूप होत चाललेले राजकारणी, स्त्रिया दलित यांना आलेले आत्मभान आणि त्यातून सन्मानासाठी चाललेल्या त्यांच्या चळवळी, ग्रामस्तरावर च्या समस्या आणि ढासळत चाललेले कृषी जीवन, फुगत गेलेली महानगरे आणि तेथील ढासळत चाललेली जीवनमूल्ये या सगळ्याचे

त्यातूनच साठोत्तरी साहित्यात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, प्रादेशिक, महानगरीय असे नवे साहित्य प्रवाह निर्माण झाल्याचे चित्र..साहित्यात दिसू लागले. पुढे विज्ञान साहित्याचा नवा प्रवाह यामध्ये निर्माण झाल्याचे दिसते. इस १९९० नंतर खाऊजा धोरण शासनाने स्वीकारले आणि मराठी साहित्यावर त्याचा खूप मोठा प्रभाव पडल्याचे दिसते. इंटरनेटच्या माध्यमातून झालेला माहितीचा विस्फोट आणि एकत्र आलेले जग या सर्वांचा साहित्यावर खूप मोठा प्रभाव पडल्याचे आपणास दिसते. त्यातूनच साहित्य विशालतेकडून सूक्ष्मतेकडे जाताना आपल्याला दिसते. त्यातूनच पुढे अनेक नवप्रवाह मराठी साहित्यात निर्माण झाले. समाजात प्रत्येक घटक आपले अस्तित्व शोधू लागला आणि त्यातूनच हे नवे साहित्य प्रवाह मराठी साहित्यात गतिमान होऊ लागले. याचाच परिचय या शोधनिबंधात आपण करून घेत आहोत.

की वर्ड्स - साहित्य प्रवाह, दलित साहित्य,ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य,विज्ञान साहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य

उद्दिष्टे - सदर शोधनिबंधात मराठी साहित्य प्रवाहातील वेगवेगळ्या साहित्यप्रवाहांची चर्चा करून हे साहित्यप्रवाह नंतरच्या कालखंडात विशालतेकडून ते सूक्ष्मतेकडे कसे गतीमान झाले व या साहित्य प्रवाहांची संख्या कशी वाढत गेली याविषयीची मांडणी करणार आहोत.

पूर्वाभ्यास - या विविध साहित्य प्रवाहांच्या अंगाने खूप मोठी चर्चा मराठी साहित्यात झालेली आहे. ग्रामीण साहित्याच्या अंगाने वासुदेव मुलाटे, आनंद यादव अशा अनेक धुरीणांनी या संदर्भातली मांडणी केली आहे.दलित साहित्य संदर्भात योगेंद्र मेश्राम,गंगाधर पानतावणे अशा कितीतरी दिग्गजानी या संदर्भातली भूमिका मांडली आहे. स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात अश्विनी धोंगडे, मंगला वरखेडे आदींनी स्त्रीवादी साहित्य संदर्भातली मांडणी केली आहे. विविध साहित्य प्रवाहांच्या अंगाने मांडणी केल्याचे दिसते

समृद्ध केला. १९६० नंतरच्या लेखकांविषयी आनंद असे म्हणतात की, १९६० नंतरचा नवा ग्रामीण लेखक पुढे आला. दुसऱ्या पिढीच्या या लेखकवर्गाचे बहुशी ग्रामीण साहित्य स्वतः प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभवातून निर्माण होऊ लागले. सामाजिक दृष्ट्या पहिल्यांदाच या सामाजिक स्तराला स्वतःला वाचा फुटली; त्यांच्याविषयी इतरांनी कुणी निवेदन करण्याची माहिती सांगण्याची गरज उरली नाही. हजारो वर्षे मुका राहिलेला हा वर्ग महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा या काळात मुखरित झाला. त्याला वाचा आली.' म्हणजेच १९६० नंतरचा ग्रामीण लेखक आपल्या भोवतालचे वास्तव ग्रामीण साहित्यातून व्यक्त करू लागला. पण १९९० नंतरच्या शासनाच्या खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरण या धोरणाने ग्रामीण साहित्यात आमूलाग्र बदल झाल्याचे दिसते. त्याचे प्रतिबिंब सन २००० नंतरच्या साहित्यात पडलेले आपल्याला दिसून येते. निसर्गाशी संघर्ष करत शेतकऱ्याने पिकवलेली शेती, बाजारात त्याने पिकवलेला माल आल्यावर मिळणारे उत्पादन खर्चापेक्षाही कमी मूल्य, वाढणारे कृषी कर्ज, आवळला जाणारा सावकारी पाश, विकासाच्या नावाखाली शासनाकडून हडप केल्या जाणाऱ्या जमिनी, शेतीची नापिकता, विभक्त कुटुंब पद्धती, त्यातील संघर्ष, ग्रामपातळीवरील अपुऱ्या रोजगाराच्या संधी, शैक्षणिक आणि आरोग्य सोयीसुविधांचा असणारा अभाव, तुटपुंजा वाहतुकीच्या सुविधा अशा अनेक समस्यांना कवेत घेऊन या कालखंडातील साहित्य प्रकट होताना दिसते. ग्रामीण भागातील राजकारण आणि त्या राजकारणात ढवळून निघणारे समाज, शेतीमालाला भाव मिळावा म्हणून उभ्या केल्या जाणाऱ्या चळवळी, त्या चळवळीतील संघर्ष, शेतकरी संघटनांची आंदोलने, त्यात फूट पाडणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या भूमिका अशा विषयांना घेऊन या कालखंडातील साहित्य प्रकट होताना दिसते. आसाराम लोमटे, इंद्रजीत भालेराव, राजन गवस, किरण गुरव, नवनाथ गोरे, बाबाराव मुसळे, भारत काळे, प्रवीण बांदेकर, सिताराम सावंत, महेंद्र कदम, कृष्णात खोत अशा कितीतरी नव्या पिढीतील लेखक, कवींचा उल्लेख या कालखंडातील उल्लेखनीय साहित्यिक म्हणून करता येईल.

त्रीवादी साहित्य :

साठोत्तरी साहित्य प्रवाहात दलित साहित्य प्रमाणेच डित आणि वंचित राहिलेला घटक म्हणजे स्त्री होती. आणि त्या ही आपल्या न्याय हक्कासाठी झगडू लागल्या. आपल्या समस्या साहित्यातून मांडू लागल्या. त्या व्यक्त होऊ लागल्याचा पिढ्यानपिढ्या मनात साचलेल्या भावनांचा निचरा होऊ लागला. स्त्री ही सुद्धा पुरुषांप्रमाणेच एक स्वतंत्र अस्तित्व असणारा घटक आहे. ती उपभोग्य वस्तू नाही तर तिला मन आहे. तिला स्वातंत्र्य दिले पाहिजे. हा विचार या साहित्यातून प्रकट होताना दिसतो. स्त्रीवाद म्हणजे पुरुषाला विरोध असा वाद नसून स्त्रियांना सन्मानाची वागणूक दिली गेली पाहिजे, तिला स्वतंत्रता दिली पाहिजे. या विचारांचा पुरस्कार हे साहित्य करताना दिसते. इ.स. २००० नंतर स्त्रीवादी साहित्यातही बदल होताना दिसतो. स्त्रिया सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करू लागल्या. त्या स्वयंभू झाल्या, स्वतंत्र झाल्या तरीही पुरुषी मानसिकता त्यांना आपल्या दास्यातून मुक्त होऊ देत नाही. कामाच्या ठिकाणी ही स्त्रियांना त्रास दिला जातो. प्रवासातही त्यांचा छळ केला जातो. वरिष्ठांच्या कडून अनेक वेळा त्यांना त्रास होतो, कुटुंब आणि नोकरी सांभाळताना स्त्रियांची होणारी कसरत, स्त्री मग ती कोणत्याही जाती धर्मातली असली तरी तिच्या वाट्याला येणारे दुय्यमत्व, या पुरुषी मानसिकतेविरुद्ध स्त्रियांनी केलेली बंडखोरी, नवतरुणींचे सामाजिक रूढी परंपरा व्यवस्थेविरुद्धचे बंड अशा अनेक नव विषयांना घेऊन या कालखंडातील स्त्रीवादी साहित्य प्रवाही होते आहे. या कालखंडात उर्मिला पवार, शिल्पा कांबळे, वैशाली हळदणकर, निर्मला देशपांडे, शांताबाई रावखंडे, आशा भेंडे, सुलोचना चव्हाण, नंदा मेश्राम, ज्योत्स्ना कदम, विजया लवाटे, नसीमा हुरजूक अशा कितीतरी आघाडीच्या कवी इच्छुकांची नावे सांगता येतील. त्यांनी आपल्या सशक्त लेखणीने या कालखंडातील स्त्रियांच्या व्यथा-वेदनांना शब्दरूप दिले असून समाजातील स्त्रियांच्या दुय्यम स्थानाची मांडणी केली आहे. व्यवस्थेविरुद्ध बंड करण्याची मानसिकताही त्यांच्या काही दिसून येते. या कालखंडातील साहित्यात हे चित्रण आल्याचे दिसते.

महानगरीय साहित्य :

मराठी साहित्य प्रामुख्याने महानगरांची वर्णन येतच होते. नगर म्हटले की तिथले सुखी समृद्ध जीवन साहित्यातून प्रकट होत होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील या महानगरीय सुखी समृद्ध जीवनाला तडे गेलेले दिसून येतात. खेड्यांतून रोजगारासाठी महानगर आत येणारी तरुण पिढी, महानगरांची वाढती लोकसंख्या व तेथील अपुऱ्या सोयी सुविधा, वाढती

च्या वाढी यामुळे महानगरीय [illegible] तीतरी समस्या या घेऊन महानगरीय साहित्य प्रकट होऊ गले. भाऊ पाध्ये, मधु मंगेश कर्णिक, सुभाष भेंडे, अरुण साधू, जयवंत दळवी अशा कितीतरी लेखकांनी हा महानगरीय साहित्याचा प्रांत समृद्ध केला. १९९० नंतर शासनाच्या खाउजा धोरणाचा प्रत्यक्ष परिणाम महानगरीय जीवनावर मोठ्या प्रमाणात झाला. त्याचे प्रतिबिंब नंतरच्या साहित्यात प्रकर्षाने पडलेले दिसते. त्यामध्ये ब्रजेश सोलंकी, हेमंत दिवटे, मन्या जोशी, नितीन कुलकर्णी अशा कितीतरी नवलेखकांनी या महानगरीय जीवनाचा परामर्श घेतला आहे.

प्रादेशिक साहित्य :

विशिष्ट भूप्रदेश घेऊन प्रकट होणारे साहित्य म्हणजेच प्रादेशिक साहित्य होय. अशी संकल्पना मांडत अभ्यासकांनी प्रादेशिक साहित्य प्रवाहाची मांडणी केली आहे. डॉ.अ.रा.तोरो, डॉ. द. भि.कुलकर्णी, डॉ आनंद यादव, म. सु. पाटील इत्यादी अभ्यासकांनी या साहित्यप्रवाहाची मांडणी केली आहे. व्यंकटेश माडगूळकर, र.वा.दिघे, श्री.ना. पेंडसे, रा. रं.बोराडे, ग.त्र्यं. ठोकळ आदी लेखकांनी हा साहित्य प्रवाह समृद्ध केला आहे.

आदिवासी साहित्य :

आदिवासी समाजाला शिक्षणाने आत्मभान आले. आपण आदिम निवासी असूनही आपले अस्तित्व या व्यवस्थेकडून नाकारले जात आहे याचे दुःख या सुशिक्षित तरुणांना झाल्याचे दिसते. आदिवासी प्रथा आणि परंपरा या मूळ निवासी मानवाच्या प्रथा परंपरा असून त्याच निसर्ग परंपरा आहेत. स्वार्थ डोळ्यांसमोर ठेवून मानवाने नवी व्यवस्था जन्मास घातली आहे ती एकूणच मानवी जातीच्या हिताची नसून ती मोजक्या मंडळींच्या हिताची आहे हे वास्तव या मूलनिवासींना अस्वस्थ करू लागले. त्यातूनच त्यांची धारदार लेखणी लिहू लागली. जंगलचा राजा असणारा आणि या भूमीचा मूलनिवासी असणारा आदिवासी आज मात्र येथील व्यवस्थेचा बळी ठरत आहे हे दुःख या साहित्यातून प्रकट होताना दिसते. प्रारंभीच्या कालखंडात आपणच मूलनिवासी आहोत ही भूमिका हे साहित्य पटवून देताना आपल्याला दिसते. या समाजाच्या प्रथा, परंपरा, रूढी, विचार कसे महत्त्वपूर्ण होते व समाजाच्या हिताचे ोते या संबंधीची साधकबाधक चर्चा या साहित्यातून ालेली दिसते. सन २००० नंतर मात्र या साहित्यातही मूलाग्र बदल झाल्याचे आपल्या निदर्शनास येते नागवला जात आहे. त्याच्या [illegible] त्याला हद्दपार केले जात आहे. नवनवी शासकीय आणि विकासाची धोरणे आखून आदिवासींच्या जमिनी हस्तगत केल्या जात आहेत. कायद्याचा धाक दाखवून आदिवासींना गुलाम बनविले जात आहे. आदिवासी कवी, लेखक [illegible] भाषेत आपल्यावर होणारा अन्याय अत्याचार मांडतो आहे. विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, वाहरू सोनावणे, उषाकिरण आत्राम या ठळक नावाने हा साहित्य प्रवाह सुरू झाला होता पण आज इ. स.२००० नंतर माधव सरकुंडे, वामन शेडमाके, वसंत कनाके, कुसुम आलाम, संघाजा मेश्राम, पुरुषोत्तम शेडमाके, रवी कुरसंगे, विश्राम वळवी, सुभाष आडे, कुसुम बोंबले, विनोद कुमरे अशी कितीतरी नवीन लेखक, कवी मंडळी आदिवासी साहित्याचा प्रांत समृद्ध करत आदिवासी समाजाच्या नव्या समस्यांना कवेत घेण्याचा प्रयत्न करत आहेत . त्यातल्या बदलत्या वर्तमानाचा वेध साहित्यातून घेत आहेत.

विज्ञान साहित्य :

विज्ञान साहित्य हा नवा साहित्य प्रवाह अलिकडे सुरू झाला आहे. विज्ञान हे तंत्रज्ञानावर चालते तर साहित्य हे भावनिक बंध निर्माण करणारे असते. फॅन्टसी प्रकारात पुन्हा साहित्य प्रवाह मराठीत निर्माण झाला असावा. मराठी कल्पनांना वैज्ञानिक चमत्कारांचा आकार देत केलेली मांडणी या विज्ञान साहित्यातून व्यक्त होते. विज्ञान साहित्यही प्रारंभीच्या कालखंडामध्ये फारसे चर्चिले गेले नव्हते व लोकप्रियताही मर्यादित होती. पण नंतरच्या कालखंडात विज्ञान साहित्याने खूप मोठी झेप घेत आपले विश्व विस्तारित केले. विज्ञानातील चमत्कार काल्पनिक रीतीने मांडण्याचा प्रयत्न नंतर साहित्यिकांनी केला. निसर्गातील अनेक गोष्टींविषयी गूढ वाटत आले आहे अशा गोष्टींविषयी साहित्य लिहून त्यातील गूढता आपल्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न वैज्ञानिक दृष्टिकोनातून केला. ज्ञान साहित्य हे मराठी साहित्याला लाभलेली जणू देणगीच आहे असे विज्ञान साहित्य नंतरच्या कालखंडात लिहिले गेले. बदलत्या जीवनशैलीचा आणि बदलत्या मानवी मनातील विचारांचा कल्पनाबद्ध मांडून त्याला वैज्ञानिक दृष्टी देऊन त्याची मांडणी झाली आणि विज्ञान साहित्य म्हणून हे साहित्य लोकप्रिय झाले. २००० नंतर जयंत नारळीकर, निरंजन घाटे, पंडित

साहित्य कवी, लेखक आजही विज्ञान साहित्याचा समृद्ध करत आहेत. इ. स.२००० नंतरच्या विज्ञान साहित्यात रसिकांना वैज्ञानिक चमत्कारांचा परिचय करून देत असतानाच त्यांची वैज्ञानिक दृष्टी प्रगल्भ करणे हा हेतू या साहित्यात दिसतो. या कालखंडातील साहित्य अधिक सजग आणि प्रगल्भ झाल्याचे दिसून येते. अवकाशातील आणि आकाशातील अनेक मानवी मनातील कल्पनांना घेऊन हे विज्ञान साहित्य प्रकट झाले आहे. या कालखंडातील विज्ञान साहित्यातील अनेक कल्पना शास्त्रज्ञांनी वास्तवातही आणल्या आहेत. या कालखंडातील साहित्यिकांनी मांडलेल्या कल्पना वैज्ञानिकांनाही एक विचार करायला लावणारी घटना बनल्या आहेत.

इतर साहित्य प्रवाह :

साठोत्तरी साहित्यात वरील साहित्य प्रवाह प्रामुख्याने दिसत असले तरी नंतरच्या कालखंडात या साहित्य प्रवाहात वाढ होत गेल्याचे दिसते. नंतरच्या कालखंडात साहित्याची सखोल चिकित्सा होत गेली. त्यातूनच नवनवे साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्याचबरोबर जातीय भान, धार्मिक भान, मानवी वयाचे भान यातून काही नवसाहित्य प्रवाह निर्माण झाले. धार्मिक भान आल्याने मुस्लिम साहित्य, ख्रिस्ती साहित्य, जैन साहित्य त्याचबरोबर जातीय भानातून ख्रिस्ती दलित साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य असे नवसाहित्य प्रवाह रूढ झाल्याचे दिसते. मानवी वयोमानानुसार बालसाहित्याचा प्रवाह रूढ झाल्याचे दिसते. त्याचबरोबर इतर साहित्याच्या संपर्कातून अनुवादित साहित्याचा नवा प्रवाह निर्माण झाल्याचे दिसते. कामगार साहित्य, अपंगांचे साहित्य असे नवसाहित्य प्रवाह मराठीत रूढ झाल्याचे चित्र नंतरच्या कालखंडात दिसते आहे. मराठी साहित्य अविरत प्रवाही आहे. त्यातूनच नवनवीन साहित्यप्रवाह यात निर्माण होताना दिसत आहेत.

मुस्लिम मराठी साहित्य :

इ.स.१९९०मध्ये सोलापूर शहरात मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना झाली आणि त्यातूनच मुस्लिम मराठी साहित्य प्रवाह प्रवाही झाल्याचे दिसते. मुस्लिम साहित्य संबंधी फक्रुद्दीन बेन्नूर असे म्हणतात की, 'मुसलमान लेखकाचे साहित्य म्हणजे मुस्लिम मराठी साहित्य होय.'[१] म्हणजेच जन्माने मुस्लिम असणाऱ्या लेखकाने लिहिलेले साहित्य म्हणजे मुस्लिम साहित्य असा एक अर्थ त्यांनी सांगितला. तर दुसरा अर्थ सांगताना ते म्हणतात, 'मराठी प्रदेशात जन्म घेतलेल्या, मराठी असणाऱ्या आणि धर्माने इस्लामधर्मीय असणारा मराठी माणूस आणि मुसलमान म्हणून जगत असताना जे ताण तणाव निर्माण होत आहेत ते व्यक्त करणारे साहित्य होय. तसेच इथल्या धार्मिक परंपरांनी निर्माण केलेले प्रश्न आणि इतिहासाने त्यांच्यावर 'परकेपण' लादल्याने केलेले [illegible] आणि इथल्या सामाजिक वास्तवातून [illegible] त्यांचे [illegible] झालेले परिणाम आणि १९८५, ८६ नंतरच्या काळातील जमातवादाच्या पुनरुत्थानामुळे वाढलेले हिंदू-मुस्लिम संघर्ष या सर्व अनुभवांचे चित्रण करणारे आणि त्यामधून समन्वय शोधण्याचा प्रयत्न करणारे साहित्य म्हणजे मुस्लीम मराठी साहित्य होय.' ही मुस्लिम मराठी साहित्याची व्याख्या अधिक व्यापक आणि सखोल वाटते. हिंदुत्ववादी संघटनांच्या वाढत्या प्राबल्यामुळे, मुस्लिमांचे असणारे मागासलेपण, त्यांचे असणारे ग्रामीण स्तरावरील प्रश्न, शहरी मुस्लीम यांच्यात असणारी असुरक्षितता व तेथील समस्याग्रस्त जीवन या अशा अनेक नवीन प्रश्नांमुळे ही साहित्य चळवळ जोर धरू लागली आणि बघता बघता मुस्लिम साहित्यप्रवाह गतिमान झाला. १९९० नंतर फ. म. शहाजिंदे, अजीज नदाफ, जावेद कुरेशी, मुबारक शेख, ऐहेतेशाम देशमुख इत्यादी लेखकांनी मोठ्या प्रमाणात लेखन केल्याचे दिसते. अलीकडल्या काळात रफिक सुरज, सय्यद अलाऊद्दीन, बाबा मोहम्मद अत्तार इत्यादी लेखक या साहित्य प्रवाहांना समृद्ध करत आहेत.

ख्रिस्ती साहित्य प्रवाह :

मराठी फादर स्टीफन्स फादर प्रवाह फलंदाज अधिक कवींनी साहित्य निर्मिती केल्याचे दिसते. पाश्चात्य असूनही या साहित्यिकांनी मराठीत खावे निर्मिती केली होती. त्यानंतर महाराष्ट्रात ही धर्मांतराचे मोठे लोण पसरले होते, त्यातूनच अनेक हिंदू बांधवांनी ख्रिस्तधर्म स्वीकारलेला होता. नंतरच्या कालखंडात धर्मापासून तुटले असले तरी मराठीभाषिक भाषेपासून मात्र तुटले नव्हते त्यांनी मराठीत साहित्य निर्मिती केल्याचे दिसते. ख्रिस्ती साहित्य संमेलनाची चळवळ सुरू झाली व या साहित्य संमेलनातून ख्रिस्त साहित्याचा विचार प्रकर्षाने मांडला गेला. शाहूराव उजगरे, स.ना. सूर्यवंशी, फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सिसिलिया कार्व्हालो, जोजेफ तुस्कानो, सुधीर जोशी आदी साहित्यिकांनी ख्रिस्ती साहित्याचा प्रांत समृद्ध करण्याचे काम केले आहे.

ख्रिस्ती दलित साहित्य :

पहिल्याच ख्रिस्ती दलित साहित्य संमेलनाचे प्रयोजन सांगताना अरविंद पी. निर्मल असे म्हणतात की, 'मराठी-

एकूणच ख्रिस्ती समाज- शूद्र, अतिशूद्र आणि 'अस्पृश्य' म्हटलेल्या जाती-जमातीतून आलेला आहे. या वस्तुस्थितीचा विसर आमच्या साहित्यिकांना आणि साहित्य संमेलनांना पडला. या समाजाची मानसिकता दलित मानसिकता आहे. त्यांच्या जाणिवा दलित जाणीव आहेत. त्यांचे इतर दलित समाजाशी एक अतूट नाते आहे; त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि इतर प्रश्न कुठल्याही दलित समाजाचे प्रश्न आहेत; या वस्तुस्थितीचा विसर आमच्या साहित्य संमेलनांना आणि साहित्यिकांना पडला.' म्हणजेच ख्रिस्ती धर्मात मोठ्या प्रमाणात दलित समाजातील लोक आहेत पण त्यांच्या प्रश्नांची मांडणी मात्र या साहित्यात होताना दिसली नाही. म्हणूनच ख्रिस्ती दलित साहित्य हा एक नवा साहित्य प्रवाह मराठी साहित्यात उदयास आल्याचे दिसते. आचार्य सत्यवान नामदेव सूर्यवंशी, नंदकुमार शेडगे, देवदत्त हुसळे आदी कवी, लेखकांनी ख्रिस्ती दलित साहित्याचा प्रांत समृद्ध केला आहे.

बालकांच्या मनोरंजनासाठी आणि त्यांना कार्यप्रवण बनवण्यासाठी, त्यांच्यावर संस्कार करण्यासाठी बालसाहित्याचा प्रवाहही गतिमान झाल्याचे दिसते.

वाढत्या औद्योगिकरणामुळे कामगारांची संख्या वाढत आहे. त्यांच्या समस्याही वाढत आहेत. त्यांच्या व्यथा आणि त्यांच्या जीवनातील सुखदुःखे त्यांच्या साहित्यातून व्यक्त होऊ लागलेली आहेत. कामगार साहित्य म्हणून मराठी साहित्यात आपले अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न करताना दिसते आहे. वेगवेगळे कामगार कायदे, कामगारांच्या समस्या, संघटना आणि असंघटित कामगारांचे प्रश्न अशा अनेक प्रश्नांना घेऊन हे साहित्य प्रकट होताना दिसत.

भटक्या-विमुक्तांची संख्या मोठी आहे. प्रारंभीच्या कालखंडात भटक्या-विमुक्त जमातीवरती आणि त्यांच्या समस्या वरती अनेक साहित्यिकांनी लेखन केले आहे. १९७२ साली भटक्या-विमुक्तांची चळवळ लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, दौलतराव भोसले आदी तरुणांनी सुरू केली आणि या चळवळीचे साहित्य निर्माण होऊ लागले. लक्ष्मण माने यांचे आत्मकथन 'उपरा', दादासाहेब मोरे यांचे 'गवाळ', लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या' अशी नव प्रवाह निर्माण होऊन त्यांची ही वाटचाल सुरू आहे. नवनवे प्रवाह निर्माण होताना त्या समूहाला आलेले आत्मभान, त्यातूनच त्यांची जागृत झालेली अस्मिता या सर्व प्रवाहांच्या मुळाशी असल्याचे दिसते. एकूणच मराठी साहित्य या सर्व प्रवाहांचा मुळे गतिमान झाल्याचे दिसते. मुख्यसाहित्य प्रवाहाबरोबरच त्यातीलच समूहघटक आपले अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. ही एकूणच मराठी साहित्याच्या दृष्टीने चांगली गोष्ट आहे. मराठी साहित्य असे गतिमान झालेले असून या काळात आणखी काही नवे साहित्य प्रवाह यात गतिमान होतील.

निष्कर्ष :

१) साठोत्तरी मराठी साहित्यात ग्रामीण दलित स्त्रीवादी प्रादेशिक महानगरीय असे प्रमुख साहित्य प्रकार आपणास दिसतात.
२) १९९०नंतरच्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण याचा प्रभाव मराठी साहित्यावर पडल्याचे दिसते.
३) स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील मराठी साहित्य आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्य यात मूलभूत फरक दिसतो.
४) मराठीत निर्माण झालेली वेगवेगळे साहित्य प्रवाह मराठी साहित्य अधिक प्रवाही व गतिमान करताना दिसतात.
५) मराठी साहित्य प्रवाह यांच्या वाडीसलेखकांची जागृत झालेली अस्मिता कारणीभूत असल्याचे दिसते.

संदर्भ -

१) यादव आनंद, ग्रामीणता साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.क्र.१४.
२) लिंबाळे शरणकुमार, साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृ.क्र.१९४.
३) तत्रैव पृ.क्र.१९४.
४) तत्रैव पृ.क्र.२१०.

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane Colle
Arts & Comme

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPA
COLLEGE OF ARTS & COM.PACH
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

संशोधक

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

• वर्ष : ९० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०७



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

॥ संशोधक ॥

पुरवणी अंक - मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ७

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक :

● डॉ. प्रमोद एस. मेश्राम ● डॉ.बळवंत टी. दाभाडे ● श्री.मनोहर आर. कोंडागुर्ले

✻ प्रकाशक ✻

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन् मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळवणी : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

८१ आधुनिक ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक संबंध आणि वतनदारी व्यवस्था
- डॉ.संतोष सुरडकर, गडचिरोली -- ३६२

८२ रानडेंचा सुधारणावाद आणि भक्ती चळवळीविषयीचे चिंतन
- डॉ.संतोष सुरडकर, गडचिरोली -- ३६७

८३ Educational & Social Reforms In India During British Period
- Dr.Sudhakar Lahupachang, Kalamboli, New Mumbai -------------- ३७१

८४ Revisiting Quit India Movement: A Case Study on Northeastern region of Maharashtra - Dr. Prakash Masram, Mumbai ---------------------- ३७४

८५ Study of Post-Independence Indian Libraries: A Special Reference to Academic Libraries -Manohar Kondagurle, Dr.Rashid Khatik ------------------ ३७९

८६ Collection Development Practices for e-Resources: A Survey of Academic Law Libraries affiliated to Savitribai Phule Pune University Pune
- Madhukar Togam, Dr.Deelip Mestri, Panvel, Navi Mumbai ----------- ३८४

८७ The Role of Translation in Post-Independence Era: English Translations of Dalit Literature in India -Dr. Dharampal Fulzele, Brahmapuri, Chandrapur ------ ३९०

८८ Folklore's Editor Sankar Sen Gupta's Three Decade Devotion to Bring Cultural Enhancement after Independence
- Dr.Neeta Khandpekar, Kalina, Santakruz, Mumbai ---------------------------- ३९६

८९ Changing Educational Policy after Indian Independence
- Prof. Shital Barge, Rajapur, Ratnagiri. ------------------------- ४०४

९० POST-INDEPENDENCE TOURISM POLICY: GEOGRAPHICAL ANALYSIS
-Dr. Rajaram Patil, Phondaghat, Dist.Sindhudurg. ------------------- ४०७

९१ Nation, Nationalism, Minorities in M. J. Akbar's Blood Brothers
- Ashutosh Popate, Chimur, Chandrapur-------------------------- ४११

९२ A study on Irrigation Development for agriculture Development in Kolhapur District (Maharashtra) - Mr.Sohel Mujawar, Dr.S.M.Bhosale, Kolhapur-------- ४१५

९३ Reflection of 21st century woman: A Critical Analysis of Baby Halder's "Life Less Ordinary" - Rashmi Purke, Uran, Navi Mumbai -------------------- ४२३

९४ Industrial Policy of Maharashtra 2019: A Study
- Saddamso Pirjade, Sarud, Kolhapur ४ -------------------------- ४२७

९५ Depiction of Sociocultural Realities in the Novels of J. M. Coetzee
- Mr.Anup Atram, Dr.Sandeep Joshi, Morshi, Amravati --------------- ४३२

९६ Cyber Security and Cyber Crime Awareness Need of Time: A Critical Analysis
- Nandini Gaikwad, Pooja Thakur, Nitin Sasane, Ravindra Morbeka, Sanjay Gaikwad, Panvel, Navi Mumbai ------------------------- ४३६

९७ Women's Economic Empowerment in India After Independence
- Neha Singh, Dr.Vishnu Fulzele, Ulhasnagar, Thane ----------------- ४४१

९८ District Central Co-operative Bank : An Overview
- Prof. Rupali Dikonda, Mhada, Solapur------------------------------------ ४४५

९९ Revisiting India's Policy towards her Diaspora Since Independence
-Dr. Karmveer Singh, Jaipur ---------------------------------- ४५०

Study of Post-Independence Indian Libraries: A Special Reference to Academic Libraries

Mr. Manohar Ramulu Kondagurle
Research Scholar
Shri. J. J. T. University, Jhunjhunu (Rajasthan) Mob. No. 9422590940
E-mail:- mkondagurle007@gmail.com
Dr. Rashid Khatik
Research Guide,
Dept. of Library and Information Science, Shri. J. J. T. University, Jhunjhunu, (Rajasthan)

Abstract :

Purpose of the study is that to reviews present situation of academic libraries in India after the 75 years of Indian independence. This study has also reviewed prosperous history of Indian academic libraries. The research paper states that every academic institution must have well equipped library with good management by application of advanced information and communication technology. Government of India and State Governments, parent bodies should keep attention regarding to standardization of libraries, providing maximum financial assistance, appointing well qualified librarians in all kinds of libraries. Government of India after Independence has made different policies and established different commissions for developing academic libraries in all sense. But actual developments of academic libraries in post-independence era are not as much as good in India as compare to the worlds libraries. The study has used available important literature related to this theme.

Keywords : Post-Independence Libraries, Indian Libraries, Academic Libraries, History of Libraries.

Introduction :

India has prosperous history of academic libraries. At the time of ancient period Nalanda university (400 A.D.) had its owned university library with rich collection of manuscripts. It was become renowned in 450 A.D. over the world for teaching learning. It became education centre not only for India but also the world. The university library had rich collection of manuscripts on philosophy, Buddhist religion, grammar, logic, literature etc. Takshashila (Taxila), Vikramshila, Vallabhi, Kanchi, Mithila, Kanhery, Odantapuri, Ujjain university had their university library with rich collection of manuscripts on the religion of Buddha and other different kinds of subjects. But now these libraries have not existence, it means destroyed. These university libraries had established significant status over the world for learning the science.

At the 7th A.D. Nagarjuna University had established on the Bank of the Krishna (Mukharjee). The university had library with greater documents on Buddhist philosophy, Tripitakas and different kinds of science subjects like Botany, Medicine, Mineralogy and Geography etc. From the countries of China, Japan, Brahmdesh, Shrilanka and other parts of the world scholars had attracted for the study. (Bhatt, 2009).

At the time of medieval period of India there were not seen academic libraries establishments and existence of it during Mogul Rule in India. Mogul Rulers had owned some existed royal libraries in their palace and some destroyed. Due to the troubling of Mogul rulers, development of libraries and higher education had stopped (Ibid).

Up to the Indian Independence during the British rule were established academic libraries in India. The British Government in India had established many colleges with good libraries such as in 1781 Calcutta College, Banaras Sanskrit college (1792), Calcutta Fort William College (1800). The British government had made different kinds of policies and established commissions for development of higher education in India with the libraries. While British ruling, Kalkatta University had established on 24th January 1857, Bombay University established on 18th July 1857 and established Madras University on 5th Sept. 1857 with the University Libraries (Chavan, 2017). After that also British government had established many colleges with good libraries. It indicates that India had greater history of educational institutions and their libraries. Mangla (1974) had mentioned that after 1924 university libraries were developed better as compare college libraries, college libraries were struggling to get better position up to 1924. Up to 1924 only 12 universities were established in India. But at the time of Indian Independence in the year 1947, the numbers of the universities were increased up to 18 universities along with their libraries (Ibid).

Significant of the study :

The study has conducted to explore present situation of academic libraries After the 75 years of Indian Independence.

Objectives of the study :

- To explore the historical background and present status of academic libraries in India.
- To review the Government role in developing academic libraries after the Indian Independence.
- To know significant changes among academic libraries after application of information and communication technology.

Research Methodology :

The study is used exploratory research method to investigate the changes among academic libraries in post-independence era of India. The author has retrieved secondary sources from the internet and physical reference sources in terms of journal's research articles, reference books, different kinds of electronic sources etc.

Review of Literature :

Bashiruddin (1967) mentioned that academic libraries were hopelessly inadequate to serve the curricular needs of modern universities (Bhatt, 2009).

S. M. Pritchard (1996) stated that quality of academic libraries must be defined to fit the local programs, yet it must also incorporate the contribution to the higher education system which lends itself to being in terms of regional and national frameworks such as accreditation (Pritchard, 1996).

Mezick (2007) opined academic libraries can help higher educational institutions retain and graduate students a keystone part of institutional mission (Association, 2010).

Shukla and Sialal (2016) defined the growth of information and communication technology and application of it in the library has changed the nature of collection, user needs, library environment and role of library and information science professionals (Shukla & Sialal, 2016).

Post-Independence Academic Libraries in India :

The truth is that education and libraries are joint sisters, no one can separate from each other. We can't thing education without library. Libraries are foundation of educational process. The belief is that libraries are heart of the educational institutions. Academic libraries are playing important role for developing nation.

As compare to the America, Russia, Britten, France, Germany, Japan, China's academic libraries, Indian academic libraries are not and were not have as much better position in terms of infrastructure, management, collection development, availability of find, application of modern technology and awareness about library.

"As compare to the world's academic institutions or universities ranks for the year of 2021, there is not seen single university or educational institution in the list of top 100 global institutions or universities from India. Very few universities and educational institutions have ranked in the list of 1000 (One Thousand) ranked global institutions such as IIT, Bombay has got first rank in the India but for the global ranking got the number of 172, whereas Indian Institute of science, Bangalore has ranked second among the Indian academic Institutes but for global ranking it is stood on the place of 193 ranking institutions. Even as compare to the Indian universities Japan, China and Singapore universities are showing better position and performance in all contexts (Maurya & Choudhary, 2021). Therefor we can state that Indian Academic Institutes and their libraries are not developing with higher priority basis after the 75 years of Indian Independence by the States and Central Government of India as well as parent body of the institutions as compare to the global institutions.

Indian Universities are on little bit good position but majority of degree and Post Graduate college libraries are struggling for financial assistance, ICT infrastructure, skills professionals, basic infrastructure etc. Very few schools and Junior Colleges have their libraries with good equipped and with enough collection of resources but at the maximum numbers of schools and Junior Colleges have libraries only for the showing on documents not for utilization. Physically that kind of schools and junior college libraries are existed somewhere neglected corner of their building. Availability of minimum qualified librarians in the schools and junior college libraries and their payment that are different issues for the present situation in all over India.

Government of India Role in Developing Academic Libraries After Independence :

The government of India was established various commissions for considering present issues at different times for the improving libraries. Within given period, the commissions had studied the present suffering issues and forthcoming needs, and proposed solutions in the form of recommendations. Then some of the recommendations had implemented by the government for the developing of academic libraries in post-independence of India. Followings are some important commissions that were made by Government of India.

University Education Commission (Dec. 1948 to Aug. 1949) :

This commission is known as S. Radhakrishnan Commission. Dr. S. Radhakrishnan was the Chairperson of this committee. The commission stated that university library is heart of the all works directly of the research and learning. This committee was also suggested to establish universities for generating knowledge and wisdom among learners.

Secondary education Commission (Oct. 1952 to June 1953) :

The commission is also known as Mudaliar Commission, worked under the chairmanship of Dr. A. L. Mudaliar. The report found that very poor status of school libraries. The commission was focused on encouraging reading habits among students and establishing good libraries in the schools. The report suggested that central library must have in every secondary school with fully knowledgeable and trained librarian.

Kothari Commission (1964-1966) :

The National Education Commission is known as Kothari Commission, constituted under the chairmanship of Dr. D. S. Kothari. The Commission was defined and focused on the role of libraries in higher educational institutions and focused on self-study of students and adult education programme also. The Eleven suggestions were made for improving qualitative libraries in universities and colleges. The report had stated school libraries should integrate with public libraries because it helps to adult education programmes.

UGC Library Committee :

Dr. S. R. Ranganathan was chairman of the commission. UGC has published the report in 1959 with focussing on university and college libraries management and services and made set of comprehensive suggestions. The Dr. Ranganathan Committee report has provided the blueprint of systematic development of the university libraries in the India.

National Knowledge Commission :

Government of India was constituted National Knowledge Commission on 13th June 2005. The Commission was focussed on education, agriculture, science and technology, e-governance etc. The commission stated accessing of knowledge should easily, the commission was emphasized on knowledge creation, preservation, dissemination.

The Commission was provided roadmap of developing academic libraries, providing LIS education, training, research facilities, preparing library fund, creation of advance library management and promoting libraries to apply ICT in the services.

University Grant Commission :

After the independence of India, from 1953 University Grant Commission has played significant role in the changing the nature of academic libraries and developing with the help of financial grant for books, infrastructure, building of library for storage and reading room specially for college and university libraries. The status of librarian improved and increased in terms of salary also. But present situation all grants from UGC has stopped.

INFLIBENET :

Establishment of INFLIBNET has brought significant changes in academic libraries. The aim of the INFLIBNET was to interconnect different libraries by the national network, to provide online union catalogue of different kinds of documents and develop computerization of libraries. INFLIBNET provides NLIST, Shodhganga, shodhgangotri, e-shodhshindhu, shodhshuddhi, Soul software, Indcat, Vidwan database, e-pgpatshala, vidyamitra etc. for making revolutionary changes in higher educational libraries (INFLIBNET Center, 2022).

ICT brought significant changes in Academic Libraries :

Integrated Library Management System (ILMS) :

ILMS has offered academic libraries to manage library resources or documents and services easily. It has replaced human resource hard work in to skilled bases easy work. It has only happened due to the application of ICT in the library operations. ILMS is implemented in different operations of library such as acquisition, circulation, technical processing, serial control, report generations, and budgetary and administrative work. Providing Web OPAC facility has enabled reader of the library to access remotely at any time. It enabled library staff to remove repetitive works and redefine the workflow, library staff can act multitasking and make more productive work.

Information Services :

E-Document delivery service is one of the information service through which provides information from other libraries which are networked by inter library lending service.

Online Readers advisory service enables libraries to provide online based information regarding new arrivals, book reviews, asking recommendations and suggestions.

User Education provides information on how to search or find sources in library, how to reach the proper source, and how to utilize library in overall.

Reference service, Current awareness services, SDI service, reprographic service, online books exhibition, all these services are provides by applying ICT in the Library ((Adebayo, Ahmed, & Adeniran, 2018).

Digital Library :

Since mid of 1990 the digital library existed in India due to the emerging of information technology, internet. The Indian government also helped to the developing digital library in India. Information explosion is one of the important causes of initiating digital library. As compare to the world, India has very few good digital libraries such as National libraries, IITs Libraries, IIM, IIS, DRDO etc. (Gurram, 2008). In terms of universities libraries, all are developing digital libraries and the college libraries also trying to develop their digital library but financial hurdles effecting till the day. In the digital library environment readers are accessing information from the remote area and internet is playing the greater role in disseminating information in digital environments.

Collection Development :

Application of the ICT in the library has impacted greater sense in terms of space of the library, form of the source such as the e-journals, e-books, e-reports, e-theses and patents, CD and

DVD etc. and hybrid collection.

Databases :

Electronic sources are provided through the databases. It requires minimal space, possible multiuser accessing at time. Academic level INFLIBNET provides NLIST, SHODHSHINDHU, SHODHAGANGA, SHODHAGANGOTRI, E-PG Patshala, Vidwan database etc. Sources become available at minimal charges in higher quantity. A single library cannot purchase all the printed copies at time, Therefore the application of ICT in library had made revolutionary changes in post-independence era.

Conclusion :

Libraries play an important role to develop the nation in all areas. It should be as heritage centre of literature. Academic libraries should not also exceptional to this. India has great history of libraries since ancient period. Libraries produce scientific thoughts which have not originated anywhere in the place. The Indian post-independence era requires more developments in academic libraries in all levels.

References :

1) INFLIBNET Center. (2022, 03 14). Retrieved from https://inflibnet.ac.in/

2) Adebayo, O. A., Ahmed, Y. O., & Adeniran, R. T. (2018). The role of ICT in provision of library services. Library philisophy and practice (e-Journal), 1951.

3) Association, o. C. (2010). Value of Academic libraries:A Comprehensive review and report. Chicago: Associationofcollege and Research Libraries.

4) Bhatt, R. K. (2009). Academic Libraries in India: A historical study. Vishion and roles of academic libraries (pp. 55-67). .: ICAL2009.

5) Chavan, A. (2017, July 18). The Birth of University of Mumbai. Retrieved 03 10, 2022, from Live History of India: https://www.livehistoryindia.com/story/eras/the-birth-of-the-university-of-Mumbai.

6) Gurram, S. (2008). Digital library intitiatives in India a proposal for open distance learning. Proceeding of IATUL conferences, (p. 25).

7) Maurya, A., & Choudhary, S. P. (2021). Ranking of Institutions of higher education indian persppective. Library Philosophy and Practice, 4985.

8) Pritchard, S. M. (1996). Determining quality in academic libraries. Library Trends, 44(3), 572-94.

9) Shukla, A., & Sialal, S. (2016). ICT Application in Academic Libraries. In M. R., Future of Academic Libraries:Issues and Challebes (pp. 62-71). New Delhi : Pentagon Press for UPRTOUS, ALLAHABAD.

● ● ●

UGC-K

II विद्या अमृतम अश्नुते II

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal Pachal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL – RAYPATAN

At Post – Raypatan, Tal. – Rajapur, Dist. – Ratnagiri, 416 704
First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994
Permanent Affiliation No. Aff-II./ICD/2015-16/1121 dated 16.09.2015, ISO 9001:2015 Certified
❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

I.Q.A.C., Department of History, Marathi, Hindi, English and Commerce

Organize

One Day Interdisciplinary National E-Conference

On

75 years of India Independence

Sponsored by

Indian Council of Social Science Research, Mumbai

In Collaboration with

Department of History, University of Mumbai, Mumbai

Date: 15 March, 2022, Time : 10.30am To 4.00pm

CERTIFICATE

This is to certify that, Dr./Prof./Mr./Miss. **Manohar Ramulu Kondagurle** of **Ph. D. Research Scholar, JJTU, Rajasthan** actively participated & presented a paper entitled **Study of Post-Independence Indian Libraries: A Special Reference to Academic Libraries** in One Day Interdisciplinary National Level E-Conference held on 15/03/2022 at Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerce, Pachal-Raypatan.

Dr. Prakash Masaram I/c Head, Department of History, University of Mumbai	**Prof. Smita Shukla** Honorary Director, ICSSR (WRC), Mumbai	**Sanjay V. Nimbalkar** Asst. Prof. IQAC Coordinator Shri. M. H. K. College of Arts & Commerce, Pachal-Raypatan	**Dr. Pramod. S. Meshram** I/c Principal, Shri. M.H.K.College of Arts & Commerce, Pachal-Raypatan

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane Colle
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PAC
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ra.

UGC CARE LIST
ISSN No.2394-5990

संशोधक

● वर्ष : ९० ● मार्च २०२२ ● पुरवणी मराठी विशेषांक ०२

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

कोकणची संस्कृती, समाज आणि लोकमानस

डॉ. विकास पाटील
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय,
पाचल- रायपाटण, ता. राजापूर
मोबाईल क्रमांक - ८७९३५९७६१४

संस्कृती समाज आणि साहित्य यांचा अन्योन्य संबंध आहे. प्रत्येक समाजाची स्वतःची अशी संस्कृती असते. रूढी, परंपरा, रिवाज तसेच कला आणि साहित्य .सणवार,उत्सव हे सारे संस्कृतीचे घटक आहेत. संस्कृती हा समाजाचा अविभाज्य घटक आहे. लेखक समाजातच लहानाचा मोठा होतो .त्याने पाहिलेले, साहिलेले,अनुभवलेले क्षण तो शब्दबद्ध करतो. तेच साहित्य होय . लेखक, कवी हा आपले भवताल साहित्यातून टिपण्याचा प्रयत्न करत असतो.आपण जगत असलेल्या समाजाचे काहीतरी देणे लागतो याच भूमिकेतून त्यांनी आपले लेखन केलेले असते. हे जसे आजच्या साहित्यला लागू पडते.त्याप्रमाणेच समाजात असणाऱ्या परंपरागत, रूढी,परंपरा, संकेत यातूनच समाजाची संस्कृती निर्माण झालेली असते.ही संस्कृती पिढ्यानपिढ्या सुरू असते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हे संस्कार पुढे सुरू राहतात.

कोकणातील लोकमानस, संस्कृतीचा अभ्यास करत असताना तेथील शांतताप्रिय आणि परंपराप्रिय समाज आपण लक्षात घेतला पाहिजे. निसर्गाने सौंदर्याची मुक्तहस्ते उधळण केलेल्या कोकणातील माणूस मात्र तिथल्या फणसासारखाच गोड आहे. आंबा,काजू,नारळ, पोफळी ,फणस, कोकम असा नैसर्गिक मेवा आणि सागरातील मच्छी यामुळे येथील अर्थव्यवस्थेला बळकटी मिळालेली आहे.

शब्दसूची (की वर्ड)

लोकमानस, म्हाळवस ,देवाचार, वेताळ, बारापाचाचा संप्रदाय, कौल

उद्देश

१. कोकणातील समाज शांततेचा शोध घेणे.
२. कोकणातील प्रथा-परंपरा,रूढी जाणून घेणे.
३. कोकणी समाज आणि संस्कृतीचा सहसंबंध जाणून घेणे.
४. कोकणातील बदलत्या संस्कृतीचे वास्तव जाणून घेणे.

अभ्यास पद्धती :- सदर अभ्यास क्षेत्रीय पद्धतीने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे

कोकणातील लोकसाहित्याचा अभ्यास फार कमी झाला आहे. डॉ.नामदेव गवळी यांनी ममालवणी मुलखातील लोकसाहित्याचा अभ्यासफ्हा शोधप्रबंध पुणे विद्यापीठात सादर केला आहे . डॉ विकास पाटील यांनी मदक्षिण कोकणातील दंतकथांचा चिकित्सक अभ्यास महा शोध प्रबंध शिवाजी विद्यापीठत कोल्हापूर सादर केला आहे. डॉ संजय पाटोळे यांनी मकोकणातील शिमगोत्सवफ्हा लघु शोध प्रबंध मुंबई विद्यापीठात सादर केला आहे.डॉ सूर्यकांत आजगावकर यांनी मकोकणी लोककथा महा(तीन तालुक्यातील) लोककथांचा अभ्यास लघुशोध प्रबंध मुंबई विद्यापीठात सादर केला आहे. असे असले तरी येथील संस्कृती आणि समाज यांचा अभ्यास मात्र फारसा झालेला दिसत नाही.

साहित्य,समाज आणि संस्कृती परस्पर संबंध

आपल्या अवतीभवतीचे पर्यावरण आणि परिस्थिती यांचा समन्वय साधत मनुष्य जगत असतो. त्यामधूनच त्यावर व्यक्तिगत व सामूहिक संस्कार होत असतात.हे मानवाचे तयार झालेले संस्कार व व्यक्तिमत्त्वविकास म्हणजे माणसाची संस्कृती होय.

⁕संस्कृती⁕

मानव आपल्या अवतीभवतीच्या परिस्थितीचे निरीक्षण अवलोकन करत असतो.त्यातूनच त्याचे संस्कारमय व्यक्तिमत्त्व

[illegible] येते. एखाद्याचे वाईट संस्कारात जीवन व्यतीत झाले असेल तर तो व्यक्ती वाईट बनण्यास त्याची संस्कृती कारणीभूत झाली असे आपण म्हणतो. एखाद्या व्यक्तीची जडणघडण कष्टातून होते आणि आयुष्यभर ती व्यक्ती कष्टत राहते. त्यावेळी आपण त्यावर झालेले चांगले कष्टाचे संस्कारच आज त्याच्या कामी येत आहेत असे सहज बोलून जातो. साने गुरुजींच्या वर त्यांच्या आईने चांगले संस्कार केले म्हणूनच सानेगुरुजींचे व्यक्तिमत्त्व चांगले घडले असे आपण म्हणतो.

संस्कृतीची व्याख्या करताना इरावती कर्वे असे म्हणतात की मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती'अशी संस्कृतीची व्याख्या त्यांनी केली आहे. म्हणजेच संस्कृती ही एका व्यक्तीची निर्मिती नसते तर ती मनुष्य समाजाची निर्मिती असते. मनुष्याद्वारेच ती प्रकट होत असते. कोणताही एखादा व्यक्ती पूर्ण आयुष्य आणि संस्कृती प्रकट करू शकत नाही किंवा दाखवू शकत नाही. संस्कृती संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवनसाफल्यार्थ स्वतःवर व बाह्य विश्वावर संस्कार करून जो अविष्कार करतो, ती पद्धती व तो अविष्कार संस्कृती होय', लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते संपूर्ण मनुष्य समाजाने अवलंबलेली जीवन पद्धती व स्वतःवर करून घेतलेले संस्कार म्हणजेच संस्कृती होय. संस्कृती ही समाजाची एक रूप असल्याचे यावरून दिसते.

समाज

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजातच जन्मतो,वाढतो आणि मरतो.इतर प्राणी कळप किंवा समुदाय करून राहतात. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे असे आपण म्हणतो याचे कारण म्हणजे समाज हा माणसांनी मिळून बनलेला असतो. हॅरी जॉन्सन यांनी समाजाची चार महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. भूप्रदेश,स्त्री-पुरुष संबंधाद्वारे प्रजोत्पादन, सर्वसमावेशक संस्कृती आणि स्वतंत्रता ही चार समाजाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. यातील सर्वसमावेशक संस्कृती हे वैशिष्ट्य महत्त्वाचे आहे . प्रत्येक समाजाचे स्वतःचे असे वेगळेपण असते. लहान मूल जन्माला आल्यापासून ते मृत्यूपर्यंत समाजातच वाढत असल्याने समाजातील विभिन्न परिस्थितीची त्याला जाणीव झालेली
सामाजिक जीवनाच्या विविध परिस्थितीत कसे जगावे या संबंधी
आकृतिबंध समाजच माणसाला शिकवत असतो. हा सामाजि
वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातो तेव्हा संस्कृती
एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सतत संक्रमण होत असते.
संस्कृतीचे संक्रमण होत असते तसेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीक
मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकसाहित्याचा वारसाही ए
पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेने चालत राहतो.

साहित्य

साहित्य हे समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते
साहित्यातून समाजाचे त्या त्या काळातील परिस्थितीचे दर्शन
असते. साहित्यिक हा समाजाचा प्रतिनिधी असतो तसाच
सामाजिक संस्कृतीत वाढलेला असतो. मानवी समाजाच्या सांस्कृ
जीवनातील स्थिती गतीच्या आलेखाचे निर्देशन साहित्य
मधून प्रत्ययाला येत असते.साहित्य आणि समाज यांचा
स्पष्ट करताना हॅरी लेविन असे म्हणतात की, साहित्य आणि
यांच्यातील संबंध अन्योन्य असतात साहित्य हा केवळ सामा
कारणांचा परिणाम नसतो तर ते सामाजिक परिणामांचे का
असू शकते.' साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध
लेविनं यांनी स्पष्ट केला आहे. साहित्य हे सामाजिक परिणा
कारण असते असे त्यांनी म्हटले आहे. सामाजिक स्थित्यंत
वेध साहित्य घेत असते असेच त्यांना स्पष्ट करावयाचे
साहित्य हे समाजाच्या इतिहासाच्या अभ्यासाचे साधन आहे
कार्ल मार्क्सने देखील म्हटले आहे.म्हणजे साहित्य आणि
यांचा संबंध एकजिनसी असा आहे . साहित्य हे कोणत्या
निर्वात पोकळीत निर्माण होत नसते तर ते समाजातीलच लोक
कडून समाजातीलच विषयावर आणि समाजाचेच वर्णन
असते. साहित्य आणि समाज यांचा असा परस्परसंबंध पूरक
.संस्कृती,समाज आणि साहित्य यांचा परस्पर संबंध परस्पर
असल्याचे आपणास दिसते. साहित्याचा व्यापक अंगाने
केल्यास लोकसाहित्य हे साहित्य संकल्पनेत येते.

कोकणातील संस्कृती, समाज आणि लोकमानस यांचा संबंध

कोकणातील माणूस हा शांत, संयमी,परंपराप्रिय व शांतताप्रिय म्हणून ओळखला जातो. पूर्वेला असणाऱ्या सह्याद्रीच्या डोंगर रांगा तर पश्चिमेला असणारा अरबी समुद्र या दोहोंच्या मधील भूभागास कोकण संबोधले जाते. प्रस्तुत शोधनिबंधात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यातील संस्कृती आणि समाज यांचा आपण विचार करणार आहोत.

येथील देव या संकल्पनेचे माणसाशी असलेले नाते भक्तिच्या ने येते. येथील लोकात असणारी भक्ती आजच्या पुढारलेल्या समाजाला धर्मभोळेपणाची,अंधश्रद्धेची वाटत असली तरी तेथील लोकांना मात्र ही परंपरा आधार वाटताना दिसते.तिथली दैवते ही लोकांशी संवाद साधतात. हा संवाद कौल प्रसादाच्या माध्यमातून व तांदूळ, फुले पाण्यात भिजवून चिकटवून पुजाऱ्या मार्फत विचारल्या गेलेल्या प्रश्नाला नकारात्मक होकारात्मक उत्तर देऊन पाषाणमूर्ती कौल देते असा समज येतील लोकात आहे. त्यातून संकटकाळात त्यांना धीर मिळताना दिसतो. देवावर श्रद्धा असल्याने येथील परिसरात चोऱ्यामाऱ्यांचे प्रकारही फारसे दिसत नाहीत. देवाच्या भीतीने कुकर्म करण्यास येथील समाज धजावताना दिसत नाही. त्याच बरोबर देव-देवतांच्या सणवार, उत्सवात येथील सर्वच समाजाला सामावून घेण्याची प्रथा असल्याने सामाजिक ऐक्य ही येथे निर्माण ाचे दिसते. हिंदू मुस्लिम अशा वेगवेगळ्या धर्मातील देवदेवतांची पूजा येथील सर्वधर्मीय समाज करताना दिसतो.याकूब बाबांची पूजा हिंदू बांधव करतात तर भैरी बुवांच्या पालखीवर गुलाल उधळण्याचे काम मुस्लिम धर्मीय करतात.त्यामुळे धार्मिक ऐक्य व जातीय सलोखा कोकणात असल्याचे आपल्या निदर्शनास येते. देवतांच्या प्रतिमा असणारे भक्ती भावनेचे आणि श्रद्धेचे वातावरणच या सर्व शांततेच्या मुळाशी असल्याचे आपणास दिसते गावातील प्रमुख व्यक्तींना ज्यामध्ये बारा बलुतेदार व पाच मानकरी यांच्या माध्यमातून गावातील मंदिरात न्यायनिवाड्याचे काम चालत असते. केलेला न्यायनिवाडा उभय पक्षाकडून मानला जातो. येथील ग्राम व्यवस्थेचे हे वैशिष्ट्य आजही दिसते.रात्री देवाचार फिरतो. रात्री देवाचाराची वाट ही मोकळी असावी. त्या वाटेत घाण केल्यास देवाचाराची वाट अडवल्यास देवाचार आपल्याला शिक्षा करतो. देवाचाराकडून आपल्यावर संकट येण्याची भीती लोकांच्यात असल्यामुळे गावातील वाटा व्यवस्थित राहिलेल्या दिसून येते.त्या प्रशस्त आणि स्वच्छ असल्याचे आपणास दिसून येते. वेगवेगळ्या गावांच्या वेगवेगळ्या देवता असल्याचे आपणास दिसून येते.काही प्राण्यांना देवता मानून त्याचे मंदिर बांधल्याचे आपणास दिसते. त्यामुळे त्या प्राण्यांची शिकार करणे निषेध मानले जाते. त्याचबरोबर काही गावांमध्ये फणस, उंबर अशा झाडांच्या लाकडांपासून मुर्त्या बनवलेल्या असल्याने या झाडांची तोड करणे त्या गावात निषेध मानले जाते.त्यामुळे या वृक्षांचे रक्षण मोठ्या प्रमाणात झाल्याचे आपणास दिसते. त्याचबरोबर मंदिरा भोवती असणाऱ्या वनराईचेही जतन मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसते. देवाचे झाड असल्याने त्याला हात लावल्यास आपल्यावर संकट येऊ शकते या भितीमुळे ही देवराई मोठ्या प्रमाणात संवर्धित झालेली आहे. ज्यामुळे आजही अनेक दुर्मिळ व दुर्लभ औषधे या वृक्षांपासून आपणास मिळताना दिसतात. येथील देव-देवतांमध्येही नातेसंबंधाच्या कथा ऐकायला मिळतात. त्या नातेसंबंधातूनच त्यांच्या उत्सवाच्या वेळी तेथील पालख्यांच्या भेटी होतात. ज्यामुळे शेजारील गावाशी वैर वा धार्मिक कार्यात दंगेधोपे न होता सलोख्याचे संबंध प्रस्थापित झालेले दिसतात.

अशाप्रकारे कोकणी संस्कृतीतून कोकणचा माणूस शांतताप्रिय, संयमी व निसर्गप्रेमी बनल्याचे आपणास दिसते.येथील लोकसाहित्याचा येथील लोकमानसावर खूप मोठा प्रभाव असल्याचे दिसते.

निष्कर्ष

१) कोकणातील माणूस हा श्रद्धाळू आहे त्यामुळेच त्याचा देवावर आणि दैवावर विश्वास असल्याचे दिसते.

२) वाईट कृत्य केल्यास देवाचा कोप होतो ही कोकणी लोकसाहित्यातील भीती तेथील समाजावर आजही असल्याचे दिसते.

३) येथील लोकसंस्कृतीने प्राण्यांनाही दैवत्व दिल्याने त्यांचे रक्षण झाले आहे.

४) येथील वृक्षांना दैवत्व लाभल्याने देवरायांचे रक्षण झाले आहे.

५) येथील पूर्वापार चालत आलेल्या परंपरा आणि रूढी याप्रमाणे वर्तन करताना येथील समाज दिसतो.

६) कोकणातील लोककलांना धार्मिक आणि दैविक अधिष्ठान लाभल्याने त्यास मोठा जनाश्रय प्राप्त झाला आहे.

७) बदलत्या वर्तमानाचे पडसादही येथील संस्कृतीवर कमीअधिक प्रमाणात पडत असल्याचे चित्र अलीकडच्या कालखंडात दिसते आहे.

❋संदर्भ❋

१) डॉ उषा कोटबागी, इरावती कर्वे: व्यक्ती आणि वाङमय, पद्मगंधा प्रकाशन,पुणे,प्रथम आवृत्ती १४ डिसेंबर २००५, पृष्ठ क्रमांक १७१

२) प्रा संजय नगरकर,निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी, नवनरेंद्र प्रकाशन अहमदनगर, प्रथम आवृत्ती ५सप्टेंबर २००८, पृष्ठ क्रमांक ९

३) तत्रैव पृष्ठ क्रमांक १२

४) तत्रैव पृष्ठ क्रमांक १३

५) अगम्य प्रहार दिवाळी विशेषांक २०१३

--*

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACH
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

UGC CARE L
ISSN No:

संशोधक

• वर्ष : ९० • मार्च २०२२ • पुरवणी मराठी विशे



स्थापना : १ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

अनुक्रमणिका

१ स्वतंत्रता के बाद बौद्धो के जीवन में सामाजिक परिवर्तन
- डॉ.प्रमोद मेश्राम, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- १०

२ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्य प्रवाहाची वाटचाल
- डॉ. विकास पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- १५

३ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील दलित नाटक
- डॉ.बळवंत दाभाडे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- २१

४ स्वातंत्र्यानंतरचा रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील ठाकर समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास (२०१० ते २०१५) - डॉ.सुधीर वाघमारे, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- २६

५ स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळीचा विकास
- डॉ.अशोक पाटील, पाचल, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ---------- ३१

६ भारतीय स्वातंत्र्योत्तरकालीन ग्रंथालयातील नवे प्रवाह: एक अभ्यास
- डॉ.जयंत मेश्राम, रिसोड, जि.वाशिम ---------- ३६

७ स्वांतत्र्योत्तर काळातील वाढते शहरीकरण
- डॉ. प्रतिभा देसाई, गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर ---------- ३८

८ स्वातंत्र्योत्तर कालखंडात सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास
- डॉ. शशिकांत वानखडे, आर्णी, जि.यवतमाळ ---------- ४२

९ स्वातंत्र्योत्तर हिंदी पत्रकारिता
- डॉ.संतोष रायबोले, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग ---------- ४७

१० स्वातंत्र्यप्राप्ती आणि सुरेश भट
- डॉ. चैनलाल राणे, गोरेगाव, जि.गोंदिया ---------- ५१

११ डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्राच्या पाचव्या सिद्धांतानुसार महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथसंख्येत झालेली वाढ : एक अभ्यास
- अंबादास खिलारे, डॉ.दिलीप मेस्त्री, पनवेल, नवी मुंबई ---------- ५५

१२ मानवी हक्क व दलित कविता
- डॉ. नरेंद्र घरत, डॉ.कविता लुटे, नागपूर ---------- ५८

१३ स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण व्यवस्थेवर महात्मा गांधींचा प्रभाव
- डॉ.नंदकिशोर मने, गडचिरोली ---------- ६४

१४ भारतीय ग्रंथालय कायदे : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९६७ चे सार्वजनिक ग्रंथालय विकासात महत्त्व - अनंत थोरात, रोहा, जि.रायगड ---------- ६८

१५ स्वातंत्र्योत्तर काल मे महिला सशक्तिकरण एवं शिक्षा का महत्व
- डॉ.रजनी वाढई, गडचिरोली ---------- ७५

१६ स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत दैनिक संचार'चे संपादक रंगा वैद्य यांचे योगदान
- शंकर पवार, कोल्हापूर ---------- ७९

१७ स्वातंत्र्योत्तर भारतातील आदिवासींची स्थिती, संविधानिक तरतुदी व कायदे
- डॉ.नरेश मडावी, गडचिरोली. ---------- ८४

स्वतंत्रता के बाद बौद्धो कें जीवन में सामाजिक परिवर्तन

डॉ. प्रमोद एस. मेश्राम
प्रभारी प्राचार्य (सहयोगी प्राध्यापक)
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल
मो. न. ९४०४७७४४९९ ई मेल : Pramodmeshragmail.com

सारांश :

हजारो सालो से इस भारतभूमी में रहनेवाले मूलनिवासी भारतीयों को उनके हक़ से प्रताड़ित और बेदखल करके उनकों गुलामगिरी युक्त जीने के लिये कानून बनाके उसकों उनकें ऊपर पूरी ताकदो/जोरों से लागु करना ये अमानवीय अत्याचारों की परिसीमाये थी। पुर्वाश्रमियोंके अस्पृश्योंका जीवन उच्चभ्रू समाज नें बनायी हुइ रीती-रिवाजोंपर, कानूनों पर निर्भर था। निचले तबके में उनकों रखा जाने से उनके अधिकार नहीं के बराबर थे। इसके ख़िलाफ़ प्राचीन काल से स्वतंत्रता प्राप्ती तक कही सारे लोगों नें अस्पृश्यों के हित में बदलाव लाने कें लिये प्रयास किये। मगर वे पूरी तरह सफ़ल नहीं हुये। डॉ. बाबासाहब अम्बेडकर कें सामाजिक यवम धार्मिक क्रांति से उच्चभ्रू समाज कें लोगों कें दिलों में कुछ ज्यादातर प्रभाव देखने कों नहीं मिला इसलिए डॉ. अम्बेडकर कें मन में हिन्दू धर्म के प्रती नफ़रत दिखाई देती है। इसलिए उन्होंने येवला परिषद में १९३५ कों हिन्दू धर्म छोड़ने की बात की। उसके बाद भारत में स्थित सभी धर्मो की जमकर पढाई की। २१ सालों कें बाद नागपुर और चंद्रपुर में १४ यवंम १६ ऑक्टोबर १९५६ कों बौद्धधम्म की दीक्षा लेकर अपने अनुयायीयोंको बौद्धधम्म की दीक्षा दिलाई। पुर्वाश्रमियोंके अचूतों ने बौद्धधम्म की दीक्षा कें पश्चात् बौद्धों कें जीवन में सभी तरह का परिवर्तन देखने को मीलता है। जो अत्यंत सराहनीय है।

कीवर्ड : स्वतंत्र भारत के बौद्ध, बौद्धधम्म, सामाजिक परिवर्तन, बौद्धों का जीवन

प्राक्कथन :

सोरोकिन का कहना है कि प्रत्येक संगठित समाज स्तरीकरण में विभाजित है। सभी देशो में इसके अनेक प्रकार दिखाई देते है। जैसे कि रोम में प्लेबियेनस स्पोर्टन में हिलोटस इजीप्सीयेन में गुलाम अमेरिका में निग्रो जर्मन में ज्यूस भारत के हिंदुयो में अस्पृश्य और् गिरीजन्। सभी देशो में उपयुक्त वर्ग समाप्त हो चुके है लेकीन भारत में अभी भी अस्पृश्य है जिसे आज भी पिचडा वर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, अन्य पिछडी जातियाँ) की संज्ञा जाती है। अनुसूचित जातियां में शोषित जातियो कें ही लो होते है। वर्ण और जाती का निर्माण समाज में उच्च समुदा के आदमियों ने विशेष पारिस्थितियों में इनका विकार किया। अस्पृश्य, पंचम, चंडाल या तों बहिष्कृत यह वा वर्ग है जिसका सामाजिक स्तर समाज के आखरी पायदा पर है जिसका स्थान सभी स्तर पर निम्नतम था। प्राचीन जीवन व्यवस्था में जिन्हे समाज में पंचम स्थान दिया गय था। वैदिक काल में चांडाल नाम दिया गया था। अंग्रेजो ने १९२८ में अस्पृश्य जाति यह शब्द का पहिली बार प्रयोग सायमन कमिशन के दौरान किया। संसार के सभी देशो में एक ऐसा वर्ग था जीसे अस्पृश्य कहते थे। गाँधी इन्हे हरिजन कहते थे। अर्थात ईश्वर के व्यक्ति। ये जीवित आदमी तो थे मगर इनके साथ आदमी जैसा बर्ताव समाज के अन्य वर्ग नही करते थे। इनका जीवन गुलामों से भी नीचा था। पशु सें भी गिरी इनकी जिंदगी थी। समाज में इनकी कोई प्रतिष्ठा नही थी। हजारो सालो तक इन्होने सामंतशाही व्यवस्था में दासो की तरह जीवन व्यतीत किया। इनको सभी प्रकार कें मानवीय अधिकारोसें वंचित रखा गया था। इसलिए समाज के पूर्वाश्रमीयों कें अस्पृश्योंका जीवन नरकयातने जैसा समान था। भारत के जनता के मन में जातिवाद की छाप बहोत गहरी है इसलिये इस मानव निर्मित कुप्रथा कों हर हाल में ख़तम किया जाना चाहिए। इसलिए पुर्वाश्रमियोंके अस्पृश्य समाज में यही भावना समाहित हुयी। इसके बारे में एम. एस. ए. राव कहते है कि संसार के विभिन्न भागों में वंचित वर्ग के लोंग संग्रठित हो रहे है कि उन्हें रंग, धर्म, जाती, जनजाति आदि के आधार पर बांटा न जाय। ये अपनी पहचान बनाना चाहते है। समाज में एक सम्मानित स्थिति बनाना चाहते है और चाहते है आत्मसम्मान। (सिह वि. एन, २००५) हिन्दू समाज में अस्पृश्यों कों जातीय अवहेलना की जाती थी। महात्मा फुले से प्रेरणा लेकर पुर्वाश्रमिके अस्पृश्यों ने डॉ. बाबासाहब अम्बेडकर पूर्व सामाजिक एवंम धार्मिक चळवळ

थी नीव रखी जो अधिक महत्वपूर्ण थी। १९२७ से लेकर डॉ. बाबासाहाब अम्बेडकर ने अस्पृश्यों के हित में सामाजिक और धार्मिक आन्दोलन की नीव रखी थी मगर उच्चभ्रू समाज के दिलो मे कुछ भी बदलाव दिखाई नहीं दिया। इसलिए १४ एवंम १६ अक्टूबर १९५६ को पुर्वाश्रमिके अस्पृश्योंको बौद्धधम्म की दीक्षा दीलाई। उसके पश्चात १९५६ से लेकर आज तक स्वतंत्र भारत देश के बौद्धो ने अपने मानवीय अधिकारो को प्राप्त किया। और सभी प्रकार के मानवीय गुलामगिरी कों छोड दिया। और खुद के जीवन में परिवर्तन लाया जो अधिक सराहीय माना गया है।

शोध का उद्देश :

पुर्वाश्रमी के अस्पृश्योंकी स्थितियोंकि पढाई करके नई पीढी कों उसकी जानकारी देना बहोत जरूरी है। डॉ. बाबासाहब अम्बेडकर ने बौद्धधम्म कों किस कारण अपनाया इसकी जाँच करना। बौद्धधम्म दीक्षित बौद्धों में हुआ परिवर्तन क्या धम्मक्रांतिका परिणाम है ? इसकी जाच करना। बौद्धों में हुआ परिवर्तन क्या डॉ. बाबासाहब अम्बेडकर के धम्मक्रांति का नतीजा है इन सभी बातों कों जानने के लिये यह संशोधन जरूरी है।

पूर्वाभ्यास :

डॉ. इलिनार झेलियट का कहना है की, पुर्वाश्रमीकें अस्पृश्योंने डॉ. अम्बेडकर के नेतृत्व में बौद्धधम्म का स्वीकार करने के बाद वे खुदको दलित समजने लगे। अडीले फिस्के का कहना है की, जीन लोगों नें डॉ. बाबासाहब के नेतृत्व में बौद्धधम्म का स्वीकार किया उन्होंने हिन्दू धर्म की प्रथा परंपराओं कों छोड़ दिया। टी.एस. विल्किंसन कहते है की, जीन अस्पृश्योंने बौद्ध धम्म का स्वीकार किया उन्होंने गलिच्छ, गन्दी कामों कों करना छोड़ दिया।

तिमोथे फिट्जेरोल्ड का कहना है की, जो बौद्ध हुये है वे तिन प्रकार का जीना व्यतीत करते है। दीपककुमार सामंता कहते है, जिन्होंने बौद्धधम्म की दीक्षा ली उनमें स्वाभिमान और आत्मसम्मान निर्माण हुआ।

डॉ. बाबासाहाब अम्बेडकर पूर्व अस्पृश्योंकी सामाजिक चळवळ :

स्वतंत्रता प्राप्ती के लिये भारतवासी लोगों ने इंग्रजो से स्वतंत्रता प्राप्ती की नींव रखी जों उच्चभ्रू समाज में महत्वपूर्ण मानी गई है। लेकिन हजारों सालों से भारत के अस्पृश्योंपर जो अत्याचार हो रहे थे वों भी तों दासता में जीवन जी रहें थे। उन्होंने भी उच्चभ्रू समूदाय के लोगोंसे अपने स्वतंत्रता की मांग की। मगर उनकें अधिकारों कों टाला गया। नवजागरण काल में जाति और धर्म के नाम पर समाज का दोहन कर रहे थे। इस समय अचूतों की दशा में सुधार आन्दोलन चल रहा था। इस पुर्नजागरण कें संबंध में देसाई लिखते है.अस्पृश्यता जैसी अमानुषिक और अन्यायपूर्ण प्रथा के प्रति शेष प्रबुध्द और शिक्षित भारतीयों के सामान्य प्रजातांत्रिक रोष का ही एक रूप था। ब्रह्म समाज, आर्य समाज, समाज सुधार सम्मेलन, इन्डियन नेशनल कांग्रेस जैसे राजनीतिक संघटन, गाँधी द्वारा स्थापित अखिल भारतीय हरिजन संघ जैसी गैर राजनीतिक संस्थाय, इन सबने प्रचार, शिक्षा और अन्य व्यावहारिक उपायों द्वारा अचूतों कों सामाजिक, धार्मिक और सांस्कृतिक अधिकार दिलाने की चेष्टा की। (देसाई ए.आर., २००१) स्वतंत्रतापूर्व भारत के उच्चभ्रू समाज के मन अचूतों के प्रती दुजाभाव था यह दोहरी राजनीती का प्रयास था। सामाजिक कुरीतियाँ समाज में निहित थी इसलिए जातिगत भेदभाव अधिक मात्रा बता हुआ दिखाई देता है।

स्वतंत्रतापूर्व काल में गोपालबाबा वलंगकर ने महात्मा फुले सें प्रेरणा लेकर डॉ. बाबासाहाब अम्बेडकर पूर्व संघर्ष किया। इनके अलावा कालीचरण नंदागवळी, शिवराम जानबा कांबळे , विठोबा संतपांडे , किसन फागू बनसोड, सेनू नारायण मेंढे और अन्य कार्यकर्त्यांओने अस्पृश्य समाजमें जागृती और समाजउन्नती लाने के लिये प्रयास किये। लेकीन पैसा और मनुष्य बल की कमतरता और हिंदूओका विरोध कढी मात्रा में होने के कारण ये समाजउन्नती का प्रयास ज्यादा विस्तारित नही हुआ। गोपालबावा का कहना था की, जबतक समाज में स्थित अस्पृश्यता खतम नहीं होती तब तक अपने समाज की उन्नती असंभव है। इसलिये उन्होने समाज में अस्पृश्यता निवारण चळवळ सुरु किया। इसके बारे में डॉ. निखुंभे कहते है की, गोपाळबावा वलंगकर या कोकणस्थ साधूने बहिष्कृत समाजावरील अस्पृश्यतेचा कलंक नष्ट व्हावा म्हणून महाराष्ट्रभर दौरा केला.या दौऱ्यात त्यांनी कथा, कीर्तने करून अस्पृश्य वर्गात जागृतीचे कार्य केले. त्याचबरोबर दीनबंधू, सुधारक सारख्या वृत्तपत्रात लिखाण करून अशपृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. (निकुंभे सी.एच., २००५)

गोपालबाबा ने १८८८ में विटाळ विध्वंसंन नाम सें जो किताब निकाली वह सराहणीय है। जिसमे कही प्रकार कें सवाल पूछें गये थे। अस्पृश्य समाज को उनके अधिकार दिलाने कें लिये गोपालबाबा ने अनार्य दोष परिहारक मंडळ की सुरवात थी। इसके बारे में डॉ. बाबासाहाब अम्बेडकर

कहते है की. अस्पृश्योन्नतीची चळवळ सर्वप्रथम सुरु करण्याचा मान कोकण प्रांतातील या संस्थेला आहे. (निकुं सी.एच., २००५) अनार्य दोष परीहारक मंडळ के माध्यम में उन्होंने अस्पृश्य समाज को उनके अधिकार दिलाने की ठान कहि थी। इसी तरह अन्य भागो में भी अस्पृश्य समाज के उन्नती का प्रयास चालू था। जो सराहीय है।

डॉ. बाबासाहाब के नेतृत्व में चली सामाजिक एवम धार्मिक चळवळ :

प्राचीन काल सें स्वतंत्रता प्राप्ती तक ही नही बल्की बौध्दधम्म के स्वीकार तक अस्पृश्य समाज गुलामगिरी युक्त जीवन व्यतीत करते हुये दिखाई देते है। जो खाने कें लिये मौताज थे। उन्ही निर्धन लोगोपर उच्चभ्रू समाज के लोगों ने अन्वयित अत्याचार किये। इसी अस्पृश्य समाज में माता भीमाई रामजी सकपाळ इनकी कोख से १४ एप्रिल १८९१ को भीमराव अम्बेडकर का जनम हुआ। जीन्होने उच्च शिक्षा के प्राप्ती तक ही नही बल्की भारतीय संविधान लिखने तक उनको अस्पृश्यता का सामना करना पडा। इसीलिए उन्होंने अपने जीवन पर्यन्त वर्ण-व्यवस्था और जाती व्यवस्था के ख़िलाफ़ आन्दोलन किया। इसका जिक्र ख़ुद अपने कहीं भाषणों में बाबासाहब ने किया। इसके बारे में अहिरे लिखते है की, when in 1923 he started practice as a barrister in the High Court of Bombay, the solicitors would not condensed to have any business with him on the ground of Untouchability. Even the humble canteen by would not serve him tea. (Ahire D.C., 2000) तों सोचिए की आम आॅदमी की जिंद्जी का क्या अनुपात रहा होगा। अस्पृश्य समाज कें लोगों को हर दिन अस्पृश्यता, जातिवाद और वर्णवाद, विटंवना जेसें अनेक मानविय घटनाओंक़ा सामना करना पड़ता था। ये प्रथाये बौद्ध धम्म के स्वीकार तक सुरु थीं।

१९२० से डॉ. बाबासाहाब ने अस्पृश्योंकी क्रांती की ख़ुद अपने हाथों में ली। अस्पृश्योंकों अपनी आवश्यक सुविधाओं के लिये उच्चभ्रू लोगोंपर निर्भर रहना पड़ता था। जीने के लिये पाणी अत्यंत महत्वपूर्ण है। इसी पाणी के लिये डॉ. बाबासाहाब ने महाड में १९ और २० मार्च १९२७ कों सत्याग्रह किया। यह सत्याग्रह १९३७ तक चलता रहा। मुंबई कोर्ट ने १७ मार्च १९३७ कों इसका निकाल दिया की, सरकारी होने के कारण यह तालाब सबके लिये खुला हुआ। इसके बारे में येलीनार झलियट कहते है की, The Mahad Satyagraha failed to achieve its specific purpose at the time, but was successful as a rallying po[illegible] the [illegible]nal reform of the D pressed classes, the [illegible] expression of their grie ances and the stimulation of a sense of unity (Elean 2005)

स्वतंत्रता पूर्व भारत में रहने वाले अस्पृश्य समाज लोंग भी हिंदू हि थे मगर अस्पृश्य समाज के लोगों क मन्दिर में जाकर पूजा और दर्शन करने की मनाइ थ इसलिए नाशिक के कालाराम मन्दिर में २ मार्च १९३० : डॉ. बाबासाहब अम्बेडकर ने अपने अनुयायीयोंके सा सत्याग्रह सुरु किया। यह सत्याग्रह १९३५ साल त चलता रहा। हिंदू समाज की ओर से इसको कड़ा विरो हुआ। १९३५ में सरकार ने यह मन्दिर अस्पृश्योके लि खुला किया। यह सत्याग्रह के बाद डॉ. बाबासाहब के म में हिंदू धर्म के प्रति जों आशावाद था वों पूरी तरह ख़तम हुआ। इसके बाद भी अमरावती, पूना और मुखेड़ में सत्याग्रह होते रहे। मगर स्पृश्य समाज में सत्याग्रह का ज्यादा प्रभाव देखने कों नहीं मिला इसलिए येवला परिषद में १३ ऑक्टोबर १९३५ कों डॉ. बाबासाहब अम्बेडकर कहते है की, दुर्दैवाने अस्पृश्य हिंदू असा डाग घेऊन मी जन्माला आलो, पण ती गोष्ट माझ्या स्वाधीन नव्हती. तथापि, हा नीच दर्जा झुगारून देऊन ही स्थिती सुधारणे मला शक्य आहे आणि ती मी करणारच याबद्दल मुळीच संशय नको. मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की, हिंदू म्हणवून घेत मी मरणार नाही. (मून वसंत , नरके हरी, २००२) मगर इस समय उन्होंने कोनसा धम्म अपनायेंगे ये निर्णय नहीं लिया था। इसी समय से अस्पृश्य समाज के लोगों नें हिन्दू समाज की सण, उस्तव, देवपूजा जैसी परम्परायोंको नाकारा। बाबासाहब की यह घोषणा के प्रति अनुकूल और प्रतिकूल मत भारत के लोगों ने प्रदषित किया।

डॉ. बाबासाहब अम्बेडकर ने अस्पृश्योंके मानविय अधिकारों के ख़िलाफ़ एक नयी दिशा और आयाम दिया। इस संबध में ए. आर. देसाई लिखते है की, डॉ. अम्बेडकर ने उनकी तकलीफों के ख़िलाफ़ आवाज बुलन्द की और उनके मूलभूत मानवीय आधिकारों के लिये जमकर संघर्ष किए। (सिह वि. एन., २००५) सामाजिक और धार्मिक सुधार हेतू अनेक सन्त, साधू ने प्रयास किये जिसमें बुद्ध, रामानुज, रामानन्द, चैतन्य, कबीर, नानक, तुकाराम, और अन्य लोगों ने समाज में स्थित अनेक कुप्रथाये खतम करने के लिये प्रयास किये थे। मगर ये पूरी तरह सफ़ल नहीं हुये। इतना हि नहीं अस्पृश्यता जैसी अमानुषिक और अन्यायपूर्वक

प्रथा के प्रति शेष प्रबुद्ध और शिक्षित भारतीयों के सामान्य प्रजातांत्रिक रोष का ही एक रूप था। ब्रह्म समाज, आर्य समाज, समाज सुधार सम्मेलन, इंडियन नेशनल कांग्रेस जैसे राजनीतिक संघटन, गांधी द्वारा स्थापित आखिल भारतीय हरिजन संघ जैसी गैर राजनीतिक संस्थाए, इन सघन प्रचार, शिक्षा और अन्य व्यवहारिक उपायों व्दारा अछूतों को सामाजिक , धार्मिक और सांस्कृतिक अधिकार दिलाने की चेष्टा की। (सिंह वि.एन., २००५)

१४ एवंम १६ ऑक्टोबर १९५६ को नागपुर और चंद्रपुर में डॉ. बाबासाहब अम्बेडकर ने अपने अनुयायियों को बौद्ध धम्म की दीक्षा देकर बौद्ध बनाया। उसके कुछ दिन पच्चात ६ डिसेम्बर १९५६ कों डॉ. बाबासाहब अम्बेडकर का महापरिनिर्वाण हुआ। उसके बाद भी भारतीय बौद्ध महासभा की और से बौद्धधम्म दीक्षा समारंभ पुरे भारत में होते रहे। बौद्ध हुये सभी अनुयायियों ने अपने समाज में और ख़ुद में परिवर्तन लाने का प्रयास सुरु किया। यह प्रयास निरंतर आज भी जारी है।

स्वतंत्रता के बाद बौद्धों के जीवन में सामाजिक परिवर्तन:

१५ अगस्त १९४७ कों भारत के लोगों ने इग्रजों के खिलाफ स्वतंत्रता प्राप्त की मगर भारत के अस्पृश्य जातियों को बौद्धधम्म अपनाने के बाद स्वतंत्रता प्राप्त हुई। बौद्ध धम्म अपनाने के पच्चात सभी तरह की मानविय गुलामगिरीयोंका दूटकर सामना किया इतना हि नहीं महात्मा फुले और डॉ. बाबासाहब अम्बेडकर ने बताये हुये शिक्षा व्यवस्था कों ग्रहण किया। इसलिए तभी से लेकर आज तक उनमे सभी प्रकार के परिवर्तन देखने कों मिलते है। जों अत्यंत सराहनीय है।

भारत के जीन लोगों ने बौद्धधम्म का स्वीकार किया उनके ऊपर इलिनॉर झेलियट, विल्किसन, डेटलेफ़, जोगदंड, गोखले, सामंता, आगलावे, मोहपात्रा और अन्य लोगोंने संशोधन किया। उनका मानना है की, धम्मदीक्षित बौद्ध समुदाय के लोगोंमें सामाजिक बदलाव हुआ। उनका संशोधन अत्यंत सराहनीय है।

बौद्धधम्म दीक्षा के बाद बौद्धों ने सामाजिक मूल्यों, सामाजिक गतिशीलता, सामाजिक दर्जा, आचरण, सामाजिक संबंधो में परिवर्तन किया। इसी बारे में केशव मेश्राम लिखते है, 'देव, दैव, नशीब, कर्म, पूर्वजन्म, पाप-पुण्य, पुनंजन्म;-शाप-वरदान, अवतार, चमत्कार, मध्यस्थ, पुरोहित ह्या सगळ्या मानवी मनाला ग्रासणाऱ्या व पूर्ण हतबल करणाऱ्या, अतिंद्रीय-अतार्किक घटकांच्या अदृश्य धाकाचा गडद पडदा [illegible] फाडला. माणसे एकदमच बदलून गेली. गावात देवदेवस्की, करणीभरणी करणारे, भूतपिशाचांची बाधा काढणारे, मंत्र-तंत्र जाणणारे, हळदीकुंकू, पीठ, तांदूळ, गहू, ज्वारी व कडधान्याचा वापर व नासाडी करीत मूठ मारणारे, प्रत्येक वस्ती-वस्तीत असणारे जाणकार, मांत्रिक निकालात निघाले. एका त्रिकोणी दोऱ्याच्या पंजात पेटती पणती ठेवून खाली केलेल्या मंत्रयुक्त, चोकोनात तांदळाचा ढीग ठेवून 'तांदरी' पाहणारे, पिठाच्या बाहुलीला बाभळीचे काटे, सुया, दाभना टोचून करणी करणाऱ्याला अटकाव करणारे, लाकडी ओबडधोबड मानवाकृती काष्टशिल्पाला चिंध्या बांधून प्रतिबाधा करणारे, कितीतरी बुजुर्ग असूनही महत्वाच्या द्रुष्टीने निरुपयोगी ठरले. नव्या जीवनसंस्कृतीचे पडधम वाजले.' (मेश्राम, २०११)

समाज के निचले तबक़े में अस्पृश्य लोंग होने के कारण उनके ऊपर कही सारी बंधने थी। वे निर्धन होने के कारण ख़ुद का पेट पालने के लिये वे कही सारे जानवरों का मांस खाते थे मगर बौद्धधम्म की दीक्षा के बाद उन्होंने खाने पिने का खुदका रवय्या बदला. इसके बारे में जर्मन समाजशात्रज्ञ डेटलेफ लिखते है, New Buddhists change their eating and drinking habits, Meat especially that of cows that have died and which was their former prerogative, is no longer eaten. They publicly renounce alcohol and other intoxicating drinks, following Buddhist prescriptions of virtuous conduct. (Detlef, 2003)

बौद्धोने अपने शादी समारोह में आमुलाग्र बदलाव किया। जो बौद्ध परंपरा सें निहित है। समाज में अपनी खुद की अलग पहचान का निर्माण किया।

निष्कर्ष :

डॉ. बाबासाहाब आम्बेडकर की सामाजिक क्रांति की चळवळ भारत में ही नहीं तो पुरे दुनिया में महत्वपूर्ण मानी जाती है। इस सामाजिक यवम धार्मिक क्रांति नें अस्पृश्य लोगों कें जीवन कों नया आयाम दिया। हजारो सालो से अस्पृश्य समाज के लोंगो पर उच्चभ्रू लोगोंने जीस तरह अत्याचार किये थे वह अत्याचारों कों प्रतिकार करने की ताकद बौद्ध समाज कें लोगों में जागृत हुयी। जिसकें कारण उनमें परिवर्तन देखने कों मीलता है। वह परिवर्तन समाज के सभी तबके पर हुआ। बौद्धधम्म दीक्षा के बाद उच्च शिक्षा प्राप्त करके उच्चतम नोकरिया प्राप्त की। अपने ख़ुद के सीमेंट कांक्रेट के भवानोका निर्माण किया। अन्य समाज

ई [illegible] अपने कार्यक्रमों में उनको बुलाते है। शादी समारोह बौद्ध पद्धति के अनुसार किया जाता है। हुंडा पद्धति कही इलाकों थोडोमें दिखाई देती है। शादी समारोह में हलदी पद्धति का कार्यक्रम ज्यादातर दिखाई देता है। विशेष तौर से स्त्रियोंको मानवीय अधिकार प्रदान किये गये है इसलियें वे आत्मनिर्भर हुई नजर आती है। देव-देवता जैसी प्रथाय छोडने का अनुपात अधिक है। बौद्ध समाज में वैज्ञानिक दृष्टिकोण का निर्माण अधिक दिखाई देता है, जो अधिक सराहनीय है।

References :

Ahire D.C. (2000). Dr.-mbedkar's Pilgramag to Buddhism'. In Ahire D.C., B.R.Ambedkar Life Work and Relevance (p. 92). Delhi: Mnohar Publication.

Detlef, K. (2003). Buddhist in India Today. New Delhi: Manohar Publication.

Eleanar, Z. (2005). From Untochables to Dalit. New Delhi: Manohar Publishers, Ansari Road, Daryaganj.

देसाई ए.आर. (२००१). भारतीय राष्ट्रवाद की सामाजिक पृष्ठभूमि.. न्यू दिल्ली: मकमिलन क. भारत.

निकुंभे सी.एन. (२००५). समाज प्रबोधनकार बाबासाहेब आंबेडकर (प्रथमावृत्ती शव.). पुणे: सुगा

निकुंभे सी.एन. (२००५). समाज प्रबोधनकार बाबासाहेब आंबेडकर. पुणे: सुगावा.

मून वसंत , नरके हरी. (२००२). डॉ. बाबासाहेब लेख आणि भाषणे (तेश. १८ भाग १). (न. ह. मून वसं एन.) मुंबई: डॉ. बाबासाहेब चरित्र साधने आ प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महारा शासन.

मेश्राम, क. (२०११). धर्मांतराचे अर्धशतक. मुंबई : लो वांड.मयगृह, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई.

सिंह वि.एन., स. ज. (२००५). भारत में सामाजिव आन्दोलन. दिल्ली : रावत पब्लिकेशन.

सिह वि. एन, स. ज. (२००५). भारत में सामाजिव आन्दोलन (प्रथम शव.). जयपुर यवं नइ दिल्ली : रावत पब्लिकेशन.

सिह वि. एन., स. ज. (२००५). भारत में सामाजिक आन्दोलन (प्रथम शव.). दिल्ली : रावत पब्लिकेशन.

* * *

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHA
COLLEGE OF ARTS & COM
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist-

Estd. 1994

|| विद्या अमृतम अश्नुते ||

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE
OF ARTS & COMMERCE, PACHAL

At/Post – Raypatan, Tal – Rajapur, Dist – Ratnagiri – 416 704
First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994
❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956
❖ Best NSS Unit Award at University Level for the year 2017-2018 ❖ ISO 9001:2015 Certified

Principal Dr. M. A. Yellure
M.A., M.Phil, Ph.D. DIHT
Cell No. 9403392105, 9834468690

Telefax – 02353-299181
E-Mail – mhkcollegepachal@gmail.com
Web – www.khapnecollege.com

Permanent Affiliation No.
Aff-II./ICD/2015-2016/1121
dated 16th September 2015

3.3 Research Publication and Awards.

3.3.1. Number of research papers published per teacher in the Journals as notified as on UGC CARE LIST during the last five years.

YEAR 2022-23

Yours Faithfully

Principal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

॥ संशोधक ॥

पुरवणी अंक १० – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

• शके १९४४ • वर्ष : ९० • पुरवणी अंक : १०

संपादक मंडळ

• प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

• डॉ. प्रमोद एस. मेश्राम • डॉ. बळवंत टी. दाभाडे • डॉ. मनोहर आर. कोंडागुर्ले

✸ प्रकाशक ✸

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१. २१ व्या शतकातील बौद्धांचे सांस्कृतिक परिवर्तन : विशेष संदर्भ दक्षिण कोकण ✓
- डॉ. प्रमोद एस. मेश्राम ---------- ९

२. २१ व्या शतकातील कविता : एक अभ्यास ✓
- डॉ. बळवंत तुकाराम दाभाडे ---------- १४

३. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधून येणारे एकविसाव्या शतकातील शेतीचे प्रश्न ✓
- डॉ.विकास शंकर पाटील ---------- २०

४. भारतातील नक्षलवादी चळवळीची समस्या : एक अभ्यास ✓
- डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील ---------- २३

५. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर उद्योग : ग्रामीण विकास आणि समस्या
- कु.वनिता देवगोंडा पाटील ---------- २७

६. २१ व्या शतकातील पर्यटन – Tourism
- डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले ---------- ३२

७. २१ व्या शतकातील आदिवासींची राजकीय स्थिती
- डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे-गणवीर ---------- ३८

८. २१ व्या शतकामध्ये गीताचार्य तुकारामदादा यांनी राबविलेली गावगणराज्य चळवळ : एक ऐतिहासिक अध्ययन
- प्रिती पारस ठिकरे, डॉ. नंदकिशोर पी. मने ---------- ४३

९. भारतीय ग्रंथालये : एक ऐतिहासिक आढावा
- सौ. जिरगे आशा चंद्रशोक ---------- ४७

१०. माहिती तंत्रज्ञानाचे बदलते स्वरूप आणि २१ शतकातील आधुनिक ग्रंथालये
- डॉ. शशिकांत वसंतराव वानखडे ---------- ५१

११. शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीने आजच्या काळात ऐतिहासिक पर्यटन स्थळांचे महत्त्व
- डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव ---------- ५५

१२. २१ व्या शतकातील महाराष्ट्रातील वाढते शहरीकरण : एक अभ्यास
- प्रा.डॉ. देविदास विक्रम हारगिले ---------- ६०

१३. महिला सक्षमीकरणात महिला आर्थिक विकास महामंडळाचे योगदान – एक अध्ययन
- मंगला दुर्गादास बनसोड, डॉ. उषा खंडाळे ---------- ६५

१४. बदलत्या शिक्षण प्रवाहात ग्रामीण भागातील शालेय बालकांच्या बौद्धिक क्षमतेचे अध्ययन
- सौ. मेघा मोहन रतकंठीवार, डॉ. माधुरी नामदेव कोकोडे ---------- ७१

'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधून येणारे एकविसाव्या शतकातील शेतीचे प्रश्न

डॉ.विकास शंकर पाटील
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय,
पाचल- रायपाटण , ता. राजापूर, जि. रत्नागिरी, मोब. ९४०४२५६४३४

सारांश :

साठोत्तरी साहित्यात ग्रामीण साहित्याचा प्रवाह सशक्तपणे गतिमान झाल्याचे दिसते . या प्रवाहाने गावाच्या सुखी समृद्धतेच्या संकल्पनेला तडा गेला. ग्रामीण भाग म्हणजे मपाटात खळाळणारे पाणी आणि हिरव्यागार निसर्गात म्हणावयाची गाणी म असे समृद्धतेचे चित्र लेखक उभे करत होते. ग्रामीण साहित्याने ग्रामीण वास्तव उभे केले.

कीवर्ड्स : अवकाळी, दरम्यान, आत्महत्या, वगळाला,कुणबी,सुतक,मसनवटा

प्रस्तावना :

गाव खेड्यातला शेती आणि शेतकरी कसा जीवन जगतो याचे वास्तव साहित्यातून सशक्तपणे प्रकट केले. गाव खेड्यातल्या भेसूर समस्यांचे चित्र उभे केले. ग्रामीण साहित्य शेतकऱ्यांच्या बांधावरून त्याच्या घरात गेले. त्याच्या घरातून ते त्याच्या अंतकरणात पोहोचले. शेतकऱ्याच्या अंतर्मनात चाललेला कोलाहल ग्रामीण साहित्यातून व्यक्त होऊ लागला. १९९० नंतर ग्रामीण साहित्याने शेतकरी जीवनाची भेसुरता अधिक सशक्तपणे मांडली. निसर्गाशी संघर्ष करणारा शेतकरी आपल्या जीवनाचा का शेवट करतो? तो आत्महत्येकडे का प्रवृत्त होतो? याचे वास्तव चित्र ग्रामीण साहित्यातून उभे राहिले आहे. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' ही एकविसाव्या ातकातील शेतकऱ्यांचे प्रश्न अधोरेखित करणारी, ग्रामस्थरावरच्या मस्यांचा आलेख मांडणारी, शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर ातकरी कुटुंबाच्या जीवनाचे उग्रभीषण सत्य मांडणारी वास्तववादी ादंबरी आहे.

द्दिष्टे :

'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीतून ून येणाऱ्या ग्रामस्तरावरच्या समस्यांची मांडणी करणे. ग्रामीण ातला शेतकरी आत्महत्येस का प्रवृत्त होतो ?त्या कारणांचा ा घेणे. शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर त्या कुटुंबाची होणारी अवस्था चित्रित करणे. अवकाळी पावसाने शेतकऱ्याच्या जीवनावर होणाऱ्या परिणामांचे चिंतन करणे.

पूर्वाभ्यास :

डॉ.सतीश कामत यांनी 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' च्या निमित्ताने हा समीक्षा ग्रंथ संपादित केला आहे. 'समकालीन दुष्टचक्राचे अंतर्भेदी चित्रण' ही डॉ रणधीर शिंदे यांची साधनातून प्रकाशित झालेली समीक्षा आहे. याबरोबरच अनेक समीक्षकांनी आपल्या समीक्षात्मक विचारांची मांडणी या ग्रंथावरती केली आहे.

'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' आनंद विंगकर यांची कादंबरी लोकवाङ्मय गृहाने २०११ मध्ये प्रकाशित केली. या कादंबरीच्या लोकप्रियतेने तिची दुसरी आवृत्ती मे २०१२ ला निघाली. लेखक ज्या समाजातून येतो त्या समाजाचे वर्णन त्याच्या चिंतनातून आणि निरीक्षणातून येत असते. आनंद विंगकर यांचे तिसरीपर्यंतचे शिक्षण मुंबईत झाले. सातारा जिल्ह्यातील कराड जवळचे विंग हे त्यांचे मूळगाव होय. तिसरी नंतर ते पुन्हा गावी आले. त्यांनी ग्रामीण भागात आपले पुढील शिक्षक पूर्ण केले. पुढे स्टेट बँकेत नोकरी करताना पुन्हा त्यांची बदली खटाव मान परिसरातील चितळी गावच्या शाखेत झाली. तेथेच लेखकाला या कादंबरी लेखनाची कल्पना सुचली. लेखकाने बालपणापासून ग्रामीण भाग आणि तेथील दुःख अनुभवले होते. त्यामुळेच साप्ताहिक साधनाच्या लेखात विंगकर म्हणतात की मी ज्या भूभागात राहतो, त्या पश्चिम महाराष्ट्रातील एकूण सामाजिक आणि राजकीय परंपरेचे संस्कारसुद्धा माझ्यावर झाले आहेत. शेतकरी मोठ्या संख्येने मराठा समाजात जास्त असला, तरी जमिनी इतरही जनसमूहाकडे आहेत. जसं कुंभारकी, लोहारकी, सुतारकी, म्हारकी, न्हावकी... अर्थात मराठा समाजाच्या तुलनेत कमी. अल्पभूधारकांत मोडण्याइतकी. त्यामुळे गरीब अन् भूमिहीन शेतकऱ्यांचं दुःख काय असतं ते माझ्या अनुभवातून मला माहीत आहे.[१] एरवी पश्चिम महाराष्ट्र म्हटला की एक सदन भूभाग असा मानला जातो. पण या भूभागातही दुष्काळी पट्टा मोठा असून तेथील शेतीचे प्रश्न गंभीर आहेत. या

पट्ट्यातही शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होतात. लेखकाने स्वतः तिथले वास्तव अनुभवले आहे कविवृत्तीच्या संवेदनशील कवीला कादंबरी सारखा विषय हाताळून शेतकरी आत्महत्येचा प्रश्न अधोरेखित करावा असे वाटले आणि त्यातूनच 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीचा उदय झाला. सहकार महर्षी शंकर मोहिते पाटील पुरस्कार केशवराव कोठावळे पुरस्कार असे सन्मान लाभले आहेत.

कादंबरीचे कथानक एकूण सहा दिवसाचे असून त्या अवधीतच ही कादंबरी पूर्ण होते. यशवंत पवार हा या कादंबरीतील आत्महत्याग्रस्त शेतकरी आहे. चांगल्या मार्कांनी बारावी पास झाल्यानंतर ही भावासाठी त्याला शिक्षण अर्धवट सोडावं लागलं. शेतीकडे लक्ष देण्यासाठी त्याने पुढील शिक्षण घेतलं नाही. पुढे पार्वतीशी त्याचा विवाह झाला. त्यानंतर उषाचा जन्म त्यानंतर निस्तेज दीपक जन्माला आणि तसाच गेला. यशवंताला मुलगा हवा होता पण आशा आणि नकोशी या दोन मुलीच त्यांच्या पोटी आल्या. मुलगा जन्मावा या हट्टा पोटी पुढे त्यांनी आपल्या पत्नीचे तीन ते चार वेळा अबॉर्शन केले. त्यात पार्वतीचे खूपच हाल झाले. मुलगा नसल्याने यशानाना सुरुवातीपासूनच नाराज असतो. त्यातच नापिकी आणि कर्जाच्या बोजाने तो हतबल होत चाललेला असतो. जीवनात पुन्हा पुन्हा संघर्ष करत निसर्गाशी दोन हात करत असतो. मुलगा नसल्याची सल त्याच्या स्वभावातून सातत्याने व्यक्त होत होती. पुढे कुत्र्याने यशानानाने पाळलेल्या बोकडाची मान तोडली. तेथून पुढे त्या कुत्र्यावर सूड उगवण्यासाठी यशाननाने मृत बोकडाला तणनाशक लावले.त्यातूनच अनेक कुत्री आणि बहुसंख्य कावळे मृत्युमुखी पडले. त्यानंतर सुरू झालेला अवकाळी पाऊस थांबायचे नाव घेईना.कथानकाला निराशेची झालर लावण्यात लेखक यशस्वी झाला आहे. अवकाळी पावसाच्या दरम्यान यशानानाच्या कृतीने मृत्युमुखी पडलेली कुत्री आणि कावळे गावात चर्चेचा विषय होतात. यशानानावर सूड उगवण्यासाठी कावळ्यांकडून होणारा हल्ला, हाताशी आलेला बोकड मेल्याने आणि सावकार आणि पतसंस्थेच्या कर्जातून मुक्त होण्यासाठी गरजेचा असणारा शाळू भिजल्यामुळे इशानानाच्या जीवनात निराशा दाटते. निराशेचे ढग इतके गडद होतात की त्यातून आशेचे किरणही नष्ट होतात. इकडे बालपणापासून सुभाषवर प्रेम करणारी उषा सुभाषसोबत पळून जावे की रहावे? या द्विधा मनस्थितीत असते. यशानानाच्या मनात दाटलेले निराशेचे ढग गडद होत जातात आणि त्यांच्या आत्महत्येच्या विचाराला बळ मिळत जाते. शेवटी यशानाना पार्वतीलाही आपल्याबरोबर आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतात. शंकर सावकाराचं कर्ज आणि पतसंस्थेचे कर्ज आपल्याला कधीच भरता येणार नाही. शंकर सावकार घरात घुसून आपली जमीन आपल्या नावावर करून घेईल. तेव्हा तू ही माझ्यासोबत चल असं म्हणून यशानांना कीटकनाशक पितात, तेच पार्वतीही घेते यशानानाचा यामध्येच अंत होतो तर पार्वतीला दवाखान्यामध्ये मायणीला उपचार होत नाही म्हणून कराडला हलवलं जातं व तिथे तिचा अंत होतो. इकडे शंकर सावकार उषा पळून जाणार होती म्हणूनच दोघांनी आत्महत्या केल्याची अफवा पसरवतो. यशवंताचा भाऊ विलास मुलींना आधार देण्याचा प्रयत्न करतो. पुतण्या विश्वास तर या तिघींवर अंतकरणापासून प्रेम करताना दिसतो. प्रसाद कुलकर्णी, पगम वाघमारे, दिलीप तिघे मिळून शंकर सावकाराविरुद्ध बातमी देतात. त्यामुळे शंकर सावकार अटक होतो. त्याचा मोठा भाऊ विलाससी चर्चा करून शंकर सावकारला सोडवतो. आई-वडिलांच्या निधनामुळे उषाला सारी कुटुंबाची जबाबदारी घ्यावी लागते. तिच्यावर अकाली प्रौढपण घेण्याची वेळ येते. सुभाषवर असणारे आपले प्रेम बाजूला ठेवून ती घरची जबाबदारी उचलते. पतसंस्थेचे लोकही विलासला थकबाकी भरण्याची विनंती करतात. विलास आपली आर्थिक स्थिती त्यांच्यासमोर ठेवतो आणि या बाकी संदर्भात निर्णय होत नाही. दुःखात हे कुटुंब एक होते. विलासला मुलींना शहरात घेऊन जावे असे वाटते पण घरी असणारी अडचण त्याच्या लक्षात येते. शेवटी सारे पुण्याला जायला निघतात. विलास, विश्वास आणि विश्वासची आई मुलींना आधार देतात. आता घर मोकळे झाल्यावर या तिघींनाच या आत्महत्याग्रस्त घरात रहावयाचे आहे. ही भीषण वास्तव वाचकांनाही अस्वस्थ करते. शेवटी उषा या घरातील मोठी मुलगी म्हणून आपल्या दोन बहिणींची जबाबदारी घेण्यास सज्ज होते. वडिलांच्या जागी निसर्गाशी दोन हात करण्यासाठी आणि जीवन संघर्षासाठी ती आपली मानसिकता बनवते. वैयक्तिक सुखदुःखाच्या कल्पना ती बाजूला ठेवते. खेड्यातील बदलते दुःखाचे वर्तमान या कादंबरीतून प्रकट होते. शेतकरी जीवनासंबंधी सांगताना लेखक म्हणतो, "१९९५ नंतर आरूढ झालेल्या जागतिकीकरणाचे अनिष्ट परिणाम भारतीय उद्योग, शेती, शिक्षण आणि आरोग्यावर प्रकर्षाने दिसू लागले. बदलते तंत्रज्ञान, अनिर्बंध बाजार, सर्वस्वाहा चंगळवाद यामुळे गरीब-श्रीमंतात कमालीची विषमता आणि पर्यावरणाचा ऱ्हास जगभर दिसू लागला. यांतच बेभरवशी मान्सून, न परवडणारी आणि अनियमीत वीज, शेतीमालाचे असमतोल भाव, मोडीत निघालेली कल्याणकारी योजना, त्यामुळे शिक्षण आणि आरोग्य सर्वसामान्य लोकांसाठी अधिक महाग झालं. सार्वजनिक वितरण व्यवस्थेची सरकारी अनास्था, गॅट व डंकेलमुळे बियाणं, खतं, अन् किटकनाशकाबाबत वाढलेलं परावलंबित्व. या सर्व कारणांधून पंजाब, हरियाना, महाराष्ट्र,

कर्नाटक, आंध्र प्रदेशात लक्षावधी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आपल्या महाराष्ट्रात लाखभर लोकांनी जगण्याचा मूलभूत अधिकार नाकारून व्यवस्थेच्या विरोधी मूक निषेध नोंदविला.''²

या कादंबरीतूनच शेतकऱ्यांनी आत्महत्या करून हाच निषेध नोंदवल्याचे दिसते. आनंद विंगकर यांच्या या कादंबरीने ग्रामीण भागातल्या खूप मोठ्या जीवन वास्तवाला प्रकट करताना ग्रामजीवनाचा मोठा हवा का आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे.

या कादंबरी संदर्भात डॉ. रणधीर शिंदे असे म्हणतात की, ''आनंद विंगकर यांच्या या कादंबरीचा लक्षणीय विशेष म्हणजे तीमधून प्रकटलेला जीवनार्थ. हा जीवनार्थ एकारलेला एकरेषीय स्वरूपाचा नाही. तो व्यापक अशा सहनानुभवाचा आहे. समकाळातील गावगाडा आणि त्यातील साऱ्या व्यवस्थेकडे एकांगाने पाहण्याची ही जीवनदृष्टी नाही. तर ती तिच्यामधील सर्व अंतर्विरोधासह समग्रतेने पाहणारी दृष्टी आहे. जात, समाजव्यवस्था, लिंगव्यवस्था यांकडे समग्रपणाने पाहण्याची दृष्टी या लेखकाच्या संवेदनशीलतेत आहे. वर्तमानातील काळवंडलेल्या विपरित दुष्टचक्राचेच केवळ ती कथन करत नाही; तर ग्रामीण जीवनात वर्षानुवर्षे झिरपत आलेल्या माणसाला तगून ठेवणाऱ्या जीवनदायी प्रेरणांचा विचार ती करते.''³ ग्रामीण जीवनातली वर्षानुवर्षे असणारे दुःख एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाताना दिसते. दुःखाचे स्वरूप मात्र तेच आहे. व्यापक जीवनात घेऊन ही कादंबरी प्रकटते. ग्रामस्तरावरील बहुरेशीय जीवन संबंधांची मांडणी करणारी ही कादंबरी आहे.

वरवर ही कादंबरी शेतकरी आत्महत्येचे चित्रण करत असली तरी ग्रामस्तरावरील अधोरेखित झाले आहेत. २१ व्या शतकातील कृषीजीवन, शेती, शेतकरी आणि त्यांचं कुटुंब, ग्राम स्तरावरील व्यामिश्र संबंधातून अन्यायाविरुद्ध लढतानाही येणाऱ्या अडचणी या विविध प्रश्नांची मांडणी या कादंबरीतून आली आहे. कादंबरी चा छोटासा पट ठेवून थोड्या कालावकाशात अनेक प्रश्न ठिकाण समोर ठेवण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

निष्कर्ष :

१) ग्राम स्तरावरील शेतीचे बिघडलेले अर्थकारण या कादंबरीच्या केंद्रस्थानी असल्याने एकविसाव्या शतकातील शेतीविषयक शासकीय धोरणांचा परिणाम शेतकऱ्यावर कसा झाला आहे हे समजते.

२) शेतकरी आत्महत्येस का प्रवृत्त होतो हे समजते.

३) एकाच कुटुंबातील शहरात राहणाऱ्या आणि ग्रामस्तरावर राहणाऱ्या भावांमधील आर्थिक स्तर समजण्यास मदत होते.

४) ग्रामस्तरावर असणाऱ्या [illegible]च्या अपुऱ्या सुविधांमुळे शेतकऱ्याचे प्राण वाचण्याऐवजी जातात याचे वास्तव चित्रण येथे आले आहे.

५) मुलगा हा वंशाचा दिवा आहे ही मानसिकता ग्रामीण भागात एकविसाव्या शतकातही मूळ धरून असल्याचे दिसते.

६) शेतकऱ्याला अपुऱ्या असणाऱ्या आर्थिक सुविधा कादंबरीतून व्यक्त होतात.

७) शासकीय पातळीवरून पुरेशी आर्थिक मदत न लाभल्याने शेतकरी व्यापारी बँका व खाजगी सावकाराकडे वळतो ज्यामुळे त्याच्या जीवनाचा अंत होतो.

८) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांनाही शासनाची मदत वेळेवर पोहोचत नाही त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचे कुटुंब ही वाऱ्यावर पडते.

९) ग्रामीण भागातला खाजगी सावकार शेतकऱ्याच्या जमिनीचे लचके तोडताना दिसते आहे. त्याचबरोबर त्यांच्या स्त्रियांच्याकडेही वाईट नजरेने बघताना दिसतात.

१०) ग्रामीण भागात शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा आणि रोजगाराच्या अपुऱ्या सुविधांमुळे येथील शिक्षणाचा आणि तरुणाईच्या हाताला काम नसल्यामुळे व्यवस्थेचा बोजवारा उडताना दिसतो.

११) शेतकऱ्याच्या आत्महत्या नंतर त्याच्या मोठ्या मुलीला अकाली प्रौढत्व घ्यावे लागते आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळावी लागते.

१२) ग्रामीण भागात सावकारी पास शेतकऱ्याचा गळा आवडताना दिसतो तर सर्वसामान्य माणसाकडून मदत होताना दिसते.

१३) शेतकरी आपली शेती विकणे म्हणजे गुन्हा समजताना दिसतो. त्यापेक्षा तो मृत्यूला जवळ करताना दिसतो.

१४) ग्रामीण भागात आजही जातीपातीचे बंध घट्ट असल्याचे दिसून येते.

१५) बळी तो कान पिळी ही प्रवृत्ती ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते. ज्यामुळे शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान होते.

संदर्भ :

१) आनंद विंगकर, साप्ताहिक साधना, १२ जानेवारी २०१३

२) आनंद विंगकर, साप्ताहिक साधना, १२ जानेवारी २०१३

३) डॉ. रणधीर शिंदे, समकालीन दुष्टचक्राचे अंतर्भेदी चित्रण, साप्ताहिक साधना १२ जानेवारी २०१३.

■■■

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPA
COLLEGE OF ARTS & COM.PA
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratn

UGC CA LISTED
ISSN).2394-59

संशोधक

• वर्ष : ९० • डिसेंबर २०२२ • पु ी विशेषांक १


75
आ ा ी का
अ त महोत्सव

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

॥ संशोधक ॥

पुरवणी अंक १० – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

- शके १९४४
- वर्ष : ९०
- पुरवणी अंक : १०

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

- डॉ. प्रमोद एस. मेश्राम
- डॉ. बळवंत टी. दाभाडे
- डॉ. मनोहर आर. कोंडागुर्ले

* प्रकाशक *

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१. २१ व्या शतकातील बौद्धांचे सांस्कृतिक परिवर्तन : विशेष संदर्भ दक्षिण कोकण
- डॉ. प्रमोद एम. जाधव १

२. २१ व्या शतकातील कविता : एक अभ्यास
- डॉ. बळवंत तुकाराम दाभाडे १४

३. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधून येणारे एकविसाव्या शतकातील शेतीचे प्रश्न
- डॉ.विकास शंकर पाटील २०

४. भारतातील नक्षलवादी चळवळीची समस्या : एक अभ्यास
- डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील २३

५. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर उद्योग : ग्रामीण विकास आणि समस्या
- कु.वनिता देवगोंडा पाटील --२७

६. २१ व्या शतकातील पर्यटन - Tourism
- डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले --३२

७. २१ व्या शतकातील आदिवासींची राजकीय स्थिती
- डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे-गणवीर --३८

८. २१ व्या शतकामध्ये गीताचार्य तुकारामदादा यांनी राबविलेली गावगणराज्य चळवळ : एक ऐतिहासिक अध्ययन
- प्रिती पारस ठिकरे, डॉ. नंदकिशोर पी. मने --४३

९. भारतीय ग्रंथालये : एक ऐतिहासिक आढावा
- सौ. जिरगे आशा चंद्रशोक --४७

१०. माहिती तंत्रज्ञानाचे बदलते स्वरूप आणि २१ शतकातील आधुनिक ग्रंथालये
- डॉ. शशिकांत वसंतराव वानखडे --५१

११. शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीने आजच्या काळात ऐतिहासिक पर्यटन स्थळांचे महत्त्व
- डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव --५५

१२. २१ व्या शतकातील महाराष्ट्रातील वाढते शहरीकरण : एक अभ्यास
- प्रा.डॉ. देविदास विक्रम हारगिले --६०

१३. महिला सक्षमीकरणात महिला आर्थिक विकास महामंडळाचे योगदान – एक अध्ययन
- मंगला दुर्गादास बनसोड, डॉ. उषा खंडाळे --६५

१४. बदलत्या शिक्षण प्रवाहात ग्रामीण भागातील शालेय बालकांच्या बौद्धिक क्षमतेचे अध्ययन
- सौ. मेघा मोहन सतकंटीवार, डॉ. माधुरी नामदेव फोकोडे --७१

२१ व्या शतकातील बौद्धांचे सांस्कृतिक परिवर्तन : विशेष संदर्भ दक्षिण कोकण

डॉ. प्रमोद एस. मेश्राम
प्रभारी प्राचार्य / सहयोगी प्राध्यापक
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल
ता. राजापूर जिल्हा रत्नागिरी ४१६७०४
मो.नं. ९४०४७७४४९९,७२७६१४०६३५, pramodmeshra@gmail.com

सारांश :

भारतीय समाजात अस्तित्वात असलेल्या नानाविध प्रकारच्या असमान विचार परंपरेमुळे समाजातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समूहाला नानाविध प्रकारच्या अत्याचारांना बळी पडावे लागले. नानाविध प्रकारच्या अटीमुळे त्यांचे जीवन नरकयातने समान झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना बौद्धधम्माची दीक्षा दिली त्यामुळे त्यांच्या सर्वांगीण जीवनात परिवर्तन दिसून येऊ लागले. या बौद्धधम्म दीक्षेमुळे अस्पृश्य समाज हिंदू संस्कृतीच्या विषमताग्रस्त पाशातुन मुक्त झाला आणि बौद्धधम्म स्वीकारामुळे बौद्ध संस्कृतीच्या गगनात मुक्तपणे विहार करू लागला. बौद्धधम्म दीक्षेच्या नंतर पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांनी लगेचच आपल्या घरातील देव-देवतांचे विसर्जन केले व पूर्वाश्रमीच्या रूढी परंपरांना तिलांजली दिली. बौद्धधम्माचा स्वीकार केल्यामुळे आत्मसन्मान त्यांच्यात निर्माण झाला. गावकीची व परंपरागत कामे त्यांनी करण्याचे सोडून दिले. न्यूनगंड गळून पडला. पुढे जाण्याची जीद्द व ताकद त्यांच्यात निर्माण झाली. ज्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला नाही ते लोक आजही महार म्हणून जीवन जगत असल्याचे दिसून येते.

२१ व्या शतकात धम्मदीक्षित बौद्धांमध्ये एवढे परिवर्तन झाले याचे मूल्यमापन समाजातील इतरांनीही करायला सुरुवात केली त्यामुळेच इतर समाजातील लक्ष्मण माने, हनुमंत उपरे व नागपूर येथे नुकत्याच झालेल्या बौद्धधम्म दीक्षेच्या समारंभात आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्मगुरू भदंत नागार्जुन सुरेई ससाई यांनी ५ ऑक्टोबर २०२२ रोजी पन्नास हजार बहुजनांना बौद्धधम्माची दीक्षा दिली. बौद्धधम्मात असलेल्या समतानिष्ट मुल्यामुळेच समाजातील इतरांनाही आज एकविसाव्या शतकात बौद्ध धम्माचे महत्व समजायला लागले. ही धम्मक्रांतीची फलश्रुती आहे. भारतात सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोनातून अनेक सामाजिक चळवळी झाल्या त्यामध्ये सर्वात महत्वपूर्ण बौद्धधम्म दीक्षेची चळवळ मानली जाते. त्यामुळे अनेकांना माणुसकीयुक्त जीवन जगण्याची संधी प्राप्त झाली.

कीवर्ड : बौद्ध, सांकृतिक परिवर्तन, कोकण, संघटना

प्रस्तावना :

संपूर्ण जगामध्ये भारतीय संस्कृतीला महान संस्कृती म्हणून गणल्या जाते. भारताचा प्रगत इतिहास सिंधू संस्कृतीपासून सुरु होतो. त्यानंतर वैदिक संस्कृती आर्यांनी विकषित केली. इ. स. ६ व्या शतकात गौतम बुद्धांनी बौद्ध धम्माची स्थापना केली. त्यानंतर हळूहळू बौद्ध संस्कृती विकषित झाली ही संस्कृती साधारणत: बाराव्या शतकापर्यंत अस्तित्वात होती या कालावधीपर्यंत ज्यांनी-ज्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केलेला होता त्यांच्यावर बौद्ध संस्कृतीचा प्रभाव निर्माण झाल्याचे दिसून येते. वैदिक आणि इस्लामी संस्कृतीने बौद्ध संस्कृतीच्या विरोधात प्रतिक्रांती करून बौद्ध संस्कृतीचा ऱ्हास केला. त्यामुळे बौद्ध संस्कृतीच्या प्रतीकांचा व घटकांचा ऱ्हास झाला, तरीही बौद्ध संस्कृती टिकून होती. यासंबधी गेल ऑम्वेट म्हणतात, ‘कला व स्थापत्यशास्त्र स्पष्टच सांगतात की, एक सहस्त्रकाहूनही अधिक काळ तो बऱ्हंशी बौद्ध होता. अगदी सुरुवातीच्या काळातील धार्मिक स्थापत्य बौद्ध होते. त्यापैकी विहार, स्तूप, चैत्य, सभागृहे आणि मठ असलेल्या गुंफा, मूर्ती असे बरेच काही काळाच्या ओघात टिकून राहिले.''[1] (गेल, २००३) प्रतिक्रांतीत बौद्ध संस्कृतीचे लिखित साहित्य नष्ट करण्यात आले. बौद्ध भिक्खूंची हत्या करण्यात आली. काही मोजके भिक्खू स्वत:चा जीव वाचविण्यासाठी देशाबाहेर गेले. त्यामुळे भारतातील बौद्ध धम्माचा ऱ्हास झाला. त्यामुळे समाजातील अस्पृश्यांना बौद्ध धम्माच्या स्वीकारापर्यंत गुलामगिरी युक्त जीवन जगावे लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ व १६ ऑक्टोबर रोजी नागपूर व चंद्रपूर या ठिकाणी पूर्वाश्रमीच्या आठ लाख अस्पृश्यांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. यामुळे २५०० वर्षापूर्वी भारतात अस्त्त्वित्वात असलेल्या बौद्ध धम्माला नवसंजीवनी मिळाली. त्यामुळे हळूहळू बौद्धांनी आपल्या जीवनामध्ये बौद्ध संस्कृतीचे आचरण करायला सुरुवात केली. याबाबत लेंडे म्हणतात, महिंद

संस्कृती हीच केवळ भारतातील एकमेव व अद्वितीय संस्कृती असा गदारोळ करणाऱ्या इतिहासकारांसमोर बाबासाहेबांनी बौद्ध संस्कृतीचे मॉडेल उभे केले. अडीच हजार वर्षापूर्वी गौतम बुद्धाने वैदिक ब्राह्मणी समाजासमोर जे मूल्य संघर्षाचे सांस्कृतिक आव्हान उभे केले होते तेच आव्हान बाबासाहेबांनी पुन्हा एकदा विसाव्या शतकात प्रस्थापित धर्म संस्कृतीसमोर उभे केले. बाबासाहेबांचे हे धार्मिक आणि सांस्कृतिक आव्हान प्रस्थापित धर्ममार्तंडास दिङ्मुढ करणारे आणि बौद्ध समाजास दिशाभान देणारे ठरले. बौद्ध धम्म स्वीकारामुळे या शोषित-वंचित वर्गाला समतानिष्ठ धम्म संस्कृतीचे नव बळ प्राप्त करता आले. बाबासाहेबांचा सामूहिक धम्मस्वीकार ही घटना सांस्कृतिक बदलाच्या संदर्भात क्रांतिकारक घटना ठरली. या धर्मांतरामुळे अस्पृश्य समाज हिंदू संस्कृतीच्या विषमताग्रस्त पाशातून बाहेर आला आणि धम्मस्वीकारामुळे समतावादी बौद्ध संस्कृतीच्या गगनात मुक्त पद्धतीने विहार करू लागलाफ (शैलेश, २००७)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्वाश्रमीच्या महारांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली व त्याचबरोबर बौद्ध संस्कृतीही दिली. ज्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला, अशा संपूर्ण बौद्ध समाजामध्ये तेव्हापासूनच परिवर्तनाची चळवळ निर्माण होऊन आज २१ व्या शतकात देखील भारतातील बौद्धांमध्ये आमुलाग्र परिवर्तन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बौद्ध धम्म दीक्षेमुळे घडून आले. तसेच परिवर्तन दक्षिण कोकणातील बौद्धांमध्येही घडून आल्याचे दिसून येते.

उद्देश :

१. दक्षिण कोकणातील पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांच्या स्थितीचे अवलोकन करणे.

२. कोकणातील पूर्वाश्रमिच्या अस्पृश्यांच्या स्थितीत बौद्ध धम्माच्या स्वीकारानंतर कशाप्रकारे परिवर्तन झाले हे अधोरेखित करणे.

३. कोकणातील पूर्वाश्रमिच्या अस्पृश्यांमध्ये झालेले परिवर्तन हा बौद्ध धम्म दीक्षेचा परिणाम आहे का याचा शोध घेणे.

पूर्वाभ्यास :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली या घटनेला जागतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे स्थान आहे. त्यामुळेच अनेक विदेशी संशोधकानी यावर संशोधन केले. डॉ. इलिनार झेलियट यांच्या मतानुसार मपूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांनी बौद्ध धम्माच्या स्वीकारानंतर स्वतःला दलित समजत असत.फ अडीले फिस्के यांच्या मते ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात बौद्ध धम्माची दीक्षा घेत[illegible]नी हिंदू धर्मातील परंपरांचा त्याग केल्याचे आपल्या संशोधनातून मांडले. टी. एस. विल्किन्सन यांनी आपल्या संशोधनातून निष्कर्ष काढला की, अस्पृश्यांनी बौद्ध धम्माच्या स्वीकारानंतर घाणेरडे काम करणे सोडून दिले. दीपककुमार सामंता यांच्या मतानुसार ज्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला त्यांच्यात स्वाभिमान आणि आत्मसन्मान निर्माण झाला. याशिवाय भारतातील किंबहुना महाराष्ट्रातील संशोधकांनी बौद्ध धम्म स्वीकारलेल्या समूहावर वेगवेगळ्या अंगाने संशोधन करून त्यांच्यात आलेले परिवर्तन म्हणणे त्यामध्ये नमूद केलेले आहे.

कोकणातील अस्पृश्यांची स्थिती :

प्राचीन काळापासून ते बौद्ध धम्माच्या दीक्षेपर्यंत भारतातील अस्पृश्यांची स्थिती नरकयातने पेक्षाही अतिशय वाईट होती अस्पृश्यतेमुळे अस्पृश्यांचे जीवन हलाखीचे होते. देशातील इतर भागापेक्षा कोकणात अस्पृश्यता फार मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती यासबंधी खानापूरकर म्हणतात, 'सर्व अस्पृश्यात हिंदू समाजाकडून जास्तीत जास्त हाल व अपमान झाले असतील तर ते महारांचे. पेशवाईच्या वेळेस त्यांच्यावर गळ्यात मडके बांधून फिरण्याची सक्ती होती व गावात जर ब्राह्मण समोर दिसला तर तो त्यांच्या छायेने अपवित्र होऊ नये म्हणून यांना जमिनीवर पालथे पडण्याचा हुकुम होता. इतकेच नव्हे तर, जमिनीवर पडलेल्या यांच्या पावलांच्या खुणांनी ब्राह्मण अपवित्र होऊ नये म्हणून यांना काटेरी झुडूप मागे घेऊन हिंडावे लागे व त्या झुडूपाने आपल्या पावलांचा भाग पुसून टाकावा लागे.'' (खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड २ , २००२)

प्राचीन काळापासून कोकणात महारांचे वास्तव होते. कोकणच्या विकासामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भर टाकली याबाबत खैरमोडे म्हणतात, 'महारांच्यावर आर्यांच्या प्रथम स्वाऱ्या झाल्या. त्यानंतर मुसलमानादी आर्येतरांच्या स्वाऱ्या झाल्या. महार हे त्यांचे गुलाम झाले. या स्वाऱ्याच्या हमल्यातून निसटून जे महार घाटावरून कोकण तळावर गेले, तेथे त्यांनी वसाहती स्थापन केल्या. त्यांनी कला कौशल्याची कामे केली. त्यांच्यात उच्च दर्जाचे कलाकार, व्यापारी, यौद्धे व राज्यकर्ते उत्पन्न झाले. कोकणच्या महारांनी सोने, चांदी, तांबे, इत्यादी धातूंची पैदास कशी करावी याबद्दलचे शोध लाऊन या धातूंच्या जंगी खाणी कोकणात निर्माण केल्या. सिंहलद्वीप, अरबस्थान, इराण इत्यादी देशांशी त्यांचा व्यापार सुरु होता. दर्यावर्दीपणात त्यांनी आपले नैपुण्य प्रस्थापित केले. व्यापारी व लढाऊ जहाजे तयार करण्यात ते अग्रेसर होते. त्यांची व्यापारधंद्यात जी भरभराट झाली व त्यांची जी छोटी-छोटी राज्य झाली, ती पाहून महारांना नष्ट

KHAPANE COLLEGE OF ARTS … PACHAL

करून तेथे आपली वस्ती स्थापन करण्याची चळवळ चित्पावन ब्राह्मणांचा पुढारी परशुराम यांनी क्षत्रीयांना हाताशी धरून केली. तरीही महार टिकाव धरून कोकणात राहिले. युरोपियन व्यापाऱ्यांनी हिंदुस्थानात आपल्या वसाहती केल्यावर हिंदी कारागिरांचे अंगठे कापून त्यांची कलाकौशल्याची कामे नष्ट केली. त्याचप्रमाणे वसाहत वाल्यांनी कोकणच्या महारांचे कलाकौशल्य व व्यापार नष्ट केले. महार स्वतःच्याच मालकीच्या जमिनीत व खाणीत मजूर म्हणून काम करू लागले. शेवटी बहामनी राज्याच्या काळात महारांना मुसलमानी अधिकाऱ्यांना आपल्या सोन्याच्या खाणी द्याव्या लागल्या. त्यामुळे महार हे घाटावर व कोकणात परक्यांचे गुलाम झाले.[४] (खैरमोडे, डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड २, २००२)

महार हा कलावंत, कलाकार होता. परंतु त्यांची कलाकौशल्याची कामे नष्ट करण्यात आली. त्यामुळे ते दुसऱ्यांचे गुलाम बनले. जे त्यांनी महारांवर वेगवेगळ्या तऱ्हाच्या अटी लादून त्यांना गुलामीचे जीवन जगायला भाग पाडले. महार हे हीन अवस्थेपर्यंत कसे पोहचले. याबाबद कठारे म्हणतात, 'महार हे राजकीय पराभवातून हीन अवस्थेत जाऊन पोहचले व अस्पृश्य बनले. कोकण हा प्रांत मुळात महार, मांग, भिल्ल, कोळी, ठाकूर व कोंग या लोकांचा होता. परंतु कदंबांनी महारांचा व मांगांचा व मौर्यांनी कोळ्यांचा पराभव करून त्यांची राज्ये जिंकून घेतली. त्यामुळे या भूमीचे भूमिपुत्र असणारे महार बेवारस झाले."[५] (अनिल, २००९) यासारख्या अनेक कारणामुळे या भूमीचे भूमीपुत्र असणारे महार बेवारस झाले ते बौद्धधम्म दीक्षा घेईपर्यंत.

देशाच्या व महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून महारांचा विचार केल्यास कोकणातील महारांची स्थिती दयनीय, हलाखीची व गुलामगिरीची होती. याचे मुख्य कारण कोकणात कट्टर जातीव्यवस्था अस्तित्वात होती. कोकणातील महार व चांभारांना गावाच्या प्रशासनात महत्त्वाची कामे होती. परंतु त्यांना जाती व्यवस्थेच्या बंधनात अडकवून ठेवले होते. त्यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी असली तरी कामाचा मोबदला बलुत्याच्या स्वरुपात मिळत असे. याशिवाय सकाळी व संध्याकाळी दारोदार जाऊन शिळ्या, उष्ट्या ओल्या अन्नाची भीक मागण्याच्या अधिकार होता. त्यांना विना मोबदल्याच्या हेतूने गुलाम म्हणून वागविले जात होते. महारांची घरे इतर समाजापेक्षा उंचीला कमी होती घरात फक्त गरजेसाठी आवश्यक असणारे सामान होते. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही गावाच्या प्रशासनात कामे करावी लागत असत. याबाबत पवार उर्मिला म्हणतात, 'महारात काहींना कोतवाली वतने होती. काहीजण ही वतने सांभाळीत, वाट्टेल ते काम करावे लागे. जळणाला लाकूड फोडण्यापासून ते मयताला लाकडे फोडून रचण्यापर्यंत. पुरुष नसतील तेव्हा स्त्रियांना हे काम करावे लागे मग ती म्हातारी असो, बाळंतीण असो वा आजारी असो."[६] (पवार, १९८९)

इतर समाजातील लोकांपेक्षा महारांचा पेहराव वेगळा होता. त्यामुळे ते स्पष्ट ओळखले जात असत. महारीण स्त्रियां उरपाटी पद्धतीने लुगडे नेसत असत. परंतु त्या डोक्यावर पदर घेत होत्या. इतर समाजातील स्त्रिया डोक्यावर पदर घेत नव्हत्या. कोकणात महारांची 'भावकी' ही संघटना भक्कम होती. त्यांच्यात एकोपा, जिव्हाळा व प्रेम होते. या भावकीमार्फत लग्न जुळवले जात असे. लग्न जमविण्यासाठी 'ठासणीचा' कार्यक्रम होत होता. 'ठासणीच्या' दिवशी बसलेल्या प्रमुख लोकांचा शब्द म्हणजे एक प्रकारचा अलिखित पक्का करार होता. कोकणात महारांची लग्ने आषाढ महिन्यातच हो असत याबाबद खैरमोडे म्हणतात, 'आषाढात कोणत्याही हिंदू जातीची लग्ने होत नाहीत. परंतु महारांची लग्नसराई आषाढात असते. ह्या महिन्यात महारकीचे काम फारसे नसते. म्हणून समस्त गावकऱ्यांच्या सोईने हा महिना महारांना लग्न कार्यासाठी काढून दिला असावा."[७] (खैरमोडे, २००३) महारांचे लग्न ब्राह्मण, पुरोहित किंवा इतर जातीचे लोक लावीत नसत. त्यांची लग्ने लावण्यासाठी त्यांच्याच जातीतील एका व्यक्तींची नेमणूक ते करीत असत त्याला 'गुरू' किंवा 'मारेजोशी' असे संबोधित असत. या लग्न लावणाऱ्या लोकांची नावे आजही 'जोशी' अशी पडलेली आहेत. लग्नानंतर मटणाचे जेवण दिले जात असे. घरात बाळाचा जन्म झाला की तिकोंडी, पाचवी व नंतर बारसे केले जात असे. सुवेर आणि सुतक पाळले जात होते. कोकणातील नाव्ही महारांचे केस कापीत नसत त्यामुळे त्यांचेच लोक केस कापीत असत.

समाजातील उच्चवर्णीयांची सेवा फुकटात करावी लागत असे. त्यामुळे हक्काने शिळे अन्न मागण्याची त्यांना सवय होती. यासारख्या अनेक कारणांमुळे त्यांच्यातील स्वाभिमान, मान-मरातब नष्ट झाला होता. कोकणातील काही गावामध्ये स्पृश्यांची हॉटेल होती त्यामध्ये महारांना प्रवेश नव्हता. पाणी किंवा चहा प्यावसा वाटला तर डोलग्यात ठेवलेल्या नारळाच्या करवंटीमधून त्यांना चहा दिला जात होता. स्पृश्य समाजातील लोकांच्या लग्नासाठी ते गेल्यास त्यांना गुरांच्या गोठ्यात हजर रहावे लागत असे. लग्नासाठी उपस्थित असलेल्या लोकांना सुरुवातीला कोरडा शिधा दिला जात होता, मात्र काही कालानंतर त्यांना गोठ्यातच जेवण दिले जात असे. कोकणातील महार वतन, खोती, वेठबिगारी, यासारख्या अनेक कारणांमुळे महारांचा आर्थिक विकास झाला नाही. महार समाजातील लोक चोरी करीत नसत, मात्र अंधश्रद्धेत महार समाजातील लोक गुंतलेले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ

अस्पृश्यांच्या जीवनात सर्वांगीण परिवर्तन व्हावे यासाठी अनेक संत, महात्म्यांनी प्रयत्न केले असे जरी असले तरी त्यांनी केवळ स्पृश्य समाजाच्या मतपरिवर्तनावर भर दिला होता. [illegible] ज्योतिबा फुलेंनी उच्चवर्णीयांच्या विरुद्ध बंडाचा मार्ग [illegible] त्यांच्यापासून गोपालबाबा वलंगकरांनी प्रेरणा घेऊन [illegible] यांनी अस्पृश्योद्धाराच्या कार्याला सुरुवात केली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांची चळवळ आपल्या हातात घेऊन अस्पृश्यांच्या चळवळीत नवा उत्साह निर्माण केला. समाजात समता प्रस्थापित व्हावी हा उद्देश घेऊन महाड येथे पाण्यासाठी सत्याग्रह केला. नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करण्याचा सत्याग्रह केला. पुणे येथील पार्वतीचा सत्याग्रह, अमरावतीचा सत्याग्रह व मुखेड सत्याग्रह केले. शेवटी स्पृश्य समाजात समता प्रस्थापित होत नाही असे दिसल्यावर १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथे ते म्हणाले. 'दुर्दैवाने अस्पृश्य हिंदू असा डाग घेऊन मी जन्माला आलो, पण ती गोष्ट माझ्या स्वाधीन नव्हती. तथापी, हा नीच दर्जा झुगारून देऊन ही स्थिती सुधारणे मला शक्य आहे आणि मी ते करणारच याबद्दल मुळीच संशय नको. मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की, हिंदू म्हणवून घेत मी मरणार नाही.'[४] (मून, २००२)

धर्मांतराच्या घोषणेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील सर्व धर्मांचा कसून अभ्यास केला. बौद्ध धम्मात अस्तित्त्वात स्वातंत्र्य, समता, बंधुता अश्या मानवी मूल्यांमुळेच त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करण्याचे निश्चित केले. नागपूर व चंद्रपूर येथे १४ व १६ ऑक्टोबर १९५६ साली आपल्या लाखो अनुयायासमवेत बौद्ध धम्माचा स्वीकार केला. या घटनेला जागतिक दृष्टिकोनातून ऐतिहासिक महत्त्व आहे.

बौद्धांचे सांस्कृतिक परिवर्तन :

भारतावर अनेक परकीयांनी आक्रमणे केली त्यामुळे भारतीय बौद्ध संस्कृतीतील काही प्रतीकांचा व घटकांचा ऱ्हास झाला असल्याचे आपल्याला दिसून येते. तरीही काही अंशी बौद्ध संस्कृती टिकून होती. याबाबद गेल ऑम्वेट म्हणतात, 'कला व स्थापत्यशास्त्र असे स्पष्टच सांगतात की, एक सहस्रकाहूनही अधिक काळ तो बव्हंशी बौद्ध होता. अगदी सुरुवातीच्या काळातील धार्मिक स्थापत्य बौद्ध होते. त्यापैकी विहार, स्तूप, चैत्य, सभागृहे आणि मठ असलेल्या गुंफा, मूर्ती असे बरेच काही काळाच्या ओघात टिकून राहिले'[९] (ऑम्वेट, २००३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली त्यामुळे बौद्ध संस्कृतीला नवसंजीवनी प्राप्त झाली. त्यामुळे हळूहळू सर्वच बौद्धांनी आपल्या जीवनामध्ये बौद्ध संस्कृतीचे आचरण [illegible] सुरुवात केली. म्हणूनच असे मानले जाते की, बौद्धधम्माच्या स्वीकारामुळे शोषित-वंचित वर्गाला समतानिष्ठ धम्म संस्कृतीचे नवे बळ प्राप्त झाले. सामुहिक धम्मस्वीकार ही घटना सांस्कृतिक बदलाच्या संदर्भात क्रांतिकारक घटना ठरली हे विशेष महत्त्वपूर्ण आहे. ज्यांनी बौद्धधम्माचा स्वीकार केला त्यांनी भगवान बुद्ध व डॉ.बाबासाहेबांना केंद्रबिंदू मानून बौद्ध संस्कृती विकसित केली. याबाबत यशवंत मनोहर म्हणतात, 'बौद्धसंस्कृती माणसाला संपूर्ण मानवी व्यवहाराचे एकमेव केंद्र करणारी संस्कृती आहे. माणूस हाच जीवनाचा नायक आहे. ईश्वर, देव, बुवा अशा कोणालाही ही संस्कृती मानतच नाही.''' (यशवंत, २००९)

धम्मदीक्षित बौद्धांनी आपली जुनी संस्कृती टाकून दिली. त्यांनी बौद्ध परंपरेशी निगडीत असलेल्या अनेक बौद्ध गुंफांचा विकास केला. कोकणात अशा अनेक बौद्ध गुफांचा शोध लावण्यात आला. त्यांनी मअशोकचक्र, बोधिवृक्ष, पिंपळाचे पान, स्तूप व संचीचे तोरण, नीळा झेंडा, धम्मध्वज, नवे शब्द, आडनावे, बौद्ध संस्कृतीशी संबंधित वाडीच्या. गावाच्या नावात परिवर्तने केली, स्वतःच्या नावात बदल घडवून आणले, रामराम, जोहर मायबाप ऐवजी जयभीम या ऊर्जा देणाऱ्या नव्या परिवर्तनवादी शब्दांचा वापर कोकणातील बौद्ध समाजातील लोक करताना दिसतात.फएवढेच नाही तर बौद्धधम्म दीक्षितांनी साहित्यातून आपले अनुभव मांडायला सुरुवात केली. त्यामध्ये तानाजी खरावतेकर, वी. तु. जाधव, शांताराम नांदगावकर, डॉ. भा. ल. मुणगेकर, आ. सो. शेवरे, जानू तांबे, विनायक मिठबावकर, उर्मिला पवार, प्रा. आशालता कांबळे, प्रा. रमाकांत यादव, डॉ. श्रीकांत धारपवार, उत्तम पवार, सुनील हेतकर, प्रा. सिद्धार्थ तांबे, सहदेव कळसुलकर, प्रा. विजय जामसंडेकर, श्रीकांत जाधव, अनंत किर्लोस्कर, राजा जाधव, प्रभाकर जाधव, प्रभाकर गवाणकर, अशा अनेक बौद्ध विचारवंतानी आपल्या लेखणीतून बौद्ध व आंबेडकरी संस्कृतीशी संबंधित साहित्य लेखन केले.

दक्षिण कोकणात समाजाचे प्रबोधन व्हावे यासाठी भीम कलापथके, कव्वाली पार्ट्या, बुद्ध व भीमगीतांच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन केले. ज्यामध्ये सखाराम कोंड्गेकर, राजेश जाधव, जनीकुमार कांबळे, अंबाजी पवार, गंगाधर कोंड्गेकर, गौरीकुमार कांबळे, शांताराम गोलीपकार इत्यादींची नावे प्रामुख्याने सांगता येतात. याशिवाय बौद्ध व आंबेडकरी दिनदर्शिकांची निर्मिती आणि मूर्तीकला, चित्रकला यामध्ये अनेक बौद्ध समाजातील लोक पारंगत असल्याचे दिसून येते.

निष्कर्ष:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना बौद्धधम्माची दीक्षा दिली. बौद्ध धम्मात अस्तित्वात असलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन सूत्रांचा त्यांनी अवलंब केला शिवाय त्यांनी सांगितलेल्या मार्गांचा अवलंब केल्यामुळे बौद्धधम्म स्विकारलेल्या अनुयायामध्ये धम्मदीक्षेच्या नंतर कमालीचे परिवर्तन झाल्याचे दिसून येते. हे परिवर्तन ६६ वर्षानंतर आजही अविरत चालू असल्याचे दिसून येत आहे. एवढेच नाही तर एकविसाव्या शतकात बौद्धांच्या जीवनात सर्वच अंगाने अनेक क्षेत्रात परिवर्तन झाल्याचे दिसून येत आहे. त्यांनी गुलामगिरीची वाट सोडून परिवर्तनाच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू आहे, हे केवळ बौद्धधम्माच्या स्वीकारामुळे त्यांच्यात परिवर्तन झाल्याचे फलित आहे यात दुमत नसावे.

References :

☐ अनिल, क. (२००९). शिवकाळ व पेशवाईतील महारांचा इतिहास . पुणे : सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे.

☐ ऑम्वेट, ग. (२००३). भारतातील बौद्धधम्म (भाषांतर). नवी दिल्ली : सेज प्रकाशन इंडिया प्रायवेट लिमिटेड.

☐ खैरमोडे , च. भ. (२००२). डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड २ . पुणे : सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे.

☐ खैरमोडे. (२००३). डॉ. भीमराव रामजी आंबेडकर. पुणे : सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ, .

☐ खैरमोडे, च. भ. (२००२). डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड २. पुणे: सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ.

☐ गेल, ऑ. (२००३). भारतातील बौद्धधम्म. नवी दिल्ली: सेज प्रकाशन इंडिया प्रायवेट लिमिटेड पेज १४१.

☐ पवार, म. (१९८९). आम्हीही इतिहास घडविला. मुंबई : स्त्री-उवाच मकरंद सहनिवास.

☐ मून, न. (२००२). डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे. मुंबई : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

☐ यशवंत, म. (२००९). बौद्ध संस्कृती आणि साहित्य. नागपूर : तक्षिला प्रकाशन नागपूर.

☐ शैलेश, ल. (२००७). बौद्ध कला, साहित्य व संस्कृती : जतन व संरक्षण. द जर्नल ऑफ इंटर डीसीप्लिनरी पालीसी रिसर्च अंड येक्षण खंड १, ४३.

■ ■ ■

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane Colle
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPAN
COLLEGE OF ARTS & COM.PAC
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratna

SHRI MANOHAR HARI KHAPARE COLLEGE OF ARTS & COM. • PACHAL •

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

One Day National Interdisciplinary Conference 28 April 2023

Organized by Rayat Shikshan Sanstha'sProf. Dr. N.D. Patil Mahavidyalaya, Malkapur
(Perid)

Rayat Shikshan Sanstha's

Prof. Dr. N. D. Patil Mahavidyalaya, Malkapur (Perid)
One Day National Interdisciplinary Conference
On
Literary Trends and Issues in 21st Century

Friday, 28 April 2023

Organized by
Departments of Marathi, Hindi, English, and IQAC

Chief Editor: - Dr. Gholap Bapu Ganpat

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

यांची 'ईडत्ळमाळ, २०१२ मधील राजन गवस यांची 'ब-बळीचा, 'भुरा', 'पंगतीतले पान', 'फेसाटी', 'भिरुड', 'चारीमेरा' अशा काही कादंबऱ्यांनी वेगवेगळे प्रयोग मराठी कादंबरीमध्ये सादर केले आहेत.

समारोपीय निष्कर्ष

एकविसाव्या शतकातील नव्या कादंबरी विश्वाचा अभ्यास करताना जाणवते की नवे आशय, नवे विषय आणि त्याचबरोबर नवनव्या साहित्यिक जाणिवा घेऊन वास्तवाची कास धरून हा प्रवास हळूहळू मार्गक्रमण करीत आहे. मराठी कादंबरी विश्व येणाऱ्या काळात खऱ्या अर्थाने सर्वार्थाने समृद्ध होणार असून भविष्यकाळ हा त्याअर्थी कादंबरीसाठी सुकाळ असणार आहे. इथल्या साऱ्या आव्हानांना पुरून उरणारे मराठी लेखकमन आपण येत्या काळात पाहूच. वास्तवाला, कल्पनांना किंवा एकूणच साहित्यस्वप्नांना बळकट करणारा येणारा काळ आपण याची देहि याची डोळा अनुभवूच !

संदर्भ

१) मराठी कादंबरी समीक्षा – प्रा.डॉ. तानाजी राऊ पाटील, डायमंड प्रकाशन.

२) सानप, डॉ. किशोर, नव्वोदोत्तर मराठी कादंबरी : आविष्कार तंत्रे आणि शैली, नव्वोदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी संपादक डॉ. गजानन जाधव, अनघा आदित्य प्रकाशन, परतवाडा – प्रथम आवृत्ती : १५ ऑक्टोबर २०२१.

३) आनंद यादव : ग्रामीणता– साहित्य व वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८१

संदर्भ ग्रंथ :–

१. बारोमास – सदानंद देशमुख
२. हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ – भालचंद्र नेमाडे
३. फेसाटी – नवनाथ गोरे
४. सातपाटील कुलवृत्तांत – रंगनाथ पठारे.

⌘⌘⌘

26

एकविसाव्या शतकातील आदिवासी कविता

प्रा.डॉ.बी.टी.दाभाडे
मराठी विभाग
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य
महाविद्यालय, ता.राजापूर, जि.रत्नागिरी

****

प्रस्तावना :

आदिवासी कविता उदयाला आलेली एक नवीन सर्वस्वी विश्वाची कविता आहे असे म्हणावे लागेल. मराठी साहित्यातील कवितेच्या इतिहासामध्ये तिचे मूळ आपणाला कोठेही सापडत नाही. तिचा इतिहासच खूप वेगळा आहे. याशिवाय तिचा भूगोलही महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही. या आदिवासी कवितेचे धागेदोरे इतर प्रांतातील आदिवासी वसाहतींशी जोडले गेले आहे. आदिवासी संस्कृती ही खऱ्या अर्थाने स्वयंभू आहे असे म्हटले जाते. तिला तिचा वेगळा देव – धर्म आहे, रूढी, परंपरा व स्वत:ची वेगळी अशी समाजव्यवस्था आहे, महत्त्वाचे म्हणजे वेगळी अशी कुटुंबव्यवस्था आहे. आदिवासी कवितेची नैतिक मूल्य आहेत. या कवितेला स्वत:चे असे संगीत, चित्रकला असा समृद्ध परंपरा लाभलेली आहे. आदिवासी कवितेची स्वत:ची अशी एक भाषा आहे. आदिवासी कवितेमध्ये अनेक बोलीभाषा वापरल्या जातात. त्याचबरोबर लोकसाहित्यानेही समृद्ध झालेली कविता आहे. अशी अनेक गुणसंपन्न झालेली स्वयंभू संस्कृती आहे. अशा संस्कृतीमधून आकाराला आलेली आदिवासी संवेदनशीलता या कवितांच्या माध्यमातून अभ्यासण्याचा प्रयत्न आहे. अशा आदिवासी कवितेने या पर्वातील मराठी कविता तर समृद्ध केलेली आहे. याशिवाय मराठी कवितेच्या परंपरेत ही मोलाची भर घालून कवितेचा प्रांत समृद्ध केलेला आहे. या आदिवासी

कवितेचे असे फार मोठे ऐतिहासिक योगदान आहे यामध्ये भुजंग मेश्राम, विनायक तुकाराम, सुनील कुमरे, वाहारू सोनवणे, कृष्णकुमार चांदेकर, विठ्ठलराव गोपाळजी कन्नाके आणि बाबुराव डोमाजी आडे इत्यादी या पर्वातील महत्त्वाचे आदिवासी कवी आहेत.

आदिवासी कवींच्या कविता :

विठ्ठलराव गोपाळजी कन्नाके : विठ्ठलराव गोपाळजी कन्नाके यांच्या 'भ्रमररुजन' (२०११) या कवितासंग्रहातील कविता गीतांच्या रूपामधील पण जुन्या वळणाची कविता या कथासंग्रहामध्ये समाविष्ट केली आहे. यामध्ये गझल, लावणी, कव्वाली आहे, आणि थोडा प्रणय – शृंगारही समाविष्ट केलेला आहे. या कवितांमध्ये देश प्रेम व भारताचा अभिमान म्हणून भारत मातेची आरती ही सर्वसामान्यांचे लक्ष वेधून घेत आहे. विविधतेतून देशासाठी, समाजासाठी एकता साधणाऱ्या भारतीय संस्कृतीचा गौरव गायलेला आहे. आपल्या समाजातील, देशातील माणुसकीचा लोप पावलेला आहे याची खंत ही या कवितेत व्यक्त केलेली आहे. महाराष्ट्र सर्वगुणसंपन्न आहे त्यामुळे महाराष्ट्राच्या परंपरेचा अभिमान बाळगण्याचा प्रयत्न या कवितेने स्पष्ट केला आहे. कवीला आपल्या आदिवासी माणसांबद्दल प्रेम आहे. तिथल्या भूमीबद्दल आपल्या गावाबद्दल आत्मीयता वाटते हे ही स्पष्टपणे या कवितेत व्यक्त झालेले आहे. विशेषतः गडचिरोली जिल्ह्याबद्दल आत्मीयता अधिक गडद झालेली आहे. आपल्या माणसांबद्दल म्हणजेच आदिवासी माणसांची संस्कृती आणि त्यांचा अभिमान कवीच्या मनामध्ये आहे हे स्पष्ट दिसून येते सहकार इमानदारी प्रामाणिकपणा आणि निसर्गावरचे प्रेम या सद्गुणांवर ही संस्कृती उभी आहे असे वाटते या कवितांमध्ये गोंडवशी राजा दलपत शहा आणि राणी दुर्गावती यांचाही कवीने गौरव केलेला आहे त्याचबरोबर आदिवासींचे सुखदुःख विशेष करून जैन्य दुःखाचे चित्रण अधिक स्पष्टपणे मांडले आहे. आदिवासींच्या जीवनाकडे जर पाहिलं तर त्यांना पाणी नाही, अन्न नाही, निवारा नाही त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची झालेली परवड या कवितेने स्पष्ट केली आहे. खऱ्या अर्थाने आदिवासींची शाळांची असलेली दुरावस्था आणि शासकीय प्रवृत्तीमुळे शासकीय कारभारातील भ्रष्टाचारामुळे खऱ्या अर्थाने हा कवी व्यतीत झालेला आहे. खऱ्या अर्थाने ही कविता एका प्राथमिक शिक्षकाचे दुःख व्यक्त करणारी आहे. प्राथमिक शिक्षक म्हणून जे काय वाट्याला आलेले आहे. अपेक्षा आणि अवहेलना याची दयनीय नोंद ही या कवितेने व्यक्त केली आहे. त्याचाच अर्थ असा की या कवितेने आदिवासींची संवेदनशीलतेची मर्यादा पूर्णपणे ओलांडलेली आहे. याचे वास्तव या कवितेत मांडले आहे.

वाहरु सोनवणे : वाहरू सोनवणे हे आदिवासी कवींपैकी एक महत्त्वाचे कवी आहेत. त्यांच्या 'गोधड' (१९८७) या कवितासंग्रहातील असलेल्या कविता आदिवासी संवेदनशीलतेचा एक वास्तव असा अविष्कार आहे. कवितेच्या आशयावरून पाहिले तर अशी जाणवते की, ही एक आदिवासी कवी आणि कार्यकर्त्याची वास्तवादी कविता आहे. या कवितेमध्ये सोनवणे यांनी परंपरागत दारिद्र्यात पिजत पडलेल्या आणि आजपर्यंत उपेक्षित राहिलेल्या आणि अन्याय अत्याचाराची शिकार झालेल्या आदिवासी समाजाची एक वास्तवता आणि त्यांची व्यथा या कवितेत मांडली आहे. ही आदिवासी माणसे आपल्या उपजीविकेसाठी जंगलामधील अनेक फळांवर आपला जो हक्क गाजवत असताना, त्यांच्या हक्काच्या जमिनीतून त्यांना हद्दपार करून त्यांचे जीवन उध्वस्त करण्यात आले आहे हा या कवितेचा खऱ्या अर्थाने सार आहे. अशावेळी आदिवासी समाजाच्या उपजीविकेसाठी कोणते साधन उरलेले नाही, रोजगार नाही म्हणून नुसती इतर गोष्टींमध्ये वेळ घालवत असतात यामध्ये ते पाणी पिऊन आपली भूक भागवत असतात. आणि अशावेळी त्यांना वेळोवेळी पोलिसी बंदुकीचा आणि जेलचा धाक दाखवला जातो. थोडक्यात अगदी इंग्रजांच्या काळापासून चालत आलेले हे अत्याचार आजही त्यांच्यावरती चालू आहे, हे या कवितेने दाखवून दिले आहे. आदिवासींची मुलं शिक्षणापासून वंचित आहेत. आदिवासींची व्यथा मांडणाऱ्या या कवितेमध्ये आदिवासी स्त्रियांच्याही वेदनेची दखल घेतलेली आहे. प्रसंगी उपाशीपोटी झोपलेली आपली मुलं पाहून कासावीस झालेली आई सुद्धा या कवितेत आहे. आपल्या पतीला रोजगार मिळाला नाही म्हणून आपल्या तान्ह्या बाळाला दूध पाजू शकत नाही, अशी असहाय्य

पत्नी या कवितेत उभी केले आहे. तुटपुंज्या रोजगारावर आपल्या स्वाभिमानापोटी नाकारणारी पण नंतरच्या काळामध्ये नाईलाजास्तव तो स्वीकारणारी असहाय्य कष्टकरी स्त्री या कवितेत आहे. प्रसंगी समाजाच्या वाईट नजरेची शिकार झालेली, रोजगार हमीवरची आदिवासी स्त्री या कवितेत आहे .थोडक्यात या पृथ्वीतलावर आपला कोणीही वाली नाही म्हणून आपण आपण दुसरीकडे म्हणजे चंद्रावर जाऊ शकतो असे आदिवासी म्हणतात. थोडक्यात आदिवासी बोलीचा आणि त्यांच्या परंपरागत दारिद्र्याची आणि अन्यायाची वास्तव कवीने अतिशय कल्पकपणे त्यांचे जीवन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भुजंग मेश्राम : भुजंग मेश्राम यांच्या 'ऊलगुलान' (१९९०) आणि 'अभुजमाड' (२००८) या कवितासंग्रहातील कविता आदिवासी संवेदनशीलतेचा एक सुंदर असा अविष्कार आहे दारिद्र्याने गाजलेल्या आणि वर्षानुवर्षे प्रस्थापितांनी केलेले अत्याचार सहन करणाऱ्या आदिवासींची वेदना सांगणारी आणि त्यांचा खऱ्या अर्थाने कैवार घेणारी कविता असल्याचे दिसते. आदिवासी हे जंगलाचे खऱ्या अर्थाने राजे आहेत आणि या जंगलातील साधनसंपत्तीवर आपला उदरनिर्वाह करत आलेले आहेत. खऱ्या अर्थाने हा त्यांचा निसर्गदत्त असा अधिकार आहे. स्वत:ला प्रगत मांडणाऱ्या किंवा समजणाऱ्या या समाज व्यवस्थेने त्यांच्या या अधिकारावर अतिक्रमण करून त्यांना जंगलातून निघून जाण्याचा वर्षानुवर्षे आपलं काम चालू ठेवले आहे. एका बाजूला प्रचंड जंगलतोड आणि दुसरीकडे त्या खनिज संपत्तीचा वारेमाप उपसा यामुळे या आदिवासींचे जीवन उध्वस्त झालेले दिसते. त्यांच्या उपजीविकेचे साधनच त्यांच्याकडून या समाज व्यवस्थेने हिसकावून घेतलेले आहे. त्यामुळे ही कविता आदिवासींच्या वास्तवाचे चित्रण करून थांबत नाही तर त्यांच्या शोकांतिकेची मूळ इतिहासच आहे, याचे वास्तव चित्रण करते. आदिवासी परंपरागत संस्कृतीचा वास्तव शोध या कवितेने घेतलेला आहे. आर्यकाळापासून पुढारलेले जेते आणि आदिवासी जित यांच्यातील इतिहासाला सुरुवात झाली. खांडवनातील संवाद हे त्यांचे एक प्रतिक मानले जाते. या संघर्षामध्ये कवी भुजंग मेश्राम तक्षकाची बाजू घेताना दिसतात. आणि अन्यायाला बळी ठरलेला तक्षक हा नागांचा आणि आदिवासींचा पहिला प्रतिनिधी होता. या कवितेत सर्वत्र विखुरलेल्या नागपुत्र, नागकन्या, नागिन, नागरिक आणि नागवृक्ष यासारख्या प्रतिमा या नाग संस्कृतीची माहिती सांगणारे आहेत. एवढेच काय तर हडप्पाशी आणि तिथल्या आर्यपूर्व सिंधू संस्कृतीशी आपले नाते जोडतात. अनेक काळापासून चालत आलेले खच्चीकरण आजही चालू आहे.

⌘⌘⌘

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

संशोधक

• वर्ष : ९० • डिसेंबर २०२२ • पुरवणी विशेषांक १०

SHRI MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COM. • PACHAL •

75
आज़ादी का
अमृत महोत्सव

॥ श्री विश्वनाथो विजयते ॥
स्थापना : १ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक ।।

पुरवणी अंक १० – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

- शके १९४४
- वर्ष : ९०
- पुरवणी अंक : १०

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

- डॉ. प्रमोद एस. मेश्राम
- डॉ. बळवंत टी. दाभाडे
- डॉ. मनोहर आर. कोंडागुर्ले

✷ प्रकाशक ✷

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१. २१ व्या शतकातील बौद्धांचे सांस्कृतिक परिवर्तन : विशेष संदर्भ दक्षिण कोकण
- डॉ. प्रमोद एस. मेश्राम ---------- ९

२. २१ व्या शतकातील कविता : एक अभ्यास
- डॉ. बळवंत तुकाराम दाभाडे ---------- १४

३. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधून येणारे एकविसाव्या शतकातील शेतीचे प्रश्न
- डॉ.विकास शंकर पाटील ---------- २०

४. भारतातील नक्षलवादी चळवळीची समस्या : एक अभ्यास
- डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील ---------- २३

५. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर उद्योग : ग्रामीण विकास आणि समस्या
- कु.वनिता देवगोंडा पाटील ---------- २७

६. २१ व्या शतकातील पर्यटन – Tourism
- डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले ---------- ३२

७. २१ व्या शतकातील आदिवासींची राजकीय स्थिती
- डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे-गणवीर ---------- ३८

८. २१ व्या शतकामध्ये गीताचार्य तुकारामदादा यांनी राबविलेली गावगणराज्य चळवळ : एक ऐतिहासिक अध्ययन
- प्रिती पारस ठिकरे, डॉ. नंदकिशोर पी. मने ---------- ४३

९. भारतीय ग्रंथालये : एक ऐतिहासिक आढावा
- सौ. जिरगे आशा चंद्रशोक ---------- ४७

१०. माहिती तंत्रज्ञानाचे बदलते स्वरूप आणि २१ शतकातील आधुनिक ग्रंथालये
- डॉ. शशिकांत वसंतराव वानखडे ---------- ५१

११. शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीने आजच्या काळात ऐतिहासिक पर्यटन स्थळांचे महत्त्व
- डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव ---------- ५५

१२. २१ व्या शतकातील महाराष्ट्रातील वाढते शहरीकरण : एक अभ्यास
- प्रा.डॉ. देविदास विक्रम हारगिले ---------- ६०

१३. महिला सक्षमीकरणात महिला आर्थिक विकास महामंडळाचे योगदान – एक अध्ययन
- मंगला दुर्गादास बनसोड, डॉ. उषा खंडाळे ---------- ६५

१४. बदलत्या शिक्षण प्रवाहात ग्रामीण भागातील शालेय बालकांच्या बौद्धिक क्षमतेचे अध्ययन
- सौ. मेघा मोहन रतकंठीवार, डॉ. माधुरी नामदेव कोकोडे ---------- ७१

ISSN No. 2394-5990

भारतातील नक्षलवादी चळवळीची समस्या : एक अभ्यास

डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील
श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालय, पाचल
मो. - ९४२३८३१८१२,
E.mail. adpatil24@gmail.com

गोषवारा:

नक्षलवाद म्हणजे शस्त्राच्या बळावर हिंसक मार्गाचा वापर करून समाजात भीतीचे वातावरण निर्माण करून आपले ध्येय साध्य करणारी संघटना होय. एकविसाव्या शतकामध्ये भारताची वाटचाल सुरू असताना त्यामध्ये अडथळे आणणाऱ्या अनेक समस्यांपैकी एक महत्त्वाची समस्या म्हणून नक्षलवादाकडे पाहणे आवश्यक वाटते. देशातील बहुतेक समस्यांचे मूळ शोधले असता ते निरक्षरता, विकासाचा अभाव आणि मागासवर्गीयांचे प्रश्न इत्यादी मध्ये सापडते . दिवसेंदिवस भारतातील नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सरकारच्या दृष्टीने नक्षलवाद ही भारतातील एक प्रमुख समस्या बनली आहे. भारताला या समस्येच्या निवारणाकरता प्रचंड ताकद खर्च करावी लागत आहे. सध्या भारतातील १५ राज्यातील २२० जिल्ह्यामध्ये नक्षलवादी चळवळ मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. नक्षलवाद्यांच्या प्रभावाखाली असलेले क्षेत्र लाल पट्टा किंवा रेड कॉरिडॉर म्हणून ओळखले जाते. प्रामुख्याने आंध्र प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, महाराष्ट्र,पंजाब इत्यादी राज्यांमध्ये ही संघटना कार्यरत आहे. यापैकी आंध्र प्रदेश व छत्तीसगड या दोन राज्यात सुमारे ७५ टक्के नक्षलवादी गट कार्यरत आहेत. पश्चिम बंगालमध्ये 'नक्षलबारी' या गावात या आंदोलनाला सुरुवात झाल्याने या चळवळीला ञनक्षलवादीफ चळवळ असे नाव पडले आहे. वास्तविक पाहता नक्षलवादी स्वतःला नक्षलवादी म्हणून न घेता 'माओवादी' असा स्वतःचा उल्लेख करताना आढळतात. त्यामुळे भारतात नक्षलवाद हा माओवाद म्हणून ओळखला जातो. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास व दुर्गम भाग हे नक्षलवाद्यांचे कार्यक्षेत्र आहे. अन्याय, क्रुर जमीनदारी व सावकारी यांना पायबंद घालण्यात नक्षलवाद्यांना सुरुवातीच्या टप्प्यात यश आल्याने समाजाकडून या चळवळीला सहानुभूती मिळत गेली. सुरुवातीच्या काळात वंचितांकडून मिळालेला पाठिंबा ही चळवळ बळकट होण्यास कारणीभूत ठरला.

महाराष्ट्राचा विचार करता गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश नकलग्रस्त प्रदेशमध्ये होतो. इ.स. १९८० मध्ये महाराष्ट्रात पीपल्स वॉर ग्रुप ची स्थापना झाली. विकास अण्णा व सत्यण्णा भूपती यांनी महाराष्ट्रातील या चळवळीचे नेतृत्व केले. गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी, एटापल्ली व सिरोंचा या तीन तालुक्यात नक्षलवाद्यांचा विशेष प्रभाव दिसून येतो. छत्तीसगड मध्ये सुकमा दंतेवाडा व बस्तर ही नक्षलवादी कारवायांची प्रमुख केंद्रे आहेत. इ.स. २००५ मध्ये येथील राज्य सरकारने सेलवा जुडूम नावाची मोहीम सुरू केली. झारखंड या राज्यातील २४ जिल्ह्यांपैकी १८ जिल्हे हे नक्षलवादी कारवायांनी प्रभावित आहेत. नक्षलवादी चळवळ मोडून काढण्यासाठी येथे झारखंड संघर्ष जनमुक्ती मोर्चा व शांतिसेना या दोन संघटना पोलीस व सरकारला मदत करत आहेत. महाराष्ट्र सरकारने विशेष कमांडो दलाची आणि विशेष कृती गटांची स्थापना करून नक्षलवाद आटोक्यात आणण्याचे काम केले आहे. शरण येणाऱ्या नक्षलवाद्यांचे पुनर्वसन करून त्यांना पुन्हा सामाजिक प्रवाहामध्ये आणण्याचे काम केले जात आहे.

बीज़ शब्द : नक्षलवाद, नक्षलवादी चळवळ, माओवादी.

प्रस्तावना :

भारताने नुकताच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या ७५ वर्षांमध्ये भारताने विविध क्षेत्रात प्रगती केली आहे. विविध क्षेत्रांत प्रगती कडे वाटचाल करत असताना देशासमोर अनेक अंतर्गत समस्या व त्यामधून देशाला बाधा निर्माण करणाऱ्या अनेक घटकांचा विकास देखील होत असताना दिसून येतो. एकविसाव्या शतकामध्ये भारताची वाटचाल सुरू असताना त्यामध्ये अडथळे आणणाऱ्या अनेक समस्यांपैकी एक महत्त्वाची समस्या म्हणून नक्षलवादाकडे पाहणे आवश्यक वाटते. देशातील बहुतेक समस्यांचे मूळ शोधले असता ते निरक्षरता, विकासाचा अभाव आणि मागासवर्गीयांचे प्रश्न इत्यादी मध्ये सापडते. नक्षलवादी कारवायांचे मूळ देखील या समस्यांमध्ये दडलेले दिसून येते. नक्षलवादाने भारतातील अनेक राज्यांमध्ये आपले हातपाय पसरलेले आहेत. दिवसेंदिवस भारतातील नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सरकारच्या दृष्टीने नक्षलवाद ही भारतातील एक प्रमुख समस्या

बनली आहे. भारताला या समस्येच्या निवारणाकरता प्रचंड ताकद खर्च करावी लागत आहे. म्हणून २१ व्या शतकातील नक्षलवाद ही समस्या जाणून घेणे आणि तिच्यावर काय उपाययोजना केल्या जात आहेत याचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

संशोधन लेखाची उद्दिष्टे :

१. भारतातील नक्षलवादी चळवळीची पार्श्वभूमी जाणून घेणे.
२. नक्षलवादी संघटनांच्या कारवायांचा आढावा घेणे.
३. नक्षलवाद विरोधी उपाययोजना जाणून घेणे.

नक्षलवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

नक्षलवाद म्हणजे शस्त्राच्या बळावर हिंसक मार्गाचा वापर करून समाजात भीतीचे वातावरण निर्माण करून आपले ध्येय साध्य करणारी संघटना होय. जॉन केटमच्या मते, 'राजकीय उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी अविधानिक मार्ग अवलंबणारे आणि हिंसात्मक कार्य करणारी संघटना म्हणजे नक्षलवाद होय.' भारतातील जमीनदारी पद्धत, आदिवासी जनतेवर होणारे अत्याचार, शेतकरी वर्गाची होणारी पिळवणूक, मागासवर्गीयांवर होणारे अत्याचार व अन्याय अशा परिस्थितीमधून नक्षलवादी चळवळीचा जन्म झाला आहे. प्रामुख्याने आंध्र प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, महाराष्ट्र,पंजाब इत्यादी राज्यांमध्ये ही संघटना कार्यरत आहे. यापैकी आंध्र प्रदेश व छत्तीसगड या दोन राज्यात सुमारे ७५ टक्के नक्षलवादी गट कार्यरत आहेत. बंदुकीच्या गोळीतूनच क्रांती घडत असते हे चिनी क्रांतीचे अध्यय नेते माओ त्से तुंग यांची विचारसरणी शिरसावंद मानून भारतात क्रांती घडवून आणण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये चारू मुजुमदार या तरुणाने जे आंदोलन सुरू केले, त्यामधून ही चळवळ उदयास आली. पश्चिम बंगालमध्ये 'नक्षलबारीफ' या गावात या आंदोलनाला सुरुवात झाल्याने या चळवळीला नक्षलवादी चळवळ असे नाव पडले आहे. प्रत्यक्षात नक्षलवाद हा शब्दप्रयोग माओवाद्यांनी प्रचलित केला होता. पश्चिम बंगालमध्ये सुरू झालेल्या हिंसक आंदोलनाचे नेते मार्क्स लेनिन व माओच्या विचाराने चालणारे होते. भारतात चीनच्या माओच्या नावाने प्रचार करणे गैरसोयीचे ठरणार असल्याने नक्षलवाद व नक्षलवादी या शब्दांचा मुद्दाम वापर करण्यात आला. वास्तविक पाहता नक्षलवादी स्वतःला नक्षलवादी म्हणून न घेता 'माओवादी' असा स्वतःचा उल्लेख करताना आढळतात. त्यामुळे भारतात नक्षलवाद हा माओवाद म्हणून ओळखला जातो. ही चळवळ उदयास आली त्यावेळी धनुष्यबाण व कुऱ्हाड हे त्यांची हत्यारे होती. मात्र कालांतराने त्यांच्या हातामध्ये अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आली.

भारतातील नक्षलवादी चळवळीत सहभागी झालेल्या बहुतेक जाती या मागास व दारिद्र्य आहेत. खास करून आदिवासी पट्ट्यामध्ये नक्षलवादी चळवळीचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याचे आढळते. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, ओरिसा, छत्तीसगड इ.ठिकाणच्या नक्षलवादी चळवळी अधिक सक्रिय आहेत. मध्य प्रदेशातील बस्तर जिल्ह्यात आदिवासींचे हितसंबंध रक्षण करण्याचे कार्य ही चळवळ करत असल्याचे दिसून येते. बिहार मधील दलित व मागासलेल्या जमातींच्या वतीने नक्षलवाद्यांनी शस्त्र उचललेले आहे. चारू मुजुमदारांच्या मृत्यूनंतर नक्षलवादी चळवळ थोडी कमकुवत झाली होती. तसेच आणीबाणीच्या काळात या चळवळीतील अनेक नेते तुरुंगात गेल्याने या चळवळीचा कणा मोडला होता. मात्र आणीबाणी नंतर काही वर्षांनी कोंडापल्ली सीतारामय्या, विनोद मिश्रा, चंद्रपूरला रेड्डी यांच्यासारख्या नेत्यांनी नक्षलवादी संघटनेला पुन्हा नवसंजीवनी देण्याचे काम केले. त्यामुळे २२ एप्रिल १९८० रोजी पीपल्स वॉर ग्रुप या गटाची स्थापना झाली. आंध्र प्रदेशातील के. सितारामया महाराष्ट्रातील कोबाद गांधी यांचा पीपल्स वॅर ग्रुप स्थापनेमध्ये मोठा सहभाग होता. पीपल्स वॉर ग्रुपने आंध्र प्रदेशातील सुमारे पाच लाख एकर जमिनीचे वाटप केले होते. लोक अदालती, शेतमजुराला किमान मोबदला आधी सामाजिक कार्यातून पीपल्स वॉर ग्रुपला वंचित घटकाचा मोठा पाठिंबा मिळाला होता. या गटाने सध्याच्या तेलंगणा व महाराष्ट्राच्या सीमावृत्ती भागात मध्य प्रदेश व कर्नाटक मध्ये आपले जाळे मजबूत केले होते. या गटाच्या कारवायांना प्रतिबंध घालण्यासाठी आंध्र सरकारने १९९२ मध्ये या संघटनेवर बंदी घातली होती. केंद्रीय निमलष्करी दलाचा वापर करून या संघटनेला कमकुवत केले होते. मात्र ही संघटना पूर्णपणे संपवण्यात सुरक्षा दलाला अपयश आले होते. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास व दुर्गम भाग हे नक्षलवाद्यांचे कार्यक्षेत्र आहे. अन्याय, क्रुर जमीनदारी व सावकारी यांना पायबंद घालण्यात नक्षलवाद्यांना सुरुवातीच्या टप्प्यात यश आल्याने समाजाकडून या चळवळीला सहानुभूती मिळत गेली. सुरुवातीच्या काळात वंचितांकडून मिळालेला पाठिंबा ही चळवळ बळकट होण्यास कारणीभूत ठरला.

नक्षलवादी चळवळीची ध्येय :

१. देशातील तरुणांना नक्षलवादी चळवळीत सामील होण्यासाठी प्रोत्साहित करणे.
२. सरकारकडून बेकायदेशीर मागण्या मंजूर करून घेण्यासाठी हिंसाचारी मार्गाचा अवलंब करणे.
३. सामान्य जनतेचे जनजीवन विस्कळीत करून लोकांमध्ये असुरक्षिततेची वातावरण निर्माण करणे.

४. शासकीय कामकाजामध्ये अडथळे आणणे.
५. देशाची एकात्मता शांतता व सुरक्षितता भंग करणे.
६. देशातील महत्त्वाच्या लोकांना ओलीस ठेवून आपल्या मागण्या मंजूर करून घेणे.इत्यादि.

नक्षलवादी चळवळीची कारणे :

भारतामध्ये नक्षलवादाचा उदय व विकास होण्याकरता अनेक कारणे कारणीभूत ठरली आहेत. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे या देशांमध्ये असलेली सामाजिक व आर्थिक विषमता नक्षलवादाला विरूश्रर कारणीभूत ठरली आहे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे नक्षलवादी चळवळ ही प्रामुख्याने जंगल ग्रस्त भागामध्ये उदयास आली आहे. भारतामध्ये जंगल युक्त प्रदेश मोठ्या प्रमाणात असून त्या ठिकाणी शिक्षण, आरोग्य, रोजगार, विद्युत, रस्ते या सुविधा पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे येथील आदिवासी व मागास लोकांना चळवळीमध्ये मोठ्या प्रमाणात ओढले जात आहे. या प्रदेशातील जनतेचे प्रस्थापित सामाजिक घटकांकडून होणारे शोषण आणि त्यांच्यावर होणारा अन्याय अत्याचार हा देखील नक्षलवादाच्या उदयास कारणीभूत ठरला आहे.

भारतातील प्रमुख नक्षलवादी गट :

सध्या भारतातील १५ राज्यातील २२० जिल्ह्यामध्ये नक्षलवादी चळवळ मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. नक्षलवाद्यांच्या प्रभावाखाली असलेले क्षेत्र लाल पट्टा किंवा रेड कॉरिडॉर म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राचा विचार करता गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश नकलग्रस्त प्रदेशमध्ये होतो. इ.स. १९८० मध्ये महाराष्ट्रात पीपल्स वॉर ग्रुप ची स्थापना झाली. विकास अण्णा व सत्यण्णा भूपती यांनी महाराष्ट्रातील या चळवळीचे नेतृत्व केले. गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी, एटापल्ली व सिरोंचा या भागात नक्षलवाद्यांचा विशेष प्रभाव दिसून येतो. हे तालुके मध्य प्रदेश व तेलंगणाच्या सीमेवर असल्याने त्या ठिकाणी नक्षलवादी क़ारवाया करून दुसऱ्या प्रदेशात पळून जाणे सोपे जाते. तसेच या तीनही राज्यातील सुरक्षा दलांमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे नक्षलवाद्यांना या ठिकाणी वर्षभर कारवाया करणे शक्य होते. त्यामुळे एकेकाळी गडचिरोली जिल्ह्यामध्ये निवडणुका घेणे सरकारला धोक्याचे झाले आहे. २००९ मध्ये तीन मोठे हल्ले नक्षलवाद्यांकडून झाल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. १ फेब्रुवारी २००९ मध्ये मोकी धानोरा येथे दहशतवादी हल्ल्यात १५ पोलीस शहीद झाले, २१ मे २००९ रोजी मुरूम धानोरा येथे १६ पोलीस शहीद झाले व ८ ऑगस्ट २००९ रोजी लाहेरी भामरागड येथे १७ पोलीस शहीद झाले. इ.स. २०१९ मध्ये गडचिरोली मधील कुरखेडा गावाजवळ नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरंग स्फोटात शीघ्र कृती दलाचे १५ जवान व वाहक शहीद झाला होता. यावरून महाराष्ट्रात अजूनही नक्षलवादी चळवळी किती मोठ्या प्रमाणात होत आहेत याचे जाणीव होते.

छत्तीसगड मध्ये नागेश उर्फ नरेश दोरला याच्या नेतृत्वाखाली इ. स. १९८० मध्ये पीपल्स वॉर ग्रुप या नक्षलवादी संघटनेची स्थापना झाली. सशस्त्र क्रांती द्वारे मुक्ती हे उद्दिष्ट त्याने घोषित केले होते. बस्तर हे त्याचे कार्यक्षेत्र होते. सध्या छत्तीसगड मध्ये सुकमा दंतेवाडा व बस्तर ही नक्षलवादी कारवायांची प्रमुख केंद्रे आहेत. २००५ मध्ये येथील राज्य सरकारने सेलवा जुडूम या नावाची मोहीम सुरू केली. या मोहिमेमध्ये नक्षलवाद सोडून आलेल्या तरुणांना परत हाताशी धरून नक्षलवाद विरोधात लढण्यासाठी प्रशिक्षित केले. त्यामुळे सेलवा जुडूम मध्येच सामील होणाऱ्यांच्या हत्या करण्याचे सत्र नक्षलवाद्यांनी सुरू केले. कॉंग्रेसचे नेते महेंद्र कर्मा यांच्या प्रयत्नातून ही मोहीम सुरू झाली होती. त्यामुळे त्यांच्यासह १५ लोकांची हत्या माओवाद्यांनी २५ मार्च २०१३ रोजी केली. परिणामी माओवाद्यांच्या भाषेत उत्तर देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला मोठा धक्का बसला. छत्तीसगडमध्ये दोन जुलै २०१३ रोजी माओवाद्यांच्या हल्ल्यात पोलीस अधीक्षकांसह चार पोलिसांना आपला जीव गमवावा लागला. १२ मार्च २०१७ रोजी सुकमा येथे झालेल्या भुसुरूंग स्फोटात १२ आर. पी. एफ. चे जवान शहीद झाले. त्यामुळे सरकारने माओवाद्यांच्या विरोधात ऋप्रहारफ नावाची मोठी मोहीम जून २०१७ मध्ये सुरू केली. या मोहिमेत पोलीस दल, सीआरपीएफ व भारतीय हवाई दलाला सहभागी करून घेण्यात आले होते. या मोहिमेत तीन सैनिक शहीद आणि सुमारे २० नक्षलवाद्यांना ठार मारण्यात यश आले. मात्र खराब हवामानामुळे ही मोहीम २५ जून २०१७ रोजी थांबवली गेली. त्यामुळे आज देखील छत्तीसगडमधील सुकुमार व दंतेवाडाचा प्रदेश नक्षलवाद्यांच्या हिंसक कारवायांच्या प्रचंड दहशतवादी वावरताना दिसत आहे.

बिहार मधून इ. स. २००० मध्ये वेगळा करण्यात आलेला एक भूप्रदेश म्हणजे झारखंड राज्य होय. या राज्यातील २४ जिल्ह्यांपैकी १८ जिल्हे हे नक्षलवादी कारवायांनी प्रभावित आहेत. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात खनिज संपता व जंगल संपत्ती असल्याने माओवादी चळवळीला ती लाभदायी ठरले आहे. बिहारमध्ये १९६९ मध्ये स्थापन झालेला माऊ कम्युनिस्ट सेंटर हा माओवादी गट नक्षलवादी चळवळ चालविण्याचे काम करतो. ती मोडून काढण्यासाठी झारखंड संघर्ष जनमुक्ती मोर्चा व शांतिसेना या दोन संघटना पोलीस व सरकारला मदत करत आहेत. या प्रमुख संघटना शिवाय इतर राज्यांमध्येही अशा

नक्षलवादी कारवाया सुरू आहेत. त्यामुळे २१ व्या शतकात सरकार समोर नक्षलवादाचे उच्चाटन करणे हे प्रमुख ध्येय असणे गरजेचे आहे.

नक्षलवाद विरोधी उपाययोजना :

नक्षलवादाचे समुळ उच्च्याटन करण्यासाठी सरकारने विशेष कमांडो दलाची आणि विशेष कृती गटांची स्थापना करून नक्षलवाद आटोक्यात आणण्याचे काम केले आहे. शरण येणाऱ्या नक्षलवाद्यांचे पुनर्वसन करून त्यांना पुन्हा सामाजिक प्रवाह मधल्या प्रवाहामध्ये आणण्याचे काम केले जात आहे. नक्षलवाद्यांसाठी गावबंदी योजना लागू करून त्या गावांच्या विकासासाठी प्रोत्साहन पर अनुदान दिले जात आहे. नक्षलग्रस्त प्रदेशांमध्ये पोलीस दलामार्फत गुप्तहेर यांचे जाळे अद्यावत करणे आवश्यक आहे. भारतीय सैन्य दलातील अतिरिक्त सैन्य व नक्षलवाद विमानासाठी वापरणे आवश्यक आहे. नक्षलवादाची समस्या हे प्रामुख्याने विविध राज्यांच्या सीमावर्ती भागात सुरू आहे. त्यामुळे शेजारील राज्याने संयुक्त मोहिमा राबवून नक्षलवादाचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. या कडक उपाययोजना करत असतानाच नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या भूप्रदेशात वेगाने विकास कामे सुरू करून तेथील लोकांना शिक्षण, आरोग्य, वीज, रस्ते या सुविधा देणे आवश्यक आहे. बड्या जमीनदारांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. नक्षलग्रस्त प्रदेश हा अतिदुर्गम असल्याने येथील तरुणांसाठी नोकऱ्या व रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. नक्षलवादी गटासोबत शांततापूर्ण चर्चा करून वाटाघाटी करणे आवश्यक आहे. शेवटी सर्वात महत्त्वाचे म्हणजे नक्षलवाद प्रभावित क्षेत्रात समाज प्रबोधनाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आपला देश व आपले राज्य याबद्दल प्रेम, आपुलकी निर्मितीसाठी व लोकशाही वरील व्यवस्थेवरील विश्वास वाढवण्यासाठी प्रयत्न करावा लागणार आहे. तरच नक्षलवाद हे २१व्या शतकासमोर असलेली महत्त्वाची समस्या संपुष्टात येणे शक्य आहे.

संदर्भसाधने :

१. डॉ. व्ही. वाय. जाधव भारताची राष्ट्रीय सुरक्षा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०११.
२. डॉ. पाटील, डॉ. धर्माधिकारी, प्रा. गावित., भारतीय राष्ट्रीय सुरक्षा, अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१९.
३. सुरेंद्र कुमार मिश्रा, नक्षलवाद, के. डब्ल्यू. पब्लिशर्स प्रा. लि. न्यू. दिल्ली, २०१०.
४. गोविंद गारे, नक्षलवादी आणि आदिवासी, सुगावा प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, २०१७.
५. दैनिक लोकसत्ता, संपादकीय, दिनांक २५ ऑगस्ट २०२०.

■■■

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAP
COLLEGE OF ARTS & COM.PAC
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

July To Sept. 2020
Issue-35, Vol-03

Date of Publication
01 August 2020

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले
-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

INDEX

01) "A Study of a Personality Characteristic of factor E- Humble Vs Assertive ... ||14
Dr. RANJAN K. BADWANAY, Aurangabad, Maharashtra, India

02) Women Liberty – Values and Reality ||17
Dr. Suresh R. Bathe, Buldhana

03) Role of Ayurveda in prevention to COVID-19 ||19
Dr. Vibha Dubey & Dr. Manish Kumar Dubey, Kanpur

04) Empowerment of women through SHGS in Daryapur ||24
Jyoti Haware

05) Analyzing the literary works of Sahityarathi Laxminath Bezbaruah ||26
Jonmoni Das, Anjan Jyoti Sarma & Pallav Protim Mahanta

06) Information Technology (IT) Industry in India: Progress and Potential ||29
Dr. Kumar Kartikeya, Bhilwara (Raj.)

07) Aatma Nirbhar Bharat-A way to make Self-Reliant India ||34
Vikash Mandal & Kusum Kanan Mishra, Maharo

08) Literature and Film: A study of Adaptation ||36
A. U. Mundhe, Udgir

09) Comparative Study of HDFC Bank and SBI ||38
Mr. Anilkumar Nirmal & Dr. Purvi Derashri, Vadodara, Gujarat

10) Open Educational Resources - OER in the Field of Business Management ... ||45
Dr. N. K. Pachauri, Firozabad

11) Ultrasonic Velocities of Binary Liquid Mixtures using Scaled Particle ... ||55
Dr. K. N. Pande, Dt. Akola

12) ICT: It'sApplication in the Teaching and Learning of Physical Education ... ||58
Prof. Pritesh Patel, Anand

www.vidyawarta.com/03 I http://www.printingarea.blogspot.com

13) Indian Banking Sector in Extant Scenario: A Trend Analysis
Dr. Manohar Das Somani & Kaushal Kumar, Indore ||62

14) Consumer behaviour towards skin care products with special reference to...
Dr. SAMIR KUMAR TIWARI & SONAL KHANNA, LUCKNOW ||67

15) A STUDY ON "WORKERS PARTICAPITATION IN MANAGEMENT DECISIONS"SRI ...
SUSHMA K.V. & VISHWANATH R. HAVALAPPAGOL, Chickballapur Tq & Dist ||72

16) Comparative study of physical fitness between two International games ...
Dr. Suresh Jayram Farakte, Kolhapur ||77

17) A Realistic View of the Presence of the Ghost in Hamlet
Dr. Alhaj Ali Adam Ismail & Asst. Lecturer. Yousif Khorsheed Saeed ||79

18) आजच्या काळात महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता
डॉ. संजय गायकवाड, जि. हिंगोली ||83

19) कोरोना संसर्ग नंतर भविष्यातील भारतीय अर्थव्यवस्था (कृषीक्षेत्र)
प्रा.डॉ. गोवर्धन खेडकर, जालना ||85

20) कोविड–१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
डॉ. गणेश बापुराव गावंडे, जि.जालना ||88

21) महात्मा ज्योतिबा फुले यांचे आर्थिक विचार
प्रा. कल्याण सर्जेराव घोडके, जि. बीड ||92

22) मराठ्वाड्यातील महिला सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ : नांदेड ...
प्रा. कांबळे नागनाथ विठ्ठलराव, नांदेड ||94

23) शिवाजी महाराजांचा काळाच्या पुढे पाहणारा आर्थिक विचार
प्रा. प्रकाश जंगले, ठाणे ||97

[redacted] [redacted]

25) श्री एम०एन०राय और मार्क्सवाद:एक समीक्षा
डॉ. तिलकराज अण्डोला, जिला पिथौरागढ़, उत्तराखण्ड ||102

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

24

अण्णाभाऊ साठे के साहित्यों में सर्वहारा वर्ग

प्रा. प्रमोद एस. मेश्राम
सहयोगी प्राध्यापक,
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य
महाविद्यालय, पाचल

****

प्राक्कथन:

स्वतंत्रतापूर्व और स्वतंत्रता के पश्चात विभिन्न साहित्यों का निर्माण बहोत सारे साहित्यकारोंने किया है। लेकीन आंबेडकरवादी, साम्यवादी, श्रमिकों के, ग्रामीण साहित्यों मे जो खुबी है वह अन्य प्रकार के साहित्यों मे दिखाई नही देती है। अण्णा भाऊ की साहित्य परंपरा वास्तविक जीवनवादी साहित्य परंपरा मानी जाती है। जिसमें वास्तविकता को प्राथमिकता दी हुयी नजर आती है। जिन्होंने परंपरावादी साहित्य को ठुकराकर बहुजनवादी साहित्य का निर्माण किया जिसमें श्रमिकों का मानवी जीवन, संघर्ष, दु:ख, गरिबी के अनेक पैलू दिखाये गये है। उनके सभी साहित्यों प्रकारों से कुछ आंबेडकरी साहित्यकारों को प्रेरणा मिली। जिसमें बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम, शरणकुमार लिंबाले और अन्य भी सामिल है।

अण्णाभाऊ साठे की साहित्यों में वास्तविकता होने हुये भी उनके साहित्यों की उपेक्षा की गयी। उनके साहित्यों के अनुसार उन्हे उचित स्थान नही दिया गया। सर्वहारा वर्ग साहित्यों की रचना से कोसो दुर था, फिर भी अण्णाभाऊ साठे ने जिन साहित्यों का निर्माण किया वह बहोत सरहानीय है।

१) व्यक्तीत्व:

प्राचीन काल में समाजव्यवस्था के भितर विभिन्न वर्णो का निर्माण किया गया। धीरे–धीरे वर्ण व्यवस्था के बाद जीतव्यवस्था कठोर बनाई गयी। उच्च वर्णो के लोगों ने वर्णव्यवस्था और जातिव्यवस्था का निर्माण खुद को सुरक्षित रखने के लिए कियाँ थाँ। जातिव्यवस्था के बारे में राम आहूजा लिखते है की, 'गुप्त काल तक जातिव्यवस्था बहाते कठोर हो गयी थी। तथा अन्य सभी जातीयों के उपर ब्राम्हणों का वर्चस्व स्थापित हो x; k FkkA½) जिसमें सर्वहारा वर्ग में निहित समाज की हालत पूरी तरह भेदभावरहित थी। जीने के सभी साधन उच्च समाज के हाथों मे थे। यह व्यवस्था स्वतंत्रता पूर्व काल तक चलती रही जिसमे सभी सर्वहारा वर्ग की हालात जीवन जीने लायक नही थी। सभी सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक और शैक्षणिक परंपरायें दुजाभाव से निहित थी। इसलिए डॉ. बाबासाहेब आंबेडकर कहते है की, 'स्पृश्यांनी दिलेल्या भीक मागण्याच्या हक्कावरच देशातील सहा कोटी अस्पृश्य आपला चरितार्थ चालवित आहेत.'(२)

१९२० में समाज में साम्यवादी विचारधारायें निहित थी। उसी समय अनुसूचित जाती के मांग समाज में १ अगस्त १९२० को तुकाराम (अण्णा) का जनम हुआ। वह वलुभाई भाऊराव साठे की संतान थे। उनकी दो शाँदिया हुयी थी और उनको मधुकर, शांता, शंकुतला यह तीन अपत्यें थी। जीवन की राह पर चलते उनको भी अस्पृश्यता, गुलामगिरी, चातुर्वर्ण्य व्यवस्था, जातीव्यवस्था का सामना करना पडा। गरीबी क्या होती है उसका नजदिकी अनुभव उनको आ गया था।

उच्चवर्गीय समाजव्दारा किये गये भेदभाव के कारण केवल डेढ़ दिन के लिए वे स्कूल में गयें थें उन्हें स्कूल में बैठने से वर्जित किया गया। फिर भी उनकी पढ़ाई की लालसा कम नही हुई। हालाखी उन्होंने बड़ी प्रयासों के साथ साक्षरता प्राप्त की थी। लेकीन शिक्षा के बारें में बजरंग बोर्डे का कहना हे की, उनकी पढ़ाई व्हर्नाकुलर फायनल याने की सातवी तक हो गयी थी। समाज में साम्यवादी विचारधारा कार्यरत थी। दुसरी और डॉ. बाबासाहेब आंबेडकर की सामाजिक क्रांती की सुरूवात हो गयी थी। उसके लिये उन्होंनें 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' का निर्माण किया था। डॉ. बाबासाहब की सामाजिक क्रांती ने समाज में सामाजिक चेतना

निर्माण करने का काम शुरू कर दिया था। लोग इस सामाजिक क्रांती से जुड़ने गये। इसलिए यह समय बहोत ही महत्वपूर्ण माना जाता है।

अण्णा भाऊ साठे का वास्तविक नाम तुकाराम भाऊराव साठे था। समाज में टोपण नाम देने की प्रथा ने उनको भी अण्णा नाम से बुलायाँ जाने लगा। वे सर्वहारा समाज के मांग समाज से थे। वह भी अस्पृश्य होने के कारण बहिष्कृत ही थे। उनकों भी समाज के सभी मुसिबतों का सामना करना पड़ा। वे शुरू में साम्यवादी थें लेकीन डॉ. बाबासाहब आंबेडकर के विचारों को सुनकर वह आंबेडकर वादी बन गये। इसलिए उन्होंने अपनी 'फकिरा' नामकउपन्यास डॉ. बाबासाहब की झुंजार लेखनकला को अर्पण की थी। अण्णाभाऊ साठे की जीवन कहानी चार टप्पों पर निर्भर की जाती है। जिसमे 'पहिला टप्पा म्हणजे वारणेच्या खोऱ्यात, डोंगरदऱ्यात वाढलेले अण्णा, दुसरा टप्पा म्हणजे वाटेगावहून मुंबईला आपल्या वडीलांसह पायी चालत आलेले, पोटापाण्यासाठी नोकरीधंदा शोधणारे, तिसरा टप्पा म्हणजे मार्क्सवादी विचारधारा स्विकारून पददलित शोषित जनतेसाठी आपली लेखणी झिजविणारे अण्णा, 'फकिरा' सारखी कादंबरी लिहणारे अण्णा, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अमर शेख, गव्हाणकर यांच्यासह उभा महाराष्ट्र ढवळून काढणारे आणि चौथा टप्पा म्हणजे कम्युनिस्ट चळवळीचा भर ओसरल्यानंतर ते मृत्यूपर्यंत जगणारे अण्णा.'(३)

उनकी जीवन कहानी सर्वहारा समाज के तहत थी। समाज में स्थित इस वर्ग की खुद की अनेक विचारधारायें थी। जीन्होंने अपनी खुद की अलग पहचान बनायी थी।

२) अण्णा भाऊ साठे की साहित्यों में सर्वहारा समाज:

१६३२ में जीना जींने के लिए वह अपने पिता के साथ अपने गाँव से पैदल ही मुंबई आये थे। वे माटुंगा के झोपडपट्टी में रहने लगे। जहाँपर आज टिलक हॉस्पीटल (अस्पताल) है। वहाँपर उनका संबंध कम्युनिष्ट विचारधाराओं के व्यक्तीयों के साथ जुड़ना गया। यह जायज था की, उन्होंने गरीबो का जीना, उनका शोषण उन्होंने अपने आँखो से देखा था। इसलिए उनका लगाव कम्युनिष्टों के पक्ष मे था। वे मॉक्सिम मार्की के साहित्यों से प्रेरित थे।

गरिबी क्या होती है, सर्वहारा का जीवन कैसे चलता है यह उन्होंने अपने आँखो से देखा था। इसलिए उनमें उन्नती लाने की भावना उनके मन में स्थापित होने के कारण अपने ज्यादातर साहित्यों में श्रमिक वर्ग को स्थान दिया हुआ दिखाई पड़ता है। साम्यवादी, आंबेडकरवादी साहित्यों में सर्वहारा वर्ग की सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवन की आलोचना ज्यादातर की जाती है। इसका यह मतलब है की, सर्वहारा समाज के सभी वर्ग के लोगों ने जो अन्यायीयुक्त जीन्दगी का सामना करकर जीना सीखा थाँ वह उनके साहित्यों में अधिक तर पाया जाता है। जो वास्तविकता के आधारों पर निहित है।

अण्णाभाऊ साठे की साहित्यरचना में समाज की वास्तविकता को अधिक स्पष्ट रूप में दर्शाया गया है। इसलिए उनका साहित्य अधिक सराहनीय माना जाता है। इस समय तक के सभी साहित्योंकारोंने अपने साहित्यों में कभी भी, कहाँपर भी सर्वहारा वर्ग के लोगों की आलोचना नही की थी। उच्च समाज के साहित्यों का साहित्य केवल रंजकता पर आधारीत था। जैसे की, ना. सी. फडके, वी. स. खांडकेर और आदी साहित्यकारोंने अपनें साहित्यों में सर्वहारा वर्ग को अलग रखा था। लेकीन अण्णाभाऊ साठे ने अपने साहित्यों में उपरी प्रकार की रचना को समाप्त करकर अपने साहित्यों में उन्होंने सर्वहारा वर्ग के लोगों के वास्तविक जीवन की सराहना की हुयी है।

आधुनिक तौर पर देखा जाता है की, नारायण सुर्वे ने अपना जीवन भी कामगारों, कष्टकरीयों के हित में रखा था। जो कहते हे की, भाकरीचा चंद्र शोधण्यात जीन्दगी बरबाद झाली. उनको प्राथमिकता से सरायाँ गया है। लेकीन उसके पहले अण्णा भाऊ साठे ने अपने साहित्यों व्दारा सर्वहारा समाज में चेतना निर्माण करने का काम कीयाँ थाँ, उनको उपेक्षित रखा गया है। जो गलत है।

अण्णा भाऊ साठे के साहित्यों प्रकारों में पोवाडा, लावणी, गीते, कथा, कांदबरी, प्रवासवर्णन, नाटक, लोकनाट्य आदी प्रकार निहित है। उनका सारा लेखन

बंद खोली के बाहर का था। उनके साहित्यों में शोषित लोगों का जीना अधिकतर दिखाई देता है। सर्वहारा वर्ग ऐसे साहित्यों से कोसो दूर था। उन्होने उस उच्च साहित्यकारों को ठूकराकर बहुजनवादी साहित्यों का निर्माण किया। उनकी सभी रचनायें बहुजनवादी होने के कारण महाराष्ट्र में ही नही सभी जगत में प्रमुख स्थानों पर है।

अण्णाभाऊ साठे ने पैंतीस उपन्यास, पंधरा लघुकथायें, बारा पटकथायें, पोवाडा, नाटक आदि साहित्यों का निर्माण किया। उनकी फकिरा उपन्यास कों १९६१ मे नवाजा गया। उनके सभी साहित्यों में हिंसा और अत्याचार रहित साहित्यो का निर्माण किया गया है। उनके साहित्यों मे सामाजिक मानदंड, अवांछनीय प्रथाएँ, महिलाओं का शोषण, गरिबी, बेरोजगारी, राजनिती यह प्रकार दिखाई देते है। उनकी साहित्यकृती महाराष्ट्र में ही नही बल्की विदेशों मे भी पायी जाती है। बाईस भाषाओं में उनका साहित्य अनुवादित हुआँ है।

उन्होंने अपने इस लेखन के अलावा नवयुग, युगांतर और आचार्य अत्रे के मराठा समाचारपत्रों मे वर्तमान स्थिती के बारे में कही लेख लिखे है। इसलिए कहाँ जाता है की, 'शोषितांना शोषणमुक्त करण्याचे, एक स्वतंत्र माणूस म्हणून स्वाभिमानाने जगण्याचे आश्वासन देणारे साम्यवादी तत्वज्ञान त्यांच्या मनात खोलवर रूजल्यामुळे तो ठसा त्यांच्या साहित्यांवर आणि सर्वाधिक स्वरूपात त्यांच्या लोकनाट्यावर उमटलेला आढळतो.'(४)

अण्णा भाऊ साठे ने तमाशा के तौर, तरिके पूरी तरह बदल डाले। 'पारंपारिक तमाशात गण, गवळण, बतावणी, सवालजवाब, वग असे घटक असतात. 'गणा'मध्ये गणेशवंदन आणि गणेश स्तवन असते. अण्णाभाऊनी ही परंपरा मोडून पहिल्या नमनाचा मान मातरभूमी, हुतात्मे, राष्ट्रपुरूष यांना देण्याचे बहुमोल काम केले.'(५)उन्होंने अपने साहित्यों में परंपरावादी प्रकारों के दूर रखा इसलिए उनको 'लोकनाट्यचे जनक' कहाँ जाता है।

स्वतंत्रता प्राप्ती के बाद भी समाज के सर्वहारा वर्ग की स्थिती में सुधार नही पाये जाने के कारण २ मार्च १९५८ के मुंबई स्थित 'दलित साहित्य संमेलन' मे दलित शब्द की नींदा की थी। उनका कहना था की, 'संविधान के अनुसार दलित यह शब्द असंविधानिक है। १९५८ तक सर्वहारा समाज की स्थिती में सुधार नही पाया गया। इसलिए वे इसी भाषण में कहते है की, एका गावात एका सार्वजनिक आडावर पाणी भरताना उच्चवर्णीय हिंदूची काळजे धडधडतात. महारमांगांचा पोवरा जोपर्यंत पाण्यात आहे तोपर्यंत आपला पोवरा पाण्यात सोडत नाहीत. कित्येक हॉटेलात खास कप ठेवलेले असतात.'(६) इसलिए उनका मानना था की, अधिक पैमाने पर आंबेडकरी साहित्य का निर्माण होना चाहिए।

३) साहित्यों मे श्रमिकों को महत्व:

समाज में स्थित सर्वहारा वर्ग को उनके साहित्यों मे सबसे ऊचाँ स्थान उन्होने दिया है। यह वर्ग समाज का मुलभूत अंग था फिर भी समाज के उच्चतम समुदाय ने उनको उनके अधिकारों से वंचित रखा था। उन्होने भी अपनी खुद की अलग पहचान बनायी थी। इसलिए अण्णाभाऊ साठे मुंबई स्थित दलित साहित्य संमेलन में कहते है की, 'हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.'(७) सभी अच्छे कामों मे उनकी अहम भूमिका थी। इसलिए इस सर्वहारा समाज ने अन्यायमुक्त जीवन जीने के लिए प्रतिकार करना चाहिए। सभी कामगारों की एकजूट होना चाहिए।

स्वतंत्रता के बाद भी सर्वहारा वर्ग की स्थितियों मे बदलाव नही आया था। उस समय उन्होने मुंबई में बीस हजार लोगों के साथ मोर्चा निकाला था। उस समय उनका नारा था, 'यह आजादी झूठी है। इस देश की जनता भूकी है।' अण्णा भाऊ साठे के मन मे सर्वहारा वर्ग के प्रती अपार प्रेम था इसलिए वे उनके हक के लिए लढ रहे थे।

४) आंबेडकरवादी नेता:

१९२० से लेकर डॉ. बाबासाहेब आंबेडकरने अस्पृश्य समाज में सुधार लाने हेतू अपने कार्य की शुरूवात की थी। उस समय सभी ठिकाणों पर उनकी सभायें शुरू थी। अण्णा भाऊ साठे ने मुंबई में उनके विचारों को सुना था। और धीरे—धीरे उनका झुकाव उनके प्रती हो गया था। इसलिए वे लिखते है की,

अंग बदले घालुनी घाव। सांगून गेले मला भीमराव।
गुलामगिरीच्या या चिखलात। रूतून बसला का ऐरावत
अंग झाडूनी निघ बाहेरी। घे बिनीवरती धाव।'(८)

उपरी पक्तीयों से यह जाहीर होता है की, उनका झुकाव आंबेकरवादी हो गया था। इसलिए उन्होंने अपनी फकिरा उपन्यास डॉ. बाबासाहब आंबेडकर की लेखणी को समर्पित किया था।

ऐसे घोर आंबेकरवादी साहित्यिक का अंत मुंबई स्थित गोरेगाव के सिध्दार्थनगर में निराशाजनक स्थिती में हुआ।

५) निष्कर्ष:

अण्णाभाऊ साठे ने अपने साहित्यों में सर्वहारा वर्ग को प्रमुखता से दिखाया है। जो अधिक सराहनीय है। उनके साहित्यों में मार्क्सवादी सिध्दांत भी पाये जाते है। उनके सभी साहित्यों से हमे नवचेतना मिलती है। उन्होंने जीवनवादी साहित्यों का निर्माण कियाँ यह उनके साहित्यों की प्रमुख खुबी है। ऐसे साहित्यप्रेमी को मेरा नीला सलाम।

संदर्भ सूची:

१) आहूजा राम, 'भारतीय समाज', रावत पब्लिकेशन जयपूर एवं नई दिल्ली सन २००२, पृ. १३
२) आंबेडकर बाबासाहेब, रघुवंशी गजेंद्र विट्ठल (अनु.), 'अस्पृश्य आणि अस्पृश्यता', रघुवंशी प्रकाशन, २४२, शुक्रवार पेठ, पुणे, पृ. २३८
३) संपा. मंडळ, 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङमय', महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, मुंबई, १ ऑगस्ट १९८८ पृ. १४
४) वही पृ. २२
५) वही पृ. २३
६) वही पृ. १२४८
७) वही पृ. १२४७
८) वही पृ. ७५

□□□

25

श्री एम०एन०राय और मार्क्सवाद:एक समीक्षा

डॉ. तिलकराज अण्डोला
जिला पिथौरागढ़, उत्तराखण्ड

****

मानववादी क्रान्ति ऊपर राजनीतिक सत्ता का अधिग्रहण करके समाज में आमूल परिवर्तन करने का प्रयास नहीं करेगी वरन् वह नीचे से जनता को स्वतंत्रता, समानता और भ्रातृत्व के लोकतान्त्रिक मूल्यों की शिक्षा देकर उसे ऐसी राजनीतिक, आर्थिक और सामाजिक संस्थाओं को संगठित करने में सहायता देगी जिनके आधार पर समाज में आमूल परिवर्तन लाया जा सकेगा। स्वतंत्रता के नैतिक मूल्य में आत्मनिर्भरता ओर विवेक के गुण होने आवश्यक हैं। मानवादी क्रान्ति मूल रूप से सांस्कृति क्रान्ति है अत: असे केवल राजनीतिक सत्ता के द्वारा सम्पन्न नहीं कराया जा सकता। भारत की केन्द्रीय और राज्य सरकारों के ऐसी सरकारों से यह आशा करना गलत होगा कि वह अच्छे समाज का निर्माण करेंगी। जब तक समाज के अधिकाश लोग अज्ञान और धर्मान्ध रहते हैं तब तक किसी क्रान्तिकारी समूह द्वारा राज्य सत्ता पर अधिकार करने के प्रयास से तानाशाही शासन पैदा होगा। नवचेतना के आधार पर जाग्रत जनता ही नवचेतना के लिये जनता में शैक्षिक और संगठनात्मक कार्य करने की आवश्यकता है।

मानववादी, समाज के सभी व्यक्तियों को, चाहे वे किसी वर्ग के हो, गरीब हो अथवा अज्ञानी हो, मानव मान कर स्वतंत्रता, विवेकवाद, धर्मनिरपेक्षता और लोकतान्त्रिक मूल्य के आधार पर मानव मूल्यों तथा नैतिकता के आधार पर उनसे समान व्यवहार करते हैं। इस नैतिक मूल्यों को स्वतंत्रता, समानता और भ्रातृत्व के मूल्यों से प्राप्त किया जाता है।

Vidyawarta®
Peer Reviewed International Refereed Research Journal
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed Pin-431126 (Maharashtra)

Certificate Of Publication

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper/article titled Aanna Bhau Sathe Ke Sahitya Mei Savhara Warg. of Dr./Mr./Miss/Mrs. Pramod Shivcharan Meshram

It is peer reviewed and published in the Issue 35 Vol. 03 in the month of July to September 2020.

Thank you for sending your valuable writing for Vidyawarta Journal.

Indexed (IIJIF)
Impact Factor 7.041
Govt.of India, Trade Marks Registry Regd.No.2611690
ISSN-2319 9318

Editor in chief
Dr.Bapu G.Gholap

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane Colleg
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

संशोधक

• वर्ष : १० • डिसेंबर २०२२ • पुरवणी विशेषांक १०

आज़ादी का
अमृत महोत्सव

18

स्थापना : १ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

18
LIBRARY
Pachal

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक।।

पुरवणी अंक १० – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

- शके १९४४
- वर्ष : ९०
- पुरवणी अंक : १०

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

- डॉ. प्रमोद एस. मेश्राम
- डॉ. बळवंत टी. दाभाडे
- डॉ. मनोहर आर. कोंडागुर्ले

✸ प्रकाशक ✸

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१. २१ व्या शतकातील बौद्धांचे सांस्कृतिक परिवर्तन : विशेष संदर्भ दक्षिण कोकण ---------- ९
– डॉ. प्रमोद एस. मेश्राम

२. २१ व्या शतकातील कविता : एक अभ्यास ---------- १४
– डॉ. बळवंत तुकाराम दाभाडे

३. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधून येणारे एकविसाव्या शतकातील शेतीचे प्रश्न ---------- २०
– डॉ.विकास शंकर पाटील

४. भारतातील नक्षलवादी चळवळीची समस्या : एक अभ्यास ---------- २३
– डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील

५. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर उद्योग : ग्रामीण विकास आणि समस्या ---------- २७
– कु.वनिता देवगोंडा पाटील

६. २१ व्या शतकातील पर्यटन – Tourism ---------- ३२
– डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले

७. २१ व्या शतकातील आदिवासींची राजकीय स्थिती ---------- ३८
– डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे-गणवीर

८. २१ व्या शतकामध्ये गीताचार्य तुकारामदादा यांनी राबविलेली गावगणराज्य चळवळ : एक ऐतिहासिक अध्ययन ---------- ४३
– प्रिती पारस ठिकरे, डॉ. नंदकिशोर पी. मने

९. भारतीय ग्रंथालये : एक ऐतिहासिक आढावा ---------- ४७
– सौ. जिरगे आशा चंद्रशोक

१०. माहिती तंत्रज्ञानाचे बदलते स्वरूप आणि २१ शतकातील आधुनिक ग्रंथालये ---------- ५१
– डॉ. शशिकांत वसंतराव वानखडे

P+UG ११. शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीने आजच्या काळात ऐतिहासिक पर्यटन स्थळांचे महत्त्व ---------- ५५
– डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव

१२. २१ व्या शतकातील महाराष्ट्रातील वाढते शहरीकरण : एक अभ्यास ---------- ६०
– प्रा.डॉ. देविदास विक्रम हारगिले

१३. महिला सक्षमीकरणात महिला आर्थिक विकास महामंडळाचे योगदान – एक अध्ययन ---------- ६५
– मंगला दुर्गादास बनसोड, डॉ. उषा खंडाळे

१४. बदलत्या शिक्षण प्रवाहात ग्रामीण भागातील शालेय बालकांच्या बौद्धिक क्षमतेचे अध्ययन ---------- ७१
– सौ. मेघा मोहन रतकंठीवार, डॉ. माधुरी नामदेव कोकोडे

२१ व्या शतकातील कविता : एक अभ्यास

डॉ. बळवंत तुकाराम दाभाडे
एम. ए., पीएच. डी.
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय
पाचल-रायपाटण ता. राजापूर, जि.रत्नागिरी
भ्रमणध्वनी : ९४२११४२७५५, ई-मेल : balwant.dabhade@gmail.com

सारांश :

समकालीन मराठी कविता हे आधुनिक मराठी कवितेचे चौथे पर्व आहे. पहिल्या पर्वामध्ये केशवसुताने इंग्रजी वळणाची सौंदर्यवादी भावकवितेची परंपरा कविता या साहित्य प्रकारामध्ये आणली. या पर्वामध्ये परिवर्तनवादी कालखंडाचे राज्य होते. दुसऱ्या पर्वातील बा.सी. मर्ढेकरांनी इंग्रजी वळणाची आधुनिकतावादी कविता मराठीमध्ये आणली. त्यामुळे या पर्वामध्ये या दोन परंपरांमधील ताण-तणाव दिसून येतो. या पर्वामध्ये सौंदर्यवादी भावकवितेची परंपराच अधिक गडद असल्याची दिसते. सौंदर्यवादी भावकवितेचा प्रभाव कमी झाला तरी, तो अध्यापही संपल्याचे दिसत नाही. चौथ्या पर्वातील समकालीन कवितेने लघुनियतकालिकाच्या चळवळीने निर्माण केलेल्या संकेताचा वारसा पुढे नेत त्याला शह देत आधुनिक वास्तवाचा अभ्यास, चित्रण करत आधुनिक माणसांचे अनेक पैलू या कवितेद्वारे दाखवलेले आहेत. दुसऱ्या आणि तिसऱ्या पर्वामध्ये दलित कवितेचा प्रवाह समृद्ध झालेला दिसतो. तसेच ग्रामीण स्त्रीवादी कवितेचा नवा प्रवाह याच पर्वात मराठीत आला. यामध्ये प्रसन्नकुमार पाटील, लक्ष्मीकांत तांबोळी आणि फ.मुं. शिंदे इत्यादी या पर्वातील वास्तववादी कवी आहेत. त्यांची कविता या काळातील बदलाचे निकष घेऊन आली आहे.

प्रसन्नकुमार पाटील यांची 'जबाला ते मेधा' (२००४) या प्रसिद्ध कवितासंग्रहातील कविता आधुनिकतावादी वळणाने जाणाऱ्या आहेत. सुरुवातीच्या काळातील त्यांची कविता प्रेम कविता आणि छंदोबद्ध स्वरूपाच्या होत्या. त्यांच्या कवितांवर पु.शि.रेगे यांच्या कवितेचा प्रभाव आहे. आधुनिक वास्तव आणि आधुनिक माणसांचे वास्तव चित्र त्या कवितांच्या केंद्रस्थानी आहे. त्यांची कविता तिसऱ्या पर्वामध्ये पाहिलेल्या चळवळीतील कवितेशी नाते सांगणारी आहे. त्यांच्या कवितेचा नायक वर्तमान प्रस्थापितांविरुद्ध बंड पुकारणारा, जात नाकारणारा, आपल्या आयुष्याचा धि:कार करणारा बंडखोर तरुण आहे. हा निर्वासित झालेला, कणाकणाने मरत जाणारा आहे. समकालीन कविता ईश्वरतत्त्वाशी चाललेला संघर्ष व संवाद या आशयाची जाणवते. अस्तिक्य-नास्तिक्य यांच्या जीवघेण्या संघर्षामध्ये नास्तिक्याच्या आणि ईश्वराच्या निषेदांचा सूरांचा संदर्भ असल्याचे जाणवतात. आधुनिक माणसांचा पेच हाच कवितेचा गाभा आहे. सर्वसामान्य माणूस व्यवस्थेला घाबरून चार भिंतीच्या खुराड्यात राहणारा आहे, पोट भरण्यासाठी फिरणारा, जीवन ही एक जन्मठेप आहे असा मानणारा आहे. अशा प्रकारे समकालीन कविता आधुनिकतावादी संवेदनशीलतेला दिलेला छेद आहे. त्यामुळे समकालीन मराठी कविता हे आधुनिक मराठी कवितेची महत्त्वाची पर्वे आहेत.

बिज शब्द : मराठी कविता, आधुनिक कविता, एकविसाव्या शतकातील कविता.

प्रस्तावना :

२१ व्या शतकातील कवितेचे विश्लेषण करताना सांस्कृतिक संकल्पनांचा संकर घडून आला आहे. कवितेला जोखताना तिच्याकडे केवळ एक साहित्यिक अभिव्यक्ती म्हणून न बघता कवितेसोबत त्या कवितेचा अर्थ प्रसरण पावतो आहे याचा विचार केला पाहिजे. कवितेचा प्रांत बदलला आहे. आणि तो पुढेही बदलणार आहे. आजची कविता जुन्या काळाच्या गर्भातून नवा काळामध्ये जन्माला घालणारी आहे. घासून गुळगुळीत झालेल्या पारंपरिक समजुतीवर आधारलेलं काळाचं स्थिर रूप एकविसाव्या शतकाला जुनं लागू झालेलं दिसते. १९९० नंतरच्या काळाला समजून घेणारं काळाचं पर्यायी रूप प्रस्थापित झालं आहे. या नव्या रूपाचे वैशिष्ट्ये म्हणजे ते प्रबोधनवादी आहे. एखादा रेडिओ सुरू करताना ज्या वेगाने तो सुरू होतो, त्यापेक्षाही जास्त वेगाने सभोतालचा काळ बदलत आहे. त्याला समजावून घेणं हे नव्या कवितेसमोरचं मोठं आव्हान आहे. १९९० नंतरचे रूप जुन्या, पारंपरिक काळाला ठाम मारून उभं राहिले आहे. एकविसाव्या शतकातील कवितेच्या सांस्कृतिक, विविध संकल्पनांचा संकर घडून येतो आहे. म्हणून १९९० नंतरच्या कवितेला समजावून घेणं बौद्धिकदृष्ट्या रोमांचकारी ठरले आहे. या काळाच्या प्रवाहात एकविसावे शतक खरे पाहाता एक

पण एक स्वतःचा चेहरामोहरा आहे. प्रबोधनाच्या विविध वळी, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोणाचा पाठपुरावा, सार्वत्रिक शिक्षण, भेद याविरुद्ध चळवळी, स्त्रीमुक्तीची विविध आंदोलने, वाद अशा विविध घडामोडी या काळातच घडल्या. त्यामुळे एकविसाव्या शतकातील कविता परिवर्तनवादी, वास्तववादी आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे :

२१ व्या शतकातील कवितांची उद्दिष्टे पाहाता मराठी काव्यसृष्टीतील एक व्यामिश्र असे पर्व आहे. मानवी अस्तित्वाचे सर्जनशील आत्मभान कवितेत आहे. या कवितांमध्ये आपल्या भावजीवनाचा उत्कट अर्थ व अनर्थ पाहणे ही एक आगळी प्रचिती या शतकातील कवितांची आहे. कवितांमध्ये सर्व घटनांविषयी लिहावे लागते. कविता संवेदनाक्षेत्रांचे दालन खुले करते. संवेदनाशीलतेच्या नानाविध शक्ती प्रकट करते. आपली भाषा, आपली कला, आपली परंपरा, समाज, संस्कृती इ.आपले अस्तित्व, आपली सुखदुःखे, विविध स्वप्ने या सगळ्यांची अपूर्व रूपे आपणास सादर करतात. या शतकातील अर्थपूर्ण जगणाऱ्या कवींनी आपापल्या कवितांमधून अर्थपूर्ण जगणारी जाणीव कवितेव्दारे मांडली आहे. २१ व्या शतकातील कविता लेखन केलेल्या कवींमध्ये लक्ष्मीकांत तांबोळी, निरंजन उजगरे, द.भा.धामणस्कर, गणेश विसपुरे, अरुण म्हात्रे, अशोक कोतवाल, श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, प्रवीण बांदेकर, मंगेश काळे, दासू वैद्य, किशोर कदम, मनोज बोरगावकर इ. कवींच्या कवितेतील ध्येयवाद आणि आदर्शवादाबरोबरच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक परिवर्तन यांची बांधिलकी असणाऱ्या कवितांचा परामर्श घेतला जाणार आहे.

एकविसाव्या शतकातील कविता :

लक्ष्मीकांत तांबोळी यांचा 'गोकुळवाटा' (२००४) या कवितासंग्रहातील कविता ताण-तणावातून निर्माण झालेल्या अस्वस्थ कविता आहेत. त्यांच्या कवितेतील वेदना, नकार आणि नैराश्य या अस्वस्थतेचे प्रतिक सर्वसामान्य माणसेच आहेत. त्यातून आलेल्या चिंतनातून सहज तत्वज्ञान हे त्यांच्या कवितेचे खरे सामर्थ्य आहे. या कवितांचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे राधा - कृष्ण यांच्यातील प्रणय-शृंगाराचे चित्रण होय. ती मागे जावून पु. शि. रेगे यांच्या नवसौंदर्यवादी कवितेच्या परंपरेशी जोडली आहे. तरी आधुनिक माणसांचा पेच हाच त्यांच्या कवितेचा गाभा आहे. हा माणूस चार भिंतींच्या खुराड्यात राहणारा, पोट भरण्यासाठी भटकणारा आहे. या आधुनिकतावादी जाणिवा या कवितेत आहेत. मरणाची जाणीवही या कवितेतील एक महत्त्वाची जाणीव आहे. सिंहाची आयाळ कुरतडणारा उंदीर, स्मशानातील कावळे, फुटपाथवरचा माणूस शेळ्या, पेच निर्माण करतात. पक्षाचे झाडाशी आणि झाडाचे जमिनीशी असलेले सनातन नाते जपणारी त्यांची कविता आधुनिकतावादी संवेदनशीलतेला दिलेला एक महत्वाचा छेद म्हणावा लागेल.

फ. मुं. शिंदे यांची कविता या शतकातील लोकप्रिय कवितेचे प्रातिनिधिक करणारी आहे. पहिल्या पर्वातील प्र. के. अत्रे यांची कविता सामाजिक व्यवस्थेवर विनोदी आणि टिपणी करणारी आहे. दुसऱ्या पर्वातील मंगेश पाडगावकर यांची कविता हलकी प्रेमगीते, भावविवश भावगीते, सामाजिक अनाचारावर केलेली उपहासात्मक टिपणी आहे. तिसऱ्या पर्वात ग्रेस आणि महानोर यांची कविता मुक्त प्रणय यामुळे लोकप्रिय झाली. त्यांच्या कवितेत कमी प्रमाणात ही सर्व लक्षणे दिसतात. 'मिथक' (२०००), 'क्षेत्र' (२००४), 'लाकडाची फुले' (२००६) या काव्यसंग्रहातील त्यांच्या कवितेचा आशय खूप व्यापक आहे. कवितांची हळवी भाषा कोमल स्वरूपाची आहे. नवसौंदर्यवादी भूमिकेशी जुळणारी आहे. आजच्या राजकीय वास्तवाचे चित्रण करणाऱ्या कवितांमध्ये स्वातंत्र्य, क्षमता आणि लोकशाहीवर केलेले उपहासात्मक टिपणी आहे. सामाजिक व्यंगावरही त्यांनी उपरोधिक भाष्य केले आहे. त्यांच्या सामाजिक जाणिवांच्या कवितांना महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे अधिष्ठान आहे. भूकंपग्रस्तांच्या, कष्टकऱ्यांच्या आणि स्त्रियांच्या वेदना मांडणाऱ्या कविताही त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या कवितेतील आशयाचा पट व्यापक आहे. मानवी अस्तित्वाचे काही मूलगामी प्रश्न घेऊन त्यातील कटू वास्तवावर मार्मिक भाष्य करणाऱ्या कविता आहे. सत्य - असत्य, न्याय - अन्याय, माणूस - नियती यांचे जीवघेणे संघर्ष कवितांचा आशय आहे. त्यांची कविता मानवी वेदनेने जागोजागी प्रश्नांकित झालेली दिसते, म्हणून या काव्यसंग्रहामधील त्यांच्या कविता चिंतनशीलतेचाही उल्लेख करणाऱ्या आहेत.

अशोक कोतवाल यांच्या 'मौनातील पडझड' (२००१)आणि 'कुणीच कसे बोलत नाही...'(२००९) या काव्यसंग्रहांतील कविता नवसौंदर्यवादी वळणाने जाणारी आहे. त्यातील प्रणय-शृंगाराची कविता छंदोबद्ध कविता आणि अल्पाक्षरी कविता हे एक विशिष्ट वळण दाखवतात. त्यानंतरच्या कवितांमध्ये आधुनिकतावादी वळण प्रभावी आहे. त्यामध्ये आधुनिक संस्कृती आणि आधुनिक माणसाचा पेच यावर उपरोधिक भाष्य करते आहे. सरते विसावे शतक आणि उगवते एकविसावे शतक यांच्या कोंडीत सापडलेली ही संस्कृती आहे. वरचेवर भयावह आणि अमानुष होत चाललेल्या आधुनिक वास्तवाचे उपरोधित

[illegible] या कवितेत आहे. गावाकडच्या कष्टकरी कुटुंबातून आलेल्या पण मध्यमवर्गीय झालेल्या निमशहरी भागातल्या सुशिक्षित तरुणाचा हा पेच आहे. तो एकाकी, संभ्रमित, पराभूत, तडजोडीला ओलीत गेलेला, नामुष्कीचे निरर्थक आयुष्य जगणारा आत्मवैरी माणूस आहे, वाळवंटात ऊन्हाने तडकलेला खडक, वणवा, वाळूचे घरटे, पिंजरा इ. प्रतिमा तसेच बंदिवान, कठपुतळी, गोगलगाय या प्रतिमा त्यांचा पेच दाखवतात. गिधाडे, मेंढरू, गारुड्याच्या खेळातला साप या प्रतिमाही त्यांच्या वर्तमान अवस्था दाखवतात. स्वतःचा निषेध करणारी त्यांची कविता आजचे भ्रष्ट राजकारण, समाजकारण, धर्मकारण आणि शिक्षण यांचाही वरच्या आवाजात निषेध करते. जागतिकीकरण, संगणकीकरण त्यातून उदयाला आलेली आधुनिक संस्कृती, या संस्कृतीतून आलेले बेगडी वागणे - बोलणे आणि या सर्वांमधून झालेले आजच्या जीवनाचे बाजारीकरण यांचा धिःकार या कवितांमध्ये त्यांनी वास्तवाचे भान ठेवून मांडलेले आहे.

त्यांची कविता मुक्तीच्या नव्या वाटा शोधताना दिसते. पिढीची आध्यात्मिक कोंडी या कवितेतही प्रतिबिंबित झालेली दिसते. एक म्हणजे या शोधाला अध्यात्मिक परिमाण आहे. त्याचबरोबर त्यांच्या काही खुणा या कवितेत सर्वत्र विखुरलेल्या आहेत अनामिक सत्य, अज्ञान सावली, अनादी अनंत योगी, वैराग्याच्या रुद्राक्षातील एकाग्रता, सम्यक शांतता आणि भगव्या सावल्या हे उल्लेख पाहण्यासारखे आहेत. प्रार्थना त्यांच्या लाडक्या कल्पना आहेत मुक्तीची दुसरी वाट हरवत चाललेल्या जिव्हाळ्याच्या कौटुंबिक नात्यात शोधताता दिसता. त्यांच्या आजी, आई, वडिल, पत्नी आणि विशेषतः मुलीवर लिहिलेल्या कविता त्यांच्या विशेष उल्लेखनीय कविता आहेत. इंग्रजी - मराठी शब्दांची सरमिसळ, काही ठिकाणी केलेला खानदेशी बोलीचा थेट वापर आणि काही ठिकाणी केलेला या बोलीचा कल्पक वापर ही त्यांच्या कवितेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

प्रवीण बांदेकर यांच्या 'येरू म्हणे' (२०००) आणि 'खेळ खंडोबाच्या नावानं'(२००५) या काव्यसंग्रहातील कवितेत गावाकडील परंपरा आणि विदेशातून आलेली आधुनिकता यांच्या कात्रीत सापडलेल्या एका तरुण कोकणी कवीचा पेच आहे. ग्रामीण कवितेची परंपरा आणि महानगरी कवितेची परंपरा या परस्पर विरोधी वाटणाऱ्या परंपरांची नाते सांगणाऱ्या कविता आहेत. ग्रामीण जीवनाचे आणि ग्रामीण मानसिकतेचे आधुनिकतावादी दृष्टिकोनातून केलेले उपरोधक चित्रण हे त्यांच्या कवितेचे वेगळेपण आहे. त्यात उध्वस्त होत चाललेले कोकणातील ग्रामीण जीवन, कोकणी माणूस यांचे वास्तव चित्रण आहे. आधुनिकीकरणाच्या आपल्या रूढी परंपरा आणि मूल्ये हरवत चालला आहे. प्रादेशिक परंपरेचे भान ठेवून त्यांची कविता प्रादेशिकतेची मर्यादित चौकट ओलांडून आधुनिक माणसाचा व्यापक पेच ही निर्माण करते. त्यांच्या कवितेतला येरू हा सामान्य माणसाचा प्रतिनिधी आहे. आधुनिक संस्कृती आणि त्यातून आलेले जागतिकीकरण आणि आजच्या जीवनाचे बाजारीकरण यांचा बळी ठरलेला हा असामान्य माणूस आहे. दहा बाय बाराच्या खोलीत संसारात मग्न असणारा आणि दैन्य दारिद्र्याने गांजलेला हा बेवारशी माणूस आहे. त्यांचे शोषण करणारी इथली व्यवस्था त्याला कधीही आपली वाटत नाही. अस्वस्थता, असुरक्षितता आणि जीवघेणी घुसमट अनुभवत जगणारा हा करंटा, कणा मोडलेला माणूस आहे. तो ठरवून स्वतःला नासवणारा आत्मनाशाची चित्रे पाहणारा, विसर्जनाला तयार असलेला, अडगळीत पडलेला माणूस आहे, तो पूर्ण श्रद्धाळूही नाही आणि पूर्ण पाखंडीही नाही. वारुळातल्या पिसाळलेल्या मुंग्या, मान खाली घालून लटकणारी वटवाघळे, उंदीर, डोंबाऱ्याच्या खेळातले वाघ या प्रतिमा यांचा पेच सूचित करतात. डोंगर चढण्याची कसरत करताना घसरणारा, ठेचाळणारा हा येरू ग्रीक कथेतल्या सिसिफसची आठवण करून देणारा आहे. कोकणी परिसरात आणि कोकणी माणसांच्या अंगात भरलेली कोकणी लोकगीतांची लय त्यांच्या कवितेने नेमकेपणाने पकडलेली आहे. त्यांनी केलेले पद्य - कवितेचे प्रयोग आठवण करून देतात. फुले आणि तुकाराम यांच्याशी उपरोधिक संवाद साधून त्यांच्या शैलीचा केलेला सर्जक उपयोग हेही त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्ये आहे. कोकणी शब्दांचा आणि कोकणी बोलीचा कल्पक वापर करून त्यातला गावरान गोडवा आणि अस्सलपणा त्यांनी आपल्या कवितेत जपला आहे.

हेमंत दिवटे यांच्या 'चौतिशीपर्यंतच्या कविता' (२००१) 'थांबताच येत नाही' (२००६) आणि 'या रूममध्ये आलं की लाईफ सुरू होतं...' (२०१२) या संग्रहातील कविता एकविसाव्या शतकाची संतप्त कविता आहे. एका महानगरीय माणसाचा व कवीचा पेच आहे. हा कंटाळलेला, सगळीकडून तुटलेला, उपेक्षित, दिशाहीन झालेला, मरणाच्या भीतीने अस्वस्थ झालेला महानगरीय माणूस आहे. आपण अपूर्ण चित्रासारखे पंगू झालो आहोत, फुटपावरचे अनाथ आहोत, मन अस्वस्थ झाले आहे. आपल्याला जगात कोणीही नाही या भावनेने, कोणत्यातरी वाटेवरून आपली वाटचाल सुरू आहे, असे त्याला वाटते. आपले सभोवतालचे जग परके जग आहे, आपण एकमेकांना शोधून घेणारे मसकरफआहोत असे तो ठामपणे सांगतो आहे. आधुनिक माणूस हा स्वतःसाठी जगतो आहे, दुसऱ्याच्या वाटेत अडथळे निर्माण करत आहे असे वाटते. एखाद्या उंदराला चोची मारून घाबरवणारे कावळे, आपल्यभोवती सापाचे वेटोळेच आहे, या पेचाला ही वास्तव साक्ष आहे.

सारख्या प्रतिमा त्याचा पेच सूचित करतात. काव्याच्या कथेप्रमाणे आपणही दोन इंचाचे झुरळ झाल्याचा अदभूत अनुभव कवीला येतो. आपणही झुरळासारखे सरपटत आहोत, पाळीव प्राणी आहोत असे त्याला नेहमी वाटते. मराठी कवितेच्या प्रांतात अमानवीकरणाची ही प्रक्रिया सुरू आहे असे वाटते. या कवितेतील आधुनिक माणसाचा कौटुंबिक पेच पाहण्यासारखा आहे. त्यात नवरा बायकोतील नात्यातला तुटकपणा, दुरावा आहे, यांत्रिक नाते आहे. कवीचे आपल्या म्हाताऱ्या आई-वडिलांशी असलेले नाते आता औपचारिक आणि केवळ फोनवरचे राहिले आहे. या शहरी कुटुंबातला नात्यांचा जिव्हाळा नाहीसा होत चालला आहे. स्वतःच्या मुलांच्या सहवासातही तो रमत नाही, कारण त्याला एकांत हवा आहे, पण त्यांना त्यांची मुले तो मिळू देत नाहीत. या कवितेत शहर आणि गाव यांच्यातील कवीला सतत सलणारे दुःख आहे. ही कविता गावाकडच्या आठवणीत पूर्णपणे हरवलेली आणि थोडीशी रमलेलेही आहे. गावाकडचे शेत, शाळा, मित्र - मैत्रिणी, इतकेच नव्हे तर मुलीच्या चित्रात नदी, देऊळ, पायवाट, आणि पक्षी कसे येतात याचे त्याला नवल वाटते. त्यांच्या नेनिवेत खोलवर घर करून राहिलेले हे गावाकडचे जग आहे. एकविसाव्या शतकातही या आधुनिक मराठी कवींचा शोधण्यासाठी चाललेला प्रयत्न अभ्यासण्यासारखा आहे.

मंगेश काळे यांच्या 'मंगेश नारायण काळेची कविता' (२००१), 'शक्तिपाताचे सूत्र' (२००४) 'नाळ तुटल्या प्रथम पुरुषाचे दृष्टांत' (२००७) आणि 'तृतीय पुरुषाचे आगमन' (२०१०) या काव्यसंग्रहातील कविता खऱ्या अर्थाने एकविसाव्या शतकाची कविता आहे. विसाव्या शतकातील कवितेने प्रस्थापित केलेल्या बऱ्याच संकेतांना छेद देणारी व पुढच्या शतकाची कविता आहे. नव्या शतकामधील वर्तमान संस्कृतीने कवीची आणि सामान्य माणसाची कोंडी केली आहे. त्याचा गुंतागुंतीचा पेच तेवढ्याच गुंतागुंतीच्या भाषेत मांडणारी ही अवघड अशा वळणाची कविता आहे. माणसांच्या भाषिक पेचाचे एक महारुपक या कवितेमध्ये साकार झालेले आहेत. एकविसाव्या शतकातला सामान्य माणूस आणि कवी आपली भाषाच हरवून बसला आहे. सर्वसामान्यांचे असे संकट आहे. कवीची आणि कवितेची भाषा यांच्यातील संबंध हे सामान्य माणसाची वेदना. विशेष म्हणजे सुरुवातीपासून मानवजातीचा चाललेला हा भाषिक खटाटोप विरोधाभासांनी कसा भरलेला आहे हे या कवितेत सांगितलेले आहे. भाषेचे व्याकरण आणि जगण्याचे व्याकरणातील गुड संबंध उघडून दाखवणारे एक महारूपक आहे. संस्कृतीचे एक महारुपकही या कवितेत साकार झाले आहेत. संतकवितेच्या अंगाने हे महारूपक उभारलेले आहे. त्यात विठ्ठल- रुक्माई, पंढरपूर - वारकरी यांच्यातील संबंधाचा परिपाक आहे. माणसाच्या मनातील श्रद्धा - अश्रद्धा यांचे द्वैत या रूपकाच्या केंद्रस्थानी आहे. त्यात ज्ञानेश्वरांची समाधी, त्याला भिडलेल्या अजानवृक्षाच्या मुळ्या, भिंत चालवणे या कथा - दंतकथांमधून ज्ञानेश्वरांच्या संतत्वाचा पेच मांडला आहे. त्यात वाघावर बसून आलेल्या चांगदेवाचेही रूपक आहे. माती तुडवणाऱ्या गोऱ्या कुंभाराच्या कथेतून माणूस - माती संबंध आणि त्यातील विनाश तत्त्व यांचे रूपक ही त्यात आहे. कांदा- मुळा -भाजी ही माझी विठाई आहे असे म्हणणाऱ्या सावता माळ्याचे रूपही त्यात आहे. आधुनिक माणसाच्या पेचाचे चिंतन करताना या कवीने संतकवितेतील अंतरिक विरोधाभासाचे आणि विसंगतीचे केलेले उपरोधिक चित्रण मराठी कवितेत नवे आहे. या संत कवींच्या दृष्टीचा आणि त्यांच्या कवितेचा या कवीने केलेला सर्जक उपयोगही अभ्यासण्यासारखा आहे. भौतिक वास्तवाला छेदून जाणारी त्यांची आध्यात्मिक दृष्टीही या कवितेत दिसते. या दृष्टीच्या खुणा त्यांच्या कवितेत सर्वत्र विखुरलेल्या आहेत.

सचिन केतकर यांच्या 'भिंतीशिवायच्या खिडकीतून डोकवताना' (२००४) या मराठी आणि 'अ डर्ज फॉर द डेड डॉग अँड अदरईन्कॅटेशन्स' (२००३) या इंग्रजी काव्यसंग्रहातील कविता द्वैभाषिक संवेदनशीलतेचे एकमेव उदाहरण आहे. बा. सी. मर्ढेकरांनी सुरू केलेली परंपरा आणि कोल्हटकर - चित्रे व सारंग यांनी ती परंपरा कशी पुढे नेली हे अभ्यासले आहे. केतकरांची कविता या पेक्षा वेगळी आहे. गुजरात सारख्या परप्रांतात जन्म घेऊनही त्यांनी मराठी कवितेचा प्रांत सक्षम केला आहे. मराठी कवितेचा निमित्ताने गुजराती आणि मराठी साहित्य परंपरा खूपच जवळ आल्या. केशवसुतांच्या पिढीमधील कवींपासून ते दिलीप चित्रे यांच्यापर्यंत मराठी कवितेची परंपरा बडोद्याशी, गुजरातशी जोडली गेली आहे. सचिन केतकरांची कवितेत सूरत आणि नवसारी या गुजरातमधील स्थळांचे उल्लेख आले आहेत. कवितेमधील गुजराती संदर्भ फार मर्यादित असल्याचे दिसते गुजराती आणि मराठी मिश्र संस्कृती आणि गुजराती - मराठी मिश्र भाषा यांचा म्हणावा तसा उपयोग त्यांनी कवितेत केलेला नाही. कानडी भागात राहून मराठी कविता लिहिणाऱ्या कवींच्या नोंदी झालेल्या दिसतात. सचिन केतकरांची अतिआधुनिक वाटावी अशी वेगळ्या घाटाची कविता आहे. वर्तमान माणसाच्या मानसिकतेचे चित्रण कवितेत उभे केले आहे. त्यांच्या कवितेला अतिवास्तववादी परिमाण आहे. त्यांच्या कवितेतही खिडकीसारखे आणि बंद पडलेले घड्याळ या कवितेतही गाजलेल्या प्रतिमा आहेत. तोंड म्हणजे संडासाचे पांढरे स्वच्छ कमोड, बॅगेत कलिंगडासारखे कापून ठेवलेले

[illegible] पेनाचे हस्तमैथून यासारख्या प्रतिमा काहीतरी [illegible] दाखवतात. हिरवा - पिवळा गल्लेलठ्ठ बेडूक, गांडूळ, [illegible], काळी विंचवीन आणि मेलेल्या घुशी या प्रतिमा वास्तव आणि आधुनिक माणसाचा पेच यातील फरक दाखवतात. या शिवाय कवितेतील निसर्गाचे विद्रूपीकरणाचाही केलेला विचार वास्तव आहे. दमेकरी संध्याकाळ, चंद्राचे मढे आणि सडणारा समुद्र अशा प्रतिमांमधून हे विद्रुपीकरण चित्रीत केले आहे. विपरीत कविकल्पना आणि तशीच विपरीत आणि विक्षिप्त शैली हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य असल्याचे अभ्यासाअंती समजते. संस्कृतीतील आपल्या जीवनाचे झालेले उलटे संदर्भ कवितेतून दिसतात संगणकाच्या भाषेचा कल्पक उपयोग, इंग्रजी शब्दांचा मनमोकळा वापर हे त्यांच्या शैलीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

महेंद्र भवरे यांच्या 'महासत्तेचे पीडादान' (२००५) या संग्रहातील कविता खाजगी व कौटुंबिक संदर्भ बाजूला ठेवून सामूहिक पेचाचे चित्रण करणाऱ्या कविता आहेत. अराजकाचे प्रक्षेपण करणारी, या अराजकाने समाविष्ट झालेली व निषेध करणारी कविता आहे. जागतिकीकरण, संगणकीकरण, मूलतत्त्ववाद, बेताल झालेली मनोरंजन संस्कृती आणि प्रसार माध्यमांचा निर्लज्जपणा यांचा निषेध या कवितेमध्ये आहे. या सर्वांना बळी पडलेल्या सामान्य माणसाची व्यथा आहे. ही स्थिती बदलण्याचे संकेत कोठेही दिसत नाहीत. ही कविता अवास्तवात समाविष्ट झालेली आहे. दलित मुक्तीपासून स्त्री मुक्तीपर्यंतच्या परिवर्तनाच्या सगळ्या सर्व राजकीय भूमिकेमूळे संपल्या आहेत. याचे चित्र कवितेमध्ये आहे. सामान्य माणसांच्या दृष्टीने हा समाज कवीला आपलासा वाटत नाही. माणूस अशा या जुलमी अर्थव्यवस्थेला बळी ठरला आहे, गावाकडील माणसांची आणि विशेषतः स्त्रियांची व्यथा या कवितेत मांडलेली आहे. शहरी व ग्रामीण भेद मिटवणाऱ्या या सामायिक क्रुरतेचे वास्तवाचे चित्रण कवितेत विस्ताराने आले आहे. अशा या अवस्थेतही ते बुद्ध, कबीर, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांना साकडे घालतात हे लक्षात घेण्यासारखे आहे, हे अंतिम दिलासा देणारे संदर्भ असतील तरच कोणतीही संस्कृती टिकते. शहरी भाषा आणि गावाकडची भाषा यांची कल्पक सरमिसळ हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या काही छंदोबद्ध कविता आणि ग्रामीण बाजाच्या कविता फार चांगल्या आहेत. लयीचे प्रयोग आपली सर्वांची दाद देऊन जातात. दाटीवाटीने बसलेले शब्द अगबंद ओळी व त्यांची घट्ट विणीची कविता सहज वश न होणारी थोडी अवघड जाणवते. हे अवघड वळण समर्थनीय आहे, कारण या कवितेतील आशयही तेवढाच गहन स्वरूपाचा आहे.

दासू वैद्य यांच्या 'तूर्तास' [illegible] या काव्यसंग्रहातील कवितेमध्ये उद्ध्वस्त झालेले [illegible] जीवन व नव्या औद्योगिक संस्कृतीच्या [illegible] हरवलेली शहरी संस्कृती यांच्यामधील [illegible] चित्रण केले आहे. हाच मध्यमवर्गीय [illegible]. [illegible] मधला रोगी, पाय कापलेला माणूस, [illegible] चरक, आणि मस्तवाल वाळवी या प्रतिमा [illegible] आहेत. त्यांच्या कवितेतील सरडा, झुरळे, [illegible], कुत्रे, [illegible] घसलेली खार अशा प्रतिमा अमानवीकरणाची प्रक्रिया [illegible] आहेत. दंश न करता फक्त फणा उगारणारे [illegible] साप आणि पालीने गिळलेला किडा ही रूपके या दृष्टीने महत्त्वाची आहेत. या कवितेमधील मरणाची आणि [illegible] तीव्र स्वरूपाची आहे. मरण-आत्महत्या त्यांचे [illegible] संदर्भ व सापाच्या प्रतिमेचे प्राबल्य यामधून साकार झाल्या आहेत. गावाकडच्या उद्ध्वस्त जीवनाचे चित्रही अस्वस्थ करणारे आहे. पडलेला वाडा, वाड्यात वाढलेले गवत, अंगणात [illegible] सुळसुळाट, या प्रतिमा गावाकडचे उध्वस्त जीवन [illegible] करताना दिसतात. वेळेवर न पडणारा पाऊस, आटलेल्या विहिरी, तुटपुंज्या कमाईवर गुजराण करणारे, दैन्य-दारिद्र्यात जीवन कंठत आपली सुखाची स्वप्ने पाहणारा अभागी एस. टी. ड्रायव्हर हा गावाकडच्या सामान्य माणसांचा प्रतिनिधी आहे. त्यांचे कविताविश्व सर्व बाजूंनी कोंडीत सापडलेले झालेले आहे. त्यामळे कोठेही मुक्तीची वाट दिसत नाही. देव, धर्म, अध्यात्माबरोबर पांडुरंग आणि तुकाराम त्यांच्या उपरोधाचे लक्ष्य झाले आहे. एवढाच आशय सर्वसामान्यांना दिलासा ठरेल असे म्हणावेसे वाटते.

श्रीधर नांदेडकर यांच्या 'सुफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून' (२००५) या काव्यसंग्रहातील कवितेत मध्यमवर्गीय तरुणाचा पेच मांडलेला आहे. प्रेम-द्वेष, सुख-दुःख, आणि आस्तिक्य-नास्तिक्य यांच्यातल्या सनातन संघर्षात सापडलेला हा माणूस आहे. यात्रेतून सुटून आपले एकाकी बेट शोधणारा, आतून उध्वस्त असलेला, स्थलांतराचा शाप लाभलेला, कोरडी विहीर, म्हाताऱ्या लियरचे मेणाचे घर, कटपुतळी आणि कृष्ण विवर या प्रतिमा त्यांचा पेच दाखवतात. त्याचबरोबर तडफडणारा मासा, अशुभ काळे मांजर, गिधाडे, उलटलेली घामीण, या प्रतिमाही पेच दाखवतात. ही कोंडी फोडून त्यांची कविता ही मुक्तीच्या निरनिराळ्या वाटा शोधताना दिसते आहे. अशा प्रकारे एकविसाव्या शतकातील वेगळ्या आशयाचे चित्रण करणारे वर्जेस सोलंकी, श्रीकांत उमरीकर, किशोर कदम, मनोज पाठक, अभय मुलाटे, मनोज बोरगावकर, गोविंद काजरेकर, पी. विठ्ठल, संतोष शेणई इ. कवींनी श्रेष्ठ दर्जाचा आशय मांडून एकविसाव्या शतकातील काव्य प्रांत [illegible] केला आहे.

NAGU KHAPANE COLLEGE OF ARTS & COM. PACHAL

समारोप :

एकविसाव्या शतकातील मराठी कवितेची गेल्या अनेक वर्षातील असलेली वाटचाल विस्ताराने पाहिली. ही माहिती विविध पर्वांमध्ये विस्तारलेली आहे. पहिल्या पर्वामध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये केशवसुतांनी इंग्रजी वळणाची सौंदर्यवादी भाव – कवितेची परंपरा मराठीमध्ये आणली होती. या पर्वामधून याच परंपरेचा एकछत्री अंमल होताना दिसतो आहे. दुसऱ्या पर्वामध्ये विसाव्या शतकामध्ये बा. सी. मर्ढेकरांनी इंग्रजी वळणाची आधुनिकतावादी कवितेची परंपरा मराठीत आणली होती. त्यामुळे या पर्वात या दोन्ही परंपरांमधील जाणवणारा ताणतणाव आपल्याला दिसत आहे. बा. सी. मर्ढेकरांच्या आधुनिकतावादी कवितेते मराठी कवितेत आणलेले परिवर्तन फार महत्त्वाचे व सकारात्मक होते. पण या पर्वातील कविता त्यांच्या वळणाची झाली नाही. या पर्वामध्ये सौंदर्यवादी भावकवितेची परंपराच वरचढ झालेली दिसते आहे. तिसऱ्या पर्वामध्ये मात्र सुर्वे, कोल्हटकर, चित्रे यांनी या सौंदर्यवादी भावकवितेच्या परंपरेला महत्त्वाचा छेद दिला आहे. बा. सी. मर्ढेकरांच्या आधुनिकतावादी कवितेचा विस्तार करत त्यांनी तिला नवे परिमाणे दिलेली आहेत. यात लघु नियतकालिकाच्या चळवळीतील कवींचे योगदान ही महत्त्वाचे वाटते. नामदेव ढसाळ यांची कविता त्याचा एक परिपाक आहे. परिणामी या पर्वात मात्र आधुनिकतावादी कवितेच्या परंपरेचे पारडे जड झालेले दिसते आहे. याही पर्वामध्ये काही लोकप्रिय कवींनी सौंदर्यवादी भागकवितेचा होत चाललेल्या परंपरेचा आश्रय घेत तिची प्रतिष्ठा टिकून ठेवल्याचे जाणवते. त्यामुळे या पर्वामध्ये सौंदर्यवादी भावकवितेचा विकास पूर्णपणे ओसरलेला दिसत नाही, हे खूप महत्त्वपूर्ण आहे.

समकालीन मराठी कविता हे आधुनिक मराठी कवितेचे चौथे पर्व होय. काही प्रमाणात हा तिसऱ्या पर्वाचा विस्तार आहे असे म्हणता येते. या पर्वात सौंदर्यवादी भावकवितेच्या परंपरेचे काही अवशेष पाहायला मिळतात. या परंपरेचा प्रभाव खूपच कमी झालेला दिसतो आहे. पूर्णपणे तो संपलेलाही दिसत नाही. कितीतरी वर्षे झाली तरी मराठी कवितेवर असलेली या परंपरेची पकड म्हणावी तेवढी ढिली झाली नाही, हे कटू वास्तव चिंताजनक असल्याचे दिसते. लोकप्रिय कवितेने तर अजून या परंपरेची कास सोडलेली नाही. सामान्य वाचकांना आणि श्रोत्यांना आजही या परंपरेचे खूप आकर्षण आहे. आजची कविता आधुनिकतावादी कवितेच्या परंपरेची कास पकडून आज कितीतरी पुढे गेलेली आहे. त्यात उत्तराधुनिक संवेदनशीलतेच्या काही प्रतिमा दिसत आहेत. पण दुसरीकडे सौंदर्यवादी भावकवितेतील प्रेमवेडे, निसर्गवेडे आणि हळवी काव्यात्मकता यांची कास धरून लोकप्रिय कविता वरचेवर शिरजोर होत चालली आहे. आपल्या आधुनिक कविता संस्कृतीतील हा विरोधाभास अभ्यासण्यासारखा आहे. समकालीन कवितेचे विश्लेषण करताना वेगवेगळ्या ध्रुवावर, अगदी विरुद्ध ध्रुवावर असलेले कवी पाहिले. त्यांचे वेगवेगळे दृष्टिकोन पहायला मिळतात. असे परस्परविरोधी विचार प्रवाह हे कोणत्याही निरोगी काव्य संस्कृतीचे आणि साहित्य संस्कृतीचे महत्त्वाचे लक्षण आहे. मराठी कवितेला उज्ज्वल भविष्यकाळ आहे, हे एकविसाव्या शतकातील कविता अभ्यासल्यावर लक्षात येते.

संदर्भ :

१. साहित्य : निर्मिती व समीक्षा : दि. के. वेडेकर, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती जानेवारी २००८.
२. ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा : डॉ.वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद, व्दितीय आवृत्ती डिसेंबर २०१०.
३. कवितेचा शोध : वसंत पाटणकर, मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती जानेवारी २०११.
४. नवं जग नवी कविता : विश्राम गुप्ते, संस्कृती प्रकाशन, पुणे , प्रथम आवृत्ती २०१६.
५. कविता विसाव्या शतकाची : संपादक – शान्ता ज.शेळके, प्र ना.परांजपे, वसंत आबाजी डहाके, निलिमा गुंडा, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती नोव्हेंबर २०००.
६. समकालीन मराठी कविता : एक निरीक्षण – प्रकाश देशपांडे केतकर, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती सप्टेंबर, २०१३.

■ ■ ■

॥ विद्या अमृतम् अश्नुते ॥

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal Pachal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL - RAYPATAN

At Post – Raypatan, Tal. – Rajapur, Dist. – Ratnagiri, 416 704
First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994
Permanent Affiliation No. Aff-II./ICD/2015-16/1121 dated 16.09.2015, ISO 9001:2015 Certified
❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

I.Q.A.C., Department of History, Marathi, Hindi, English and Commerce

Organized

One Day Interdisciplinary National Conference

On

Indian Council of Social Science Research

AMBEDKARITE HISTORY ASSOCIATION
ATTA DIP BHAV

India in 21st Century

Sponsored by

Indian Council of Social Science Research, Mumbai

In Collaboration with

Ambedkarite History Association, Mumbai

(Date: 14 October, 2022 Time : 10.30am To 5.00pm)

CERTIFICATE

This is to certify that, Dr./Prof./Mr./Miss. Balawant Tukaram Dabhade of Shri. M. H. Khapane College of Arts & Comm. Pachal actively participated & presented a paper entitled "२१व्या शतकातील कविता : एक अभ्यास" in One Day Interdisciplinary National Conference held on 14/10/2022 at Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerce, Pachal-Raypatan.

		P.S.Meshram	
Dr. Sandesh Wagh	**Prof. Sanjay V. Nimbalkar**	**Dr. Pramod. S. Meshram**	**Hon. Manohar H. Khapane**
Founder President, Ambedkarite History Association, Mumbai	Asst. Prof. IQAC Coordinator Shri. M.H.K.College of Arts & Commerce, Pachal-Raypatan	I/c Principal, Shri. M.H.K.College of Arts & Commerce, Pachal-Raypatan	President, Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal Pachal

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHA
COLLEGE OF ARTS & COM.
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist-

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

One Day National Interdisciplinary Conference 28 April 2023

Organized by Rayat Shikshan Sanstha'sProf. Dr. N.D. Patil Mahavidyalaya, Malkapur (Perid)

Rayat Shikshan Sanstha's
Prof. Dr. N. D. Patil Mahavidyalaya, Malkapur (Perid)
One Day National Interdisciplinary Conference
On
Literary Trends and Issues in 21stCentury
Friday, 28 April 2023
Organized by
Departments of Marathi, Hindi, English, and IQAC

Chief Editor: - Dr. Gholap Bapu Ganpat

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

12) एकविसाव्या शतकातील ग्रामीण कादंबरीतून व्यक्त झालेल्या समस्या
प्रा. डॉ.प्रशांत मल्लिकार्जुन लगडे, धुळे ||67

13) एकविसाव्या शतकातील मराठी आत्मकथन परमदृष्टी : एक आकलन
कु.किशोर सुभाष मुठेकर, हडपसर ||71

14) मानवी जीवनाचा अर्थ उलगडणारी साहित्यकृती: 'अर्थाच्या शोधात'
विश्वास बंडू सुतार, कोल्हापूर ||74

15) एकविसावे शतक आणि मराठी कविता
प्रा. बाळासो आ. सुतार, मलकापूर ||80

16) शेतकऱ्याच्या व्यथा मांडणारी 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट'
प्रा. प्रदिप प्रकाश कदम, रत्नागिरी ||88

17) मराठी लघुअनियतकालिकांतील कविता
सौ. कमल दिनेश येऊल, पुणे ||90

18) ~~२१ व्या शतकातील कविता 'माझ्या हयातीचा दाखला'~~
श्री ~~सुनिल [illegible] देसाई~~ ~~||95~~

19) अस्वस्थ करणाऱ्या वास्तवाचा वेध घेणारे आत्मकथन 'जसं घडलं तसं' ✓
डॉ. विकास शंकर पाटील, जि. रत्नागिरी ||98

20) एकविसाव्या शतकातील मौखिक परंपरेचे रूप स्वरुप
प्रा. एस. बी. जांभेकर, सोलापूर ||102

21) एकविसाव्या शतकाच्या कादंबरीतील समाजचित्रण
प्रा. डॉ. माधव मा.भोसले, नेसरी ||106

22) मराठी विज्ञानकथेचे विषय आणि वास्तव
प्रा. डॉ. अतुल चौरे, सतीश दशरथ पाटील ||110

23) एकविसावे शतक : वास्तवातील अनुभव (कथा)
प्रा. उदय बाळासो शिंदे, जि. कोल्हापूर ||113

24) प्राण पिशाच्च एकविसाव्या शतकातील : अदभूत कथा
प्रा. निलेश नामदेव कांबळे, जि. कोल्हापूर ||114

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

शोधनिबंधाच्या निमित्ताने एका साहित्यकृतीचा अभ्यास करण्यासाठी डॉ. विशाल इंगोलेंचा 'माझ्या हयातीचा दाखला' या काव्यसंग्रहाचा अभ्यास केला. या काव्यसंग्रहात एकूण ७५ कविता आहेत. या कवितांचा आशय, सामाजिक, राजकीय, धार्मिक स्वरूपाचा आहे. इंगोले हे प्रतिभासंपन्न कवी असून त्यांच्या सर्वच कविता या कसदार व आशयसंपन्न अशा आहेत. समाजातील अनेक प्रश्नांचे त्यांनी बारकाईने निरीक्षण करून आपल्या कवितेच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नात ते यशस्वी ठरले आहेत. मराठी साहित्यविश्वात त्यांच्या रूपाने एक दर्जेदार, प्रतिभासंपन्न, संवेदनशील वृत्तीचा कवी लाभला आहे असे म्हणता येईल.

संदर्भ –

१. डॉ. जाधव भिमराव भरत व प्राचार्य डॉ. मेनकुदळे शिवलिंग 'तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा', तौलनिक साहित्याभ्यास' प्रकाशक नांदवडेकर व्ही. डी. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, प्र दि. २०१९–२०२०, पृष्ठ क्र. ७०,७१

२. दीक्षित स्वाती 'सेट/नेट मराठी पेपर –२' निराली प्रकाशन प्र.दि. जानेवारी २०२३, पृष्ठ क्र. ७.

१

⌘⌘⌘

19

अस्वस्थ करणाऱ्या वास्तवाचा वेध घेणारे आत्मकथन 'जसं घडलं तसं'

डॉ. विकास शंकर पाटील
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य
महाविद्यालय, पाचल– रायपाटण, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी

****

मराठी साहित्यात कथा,कादंबरी, नाटक,चरित्र, आत्मचरित्र (आत्मकथन), प्रवास वर्णन असे विविध साहित्य प्रकार स्थिरावलेले दिसतात. मराठी सत्तेच्या अस्तानंतर इ.सन. १८१८ पासून ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात स्थिरावली. त्यानंतरच्या कालखंडात इंग्रजी साहित्याशी मराठी अभ्यासकांचा परिचय झाला आणि अनेक नवे साहित्य प्रकार मराठीत निर्माण झाले. आत्मचरित्र लेखन हा साहित्यप्रकार ही इंग्रजी साहित्याच्या परिचयातूनच मराठीत रूढ झाल्याचे दिसते. आत्मचरित्र लेखनाच्या पूर्वपरंपरा मराठीत दिसत असल्या तरी आपले चरित्र लिहावयाचे आहे या भूमिकेतून लेखन इंग्रजी कालखंडात सुरू झाल्याचे दिसते. 'माणूस १०० चरित्र लिहू शकेल पण एक आत्मचरित्र लिहू शकत नाही' असे म्हटले जाते. आपण स्वशी प्रामाणिक राहात आपल्याच आयुष्याचे कंगोरे उलगडून दाखवणे हे सोपे काम नाही. आपल्या जीवनाचा बराचसाच भाग असा असतो की तो इतरांना कळूच नये ही मानवी स्वभाव इच्छा असते. त्यामुळेच आत्मचरित्र लेखनाकडे लेखक फारसा वळत नाही.

आत्मचरित्र एक साहित्यप्रकार:

आत्मचरित्र हा साहित्यप्रकार मराठीत आता रूढ झाला असला तरी त्याच्या पाऊलखुणा शोधताना आपल्याला संत नामदेवापर्यंत जावे लागते. संत नामदेव हा पहिला पद्य आत्मचरित्रकार म्हणून ओळखला जातो. त्यानंतरच्या संतांच्या काळात काहीशी आत्मचरित्रपर

MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COM. PACHAL

रचना आली असली तरी गद्यातून हा अविष्कार फार कमी दिसतो. बखर गद्यात आपल्याला नाना फडणवीसाचे आत्मचरित्र व गंगाधर शास्त्री पटवर्धन यांचे आत्मचरित्र ही दोन आत्मचरित्र दिसतात. यानंतर इंग्रजी कालखंडातच मराठीत आत्मचरित्र लिहिले गेले. घ्स्वातंत्र्योत्तर तर सर्वच क्षेत्रातील व्यक्तींनी आपली आत्मचरित्रे लिहिल्याने यानंतरच्या कालखंडात आत्मचरित्रांची संख्या लक्षणीय दिसते. हा वास्तववादी साहित्यप्रकार आहे. म्हणूनच डॉ आनंद यादव आपल्या आत्मचरित्र मीमांसा या ग्रंथात म्हणतात "आत्मचरित्र हा साहित्य प्रकार आपण मानला तरी ललित साहित्याचे स्वरूप असे कल्पितवास्तव या प्रकारचे असते तसे आत्मचरित्र –आत्मकथनाचे स्वरूप नसून ते प्रत्यक्षातील वास्तव या स्वरूपाचे असते. शिवाय वाङमयीन कलात्मक भाषाशैली आत्मकथनपर लेखनात अपेक्षित नसते. म्हणून हा साहित्यप्रकार वास्तववादी ठरतो "१" जीवनातील वास्तव लोकांच्या समोर मांडणे हीच लेखकाची प्रेरणा असते. त्यामुळे हा साहित्यप्रकार वाङमयीन गुणांनी नटवायचा नसतो तर आपल्या जीवनातील अनुभव शब्दबद्ध करावयाचे असतात.

आत्मचरित्र आणि आत्मकथन:

आत्मचरित्रपर लेखनास अनेक नावांनी संबोधले जाते. आत्मचरित्र, आत्मकथन, आत्मकथा, आत्मनिवेदन, स्व–कथन अशा विविध संज्ञा त्यासाठी वापरल्या जातात. आत्मचरित्र, आत्मकथन, आत्मकथा या एकाच प्रकारच्या संज्ञा वाटत असल्या तरी त्यात अर्थपूर्ण अशा भिन्नछटा आहेत. यासंबंधी अरुण टिकेकर असे म्हणतात की "आत्मचरित्र व आत्मकथन हे समानार्थी शब्द वाटत असले तरी त्यात एक फरक आहे. आत्मचरित्र हे उण्यापुऱ्या आयुष्याचे चित्र असते. तर आत्मकथनासाठी आयुष्याचा एखादा कालखंड ही पुरतो "२" म्हणजे बऱ्याच वेळा उतार वयात आत्मचरित्र लिहिले जाते. याउलट 'मन मे हे विश्वास' सारखे आत्मकथन ऐन उमेदीत लिहिले जाते. आत्मचरित्रात बऱ्याचदा संपूर्ण जीवन कथा सांगितली जाते. याउलट जीवनातल्या विशिष्ट टप्प्यावर आत्मकथन लिहिण्याची लेखकाची इच्छा प्रबळ होते. तिथेपर्यंतचा आयुष्याचा भाग लेखक आपल्या आत्मकथनात लिहितो. मराठी साहित्यात दलित आत्मकथनांनी आत्मकथन ही संज्ञा अधिक प्रशस्त व रूढ केली. पुढे आत्मचरित्र, आत्मनिवेदन, स्वकथन या साऱ्यांपेक्षा आत्मकथन हीच संज्ञा सर्वमान्य होऊन मराठीत रुजल्याचे दिसते.

आत्मकथन लेखनाची प्रेरणा:

आपण जसे जगलो ते लोकांना सांगावे. आपल्या वाट्याला आलेला संघर्ष आणि त्या संघर्षातून आपण मिळवलेले यश, आपल्या या संघर्षात लाभलेली विविध व्यक्तींची साथ सोबत, आपल्या जीवन कहाणीतील कारुण्य, आपल्या या जगण्याचे मनात वागवले जाणारे ओझे शब्दबद्ध केल्यावर मन हलके होण्याची भावना या साऱ्या आत्मचरित्र लेखनाच्या प्रेरणा आहेत .

मराठी आत्मकथनांची वाटचाल:

मराठीत आत्मचरित्राचे लेखन इंग्रजी कालखंडात सुरू झाले. दादोबा पांडुरंगाचे 'आत्मचरित्र ', बाबा पद्मनजींचे 'अरुणोदय' काशीबाई कानिटकरांचे 'माझे शिक्षण ', लक्ष्मीबाई टिळकांचे ' स्मृतीचित्रे ', पार्वतीबाई आठवल्यांची 'माझी कहाणी', सी. ग.देवधरांचे 'जीवनवृत्तांत' या प्रारंभीच्या आत्मचरित्रानंतर सर्वच क्षेत्रातील व्यक्तींनी आपली आत्मचरित्र लिहून मराठी आत्मचरित्र लेखनाचा प्रांत समृद्ध केला. साठोत्तरी साहित्यात आत्मकथन ही संज्ञा रूढ झाली आणि आत्मकथन लेखनास चालना मिळाली. मराठीत दलित आत्मकथनांनी आत्मकथन लेखनाचा प्रांत समृद्ध केला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दया पवारांचे 'बलुतं ',प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी', शंकरराव खरातांचं 'तराळ अंतराळ', लक्ष्मण माने यांचे 'उपरा 'अशी कितीतरी आत्मकथने प्रारंभीच्या कालखंडात लोकप्रिय झाली. दलित लेखकांबरोबर स्त्रियांनी देखील आत्मकथनाचा प्रांत समृद्ध केला. दलितांबरोबरच सवर्ण समाजातील स्त्रियांनीही आपली आत्मकथने लिहिली आहेत. प्रारंभीच्या कालखंडात पती परमेश्वर या भूमिकेतून लिहिलेली आत्मचरित्र दिसतात. नंतरच्या कालखंडात ही आत्मचरित्र स्त्रियांच्या अंतकरणातील व्यथा वेदनेचा वेध घेताना दिसतात. जशी आत्मकथने विविध जातीतील स्त्री–पुरुषांनी लिहिली त्याप्रमाणे विविध धर्मीयांची ही आत्मकथने नंतरच्या कालखंडात

प्रकाशित झाली आहेत. असेच एक समाजविकृतीचे दर्शन घडवणारे आणि स्त्रीला दुर्बल समजून तिच्यावरील अन्यायाचा पाढा वाचणारे या अन्यायाशी दोन हात करत स्वत:ला सिद्ध करणाऱ्या स्त्रीचे आत्मकथन म्हणजे २००५ ला प्रकाशित झालेले 'जसं घडलं तसं' हे आत्मकथन होय. पुरुषांपेक्षा स्त्रिया आत्मकथन लिहिताना त्यांच्यावर अधिकच मर्यादा येतात. सासर,माहेर, समाज या सर्वांना सांभाळून आपल्या जीवनाचे अंतरंग उलघडून दाखवताना त्यांची कसोटी लागते. नीलम माणगावे यांनी 'जसं घडलं तसं 'या आत्मकथनातून आपला जीवन वृत्तांत जसाच्या तसा मांडला आहे.

'जसं घडलं तसं' चं मुखपृष्ठ आणि शिर्षक:

या आत्मकथनाच्या मुखपृष्ठावर प्रशस्त वाड्याचे द्वार असून त्यापुढे फिकट काळसर रंगात पुरुषाचे तोंड असून त्यापुढे एक माता आणि तिच्या तीन मुली असे बोलके चित्र आहे. वाड्यासाठी घडलेले नाट्य, पुरुषी अहंकाराने भारलेला आणि ऐतखाऊ नवरा आणि तीन मुलींना आत्मविश्वासाने कवटाळणारी विधवा माऊली असे मुखपृष्ठावर खूपच बोलके चित्र आले आहे. मलपृष्ठावरील

जसं घडलं तसं आत्मकथनातील अनुभव विश्व आणि सत्य दर्शन:

या आत्मकथनाची एकूण ११ प्रकरणे असून मानवी जीवनातील जगण्याची गुंतवणूक उलगडून दाखवण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. लेखिकेने स्वत:बरोबरच अनेकांच्या जगण्याची गुंतागुंत उलघडून दाखवली आहे. या आत्मकथनात आत्मप्रौढी कुठेही आलेली नाही. या आत्मकथनात कोरेची, सांगवडे,रुकडी आणि कोल्हापूर या गावातील एकूणच समाज जीवन,तेथील धर्म, रूढी, परंपरा, परिस्थिती आणि या परिस्थितीत पदरात तीन मुली असलेली विधवा स्त्री कशी जगते, समाज तिला किती त्रास देतो, तिच्या मुलींचे बालपण कसा हिरावून घेतो, भीतीच्या छायेखाली हे कुटुंब कसे जगत रहतं, एखाद्याला साध्या वाटणाऱ्या गोष्टीने दुसऱ्याचे जीवन कसे उध्वस्त होते या साऱ्याचे वास्तवदर्शी जसच्या तसं चित्रण या आत्मकथनात आलं आहे.

राघोबा पाटलांचा राजवाड्यासारखा रुकडीतील वाडा आणि शंभर एकर शेत जमिनीला वारस मिळावा म्हणून राघोबा पाटलाच्या विधवा सुनांपैकी रुक्मिणीबाईने आपल्या नंदेचा मुलगा दत्तक घेतला. तिची जाऊबाई लक्ष्मीबाईने आपली मुलगी त्याला दिली. अशा पद्धतीने रक्ताचा वारस इस्टेडीला असावा म्हणून हा प्रयत्न झाला. आपल्या जावेने दत्तक घेतलेल्या मुलास इस्टेट मिळेल म्हणून लक्ष्मीबाईने दुसरा मुलगा दत्तक घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे रागावलेल्या नीलम माणगावेच्या वडिलांनी आपल्याच सासूचा खून केला. हे प्रकरण उघडकीस आल्यावर नीलम माणगावेच्या वडिलांना शिक्षा झाली. ते तुरुंगात असताना बाळंतपणात त्यांच्या पत्नीचे निधन झाले. त्यानंतर ३२ वर्षाच्या पुरुषाशी अकरा वर्षाच्या कोवळ्या मुलीचे लग्न झाले. ती कोवळी मुलगी म्हणजे लेखिकेची आई होय. लग्नानंतर कोरोची गावात कोवळ्या ताराबाईचा संसार सुरू झाला. काही वर्षात तिला तीन मुली झाल्या. पहिल्या दोन मुली नंतर बऱ्याच वर्षांनी नीलमचा जन्म झाला. एकदा वादळी पावसात त्यांचे घर पडले आणि त्यांनी रुकडीतील वाड्यात रहायचा निर्णय घेतला. त्या वाड्यात अगोदरच राहणाऱ्या मावस काकाला नीलमच्या कुटुंबाचे तेथे येणे पसंत पडले नाही. त्यांच्या कुटुंबीयांकडूनही खूपच त्रास लेखिकेच्या कुटुंबाला झाला. नीलमचे वडील काहीच काम करत नव्हते. अखेरच्या काळात तर त्यांना लकवा मारला होता. त्यांनी कोर्ट कचेरी साठी बरीच जमीन विकली होती. ताराबाईचे त्यांनी खूप हाल केले. त्यांच्या मृत्यूनंतर वाड्याला मालक राहिला नाही. त्यामुळे गावकऱ्यांकडूनही खूपच त्रास लेखिकेच्या कुटुंबाला झाला. वाड्याच्या भिंतींची माती चोरणे, तेथील मोकळ्या जागेत जनावरे बांधून घाण करणे, वाड्याच्या कोपऱ्यातील अंधाऱ्या खोलींचा उपयोग आपली विकृत वासना भागवण्यासाठी करत असल्याचे दृश्य लेखिकेने अनेक वेळा पाहिले. लेखिकेच्या घरी येणाऱ्या शिक्षकाकडूनही लहान लेखिकेला वाईट अनुभव आल्याचे लेखिकेने सांगितले आहे. वाड्याच्या मागील बाजूस असणाऱ्या बागेतील फुले फळे ही गावातील उनाड पोरांनी लेखिकेच्या कुटुंबाच्या वाट्याला' कधीच येऊ दिली नाहीत. तालमीत येणाऱ्या मुलांच्या कडूनही सातत्याने त्रास होत राहिला. पडक्या वाड्याच्या

आडोशाला उभे राहून निर्लज्ज पुरुष लघवी करत असायचे. अशा अनेक प्रकारांनी या कुटुंबाला त्रास होत राहिला. लेखिकेने कोणताही आडपडदा न ठेवता आपल्या जीवनात घडलेलं जसं च्या तसं सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या आत्मकथनास एक वेगळी उंची मिळाली आहे. कुटुंब प्रमुख करता पुरुष नसलेल्या घरातील महिलांशी समाज कसा वागतो त्याचे वास्तव उदाहरण हे आत्मकथन आहे. नीलम माणगावे यांच्या आईचा परिस्थितीशी समाजाशी आणि जीवनाशी चाललेला संघर्ष वाचकांनाही अस्वस्थ करणारा आहे. वडिलांनी केलेल्या चुका त्यांच्या निधनानंतरही या कुटुंबाला त्रास देत राहतात. प्रत्येक धर्मात रूढी आणि परंपरात स्त्रियांना गुंतवले जाते आणि समाजही त्यांचा छळ करत राहतो याचं वास्तव दर्शन या आत्मकथनातून घडते. समाजातील सोशिक स्त्रियांच्या वाट्याला अधिक दु:ख येताना दिसते. लेखिकेच्या आईने प्रत्येक संकट आपल्यावर घेऊन आपल्या मुलींना सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नीलम माणगावे यांना आपल्या आई विषयी अपार आदर असल्याचे दिसते. एकूणच हे आत्मकथन स्त्रीला कराव्या लागणाऱ्या संघर्षाचा वेध घेणारे आहे.

निष्कर्ष

१) हे आत्मकथन नावाप्रमाणे जसं घडलं तसं व्यक्त होताना दिसते.

२) जैन कुटुंबातील वास्तवाचा वेध हे आत्मकथन घेताना दिसते.

३) कोणत्याही धर्मात व समाजात स्त्रियांचे दुय्यमत्व आजही कसे टिकून आहे याचे दर्शन या आत्मकथनातून होते.

४) जैन धर्मातही वंशाला वारस म्हणून मुलगा असावा अशीच मानसिकता दिसते.

५) आपल्या संपत्तीला आपल्या रक्ताचा वारस असावा अशी मानसिकता आजही समाजात रूढ असल्याचे दिसते.

६) एखाद्या कुटुंबात सलग मुली जन्मल्यास त्यासाठीही त्या मुलीच्या मातेलाच दोषी धरण्यात येते.

७) कुटुंबातील कर्ता पुरुष एखाद्या गुन्ह्यात अडकला तर समाजही त्या कुटुंबाकडे वाकड्या नजरेनेच बघत राहतो.

८) निराधार कुटुंबाला आधार देण्यापेक्षा त्या कुटुंबाचा छळवाद मांडताना समाज दिसतो.

९) वडिलांपेक्षा खंबीरपणे समाजाविरुद्ध उभी राहून संघर्ष करणारी आई या आत्मकथनाच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसते .

१०) अन्यायाविरुद्ध स्त्रियांना लढण्यासाठी बळ देणारे हे आत्मकथन आहे.

संदर्भ:

१) आत्मचरित्र मीमांसा, डॉ. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, प्रथम आवृत्ती,१९९८

२) ललित(चरित्र –आत्मचरित्र विशेषांक), अरुण टिकेकर, मॅजेस्टिक प्रकाशन, जून– जुलै २०१३

३) जसं घडलं तसं, नीलम माणगावे, श्रीपाद प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २०००

⌘⌘⌘

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAP.
COLLEGE OF ARTS & COM.PAC.
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

PACHAL

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

॥ संशोधक ॥

पुरवणी अंक ९ – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

- **शके १९४४**
- **वर्ष : ९०**
- **पुरवणी अंक : ९**

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

- डॉ. प्रमोद एस. मेश्राम
- डॉ. बळवंत टी. दाभाडे
- डॉ. मनोहर आर. कोंडागुर्ले

✷ प्रकाशक ✷

श्री. संजय मुंदडा
कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ
सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

INDEX

1. **Modern Libraries: The Need of 21st Century** ---------- 5
   - Manohar Ramulu Kondagurle ----------
2. **Annihilation of Casteism in 21st Century Reality or Myth** ---------- 8
   - Dr. Santosh Bansod ----------
3. **Availability of E-Resources and Services in the Grant in Aid College Libraries in Chandrapur District affiliated to the Gondwana University, Gadchiroli : A Study** ---------- 13
   - Mohan Shashikant Ratkanthiwar ----------
4. **Changes in Communication and Technology in 21st Century** ---------- 20
   - Dr. Vidhya Sharad Modi ----------
5. **Locating Tribal Life and Culture in Gopinath Mohanty's *Paraja*** ---------- 24
   - Dr. Dharmapal Babaji Fulzele ----------
6. **21st Century Challenges of English Language Teaching in Rural Areas and Suggestopedia** ---------- 28
   - Ashutosh Manohar Popate ----------
7. **National Education Policy 2020 and Implications on Higher Education in Rural India** ---------- 32
   - Dr. Prem Bhagwan Acharya ----------
8. **Health Tourism in India: 21st Century** ---------- 37
   - CMA(Ms.) Shameem Memon ----------
9. **Role Of Women Entrepreneurs in Micro, Small and Medium Enterprises(MSMEs) in India in 21st Century** ---------- 43
   - Neha Abhishek Singh ----------
10. **Accessible Opportunities And Challenges Faced By Scheduled Caste Entrepreneurs In Western Maharashtra**
    - Dr. Santoshkumar B. Yadav, Rahul Uttam Bansode ----------49
    - Sudha Sambhaji Kamble ----------
11. **Twenty-first century Libraries** ---------- 60
    - Dr. Swati S. Shambharkar ----------
12. **Constitutional Mandate And Annihilation Of Caste** ---------- 64
    - Dr. Umesh N. Udapure ----------
13. **Assessment of The Job Satisfaction of Asha Workers in Corona Pandemic 2019 (Study of ASHA workers from Nanashi PHC, Nashik)** ---------- 73
    - Prof. Chandraprabha Tryambak Nikam ----------

Modern Libraries: The Need of 21st Century

Manohar Ramulu Kondagurle
Librarian
Shri. M. H. Khapane College of Arts and Commerce, Pachal
Tal. Rajapur, Dist. Ratnagiri – 416704
Mob. 9422590940, Email- mkondagurle007@gmail.com

Abstract:

The purpose of the research paper is to define modern libraries in the context of 21st century. Therefore the study has conducted as "Modern Libraries: The need of 21st Century". The method of study was collected available primary and secondary resources and reviewed it in the context of modern libraries in the 21st century.

Keywords: Modern Library, Modern Librarian, 21st Century Library, Digital Library.

Introduction :

Indian libraries in 21st century's are reinventing themselves for providing information more accessible via internet and in the digital form. Present libraries are not meaning only the store house of printed materials; they are connecting readers with collective knowledge. Still printed materials are playing crucial role in helping readers, at the same time modern technologies are offering additional pathways to readers and information acquisition. In the 21st century learners, researchers and also the readers do not need library only for issue returning of reading materials. But they need place where they get encouragement for participatory learning and build knowledge from different resources. So, present day libraries are not becoming archiving centers, but it is becoming learning centers (Hollad, 2015).

In 21st century, every reader is possessing global library in single device at their hand. Therefore the library role is getting more importance while providing services to readers. Libraries are providing resources as well as creating space for exploring, generating information and collaborating among the reader community. Due to the reason, library bringing traditional as well as electronic information together for creating knowledge hub.

Objectives of the Research Paper :

i) To understand the modern libraries in 21st century context.
ii) To explore the nature of libraries in 21st century.
iii) To know the importance of libraries in 21st century.

Research Method :

The study is based on the available literature from primary and secondary sources. During the study carefully collected resources and reviewed in the context of modern libraries are the need of 21st century.

Significance of the Study :

The study is focused on the modern libraries in the context of 21st century. Information and communication technologies have brought tremendous changes in the nature of libraries meanwhile the needs of libraries have been growing. Therefore the study constituted as "Modern Libraries: The need of 21st Century".

Modern Libraries :

In the 21st century, libraries are playing the role of social organization with using modern information and communication technology for providing information services to reader. Due to the advance technology application in the library, library services are available on 24x7 for readers. There is not necessary particular place based services.

Modern library functions to make available knowledge to society. It is also functions as local knowledge center and provide gateway for national and international level knowledge. (Library and Information services)

Changing Nature of Library :

In knowledge community, libraries are heart of the society. But in the 21st century, nature of libraries has significantly changed in terms of collection of resources, storage, accessing, information searching on OPAC, mode of information delivery, reservation of source, renewing, user community, location of user and time.

a) Digital Library :

Digital library contains digital resources with texts, images, videos, audios and information in other electronic formats. These sources are provided via internet. Digital library is enables to provide library services to reader in convenient time at anywhere. Digital library in 21st century have more importance due to the requirement of less physical space, information accessing and sharing information.

b) Hybrid Library:

Hybrid library is defined such as integration of printed sources with digital sources. In 21st century, importance of hybrid library is growing due to the advantages and disadvantages of ICT application in the library. Hybrid library contains both digital as well as printed sources together, therefore there is possible to provide appropriate source to reader on their demand. (Charles & Daniel, 1999).

Penny Garrod defined about hybrid library is: "an environment with physical and virtual services supporting professional activities of the users at their workplace from the discovery of information to the manipulation and analysis of the delivered resources." (Allen, 2005).

c) Virtual library:

Virtual library meaning is the without wall of library. In 21st century, functions of modern librarians have changed with the application of advanced technologies in library. In virtual environment, resources do not exist in physical forms that are in digital form. Readers are no need to come physically in the library. Through the internet, all library services are provided to user at anywhere (Koganuramath, 2007).

Librarian in 21st Century :

Bender & Fish, (2000) stated that knowledge worker i.e., librarians is the most critical profession in the existing century (Siddiqua, Ansari, & Ansari, 2021). The vital role is playing by library not only by accessing information resources but also providing place for developing knowledge society. (Skills for 21st-Century Librarians, 2021). In 21st century, librarian is also known as information officer, knowledge manager etc. and librarian also playing vital role in terms of providing information services, reference services, assisting in research for research scholars, library users and scientists. Librarian cooperates to faculty members, research scholars and learners and readers from society. He/she understand requirements and needs of reader and make available the appropriate resources.

Conclusion :

Now a day in 21st century, libraries are making available common environment for inspiring readers in terms of research, academic work, generating knowledge and making knowledge society. With application of ICT in the library operation and services tremendous changes have bought in 21st century. Libraries are meeting several demands of information societies for building strongest nation as Republic India.

References :

- *Skills for 21st-Century Librarians*. (2021, July 23). Retrieved from American Library Association: http://www.ala.org/tools/programming/21stcenturyskills (Accessed November 8, 2022)
- Allen, L. (2005). Hybrid Librarians in the 21st Century. *ACRL Twelfth National Conference*, (pp. 291-301). Minneapolis, Minnesota.
- Arumuru, L. (2020). RE-POSI RE-POSITIONING THE 21ST CEN TIONING THE 21ST CENTURY UNIVERSI Y UNIVERSITY LIBRARIES IN Y LIBRARIES IN . *Library Philosophy and Practice (ejournal)*, 3936.
- Aspenson, A., Poling, J., & Scherer, J. A. (2011). The 21st Century Library Building : Adjust or wither. *Satellite Conference* (p. 11). Atlanta, Georgia, USA: IFLA Standing Committee on Library Buildings and Equipment & IFLA Standing Committee on Information Technology.
- Charles, O., & Daniel, S. (1999, 04 01). What is the Hybrid library? *Journal of Information science*, 97-112.
- Hollad, B. (2015, Jan 14). *Edutopia*. Retrieved from 21st Century Libraries The learning Commons: https://www.edutopia.org/blog/21st-century-libraries-learning-commons-beth-holland#:~:text =The% 20libraries % 20 of % 20 the % 2021st, digital % 20 to % 20 create %20l earning%20hubs.
- Koganuramath, M. (2007). Virtual Library :an Overview. *5th International CALIBER -2007, Panjab University*, (pp. 535-542). Chandigarh.
- *Library and Information services*. (n.d.). Retrieved from https://nios.ac.in/media/documents/SrSecLibrary/LCh-014.pdf Retrived on 07.11.2022
- Mondal, H. (n.d). The Library: Changing Role and Services in 21st Century's Information Socieies. 12.
- *Modern Library Services*. (n.d.).
- Role of Libraries in Society. (n.d.).
- Reyes, V. (2006, July 3). The Future Role of the Academic Librarians in Higher Education. *Libraries and the Academy, 6*, 301-309. doi:DOI: 10.1353/pla.2006.0043
- Shonhe, L., & Jain, P. (2019). Reshaping Libraries for the 21st Century: User Perspectives. *Zambia Journal of Library & Information Science (ZAJLIS), 3*(1&2), 17-34.
- Siddiqua, N., Ansari, H., & Ansari, M. N. (2021). Changing Role of Librarian in Knowledge Management: A Survey of. *Library Philosophy and Practice (e-journal)*, 5934.

■■■

॥ विद्या अमृतम् अश्नुते ॥

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal Pachal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL - RAYPATAN

At Post – Raypatan, Tal. – Rajapur, Dist. – Ratnagiri, 416 704
First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994
Permanent Affiliation No. Aff-II./ICD/2015-16/1121 dated 16.09.2015, ISO 9001:2015 Certified
❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

I.Q.A.C., Department of History, Marathi, Hindi, English and Commerce
Organized

One Day Interdisciplinary National Conference

On

Indian Council of Social Science Research

ATTA DIP BHAV

India in 21st Century

Sponsored by

Indian Council of Social Science Research, Mumbai

In Collaboration with

Ambedkarite History Association, Mumbai

(Date: 14 October, 2022 Time : 10.30am To 5.00pm)

CERTIFICATE

This is to certify that, Dr./Prof./Mr./Miss. Manohar R. Kondagurle of Shri. Manohar Hari Khapane College of Arts and Commerce, Pachal actively participated & presented a paper entitled "Modern Libraries: The Need of 21st Century" in One Day Interdisciplinary National Conference held on 14/10/2022 at Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerce, Pachal-Raypatan.

Dr. Sandesh Wagh
Founder President,
Ambedkarite History
Association, Mumbai

Prof. Sanjay V. Nimbalkar
Asst. Prof.
IQAC Coordinator
Shri. M.H.K.College of Arts &
Commerce, Pachal-Raypatan

Dr. Pramod. S. Meshram
I/c Principal,
M.H.K.College of
Arts & Commerce,
Pachal-Raypatan

Hon. Manohar H. Khapane
President,
Sahyadri Parisar Shikshan
Prasarak Mandal Pachal

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPA
COLLEGE OF ARTS & COM. PAC
A/P Raypatan, Tal- Rajapur, Dist- Ratna

अक्षर वाङ्मय

वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. २

फेब्रुवारी २०२३

[illegible] HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMM. PACHAL



मुख्य संपादक

डॉ. नानासाहेब सुर्यवंशी

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer
Reviewed Journal

SHRI MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COM. • PACHAL •

अक्षर वाड्.मय

वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. २

फेब्रुवारी २०२३

संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

कार्यकारी संपादक
डॉ. शिवाजीराव देशमुख

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५
मुद्रक: श्री. जे प्रिंटिंग प्रा लिमिटेड १४१६ सदाशिव पेठ पुणे- ४११०३०
साहित्य व वर्गणी पाठवण्याचा पत्ता: डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर,
जि. लातूर, ४१३५१५
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

वार्षिक वर्गणी: रु ५००/-
द्विवार्षिक वर्गणी : रु ९००/-
पंचवार्षिक वर्गणी : रु २०००/-
अंक मूल्य : रु १२५/-

- महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ या नियतकालकाच्या प्रकाशनात अनुदान दिले असले तरी या नियतकालिकेतील लेख लेखांच्या विचाराशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

- या अंकातील लेखातून व्यक्त झालेले लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असं नाही.

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

"निळया दातांची दंतकथा मधील तंत्रज्ञानाचे उपयोजन"

डॉ. विकास शंकर पाटील

श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय,पाचल -रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

साठोत्तरी साहित्यात ग्रामीण दलित स्त्रीवादी महानगरीय प्रादेशिक असे विविध साहित्य प्रवाह प्रवाहित झालेले दिसतात. १९६० ते १९८० या कालखंडात मराठी साहित्यात सर्वच स्तरातील रसरशीत जीवन प्रकट झाले आहे. १९८० नंतर मात्र गाव आणि शहर यातील अंतर कमी होत गेले. स्त्रिया आणि दलित यांचेही जीवनमान उंचावत चालले होते. शेती व्यवस्थेत येत असलेला तंत्रज्ञानाचा वापर कृषीजन्य व्यवस्थेतील प्राणी जीवनास उध्वस्त करत होता. कृषीजन्य व्यवस्थेवर निसर्गाबरोबरच शेतीमालाला हवी असलेली बाजारपेठ आणि तेथे पिकवलेल्या मालाला मिळणारे मूल्य याचा खूप मोठा परिणाम होत चालला होता. शिक्षणामुळे दलित आणि स्त्री जीवन सुसह्य होत चालले होते. महानगरे मात्र बकाल होत चालली होती. साहित्यात विज्ञान साहित्य, बालसाहित्य, मुस्लिम साहित्य आदिवासी साहित्य असे नवे साहित्य प्रवाह निर्माण होत होते.

कीवर्ड - जागतिकीकरण, तंत्रज्ञान, माहितीचे महाजाल, इंटरनेट, व्हाट्सअप, ट्विटर, फेसबुक, ब्लॉग

१९९० ला खाऊजा (खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण) धोरण स्वीकारले आणि भारताच्या परंपरागत मूल्य व्यवस्थेला धक्के बसत गेले. जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात झालेला माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट सर्वच महानगरे व्यापू लागला. महानगरातून हा माहिती तंत्रज्ञानाचा ओघ ग्रामीण भागात ही पोहोचला. ग्रामीण भागात या धोरणाचे पडसाद मोठ्या प्रमाणात उमटल्याचे दिसते. माहिती तंत्रज्ञानाच्या या महाजालाने सर्व क्षेत्रे व्यापून टाकली. कृषी,व्यापार, व्यवसाय,रोजगार, शिक्षण अशा सर्व क्षेत्रात या धोरणाने अमुलाग्र बदल घडवून आणले. परंपरागत मूल्य व्यवस्थेला आणि जीवन व्यवस्थेला फक्त तडेच गेले नाहीत तर ती ढासळत जात असताना पाहण्यापलीकडे आपल्या हातात काहीच राहत नसल्याची खंत या व्यवस्थेचा बळी ठरलेल्या पिढीला वाटत राहिले. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाज बदलाचे प्रतिबिंब साहित्यातून प्रकट होत असते. साहित्याची भाषा ही समाजाची भाषा असते. या भाषेचे काम फक्त संप्रेषणच नसून समाजाची ती बोलीच असते. कोणत्याही प्रदेशातील साहित्यही तेथील बोली प्रकटत असते. ज्यावेळी एका भाषेचा इतर भाषेची संपर्क येत असतो त्यावेळी नवीन शब्दांची भाषिक देवाणघेवाण होत असते. त्यातूनच मूळ भाषा दुसऱ्या भाषेतून आलेली काही शब्द जसेच्या तसे स्वीकारते. त्यामुळे मूळ भाषेत मूळच्या नसलेल्या काही नव्या शब्दांची भर पडते.माहिती तंत्रज्ञानाचा व जागतिकीकरणाचा परिणाम साहित्यावरही मोठ्या प्रमाणात झाला.

जागतिकीकरणाचा मानवी जीवनावरील परिणाम

जागतिकीकरणात जग एक खेडे होऊन गेले. भारतीय संस्कृतीवर याचा खूप मोठा परिणाम झाला. औद्योगिकीकरणाच्या रेट्यात देशी उद्योग व्यवस्था रसातळाला गेली होती. त्याही पलीकडे शासकीय पातळीवर अनेक उद्योगधंदे बागायती शेतीवर लादले गेल्याने तेथील शेतकरी उदध्वस्त होत गेला. जगाच्या बाजारपेठेत माणूस मूल्यहीन बनत चालला. पैसा आणि स्पर्धा या दोन गोष्टींनी नात्यातील मायेचा ओलावा संपवला. शेतीतील उदध्वस्तता, शहरांचे बकालपण, रोजगाराची कमतरता, महागलेली शिक्षण व्यवस्था, गुणवत्तेपेक्षा आर्थिक सुबत्तेला दिले गेलेले महत्त्व, ग्रामीण स्तरावर वाढलेल्या समस्या, आरोग्याचे झालेले गंभीर प्रश्न , वाढलेली बेकारी, गुन्हेगारी, भाषावाद, प्रांतवाद, सीमावाद, वाढलेला नक्षलवाद आणि दहशतवाद अशा अनेक समस्या भारताबरोबरच इतर अप्रगत राष्ट्रात आ वासून उभ्या राहिल्या. मानवी जीवन सुसह्य व्हावे म्हणूनच जागतिकीकरणाचा स्वीकार केला गेला पण दुर्दैवाने जागतिकीकरणाने मानवी जीवनातील गुंते अधिकच वाढले. जागतिकीकरणाच्या या रेट्यात मनोरंजनाची साधने बदलली. ती महागडी साधने घराघरातील गरज बनली. या साधनांनी राहणीमान महाग केले. या साधनात मानव इतका गुंतत गेला की तो त्याचे अस्तित्वच विसरत चालला. कमी वेळेत आणि कमी कष्टात अधिक श्रीमंत पुण्याच्या मागे माणूस धावू लागला. यामुळे पैसे गोळा करण्याचे आणि फसवण्याचे फंडे वाढू लागले. विज्ञान, तंत्रज्ञानाचा वापर मानवी जीवनात वेगाने वाढू

त्रज्ञान ही मानवाची गरज बनत चालली. जागतिकीकरणाच्या रेट्यात मानवी जीवन सुसह्य बनवण्यासाठी त्रज्ञानाशिवाय पर्यायच उरला नाही अशी मानसिकता समाजाची होऊन बसली. त्यामुळे जागतिकीकरणाच्या या प्रभावात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आहारी प्रचंड गेला. प्रगत विज्ञान तंत्रज्ञानामुळे उद्योग व्यवसायातील मानवी रोजगार कमी होत म्हणून जणू काही भावनाहीन आणि संवेदनाहीन बाहुलीच बनत गेला. या साऱ्याचा परिणाम साहित्यावरही मोठ्या झाला.

वी जीवनातील तंत्रज्ञानाचा वापर

जागतिकीकरणामुळे प्रगत देशातील तंत्रज्ञान जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले. संगणक ही मानवाची गरज बनली. मोठे संगणकावर करणे सुलभ झाले. संगणकाबरोबरच मोबाईल मानवी जीवन व्यापून गेला. मोबाईल वरील वेगवेगळी ॲप तासनतास गुंतून ठेवण्यास पुरेशी ठरली. वैद्यकीय क्षेत्र,शिक्षण क्षेत्र, कृषी व्यवस्था, औद्योगीकरण या साऱ्याच गोष्टीत नाने खूप मोठी भरारी घेतली. मानवाने आपल्या बुद्धीच्या बळावर महाकाय यंत्रे बनवलीत. याच तंत्रज्ञानाच्या बळावर शेजाऱ्यांना उध्वस्त करू शकतील अशी महाकाय अस्त्रेही बनवलीत. आपल्या शेजाऱ्यांना आणि आपल्या विचारांशी नणाऱ्या देशांनाही बलशाली राष्ट्रांनी त्रास देणे सुरू केले. त्यातूनच दहशतवादाची समस्या वाढत गेली. दहशतवाद्यांकडून णारे अन्वित अत्याचार स्फोटात मारले जाणारे निरूपद्रवी नागरिक यामुळे समाजमन अस्वस्थ होत गेले. कृषी व्यवस्थेत वाढल्याने तेथील मानवाच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला. शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाची वाढ झाली. शिक्षणातील तील अंतर वाढले. वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञान मौलिक ठरले. तंत्रज्ञानाने मानवी जीवन सुसह्य केले तरी त्याचे दुष्परिणाम प्रमाणात मानवी जीवनावर झाल्याचे दिसते.तंत्रज्ञानासंबंधी 'एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर तंत्रविद्येच्या या आपल्या लेखात वसंत पळशीकर म्हणतात, "जगातील सर्वसाधारण लोकांचे दैन्य व दारिद्र्य कायमचे दूर करण्याची आजच्या तंत्रविद्येच्या ठायी असल्याचे आश्वासन तंत्रविद्याविशारद वर्षानुवर्षे देत असूनही जगातील दोनतृतीयांश च्या वाट्याचे दैन्यदारिद्र्य मिटलेले नाही. ही तंत्रविद्या अधिकाधिक प्रगल्भ बनत चालली आहे.तसतशी ती जास्त माणसांना काढत चालली आहे. "१"

तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याला सारे दारिद्र्य दूर करता आलेले नाही उलट ते वाढल्याचेच पळशीकरांचे मत आहे.

त्यावर झालेला जागतिकीकरणाचा आणि तंत्रज्ञानाचा परिणाम

साहित्यात भावनेला महत्त्व असते. समाजात चाललेल्या घडामोडी साहित्यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रतिबिंबित होत त. लेखक हा समाज वास्तवाचा वेध साहित्यातून घेत असतो. समाजाप्रती असणाऱ्या आपल्या उत्तरदायित्वातून त्याची करत असते . जागतिकीकरणापेक्षा देशीवाद महत्त्वाचा आहे हे सांगताना डॉ. किशोर सानप आपल्या 'देशीवाद, तिकीकरण आणि मराठी कादंबरी' या लेखात म्हणतात की, " राष्ट्रीयता,आंतरराष्ट्रीयता,जागतिकता ह्या संकल्पना कृत्रिम स्वप्नाळू असून, त्यांच्यापेक्षा आपल्या देशीय अस्मिता अधिक महत्त्वाच्या असतात. कारण देशीय अस्मिता ह्या च्याप्रमाणेच आपल्या भोवतालच्याही मानवी समूहाचा- जातीधर्माच्या समूहांचा सन्मान करायला आणि गुण्यागोविंदाने ला शिकवतात. "२" राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जागतिकीकरण यापेक्षा देशीवादाचा पुरस्कार करताना डॉ. किशोर सानप त. जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाने मानवी जीवन सुसह्य बनवले असले तरी मानवा मानवात मात्र दुरावा निर्माण झाला. ही भावनाहीन बनत गेली. माणूस उपभोगाच्या मागे अधिक लागल्याने जीवनाची खरी रंगत त्याच्याकडून विसरूनच गेली. चे बदललेले वर्तमान साहित्यातून प्रतिबिंबित होत असताना तंत्रज्ञानाचा खूप मोठा प्रभाव साहित्यावर पडला. साहित्य ही याचा खूप मोठा परिणाम झाला. तंत्रज्ञान हे इंग्रजी आणि इतर भाषेतून आल्यामुळे तंत्रज्ञानासंबंधी असणारे शब्द च्या तसे मराठी भाषेत सामावले गेले. मराठीत त्यांना पर्यायी भाषिक शब्द शोधण्याचा प्रयत्न झाला पण ते जनभाषेत रुजले त. जागतिकीकरणाच्या या रेट्यात जगभरातील देशातून जशी अन्नधान्याची आयात निर्यात झाली, तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण त्याप्रमाणेच वेगवेगळ्या रोगांची वाटचाल ही कळत नकळतपणे झाली. या रोगांना जन्म देणाऱ्या देशांनी जी नावे ठेवलीत च्या तशी मराठीत रुजलीत . दूरदर्शनद्वारे दाखवल्या जाणाऱ्या बातम्या पाहताना महाकाळ वादळांना दिलेली नावे

अशीच्या तशीच राहिलीत. इतर देशातील पतधोरण, क्रीडा धोरण, कृषी व्यवस्थेतील तंत्रज्ञान इत्यादींच्या अनुषंगाने [illegible] परभाषेतील शब्द मराठीने जसेच्या तसे आपल्या पोटात सामावून घेतले. वाढते संगणकीकरण, मोबाईल, व्हॉट्सअॅप, ट्विटर, ई-मेल, फेसबुक इत्यादी तंत्रज्ञानासंबंधीच्या साधनांनी व अॅपनी मानवी जीवन व्यापून टाकले. या तंत्रज्ञानाचा वापर अधिक सुलभपणे करता येऊ शकणाऱ्या भाषेचा वापर नव्या पिढीकडून होऊ लागला. मोबाईल व संगणकावर हाताने टायपिंग करण्यापेक्षा बोलल्यानंतर टाईप होत जाणे हा प्रकार खूपच सुलभ वाटू लागला. त्यातही मराठी भाषा इंग्रजीत लिहिणे हा प्रकारही वाढला. शब्द इंग्रजीत असतील पण वाचल्यानंतर ते मराठीत असल्याचे समजते. अशी लेखनाची नवी पद्धत सुरू झाली. तंत्रज्ञानाचा सुलभ वापर करत असताना मूळ भाषेवरती इतर भाषांचे अतिक्रमण होऊ लागले . यामुळे साहित्यावर तंत्रज्ञानाचा परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून येऊ लागला. जागतिकीकरणाच्या रेट्यात भावना हरवत चाललेले साहित्यही अधिक तांत्रिक बनत चालले. व्हॉट्सअॅप वर चर्चा करत असतांना G M, G Nअसे कमी शब्दांचे इंग्रजी संदेश सुरू झाले . साहित्यातून जेव्हा या संदेशांचे लेखन होऊ लागले त्यावेळी साहित्यिकाने जसेच्या तसे संदेश आपल्या कथा कविता कादंबरीत मांडल्याने तंत्रज्ञानाच्या वापराने मराठी भाषेतील शुभ सकाळ शुभ रात्री यासारखे शब्द जणू हद्दपारच होत चालले. हे एक प्रातिनिधिक स्वरूपातील उदाहरण झाले पण अशा बऱ्याच मराठी शब्दांना तंत्रज्ञानाच्या वापराने घरघर लागली. काही इंग्रजी शब्दांचा मराठीतील अनुवाद खूपच लांब असल्याने त्याऐवजी पर्यायी इंग्रजी शब्द वापरणे मराठी लेखक कवींना सुलभ वाटू लागल्याने तेच शब्द मराठीत रुजत गेले. अलीकडे आलेल्या कोरोना आजाराने तर मराठी भाषेला इंग्रजी शब्दांची देणगीच बहाल केली. कोरंटाईन, स्वॅब, व्हेंटिलेटर, स्कोअर अशा कितीतरी इंग्रजी शब्दांची सहजपणे मराठीत रुजवणूक झाली. मराठी साहित्यात तयार झालेल्या नवीन कलाकृतींवर तंत्रज्ञानाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवतो अलीकडेच प्रकाशित झालेल्या प्रणव सखदेव यांच्या निळ्या दाताची दंतकथा आणि इतर कथा या कथासंग्रहावर व त्यातील भाषेवर झालेला जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाचा परिणाम थोडक्यात अभ्यासू .

'निळ्या दातांची दंतकथा आणि इतर कथा ' या कथासंग्रहावरील प्रभाव

मराठीतील प्रतीत यश नवलेखक म्हणून प्रणव सखदेव यांची ओळख आहे. आपल्या दमदार लेखणीने काळे करडे स्ट्रोक्स आपल्या पहिल्याच कादंबरीत साहित्य अकादमी मिळवणारे लेखक म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांचा ' पायऱ्यांचा गेम आणि इतर कविता ' हा कवितासंग्रह 'नाभीतून उगवलेल्या वृक्षाचे रहस्य ' हा कथासंग्रह '९६ मेट्रोमॉल ' ही कादंबरी हे त्यांचे लेखन प्रकाशित आहे. त्यांचा 'निळ्या दाताची दंतकथा' हा कथासंग्रह जानेवारी २०१९ मध्ये प्रकाशित झाला.ऑगस्ट २०२० पर्यंत त्याच्या तीन आवृत्ती निघाल्या यावरून त्याची लोकप्रियता लक्षात येते. त्यांची या कथासंग्रहातील पहिलीच कथा हा खेळ आयडेंटिटी थेप्टचा! या नावातच इंग्रजीचा वावर दिसतो. तर अखंड कथेत इलेक्ट्रॉनिक मीडियाची रेलचेल दिसते. या कथेचा नायक फेसबुकचा वापर करताना दिसतो. फेसबुक वरील त्याच्या मैत्रिणी त्याला मेसेज करून प्रतिसाद देत राहतात. यातूनच त्याचा फेसबुक वरील वावर वाढत जातो. आपण खूप सुंदर लिहितो आहोत याचीही जाणीव त्याला होते. त्याच्यातील कवी जागा होतो. त्याच्या या फेसबुकवरील कवितांना आलेले प्रातिनिधीक प्रतिसाद पाहूया.

सुहास : khoopchaan re..... Keep it up!

जयंत : LIHIT RAHA RE..... BASSI MALA VATAT, HICH EK DAAD PURESHI AHE....

विनय : MITRA!!!! "१८"

असे कितीतरी शब्द आणि संवाद येताना दिसतात. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे या कथेमध्ये न बोलताही संवाद होऊ लागले. इंग्रजी मिश्रित मराठीचा वापर तंत्रज्ञानामुळेच सुलभ झाला. आपली ओळखच चोरली जाते याची भीती नायकाला वाटू लागली. त्यातूनच कथानक पुढे सरकत जाते या साऱ्याच कथानकाला तंत्रज्ञानाचा आधार घ्यावाच लागतो.

'कतरा कतरा जीते है...'या कथेत नायकावर प्रेम करणारी अवंति नायकाला लग्नास विरोध करते. ती एकटीच राहणे महत्त्वाचे मानते. नायक निशाच्या प्रेमात पडतो. पुढे निशाशी लग्न करून त्यांना मयूर नावाची मुलगी ही होते. आपल्या पत्नी मुलीसह संसारात सुखी असणारा नायक निशाच्या नको त्या मागणीने भरकट तो. कथासूत्र असणाऱ्या या कथेत तंत्रज्ञानाचा वापर खूपच झाल्याचा दिसतो. अवंती आणि नायकातला संवाद पाहू

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

[illegible]

[illegible] Nisha pan aaheka?

[illegible] campla gelie with mayu

[illegible] : nasi :-) यम्म अपचा अंगठा ."७१"

[illegible] अनेक इंग्रजी मिश्रित संवाद न बोलताच पुढे जातात. वाचकांच्या मनात या संवादांविषयी संधीग्धता राहत नाही.

[illegible] मराठी साहित्यात असे सातत्याने येताना दिसत आहे.

[illegible] इंग्रजी शब्दच येतात असे नाही तर मराठीतही ही तंत्रज्ञान इंग्रजी मराठी शब्द घेऊन येताना दिसते. या कथासंग्रहातील मन

[illegible] डॉट एच टी एम एल या कथेतील नायक मेसेज करताना म्हणतो

[illegible] मेक्सीकंटला मेसेज करतोय-

[illegible], आहेस कुठे...

[illegible]चा मेसेज येतोय.'१८३'

[illegible] मेसेज करत असताना त्यामध्ये मराठी पण इंग्रजी असणारे शब्द वापरले जातात. तंत्रज्ञानाने झालेला हा परिणाम [illegible] अशाप्रकारे साहित्यामध्ये तंत्रज्ञानाचा खूप मोठा परिणाम झाल्याचे दिसते. भाषेचीही गळचेपी होताना दिसते. साहित्यात तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात डोकावताना दिसते व ते कथानकही पुढे घेऊन जाते.

निष्कर्ष

1. जागतिकीकरणाचा ग्रामीण आणि महानगरीय जीवनावर खूप मोठा परिणाम झाल्याचे दिसते.
2. जागतिकीकरणाचा हा प्रभाव मराठी साहित्यावर मोठ्या प्रमाणात दिसून येतो.
3. तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याने मराठी साहित्यातही त्याचा वावर मोठ्या प्रमाणात दिसतो.
4. जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानामुळे बदलणारी परंपरागत व्यवस्था आणि सुमूहभावनेचे कोसळतेपण वाचकांना अस्वस्थ करणारे आहे.
5. जागतिकीकरणामुळे गरीब श्रीमंत दरी कमी होण्याऐवजी वाढल्याचे दिसते. त्याचा परिणाम साहित्यावरही जाणवतो.
6. इतर भाषेतील साहित्याचा व तंत्रज्ञानाचा परिणाम मराठी साहित्यावरही जाणवतो.
7. तंत्रज्ञान हे मानवी जीवन सुसह्य बनवते असे म्हटले जात असले तरी त्यात वास्तवता कमी आहे.
8. मराठी साहित्यात तंत्रज्ञानाच्या वापराने इंग्रजीची भाषिक रेलचेल वाढल्याचे दिसते.
9. जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे मराठी साहित्य प्रवाह क्षीन झाल्याचे झाल्याचे दिसते .
10. तंत्रज्ञान ही काळाची गरज बनली असून त्यापासून अलिप्तही राहता येत नाही हे वास्तव दुर्लक्षता येत नाही.

संदर्भ

1. डॉ. रवींद्र शोभणे, जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती फेब्रुवारी २०१२, पृ. [illegible]
2. [illegible] पृ. क्र.१९३
3. प्रणव सखदेव, निळ्या दातांची दंतकथा, रोहन प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती २०२०

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur

Lal Bahadur Shastri College of Arts, Science and Commerce,Satara.

Dist. Satara (M.S.)

ONE DAY NATIONAL CONFERENCE
on
"Changing Nature of Literature in the Age of Technology"
(English , Marathi ,Hindi , Sanskrit)

CERTIFICATE

This is to certify that Dr./~~Mr.~~/~~Mrs.~~/~~Miss~~ डॉ. विकास शंकर पाटील of श्री. मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ आर्टस आणि कॉमर्स. पाचल. organized has attended One Day National Conference on "Changing Nature of Literature in the Age of Technology" on 11th Feb. 2023 as Chair Person/ Resource Person/ Participant /Member of Organizing Committee

He/She has presented the research paper entitled जागतिकीकरण व तंत्रज्ञानाचा मराठी भाषेवरील प्रभाव निळ्या दालाची देतकथा च्या अनुषंगाने

Dr. P. P. Lohar
Convener

Dr. A. S. Tawar
Convener

Dr. R. V. Shejawal
Principal

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PACHAL

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPAN
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

Scanned by CamScanner

(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

September-2021

ISSUE No- (CCCXVIII) 318 (B)

Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar

"WE ARE INDIANS, FIRSTLY AND LASTLY"

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Pramod S. Meshram
I/c Principal,
Shri M. H. K. College of
Arts & Comm. Pachal

The Journal is indexed in:
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati
Website – www.aadharsocial.com Email – aadharsocial@gmail.com

Impact Factor – 7.675
ISSN – 2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed
Multidisciplinary International Research Journal

September-2021

ISSUE No- (CCCXVIII) 318

Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar

Chief Editor
Prof. Virag.S.Gawande
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Editor
Dr. Pramod S. Meshram
I/c Principal,

Shri M. H. K. College of Arts & Comm. Pachal

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

INDEX-B

No.	Title of the Paper	Authors' Name	Page No.
1	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि सद्यस्थिती	प्रा. डॉ. संतोष पां. बनसोड	1
2	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सिध्दांतवादी सामाजिक चळवळ	डॉ. प्रमोद एस. मेश्राम	7
3	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य	डॉ.विकास शंकर पाटील	12
4	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उर्जा विषयक धोरण	प्रा. अंभोरे ए.जी.	16
5	स्वतंत्र मजूर पक्ष : शेतकऱ्यांच्या उद्धाराचा जाहीरनामा	डॉ. अक्षय किशोर घोरपडे	18
6	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय शेती विषयक विचार	डॉ.अंजली मस्करेन्हस	24
7	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला महाडचा सत्याग्रह	डॉ. अंकुश मारुती सोहनी	28
8	डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक प्रगती – प्रेरणा नवतरुणांसाठी मार्गदर्शक : एक यशस्वी पाऊल	डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले /डॉ. सौ. अरुणा लहानबा लोंढे	31
9	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गौतम बुद्धांचे चरित्र आणि शिकवण यासंदर्भात उपस्थित केलेले चार प्रश्न आणि त्यांची चर्चा	डॉ. अश्विनी आत्माराम तोरणे.	37
10	पत्रकार - डॉ. बाबासाहेब आंबेडकर	प्रा. डॉ. बळवंत दाभाडे	46
11	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार	प्रा.डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक	52
12	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार : एक अभ्यास	डॉ.बाबासाहेब रावसाहेब शेंडगे	55
13	समाज परिवर्तक युगपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर	डॉ.बाळासाहेब देवकाते	58
14	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार व कार्य	प्रा. गायकवाड बाळू भिमराव	61
15	समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर	प्रा. डॉ. गणेश मालटे/श्री. भागवत भास्करराव पाटील	64
16	डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर एक बहुआयामी व्यक्तिमत्व	डॉ. भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी	69
17	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा दलित साहित्यावरील प्रभाव	भूषण प्रदीपकुमार देशमुख /डॉ. वंदना स. भोयर	72
18	डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायासंबंधीचे विचार आणि कार्य	चैतन्य शंकर कांबळे	75
19	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्यकाळ व ब्राह्मण काळ या विषयक ऐतिहासिक विचार	डॉ. छाया भास्कर भोज	81

20	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार आणि कार्य **डॉ. जयश्री गणपती कांबळे /प्रा. डि. ए. सरदेसाई**	84
21	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टीकोन –एक अभ्यास' **प्रा. रसाळ दशरथ किसन**	88
22	सामाजिक न्यायात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका **श्री. धनंजय वसंत भाट**	92
23	भावी पिढीची उभारणी विद्यापीठात होते : एक आकलन **प्रा. डॉ. धिरजकुमार सत्यकाल कोतमे**	96
24	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन **प्रा डॉ.गौतम क्ष.ढवळे**	100
25	बुद्ध विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य **प्रा.जगदीश पांडुरंग राणे**	102
26	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रउभारणीतील योगदान **गजानन गणपत होडे**	106
27	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य **डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे**	111
28	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा दूरगामी दृष्टिकोन आणि आजचा भारत **डॉ. कांता कांबळे**	114
29	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शेतीविषयक धोरण **Prof. Lankesh Murlidhar Gajbhiye**	122
30	डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांचे आर्थिक विचार **Dr. Madhukar Vithoba Jadhav**	125
31	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार **प्रा. माधुरी हरिभाऊ गवळी**	128
32	जलव्यवस्थापन-जलनियोजन तज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर **सौ. मनिषा सूर्यकांत गायकवाड**	133
33	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान **प्रा. डॉ. नागोराव संभाजी भुरके**	135
34	कवी अरुण काळे यांच्या कवितेतून येणारे आंबेडकरी विचार **डॉ.नीता दिपक मिसे-ढावरे**	140
35	बाबुराव बागूल यांच्या साहित्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव **निलेश वसंतराव आहेर**	144
36	पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा इतिहास आणि वर्तमान **प्रा. डॉ.प्रज्ञा कुमार गाथाडे**	149
37	वर्तमानातील शेती प्रश्न आणि डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार **प्रा. डॉ. वाघमारे एस. एस.**	152
38	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य व संस्कृती विषयक योगदान **सौ.स्नेहा विलास कोलते**	155
39	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य **डॉ.विकास शंकर पाटील**	161
40	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेले सत्याग्रह **डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले**	166

41	Role Of Educational Thought Of Dr. Babasaheb Ambedkar In 21 St Century Dr.Golhar Anuradha Sandip	171
42	Dr. Babasaheb Ambedkar- An Unique and Ideal Soul of India Dr. Ashok Gangaram Sabne	173
43	Dr.Babasaheb And Fight Against Untouchability Assi Prof.Pradeep Hanmant Nikam	178
44	Dr.BabasahebAmbedkar as a Best Reader: An Overview Mr.Manohar Ramulu Kondagurle	180
45	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलव्यवस्थापनातील योगदान डॉ. मनिषा शिवाजी पाटील	184
46	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर आणि परिणाम श्री. मधुकर रामचंद्र काळबागे /श्री. सुखदेव विष्णू कोल्हे	190
47	महाराष्ट्रातील दलित चळवळीची सद्यस्थिती प्रा. डॉ. कैलास सोनवणे	193
48	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार व कार्य प्रा. हनुमंत भारत सरतापे	198
49	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीसंबंधी कार्य व विचार दिपाली वैजनाथ आदोडे	201
50	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर आणि मातंग समाज डॉ. डी. ए. मोरे	206
51	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य भागवत भास्करराव पाटील	212
52	मराठी कवितेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्रण डॉ. बळवंत मगदूम	216
53	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय योगदान प्रा. बी. ए. कश्यप	219
54	राष्ट्रवाद व डॉ.आंबेडकर डॉ.अरूण ल.मोहिते	225
55	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महिलांविषयक कार्याची सामाजिक चिकित्सा अनुपमा भास्कर मोरे	228
56	डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री उद्धार विषयक कार्य डॉ. सुरेश विठ्ठलराव पाथरकर	232
57	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि कार्य प्रा. श्रीमती स्वाती रमेश फापाळे	236
58	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य अजित जयराम जाधव	238
59	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा साहित्यावरील प्रभाव (कवितेच्या संदर्भात) प्रा. सुनिता दत्तात्रय दळवी	241
60	नारायण सुर्वे यांच्या कामगारविषयक कवितेवर दिसून येणारा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव डॉ. परमेश्वर महादेव पाटील	247
61	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार व कार्य डॉ. राजशेखर हिरेमठ	250

62	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बील प्रा. राजश्री बंडोपंत पोवार	254
63	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील	257
64	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीतील योगदान प्रा. बाळासो अण्णा सुतार	260



भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य ;
दर्जाची व संधीची समानता ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.

.Aadhar’ International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII) B
ISSN : 2278-9308
September, 2021

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सिध्दांतवादी सामाजिक चळवळ

डॉ. प्रमोद एस. मेश्राम
प्र. प्राचार्य, श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

प्रस्तावना

संपूर्ण जगाने आज मान्य केले आहे की, डॉ. बावासाहेब आंबेडकर हे आधुनिक काळातील महान समाजशास्त्रज्ञ होते. यासंबंधी जगातील अनेक विद्वानांनी अनेक उपमांनी डॉ. बाबासाहेबांना संबोधित केले आहे. भारतातील अनेक समस्यांवर त्यांनी उपाययोजना सांगितल्या आहेत. मात्र त्या योग्य पध्दतीने कार्यान्वित न झाल्यामुळे आजही अनेक समस्या पूर्णपणे संपुष्टात आल्या नाहीत. ही आजची खेदाची बाब आहे हे निश्चित. मात्र अजूनही समाजव्यवस्थेतील समस्या पूर्णपणे सोडवायच्या असतील तर त्यांच्या विचारांची कास धरूनच आपल्याला चालावे लागणार आहे यात दुमत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेतील वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, अस्पृश्यता व इतर विषयाबाबतीत अतिशय वस्तुनिष्ठ पध्दतीने अध्ययन करून इ.स.१९१६ साली कोलंबिया विद्यापिठामध्ये 'भारतातील जाती घडण, उत्पत्ती आणि विकास' या विषयावर व्याख्यान दिले. यामध्ये त्यांनी वयाच्या पंचवीसाव्या वर्षी जातिसंस्था विषयक सिध्दांत मांडले. जे आजपर्यंत कोणत्याही समाजशास्त्रज्ञाला खोडता आलेले नाहीत. म्हणूनच त्यांचा जातिसंस्था विषयक सिध्दांत अत्यंत महत्वपूर्ण मानला जातो. भारतातील वर्ण, जाती ह्या कशा निर्माण झाल्या, त्या कशा टिकून राहिल्यात यासंबंधीचे मानवशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय विश्लेषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यामध्ये केले आहे.

भारतात सामाजिक सुधारणा करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी समाजात सामाजिक, धार्मिक व आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. सामाजिक सुधारणेची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येत असली तरी पूर्णतः समाजातील असलेला अंधकार उच्च वर्गातील लोकांच्या भूमिकेमुळे नष्ट झाला नाही. त्यामुळे १९व्या शतकाच्या उत्तरार्धात बाबा पद्मनजी, विष्णू बुवा ब्रम्हचारी, भिकोबा दादा चव्हाण, रामकृष्ण भांडारकर, कृष्णराव केळूसकर, सीताराम केशव बोले यासारख्या अनेक समाजसुधारकांनी समाजातील खालच्या वर्गातील अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी कार्य केल्याचे दिसून येते, मात्र यानंतर समाजसुधारणेचे खरे कार्य, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यामुळेच आधुनिक महाराष्ट्राला फुले-शाहू व आंबेडकराचा महाराष्ट्र असे मानण्याची परंपरा आहे.

भारतीय समाजव्यवस्था

प्राचीन काळापासून समाजातील असमान संरचनेमुळे खालच्या समुहातील अस्पृश्यांचे अतोनात हाल झाले. यामुळे समाज दुभंगला गेला. सिंधु संस्कृतीच्या ऱ्हासानंतर वैदिक संस्कृतीचा विकास झाला. चार वर्णांची ताठर चार्तुवर्ण्य समाजव्यवस्था प्रस्थापित झाली. प्रत्येक वर्णांची बंधने अधिक कठोर होत होती. याबावत राम आहूजा म्हणतात की, 'कुछ सिध्दातोंका मानना है की वर्ण व्यवस्था उतनी ही कठोर थी जितनी आज जाती व्यवस्था है।'१ त्यानंतर जातिव्यवस्था निर्माण झाली. १९ व्या शतकात अनेक विचारवतांनी जातीसंस्थेचा अभ्यास केला. तिच्या उत्पत्तीबद्दल व तिच्या स्वरूपाबद्दल विव्दानांमध्ये एकमत असल्याचे दिसून येत नाही.

जातिव्यवस्था ही क्रमाक्रमाने कठोर होत गेल्याचे दिसून येते. जातींची उत्पत्ती कशी झाली हे सांगताना डॉ. बावासाहेब आंबेडकर म्हणतात, 'अस्पृश्यांचा वरच्या वर्गाशी संपर्क येत राहिला व या संपर्कातूनच अस्पृश्य वर्ग वरच्या वर्गाचे अनुकरण करू लागला. जाती या सुध्दा अनुकरणातूनच निर्माण झाल्या. जाती निर्मितीत पहिल्या प्रथम ब्राम्हणांनी स्वतःला बंदिस्त करून घेतले व स्वतःची जात निर्माण केली. याचेच अनुकरण अन्य समाजाने केले व त्यामुळे या जाती पडल्या'२ जाती या शुद्र जाती यांच्या शोषणासाठी निर्माण झालेली कृत्रिम व्यवस्था आहे असे सिध्दांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. काही जाती ह्या व्यवसायावरूनही पडल्या. अशा ४२९ जाती भारतात अस्तित्वात असल्याचे आपणास दिसून येते. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, अस्पृश्यता, गुलामगिरी व इतर घटकांनी भारतातील एकात्मता नष्ट केल्याचे दिसून येते. एका बलिष्ट व्यवस्थेने बहुजन समाजाला विशिष्ट पध्दतीने बंधनात अडकवून ठेवले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सखोल संशोधन करून 'The Untouchables' हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ अतिशय महत्वपूर्ण समजला जातो.

समाजात अस्तित्वात असलेल्या अनेक असमान पध्दतीमुळे अस्पृश्यांनी काय करावे व काय करू नये ही सांगणारी नियमावलीच तयार केली होती. त्या नियमांचा भंग करणे हा गुन्हा समजला जात होता. संपूर्ण मानव समाज एकच आहे असे मानणारा उच्चभ्रू समाज नसल्यामुळे बहुजनातील अस्पृश्यांचे सर्वच ठिकाणी फार मोठे नुकसान झाले. त्यामुळे अस्पृश्य समाज कनिष्ठ प्रतीचे जीवन जगत होता. या संबंधात रामशरण शर्मा म्हणतात, 'मौर्य पूर्व काल में शुद्रों की सामाजिक स्थिती में परिर्वतन हुए तथा उसकी दशा और भी बिगड़ गई।'३

बहुजन समाजातील सर्वात खालच्या स्तरातील अस्पृश्यांनी प्रशासकीय व्यवस्था, महसूल व्यवस्था, गावांचे संरक्षण, मार्गदर्शक, वाटाळे, सरकारी अधिकाऱ्यांची सेवा करणे, रयतेची खाजगी कामे, त्यासोबतच उच्चभ्रू समाजातील लोकांची सेवा करणे अशी महत्वपूर्ण कामे जरी केली असली तरी समाजातील त्यांची स्थिती अधिकार शून्य होती. सामाजिक, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात त्यांची फसवणूक केली जात होती. ही अस्पृश्यांची स्थिती बौद्धधम्माच्या स्वीकारापर्यंत तशीच असल्याचे आपल्याला दिसून येतो.

अस्पृश्यांना पाणवठे, देवांची मंदिरे, सार्वजनिक रस्ते, सार्वज़निक विहिरी, हॉटेल व इतर उपयोगाच्या वस्तूंना हात लावण्याचा किंवा मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार नव्हता. उच्चभ्रू समाजाला केवळ त्यांचा उपभोग घेण्याचे माहिती होते, पण तेही आपल्यासारखीच माणसे आहेत याची कल्पना किंवा विचार त्यांच्या मनात का येत नसावा. हेही तेवढेच महत्वाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सिध्दांतवादी सामाजिक चळवळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म अस्पृश्यांतील महार जातीत झाला होता. त्यामुळे अस्पृश्यांच्या जीवनातील दुःख काय असतात याचा जवळून अनुभव लहानपासून ते उच्च विभूषित होईपर्यंत त्यांना आल्याचे दिसून येते. कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घेत असताना वयाच्या पंचवीसाव्या वर्षी भारतातील जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीचा सिध्दांत मांडला. ज्यामध्ये जाती संस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण त्यांनी केले. इ.स.१९३७ साली लाहोरच्या परिपदेकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जातिव्यवस्थेचे निर्मुलन' हा विषय घेऊन समाजशास्त्रीय विश्लेषण केले होते. मात्र जातपात तोड मंडळाच्या संयोजकांना ते भाषण विद्रोही वाटल्यामुळे त्यांनी परिषदच रद्द केली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ते भाषण 'Annihilation of Caste' या नावाने प्रकाशित केले. हा ग्रंथ जातीव्यवस्थेच्या संदर्भातील मूलगामी ग्रंथ मानल्या जातो. याच ग्रंथात ते म्हणतात की, 'हिंदू समाज म्हणजे जातीचे आगर आहे. हिंदू हा जातीने तयार झालेल्या लोकांचा समहू आहे.'४ आज हे विधान पूर्णतः खरे असल्याचे दिसून येते. आजही भारतातील लोकांचे संबंध जातीवर आधारीत आहेत. जात ही हिंदूची कायदेशीर संस्था आहे. कळीचा मुद्दा असा की, जात हा शब्द समान दर्जाचा नाही. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते, म्हणूनच त्यांनी सामाजिक सिध्दांतवादी चळवळ १९२० पासून सुरू केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समाजाला जागृत करण्यासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी अडीच हजार रूपयांची आर्थिक मदत दिली होती, म्हणूनच ३१ जानेवारी १९२० साली 'मूकनायक' पाक्षिक त्यांनी सुरु केले. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हे ब्रिदवाक्य या पाक्षिकावर छापण्यात येत होते. भारतातील तळागाळात असलेल्या समाजाला जागृत करणे, हा महत्वपूर्ण संदेश त्यामधून देण्यात आलेला होता. अस्पृश्यता, जातीयता नष्ट करण्यासाठी 'बहिष्कृत हितकारणी' सभेच्या माध्यमातून शिक्षण प्रसार करणे, वाचनालये सुरू करणे, वसतीगृहे काढणे इ. महत्वपूर्ण कार्य केल्याचे दिसून येते. बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून अनेक महत्वपूर्ण कार्य करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना जागृत करून त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी व स्पृश्यांचे हृदय परिवर्तन करण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांना आपल्या सोबत घेऊन महाड, नाशिक, पुणे, अमरावती व मुखेड येथे कायद्याच्या चाकोरीत राहून सनदशीर मार्गाने सत्याग्रह केले.

महाड येथील चवदार तळे सत्याग्रह

महाडचे चवदार तळे सार्वजनिक होते, तरिही गावातील स्पृश्य वर्गाचे दडपण व भीतीपोटी अस्पृश्य समाजातील लोक पाण्याला स्पर्श करू शकत नव्हते. ही अस्पृश्यांची भीती नष्ट करण्यासाठी व सामाजिक विषमतेविरुद्ध अस्पृश्यांना सिद्ध करून समानतेचे हक्क प्राप्त करण्यासाठी १९ व २० मार्च १९२७ साली चवदार तळ्यावर अनेक कार्यकर्त्यांसमवेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रह केला. या सत्याग्रहाचे प्रचारकार्य जोरात झाल्यामुळे जवळपास ५००० अस्पृश्य बांधव सत्याग्रहाला हजर होते. या परिषदेचे स्वागताध्यक्ष संभाजी गायकवाड होते. सत्याग्रहासाठी जमलेल्या लोकात चेतना निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समुदायाला मार्गदर्शन केले. या भापणाचा स्त्री वर्गावर तात्कालीन परिणाम झाल्याचे दिसून आले.

२० मार्च १९२७ रोजी हजारो अनुयायांसमवेत महाडच्या चवदार तळ्यातील पाणी ओंजळीने प्राशन करून आम्ही अस्पृश्य असल्याचे नाकारले. हे मनुवादी लोकांना सहन न झाल्यामुळे अस्पृश्यांवर अमानुप अत्याचार केला. वाटलेले तळे शुध्द करण्यासाठी पंचगव्य टाकून तळ्याचे शुध्दीकरण केले. यानंतर स्पृश्यांनी चवदार तळ्याच्या सत्याग्रहावर बंदी घालायची अशी मागणी कलेक्टरकडे केली. त्यांची ही मागणी मान्य न झाल्यामुळे १२ डिसेंबर १९२७ रोजी नऊ स्पृश्य हिंदूनी कोर्टात फिर्याद दाखल केली. त्यामुळे कोर्टाने मनाई हुकूम दिला. मुंबई उच्च न्यायालयाने १७ मार्च १९३७ ला जस्टिस ब्रूमफील्ड आणि एम. जे वाडीया यांच्या बेंचने सवर्ण हिंदूचे अपील फेटाळले. चवदार तळ्याची जमीन कोणाच्या मालकी हक्काची नाही, हे सवर्ण हिंदूना सिध्द न करता आल्यामुळे ती सार्वजनिक ठरते. या निर्णयानुसार तब्बल दहा वर्षांनी चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले झाले.

महाड सत्याग्रहासंबंधी अस्पृश्यांना मानवी हक्क स्थापन करण्यासाठी विजय मिळाला. परंतु तळ्यातील पाणी पिणे एवढाच हेतू सत्याग्रहाचा नव्हता म्हणूनच सत्याग्रहाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'चवदार तळ्याचे पाणी पाल्याने तुम्ही आम्ही अमर होऊ अशातला काही भाग नाही. आजपावेतो चवदार तळ्याचे पाणी प्यालो नव्हतो, तर तुम्ही आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ त्या तळ्याचे पाणी पिण्याकरीता जावयाचे नाही. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिध्द करण्याकरीताच त्या तळ्यावर आपणास जावयाचे आहे. म्हणजे ही सभा समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी बोलाविण्यात आली आहे.'[५]

महाडच्या सत्याग्रहामुळे अस्पृश्यांमध्ये स्वाभीमानाची चळवळ बाबासाहेबांच्या नेतृत्वात सारखी वाढत गेल्याचे दिसून येते. म्हणूनच आजपर्यंतच्या इतिहासातील समतेसाठीच्या सत्याग्रहाला महत्वाचे स्थान आहे.

नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह

भारतातील सर्व हिंदू ज्या देवतांची पूजा व आराधना करीत असत त्याच देवतांची पूजा अस्पृश्यही करीत होते. मात्र अशा अस्पृश्यांना मंदिरात जाऊन पूजा व दर्शन घेण्याची मनाई होती. त्यासाठी नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्यांनी काळाराम मंदिरात प्रवेश करण्याचे ठरविले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाड तळ्याच्या प्रकरणाबद्दल काळजीत होते. भाऊराव कृष्णाजी गायकवाड यांनी बाबासाहेबांचे मन वळविले. त्यामुळे त्यांनी सत्याग्रहास संमती दिली.

२ मार्च १९३० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्यकर्त्यासमवेत काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाला सुरूवात केली. याबाबत वसंत मून म्हणातात, 'सकाळी दहा वाजता परिषद सुरू झाली. त्यात सत्याग्रहाच्या कार्यपध्दतीबद्दल विचार विनिमय झाला. ठरल्याप्रमाणे तीन वाजता सुमारे पंधरा हजार सत्याग्रहींची एक मैल लांबीची मिरवणूक अत्यंत शांतपणे व शिस्तीने राममंदिराकडे निघाली. समोर लष्करी पध्दतीचा बँड होता. राममंदिराचे सर्व दरवाडे बंद होते. गोदावरी नदीच्या घाटावर मिरवणुकीचे जंगी सभेत रूपांतर झाले.'[६]

नाशिकच्या मंदिर प्रवेश सत्याग्रह एक महिन्यापर्यंत तसाच सुरू होता. कुर्तकोटी शंकराचार्यांनी स्पृश्य हिंदूची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण तो असफल ठरला. ९ एप्रिलला रामनवमी असल्यामुळे रामाचा रथ बाहेर पडणार होता. त्यासाठी स्पृश्य व अस्पृश्य यांच्यात तडजोड होऊन दोन्ही बाजूच्या धडधाकट लोकांनी रामाचा रथ ओढायचा असे ठरले, मात्र सनातनी लोकांचा पूर्वनियोजीत हेतू वेगळाच होता. त्यानुसार त्यांनी रामाचा रथ ओढण्याची तयारी केली. त्यामुळे सत्याग्रहींना आवश्यक असणाऱ्या दुकानातील वस्तू मिळेनाशा झाल्या. सत्याग्रह परिसरात कलम १४४ लागू झालेनंतर अस्पृश्यांना सत्याग्रह बंद करावा लागला. ही बातमी श्री. द. वि. प्रधान यांनी बाबासाहेबांना सांगितली. त्यावर भाऊसाहेब गायकवाडांना ध्येय सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'मंदिरात शिरून देवदर्शन घेणे हे आपल्या सत्याग्रहाचे ध्येय नाही. देवळात प्रवेश करणाऱ्या सवर्ण हिंदूना विरोध करून अस्पृश्यांनाही मंदिरात जाण्याचा हक्क आहे. हे त्यांना मान्य करावयास भाग पाडणे हे सत्याग्रहाचे ध्येय आहे'.[७] नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह १९३५ सालापर्यंत सुरू होता. पाच वर्षांच्या संघर्षानंतर सरकारच्या हस्तक्षेपामुळे नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले झाले. सत्याग्रहाच्या माध्यमातून अस्पृश्यानाही हिंदू धर्मात मानाचे स्थान मिळेल ही आशा लोप पावली होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिंदूप्रती असलेला आशावाद संपल्याचे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने झालेले सत्याग्रह

हिंदू समाजाकडून अस्पृश्यांवर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात आतापर्यंत दोन सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात घडवून आणले होते. त्यामुळे अस्पृश्य समाजात उच्च प्रतीची समाजजागृती झाल्यामुळे या सत्याग्रहाच्या दरम्यान अमरावती येथील अंबादेवी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह, पुणे येथील पर्वती सत्याग्रह व मुखेडच्या सत्याग्रहासाठी अनेक सत्याग्रहींनी त्यामध्ये सहभाग नोंदविल्याचे दिसून येते.

अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९२५ साली श्री. माधोराव गोविंदराव मेश्राम यांनी चळवळ सुरू केली होती. अस्पृश्यांनाही देवळात प्रवेश मिळावा यासाठी मंदिराच्या व्यवस्था कमिटीकडे अर्ज पाठविले. परंतु त्या अर्जाला सनातन्यांनी काहीही उत्तर दिले नाही. ब्राम्हणेतर चळवळीतील दादासाहेब पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अस्पृश्यांच्या चळवळीला उचलून धरले. त्यावेळेस 'कमिटिने १९२६ साली असा ठराव पास केला की, अस्पृश्यांची ही चळवळ आततायीपणाची व अन्यायाची आहे आणि त्यामुळे वर्णाश्रमावर घाला होणार आहे'.८

अंबादेवीच्या मंदिर प्रवेश सत्याग्रहाला दोन वर्षे पूर्ण झाली होती तरीही स्पृश्यवर्गीय अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश करू देण्यास तयार नव्हते. मंदिर प्रवेश कमिटीमार्फत १३ नोव्हेंबर १९२७ रोजी सत्याग्रहींना मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बोलाविण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना बाबासाहेब म्हणाले, 'कोणताही देव अस्पृश्यांमुळे विटाळला जात नाही, म्हणून अस्पृश्यांकरीता स्वंतत्र देवालयास आमचा विरोध आहे. हिंदुत्व हिंदुकरीता आहे असे मानले तर स्पृश्य आणि अस्पृश्य या दोघांकरिता आहे. हिंदुत्वाच्या विकासात वाल्मिकी, रोहिदास, चोखामेळा आदी संतांचा तसेच सिदनाक वैगेरे महारांचा वाटा आहे'.९ असे महत्वपूर्ण उत्साही मार्गदर्शन सत्यागहींना बाबासाहेबांनी केले. त्यामुळे अस्पृश्य वर्गात जागृती निर्माण झाली. पुन्हा हा सत्याग्रह सुरू करण्यात आला. परंतु या सत्याग्रहाचा प्रश्न बरेच दिवस प्रलंबित राहिला.

महाड सत्याग्रहापासून अस्पृश्यांनी स्फूर्ती घेऊन अनेक ठिकाणी सत्याग्रह केले. पुण्यातील पर्वती मंदिरात प्रवेश करण्याचा सत्याग्रह दि. १३ ऑक्टोबर १९१९ रोजी सुरू केला. या सत्याग्रहात अग्रेसर शिवराम जानबा कांबळे, पा. ना. राजभोज, थोरात, लांडगे, देवदास रानडे विनायकराव भुस्कुटे, केशवराव जेधे, गाडगीळ इ. समाविष्ट असल्याचे दिसून येते.

बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेबांनी १८० वर्षापूर्वी पुण्याचे पर्वती मंदिर खाजगी खर्चाने बांधले आहे. त्यामुळे ते सार्वजनिक मंदिर नाही असा पवित्रा सनातनी स्पृश्य वर्गाने घेतला होता. यासंबंधी चां. भ. खैरमोडे म्हणतात, 'पर्वतीचे देऊळ हे खाजगी आहे की सार्वजनिक हा प्रश्न उपस्थित करून काही जणांनी अशी भूमिका घेतली आहे की, हे देऊळ खाजगी असल्यामुळे अस्पृश्यांना त्यात प्रवेश मिळणार नाही व त्यासाठी त्यांनी सत्याग्रह करू नये.'१० असे मत स्पृश्य वर्गाचे होते. अस्पृश्य लोक ते देऊळ खाजगी नसल्याचे मानत असत. अस्पृश्यांचे स्पष्ट मत होते की, मंदिरांच्या पायऱ्यांचा खर्च सार्वजनिक उत्पन्नातून होत असेल तर ते मंदिर खाजगी कसे? त्यामुळे अस्पृश्यांनी स्पृश्य कार्यकर्त्यांच्या मदतीने दि. १३ ऑक्टोबर १९२० रोजी दसऱ्याच्या दिवशी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह सुरू केला. पर्वती मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह हा तीन वेगवेगळ्या दिवशी करण्यात आले. या सत्याग्रहासाठी अस्पृश्यांवर मारामारी, दंगेधोपे झाले.त्यामुळे अस्पृश्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. स्पृश्यांच्या मध्यस्थीमुळे २० जानेवारी १९३० रोजी सत्याग्रह स्थगित झाला. तो पुन्हा सुरू झाला नाही. शेवटी १९४७ साली मंदिर १८ वर्षाच्या प्रयत्नानंतर खुले झाले.

महाडच्या सत्याग्रहानंतर संपूर्ण महाराष्ट्रातच सत्याग्रहाची परिस्थिती निर्माण झाली होती. मुखेड गावच्या महारवाड्यात पांडव-प्रताप ग्रंथाचे पारायण टाळ-मृदूंगात, भजने गाऊन, शेवटच्या दिवशी पांडव-प्रताप ग्रंथाची दिंडी निघणार होती. त्यासाठी आजूबाजूच्या गावातील आप्तेष्ट मंडळीही जमली होती. २३ सप्टेंबर १९३१ रोजी दुपारी २.३० वा. पांडव-प्रताप ग्रंथी मिरवणूक काढली. या मिरवणुकीत १५०० मंडळी होती. तीनच्या सुमारास गावाच्या वेशीजवळ मिरवणूक आली. काही कारण नसताना गावातील मराठ्यादी स्पृश्य हिंदू लोकांनी मिरवणूकीचा रस्ता रोखून धरला. याचे कारण काय? असे विचारल्यावर स्पृश्य मंडळी अस्पृश्यांना उद्देशून अचकट विचकट शिव्या देऊ लागली. असा प्रकार केल्यानंतर त्यातील काहीजण ओरडून म्हणाले, 'तुम्ही मुकाट्याने महारवाड्यात परत जा. तुमची मिरवणूक आम्ही गावातून जाऊ देणार नाही. आज तुम्ही देवाची व पोथीची मिरवणूक काढाल व उद्या महार, चांभारचा नवरदेव गावातून मिरवित न्याल आणि परवा तुम्ही लोक आमच्या ओटीवर व घरांदारातही घुसाल.'

त्यानंतर स्पृश्यांनी अस्पृश्यांवर दगडांचा मारा केला. त्यामुळे अस्पृश्य वाट मिळेल तिकडे सैरावैरा पळत सुटले. या प्रकरणी मुखेडच्या एकूण २६ ब्राम्हणेतरांवर सार्वजनिक रस्त्याने अस्पृश्यांना जाण्यास अडथळा केल्याच्या गुन्ह्याबद्दल खटला भरण्यात आला. त्यामुळे त्यांनी अस्पृश्यांबरोबर सामोपचाराचे बोलणे सुरू केले होते. २६ स्पृश्य मराठ्यांनी दिलगिरी व्यक्त केली होती. त्यामुळे पूर्वाश्रमीच्या महार मंडळीच्या विनंतीवरून १९ मार्च १९३२ रोजी सरकारने खटला काढून टाकला.

सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सिध्दांतवादी चळवळीतून असे दिसून येते की, समाजात असलेली स्पृश्यास्पृश्य असा भेद संपवून सामाजिक समता प्रस्थापित करणे हेच मुख्य सूत्र सत्याग्रहाच्या पाठीमागे होते. हिंदू समाज जसा ब्रिटिशांच्या तावडीतून मुक्त होण्यासाठी झटत होता, तसेच अस्पृश्य हेही आपल्या मानवीय अधिकारासाठी झटत होते. जे सुधारणावादी होते त्या स्पृश्य मंडळीनाही त्यांना मदत केली होती. आजही आधुनिक महाराष्ट्रातील जातीवाद संपल्याचे दिसून येत नाही. डॉ. बाबासाहेब आबंडेकरांनी हिंदू धर्माच्या चौकटीत राहूनच हिंदू समाजात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना असे समजून आले की, हिंदूचा दृष्टिकोण बदलणे अशक्य आहे याची जाणीव झाल्यानंतरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मी अस्पृश्य म्हणून जन्माला आलो असलो तरी अस्पृश्य म्हणून मरणार नाही.'

संदर्भ

- आहूजा राम, **'भारतीय समाज'** रावत पब्लिकेशन जयपूर अवम नई दिल्ली, सन २००२, पृ. १३
- मूत वसंत (संपा.), **'डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग व स्पिचेस,' खंड १**, महाराष्ट्र शासन संस्कृती मंडळ, मुंबई सन २०१०, पृ. १८, १९
- शर्मा रामशरण, **'शुद्रों का प्राचीन इतिहास'**, राजकमल प्रकाशन, नेताजी सुभाष मार्ग दरियागंज, नई दिल्ली, तिसरी आवृत्ती २०० पृ. १०८
- पाटणकर मनिषा (संपा.), **'लोकराज्य १', धम्मचक्रप्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक**, महाराष्ट्र शासन, मुंबई ऑक्टोबर २००६, पृ. १२४
- गेडाम टी. जी., **'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर'**, सौ. शारदा गेडाम, आवळे नगर नागपूर, प्रथम आवृत्ती २००६, पृ. ६३, ६३
- मून वसंत,**'डॉ.बाबासाहेब आंबेडकर'**,नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया,नवी दिल्ली,तिसरी आवृत्ती २००५,पृ. ४१
- खैरमोडे चां. भ., **'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर'**, खंड ३, सुगावा प्रकाशन, ५६२ सदाशिव पेठ, पुणे, तृतीय आवृत्ती २००३, पृ. ३३४
- कित्ता पृ. १५
- कित्ता पृ. २६८
- गायकवाड प्रदीप (संपा.), **'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जनता साप्ताहिक पत्र'**, डॉ. बावासाहेब आंबेडकर उड्डाण पूल, लष्करी बाग, नागपूर, प्रथमावृत्ती १४ एप्रिल २००७, पृ. २०१

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACH
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratn

dhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII) B
ISSN : 2278-9308
September, 2021

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य

डॉ.विकास शंकर पाटील
श्रीमनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल– रायपाटण,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी

साठोत्तरी मराठी साहित्य प्रवाहात दलित साहित्य हा एक रसरशीत आणि वास्तववादी असा साहित्य प्रवाह म्हणून ओळखला जातो. आज दलित साहित्य खूप विस्तारले असून त्यात वैविधता ही आलेली आहे. आज दिसणारा विशाल दलित साहित्याचा प्रवाह पाहिला की त्याच्या प्रारंभाकडे जाणे, त्याच्या निर्मिती प्रक्रियेचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव आणि त्यांच्या तत्वज्ञानातूनच हे साहित्य उगम पावल्याचे आपणास दिसते. विशालकाय सांस्कृतिक व भौगोलिक विविधता असणाऱ्या भारताला घटनेच्या धाग्यात बांधून ठेवण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहेच, त्याचबरोबर अर्थतज्ञ, जलनीतीतज्ञ, पत्रकार, संपादक, विधीतज्ञ, कायदेपंडित विचारवंत अशा विविध क्षेत्रात त्यांनी भरीव काम केले आहे. हजारो वर्षे दलित समाज व्यवस्थेने दिलेल्या बंधनात राहून, अन्याय अत्याचार आणि गुलामगिरी सहन करत होते. त्या दलित समाजाला आत्मभान देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात घेऊन येऊन त्यांना त्यांचे अधिकार व हक्क परत मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान समाज सुधारक आहेत.

संघर्ष हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता.आयुष्यभर त्यांनी संघर्ष केला. जाती व्यवस्थेविरुद्ध, संस्कृतीविरुद्ध,समाजव्यवस्थेविरुद्ध त्यांचा संघर्ष अविरत सुरु राहिला. जे जे वाईट आणि अन्याय कारक होते त्या सर्वावर प्रहार करणे आणि चांगल्या गोष्टींचा स्वीकार करणे व त्या अंगीकृत करणे हा त्यांचा स्थायीभाव होता.त्यांच्यासंदर्भात योगेंद्र मेश्राम असे म्हणतात की "डॉ.आंबेडकरांनी आपल्या जीवनातली सारी आग प्राशन केली. ते सूर्यासारखे प्रखर बनले. तेजस्वी अन कणखर बनले. आणि माणसाला माणूस न लेखणाऱ्या दुष्ट जुलमी रूढी -परंपरा, हिंदू संस्कृती व धर्मसत्ता याविरुद्ध ते तुटून पडले.रणांगणावरील एखाद्या शूरवीराच्या बाण्याने ते आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्राणपणाने लढत राहिले. अमानुषता व अन्यायाचा प्रतिकार अर्थ युद्ध करा लढा झगडा असा संदेश त्यांनी आपल्या दलित बांधवांना दिला हा माणूस दावा अन्यायाच्या प्रतिकारार्थ युद्ध करा, लढा। झगडा। ।असा संदेश त्यांनी आपल्या दलित बांधवांना दिला.[1]

डॉ.वाबासाहेब आंबेडकर हे महान विचारवंत होते. त्यांनी दलित समाजाचे दुःख, वेदना यांचे कारण शोधले आणि त्यातून त्यांना बाहेर काढण्याचा उपाय शोधला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही दलित समाजाचे उद्धारकर्ते आहेत. त्यांनी विषमतेविरुद्ध लढा उभारला, माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेला त्यांनी नकार दिला. त्यांनी केलेले कार्य हे सहज सुलभ झालेले नाही तर त्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षा संबंधी योगेंद्र मेश्राम असे म्हणतात की, "अत्यंत प्रतिकूल विरुद्ध परिस्थितीतून जात असताना त्यांच्या जीवनमार्गातील प्रतिवाद - अडथळयांनीच त्यांच्यामध्ये कमालीची जिद्द प्रचंड ताकद निर्माण केली.जीवनाच्या परिक्रमेतील प्रतिकूलतेने निर्माण केलेला डॉ. आंबेडकरातील चीड क्रोध व संताप हा सात्विक तितकाच स्वभाविक असल्यामुळे त्यांच्यामधील तो एका शक्तीचे रूप होता, परिस्थितीचा आत्यंतिक भडिमार त्यांनी सोसला म्हणून ते आत्यंतिक विद्रोहीशक्तीने भरले. विद्रोह सूर्य झाले.बंडखोर बनले. त्यांच्या जीवनानेच अन्यायाची मनात भयंकर चीड निर्माण केली. प्रतिकाराची अफाट शक्ती पैदा केली आणि ते महान बंडखोर बनले. प्रतिकूलता, प्रतिवाद वा अडथळे सृजनाला पोषक ठरतात काय?सुजन सामान्यांना रडतात पण आंबेडकर मूक समाजाचे नायक झाले सारा बहिष्कृत भारत त्यांनी जागा केला."बाबासाहेबांनी संकटाला संधी मानले. आपल्या वाट्याला आलेल्या व्यथा-वेदना घेऊन त्यांना कवटाळत ते बसले नाहीत तर त्यांच्या मागे असणारी कारणे शोधून त्यावर ते उपाय शोधंत राहिले.प्रसंगी संघर्ष स्वतःशीच,समाजाशी,धर्मवेड्याशी, राजकारण्यांशी,सनातन्यांशी असा विविध पातळयांवर होत राहिला पण ते मागे हटले नाहीत.त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या ज़ोरावर आणि साहसाच्या जोरावर दलित समाजाला आत्मभान दिले. त्यांना शिक्षणाची कवाडे खुली करून दिलीत. स्वतः शिक्षण घेऊन स्वतःच्या विद्वत्तेच्या बळावर भारतीयांना दिपवून टाकले. समाजव्यवस्थेत जे जे अमंगल मानले होते, ज्यांना अस्पृश्य मानले गेले होते,ज्यांचा जगण्याचा अधिकार हिरावून घेतला होता, गुलामगिरीत ज्या मंडळींना ठेवले गेले होते त्या सर्वांना त्यांनी या व्यवस्थेतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवला.ते खरे क्रांतिसूर्य होते म्हणूनच त्यांच्या विषयी योगेंद्र मेश्राम म्हणतात, "डॉ.

बाबासाहेबांनी अडाणभोळ्या,दुबळ्या नी मुक्या माणसांना वाचा दिली. माणुसकीने जगण्याची शक्ती, आत्मविश्वास व आत्मप्रतिष्ठेचे भान त्यांच्यात निर्माण केले.डोळस केले. आत्मविकासाची व आविष्कराची डोळस जाणीव दिली.दलितांच्या काळापासून काळवंडलेल्या, मेलेल्या इच्छा व आशा -आकांक्षाना सर्वस्पर्शी परिवर्तनाचा साजिवंत आकार प्राप्त करून दिला आणि त्यांची मेलेली -मोडलेली मने अशी त्यांनी नव्याने घडवली. समाजक्रांतीची डोळस प्रबळ जाणीव आणि मानसिकता दलितात निर्माण केली.[iii]बाबासाहेबांनी हजारो वर्षे खितपत पडलेल्या दलित समाजाला नवविचार दिला. लढण्याची जिद्द दिली. समाज व्यवस्थेविरुद्ध, जाती व्यवस्थेविरुद्ध,धर्मव्यवस्थेविरुद्ध लढण्यासाठी एक नवा विचार दिला.स्वातंत्र्य, समता,बंधुता या त्रयीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांचे जीवन संघर्षमय असले तरी त्यातून दलित समाजाचे जीवन उजळून निघाले. समस्त भारतीयांना स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रयीचे महत्व पटवून दिले.घटनेच्या माध्यमातून लोकशाही बळकट करून प्रत्येकाला त्यांचे अधिकार प्राप्त करून दिले. म्हणूनच बाबासाहेबांचे जीवन त्यांची कार्य कृती ही फक्त दलित साहित्य निर्मितीची प्रेरणा नसून दलित साहित्यातून जे काही तत्त्वज्ञान येते त्या तत्त्वज्ञानाचा मूलभूत आधार ही आहे.बाबासाहेबांच्या विचारांचे तत्त्वज्ञानचं दलित साहित्याच्या मुळाशी असलेले आपल्याला दिसून येते.

स्वातंत्र्य समता बंधुता यांचा पुरस्कार दलित साहित्य करते -

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते समाज बलशाली होण्यासाठी तो समाज स्वतंत्र असला पाहिजे.तिथे समता असली पाहिजे आणि त्या समाजात बंधुभाव असला पाहिजे. सामाजिक लोकशाहीचे तत्व म्हणजे आंबेडकरवाद होय.बाबासाहेबांच्या मते राजकीय लोकशाहीत व्यक्तीची स्वातंत्र्य हिरावून घेतली जातात आणि सामान्य माणूस केवळ गरजेपोटी, पोटाच्या भुकेसाठी गुलाम बनतो म्हणूनच राजकीय लोकशाही ही व्यक्तीच्या विकासासाठी घातक असते असे त्यांना वाटते.प्रत्येक माणसाला विकासाची समान संधी उपलब्ध झाली पाहिजे त्याच्या विकासामध्ये जात, धर्म, वंश, लिंगभेद आधी गोष्टी येता कामा नयेत असे बाबासाहेबांना वाटते म्हणूनच समता या तत्वाचा पुरस्कार ते करतात, त्याचबरोबर 'हे विश्वचि माझे घर'या उक्तीप्रमाणे प्रत्येकाला दुसरी व्यक्ती ही आपली वाटली पाहिजे. प्रत्येक समाज आपला वाटला पाहिजे. त्या ठिकाणी बंधुभाव असणे आवश्यक आहे.तिथे मत्सर नसावा. एकमेकाविषयी द्वेषभावना नसावी तर बंधुत्वाची भावना असावी हा विचार बाबासाहेबांचा आहे. त्यामुळेच त्यांनी बंधुता या तत्त्वाचा देखील पुरस्कार केलेला आपल्याला दिसून येतो.स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हा लोकशाहीच्या मुळाशी असणारा विचार बाबासाहेबांनी स्वीकारलेला आहे.या त्रयीचा स्वीकार दलित साहित्य करताना आपल्याला दिसून येते.बाबासाहेबांचा विचार भारतीय लोकशाहीला बळकटी देणारा आहे.

जातिवाद व विषमतेला विरोध -

जातिवाद आणि विषमतेला बाबासाहेबांचा प्रचंड विरोध होता. त्या विरोधीच त्यांचा संघर्ष अविरत सुरु राहिला.त्यासाठी परंपरागत व्यवस्था त्यांनी धुडकावून देऊन नवी मूल्यव्यवस्था स्वीकारली. जातिवाद, विषमतेत एक समाज दुसऱ्या व्यक्तीचे हक्क अधिकार हिरावून घेतो, त्याच्यावर अन्याय, अत्याचार करतो. त्यामुळेच या व्यवस्थेला बाबासाहेबांचा विरोध होता.तो त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंतराहिला.दलित साहित्यही बाबासाहेबांच्या या विचाराचे समर्थन आपल्या साहित्यातून करताना दिसते. दलित साहित्यात ही जातीयता व विषमतेला विरोधच आहे.

मानवतावाद -

मानवतावाद म्हटले की भूतदया येते पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मानवतावाद हा हृदयातून आलेला नव्हता तर तो बुद्धिप्रामाण्यावर उभा होता.विरोधासाठी विरोध अशी त्यांची भूमिका नव्हती तर त्यांचा विरोध हा तत्त्वांसाठी होता.तो विध्वंसक नव्हता तर विधायक होता. तो व्यक्तीविरुद्ध नव्हता तर प्रवृत्तीविरुद्ध होता. त्यांचे वैर ब्राह्मण व्यक्तीचे नव्हते तर ब्राह्मण वादाशी होते.ते अज्ञान,अंधश्रद्धा, भेदभाव जातीयता विषमता यासर्व शोषण प्रवृत्तीच्या विरोधी होते. नवनिर्मितीसाठी,विधायक निर्मितीसाठी अशा विषमतेचा, जातीयतेचे ते कट्टर विरोधकच होते.हाच त्यांचा मानवतावाद हा बुद्धाच्या मानवतावादासी एकरूप आहे.मानवी विकासाचा तो ध्यास आहे.समग्र मानव जातीला पुढे घेऊन जाणारा तो मानवतावाद आहे.आज बाबासाहेबांना अपेक्षित असणारा मानवतावाद दलित साहित्याच्या मुळाशी असलेला आपल्याला दिसून येतो.

वेदना,विद्रोह,नकार दृष्टी -

दलित साहित्याच्या मुळाशी वेदना, विद्रोह,नकार या प्रधान प्रेरणा सांगितल्या जातात. परंपरागत व्यवस्थेने लादलेल्या जीवनाची वेदना म्हणतानाच, त्या परंपरागत जीवनाविषयी विद्रोह आणि त्या परंपरांना नकार ही दलित साहित्याची भूमिका राहिली आहे. बाबासाहेबांच्या विचारातूनच यांची मांडणी झाल्याचे दिसते. दलित साहित्याच्या

प्रेरणा सांगताना प्रकाश खरात म्हणतात, "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे दलित,शोषित समाजात एक प्रचंड वैचारिक क्रांती झाली. हजारो वर्षापासून मुका असलेला समाज बोलू लागला. हातात लेखणी घेऊन लिहू लागला. पाण्याला स्पर्श करण्याचा माझा अधिकार आहे हे सांगू लागला. हिंदू धर्माची गुलामगिरी नष्ट करण्यास तयार झाला. डॉ.आंबेडकर यांच्या आंदोलनामुळे व तत्त्वज्ञानामधून शोषणाविरुद्ध बंड, विद्रोह,नकार ही सिद्धांत तत्वे उदयास आली.[iv]दलित साहित्यात दिसणारी ही सिद्धांत तत्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातूनच प्रकट झालेली आपल्याला दिसून येतात.तीच साहित्य तत्वे दलित साहित्याच्या मुळाशी असून त्यांची मांडणी झाल्याचे आपल्याला दिसते.

वैज्ञानिक दृष्टीकोन -

बाबासाहेबांनी सर्व समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सक पद्धतीने पाहण्याची दृष्टी दिली. आजपर्यंत समाज रूढी, परंपरा, संस्कृतीतच गुंतला असल्यामुळे आपल्या फायद्यासाठी समाजाला वेठीस धरणारे,समाजातील कष्टकरी गोरगरीब लोकांचा छळ करणारे, प्रसंगी धर्माची वा देवाची भीती दाखवून लोकांना लुबाडणारे लोक समाजात मोठ्या प्रमाणात होते. इतकेच नाही तर समाजात घडणाऱ्या घटनांचा आपल्या पद्धतीने अन्वयार्थ लावून लोकांना लुटले जात होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्व कृतींचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अर्थ लावण्याचा प्रयत्न केला व समाजाला एक नवी दृष्टी दिली. दलित साहित्यातही या दृष्टिकोनातूनच लेखन होतांना आपल्याला दिसते. बाबासाहेबांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून अर्थ लावण्याच्या पद्धतीचा समाजास फायदा झाला. लोक अज्ञान,अंधश्रद्धा,रूढी,परंपरा यातून बाहेर पडण्यास मदत झाली. दलित साहित्याने हा विचार प्रखरतेने मांडण्याचा प्रयत्न केला.

बुद्धाचे तत्वज्ञान -

संपूर्ण मानव जातीला बुद्ध हवा आहे. ही गरज बाबासाहेबांनी बुद्धाचे तत्वज्ञान सांगून प्रतिपादन केली. महात्मा गौतम बुद्ध यांचे तत्वज्ञान साध्या सोप्या शब्दात लोकांच्या पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. स्वतः बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. त्याचबरोबर बौद्ध धर्माची शिकवण महान असून ती मानव जातीच्या हिताची आहे. याचेही महत्व समस्त समाजाला पटवून दिले. महात्मा गौतम बुद्धाची अहिंसा आजच्या विश्वाला खूप आवश्यक आहे या संदर्भात आपल्या शब्दात मांडणी केली.

दलित आत्मकथने -

आत्मचरित्र या प्रकारातून पुढे आलेली दलित आत्मकथने संपूर्ण साहित्यविश्व ढवळून काढणारी ठरलीत. दलितांचे गावकुसाबाहेर जगणे, जगण्यासाठी त्यांची चाललेली धडपड, पांढरपेशी समाजाकडून केला जाणारा अन्याय-अत्याचार या साऱ्याची क्रमवार मांडणी या दलित आत्मकथनातून झाली आहे. दलित यांच्यावर झालेला अन्याय, अत्याचार वाचून पांढरपेशी लेखकांच्या लेखण्या गळून पडल्या. दलित आत्मकथनातील दाह वाचकांनाही अस्वस्थ करून गेला. आपण जगलेले जीवन वास्तव जसेच्या तसे मांडण्याचे बाबासाहेबांनी दिलेले धैर्य इथे आत्मकथन लेखनाला सहाय्यभूत झाले. बाबासाहेबांच्या विचारातूनच ही आत्मकथन लिहिणारी पिढी पुढे आली होती. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांची केलेली कृती म्हणजेच ही आत्मकथने होत. आत्मकथन लेखनाला बाबासाहेबांचा विचार प्रेरणादायी ठरला हे सांगताना वासुदेव मुलाटे असे म्हणतात की, " समाजाच्या या निम्नस्तरातील जाती शिक्षणामुळे जागृत होऊ लागल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि विचार यामुळे त्यांना आत्मभान येऊ लागले.स्वतःच्या उद्धारासाठी हा दलित भटका समाज संघटित होऊ लागला.चळवळ उभारून संघर्ष करू लागला. समता आणि न्यायासाठी झगडू लागला.सामाजिक गुलामगिरीची बंधने झुगारून अस्तित्वासाठी लढाई करू लागला.[v]

दलित समाजाला बाबासाहेबांच्या विचाराने आत्मभान आले व आपल्या न्याय हक्काची मागणी तो करू लागला. त्यासाठी त्यांनी लेखणी हातात घेतली. आपल्यावर होणारे अन्याय अत्याचार प्रभावीपणे तो साहित्यातून व्यक्त करू लागला. बाबासाहेबांनी दिलेले धारिष्ट या साऱ्या लेखनामागे असलेले आपणास दिसून येते.

आंबेडकरवाद -

आंबेडकरवाद हा मानवी मूल्यावर आधारलेला मानवतावादच आहे. तो भक्कम आशा बुद्धिवादावर उभा आहे. बुद्धाचे तत्वज्ञान ही त्याची मूळ बैठक असून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विद्रोह आणि विश्वात्मकता हीच त्याची अंतिम धारणा असून तेच अंतिम ध्येय आहे. त्याचबरोबर विषमतेला,पिळवणुकीला,अन्यायाला, बुवाबाजीला, अंधश्रद्धेला, ब्राह्मणशाहीला,भांडवलशाहीला, सामंतशाहीला निकराचा विरोध आहे. बाबासाहेबांना विवेकयुक्त आणि विज्ञाननिष्ठ नवसमाज हवा आहे. स्वातंत्र्य समता आणि बंधुता लोकशाही निष्ठतत्वावर आधारित नवभारताचे स्वप्न ते पाहतात.प्रा.रावसाहेब कसबे यांच्या शब्दात आंबेडकरवाद म्हणजे

समता,स्वातंत्र्य, बंधुता, न्याय म्हणजे आंबेडकरवाद
लोकशाही समाजवादाचा स्वीकार म्हणजे आंबेडकरवाद

समाज परिवर्तनाचे तत्वज्ञान म्हणजे आंबेडकरवाद
प्रज्ञा,शील,करुणा व मैत्रीची सांगड म्हणजे आंबेडकरवाद
अनित्य,अनात्म,अनिश्वरवाद आणि विज्ञानवाद म्हणजे आंबेडकरवाद
बुद्धिप्रामाण्य, विवेक,गती,तर्क आणि बुद्धिवादाचा स्वीकार म्हणजे आंबेडकरवाद
सर्वंकष मानवमुक्तीचे तत्वज्ञान म्हणजे आंबेडकरवाद
आणि आंबेडकरवाद म्हणजे सम्यक क्रांतीचे तत्त्वज्ञान”

थोडक्यात समाजातील अन्याय व विषमता जन्य परिस्थितीवर पोसल्या गेलेल्या प्रवृत्तीवर प्रहार करून माणसाला माणूसपण देऊन, त्यांचे हक्क व प्रतिष्ठा त्यांना मिळवून देणे, मानवी मूल्यांची जपणूक करणे हेच आंबेडकरवादाचे अंतिम ध्येय आहे. हाच आंबेडकरवाद दलित साहित्यातून प्रकट होताना आपल्याला दिसतो.

दलित साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जसे आहेत तसेच त्या साहित्यातून प्रकट होणारे विचारही डॉ. बाबासाहेबांच्या तत्वज्ञानातून आले आहेत.

निष्कर्ष-:

१) दलित साहित्याचे प्रमुख प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत.
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार दलित साहित्याच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते.
३) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय, धार्मिक, वैचारिक क्रांतीविचार हाच दलित साहित्याचा पाया आहे.
४) स्वातंत्र्य, समता,बंधुता या त्रयीचा पुरस्कार करताना दलित साहित्य दिसते.
५) दलित साहित्य परंपरांना व संस्कृतीला चिकटून बसत नाही तर बाबासाहेबांच्या विचारातील नवराष्ट्राच्या निर्मितीचा पुरस्कार करताना दिसते.
६) दलित साहित्य हे मानवतावादाचा पुरस्कार करणारे साहित्य आहे.
७) दलित साहित्यावर गौतम बुद्धांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.
८) दलित साहित्य हे विश्वात्मकतेचा पुरस्कार करताना दिसते.
९) दलित साहित्य आंबेडकरवादाचा पुरस्कार करताना दिसते.
१०) दलित साहित्याने नवी वाङ्मयमूल्ये निर्मिली आहेत.

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist-

'B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII) B
ISSN : 2278-9308
September, 2021

पत्रकार - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रा. डॉ. बळवंत दाभाडे
मराठी विभाग, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल- रायपाटण
ता.राजापूर, जि.रत्नागिरी, ४१६ ७०४ ,ईमेल : balwant.dabhade@gmail.com

प्रस्तावना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारीतेचा विचार करत असताना त्यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून सामाजिक जाणीव करून दिलेली आहे. विसाव्या शतकाचा उदय हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा एक महत्त्वाचा कालखंड मानला जातो. एखादा कालखंड राजकीय असो किंवा सामाजिक असो त्याची जाणीव मात्र सर्वसामान्य समाजाला करून देणे ही जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेमध्ये दिसून येते. या दृष्टिकोनातून विचार केला तर ही एक काळाची गरज होती म्हणून महाराष्ट्रातील इंग्रजीतील काही पत्रकारितेचा विचार करत असताना या कालखंडातील इंग्रजीतील वृत्तपत्राने आपले महत्त्वाचे कार्य पार पाडले होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून याच जाणिवेतून समाजाच्या उद्धारासाठी वृत्तपत्राने महत्त्वाचे कार्य केलेले आहे. भारतीय वृत्तपत्रसृष्टीला साधारणपणे दोनशे वर्षांपेक्षा अधिकचा कालखंड झालेला आहे. या कालखंडामध्ये पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये ज्यांचे कार्य अमुल्य आहे, अशा मोजक्याच लोकांचा उल्लेख आज आपणास वाचायला व ऐकायला मिळतो. या उल्लेखामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रगण्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे जे नीतिशास्त्र आहे ते आजही सर्वांसाठी उपयुक्त व प्रभावशील मानले जाते. पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये मागील काही वर्षांपासून आमूलाग्र असे बदल घडून आलेले आहेत. या बदलाने पत्रकारितेला संपूर्णतः नवीन चेहरा मिळवून दिलेला आहे. या नाविन्यपूर्ण क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेच्या प्रारूपाचा समावेश मात्र कायमपणे दिसून आलेला आहे. याचा अर्थ असा की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही कालमर्यादेत निश्चितपणे थांबणारी नसून ती चिरंतन स्वरूपाची आहे. विशिष्ट समुदायाचे नेतृत्त्व करणारे सामाजिक आणि राजकीय विचारवंत एवढी मर्यादित प्रतिमा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निर्माण करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे व्यक्तिमत्त्व विशिष्ट चौकटीत बंदिस्त करता येईल, एवढे मर्यादीत ना काल होते ना आज आहे. सूर्यप्रकाशाला ज्याप्रमाणे बंदिस्त करता येणार नाही. त्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महत्त्वाला देखील बंदिस्त करता येणार नाही. भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास लेखन करणाऱ्या मंडळींना ही बाब नक्कीच लक्षात आली नसावी. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रभावी संपादक, पत्रकार होते, ही घटना त्यानी बाजूला ठेवली. मात्र डॉ. व्ही. डी.राव, चां. भ. खैरमांडे, डॉ.धन्यजय कीर, अमेरिकन अभ्यासक डॉ. एलिनार झेलियट, अप्पासाहेब रणपिसे, सुखराम हिवराळे, डॉ. हरिश्चंद्र निर्मळे, गंगाधर पानतावणे इ. अभ्यासकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचे वैभव जगापुढे मांडले. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेच्या अनुषंगाने काही प्रकाशाने केलेली आहेत. यामध्ये वसंत मून यांनी संपादित केलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'बहिष्कृत भारत' आणि 'मूकनायक' हा ग्रंथ खूप महत्वाचा आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक प्रगतीमध्ये वृत्तपत्रांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वैचारिक चळवळ निर्माण करायची असेल तर वृत्तपत्रा खेरीज दुसरा कोणताही पर्याय नाही, ही बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना चांगल्या प्रकारे ज्ञात होती. तळागाळातील दलित, गरीब वर्गामध्ये जनजागृती व नवचेतना निर्माण करण्यासाठी वृत्तपत्राशिवाय दुसरे प्रभावी साधन नाही याचीही त्यांना प्रकर्षाने जाणीव होती.

हजारो वर्षांपासून मूक असलेल्या मनाला, उपेक्षित असणाऱ्या समाजाला न्याय देण्यासाठी व त्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सामाजिक व राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्र साधन म्हणून समाजाच्या उद्धारासाठी वापरण्याचा निर्धार केला. ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' या नावाने पाक्षिक सुरु केले. या अंकाच्या संपादकीय मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्र काढण्यामागील आपली भूमिका विशद केली, त्यामध्ये ते लिहितात, 'आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा करण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही.' म्हणून व 'स्वजनाद्धाराचे कार्य करण्यास योग्य पंथ दाखवण्यासाठी' आपण मूकनायक पत्र सुरू करीत आहोत. मूकनायक या वृत्तपत्राला डॉ. बाबासाहेब आंबेडकर अधिक वेळ देवू शकले नाहीत. १९२० साली पुढील अभ्यासासाठी त्यांना इंग्लंडला जावे लागले. श्री. घोलप यांच्यावर मुकनायकाची जबाबदारी सोपविली. त्यानंतर चार वर्षानंतर १९२३ ला मात्र मूकनायक बंद पडले. मूकनायकाच्या बारा अंकांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपादकीय लेखन अभ्यासायला मिळते. १९२० ते १९२३ या कालखंडामध्ये साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी अशावेळी वृत्तपत्र काढणे व ते चालवणे हे महत्त्वाचे ठरते. मूकनायक नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरु केले. पुढे १५ नोव्हेंबर १९२९ ला काही अडचणींमुळे ते बंद पडले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३० मध्ये 'जनता' आणि १९५६ ला 'प्रबुद्ध भारत' अशी दोन वृत्तपत्रे सुरू केली. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रीय प्रपंच समाज उद्धाराचा आहे. हे लक्षात येते. सामाजिक सुधारणेचा प्रवास त्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून सुरू केलेला होता. या पार्श्वभूमीवर त्यांचा वृत्तपत्रीय लेखनाचा परामर्श खालील प्रमाणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक(१९२०),बहिष्कृत भारत(१९२७), जनता(१९३०) आणि जनतेतेच रूपांतरित प्रबुद्ध भारत (१९५६) अशा चार पत्रांना जन्म दिला. 'समता' हे 'समाज समता संघा' चे मुखपत्र होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाज समता संघाचे अध्यक्ष होते, संस्थापक नव्हते. संघ अगोदरच स्थापन झालेला होता. एका सभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती करण्यात आली आणि ती त्यांनी स्वीकारलीही. समाज समता संघातील कार्यकारिणीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव अस्पृश्य समाजातील होते. संघाच्या 'समता' पत्राचे संपादक दे. वि. नाईक होते. तेव्हा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या 'मूकनायका' ने 'बहिष्कृत भारता' तील 'जनते' ला 'प्रबुद्ध भारता' ची ओळख करून दिली आणि महाराष्ट्रमध्ये आणि मराठीमध्ये दलितांच्या पत्रसृष्टीला एक नवी दिशा व नवे सामर्थ्य प्राप्त झाले.

मूकनायक :

'मूकनायक' हे नाव समाजाच्या दृष्टीने अर्थपूर्ण होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूक समाजाचे जणू नायकत्व स्वीकारल्याचीच जाणीव होते. संपादक म्हणून त्यांनी अस्पृश्य समाजातील तरुण पांडुरंग नंदराव भटकर याच्याकडे ती जबावदारी सोपवली.' मूकनायक' वर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपादक म्हणून नाव नसले तरी ते डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या चळवळीचे खऱ्या अर्थाने मुखपत्र होते. असे धनंजय कीर म्हणतात 'मूकनायक' प्रसिद्ध झाले त्यावेळी लोकमान्य टिळक हयात होते आणि 'केसरी' ची प्रसिद्धी होती. त्यांच्या हयातीतच 'मूकनायक' ची जाहिरात 'केसरी' मध्ये देण्यास नकार देण्यात आला होता. प्रार्थना समाजाची 'सुबोधपत्रिका' ख्रिस्ती मिशनऱ्यांचे 'ज्ञानोदय', हिंदुत्वाचा प्रखर पुरस्कार करणारे 'भाला', आणि ब्राह्मणेतरांची 'दीनमित्र', 'विजयी मराठा', 'जागरूक', ही पत्रे आपापल्या वैशिष्ट्यांनिशी महाराष्ट्रात प्रसिध्दीस आली होती. ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, संदेश, इ. पत्रेही प्रसिद्धीच्या मार्गावर होती. ब्राह्मणेतर पत्रांमध्ये अश्पृश्यांसंबंधी अनेक विषयांवर मजकूर येत होते. इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका यासारख्या पत्रांनीही या प्रश्नांना स्थान दिले होते. परंतु या सर्वच पत्रांमध्ये बहिष्कृतांच्या

प्रश्नांचा सांगोपांग उहापोह होण्यास पुरेशी जागा मिळणे शक्य नव्हते. अस्पृश्यांना दीपस्तंभासारखे ठरेल असे स्वतंत्र वृतपत्र हवे होते. देशातील विविध घडामोडी, स्वराज्याच्या मत्रांने भारावून गेलेली हिंदी जनता, अश्पृश्येतरांची नावलौकिक प्राप्त केलेली पत्रे, या पार्श्वभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' सुरू केले होते. हे आव्हान स्वीकारण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ होते हे निश्चित होते. सर्व जातींचे कल्याण होईल अशी भूमिका वृत्तपत्रांनी घेतली पाहिजे. आणि तसी भूमिका घेतली नाही तर त्यात सर्वांचेच अहित आहे, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे होते. जर वृत्तपत्रांमध्ये स्वार्थप्रेरित व हितसंबंध निर्माण झाले तर स्वतःचे व इतरांचेही नुकसान करतात. 'मूकनायका' ने दलितांच्या अपेक्षित भावना व आकांक्षा तळागाळापर्यंत पोचवण्याचा व रुजवण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे ऐतिहासिक असे महत्व आहे. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रामध्ये सुद्धा अस्पृश्यांनी आपल्या जीवनात मोठे स्थान निर्माण केले पाहिजे. ही एक वेगळी आणि नवी जाणीव 'मूकनायका' च्या माध्यमातून समाजामध्ये अस्तित्वात आली होती. अस्पृष्यांनी त्यांची स्वतःची जाणीव निर्माण होण्यासाठी किंवा अस्मिता जागवण्याचे 'मूकनायका' ने आपल्या अल्पावधीतच केलेले कार्य समाजामध्ये, लोकजीवनामध्ये परिवर्तन घडवून आणले होते.

बहिष्कृत भारत :

'मूकनायक' प्रमाणेच 'बहिष्कृत भारत' च्या किरकोळ अंकाची किंमत दीड आणा आणि वार्षिक वर्गणी तपालसहित तीन रुपये होती. पहिल्या अंकावर जाहिरातीचे दर 'पहिल्या वेळी दर ओळीस पाच आणे, दुसऱ्या वेळी चार आणे, व तिसऱ्या वेळी तीन आणे आणि पुढे प्रत्येक वेळी दोन नाणे' असे होते. 'कायम व फार दिवसांच्या जाहिरातीच्या दरासाठी पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावे' अशी सूचना करण्यात आली होती. पहिल्या अंकावर साखळदंडांनी जखडबंद केलेले दोन रुबाबदार सिंह जगाला 'बहिष्कृत भारत' दाखवित आहेत असे चित्र असून या चित्राच्या वर 'नमुना अंक' व वर कोपऱ्यामध्ये 'पाक्षिक पत्र' असा निर्देश केलेला होता. या अंकावर 'मूकनायक' प्रमाणे कोणत्याही काव्यपंक्ती नाहीत. एवढेच नाही, तर पहिल्या पानावर संपादक म्हणून उल्लेख नाही. तो उल्लेख दहाव्या पानावर केला आहे. दुसरा अंकाचा विचार करता काही बदल केले. पहिल्या पानावरील सिंहाचे चित्र गाळले गेले व त्या जागी 'बहिष्कृत भारत' अशी अक्षरे आली. या अक्षरांच्या वर उजव्या बाजूला रजिस्टर नंबर बी.२२५० व डाव्या बाजूला फक्त 'पाक्षिक पत्र' असा उल्लेख आहे. पहिला अंक मोरेश्वर चिंतामण लेले यांच्या 'विक्रम प्रिंटिंग प्रेस' मध्ये मुद्रित करण्यात आला होता. आता मुद्रणालय बदलून, दुसरा अंक अनंत आत्माराम मोरमकर यांच्या श्रीलक्ष्मीनारायण प्रेस मध्ये छापण्यात आला. 'बहिष्कृत भारत' या नावाखाली मुद्रक आणि संपादक व प्रकाशक यांची नावे पत्त्यासह देण्यात आली. आणि त्याखाली जाड ठशात ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायातील ओवी क्रमांक १८९, १९० व १९१ समाविष्ट केल्या होत्या. 'मूकनायक' वर संत तुकारामाच्या ओळी, तर 'बहिष्कृत भारत' वर अत्यंत सार्थ अशा ज्ञानेश्वरांच्या काव्यपंक्ती होत्या. संतवाङ्मयातील आपल्या ध्येयधारणाला अनुकूल अशा ओळी संतवाङ्मयाचा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या संतवाङ्मयप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दर्शन येथे होते. 'बहिष्कृत भारत' च्या पहिल्या अंकाच्या पहिल्या पानावर काव्यपंक्तीखाली 'मुंबई, रविवार तारीख तीन माहे एप्रिल १९२७ असा निर्देश आहे, तर दुसरे अंकावर 'शुक्रवार तारीख २२ एप्रिल १९२७' असा आहे. 'बहिष्कृत भारत' च्या याच पानावर पहिल्या अंकात 'सुबोध वचने' व 'आजकालचे प्रश्न' हे सदर आहे. तर दुसऱ्या अंकात 'सुबोध वचने' ऐवजी 'अनुक्रमाणिका', मात्र सदर तेच आहे. ही प्रथा पुढे अनेक अंकांपर्यंत कायम आहे. अधूनमधून मुद्रणालये बदलली आहेत. व काही जोडअंकही निघालेले आहेत. पानानुसार किरकोळ अंकाच्या किमती कधी दोन आणे, तीन आणे, चार आणे तर कधी सहा आणे ठेवलेल्या होत्या. 'बहिष्कृत भारत' वेळेवर निघत नाही, वर्गणीदारांच्या हाती वेळेत जात नाही, असे आरोप वारंवार होत होते, यासाठी आर्थिक परिस्थिती कारणीभूत असली तरी एकट्याने स्वीकारलेली जबाबदारी त्यामुळे 'बहिष्कृत

भारत' याबाबत अनियमितता व खंडितता आलेली होती. 'बहिष्कृत भारत' साठी २४-२४ रकाने एकट्यानेच लिहिण्याची किमयाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना करावी लागली. तरीही 'बहिष्कृत भारत' ची संपादकी हा इतर पत्रांच्या संपादकीप्रमाणे पैसे कमवण्याचा धंदा नसून ही लोक जागृतीकरिता घेतलेली स्वयंदीक्षा आहे, असे म्हणावेसे वाटते. या विचाराने समाजाच्या लौकिक ऋणाची फेड करणाच्या कर्तव्यदक्षतेने, प्रतिकुलतेतही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तीन वर्षे हा वृत्तपत्रीय प्रपंच केला होता. 'बहिष्कृत भारत' हा खऱ्या अर्थाने एक झंझावात होता. हिंदू समाजामध्ये आलेले ते एक तुफान होते. यात तिळमात्र शंका घेण्याचे कारण नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक सहकारी व 'समता' पत्राचे संपादक श्री. दे. वि. नाईक यांनी आंबेडकरांचे लेखन ब्राह्मणांनी अवश्य वाचावे. अशी शिफारसही केली होती. "नेहमी गोड गोडच आवडेल, तेच ग्रहण करण्याची फार दिवसांची सवय झाल्यामुळे आरंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिहिणे विषाप्रमाणे कडू लागेल, पण परिणामी तेच अमृताप्रमाणे गोड असल्याचा अनुभव येईल" असेही त्यांनी प्रतिपादन केले.

जनता :

'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत' या पत्रानंतर ज्यांचा प्रदिर्घ असा प्रवास झाला असे पत्र म्हणजे 'जनता' होय 'बहिष्कृत भारत' बंद झाल्यानंतर एक वर्षाने म्हणजे २४ नोव्हेंबर १९३० रोजी 'जनता' 'चा पहिला अंक प्रकाशित झाला. या पत्राच्या पहिल्या अंकावर रजिस्ट्रेशन क्रमांक नाही. सोमवार दिनांक १५ डिसेंबर १९३० रोजी प्रकाशित झालेल्या दुसऱ्या अंकावर मात्र रजिस्टर नंबर बी २७७९ असा निर्देश आहे. संपादक म्हणून देवराव विष्णु नाईक यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. श्री. नाईक हे बंद पडलेल्या 'समता' व 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर' या पत्रांचे संपादक होते. नाईक हे पुरोगामी व अस्पृश्यांच्या चळवळीतील एक सक्रिय सहभागी होणारे ब्राह्मण कार्यकर्ते होते. या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व्याप प्रचंड होता. त्यामुळे स्वतः एखादे वृत्तपत्र चालवण्यास त्यांना उसंत नव्हती. परंतु 'जनता' पत्रामध्ये त्यांनी वेळोवेळी लेखन केले होते. 'जनता' हे प्रारंभी पाक्षिक होते. नंतर ३१ ऑक्टोबर १९३१ रोजी साप्ताहिकात रूपांतर केले.'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत' यांच्याप्रमाणे 'जनता' च्या किरकोळ अंकाची किंमत दीड आणा होती आणि वार्षिक वर्गणी फक्त दोन रुपये दहा आणे होती. शीर्षभागी डॉ. भीमराव आंबेडकर, एम. ए., पीएच.डी., बार अ‍ॅट लॉ यांच्या नेतृत्वाखाली निघणारे जनहितप्रवर्तक पाक्षिक पत्र 'जनता' असे छापलेले होते. 'जनता' या अक्षराखाली इंग्रजीमध्ये 'द पीपल' असे लिहिलेले होते. पहिल्या अंकाच्या निर्देशाबरोबरच 'दादर-सोमवार तारीख २४ नोव्हेंबर सन १९३० इसवी असा उल्लेख आहे. त्यामुळे जनता या वृत्तपत्रामध्ये उपेक्षित समाजाच्या सर्व व्यथा वेदना चित्रित झालेल्या दिसतात. प्रकाशक व व्यवस्थापक म्हणून भा. र. कद्रेकर यांचे नाव असून पहिल्याच पानावरती वर्गणीदारांना विनंती करताना, समता व बहिष्कृत भारताच्या वर्गणीदास वर्गणीची पोच होईपर्यंत 'जनता' चे अंक विनामोबदला देण्याचे ठरवले आहे. जनता पाक्षिक हेही पत्र आंबेडकर व समाज समता संघाच्या चालक मंडळींच्या नेतृत्वाखाली निघत असल्यामुळे वरील दोन्ही पत्रांची वर्गणीदार आश्रय देतील, अशी खात्री देण्यात आली होती. संपादकीयमध्ये वर्तमान परिस्थितीबाबत निवेदन करताना, पददलितांच्या सुखदु:खाला मुखर करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला होता. आपली दु:खे निसंकोचपणे मांडण्यात 'जनता' अग्रेसर असेल असे आश्वासनच दिले होते. काही अंकाच्या प्रसिद्धीनंतर शीर्षभागी 'गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल" असे ब्रीदवाक्य लिहिले होते. या ब्रीदवाक्यतून अस्पृश्यांना बंडखोरीचे तत्त्वज्ञान आणि संघर्षवृत्ती देण्यासाठीच 'जनता' चा जन्म झाला होता, खरे ठरले. अशाप्रकारे 'जनता' ने २५ वर्षे आपले कार्य केले असले तरी ते काहीवेळा खंडित झालेले होते. १९५५ पर्यंत विविध संपादकांच्या संपादनाखाली वाटचाल करीत होते. यशवंतराव आंबेडकर, बी.सी.कांबळे इत्यादींनी 'जनता' ची धुरा सांभाळली होती.

प्रबुध्द भारत :

१९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निर्वाण झाल्यानंतर 'प्रबुध्द भारता' च्या व्यवस्था पाहण्यासाठी संपादक मंडळ स्थापन करण्यात आले. संपादक यशवंतराव आंबेडकर, शंकरराव खरात, दा. ता. रूपवते, मुकुंदराव आंबेडकर इत्यादींनी जबाबदारी सांभाळली. १९५७ मध्ये अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर 'प्रबुद्ध भारत' रिपब्लिकन पक्षाचे मुखपत्र बनले. १९६१ साली हे साप्ताहिक काही कारणाने बंद पडले. संपादक मंडळात असलेल्या राजकीय नेत्यांमध्ये निर्माण झालेला संघर्ष याचा परिणाम 'प्रबुध्द भारत' वर झाला. हे पत्र बंद होण्यास एक कारण ठरले. 'मूकनायक' 'प्रबुध्द भारत' हा मोठा प्रवास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचाच एक प्रवास होता. दलित चळवळींचे, घटनांचे आणि घडामोडींचे पूर्णतः भान होते. समाजस्थितीशी मिळते न घेता समाजस्थिती बदलण्याची प्रतिज्ञा या पत्रांनी केली होती. अंधारामध्ये चाचपडणाऱ्या व आत्मविस्मृत समाजमनांवर विचारांच्या लाटा आदळून त्यांना नवी दृष्टी व नवा आशय देण्याचे महत्त्वाचे कार्य या पत्रांनी केले होते. हे कार्य अस्पृश्य समाजापुरतेच सिमित नव्हते. तर समग्र हिंदु समाजाचा परीघ पत्राने व्यापलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक प्रबोधनाचे आणि समाजाचे चित्र मनाशी बांधले होते. या पत्रातून विविध विषयांवर समाजाला नवी दिशा देणारे लेखन प्रकाशित होत होते. या पत्रामधून अग्रलेख, प्रासंगिक, भाषांतरे, काही दुर्मिळ लेखांचे पुनर्मुदण, संमेलनालनांचे वृत्तांत, ग्रंथांचे अभिप्राय असे विविध प्रकारचे साहित्य 'प्रबुध्द भारत' मधून प्रकाशित होत होते. अशाप्रकारे समाजाला एक नवी दृष्टी देणारे क्रांतिकारक विचार ' प्रबुध्द भारत 'मधून प्रत्ययास येत होते.

समारोप:

डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांचे वृत्तपत्रीय लेखन आजही वाचनीय ठरते. पत्रकार कसा असावा? वृत्तपत्रीय लेखनात कोणत्या बाबीचा समतोल असावा राखावा? कोणते विषय लेखनासाठी निर्धारित करावे या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काही वर्षांपूर्वीच दिली आहेत. त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या लेखनात व्यक्तीव्देष कुठेही दिसत नाही. त्यांच्या लेखनातील दाहकता त्यांनी जगलेले व अनुभवलेल्या आयुष्याचे निर्देशन करणारी होती. त्यांच्या लेखनाचे विषय केवळ बोलण्याचे नव्हते तर, ते त्यांचे प्रत्यक्ष दु:ख होते. हे दु:ख जाणून घेतले की, कोणत्याही विवेकशील माणसाला त्यांच्या लेखनाचे मर्म व वेदना दिसून येतात. त्यांच्या वृत्तपत्राच्या नावांचा जर विचार केला तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तत्कालीन समाजव्यवस्थेविषयीची चीड आणि स्वरूप लक्षात येते. 'मूकनायक' या नावावरून - 'ज्याला वाचा नाही अशा मुक्या लोकांचा नायक म्हणजे 'मूकनायक' तर 'बहिष्कृत भारत' या नावावरून - 'भारतीय समाज व्यवस्थेने ज्याना नाकारले, ज्याचे अस्तित्व मान्य केले नाही अशा बहिष्कृत लोकांचा भारत' असा अर्थबोध होतो. 'जनता' या वृत्तपत्राच्या नावावरून असा अर्थध्वनीत होतो की, भारतीय समाजव्यस्थेमधील साधी, भोळी, ज्यांना कसेही हाकले तरी चालेल अशी सर्वसामान्य माणसे. चौथ्या वृत्तपत्राचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'प्रबुध्द भारत' असे ठेवले. १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्माची दीक्षा लाखो अनुयायींसोबत घेतली. याप्रसंगी 'संपूर्ण भारत बौध्दमय केल' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. त्यामुळेच वृत्तपत्राचे नाव 'प्रबुध्द भारत' निश्चित केले असे म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा प्रवास संघर्षमय होता. वर्तमानकाळाचा विचार करता त्यावेळी वृत्तपत्र निर्मितीच्या अनुषंगाने साधने अपूरी होती. वृत्तपत्र निर्मिती प्रक्रियेत इतरांचे सहकार्य देखील मिळत नव्हते. कारण तत्कालीन समाजव्यवस्था असे सहकार्य उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विरोधात होती. सोबतच आर्थिक भांडवल पुरेशी प्रमाणात उपलब्ध नव्हते. अशा परिस्थितीला मात करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चार वृत्तपत्र यशस्वीरीत्या चालवली होती. केवळ चालवली नाही तर, त्या माध्यमातून सामाजिक

चळवळ राबवली होती, गतिमान केली. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता, शैली, वृत्तपत्र हाताळण्याचे तंत्र, वृत्तपत्रीय लेखनातील वैविध्यता आणि परखडपणा सोबतच पत्रकारितेत निर्माण केलेली सामाजिक समता, न्याय भूमिका यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आजच्या पत्रकारिता पिढीला तितकेच उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात.

संदर्भग्रंथ सूची :

१) प्रसार माध्यमे आणि समाज, डॉ. सुधीर रसाळ, प्रा.विनोद निताळे, डॉ. गोपी सोरडे, अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्रथमावृत्ती जुलै २०२०
२) पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, व्दितीयावृत्ती, १९९६
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२० - १९२८ , संपादक, हरी नरके, म.ल.कासारे, एन.जी.कांबळे, अशोक गोडघाटे, महाराष्ट्र शासन, शासकीय कुटील क्र.१८, मुंबई, प्रथमावृत्ती, २००५
४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२९-१९५६, संपादक, हरी नरके, म.ल.कासारे, एन.जी. कांबळे, अशोक गोडघाटे, महाराष्ट्र शासन,शासकीय कुटील क्र.१८, मुंबई, प्रथमावृत्ती, २००५

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PAC
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratna

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII) B
ISSN : 2278-9308
September, 2021

वर्तमानातील शेती प्रश्न आणि डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार

प्रा. डॉ. वाघमारे एस. एस.
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी. ,मोबा. ९४२२३५६५३४

१.१ प्रस्तावना –

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक असामान्य प्रतिभावंत, कायदा, समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि मानववंशशास्त्र अशा अनेक शास्त्रांमध्ये तसेच समाजकारण, धर्मकारण, राजकारण आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुमोल कामगिरी बजावलेली असली तरी ते मुलतः अर्थतज्ञ होते. त्या अनुषंगाने भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार केला असता स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शेती उत्पादनात वाढ झाली, भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण झाला पण वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकरण, वाढते नागरीकरण, पर्यावरणाचा बिघडलेला समतोलयामुळे एका बाजूने शेती उत्पादन वाढ झाली. मात्र शेती व्यवसायाच्या दृष्टीकोनातून विचार करता स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांची मालिका संपलेली नसून हे प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालले आहेत. त्यातूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा कलंक पुसण्यासाठी आणि वर्तमानातील निर्माण झालेले शेती प्रश्न सोडविण्यासाठी एक अर्थतज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले शेतीविषयक जे विचार मांडले आहेत याचा मागोवा प्रस्तुत शोध निंबधात संशोधकर्त्याने केला आहे.

१.२ संशोधनाचा उद्देश –

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेतीविषयक दृष्टिकोन जाणून घेणे.
२) वर्तमानकाळातील शेतीशी संबंधित समस्या दूर करण्याच्या दृष्टीने बाबासाहेबांच्या विचारांची उपयुक्तता स्पष्ट करणे.

१.३ तथ्य संकलन पध्दती –

प्रस्तुत शोध निबंधाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम तथ्य संलकन पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, मासिके, संशोधन पेपर, इंटरनेट, इ. माध्यमांचा वापर करून तथ्य संकलन करण्यात आले आहे.

१.४ भारतातील लहान धारणक्षेत्रे आणि त्यावरील उपाय –

'लहान धारणक्षेत्रे आणि त्यावरील उपाय' (Small Holdings in India and their Remedies) हा आंबेडकरांचा लेख म्हणजे भारताच्या शेतीप्रश्नांवरील अत्यंत मूलभूत अशा प्रकारचे भाष्य होय. हा लेख प्रथम १९१८ मध्ये प्रसिध्द झाला. त्यानंतरच्या काळात भारतात शेतीक्षेत्रात अत्यंत महत्वपूर्ण व गुणात्मक असे बदल झाले आहेत. १९५०च्या दशकात विविध राज्यांनी संमत केलेला जमीनसुधारणा विषयक कायदा हा पहिला महत्वाचा बदल होय.

लहान क्षेत्रे ही भारतीय शेतीला भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. लहान धारण क्षेत्रे व त्यातही त्यांचे विखंडन यामुळे साधनसंपतीचा पर्याप्त उपयोग करण्यात अडचण निर्माण होवून उत्पादन खर्च वाढतो तर दुसऱ्या बाजूने उत्पादकता कमी होते त्यावर उपाय म्हणून धारणक्षेत्राचा आकार

वाढविणे व तुकडे जोड करणे हेच आपल्याला प्राथमिक उपाय वाटू लागतात. यासंदर्भात आंबेडकरांनी खालील तीन प्रश्न उपस्थित केले आहेत.

१) धारण क्षेत्राचे विखंडन मुळातच का होते?
२) किफायतशीर धारणक्षेत्र कसे ठरवायचे?
३) लहान धारणक्षेत्रामुळे निर्माण झालेल्या समस्येवर अंतिम उपाय कोणता?

पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात आंबेडकरांच्या मते जमिनीवर पडत असलेला लोकसंख्येचा भार हेच मुख्य कारण होय तर किफायतशीर धारण क्षेत्र म्हणजे जमीन भांडवल व श्रम हे सर्व उत्पादन घटक पर्याप्त प्रमाणात उपलब्ध असणे होय. या परिस्थितीवर मात करण्यासाठी उद्योगीकरण हे आंबेडकरांनी या प्रश्नाला दिलेले निःसंदिग्ध उत्तर होय. उद्योगीकरणामुळे शेतीक्षेत्रावरील अतिरिक्त भार कमी होईल. त्यामुळे जमिनीचे विभाजन करण्याच्या प्रवृत्तीस आळा बसेल. त्यामुळेच आंबेडकराच्या मते भारतातील शेतीचे प्रश्न सोडविण्याचा उद्योगीकरण हा एकच खात्रीलायक उपाय होय.

१.५ अमानुष खोती पध्दत आणि डॉ. आंबेडकरांचे विचार –

१७ सप्टेंबर १९३७ रोजी आंबेडकरांनी मुंबई कायदेमंडळात खोती पध्दत रद्द करण्या विषयी विधेयक मांडले. ही खोती पध्दत रत्नागिरी, ठाणे, रायगड जिल्ह्याच्या काही भागात प्रचलित होती. या पध्दतीत खोत भूधारकांवर मोठ्या प्रमाणात अन्याय जुलूम करत असत. त्यामुळेच खोती पध्दती लवकरात लवकर नष्ट करण्याची आंबेडकरांनी मागणी केली. खोती अंताचे विधेयक सादर करून भूधारकांच्या शोषणाला मूठमाती देण्याचा आंबेडकरांचा प्रयत्न होता. खोती अंतामुळे शासन व भूधारक यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होणार होता. आंबेडकरांचे खोती अंताचे विधेयक म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात देशात करण्यात आलेल्या जमिन सुधारणा विषयी कायद्याची नांदीच होय.

१.६ सहकारी शेती पध्दती –

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील शेतीची समस्या सोडविण्यासाठी एक मार्ग म्हणून सहकारी शेती पध्दतीचाही पुरस्कार केलेला दिसून येतो. ऑक्टोबर १९२७ मध्ये अल्पभूधारक मदत विधेयक एफ. जी. एस. अँडरसन यांच्या कायदेमंडळात मांडले. या बिलात त्यांनी स्थावर मालमत्तेच्या विभाजनावर नियंत्रण आल्यामुळे वारसा हक्कानुसार एका ठराविक आकारापलीकडे जमिनीचे तुकडे होणार नाहीत. सामुदायिक शेती पध्दतीमुळे शेतीतील उत्पन्न वाढून जमिनीची भरभराट होईल. मुख्य म्हणजे शेतकऱ्यांचे जमिनीवर वरील हक्क अबाधित राहतील.

१.७ भारतातील भूमिहीनांच्या संदर्भातील डॉ. आंबेडकरांचे विचार –

भूमिहीनांच्या आणि अल्पभूधारकांच्या संदर्भातही डॉ. आंबेडकरांनी आपले मौलीक विचार मांडले. जोपर्यंत अस्पृश्यवर्ग आपल्या परंपरागत व्यवसायाचा त्याग करून आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होत नाही तोपर्यंत सामाजिक स्वातंत्र्याची पूर्ती होऊ शकत नाही. त्यासाठीच डॉ. आंबेडकरांनी सरकारकडे पडीक जमिनीची मागणी करून असा स्पष्ट आरोप केली होता की, भारत हा शेतीप्रधान देश असूनसुध्दा बहुसंख्या लोक भूमिहिन आहेत. त्यामुळेच भूमिहिनांना हक्काचे उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी नागपूर येथे १८ व १९ जुलै १९४२ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय दलित वर्गाच्या परिषदेत सरकारकडे उपलब्ध असलेल्या पडीक जमिनीची मागणी केली होती. आंबेडकरांच्या मते लोकांकडे पडीक असलेली खाजगी मालकीची जमीनही सरकार विकत घेऊ शकते व तीचा उपयोग या उद्देशपूर्तीसाठी करू शकते.

१.८ जमिनीचे राष्ट्रीयीकरण –

भारतीय कृषीउद्योगाला राष्ट्री उद्योग घोषित करून सामुदायिक शेती पध्दतीचा अवलंब करणे भारतातील जमिनधारणापध्दती केवळ आर्थिक दृष्टिकोनातून नव्हे तर शेतमजूर म्हणून राबत असताना तीदेखील सदोष आहे अशा धारकांच्या जमीनधारक पध्दतीमुळे भारतातील अधिपती श्रेणी निर्माण करण्यास जमीनधारणा पध्दती कारणीभूत आहे. भारतीय शेतीचे राष्ट्रीयीकरण करणे अभिनव उपाय डॉ. आबंडेकरांनी दिला. भारतीयांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचे प्रभावी स्थान आहे. आजतागायत शेती व्यवसाय त्यावर आधारित एकूण ७०टक्के लोक आजमितीस गुंतलेले आहेत. यासर्वांची आर्थिक शोषणातून मुक्तता करावयाची असेल तर डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या सूचना, नियम, तत्वांची अंमलबजावणी करावी लागेल. तेव्हाच आर्थिक व सामाजिक शोषण थांबेल.

१.९ यांत्रिक शेती –

लोकशाहीत प्रत्येकाने सुखी जीवन प्राप्त होण्यासाठी यंत्राचा वापर करावा असे आंबेडकरांचे प्रामाणिक मत होते. यंत्राचा वापर करून मानवी जीवन सुखकर व आर्थिक समानता कशी आणता येईल याचे समर्थन डॉ. आंबेडकरांनी अनेक लेखांतून केले. भौतिक सुखांबरोबर मानवी मनाचा विकास घडून येईल. याकडे डॉ. आंबेडकर आपले लक्ष वेधतात. यांत्रिकीकरणातून शेती उत्पादन वाढून दूर्बल घटक वेळ मिळताच सुसंस्कृत होऊ शकतील.

१.१०डॉ. आंबेडकरांच्या विचारांची वर्तमान उपयुक्तता –

देशातील शेतीची सध्यस्थिती आणि शेतीशी संबंधित समस्यांचा सखोल आणि व्यापक अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार आजही उपयुक्त आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत औद्योगिक क्षेत्राचा विकास करून शेतीतील अतिरिक्त श्रमशक्ती काढून घेवून उद्योगाचा विकास करणे, शेतीला वेळेत कर्ज पुरवठा, जलसिंचन पुरवठा, बी-बियाणे, खते अवजारे, यांत्रिकीकरण यांचा आवश्यक पुरवठा करणे त्यामुळेच शक्य होणार आहे. आजही सामुदायिक सरकारी शेतीचा प्रयोग शेती विकासासाठी आणि शेती समोरील समस्या सोडविण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. विशेष म्हणजे शेतजमिनीचे आकारमान वाढविण्याबरोबरच शेत जमिनीच्या मालकीच्या विषमताही नियंत्रित करणे त्यातून शक्य होणार आहे या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून शेती विकासाबरोबरच इतर क्षेत्रांच्या विकासास मदत होऊन अर्थव्यवस्थेचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होणार आहे. त्यामुळेच स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. आंबेडकरांनी मांडलेले शेतीविषयक विचार आजही एकविसाव्या शतकात उपयुक्त आहेत. यात तीळमात्र शंका नाही.

संदर्भ ग्रंथ –

१) आर्थिक विचारांचा इतिहास – डॉ. देसाई आणि भालेराव, निराली प्रकाशन, पुणे
२) सर्वदर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर – संपादक, डॉ. पी. विठ्ठल आणि डॉ. नागोराव कुंभार, डायमंड पब्लिकेशन्स पुणे.
३) म. गांधी आणि डॉ. आंबेडकर विचारधारा – डॉ. व्ही. व्ही. भास्कर, अथर्व पब्लिकेशन्स धुळे
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिचिंतन – संपादक, डॉ. माधव जाधव, लोकायन प्रकाशन, सातारा
५) कृषी क्षेत्रातील पेचप्रसंग आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या – डॉ. सतीश गव्हाणे
६) डॉ. बाबासाहेबांचे कृषिविषयक विचार – डॉ. त्रिलोक हजारे

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

प्राचार्य
श्री.मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ
आर्टस् ॲन्ड कॉमर्स,पाचल

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII) B
ISSN : 2278-9308
September, 2021

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य व संस्कृती विषयक योगदान

सौ.स्नेहा विलास कोलते
श्री. मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ आर्ट्स अंड कॉमर्स ,पाचल
मोब.नं. ७२७६७१७७३७

प्रस्तावना-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य वं संस्कृती विषयक योगदान या शोधनिवंधामध्ये भारतरत्न, विद्याविभूषित डॉ.बाबासाहेबांच्या जीवनाचा धावता आढावा घेऊन त्यांच्या साहित्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणत्याही व्यक्तीच्या बालपणापासून लाभलेली संस्काराची शिदोरी हि महत्त्वाची असते. अस्पृश्यांशी कसा व्यवहार होतो हे त्यांनी स्वत; अनुभवले असल्याने त्याची दाहकता त्यांनी स्वत: भोगली होती. अस्पृश्यांच्या जीवनात उद्भवणारे अनेक सनातन प्रश्न होते. जातीभेद, धर्मभेद गरीब-श्रीमंत,उच्च-नीच,स्त्री–पुरुष हे सर्व प्रकारचे भेद देशाच्या एकतेला आणि एकात्मतेला मारक आहेत.देशाच्या विकासआड येणारे प्रमुख अडथळे आहेत.हजारो वर्षापासून ज्यांचे माणूसपण नाकारण्यात आले होते.,ज्यांना स्वातंत्र्यापासून ,हक्क अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले , अशा शोषितांना न्याय देण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. अज्ञान ,अंधश्रद्धा आणि अनारोग्याने ग्रासलेल्या समाजाला सज्ञानी करण्यासाठी हाती बंडाचे निशाण घेतले . त्यासाठी त्यांनी साहित्य वं संस्कृतीमध्ये कशाप्रकारे परिवर्तन घडवून आणले वं त्याचे या क्षेत्रातील योगदान त्यांच्या अन्य क्षेत्रातील योगदानाप्रमाणे कशाप्रकारे क्रांतिकारक स्वरूपाचे ठरले हे समजावून घेणे अत्यावश्यक ठरते.या शोधनिबंधामध्ये विद्याविभूषित, थोरसाहीत्यिक,क्रांतिकारक यांच्या साहित्याचा अल्पसा परिचय करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.डॉ. बावासाहेव आंबेडकर यांचे साहित्य वं संस्कृती विषयक योगदानहे मौलिक स्वरूपाचे आहे. त्यांनी या क्षेत्रांत दिलेल्या योगदानाच्या बळावर येथील साहित्य संरचनेमध्ये वं संस्कृती संरचनेमध्ये मुलभूत परिवर्तन आकारास आले . त्यांचे या क्षेत्रांतील योगदान कशाप्रकारे क्रांतिकारी स्वरूपाचे ठरते हे समजावून घेणे अत्यावश्यक ठरते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या सामाजिक कार्याचा आरंभ त्यांच्या वृत्तपत्रीय वाड्ग्मयनिर्मितीतून होतो. तळपातळीवरीलशोषित, वंचित समाजाला जागृत करायचे असेल तर त्यांच्यामध्ये नविन जाणिवांची निर्मिति करण्याची आवश्यकता वाटली.अस्पृश्यांत जागृती करण्यासाठीडॉ. बाबासाहेब आंबेडकरानी ३१ जानेवारी १९२० रोजी "मूकनायक " हे वृत्तपत्र सुरु केले.सरकारी नोकरीत असल्याने त्यांना अधिकृतपणे संपादक राहता येत नसल्याने संपादक म्हणून पांडुरंग नंदराम भटकर यांना संपादक नेमले होते.हजारो वर्षापासून नि:शब्द असलेल्या वं धर्मसंस्कृतीच्या साखळदंडानीवंदिस्त असलेल्या मुकनायकाला वाचा प्राप्त करून दिली. धर्मकेद्री,वर्णकेंद्री जातीकेंद्री वर्गकेद्री वलिंगभेदकेन्द्री संस्कृतीमध्ये खितपत पिचत पडलेल्या समाजाला या वृत्तपत्रातून आत्ममुक्तीचा स्वर प्राप्त करून दिला. वृतापत्रामधून जनजागरण करीत असतानाच त्यांनी समांतरपणे बहिष्कृत वर्गाच्या सभांना आरंभ केला. पुढे उर्वरित शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना लंडनला जावे लागले. तेथून आल्यावर त्यांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथील चवदार तळयावर दीनदलितांच्या मुक्तीचा व त्याच्या न्याय हक्काचा धर्मसंगर छेडला. हा मानवमुक्ती संग्राम निर्माण करताना लगेच त्यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत" हे पाक्षिक नव्याने सुरु केले. या वृत्तपत्रीय वांडमयामधून त्यांनी आपल्या सामाजिक धार्मिक तसेच सास्कृतिक मुक्तीची प्रक्रिया राबवली. या वर्तमान पत्रानंतर 'जनता' हे नियतकालिक काढले. 'जनता ' ह्या वृतापत्राचेच पुढे 'प्रबुद्ध भारत' या वृतपत्रामध्ये रुपांतर झाले त्यानंतर 'समता' हे पाक्षिक सुरु केले. या सर्व वृतपत्रामधून त्यांनी विसाव्या शतकाच्या काळात नव्या दृष्टीकोनाच्या वाडग्मयाची निर्मिति केली. त्यांनी निर्मिलेल्या वाड्ग्मय निर्मितीला ऐतिहासिक स्वरूपाचे मोल आहे. तत्कालीन पातळीवरुन पुढे येऊ पाहणाऱ्या अनेक नवलेखकांचे,कवीचे तसेच कथाकारांचे लेखन या वृतापत्रामधून प्रसिद्ध झाल्याचे दिसते. डॉ. वावासाहेबानी निर्माण केलेली वृत्तपत्रीय वांडमयीनसृष्टी एक ध्येयासक्त स्वरुपाची होती. त्यांनी वृतपत्राच्या माध्यमातून तत्कालीन समाजाचे अभूतपूर्व जनजागरण केले. हे जनजागरण तळपातळीवरील समाजाला प्रबोधित करण्यासाठी ज्याप्रकारे महत्त्वाचे ठरले. तसेच ते उच्च वर्गीय समाजालाप्रश्नांकितकरण्याच्या व अंतर्मुख करायला महत्वपूर्ण ठरले.

डॉ. बाबासाहेबानी या देशात केलेल्या महान क्रान्तीत त्याच्या अभ्यासपूर्ण भाषणांचे योगदान खूप मोठे आहे. ते एक प्रतिभावंत व्यक्तिमत्व होते. नेतृत्व गुणाबरोबरच त्यांच्यात वक्तृत्व हा गुण ही होता. शून्यातून शिखर

गाठलेल्या महान नेत्याने वक्तृत्वाच्या जोरावर कोट्यवधी जनतेच्या हृदयावर व प्रज्ञेवर निस्सिम अधिकार गाजविला. त्यांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून गुलामगिरीत पिचत पडलेल्यादिनदालीतानाजाणीव करून दिली. त्याच्या प्रभावी वक्तृत्वाने या देशात सर्वकष क्रांती घडवून आणली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तळागाळातील समाजमनात ज्वलंत स्वाभिमानाची भावना निर्माण करून जीवनाकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन त्यांनी पूर्णत: बदलवला.माणूस हा स्वत:च्या जीवनाचा शिल्पकार आहे. ते केवळ डॉ. बाबासाहेबाच्या भापणामुळेच ! डॉ. आंबेडकर यांनी विविध विषयावर वेळोवेळी भाषणे दिली.अस्पृश्यांना मानवी जीवन प्राप्त करून देणे, दलित,शोषित ववंचिताना आपल्या भविष्यातील लढे उभारण्यासाठी प्रेरणा देणे, देशातील सामाजिक राजकीय प्रवाहात त्यांना सामील करून त्याचे अधिकार मिळवून देणे, बहुजन समाजाला धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे, राष्ट्र निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या मार्गाचा स्वीकार करण्याचेआव्हान करणे व देशाच्या विकासाच्या नवीन दिशा शोधणे असे अनेक विषय त्यांनी आपल्या भाषणातून हाताळले या सर्व भाषणांनाऐतिहासिक असे महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेबानीत्या विषयाच्या संदर्भात मुलभूत व वस्तुनिष्ठ असे विचार मांडल्याचे दिसते.भारतीय समाजाला विचाराची एक दिशा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचेहे मानवमुक्तीचे विचार आपणासर्वानाएका उन्नतीच्या दिशेने घेऊन जाणारे आहेत त्यांनी उभारलेल्या चळवळीत 'माणूस' हा केंद्रबिंदू असल्याचे दिसते. त्यांनी माडलेले विचार,भाषणे आजच्या तरूण पिढीला बहुमोल ठरणारी आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विविध विषयावरचा व्यासंग अफाट असा होता त्यांनी अनेक विषयावर मुलभूत चिंतन केले. त्यातून अनेक अत्यत महत्त्वाच्या ग्रंथसंपदेची निर्मिति झाली. या ग्रंथसंपदेतून त्याची सर्व समावेशक आणि समन्यायी अशी वैचारिक भूमिका स्पष्ट होते. त्याचा ग्रंथाचा संक्षिप्त आढावा खालीलप्रमाणे घेता येईल:

१. Administration and Finance of the East India Company (ईस्ट इंडिया कंपनी प्रशासन आणि अर्थनीती) १९१५

डॉ. बाबासाहेबानी 'Administration and Finance of the East India Company'हा शोधनिबंध एम.ए.च्या पदवीसाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाला इ.स.१९१५ मध्ये सादर केला होता.हा केवळ ४२ पानाचा शोधनिबंध होता इ.स.१७९२ते१८५८ या कालखंदातील ईस्ट इडिया कंपनीचा राज्यकारभार आणि वित्त यासंबधीच्या धोरणातील बदलाचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. हे बदल भारतीयांच्या हालअपेष्टांना कसे कारणीभूत ठरले याचे विदारक आर्थिक स्थितीचे स्वरूप या प्रबंधात मांडले आहे.

२) The Buddha and his Dhamma (भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी त्यांच्या ह्या पुस्तकात धर्म आणि धम्म या दोन संकल्पनाची सखोल चर्चा केली आहे. त्यातील भेद स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, धर्म हावैयकतिक असून धम्म हा मुलत: तत्वत:च सामाजिक आहे. धम्म म्हणजे सदाचरण व जीवनातील सर्व क्षेत्रात माणसा-माणसातील व्यवहार उचित असणे होय. तर धर्म या कल्पनेत वस्तुमानाच्या आरंभाच्या साक्षात्काराला महत्त्व दिले जाते. धम्माचे प्रयोजन हे जगाची पुनरर्चना हे होय. धर्मात देव, आत्मा, प्रयोजन प्रार्थना,पूजा कर्मकांड यांना स्थान असून नीतीला स्थान नाही याउलट नीती हे धम्माचे सार आहे.

या ग्रंथाची आठ खंडात विभागणी केली आहे. पहिल्या खंडात सिद्धार्थ गौतम बोधिसत्त्व बुध्द कसे झाले. दुसऱ्या खंडात धम्मादिक्षेचीमोहीम,तिसऱ्या खंडात भगवान बुद्धांनी काय शिकवले? यात धम्म, अधम्म वसधम्म म्हणजे काय याचे विवरण दिले आहे. चौथ्या खंडात धर्म व धम्म पुनर्जन्म,कर्म,बुद्धाची प्रवचने आहेत. पाचव्या खंडात संघ,भिक्खुचे कर्तव्य,भिक्खु आणि उपासक,उपसकासाठी नियम तर सहाव्या खंडात भगवान बुद्धाचे समर्थक, विरोधक आणि बौद्ध धम्माचे टीकाकार, सातव्या खंडात भ्रमणीकाची अंतिम यात्रा, वैशालीचा निरोप व महापारीनिर्वान आणि आठव्या खंडात भगवान बुद्धाचे व्यक्तिमत्व व उपसंहार इ. विषयाच्याद्वारा भगवान बुद्धाचा जन्म,गृहत्याग सम्बेधीप्राप्ती,धम्मचक्र प्रवर्तन, धम्मप्रचार,बौद्धधम्माचे तत्त्वज्ञान आणि महापरीनिर्वाणापर्यत."भगवान बुध्द आणि त्याचा धम्म" हा एक मौलीक ग्रंथ आहे.तसेच हा ग्रंथ बौध्द धर्मियाचा धर्मग्रथ म्हणून हि मान्यता प्राप्त आहे.

३.Who were the Shudras? How they came to be the Fourth Varna in Indo-Aryan society(शुद्र पूर्वी कोण होते?) १९४६

डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचा हा ग्रन्थ १९४६ मध्ये प्रसिद्ध झाला. या ग्रंथात शुद्रांच्या उत्पत्तीचे साधार वर्णन केले आहे. त्याच्यामते वैदीक काळात चातुर्वण्य व्यवस्था नसावी,तर पूर्वी भारतीय समाजात ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे तीन वर्ण होते. पुढे ब्राह्मण आणि क्षत्रिय याच्यात मतभेद झाले. या संघर्शात क्षत्रियांनी ब्राह्मणाचे वर्चस्व मान्य केले नाही परिणामी ब्राह्मणानी क्षत्रियांना क्षत्रियत्वासाठी आवश्यक असलेला मौजीबंधनाचा अधिकार

नाकारला.ज्या क्षत्रियाचे उपनयन होऊ शकले नाही, ते वर्ण व्यवस्थेतून दुसऱ्या स्थानावरून खाली आले त्यातून चौथा शुद्र वर्ण तयार झाला. आजचे शुद्र हे पूर्वाश्रमीचे क्षत्रिय आहेत अशी डॉ.बाबासाहेबांची भूमिका होती.

या पुस्तकात डॉ.बाबासाहेबांनी सहा भागात अहिन्दुतील अस्पृश्यता, हिन्दुतील अस्पृश्यता, अस्पृश्य गावाबाहेर का राहतात,अस्पृश्यतेचे मूळ वंशभेद आणिउद्योगधंदे,बौध्द धर्माचा तिरस्कार, गोमांस भक्षण, अशुद्ध आणि अपवित्र व वाताहत झालेले लोक अस्पृश्य केव्हा बनले आदीचे विवेचन केलेले आहे.

अस्पृश्यतेच्याउत्पत्तीबद्दलचीहि उपपत्ती पूर्णत: नवीन आहे,हे स्पष्ट करून डॉ.बाबासाहेबांनी उत्तम व सत्यसंदर्भ ग्रंथात वापरले आहेत.

४)Castes In India: Their mechanism, Genesis and development (भारतातील जाती संस्था तिची यंत्रणा,उत्पत्ती आणि विकास)

१९१६सालच्या मे महिन्यात अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्रा.ए.ए.गोल्डन वायझर यांच्या मानववंशशास्त्राच्या परिषदेतडॉ.बाबासाहेबांनी "castes in India: Their mechanism, Genesis and development" या विषयावर आपला संशोधनात्मक निबंध वाचला. त्यात त्यांनी अनुकरणाचा सिद्धांत मांडला. त्यांच्यामते जगातील सर्व समाज हे वर्गीय समाज होते. या वर्गाचा आधार आर्थिक बौद्धिक किंवा सामाजिक होता.सामाजिक व्यक्ती नेहमीच कोणत्या न कोणत्याही वर्गाची घटक असते. भारत सोडून अन्यत्र समाजातील वर्ग मुक्त राहिल्याने हे समाज परिवर्तनीय राहिले. परंतु भारतातील वर्ग हे बंदिस्त केले गेल्यामुळे भारतात जाती निर्माण झाल्या. डॉ.बाबासाहेब म्हणतात,'जातीसंस्था' हि मनूने निर्माण केलेली नसून ती त्याच्याही फारपुर्वीअस्तित्वात होती. जातीसंस्थांच्या उत्पतीत केंद्रबिंदू असलेला व्यवसाय वर्गीय संस्था,नव्या श्रद्धा,देशांतर आदी मुद्द्याकडे त्यांनी लक्ष्य वेधले आहे.

५) The problem of the Rupee-Its Origin and its solution(रुपयाचा प्रश्न उदगम आणि उपाय)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी लंडन स्कूल ऑफ इकोनामिक्स मध्ये डॉकटर ऑफ सायन्स ((डी.एस.सी) या अत्युच्च पदवीसाठी प्रा. एडविन कनन यांच्या अनुमतीने 'दि प्राब्लेम ऑफ दि रुपी – इटस ओरीजिन अंड इट्स सोल्युशन' हा प्रबंध १९२२ साली ऑक्टोबर महिन्यात लंडन विद्यापीठाला सादर केला. या ग्रंथात त्यानी भारतीय चलनांच्या उत्क्रांतीची ऐतिहसिक मीमांसा करून भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती? या त्या काळातील महत्त्वाच्या प्रश्नावर आपले मूलगामी विचार मांडले आहेत.

६)The National Dividend of India a Historical and Analytical study(ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती

डॉ. बाबासाहेबानी भारताच्या आर्थिक प्रश्नावर सखोल अभ्यास करून 'The National Dividend of India a Historical and Analyticalstudy' (भारताचा राष्ट्रीय नफ्याचा वाटा) हा एक ऐतिहासिक पृथकरणात्मकप्रबंध लिहून पूर्ण केल्यानंतर तो १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापीठाला सादर केला. प्रबंधावर त्यांना डॉक्टरेट पदवी मिळाली .

७) Federation Versus Freedom(संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य)

पुणे येथील 'Gokhale institute of politics and economics' या संस्थेच्या वार्षिक समारंभात गोखले सभागृहातील काळे स्मृती व्याख्यानमालेत २९ जानेवारी १९३९ रोजी डॉ. बाबासाहेबाना व्याख्याणासाठी आमंत्रित केले होते. याप्रसंगी त्यांनी 'फेडरेशन व्हर्सेस फ्रीडम ' या विषयावर आपले विचार माडले.

८)Pakistan or the Partition of India (पाकिस्तान अथवा भारताची फाळणी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथम १९४० च्या डिसेंबर महिन्यात 'थॉटस ऑन पाकिस्तान' (पाकिस्तान अथवा भारताची फाळणी) हा अत्यंतमहत्त्वाचा अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहून प्रकाशित केला. याच ग्रंथाची सुधारित आवृत्ती पुढे १९४५ साली प्रकाशित करण्यात आली. सुधारित आवृत्तीचे शीर्षक (Pakistan or the partition of India) या ग्रंथाची प्रथम आवृत्ती होय. हा ग्रंथ थान्केर अंड कंपनी ली.,मुंबई या संस्थने प्रकाशित केला.

९) Annihilation of castes (जातीचे निर्मुलन)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३६ मध्ये जातपात तोडक मंडळाद्वारा लाहोर येथे होणाऱ्याअधिवेशनात आपले विचार मांडण्यासाठी तयार केलेला अध्यक्षीय भाषणाचा मसुदा पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला.भारतीय

राजकारनातील जातीय पेचप्रसंग व त्यातून मार्ग काढणे या व इतर मुद्द्यावर मत प्रदर्शित केली.ती पी अंड ओ प्रिंटींग प्रेस,दिल्ली येथे १९४५ मध्ये छापून आली .

१०)Ranade,Gandhi and Jinnah(रानडे,गांधी आणि जीना)

दि. १८ जानेवारी १९४२ रोजी न्या.महादेव गोविंद रानडे याच्या १०१व्या जयंती निमित्त भारतसेवक समाज या संस्थेने गोखले मेमोरियल सभागृहात आयेजित केलेल्या समारंभात डॉ.बाबासाहेब आबेडकर यांना प्रमुख वक्ते म्हणून डेक्कन सभाऑफ,पुणे या संस्थेने आमंत्रित केले होते, त्याप्रसंगी त्यांनी “रानडे,गांधी आणि जीना” याविषयावर प्रदीर्घ असे तात्विक व्याख्यान दिले होते.

११)Mr.Gandhi and the Emancipation of the Untouchables(गांधी आणि अस्पृश्यांची मुक्ती)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४२ साली हिंदुस्थानातील अस्पृश्यांच्या प्रश्नासबंधी विचार प्रदर्शित करणारा प्रबंध institute of pacific relation या संस्थेकडे पाठविला होता. त्यावर चर्चा होऊन तो प्रबंध अधिवेशनाच्या अहवालात छापला होता. पुढे हा ग्रंथ ‘गांधी अंड दि इमान्सिपेसन ऑफ दि अनटचेबल’ (गांधी आणि अस्पृश्यांची मुक्ती ! गांधी आणि अस्पृश्य वर्गाचे विमोचन) या नावाने डिसेंबर १९४३ मध्ये थंकरअंड कंपनी ली. मुंबई यांनी पुस्तकरूपाने प्रकाशित केला.

१२)communal Deadlock and a way to solve it (जातीय पेच आणि तो सोडवण्याचा मार्ग)

The all India schedule cast federation चे ६ मे १९४५ रोजी मुंबईत नरेपार्क वर आयोजित केलेल्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या राष्ट्रीय दृष्टीकोनातून भूमिका विषद केली. त्यात त्यांनी भारतीय राजकारणातील जातीय पेचप्रसंग आणि त्यातून मार्ग काढने या व इतर मुद्द्यावर आपली मते प्रदर्शित केली.पी अंड ओ प्रिंटींग प्रेस,दिल्ली येथे १९४५ मध्ये छापला.

१३) What Congress and Gandhi have done to the Untouchables (कॉंग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले?)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी१९४५च्या जून महिन्यात प्रसिद्ध केलेला हा एक वैचारिक ग्रंथ मानला जातो. यात त्यांनी कॉंग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांचे किती नुकसान केले? असा अर्थ निघतो हा अर्थ सिद्ध करण्यासाठी डॉ. बाबासाहेबानी या ग्रंथात विपुल माहिती व आकडेवारी दिली आहे. याच्या राजकीय सामाजिक धार्मिक व आर्थिक योजना संबंधी चिकित्सकटीकात्मक विचारसरणीने प्रकाश टाकला आहे.

१४)States and Minorities- What are their rights and how to secure them in the constitution free India (संस्थाने आणि अल्पसंख्याक)

संस्थाने आणि अल्पसंख्याक जाती याचे हक्क कोणते आणि ते स्वतंत्र भारताच्या संविधानात प्रविष्ट कसे करून घेता येतील.याविषयी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन तर्फे घटना समितीस सादर केलेला अस्पृश्यांच्या हितसंरक्षक तरतुदीचा खलिता डॉ. बावासाहेब आंबेडकर यांनीआपले निवेदन घटना समितीला सादर केले. ते ‘फ्रेमिग ऑफ इडियाज कॉन्स्टीट्युशन‘ या ग्रंथाच्या पृष्ठ ८४ ते ११४ पानावर छापण्यात आले होते. हे निवेदन डॉ. बाबासाहेबानी पुस्तकरूपाने मार्च १९४७ मध्ये थकर अंड कंपनी ली.,मुंबई याच्याद्वारे प्रकाशित केले.

१५) Maharashtra as a Linguistic Province (महाराष्ट्र –एक भाषिक प्रांत)

“Maharashtra as a Linguistic Province”हे पुस्तकरूपाने ऑक्टोबर १९४८ मध्ये थंकर अंड कंपनी ली.,मुंबई या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले. मूळ इंग्लिश भाषेत लिहिलेल्या पुस्तकाचे प्रा.बी.सी.कांबळे यांनी मराठीत भाषांतर करून प्रसिद्ध केले होते. महाराष्ट्रएक भाषिक प्रांत याविषयी विचार भाडताना डॉ. बाबासाहेबानीभाषावर प्रांत रचनेच्या समस्या, महाराष्ट्र हा व्यवहार्य प्रांत होईल का? महाराष्ट्र प्रांत हा एकच असावा की,संघराज्य असावा व महाराष्ट्र मुंबई शहर असे चार भागात विवेचन केले आहे.

१६) The Rise and Fall of Hindu Women- (हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती- (१९५१)-

डॉ. बाबासाहेबांचा हा वैचारिक व सांस्कृतिक लेख प्रथम कोलकत्त्याच्या ‘महाबोधी’ मासिकाच्या मे व जून १९५१च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. नंतर ‘द राईज अन्ड फॉल ऑफ हिंदू वुमन’ हे संशोधनात्मक वैचारिक लेखन १९६५ साली डॉ. आंबेडकर पब्लिकेशन सोसायटी या प्रकाशन संस्थेने पुस्तक रूपाने प्रकाशित केले.

१७) The Riddles in Hinduism- (हिंदू धर्मातील कोडे)

इ. स. १९५१ ते १९५६ या पाच वर्षाच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी द बुद्ध अन्ड हिज धम्म (भगवान बुद्ध व त्यांचा धम्म), रिव्होलुशन अंड.काउंटर रिव्होलुशन इन इंडिया (क्रांती आणि प्रतिक्रांती), बुद्ध अन्ड कार्लमार्क्स, दि रिडल्स ऑफ हिंदूइझम (हिंदू धर्मांचे कोडे) या ग्रंथाचे लेखन चालू होते. दि रिडल्स ऑफ हिंदूइझम या ग्रंथाच्या लेखनमालेची सुरुवात १९५४ मध्ये केली व सप्टेंबर १९५६ मध्ये लिहून पूर्ण केला. परंतु त्यात फेरफार करणे व शेवटी प्रत तयार करण्याचे काम अपूर्ण राहिले. महाराष्ट्र लेखन व सांस्कृतिक मंडळने हे पुस्तक रूपाने प्रदर्शित केले आहे.

१८) Thoughts on Linguistic States- (भाषिक राज्यांसंबंधी विचार)

डॉ. बाबासाहेबांनी 'Thoughts on Linguistic States' हे पुस्तक नागसेन बन औरंगाबाद येथे लिहून प्रकाशित केले. यात एकूण पाच भाग व अकरा प्रकरणे आहेत. आपले विचार स्पष्ट करण्यासाठी ५ नकाशे व प्रमुख जातीची आकडेवारीचे परिशिष्ट जोडले आहे.

१९) The Pali Grammar, Dictionary and BouddhaPooja Path (पाली व्याकरण, शब्दकोश आणि बौद्ध पूजापाठ)

Dr. BabasahebAmbedkar Writing and Speeches Vol.-16 Grammar and Dictionary of the Pali Language by Dr. B. R. Ambedkarहा ग्रंथ बराच काळ अप्रकाशित होता. महाराष्ट्र शासनाने १९९८ मध्ये हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र साहित्य प्रकाशन समितीमार्फत प्रकाशित करण्यात आला. त्यावेळी महाराष्ट्र शासनाचे विशेष पदाधिकारी व बाबासाहेबांच्या साहित्याचे गाडे अभ्यासक वसंत मून हे होते. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

२०) Revolution and Counter Revolution- (क्रांती आणि प्रतिक्रांती)

"क्रांती आणि प्रतिक्रांती" हा एक महत्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथात डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माच्या भारतात झालेल्या उदयाला क्रांती मानले असून ब्राह्मणी धर्माने त्या विरुद्ध ज्या मार्गाचा अवलंब केला त्याला प्रतिक्रांती मानले. या प्रतीक्रांतीचा जो परिणाम झाला तो म्हणजे बौद्ध धर्माची अवनती किंवा ऱ्हास होय. या दोन्ही ऐतिहासिक घटना कशा घडल्या त्या मागे नेमकी कोणती कारणे होती, त्याची कारणमीमांसा करण्याच्या हेतूने डॉ. बाबासाहेबांनी या ग्रंथाची निर्मिती केली.

२१) Buddhism and Communism- (बौद्ध धर्म आणि साम्यवाद)

१५ नोव्हेंबर १९५६ रोजी नेपाळची राजधानी काठमांडू येथे 'वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट कॉन्फरन्स' ची परिषद भरली होती. संयोजकांच्या आमंत्रणानुसार डॉ. बाबासाहेब परिषदेला उपस्थित राहिले होते. २० नोहेंबर १९५६ रोजी या परिषदेत त्यांनी बौद्ध धर्मातील अहिंसा या विषयावर व्याख्यान देण्याचे ठरवले होते परंतु बहुसंख्य प्रतिनिधींनी बुद्ध आणि साम्यवाद'Buddhism and Communism' या विषयावर बोलण्याचा आग्रह धरला. त्यानुसार त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण असे विस्तृत व्याख्यान दिले. मांडलेले विचार बुद्धिझम अंड कम्युनिझम या नावाने प्रकाशित झाले.

समारोप-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे मूर्तिमंत ज्ञानभांडार होते. त्यांची ज्ञानप्राप्तीची भूक फार मोठी होती म्हणूनच ते आजीवन ज्ञानार्थी बनून राहिले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निरनिराळ्या विषयासंबंधीचे विशेस ज्ञान सदैव उपयोगी पडावे म्हणून ते ज्ञान शब्दबद्ध करण्याच्या उद्देशाने पुस्तक लिहिली आहेत. त्यांनी लिहिलेले ७ ग्रंथ प्रकाशित झाले आणि त्यांनी लिहिलेले ९ पुस्तके प्रकाशित झाले. या व्यतिरिक्त 'बुद्ध आणि कार्लमार्क्स' रिव्होल्यूशन इन एन्शन्ट इंडिया आणि द रिडल्स ऑफ हिंदूइझम अशा तीन ग्रंथांचे लेखन केलेले होते. परंतु तिन्ही ग्रंथांना अंतिम स्वरूप देण्याचे राहून गेले. त्यामुळे ते तिन्ही ग्रंथ त्यांच्या महापारीनिर्वाणापूर्वी प्रकाशित होऊ शकले नाही. त्यांचे ग्रंथ, त्यांची साहित्य अस्पृशांना, सर्व हिंदू समाजाला, आपल्या भारत या राष्ट्राला सदैव मार्गदर्शन करणारा असा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या लेखनाच्या माध्यमातून थोर हितकर मार्गदर्शक सिद्ध झाले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन हे अंतर्मुख करायला लावणारे असे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिगाम्याविरुद्ध लढण्यासाठी साहित्य हेच शस्त्र केले. त्यांचे बहुतांशी साहित्य हे इंग्रजी भाषेमध्ये होते जेणेकरून भारतातील धार्मिक आर्थिक इ. प्रश्न जगाच्या व्यासपीठावर पोहोचेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य हे

आजही भारतातील विविध समस्यांवर मौलिक मार्गदर्शन म्हणून उपयोगी पडते. इतक्या प्रचंड बुद्धिमत्तेचा आणि दूरदृष्टीचा नेता पून्हा होणे नाही.

संदर्भ:

१) प्रबोधन प्रकाशन ज्योती- एप्रिल २०१५.
२) लोकराज्य- एप्रिल २०१८.
३) योजना- फेब्रु. २०१५, एप्रिल २०२०.
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग १, २, ३.
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर.
६) संपा. डॉ. पी. विठ्ठल, डॉ. नागोराव कुंभार, सर्वदर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

IQAC - C dinator
Shri- M. H. e College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPA
COLLEGE OF ARTS & COM
A/P Raypatan,Tal- Rajapur,

Dr.BabasahebAmbedkar as a Best Reader: An Overview

Mr.Manohar Ramulu Kondagurle
Librarian,Shri. M. H. KhapaneArts and Commerce College, Pachal
Tal. Rajapur, Dist. Ratnagiri – 416704
Mobile No. 9422590940. ,E-mail:- mkondagurle007@gmail.com

Abstract: -

The study is conducted to review the reading habits of Dr.BabasahebAmbedkar and how he was actual best reader in the world. He had provisioned in Indian Constitution the education should for all and it must compulsory to each Indian citizen. He was best writer, reader, social reformer, politician, researcher and philosopher. He was the father of Indian Constitution. While writing Indian Constitution, he spent complete time of the day for study, discussing and writing. His reading habit has inspired to every reader of India. His struggle of reading and education deserves to be appreciated in wider spectrum and need to be known to all among Indians.

Keywords: - BabasahebAmbedkar, Dr.Babadaheb, BhimraoRamjiAmbedkar, Indian Educator, Best Reader, Library User, Father of Indian Constitution.

1.1 Introduction:

Library is source of knowledge. It consist text books, reference books, journals, magazines, newspapers, different kind of databases, maps, globs, theses, dissertations, monographs and other reading materials. The say is that constructing and developing good library is the creating and producing the knowledge society. The every good nation has built by the knowledge and research and development. The knowledge and research and development activity is totally depends on the good library. Therefor good library must be the integrate part of the society as well as nation. Good libraries in the world are Library of Congress, British Library, and Columbia University Library so on. There are many excellent libraries in the world Such as in the country USA, Briton, China, France etc. But in India comparing to the world very few little bit good libraries but not in the list of world's top libraries.

Reader is the person who read reading materials. Reader is user of every library. The existence of libraries are the mostly depends on the readers. The best reader or ideal reader is the person who understands and remembers what he/she reads. The best reader also appliesideas to his/her own life and in the society learned through reading. Best reader also becomes best writer. The study focuses on the reading habit of Dr.BabasahebAmbedkar.

1.2 Objectives of the Study:

- To know about Dr.BabasahebAmbedkar.
- To examine how Dr.BabasahebAmbedkar was Best Reader in the World.
- To know the literature written by Dr.BabasahebAmbedkar.

1.3 Methodology:

The study used a review of literature to investigate about how Dr.BabasahebAmbedkar had used libraries for reading. The author also retrieved literature related to Dr.BabasahebAmbedkar and evaluated how Dr.BabasahebAmbedkar was Best Reader not only in India but also in the World.

1.4 Significance of Study:

The study is designed to explore and review the personality and reading habit of Dr.BabasahebAmbedkar. Importance of the study is that how the person read to become great person in the world history. The quote of Dr.BabasahebAmbedkar is that "life should be great rather than long".

1.5 Early Life:

Dr.BhimraoRamjiAmbedkar is also known as Dr.BabasahebAmbedkar. He is known as Vishwaratna, Parampujya, Bharatratna, Mahamanav, NavBharatacheNirmate and Bodhisatva. He was born on 14th April 1991 at Mhow now officially known as Dr.Ambedkar Nagar in Madhya Pradesh. He was economist, social reformer, Indian jurist, great politician best editor of newspapers, journalist and Creator of Indian Constitution. Dr.BabasahebAmberdkar's father was RamjiMalojiSakpal, Mother Bhimbai, wife Ramabai, and son Yashwant. His family was from Marathi background Tal. Dapoli'sAmbdave Village Dist. Ratnagiri Maharashtra.

Dr.BabasahebAmbedkar was inspired to all lower caste communities as well as upper caste communities. He had fought against social discrimination. Dr.BabasahebAmbedkar was Labour Minister in British Viceroy's Executive Council of pre-independent India. He was chairman of Constituent Drafting Committee. He was first Minister of Law and Justice in Independent India. He also considered chief architecture of the Independent Indian Constitution.

Dr.BabasahebAmbedkar was a life-long learner, student. He earned doctorates in economics from both worlds top University of Columbia and London School of Economics. He achieved the reputation as a scholar in the research of Law and Justice, in the field of economics, agriculture, political science, anthropology, sociology, religion, history, journalism and education. Dr.BabasahebAmbedkar had awarded by India's highest civilian award "Bharat Ratna" in 1990.

1.6 Educational or Academic Development:

1. 1902- Elementary Education in Satara, Maharashtra.
2. 1907- Matriculation from Elphinstone High School, Bombay.
3. 1909- Inter from Elphinstone College Bombay in Persian and English.
4. 1913- B.A. (Graduation) from Elphinstone College Bombay,Affiliated to University of Bombay with Economics and Political Science.
5. 1915- M.A. from Columbia University, New York (USA), Theses presented 'Ancient Indian Commerce'.
6. 1916- M.A. from Columbia University, Theses presented 'National Dividend of India: A Historic and Analytic Study. Research paper presented in May 2016 entitled 'Castes in India: Their Mechanism, Genesis and Development the seminar conducted by Alexander Goldenweiser, Anthropologist.
7. 1917- Ph. D. from Columbia University conferred a Degree of Ph. D.
8. June, 1921- M. Sc. from London School of Economics, London. The thesis was 'Provincial Decentralization of Imperial Finance in British India'.
9. Sept. 1920- Barrister at Law from Gray'sInn., London. 1922-23 spent some time spent in University of Bonn, Germany for reading economics.
10. Nov. 1923- D. Sc. from London School of Economics, London. The Problem of Rupee- Its Origin and its solution was accepted for the degree in Economics.
11. June 1952- L. L. D. from Columbia University, New York for his achievements, Leadership and Authoring the Constitution of India.
12. Jan. 1953- D. Litt.From Osmania University Hyderabad for his achievements, Leadership and Writing the Indian Constitution.

1.7Dr.BabasahebAmbedkar as a Best Reader:

Daily Routine of Dr.Ambedkar page no. 76, Dr.BabasahebAmbedkarstated "I regret that you have no liking for studies. It is vain on your part to pretend that you don't find time. How much time do I get to study? On my return journey from England, I red Eight Thousand (8000) pages between Venice and Bombay. It was six day journey." During another conversation Dr.BabasahebAmbedkar said "you must inculcate a habit of reading. You cannot sit constantly at a place. Once I read for sixty four hours at a stretch and rose only when I had finished the Book. On another occasion in Berlin this time, I took up a book in the evening and read it all night through. I got up only after I had finished it around four in the morning. This page also mentioned the statement of Watchmen who would be around outside, "Every day when I retired to sleep half past one or two at night, he (Dr.BabasahebAmbedkar) was still reading. I left about half a dozen books on a stool beside his bed. I never knew how long he read. He must have slept at five."(How many books might Dr. Babasaheb Ambedkar have read in his life?, 2019)

The above paragraph prove that how Dr.BabasahebAmbedkar was hungry for reading. Dr. Babasaheb red 8000 pages while travelling from England's Venice to Bombay. The time of travelling was six days. It means in a day he was red more than 1300 pages. The day consists 1440 minutes and reading speed of Dr.BabasahebAmbedkar was more than 1300 pages in a day.And Dr. Babasaheb stated that reading habit should inculcate. In another statement, he stated, he red sixty four hours at a stretch and rose only when he was finished the book.

World's Greatest Library:

“John Gunther the writer of the world famous book ‘Inside Asia, writes in his book that Dr.Babasaheb's library was the largest among the world's private ones. His library had books on all subject. The books in his library were not just show pieces, he had studies all of them. This was sign of his immense knowledge. John Gunther Goes on to assert that whatever he is doing for the untouchables of India will not find a parallel in any part of the world.”(How many books might Dr. Babasaheb Ambedkar have read in his life?, 2019)

The above paragraph review that Dr.BabasahebAmbedkar had library which was world's largest personal ones and the library was and is known as RAJGRUHA. It had more than 50000 (Fifty Thousand) Books. That's why Dr.BabasahebAmbedkar is known as “Symbol of Knowledge”.

The potential of young Babasaheb was noticed by Krishna ArjunKeluskarGuruji and he always visited to Dr.BabasahebAmbedkar at the garden in South Mumbai and promoted to keep up with his reading habits. Once on passing matriculation by Dr.BabasahebAmbedkar, received a gift of book on the life of Gautam Buddha written by Shri. KeluskarGuruji. Shri.KeluskarGuruji also recommended to Baroda Maharaja SayajiraoGaikwad for financially assisting to Dr. Babasaheb for further education. (Waldekar, 2020).

While studying in Columbia University Dr. Babasaheb had brought more than 2000 books for reading in India. (Makers of Modern India, pp 188, and DhananjayKeer also Mentioned in Dr.BabasahebAmbedkar's Biography). Entire life Dr.BabasahebAmbedkar loved for books. In 1931 Dr. Babasaheb went London for attending Round Table Conference and brought 32 big boxes of books to India.

Dr. Babasaheb was much hunger for reading. At the age of 22 Dr.BabasahebAmbedkarbought 2000 books despite having difficult financial conditions. By the reading Dr. Babasaheb Achieved very greatness not only India but also in the World. Book reading played important role in the life of Dr. Babasaheb such as ‘Buddha’ red at the teenage and it led his interest towards Buddhism at the later stage of life.

There is not a person in the world who build house for books. Dr.BabasahebAmbedkar sold his old house for purchasing books and paid some loan. He always spent half of the payment for purchasing book, that proves best reading habit of Dr, Babasaheb. (Atri, n.d.).

While writing Indian Constitution, Dr.babasahebAmbedkar had studied and worked whole day and completed the Indian Constitution in 2 years, 11 Months, 18 Days. This was greatest contribution of Dr.BabasahebAmbedkar for Republic India. Every man of the India accepted that Dr.BabasahebAmbedkar is a great person in the world.

1.8 Literature Written by Dr.BabasahebAmbedkar:

1. Castes in India- 1916
2. The Problem of Rupee: Its Origin and Its Solution- 1923
3. Annihilation of Castes – 1936
4. Who Were the Shudras? - 1946
5. Thoughts on Pakistan- 1945
6. The Untouchables- 1948
7. Riddles in Hinduism
8. Ranade Gandhi and Jinha- 1943
9. Federation versus Freedom- 1939
10. States and Minorities- 1947
11. Revolution and Counter Revolution
12. Buddha and Karl Marx- 1956
13. Buddha and His Dhamma-1957 (After Mahaparinirvan)

1.9 Conclusion:

The thought of Dr.BabasahebAmbedkar “Edcuate, Organize and Agitate” indicate that how the importance had given for education by him and the entire life had spent for reading and writing. Dr.BabasahebAmbedkar was believed that reading and education build the society as well as nation. This study indicate to scholars, students, readers from the society if you not read, you may die. The future need is read much and build nation.

References:

How many books might Dr. Babasaheb Ambedkar have read in his life? (2019, January). Retrieved from Quora: https://www.quora.com/How-many-books-might-Dr-Babasaheb-Ambedkar-have-read-in-his-life Retrieved on 31.08.2021

Atri, P. (n.d.). *Babasaheb Ambedkar and His Love For Books.* Retrieved from https://velivada.com/2020/04/23/babasaheb-ambedkar-and-his-love-for-books/

Waldekar, S. (2020). *Knowing (Reading) 'The Ambedkar' And Being 'An Ambedkarite': Through The Anti-Caste And Feminist Lens.* Retrieved from https://velivada.com/2020/04/13/knowing-reading-the-ambedkar-and-being-an-ambedkarite-through-the-anti-caste-and-feminist-lens/

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- R..

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII) B
ISSN : 2278-9308
September, 2021

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय योगदान

प्रा. बी. ए. कश्यप
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी ,मोबा. ७२७६६४५०८४,ईमेल –babasaheb.kashyap@gmail.com

---

प्रस्तावना –

आज २१व्या शतकामध्ये जगातील अनेक देश आपली अर्थव्यवस्था सांभाळून ती अधिक मजवूत करण्यासाठी व्यूहरचना आखताहेत. आज जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये अमेरिका, चीन, जपान, इंग्लंड हे देश ऐकमेकांशी स्पर्धा करत आहेत. भारताची अर्थकारणाची गणिते चुकल्याने तो कधीच या स्पर्धेतून बाहेर पडला आहे. प्रत्येक देशामध्ये असणारी गरीब जनता, मध्यमवर्गीय जनता, श्रीमंत व अतिश्रीमंत वर्ग या सर्वांना एका रेषेत बांधणारी व्यवस्था म्हणजे त्या देशाची अर्थव्यवस्था हि अर्थव्यवस्था सूचीबद्ध करणारा असतो तो अर्थतज्ञ आणि असा अर्थतज्ञ त्या देशाकडे असणे हे त्या देशाचे परमभाग्य असते. अर्थतज्ञ हे बुद्धीमान असतात. ख्यातनाम मार्क्सवादी अर्थतज्ञ पाल वॅरन यांनी बौद्धिक कर्मचारी व बुद्धीवंत यांच्यात फरक केला आहे. निर्वाहाचे साधन म्हणून बुद्धीचा वापर करणारे ते बौद्धिक कर्मचारी. पण जे चिकित्सक विश्लेषणासाठी व सामाजिक स्थित्यंतरासाठी बुद्धीचा वापर करतात त्यांना बुद्धिवंत म्हणतात. अन्टोनिया ग्रॅमसी या विचारवंतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचं वर्णन जैविक बुद्धिवंत म्हणून केलं आहे. असा जैविक बुद्धिवंत एखाद्या संपूर्ण समाजाचे हितसंबंध न्याय पध्दतीने राष्ट्रासमोर मांडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील भारताचे ख्यातनाम अर्थतज्ञ होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या राजकारणात, स्वातंत्र्य चळवळीत, सामाजिक चळवळीत, राज्यघटनेच्या निर्मिती प्रक्रियेत, मंत्रिमंडळता असलेलं योगदान अचंबित करणारे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक महत्वाच्या पैलूपैकी अर्थतज्ञ हा पैलू दुर्लक्षित झाला आहे. तो भारत देशाकडून आणि नोबेल पारितोषीक समितीकडून देखील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय लिखाणावर अभ्यास करून मांडणी करणाऱ्यांना नोबेल मिळाले पण बाबासाहेबांना दुर्लक्षीलं गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१५ साली एम.ए. हि पदवी अर्थशास्त्रामध्ये व १९१७ साली पी.एचडी. हि पदवी देखील अर्थशास्त्रीय विषयामध्येच संपादन केली. १९२९ साली डॉ. ऑफ सायन्स हि अत्युच्च पदवी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथून मिळविली. ती देखील अर्थशास्त्रामध्येच, अर्थशास्त्रामध्ये सर्वोच्च पदव्या मिळवीत असताना त्यांनी अर्थशास्त्रावर मौलीक ग्रंथ देखील लिहिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्रावर तीन महत्वपूर्ण ग्रंथ लिहिले.

१) अॅडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी
२) इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स अँड सोल्यूशन
३) दि प्रॉब्लेम ऑफ रूपीः इट्स ओरिजन अँड सोल्यूशन

हे तीनही ग्रंथ एम.ए., पी.एचडी. आणि डॉ. ऑफ सासन्य या तीन पदव्यांसाठी लिहिलेले प्रबंध होते. या प्रबंधामध्ये त्यांनी मांडलेले आर्थिक विचार पाहता डॉ. बाबासाहेब हे जागतिक अर्थतज्ञ होते याची खात्री होते. आता वरील प्रबंधामधील मांडणी थोडी विस्ताराने पाहू.

१) अॅडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एम.ए. साठी लिहिलेला हा पहिलाच ग्रंथ. या ग्रंथ वजा शोधनिबंधामध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त व्यवस्था यांच्यामध्ये सन १७९२ ते १८५८ या कालखंडामध्ये कसकसे फेरबदल होत गेले आणि त्यातून भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला त्याचे विदारक आर्थिक चित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले आहे. १७९२ ते १८५८ या सहा दशकांच्या कालखंडामध्ये कंपननी सरकारने आणि पर्यायाने ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेची यथेच्छ पिळवणूक केली. याची विस्तृत आकडेवारी देऊन सरकारचा एकूण महसूल या कालखंडामध्ये ५५ लाख पौंडापासून वाढत जाऊन ३१७ लाख पौंडापर्यंत जाऊन पोहोचला म्हणजेच त्यामध्ये पाचपटीने वाढ झाली, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवून दिले. या उत्पन्नामध्ये जमिनीवरच्या कराचा वाटा ५४टक्के, मीठावरच्या कराचा वाटा ११टक्के, अफुवरच्या कराचा वाटा ५४टक्के, सीमाशुल्काचा वाटा ६टक्के, आणि

बाकी इतर कर अशी विभागणी होती. या कर आकारणीमध्ये जमिनीवरील कर विशेष जाचक होता. रमेशचंद्र दत्त आणि अनेक विदेशी तज्ञांचे दाखले देऊन, शेतकरी वर्ग या करांमुळे कसा भरडला जात होता याचे विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

ब्रिटिश सरकारने उत्पन्नाचा स्त्रोत वाढवण्यासाठी महसुली उत्पन्नाबरोबरच मोठ्या प्रमाणात कर्जे उभारली. ती दोन प्रकारची होती. एक भारतामध्ये उभारलेली कर्जे आणि दोन विदेशी कर्जे. सन १७९२ साली भारतीय कर्ज साधारण ७० लाख पौंड होते. ही सर्व कर्जे वेगवेगळ्या लढायांमुळे निर्माण झाली होती. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नमुद करतात. महसुली उत्पन्न आणि सरकारी कर्जे यातून उभारलेल्या पैशाचा विनियोग करताना सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी फारच थोडी रक्कम खर्ची पडत असे. कंपनी सरकार लष्करावर प्रचंड खर्च करीत असले तरी त्यामागे मोठा हिस्सा भारतीय शिपायांना वेतनाच्या रूपाने मिळत असेल असे नसून एका युरोपियन शिपायाचे वेतन चार भारतीय शिपायांच्या एकत्रित वेतनापेक्षाही जास्त होते हे आकडेवारी देऊन नंतरच्या ग्रंथात दाखवून दिले आहे. याचाच अर्थ, आर्थिक विकासासाठी अत्यंत नगण्य रक्कमेचा विनियोग करण्यात आला. त्याचा धिक्कार करून भारतीय जनतेची वंचना कशी करण्यात आली त्याचे विवेचन त्यांनी केली आहे. तसेच १९५८ साली ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करण्यात आली. त्यावेळी कंपनी सरकारच्या कर्जाचा बोजा कोणी उचालयचा असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी असलेल्या ब्रिटिश सरकारने कसा अन्याय केला आहे त्याचे प्रभावी चित्रण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. शेवटी ब्रिटिश सरकारच्या भारतातील कामगिरीचे मूल्यमापन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, भारताने इंग्लंडसाठी केलेल प्रचंड आर्थिक योगदान हे जेवढे थक्क करणारे आहे, तेवढेच इंग्लंडचे भारतासाठी नगण्य आर्थिक योगदान विस्मयकारक आहे. शिवाय ब्रिटिश सरकारने भारतासाठी केलेले योगदान हे प्रामुख्याने बिगर आर्थिक स्वरूपाचे आहे.

२) दि इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया –

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा ग्रंथ पी.एचडी. पदवीसाठी लिहिलेला होता. हा प्रबंध म्हणजे त्यांच्या सरकारी वित्तविषयक कामगिरीचा उत्कृष्ठ नमुना आहे. या विस्तृत ग्रंथामध्ये ब्रिटिश केंद्र सरकार आणि त्यावेळची घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंधाविषयीचे विचार व्यक्त होतात. १८३३ ते १९२१ या प्रदिर्घ कालखंडात हे आर्थिक संबंध कसे विकसीत होत गेले याविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले आहे. सन १८३३ ते १८७१ या काळात भारत सरकारच्या वित्त व्यवस्थेचे संपूर्ण केंद्रिकरण झाले होते. सर्व निर्णय केंद्रसरकारकडून घेतले जात. खर्चाचा अर्थसंकल्प करण्याचा अधिकार राज्याकडे व पैसा उभारण्याची जबाबदारी केंद्र सरकारवर अशी पद्धत होती. या काळात शेतसारा मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आल्याने उत्पादनाला खीळ बसली. आयातीवरील कर अंतर्गत जकातीपेक्षा कमी असल्याने परकीय मालाच्या स्पर्धेत भारतीय उद्योग जकातीपेक्षा कमी असल्याने परकीय मालाच्या स्पर्धेत भारतीय उद्योग टिकू शकले नाहीत. उत्पन्नापैकी निम्मा भाग लष्करावर खर्च केला जाऊन शिक्षण, आरोग्य, कालवे, रस्ते याकडे दुर्लक्ष करण्यात आले. प्रांतिक सरकारच्या मागण्या जास्त असल्याने उत्पन्न खर्चाच्या बाबी आता प्रांताकडे सोपविण्यात आल्या व तरीही उत्पन्न अपुरे असेल तर केंद्राकडून अनुदान दिले जाई. केंद्राला उत्पन्न खर्च मेळ साधण्यासाठी नवी कर आकारणी करावी लागली. अशावेळी धनिकांचा उत्पन्नावरील कर रद्द करून रयतेवर अधिक करभार टाकला. वास्तविक उत्पन्नावरील कर आकारणी घटक राज्यांच्या दृष्टीने योग्य होती असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. १८७७-७८ ते १८८१-८२ मध्ये उचलून दिलेल्या महसुलावर आधारित अंदाजपत्रकाची पद्धती होती. ज्यामध्ये विशिष्ठ प्रकारचे घटक राज्यातून मिळणारे महसूली उत्पन्न त्या-त्या घटक राज्यांसाठी राखून ठेवण्यात आले.

१८८२-८३ ते १९२०-२१ या कालखंडात महसुलाच्या हिस्सा वाटपावर आधारित अंदाजपत्रकाची पद्धती प्रचलित होती. या पद्धतीत केंद्र सरकार व घटक राज्ये यांनी गोळा केलेल्या महसुलाचा सुनिश्चित हिस्सा एकमेकांना देण्याची तरतूद करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, पूर्वीच्या वित्तीय व्यवस्थेला नवेरूप देणे ही काळाची गरज होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय विचारांचे महत्व आजच्या काळातही बदल कमी झालेले नाही असे दिसते. आजही भारताच्या राज्यघटनेनुसार राज्य सरकार व केंद्र सरकार यांचे वित्त संबंध ठरविण्यासाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार यासंबधीताने पायाभूत मानावे लागतील.

३) दि प्रॉब्लेम ऑर रूपीः इट्स ओरिजन अँड सोल्यूशन -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्थशास्त्रीय दृष्ट्या अत्यंत महत्वाचा ग्रंथ डॉ. ऑफ सायन्सच्या पदवीसा लिहिलेला हा प्रबंध प्रथम १९२३ साली प्रसिद्ध झाला. नंतर १९४७ साली हिस्टरी ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिं या नावाने पुन्हा प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय रूपयाच

उत्क्रांतीच्या ऐतिहासिक मीमांसा करून, भारतासाठी आदर्श चलनपद्धती कोणती? या त्यावेळच्या अत्यंत ज्वलंत विषयावर आपले मूलगामी विचार मांडले. भारतीय रूपयाच्या दुर्लक्षिलेल्या सन १८०० ते १८९३ या कालखंडामध्ये भारतीय रूपयाची, चलनाचे परिणाम म्हणून कशी जडणघडण होत गेली, त्याचे सखोल विवेचन सादर करतात. भारतासाठी भविष्यकालीन दृष्टिकोनातून आदर्श चलनपद्धती कोणती असावी याविपयी तत्कालीन अर्थतज्ञांपुढे त्यावेळी दोन प्रमुख पर्याय होते. एक तर सुवर्ण परिमाण, ज्यामध्ये सोन्याच्या नाण्याच्या वापर चलन म्हणून अभिप्रेत असतो, दुसरा पर्याय होता सुवर्ण विनिमय परिमानाचा, ज्यामध्ये कागदी नोटांचा चलन म्हणून वापर होतो आणि कागदी रूपये घेऊन ठराविक दराने सोने देण्याची सरकारने हमी घेतलेली असते. या दोन परस्पर विरोधी चलनव्यवस्थांच्या योग्यायोग्यतेचा जो वाद चालला होता. त्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रा. केन्स यांच्यासारख्या अत्यंत नामवंत आणि प्रभावशाली अर्थतज्ञांशी वाद घातला होता, हे आजच्या बहुतेक अर्थतज्ञानादेखील माहित नाही. प्रा. केन्स आणि इतर अर्थतज्ञांनी सुवर्ण विनियम परिणामाचा पुरस्कार केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याला कडाडून विरोध केला. त्यांचा युक्तीवाद असा होता की, सुवर्ण विनिमय परिमाणांमध्ये लवचिकता जरूर असेल, मात्र लवचिकता हे दुधारी अस्त्र असून परिणामतः भाववाढ होऊन रूपयाची किंमत घसरू शकते. त्यामुळे विनिमयाचे साधन म्हणून रूपयाचे स्थान डळमळीत होण्याची शक्यता संभवते. आपल्या युक्तीवादाच्या समर्थनासाठी, ऐतिहासीक पुरावे देऊन, सुवर्ण परीमाण असताना भारतातील किंमती कशा स्थिर होत्या, त्याउलट सुवर्णविनिमय परिमाण प्रचलित असताना कशी भाववाढ झाली होती, त्याचे साधार विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात. त्या वादातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अक्षरशः खरी ठरली आहे.

भारतामध्ये आणि इतरत्र केन्सच्या भूमिकेचा स्वीकार त्यावेळी करण्यात आला. मात्र त्याला ९० वर्षे लोटल्यानंतर आजहि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्लेषण अधिक मर्मग्राही होते हे आज अर्थतज्ञांना कळून चुकले आहे. त्या वादामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता त असा कि चलननिर्मिती करणाऱ्या (रिझर्व्ह बँकेसारख्या) संस्थेच्या चलननिर्मितीच्या क्षमतेवर परिणामकारक नियंत्रण असण्याची आवश्यकता आहे. नाहीतर अनिर्बंध चलनपुरवठा आणि त्यातून भरमसाठ भाववाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेसाठी जे हिल्टन यंग कमिशन १९२६ साली नेमण्यात आले होते. त्याच्यापुढे साक्ष देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाच युक्तिवाद केला होता. याबाबतीत आजची आर्थिक स्थिती काय दाखवते? केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट प्रचंड गतीने वाढत आहे. कधी नव्हे तो जीडीपी मायनसमध्ये गेला आहे. कोरोना महामारीच्या संकटात भारतीय जनतेला स्थिरतेचा धीर देण्यात अडचणी येत आहे. केंद्र सरकार लाखोकोटिंचे पॅकेज जाहिर करून देखील उद्योजकांच्या, व्यावसायिकांच्या आत्महत्या थांबत नाहीत. अर्थव्यवस्थेचा कणा असणारे शेती व उद्योगक्षेत्र गटागंळया खात आहेत. केंद्र सरकारचे आर्थिक धोरण चुकत असल्याने त्यांना रिझर्व्ह बँकेकडून रक्कम घ्यावी लागत आहे. केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेकडून २०१८-१९ ला १,७५,९७८ कोटी, सन २०१९-२० ला ५७,१२८ कोटी, सन २०२०-२१ ला ९९,१२२कोटी इतकी रक्कम घेतली आहे. आज भारतीय अर्थव्यवस्थेला ज्या डॉक्टरांच्या सल्ल्याची व उपायांची गरज आहे ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. कारण चलन निर्मितीच्या क्षमतेवर परिणामकारक नियंत्रण ठेवण्याची डॉ. आंबेडकरांनी १९२१साली मांडलेली भूमिका एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतर ही निश्चितच योग्य होती असे म्हणावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या इतर ग्रंथातील आर्थिक विचार

(१) जातीव्यवस्था –

'अँनिहीलेशन ऑफ कास्ट' या आपल्या ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,'जाती व्यवस्थेमध्ये अभिप्रेत होती ती विभागणी श्रमांची नव्हती तर ती श्रमिकांची विभागणी होती व अमानवी आहे.' एखाद्या ब्राह्मणाचा मुलगा कितीही अकार्यक्षम निपजला तरी त्याचा पौरोहित्याचा अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नव्हते त्या उलट एखाद्या मागासवर्गीय तरुण बुद्धिमान असला तरी त्याला हलकी सलकी कामे करूनच आयुष्य कंठावे लागत असे. एका वर्णातून दुसऱ्या वर्णांमध्ये कोणालाही प्रवेश वर्ज्य होता. ही श्रमाची विभागणी नव्हे तर श्रमिकांची विभागणी होती. श्रमाच्या विभागणी मध्ये काहीही गैर नाही. मात्र श्रमिकांची विभागणी ही अमानवी आहे. जगात इतरत्र कुठेही अशी विभागणी झालेली नाही आणि त्यामुळे भारताचे अतोनात नुकसान झाले आहे असा विचार डॉ. आंबेडकर यांनी मांडला. जातिव्यवस्थेमुळे भारताची आर्थिक प्रगती आणि विकास कसा खुंटला आहे. जातिव्यवस्थेमुळे श्रमशक्ती आणि भांडवल हे उत्पादनाचे दोन्ही महत्त्वाचे घटक हे जिथे त्यांची उपयुक्तता जास्तीत जास्त आहे अशा ठिकाणी वापरले न जाता पारंपरिक जातीनिहाय पद्धतीने अर्थव्यवस्थेमध्ये त्याचे वाटप होते. त्यामुळे उत्पादन प्रक्रिया व कार्यक्षम होऊन आर्थिक प्रगतीला खीळ बसते असा युक्तिवाद डॉ. आंबेडकरांनी केला आहे.

(२) अस्पृश्यता-

'व्हॉट कॉंग्रेस अँड गांधी हॅव डन टू अनटचेबल्स' या ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, अस्पृश्यता ही केवळ धार्मिक रचना नसून गुलामगिरी पेक्षा हि भयंकर अशी आर्थिक रचना आहे. गुलामगिरी मध्ये मालक हा गुलामाला खाऊ-पिऊ घालतो कपडेलत्ते देऊन कमीत कमी त्याला माणूस म्हणून वागवण्याची जबाबदारी स्वीकारतो. त्याउलट अस्पृश्यता ही अशी रचना आहे की जिच्यामध्ये मालकांवर काहीही जबावदारी न येता अव्याहतपणे अस्पृश्य समाजाची आर्थिक पिळवणूक करता येते. जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता यांसारख्या सामाजिक समस्यांचे आर्थिक दृष्टिकोनातून विश्लेषण करणारे बहुधा पहिलेच विचारवंत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

(३) मार्क्सवाद –

'बुद्धीझम अँड कम्युनिझम' या आपल्या शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सवादी आणि त्याची भारतीय सामाजिक आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात उपयुक्तता याची सखोल चर्चा केली आहे. पहिले म्हणजे रयतेचे शोषण केवळ वर्ग कलहामुळे होते हा मार्क्सवादाचा सिद्धांत डॉ. आंबेडकरांना मंजूर नव्हता. शोषणाला आर्थिक तसेच सामाजिक धार्मिक असे अनेक पैलू असतात. किंबहुना भारतीय परिस्थितीच्या संदर्भात सामाजिक आणि धार्मिक शोषण हे आर्थिक शोषण हा इतकेच जाचक आहे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती.डॉ. आंबेडकर म्हणतात मार्क्सवाद हा पुनर्रचनेपेक्षा सर्वंकष क्रांतीचा पुरस्कार करतो. रयतेची एकाधिकारशाही प्रस्थापित करणे हे त्यांचे अंतिम ध्येय होय. त्यासाठी साम दाम दंड भेद अशा कोणत्याही नीतीचा अवलंब साम्यवादाला मान्य आहे. मग तो रक्तरंजीत असला तरी चालेल मानवी जीवनमूल्यांना तिथे स्थान नाही लोकशाहीचे खंदे समर्थक असलेल्या डॉ. आंबेडकरांना सरकारची कोणतीही एकाधिकारशाही मान्य नव्हती. रक्तरंजित क्रांती ऐवजी घटनात्मक तरतुदी आणि लोकशाही प्रक्रियेची सुसंगत अशा साधनांनी समाजाची पुनर्रचना करावी असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता.

राज्यसंस्था ही तात्कालिक असून कालांतराने आपोआपच नष्टप्राय होईल हा मार्क्सवादाचा सिद्धांत देखील डॉ. आंबेडकरांनी पूर्णपणे नाकारला. वर्ग विरहित समाज रचनेवर त्यांचा विश्वास होता. मात्र राज्यसंस्था विरहित समाज रचना त्यांना अशक्यप्राय वाटत होती. किंबहुना जोपर्यंत मानवी समाज अस्तित्वात राहील तोपर्यंत राज्यसंस्था टिकून राहील असा त्यांचा विश्वास होता.

(४) विकासाची अर्थनिती –

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेसाठी विकासाची अर्थनीती काय असावी याचे अभ्यासपूर्ण विवेचन डॉ. आंबेडकरांनी 'स्टेटस अँड मायनॉरिटी' या ग्रंथांमध्ये केल्याचे दिसून येते. याबाबतीत त्यांनी गरिबी हटविणेस विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्तता या तत्वत्रयीचा आग्रह धरला आहे.डॉ. आंबेडकर या ग्रंथांमध्ये म्हणतात, खाजगी उद्यमशीलतेला धक्का न लावता। जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त राहील आणि संपत्तीचे वाटप समानशील होईल अशा पद्धतीने आर्थिक व्यवहाराचे नियोजन करणे ही राज्यसंस्थेची जबावदारी आहे.राष्ट्रीयकरणाला डॉ. आंबेडकरांचा विरोध नव्हता. मात्र उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या हाती एकवटली पाहिजेत अशी अतिरेकी भूमिका त्यांनी घेतली नाही. शेत जमीन आणि अवजड उद्योगधंदे यावर सामुदायिक मालकी असावी. शेत जमिनीचे राष्ट्रीयीकरण करूनसामुदायिक लागवड करावी आणि उत्पादनाचे लोकशाही पद्धतीने जातिभेद न करता वाटप करावे म्हणजेच गरीबांना न्याय देता येईल अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. विशेष म्हणजे खाजगी उद्यमशीलतेला धक्का लागू नये व व्यक्तिगत प्रेरणांचा संकोच होऊ देता कामा नये यावर डॉ. आंबेडकरांनी भर दिलेला दिसून येतो.

भारतात समाजवादी अर्थव्यवस्था असल्याशिवाय भविष्यातील कोणतेही सरकार देशात सामाजिक आर्थिक व राजकीय न्याय कसा देऊ शकेल? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला होता. भांडवलदारांना नफा कमावण्याच्या धोरणातून गरीब हा अधिक गरीव होतो आणि भांडवलदार अधिकाधिक श्रीमंत होत आहेत हे त्यांनी युरोप अमेरिकेत पाहिले होते. भांडवलदारी अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिल्याची फळे आपण भोगतो आहोत. ऑगस्ट २०२१ अखेरची आकडेवारी काय सांगते तर. मुकेश अंबानी यांची संपत्ती ११५ टक्क्यांनी वाढली, गौतम अदानी यांची ८२९ टक्क्यांनी वाढली, अजीम प्रेमजी १५३ टक्के, पालनजी मिस्त्री ९४ टक्क्यांनी वाढली. समाजवाद सोडून भांडवलशाहीला प्राधान्य दिल्यास हे असेच होणार हे बाबासाहेबांनी अर्थ शास्त्रीय दृष्ट्या त्याच वेळी ओळखले होते.

(५) शेतीविषयक विचार –

भारतीय शेती विषयक विचार मांडत असताना त्यांनी भारतीय शेतजमिनीच्या धारण क्षेत्राचा असणारा लहान आकार व त्यावरील उपाय जमीन महसूल सामुदायिक शेती, सहकारी शेती, महारवतन कृती पद्धती यावद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. शेती संदर्भातील विशेपतः छोट्या धारण क्षेत्राच्या बाबतीत मांडलेले विचार आजच्या परिस्थितीत उपयुक्त ठरतात. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांच्या आधाराने जर कापड धोरणे आखली तर निश्चितपणे ग्रामीण भागातील शोषितांना त्यांना न्याय्य हक्क मिळेल.शेतीला त्यांनी आर्थिक उद्योग संबोधले होते. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतकरी वर्गाच्या जमिनीच्या उपयुक्ततेवर मोठा ताण येतो.अ.भा.शे.का.फे. च्या वतीने घटना समितीला दिलेले निवेदन 'राज्य आणि अल्पसंख्यांक' या नावाने प्रसिद्ध आहे. 'भारताचा मोठा भाग ग्रामीण असल्याने या निवेदनात त्यांनी शेतीला राष्ट्रीय उद्योग घोषित करण्याची मागणी केली होती. असे केल्याने शेत जमीन ही सरकारच्या मालकीची असणार होती. डॉ. आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यातील आर्थिक धोरण क्रांतिकारक होती. बाबासाहेबांच्या पक्षाकडे सत्ता नसल्याने त्यांना ती राबवता आली नाही.

(६) जल धोरण –

स्वातंत्र्य पूर्व काळात १९२० ते १९५० या दरम्यान भारत सरकारने देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी नियोजनाचा अवलंब केला नियोजनाच्या स्वीकारा बरोवरच देशातील जलद व वीज साधनांचा नियोजनबद्ध विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचा निर्धार या काळात करण्यात आला. डॉ. आंवेडकर १९४२ ते १९४७ या दरम्यान केंद्रीय मंत्रिमंडळात असताना त्यांच्याकडे श्रम सिंचन व वीज हे खाते असताना त्यांनी केंद्र सरकारच्या जल व वीज धोरणांचा पाया घातला डॉ. आंबेडकर यांना सिंचन वीज रस्ते यांसारख्या पायाभूत सोयीचे आर्थिक विकासातील महत्त्व माहीत होते. म्हणूनच १९४२ ते १९४६ या योजना काळात विविध पायाभूत सोयी सुविधा विकसित करण्यावर भर दिला. डॉ. आंबेडकरांच्या मते स्वस्त व मुबलक विजेशिवाय औद्योगिकीकरणाचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे सिंचन सुविधा विकसित केल्या शिवाय शेतीतील उत्पादकता व उत्पादन वाढविता येत नाही. त्यांच्या अखत्यारीत या काळात जे नवीन जलधोरण आकारास आले त्याची प्रमुख तीन वैशिष्ट्ये सांगता येतील.

- नदी पाणलोट क्षेत्र (River Valley Basin) आधारित जलसंधारणाच्या विकासासाठीच्या बहुविध दृष्टीकोनाचा (Multipurpose Approach) स्वीकार.
- वहुविध जलद प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नदी पाणलोट प्राधिकरण (River Valley Authority / Corporation) ची स्थापना.
- जलद व वीज संसाधनाच्या विकासासाठी केंद्र पातळीवर दोन तांत्रिक संस्थांची निर्मिती.

अ) केंद्रीय जलमार्ग सिंचन व जलप्रदूपण (Central Waterway's Irrigation and Navigation Commission) (CWINC)

व) केंद्रीय तांत्रिक वीज मंडळ (CTPB) इत्यादी

डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी केलेल्या प्रयत्नामुळेच मोठे धरण प्रकल्प पूर्णत्वास जाऊ शकले यामध्ये दामोदरप्रकल्पाचा (विहार) प्रामुख्याने समावेश होतो. दामोदर प्रकल्पाच्या पूर्णत्वाला नंतर महानदी सोने तसेच कोसी या प्रकल्पांची सुरुवात याच काळात १९४२ते १९४६मध्ये करण्यात आले.

हिन्दी का यह साहित्य डॉ. बाबासाहब अम्बेडकरजी के विचारों से प्रेरणा लेकर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शोषण के विरोध में, अपनी आवाज बुलंद करता है। तथा शोषक वर्ग को अंतर्मुख होकर सोचने के लिए वाध्य करता है। समाज एक हिस्से को केवल अपमान अवहेलना, दारिद्र्य, अभाव, वेदना और पिढा भोगने के लिए वाध्य करता है। तथा सदियों तक सुख-सुविधायें सम्पत्ति और सत्ता को अपनेही हिस्से में रखने वाले वर्ण व्यवस्था की शातिर साजिशों का पर्दाफाश कर देता है। सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक मूल्यों की फिर से पडताल करने की आवश्यकता मेहसूस करता है और मानवता शर्म से डूब जाय ऐसी नीति, धर्म, रीति, रूढीयों को बनानेवाले और संवर्धन करनेवाले ब्राम्हणी समाज की चिरफाड करता है। दलित आत्मकथनों के माध्यम से एवं कविताओं के माध्यम से अभिव्यक्त वेदना, पिडा और विद्रोह वेदना में स्थित स्वर को प्रस्फूट्टित होने के लिए लालायित करता है। जो आज संघर्ष का तेजस्वरी स्वर के रूप में उभर रहा है। अतः ये स्वर निराशा के नही है आशा का है। जिसमें अपनी अस्मिता की खोज में निरंतन रचनात्मक आयामों को छू लेने का इसमें सामर्थ्य है।

संदर्भ -

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
.LEGE OF ARTS & COM.PACH
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratn

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380

SRJIS

ISSN 2319-4766

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-51

Special Issue of Department of History, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)

5th June 2021

RECENT TRENDS IN MODERN HISTORY

Chief Editor
Dr. Subodh Kumar Singh
Principal

Editor
Dr. Dipak P. Lonkar
Head, Dept. of History

Book 2

67 अचलपूर शहरातील प्रमुख वीरगळ
डॉ. ओमप्रकाश सा. बोबडे 323-325

68 राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे, राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी विचार
प्रा.डॉ.भारत वि.नखाते 326-329

69 क्रांतिकारक : वीर बाबुराव शेडमाके
प्रा. डॉ. डी. एन. कामडी 330-333

70 वंचितांचा इतिहास
डॉ. कल्पना एम. सांगोळे 334-338

71 शस्त्रशास्त्र : इतिहास घडवणाऱ्या शस्त्रांच्या इतिहासलेखनाचे शास्त्र
श्री. मृण्मय दीपक अरबुणे 339-341

72 स्वयंभू श्री. हरिश्चंद्र महादेव मंदिराचा इतिहास
प्रा. डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ 342-345

73 स्थानिक इतिहास आणि त्यामधील प्रमुख घटक
प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील 346-348

74 ब्रिटिश कालीन चंद्रपूर नगरपालिकेतील सार्वजनिक शिक्षण सुधारणा
प्रा. डॉ. प्रमोद ना. घ्यार 349-351

75 चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे वैभवशाली पण दुर्लक्षित लोकसाहित्य एक मागोवा
प्रा. संदीप पुंडलिक नन्नावरे 352-356

76 वऱ्हाडातील महानुभाव संप्रदाय: एक सामाजिक क्रांती
डॉ. गजेन्द्र बी. ढवळे 357-362

77 कासेगाव येथील प्राचीन शिव मंदिर एक अभ्यास
डॉ. रविकीरण जाधव & श्री. ज्ञानेश्वर सतिश झरकर 363-368

78 सबाल्टर्न लेखनप्रवाह आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत चंद्रपूर जिल्हयातील वंचीतांचे योगदान
डॉ. पुरूषोत्तम माहोरे 369-373

79 विसाव्या शतकातील भारतीय मुस्लीम स्त्रियांची स्थिती
कु. सानिया सफराजखान पठाण 374-378

80 भारतातील स्त्रीयांच्या उन्नतीची चळवळ
प्रा. कांबळे शिवाजी ईरबा 379-383

81 बांग्लादेश संदर्भात इंदिरा गांधी यांचे कर्तृत्व
प्रा. शिवचरण धांडे 384-386

82 सातपुडा पर्वतरांगातील आदिवासींचे सण-उत्सव
प्रा. डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी 387-392

83 स्त्रीवाद
डॉ. सतिश खरात 393-398

Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies
SJIF2021=7.380
ISSN: 2319-4766

स्थानिक इतिहास आणि त्यामधील प्रमुख घटक

✓ **प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील**
श्री. मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स. पाचल. ता. राजापूर. जि. रत्नागिरी

सारांश

'इतिहास' या शब्दाची फोड 'इति + ह + आस' म्हणजे असे असे घडले अशी केली जाते. गतकाळात घडलेल्या निवडक घटनांचा अर्थ लावला की इतिहास आकाराला येत असतो. इतिहासाच्या अभ्यासामध्ये आता राजकीय बाजू व्यतिरिक्त इतर सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक घटकांनाही अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. आधुनिक काळात इतिहास लेखन शास्त्रामध्ये अनेक इतिहास लेखनाचे नवनवीन प्रवाह उदयास आले आहेत. त्यापैकी स्थानिक इतिहास लेखन प्रवाहाच्या मुख्य घटकांचा अभ्यास करणे हा या शोध निबंधाचा मुख्य उद्देश आहे. आधुनिक काळात इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासामुळे आंग्लवादी, राष्ट्रवादी, प्राच्यविद्यावादी, मार्क्सवादी, सबाल्टर्न, इ. इतिहासलेखन प्रवाह निर्माण झाले आहेत. या प्रवाहाबरोबरच प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास लेखन हे नवे प्रवाह आता उदयास येऊन ते महत्वाचे ठरू लागले आहेत. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. स्थानिक इतिहासाचा अभ्यास करताना अभ्यासकांनी विशेष काळजी घेतल्यास याप्रकारचा अभ्यास इतिहास लेखनात उपयुक्त भर टाकू शकतो. स्थानिक इतिहास लिहीताना इतिहासकार त्या ठिकाणच्या लोकांच्या आपल्या जन्मभूमीविषयी ज्या स्वाभाविक भावना असतात त्या भावना व ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असणारी व्यक्ती यांच्या आधारे इतिहास लेखन करतो. कधी स्वतःच्या स्मरणातून तर कधी इतरांना बोलके करून त्याच्याकडून वदवून घेतलेल्या मौखिक इतिहासाच्या रूपात मांडत असतो. त्यामुळे मौखिक इतिहास हा स्थानिक इतिहासासाठी आवश्यक घटक मानला जातो. स्थानिक इतिहासाचे संशोधन करताना गावांच्या नावाची व्युत्पत्ती, भौगोलिक, सामाजिक रचना, धार्मिक व सांस्कृतिक जीवन, आर्थिक घटक, राजकीय व प्रशासकीय घटक या मुद्यांच्या आधारे स्वतंत्रपणे लेखन करणे आवश्यक आहे.

प्रास्ताविक -

अनेक इतिहासकारांनी इतिहासाच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आढळतात. तरीही 'इतिहास' या शब्दाची फोड 'इति + ह + आस' म्हणजे असे असे घडले अशी केली जाते.[१] गतकाळात घडलेल्या निवडक घटनांचा अर्थ लावला की इतिहास आकाराला येत असतो. इ. एच. कार यांच्या मते, 'भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद म्हणजे इतिहास होय. इतिहासकार भूतकाळातील ठराविक घटना निवडून त्याबद्दल आपले स्पष्टिकरण सादर करतो त्यालाच इतिहास असे म्हणतात.'[२] इतिहासकार विविध प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे इतिहास लेखन करीत असतो. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे इतिहासाबद्दल म्हणतात, 'विशिष्ट काल, विशिष्ट स्थल व विशिष्ट व्यक्तीचे विशिष्ट आचरण हे तीन घटक एकत्र येवून प्रसंग ही वस्तू बनली जाते व अनेक प्रसंगांच्या व्यवस्थित संततीपासून इतिहास म्हणून ज्या वस्तूस म्हणता येईल तिची निर्मिती होते.'[३] त्यांनी इतिहासामध्ये फक्त राजकीय घटनांचाच अभ्यास नसून मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचा अभ्यास होत असतो असे सांगितले. इतिहास म्हणजे केवळ भूतकाळातील राजकारण आणि वर्तमानकाळातील राजकारण म्हणजे भविष्यातील इतिहास हा विचार आता मागे पडला आहे. इतिहासाच्या अभ्यासामध्ये राजकीय बाजू व्यतिरिक्त इतर सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक घटकांनाही अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.[४] आधुनिक काळात इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासामुळे इतिहास लेखनाचे नवनवीन प्रवाह उदयास आले आहेत. अशा लेखन प्रवाहामध्ये आंग्लवादी, राष्ट्रवादी, प्राच्यविद्यावादी, मार्क्सवादी, सबाल्टर्न, प्रादेशिक व स्थानिक इतिहास इ. चा समावेश होतो. या प्रवाहापैकी स्थानिक इतिहास लेखन प्रवाहाचा अभ्यास करताना कोणत्या प्रमुख घटकावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे हा या शोध निबंधाचा मुख्य उद्देश आहे.

स्थानिक इतिहासलेखन प्रवाहाचा उदय व विकास -

स्थानिक इतिहास लिहिण्याची सुरूवात प्रथम इंग्लंडमध्ये सोळाव्या शतकात सुरू झाली. पाश्चिमात्य देशात विशेषतः फ्रान्समध्ये किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रे, संग्रालये, पोषाख, अलंकार, भांडी, इ. चा इतिहास लिहिला जाऊ लागला. १९व्या शतकात अमेरिकेतही अशाचप्रकारचे लिखाण होऊ लागले. खास करून व्यापारी, उद्योगपती, प्रसिध्द व्यक्ती, व चर्चचे अधिकारी यांची माहिती इंग्लंडमधून आलेले व अमेरिकेत स्थायिक झालेल्या लोकांनी, अमेरिकेत युध्दात भाग घेतलेल्या लोकांनी, भौगोलिक घटकांची माहिती लिहिली.[५] त्यामुळे तेथे स्थानिक इतिहासाचा उदय झाला. डॉ. राजा दिक्षित यांनी स्थानिक इतिहासाची संकल्पना मांडताना असे म्हटले आहे की, 'इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता या दोहोंचा वेध असतो. त्यातील अनेक अनेकदा दुर्लक्षित

राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. स्थानिक इतिहासाचा अभ्यास करताना अभ्यासकांनी विशेष काळजी घेतल्यास याप्रकारचा अभ्यास इतिहास लेखनात उपयुक्त भर टाकू शकतो.'६ स्थानाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. प्रदेश ही संकल्पना सापेक्ष आहे.

स्थानिक इतिहास लिहीताना इतिहासकार त्या ठिकाणच्या लोकांच्या आपल्या जन्मभूमीविषयी ज्या स्वाभाविक भावना असतात त्या भावना व ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असणारी व्यक्ती यांच्या आधारे इतिहास लेखन करतो. कधी स्वतःच्या स्मरणातून तर कधी इतरांना बोलके करून त्याच्याकडून वदवून घेतलेल्या मौखिक इतिहासाच्या रूपात मांडत असतो.७ त्यामुळे मौखिक इतिहास हा स्थानिक इतिहासासाठी आवश्यक घटक मानला जातो. गोविंद नारायण मडगावकर यांचा मुंबईचे वर्णन (१८६१), ना. वि. जोशी पुणे शहराचे वर्णन (१८६८), ना. व. चाफेकर यांचे बदलापूर (१९३३), द. गो. लांडगे यांचा नागपूरचा सांस्कृतिक इतिहास (१९५४), राजुरकर यांचा चंद्रपुरचा इतिहास (१९५६), पु. पा. गोखले यांचा जागृत सातारा (१९६२), अरूण टिकेकर संपादित शहर पुणेः एक सांस्कृतिक संचिताचा मागोवा (२०००), इ. ग्रंथामध्ये स्थानिक इतिहासाची मांडणी केलेली आहे. स्थानिक इतिहास लेखन ही बाब हळूहळू अत्यंत महत्वाची ठरत आहे. प्रत्येक गावाची, तालुक्याची व प्रदेशाची एक स्वतंत्र ओळख असते. त्या प्रदेशात असणाऱ्या गावांना इतिहासाची चांगली परंपरा असते. स्थानिक इतिहासाचे संशोधन करताना पुढील मुद्यांच्या आधारे स्वतंत्रपणे लेखन करणे आवश्यक आहे.

स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे घटक

१) ऐतिहासिक पार्श्वभूमी

स्थानिक इतिहास लेखनामध्ये सर्वात महत्त्वाचा पैलू अथवा घटक म्हणून ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व आहे. याबद्दल इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी गावांच्या नावाची उत्पत्ती कशी झाली याचे उत्तम वर्गीकरण केले आहे.८ कोणत्याही गावाचे ऐतिहासिक महत्त्व गावाची प्राचीनता, गावाच्या नावाची उत्पत्ती, गावाशी संबंधित पुराणकथा, दंतकथा, लोक समजुती इ. महत्त्वाचे असतात. बऱ्याच वेळा गावाच्या नावातच त्या गावाचा इतिहास दडलेला असतो. उदा. पंढरपूर हे नाव ऐतरैय ब्राम्हण ग्रंथानुसार विश्वमित्राच्या शंभर मुलांपैकी पौन्ड्र मुलाची राजधानी पौन्ड्रपूर म्हणजेच आजचे महाराष्ट्रातील पंढरपूर होय.९ तसेच कोल्हापूर या नावाची उत्पत्ती शोधण्याचा प्रयत्न केला तर त्या नावातच त्याच्याशी संबंधी पुराणकथा पहावयास मिळतात. प्रत्येक गावाला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक असा ऐतिहासिक वारसा लाभलेला असतो. या इतिहासामधूनच त्या गावांचा विकास व जडणघडण झालेली असते. मात्र पुरेशा प्रमाणात लिखित पुरावे नसल्यामुळे शेकडो किंवा हजारो वर्षांचा अनेक गावांचा इतिहास लिहिला गेलेला नाही. त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनामध्ये अशा अनेक गावांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे आवश्यक आहे.

२) भौगोलिक पार्श्वभूमी किंवा घटक

जगातील प्रत्येक देशाला त्या देशातील प्रत्येक राज्यांना, प्रांतांना, जिल्ह्यांना , तालुक्यांना व कांही विशेष प्रसंगी गावांनाही विविध भौगोलिक परिस्थिती लाभलेली असते. काळानुरूप त्यात बदल होत जातो त्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास स्थानिक इतिहासलेखनात केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ एखाद्या गावातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, जंगल संपदा, पशुपक्षी, त्या गावाच्या भौगोलिक सीमा, पाण्याचे स्त्रोत इत्यादींचा अभ्यास करता येतो. इतिहास आणि ऐतिहासिक घटनावर भौगोलिक घटक परिणाम करत असतात. त्यामुळे या भौगोलिक घटकांचा त्या गावावर काय परिणाम होतो किंवा झालेला आहे याचाही अभ्यास करता येतो. उदा., नदी, तलाव, ओढे असलेली गावे तेथील शेती, शेतीवर आधारित व्यवसाय असा तुलनात्मक अभ्यास कोणत्याही ऐतिहासिक घटनेचासंत क्या अभ्यास करण्याआधी ती घटना ज्या ठिकाणी घडली तेथील भौगोलिक घटक अभ्यासणे महत्त्वाचे असते. अन्यथा त्या घटनेचा व्यवस्थित अर्थबोध होत नाही. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा तेथील पशुपक्षी, शेती, व्यक्ती व व्यक्ती समूहावर परिणाम होत असतो त्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

३) सामाजिक जीवन

एक गावाची एक विशिष्ट सामाजिक संरचना असते. अनेक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावातील सामाजिक जीवन व त्यामध्ये झालेले स्थित्यंतर समाविष्ट करू शकतो. गावची लोकसंख्या, लोकसंख्येत झालेला बदल, कुटुंबसंस्था कुटुंबसंस्थेत झालेला बदल, विविध जाती पोटजाती, पंथ, रूढी-परंपरा, आचार-विचार, प्रथा, सामाजिक संस्था, आभूषणे अलंकार अशा अनेक अंगाने अनेक इतिहासात लेखन केले जाऊ शकते. उदा., काही गावात व जातीत लग्न प्रथा विशिष्ट केल्या जातात. गावांमध्ये विविध जमातीचे लोक राहतात. त्यांची आडनावे प्रामुख्याने गोत्र, गाव, व्यवसाय व हुद्दा या घटकावरून मिळालेली असतात. गावाचा इतिहास लिहिताना स्त्रियांची स्थिती, स्थान, दर्जा, स्त्री-पुरुष समानता, मुलींचे शिक्षण, हुंडा प्रथा, विवाह पद्धती इत्यादी संबंधी माहिती नव्याने मांडता येते.

४) सांस्कृतिक जीवन

एखाद्या गावातील सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना तेथील धार्मिक परंपरा, सण-उत्सव, यात्रा-जत्रा महोत्सवातील प्रथा-परंपरा, पूजाविधी, दंतकथा, पुराणकथा इत्यादींचा अभ्यास करणे गरजेचे असते. कारण प्रत्येक गावात विविध देवदेवतांची मंदिरे, दर्गे व मशिदी आहेत. अशा प्रत्येक गावात विशिष्ट पद्धतीने त्यांच्या जत्रा-यात्रा साजऱ्या केल्या जातात. त्याची नोंद स्थानिक इतिहासात होणे गरजेचे आहे. याशिवाय काही गावात अतिविशिष्ट खेळ, क्रीडाप्रकार, मनोरंजनाची माध्यमे व कलाप्रकार प्रचलित आहेत. त्याचाही याठिकाणी सखोल अभ्यास करता येतो. सांस्कृतिक जीवनाच्या माध्यमातून त्या त्या गावातील सामाजिक, धार्मिक व आर्थिक अनुबंध अभ्यासता येतात. साहित्यिक, सांस्कृतिक अनुबंध समजून घेता येतो. काही गावातील यात्रा-जत्रा विशिष्ट विशिष्ट संकेताच्या आधारावर संपन्न होतात, याचाही या माध्यमातून अभ्यास करता येतो. सांस्कृतिक जीवन हे बड्या कृषी घटकावर आधारित असल्याने अनेक सण समारंभ कृषक जीवनाचे द्योतक आहेत. त्यामुळे त्या कृषक जीवनाचा प्रभाव व संस्कृतिक अनुबंध समजावून घेण्यासाठी स्थानिक इतिहास महत्वाचा असतो.

५) आर्थिक जीवन

भारतातील बहुतांश खेड्यांचे अथवा गावांचे अर्थकारण हे शेती किंवा कृषी जीवनावर आधारित आहे. त्या त्या गावातील जमीन, जमिनीचे प्रकार, शेती, शेतीचे प्रकार, शेतीवर आधारित जोडधंदे, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळणाची साधने, जाती आधारित व्यवसाय, व्यापारी जाती-जमाती इत्यादींचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून करता येतो. उदा., एखाद्या गावातील एकूण कृषी क्षेत्र, फळ लागवडीखाली असलेली जमीन, विविध हंगाम, पीक पद्धती, शेतीची पद्धती, शेती उत्पादने, बाजारपेठ, उत्पादन खर्च, हत्यारे, मळणी, नांगरणी अशा विविध अंगांनी अभ्यास करून त्या गावाचे अर्थकारण समजावून घेता येते.

६) राजकीय व प्रशासकीय घटक

गावचे राजकारण व प्रशासन, गावाचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, गावातील स्वातंत्र्य सैनिकांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग याबद्दलचे संशोधन स्थानिक इतिहासासाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. उदा., रत्नागिरी जिल्ह्यातील पाचल गावचा स्थानिक राजकीय इतिहास लिहिताना आबा नारकर यांचे स्वातंत्र्य संग्रामामधील योगदान विचारात घेतल्याखेरीज तो परिपूर्ण होत नाही.१०

संदर्भ

लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), मराठी विश्वकोष, खंड २, मुंबई, १९७६, पृ. ५०७

शांता कोटेकर, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५ पृ. ४

मु. ब. शहा (संपा.), इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड १०, धुळे, १९९८, प्रस्तावना, पृ. १९

डॉ ह. श्री. साने (संपा.), सामाजिक शास्त्रे आणि साहित्यःअंतःसंबंध, पुणे, १९९५ पृ. ९१

Barbara J. Howe, 'A Century of Local History Writing, JSTOR; OAH Magazine of History VOL. No. 3 (summer), 1989, P., 10 - 15

राजा दिक्षित, प्रादेशिक इतिहासाचा वर्तमान संदर्भ, इतिहास शिक्षक, पुणे, ऑक्टोबर-डिसेंबर, २००४, पृ., ४

अरूण टिकेकर (संपा.), शहर पुणेः एका संचिताचा मागोवा, खंड १, पुणे, २०००, प्रस्तावना, पृ., १६

मु. ब. शहा (संपा.), इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड ६, धुळे, १९९८, प्रस्तावना, पृ. ४२

मिथिला उदय लाड, त्रैमासिक आदिम संघर्ष, मार्च ते मे २०१४, पृ.७

स्नेहल नेने, सह्यगिरीतील गांधीः आबा नारकर, पुणे २०१३

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACH
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagir

IMPACT FACTOR (SJIF) 2021-7.380
ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE 2021, VOL- 10, ISSUE-55

राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक, मराठी विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, (जि. चंद्रपूर) महा.

मुख्य-संपादक
डॉ. सुबोध कुमार सिंह
प्राचार्य

संपादक
डॉ. जयश्री शास्त्री
मराठी विभाग प्रमुख


अनुवादित
स्त्रीवादी
अदिवासी
ग्रामीण
दलित
समकालीन मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा
नाटक
कादंबरी
कविता
कथा
समीक्षा
ललित

11 समकालीन ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण : ‘पाडा’ 76-80
प्रा. डॉ. विजयेंद्र विश्वनाथ पाटील

12 समकालीन स्त्रीवादी साहित्यप्रवाह 81-87
प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई

13 समकालीन मराठी ग्रामीण कविता 88-102
प्रा. डॉ. राजकुमार मुसणे

14 केशव मेश्राम-दलित मुक्ती लढ्यातील विद्रोही कवी 103-105
डॉ. अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ

15 समकालीन आदिवासी कवितेतील संवेदना 106-114
प्रा. डॉ. प्रकाश पी. वट्टी

16 समकालीन मराठी कादंबरी : निळ्या डोळ्याची मुलगी 115-118
डॉ. अर्चना काटकर-सोनवणे

17 जागतिकीकरणात समकालीन मराठी कवितेचे स्वरूप 119-128
डॉ. नरेंद्र तुकडोजी आरेकर

18 ‘कोरकोंडा’ कादंबरी — कायद्याच्या वाटेवरून होणारा संघर्ष 129-134
प्रा. डॉ. .अरुण लाडे

19 ‘पोटमारा’ या कादंबरीतील समकालीन जाणिवा 135-143
प्रा. प्रदिप केशव चापले

20 समकालीन मराठी नव कवींची ग्रामीण कविता 144-151
प्रा. डॉ. अतुल नारायन चौरे

21 रेखा बैजल आणि माधुरी शानभाग यांची विज्ञानकथा 152-158
प्रा. रंजिता वीरकर

22 'आलोक' समकालीन दीर्घकथेचा यशस्वी अविष्कार 159-163
प्रा. विकास शंकर पाटील

23 समकालीन मराठी साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना 164-168
प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत

24 आदिवासी आत्मकथने स्वरूप व आकलन 169-173
डॉ. विठ्ठल केदारी

'आलोक' समकालीन दीर्घकथेचा यशस्वी अविष्कार

प्रा. विकास शंकर पाटील
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

आलोक हा आसाराम लोमटे यांचा शब्द प्रकाशनाने २५ मार्च २०१० रोजी प्रकाशित केलेला कथासंग्रह आहे. मराठी कथेतील या कालखंडातील एक सशक्त व दर्जेदार लेखक म्हणून आसाराम लोमटे यांना ओळखले जाते. आसाराम लोमटे यांचे अतिशय खडतर परिस्थितीत शिक्षण झाले. इंद्रजित भालेराव यांच्या कवितेचा व त्यांच्या सानिध्याचा, विचारांचा प्रभाव त्यांच्यावर राहिला.लहानपणापासूनच खडतर ग्रामीण जीवनाचा अनुभव आसाराम लोमटे यांनी घेतला होता. त्याचबरोबर लोकसत्तामध्ये वार्ताहर म्हणून काम करत असताना ग्रामीण भागातील समस्या आणि ग्रामीण जीवन वास्तवाचे निरीक्षण त्यांनी केले. आपणा भोवतालचे रखरखीत वास्तव घेऊन त्यांच्या कथांतून हीच आशयसूत्रे त्यांनी मांडली आहेत. मराठी कथेमध्ये दीर्घकथा लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांचा पहिला कथासंग्रह 'इडा पिडा टळो' हा समीक्षकांच्या पसंतीस उतरला. त्यातील सहा ही दीर्घकथा वाचकांनाही अस्वस्थ करून गेल्या. 'इडा पिडा टळो' या कथासंग्रहने आसाराम लोमटे यांना दर्जेदार आणि वास्तवदर्शी लेखन करणाऱ्या, ग्रामीण वास्तवाशी एकरूप झालेल्या लेखकाच्या पंक्तीत स्थान मिळवून दिले. त्यामुळेच त्यांच्या पुढील कथासंग्रहाची उत्सुकता वाचकांना ही लागली होती आणि ही उत्सुकता आसाराम लोमटे यांच्या सकस लेखणीचातून 'अलोक' च्या रुपाने प्रकटली त्या कथा संग्रहाने आपले असामान्यत्व सिद्ध करत साहित्य अकादमी पुरस्कारावर्ती आपले नाव कोरले. यातूनच आसाराम लोमटे यांच्या या कथासंग्रहातील सकस कथांचे महत्त्व अधोरेखित होते.

या कथासंग्रहाच्या मुखपृष्ठावर लेखकाने खोडाच्या मुळाशी बसलेला शेतकरी दाखविला आहे. या मुखपृष्ठावरील चित्रातून लेखकाला खूप काही सांगावयाचे असल्याचे अधोरेखित होते. या खोडावर ती कोणतीही पाने दिसत नाहीत आणि शेतकरी त्याच्या मुळाशी बसलेला आहे. झाड ज्या पद्धतीने पाण्याचा शोध घेत राहते. त्याच्या मुळ्या या पाण्याच्या दिशेने जात राहतात, त्याचप्रमाणे मानवी जीवन ही सुखाच्या शोधार्थ भटकत राहते. शेतकऱ्याच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ आणि त्या दुष्काळाने हिरावून नेलेले त्याचे सुख, वटलेले झाड आणि पाण्याच्या शोधार्थ झाडाला इकडेतिकडे फुटणाऱ्या मुळ्या याचा संदर्भ कदाचित लेखक जोडू पाहतो. लेखकाने या कथासंग्रहाच्या प्रारंभीच अर्पण पत्रामध्ये असे म्हटले आहे की 'अशांना ज्यांची मुळे अजूनही मातीत आहेत' यावरुनच एक गोष्ट प्रकर्षाने आपल्या लक्षात येते की जी माणसे ग्रामीण संस्कृती, कृषीजीवन, कृषी संस्कृतीशी निगडित असलेली सर्व व्यवस्था यामध्ये गुंतून पडलेली आहेत अशा लोकांना हे पुस्तक अर्पण केलेले आहे. जी माणसं मातीशी जुळलेली आहेत, जी माणसं आजही गावच्या मातीपासून दूर झालेली नाहीत अशा माणसांना हा कथासंग्रह लेखकाने अर्पण केलेला आहे.

या कथासंग्रहाच्या मलपृष्ठावर भा. ल. भोळे यांनी पत्रातून आसाराम लोमटे यांना पाठवलेला मजकूर आला आहे. यामध्ये त्यांनी "आसाराम लोमटे यांची कथा आज आणि आता साक्षात भिडते" असे म्हटले आहे.

त्याचबरोबर "कारण ज्या जीवनाविषयी त्यांना तुम्ही लिहिता त्याबद्दल तुम्हाला जिवंत आस्था आहे" अ म्हटले आहे. १६३ पानाच्या या कथा संग्रहामध्ये सहा कथा आलेल्या असून या कथासंग्रहाचे मुखपृष्ठ आ रेखाटने बाळ ठाकूर यांनी रेखाटलेली आहेत.

चिरेबंद - या कथेत गावाकडे एकटीच राहणारी आजी व तिचा शासकीय पातळीवर सत्कार आहे म्ह तिला सोबत करण्यासाठी शहरातून गावी आलेला तिचा नातू यांच्यातील संवादतून हे कथानक पुढे सर राहते. त्यांच्या आजोबांनी रजाकारांशी लढा दिला म्हणून स्वातंत्र्य सैनिकांच्या वीर पत्नीचा सत्कार शासन आयोजित केला आहे. त्यासाठी गावी आलेला नातू अनेक नवनवीन सत्य आजोबांविषयी जाणतो आ हादरून जातो. गावातील गोरगरिबांच्या जमिनी आजोबांनी लाटल्या. त्यातूनच त्यांचा खून झाला हे नवे स त्याला कळते.रजाकार लढ्याशी त्यांचा काही संबंध नसल्याचे कळते. आपला चिरेबंदी वाडा असाच अने सत्य गिळून बसला आहे. या चिरेबंदी वाड्यातून एकही सत्य पाजरणार नाही हे निवेदकाला समज आजीच्या सत्कारानंतर तो शहरात जायला निघतो त्या वेळी त्याचे पाय वाड्यात अडखळत नाहीत. अने लहानसान प्रसंगातून त्याला आपल्या आजोबांविषयी माहिती मिळते व अस्वस्थ करणारे वास्त त्याच्यासमोर येते. या वाड्यात राहण्यापेक्षा या वाड्याचा वारस म्हणून राहण्यापेक्षा त्याला शहरात राहणे वाटते. आजोबांनी अनेक लोकांना छळून या जमिनीचा ताबा मिळवलेला असतो. जमीन मिळवूनही त पडून आहेत हे वास्तवही दुर्लक्षित करता येत नाही. ही कथा ग्रामीण भागातील वास्तवावर प्रकाश टाकता दिसते. ग्रामीण भागात जमिनी परस्पर नावावर करून घेणे, ताब्यात घेतलेल्या जमीनीवर आपला अधिकार सांगणे अशा अनेक घटना घडताना आपल्याला दिसून येतात. या जमिनीच्या वादातून होणारे खू त्यानंतर या जमिनीच्या वादातून होणारे न्यायालयीन लढे, या जमिनी वादामुळे पडल्याने त्यांचे होण आर्थिक नुकसान, शहरात गेलेला मुलगा आणि गावाविषयी असणारी त्याचीअनास्था, गावाशी ना तुटल्याने त्याला आपल्या घराविषयी कुटुंबाविषयी वाटणारी अनास्था, स्वातंत्र्यलढ्यात सहभाग न घेता स्वातंत्र्यसैनिक म्हणून काहींची झालेली नोंदणी असे अनेक प्रश्न या कथेतून चित्रित झाल्याचे दिसते. सा सुनेच्या नात्यातील रुंदावत चाललेली दरी, सासूचे एकटेपण, तिची असणारी गावाविषयीची अस्मिता, सासू गावच्या शेतीतून मिळालेले उत्पन्न लपून ठेवले आहे अशी शहरी सुनेची असणारी मानसिकता अशा अने नवीन गोष्टींवर ही कथा प्रकाश टाकताना आपल्याला दिसते.

ओझं - ही कथा तर वाचकांना अस्वस्थ करून टाकते मराठवाड्यातील शेतकऱ्याच्या पाचवीला पुजले दुष्काळाचे दुःख आणि या दुष्काळाच्या झाडात होरपळनारा शेतकरी या कथेत चित्रित झाला आहे. आपल्य भोवतालचे जगण्याच्या आशेचे अंकुर होरपळून जातात आणि नात्यातील ममतेचे पाझर असतात त्या वे शेतकरी आत्महत्येच्या पर्यायाकडे वळतो यावर या कथेतून लेखकाने प्रकाश टाकला आहे. त्याचबरोब एका नव्या प्रश्नाची मांडणी ही लेखकाने कल्पकतेने केलेली आहे. दोन भावांमध्ये लहान भाऊ शिकू शिक्षक होतो तर मोठा भाऊ त्याच्या शिक्षणासाठी हाडाची काडं करून त्याचं शिक्षण पूर्ण करण्या काळजी घेतो. लग्नानंतर या लहान भावाची पत्नी शहरातील सुखवस्तू जगणे पसंत करते तर पत्ती ने गावाक केलेली मदत तिला खूपत राहते. याउलट मोठा भाऊ शेतीत संघर्ष करत शेती पिकवण्याचा प्रयास करतान

दिसतो. आई-वडील, पत्नी आणि एकच मुलगी चतुरा असा कुटुंब काबिला सांभाळतो. निसर्गाशी दोन हात करण्याचा प्रयत्न करतो, पण प्रत्येक वेळी येणारे अपयश आणि मुलीच्या भवितव्याची चिंता त्याला अस्वस्थ करून सोडते. प्राध्यापक असणाऱ्या भावालाही आपल्या घराविषयी, घरच्यांच्याविषयी अस्था वाटते.अधीमधी घरी जाऊन भावाला समजवण्याचा प्रयत्न ही तो करत असतो. आपली मुलगी चतुरा हिला शहरात शिकण्यासाठी आपला प्राध्यापक भाऊ ठेवू शकत नाही ही वेदना त्याला अस्वस्थ करून सोडते. आपल्या पाठीमागे असणारे निसर्ग आणि दुष्काळाचे दुःख, सातत्यानं जीवनात करावा लागणारा संघर्ष आणि मुलीचेही मनासारखे शिक्षण करू शकत नसल्याच्या दुःखातून शेवटी विष प्राशन करून हा शेतकरी आत्महत्या करताना दिसून येतो. त्याच वेळी या घराचा बोजा किंवा या घरच्यांची जबाबदारी हा प्राध्यापक भाऊ सांभाळताना दिसतो. हा आशावादी दृष्टीकोणही ही लेखकाने चित्रित केला आहे.एकूणच ग्रामीण भागातील शेती आणि शेतकरी आणि तेथील शेतकरी मुलांच्या जीवनाची समस्या लेखकाने या कथेच्या मुळाशी ठेवलेली आहे. नोकरदार व्यवस्थेमध्ये घरात राहणारी मंडळी गावापासून तुटत जातात सत्य या कथेच्या मुळाशी लेखकाने ठेवले आहे.

खुदळण - ही कथाही वाचकाला अस्वस्थ करणारा अनुभव देणारी आहे राजकीय जीवनात एका पक्षातील नेते दुसऱ्या पक्षात सहजगत्या जात असतात पण ग्रामपातळीवर या कार्यकर्त्यांच्या मनामध्ये होणारी खळबळ लेखकांने मार्मिकपणे टिपली आहे. कम्युनिस्ट पार्टीचे काम करणारा दताराव ज्यावेळी ही पार्टी सोडून सत्ताधारी पार्टीकडे जातो त्यावेळी त्याच्या मनात चाललेली खळबळ आणि लोकांच्या कडून त्याला मिळणारे टोमणे, यामुळे तो अस्वस्थ होऊन जातो.आपण आपल्या मूळ प्रवाहापासून तुटत चाललेलो आहोत, आपण संघर्ष करण्यापेक्षा सत्तेशी तडजोड करत आहोत ही भूमिका त्याला अस्वस्थ करत राहते. संघर्ष करत राहणे हीच जिवंतपणाची निशाणी आहे, तत्वानशी तडजोड करत जगणे, सत्तेशी तडजोड करत जगणे म्हणजेच आपल्यातले स्वत्व गमावण्यासारखे आहे असे त्याला वाटते. मुलीच्या लग्नाची असणारी चिंता आणि त्या लग्नासाठी विरोधी आमदाराकडून घेतलेले ५०,००० यामुळे आपण ही स्वार्थी झालो की काय ही भावना त्याला छळत राहते. ज्या आप्पानचे नेतृत्व मानून काम केले त्या अप्पापासून दूर जाणे त्याच्या मनाला पटत नाही. अप्पाच्या भेटीत अप्पानी सांगितलेले तत्वनिष्ठ जीवन हेच खरे जीवन आहे.याचा साक्षात्कार त्याला होतो. ग्रामीण स्तरावरील छोठ्या-मोठ्या तडजोडी करत असताना त्या कार्यकर्त्याच्या अंतर्मनात चाललेला संघर्ष लेखकांने मोठ्या कल्पकतेने चित्रित केला आहे. त्याच वेळी या संघर्षातूनच ही व्यक्तिमत्त्व घडत असतात हे वास्तवही त्यांनी अधोरेखित केल्याचे दिसून येते.

कुभांड - ही कथा ही वाचकाला अस्वस्थ करणारी आहे. दलित वाड्यातील गवळण आणि सवर्ण समाजातील व्यक्ती यांच्या संघर्षातून ही कथा फुलत राहते.ग्रामीण भागात असणारे राजकारण आणि त्यातून उद्ध्वस्त होणारे संसार, त्याचबरोबर दलित आणि सवर्ण संघर्ष हा या कथेच्या मुळाशी आहे. शेतात गवळण व अंकुश यांचा मुलगा सुरेश याने मोसंबी चोरल्या म्हणून त्याला माली पाटलाने मार दिला. माली पाटलाला विचारायला गेल्यावर त्याने गवळण व अंकुशचाच पानउतारा केला. त्यामुळे चिडलेल्या या दोघांना आनंद त्याच्यावरच अॅट्रॉसिटी गुन्हा करण्यास प्रवृत्त करतो. चिडलेला मालीपाटील गावातील उनाड पोरांना गवळणची नोकरी

जावी असे उद्योग करावयाला सांगतात. त्यातून गवळणला त्रास दिला जातो. ती नोकरी वाचविण्यासाठ मालीपाटलाचा दरवाजा ठोठाविते पण मालीपाटीलही त्यांना माफ करत नाही. ही कथा आजच्या सव आणि दलित समाजाच्या संघर्षावर प्रकाश टाकताना दिसते. दलितांना दिलेले अधिकार, त्यांना मिळालेल कायद्याचे कवच कसे कुचकामी ठरते याचे वास्तवदर्शी चित्रण या कथेच्या मुळाशी आहे

जीत - ही कथा तर ग्रामीण भागातल्या राजकारणावर्ती प्रकाश टाकते. ग्रामीण भागातील राजकारण हे आज किती टोकाचे बनले आहे यावरती ही कथा बेतली आहे.या कथेतील राजकारणी सभापती धर्माजी भोसल सरपंच विलास शिंदे याला कशी धोबीपछाड देतो याची ही कथा. दोघेही आपल्या महत्वकांक्षेपोट राजकारणाशी कांहीही संबध नसणाऱ्या माणसांना यात ओढतात. सभापती मयत हारी भोसल्याच्य बायकोला कौसालाबाई तर सरपंच पंढरी कदमाला उभे करून आपली पोळी कशी भाजेल हे पहातात महिन्याभरापूर्वीच पतीचे निधन होऊनही सभापतीच्या हट्टासाठी त्या स्त्रीला निवडणुकीला उभे राहावे लागते . निवडणुकीला उभे राहिल्यानंतर निवडणुकीचे जे काही ग्रामीण फंडे आहेत ते वापरून त्या ठिकाण विजयाकडे आगेकूच करावी लागते.हे सारं मन मारून ही मंडळी करताना आपल्याला दिसून येतात. य वास्तवावर ती लेखकाने प्रकाश टाकल्याचे दिसते. ग्रामीण राजकारणाची घसरत चाललेली पातळी लेखका रेखाटली आहे.

वळण - ही कथा तर वाचकाला खूपच अस्वस्थ करून सोडते. ग्रामीण भागात असणारी पायपीट करून शाळेत जात असते दोन किलोमीटरची शाळेसाठी करावी लागणारी पायपीट, ही पायापीठ करूनही प्रयागच्या वाट्याला येणारे दुःख लेखकाने चित्रित केले आहे. शाळेत जात असताना ती एक दिवस गावातील भांडण दुरून पाहते. एका व्यक्तीचा खून होतो आणि यासाठी तिने साक्ष देऊ नये म्हणून दोन्ही बाजूंनी तिच्यावरती दडपण येते. कोणाचे नाव न घेता ही कुसुम चा शैक्षणिक प्रवाह थांबवण्याचा प्रयत्न होतो. शिक्षकाच्या मनात असूनही शिक्षकाला याविरुद्ध काहीच करता येत नाही पण त्याने सुचवलेल्या मार्गाने प्रयागचे शिक्षण सुरू राहते. राजकारणाचा बळी कुसुम ठरताना दिसते. एक हुशार आणि शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी असणारी मुलगी आपलं भविष्य घडवू पाहत असते. पण आयुष्यातलं एक वळण तिच्या जीवनाचं सार वळणच बदलून टाकते यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. या कथेच्या माध्यमातून लेखकाने ग्रामीण भागातील राजकारणाने उद्ध्वस्त होणारे शैक्षणिक जीवन वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रयागचे शिक्षण सुरू ठेऊन आशावादी दृष्टीकोण व्यक्त केला आहे.

निष्कर्ष -

१) आसाराम लोमटे यांची कथा मराठी कथेची कक्षा रुंदाविते.
२) आसाराम लोमटे यांची कथा ग्रामजीवनाशी एकरूप झाली आहे.
३) आसाराम लोमटे यांची कथा मराठी कथेला समृद्ध करते.
४) आसाराम लोमटे यांची कथा बहु आशयकेंद्री आहे. दीर्घकथेचा वापर कौशल्याने केला आहे.
५) आसाराम लोमटे यांची कथा कृषिजन्य व्यवस्थेतून प्रकट होते.

आलोक कथासंग्राहातील स्त्री पात्रे संघर्ष करतांना दिसतात. ग्रामीण स्त्रीयांचा मानसिक, सामाजिक व कौटुंबिक असा सर्वच पातळीवर संघर्ष सुरू असल्याचे दिसते.

कथेतील खलप्रवृतिकडेही आसाराम लोमटे यांचा माणुस म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन कथेला वेगळ्या उंचीवर नेतो.

ग्रामजीवनातील रसरसित वास्तवाचा अस्सल अनुभव आसाराम लोमटे यांच्या कथेतून वाचकाला मिळतो.

) खेड्यातील ढासळत चालेल्या समूह भावनेचे चित्रण ही कथा करतांना दिसते.

०) लोमटेंची मोजक्या शब्दात मोठा आशय व्यकत करण्याची शैली कथा आशयाला अधिक समृद्ध करते.

ंदर्भ -

यावहारिक मराठी- ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन

ुस्तक परीक्षण- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रीविद्या प्रकाशन पुणे.

यावहारिक मराठी - स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन.

IQAC - Coordinator
hri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
CO EGE OF ARTS & COM.PACHA

Cloud Computing Technology Helps India to Become Information Atmanirbhar (Self-Depend): A Review

Mr.Manohar Ramulu Kondagurle
Research Scholar
Shri. J. J. T. University, Jhunjhunu (Rajasthan)
Mobile No. 9422590940
E-mail:- mkondagurle007@gmail.com

Abstract: -Present Article is focused on recent concept cloud computing technology application in information centre or library for making Information Atmanirbhar Bharat. Method of the study is review of past studies related to cloud computing technology from books, journals, conference proceeding and internet. The study covered concept of cloud computing technology, its types, and application in information centre or library for making information atmanirbhar Bharat. The cloud computing technology has brought revolutionary changes in information and library profession.

Keywords: -Cloud Computing, Information Atmanirbhar Bharat, Information self -depend India, ICT.

1.1 Introduction:-Before the emerging of computer technology and internet, information centres or libraries were provided and fulfilled their own user's needs of information. That time, while providing information services to the users, information centres were faced limitations of location, time and lack of enough financial availability. Computer technology enables information centres or libraries to work collaborative manner as information resources sharing, information centre's networking and consortia for providing information resources to the users. Information communication technology has changed scenario of limitations of information centres and libraries by providing information sources.In the recent trend and technology, information centres or libraries are adopting cloud computing for supplying seamless services with quality in a cost effective and economic way.In the Information era, cloud computing brought revolutionary changes in information technology after computer and internet revolution. Cloud computing technology is emerged as a boom for information centres or libraries. Cloud computing offers various opportunities to connect information services with information cloud. It is advance technology in distributed computing, parallel computing and grid computing. Cloud computing is available on pay per use real time service on the internet. Present study reviews the concept of cloud computing, its importance, types and application in information centres or libraries for becoming self-depend or atmanirbhar of information in India.

1.2 Literature Reviews:

Cloud computing technology is boom for information centres or libraries, it is offering different kinds of opportunities to reach and provide library services by cloud of information (Kadbe & Dange, 2015).

Cloud computing is web based technology, information is shared, applications are provided, and other computing devices are provided on demand with using web technology in cloud computing (Wagde, 2015).

Using Google Gmail, photos organizing on Flicker and web searching with Bing are engaged in cloud computing technology (Gaikwad, 2015).

Manipulating, configuring and online application accessing refers in cloud computing. Cloud computing offers data storage online, application and infrastructure (Tutorialspoint.com, n.d.).

Cloud computing is versatile technology, it helps in broader spectrum of applications and particularly in developing world and cloud computing is rendering on low cost in dynamic scale. It is most cost effective in innovation driven small companies (Srinivas, Reddy, & Qyser, 2012).

1.3 Objectives of the study:

- To review the concept of cloud computing.
- To explore importance of cloud computing for information atmanirbhar Bharat.
- To know the application of cloud computing in information centres / libraries.

1.4 Scope and Limitation of the study:-The study helps information and library professionals for understanding cloud computing concept and use of it for making information atmanirbhar Bharat.

1.5 Statement of the Research Problems:-Cloud computing technology has brought tremendous revolution in the information industry. Hence the study is focused on information atmanirbhar Bharat with using cloud computing technology.

1.6 Methodology:-The paper is described the cloud computing technology for making information atmanirbhar Bharat with the help of available literature in books, journals, conference proceedings and internet.

1.7 Cloud Computing:-National Institute of Technology (NIST) defined "Cloud computing is a model for enabling the network access in ubiquitous and convenient on demand to share a pool of configurable computing resources that can be rapidly provisioned and released with minimum management effort or service provider interaction.(Jim, n.d.) It is typically defined as a type of computing that relies on sharing computing resources rather than having local server or personal devices to handle applications" (Kadbe & Dange, 2015).

Cloud is a term used as analogous to internet. Cloud computing is an internet based technology that provides virtual shared servers, software, devices, infrastructure, platform, other resources for making available on users interest on pay (LuitInfotech, n.d).

Simply cloud computing is sharing of resources and applications on internet to get work without concern about ownership and network management of resources and applications.

1.7.1 Types of Cloud Computing:

a) Infrastructure as a Service (IaaS):-Infrastructure as a Service provides virtual computers, virtual infrastructure and storage, hardware accessories etc. In this type of cloud computing, host manages the entire infrastructure. Clients are also responsible for all other deployment.This kind of cloud computing makes ideal for small and medium size organizations in a least cost and as IT solutions. Infrastructure as a service is available on fully out sourced on pay for use service. It is available in public, private and hybrid model of cloud computing.(What are the types of cloudcomputing?, 2021)(Patil & Patil, 2015). Example of this service is Amazon's web services.

b) Software as a Service (Saas):-Resources and applications are provided by host to the subscribers. Software as a service provides hardware, operating systems and other special software to the user through internet. It provides same software on all user devices for accessing it on the cloud. There is no need worry by user of the cloud about application servers, storage and related content of the information technology. Providers of SaaS Cloud are Google App, AQLAzure etc.(Gaikwad, 2015).

c) Platform as a Service (PaaS):-Host of the Platform as a service provides the access components to the subscribers which applications they require to develop and operate over the internet. This service save the cost of licence, infrastructure, reduces on going operational cost for development, test and hosting environment. This kind of cloud computing service is provided by such venders that Microsoft, Google, Windows Azure, Google ass Engine etc. (Patil & Patil, 2015).

1.7.2 Application of Cloud Computing Technology in Information Centres or Libraries:

i. Cloud computing technology is used for hosting website of information centres or libraries. Amazon's Elastic Computing Cloud (EC2) service is used by Columbia Public Library for hosting website. It provides services rapidly, scalability and redundancy.

ii. Information centres can build digital library, institutional repository, content management system, and integrated library system.

iii. Google docs is used to store library's documents and can provide to user. It is used for collect google forms, googlecalendar and google analytics to collect statistics about library website, blogs and catalogues.

iv. Data backup is stored in cloud computing technology such bibliographical data, reports, media collections etc.

1.7.3 Cloud Computing Technology initiatives in information centres:

- Open Source Software- Koha, D-space, and Greenstone etc.
- Drupal for Content Management
- Moodle for LMS
- OCLC Webscale
- Ex-libris cloud
- Duraspace'sDuracloud – Repository solutions like D-space(Kadbe & Dange, 2015).

1.7.4 Benefits of Cloud Computing in Information Centres or Libraries:

i. Cloud Computing provides all infrastructural facilities in least cost.

ii. Enables user to use personalized workspace.

iii. Provides storage, backup and recovery facility.

iv. It provides virtualized technology so virtualized services can be provided by information centres.

v. Create user friendly environment.

vi. It is cost effective and highly automated technology for information centres.

1.8 Conclusion:-The review of the study is that Indian Information Centres are not fully adopted cloud computing technology in the information environment. But some of Institutions like IIT Delhi are adopted and encouraging other institutions for adopting cloud computing technology for fulfilling user's requirement. The study observed that cloud computing technology gives most reliable and rapid information to the user and create paper less society. Over all study review that cloud computing technology helps India to become Information Atmanirbhar and it is the requirement of the present age of information centres or libraries.

References:

1.What are the types of cloudcomputing? (2021). Retrieved from Leading adge IT serviceand Support:https://www.leadingedgetech.co.uk/it-services/it-consultancy-services/cloud-computing/what-are-the-types-of-cloud-computing/

2.Gaikwad, M. N. (2015, 02 20). CloudComputing in Academiclibraries in India. Role of Librariesin creation ofknowledge society, pp. 62-65.

3.Jim, D. (n.d.). Introduction to CloudComputing. Retrieved from KTHVetenskap OCH Konst: https://www.kth.se/social/files/554fa451f276544829bc2e5e/9-cloud-computing.pdf

4.Kadbe, M. M., & Dange, R. N. (2015, 02 20). Cloud Computing and Libraries. Role of libraries in creationof knoeledgesociety, pp. 57-61.

5.LuitInfotech. (n.d). What is Cloudcomputing? Retrieved from https://www.luitinfotech.com/kc/what-is-cloud-computing.pdf

6.Patil, H. J., & Patil, D. T. (2015). Cloud Computing Models itsapplication. Role of Libraries in creationofknowledge society (pp. 70-74). Jalgaon: Atharva Publicaation.

7.Srinivas, J., Reddy, K. V., & Qyser, A. M. (2012). Cloud Computing Basics. Internstionjournal of Advance researchincomputer and communicationengineering, 1(5), 343-347.

8.Tutorialspoint.com. (n.d.). Cloud ComputingTutorial. Tutorialspoint.com.

9.Wagde, J. W. (2015, 02 20). Cloud Computingtechnology and Digitsllibrary. Role oflibrariesin creation ofknowledge society, pp. 66-69.

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACH
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnag.

Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed Indexed
Multidisciplinary International Research Journal

November -2020

SPECIAL ISSUE

INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,,Dist. BEED.

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Impact Factor – 7.675

ISSN – 2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November - 2020

ISSUE No – CCLXIV (264)

INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr.S.N.Jadhavar
Editor :
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.

Dr.R.M.Hajari
Executive Editor:
Principal
Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.

Aadhar International Publications
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

21	स्त्रीवादी साहित्य **मुळाटे श्रीधर सुधाकर**	81
22	'राखीव सावल्यांचा खेळ' मधील स्त्री प्रा. मोहन चव्हाण	84
23	१९९० नंतरच्या स्त्रीवादी कवितेतील जाणिवा डॉ.फारुक अहमदसाब तांबोळी	88
24	स्त्री समाज सुधारक **प्रा.डॉ. शारदा गोविंदराव बंडे**	91
25	गुप्तकालीन स्त्री जीवन अमोल नानासाहेब मस्के	93
26	स्त्रीवाद : स्वरुप आणि संकल्पना **प्रा. अडसुळे एस. पी.**	95
27	प्राचीन भारतीय विदुषी स्री रत्न घोषा और विश्ववारा का वैदिक ग्रंथों में योगदान प्रा. विकास भानुदास टकले	97
28	भांडे — कपडे करणा—या स्त्री मजुरांची भुमिका व समस्या डॉ. रविंद्र बापुराव शेंडे/ प्रा. स्वप्नील एस. बोबडे	102
29	राजमाता जिजाबाई कार्य की प्रासंगिकता डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे	106
30	महाराष्ट्र विधिमंडळात महिला प्रतिनिधित्व प्रा. डॉ.आंधळे बी. व्ही.	108
31	ग्रामीण स्त्रियांच्या समस्या :एक ऐतिहासिक अभ्यास डॉ बाबासाहेब शेप	113
32	मराठी कवितेतील स्त्री-जाणीवा **डॉ.कैलास इंगळे**	120
33	अठराव्या शतकातील स्त्रीया आणि गुलामगीरी डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट	124
34	लोकसाहित्य चळवळीच्या लोकनेत्या- डॉ. सरोजिनी बाबर **प्रा.डॉ. विकास शंकर पाटील**	127
35	वाटचाल ८ मार्च ची **प्रा. ऍ. अल्का बाबाराव सोमवंशी**	130
✓ 36	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत स्त्रियांचे योगदान **प्रमोद एस. मेश्राम**	133
37	नाना शंकर शेठ यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य डॉ.भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी	137
38	जातक काल में नारी जीवन डॉ० विश्वजीत कुमार नवीन	143
39	समकालीन कामकाजी महिला और जीवन संघर्ष भारतीय महिला: वर्तमान, भूत और भविष्य डॉ. जितेन्द्र कुमार पयासी	150
40	मध्ययुगीन वेदनांची मुक्तीगाथा: संत सोयरा विनायक पवार कृष्णा उत्तम नागरे	152
41	भारतातील महिलांची शैक्षणिक आणि आरोग्य विषयक सद्या स्थिती कु. संगिता साहेबराव बोरसे	155

लोकसाहित्य चळवळीच्या लोकनेत्या- डॉ. सरोजिनी बाबर

प्रा. डॉ. विकास शंकर पाटील
श्री. मनोहर हरी खापणे कलाव वाणिज्य महाविद्यालय पाचल-रायपाटण ता. राजापूर, जि. रत्नागिरी

डॉ. सरोजिनी बाबर यांचे हे जन्मशताब्दीवर्ष आहे. मराठी लोकसाहित्याच्या क्षेत्रात दोन महनीय विदुषींचे नाव आवर्जुन घ्यावे लागते. डॉ. सरोजिनी बाबर आणि डॉ. दुर्गा भागवत. डॉ. सरोजिनीबाबर यांनी लोकसाहित्याचे मोठ्या प्रमाणातसंकलन, संपादन केले तरदुर्गा भागवत यांनी लोकसाहित्याची मांडणी शास्त्रीय दृष्टीकोनातून करत लोकसाहित्याला सैध्दांतिक बैठक प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला. डॉ. सरोजिनी बाबर यांनी मराठी लोकसाहित्याचे मोठ्या प्रमाणात संकलन केले. त्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. गाव, खेड्यातील, डोंगर कपारीतील, आदिवासी पाड्यावर जाऊन त्यांनी हेलोकसंचितसंकलीत करण्याचा प्रयत्न केला. राजकारण, समाजकारण, साहित्यकारण आणिसंस्कृतीरक्षण अशासर्वचक्षेत्रात त्यांनी भरीव कार्य केले आहे.

❖ शालेय व महाविद्यालयीन शिक्षण

डॉ. सरोजिनी बाबर यांचा जन्म 7 जानेवारी 1920 रोजी बागणी, ता. वाळवा,जि. सांगली येथे झाला. लहानपणीच पोलिओच्या साथीत त्या सापडल्या आणि पायाने थोड्या अधू झाल्या. स्त्रीयांविषयी उदारदृष्टीकोन असलेल्या श्री. कृष्णराव बाबर या त्यांच्या वडीलांकडूनसद्विचारांचावारसा त्यांना लाभला. आईगंगूबाई बाबरववडिलांकडून समाजसेवा, सत्कार्याचा संस्कारसरोजिनी बाईंना मिळाल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणवरहीयाचा परिणाम झाला. वडीलशिक्षण खात्यात नोकरीस असल्यामुळे त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्याव त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणांच्या लोकपरंपरा, लोकरितीव तेथील लोकवाङमयाशी त्यांचा परिचय झाला. त्यांचे शालेय शिक्षण बागणी येथे तर महाविद्यालयीन शिक्षण पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात झाले. मुंबई विद्यापीठात मराठी विषयात त्या प्रथम आल्या. श्री. म. माटे, द. वा. पोतदार यासारखे गुरु त्यांना लाभले. त्यामुळे त्या स्वातंत्र्यचळवळीकडेही ओढल्या गेल्या. त्यांना अटकही झालीहोती. 1951 मध्ये लेखक के. ना. वाटवे यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठी साहित्यातील स्त्रियांचे योगदान' या विषयावर त्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांनी लोकसाहित्य व समाजशिक्षण मालेत केलेल्या प्रचंड कार्यामुळे राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाने त्यांना इ.स. 1982 साली डी. एस्सी. (डॉक्टर ऑफ सायन्स) ही पदवी बहाल करुन त्यांचा सन्मान केला.

❖ राजकीय कार्य

डॉ. सरोजिनी बाबर यांनी स्वातंत्र्यचळवळीत सहभाग नोंदविलाहोताच. त्यासाठी त्यांना अटक झालीहोती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर इ.स. 1952 ते 1957 या कालावधीत त्या तत्कालीन मुंबई प्रांताच्या विधानसभा सदस्या म्हणून कार्यरत होत्या. इ.स. 1963 ते 1969 या काळात त्या विधानपरिषद सदस्या होत्या. इ.स. 1968 ते 1974 या कालावधीत त्या राज्यसभा सदस्या होत्या. पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिरागांधी, यशवंतराव चव्हाण, शिवसेनाप्रमुख बाळासाहेबठाकरे, वसंतदादा पाटील या मान्यवरांशी त्यांचा सतत संपर्क होता. त्यांची ही राजकीय वाटचालसुरु असतानाच तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणयांनी 1960 साली 'महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती' च्या अध्यक्षपदी त्यांची निवड केली. त्यानंतर त्यांनी राजकारणापेक्षा लोकसाहित्य संकलनाची आणि संपादनाची मालिकाच सुरु केली. त्यांच्या वडिलांनीसुरु केलेले 'समाज शिक्षण माला'चे रोपटे खऱ्या अर्थानेसरोजिनी बाईंनीचरुजविले.

❖ समाजशिक्षण मालेतील कार्य

सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन कृ. भा. बाबर यांनी विद्यार्थ्यांनी दिलेल्या 4500 रुपयांच्या भेटीमध्ये स्वतःचे 500 रु. घालून 'समाज शिक्षणमाला' हे नियतकालिक सुरु केले. मालेचा पहिला अंक 20 ऑक्टोबर 1950 रोजी 'दसरा-दिवाळी' या नावाने प्रकाशित झाला. तेथून 550 व्या अंकापर्यंत सरोजिनी बाबर यांनीच संपादिका

म्हणून काम पाहिले. आपल्या वडिलांच्या 99 पुस्तकांच्या पाठोपाठ 87 पुस्तके लिहिण्याचे काम सरोजिनी बाबर यांनी केले आहे. 'वृक्षवल्लरीः सोयरी धायरी', 'छंद माझा आगळा' इत्यादी सामाजिक विषयावरील लेखन त्यांनी मालेत केले आहे. 'उखाण्यांचे वैभव', 'लोकगीतातील आनंद', 'लोककला', 'सौभाग्य लावण्य रखुमाईचे', 'लोकगीतेइथेगवसतात', 'भोंडला', 'मखमली पोथी', 'भातुकली', 'आमची कला अकादमी', 'चलारे वैकुंठभुवनी', 'शंकर पार्वती', 'देवा अभंग बोलावा', 'ईश्वरा तुझीलीला अगाध आहे!', 'विठ्ठल, तू असा आहेस कारे?' इत्यादी सांस्कृतिकव धार्मिक साहित्य प्रसिद्ध झाले आहे. 'आजोळघरचीशाळा', 'देशसाक्षरहोतो आहे' इत्यादी शिक्षणविषयक साहित्य, 'धानाई बयो गुणाची', 'इतिहासकालीन स्त्रियांची पत्रे', 'भारतीय स्त्री रत्ने' इत्यादी स्त्री विषयक साहित्य प्रसिद्ध आहे. 'मंजूळ आजी', 'सुर्याची कन्या राधिका' हे कथात्मक साहित्य, 'महाराष्ट्राचे शिल्पकार', 'सावली', 'इंदिरा प्रियदर्शनी', 'कृष्णराव भाऊराव' इत्यादी चरित्रात्मक लेखन केले आहे. 'माझी साधना' हे आत्मचरित्रात्मक लेखन तर 'इतिहासकालीन स्त्रियांची पत्रे' हे ऐतिहासिक साहित्य शिक्षणमालेतून प्रसिद्ध झाले आहे.

❖ मराठी वाङ्मयातील कार्य

लोकसाहित्याच्या संकलनाबरोबरच कथा, कादंबऱ्या, बालवाङ्मय इत्यादी वाङ्मय प्रकारात स्वतंत्रपणेलेखन केलेआहे. 7 कादंबऱ्या, 11 कथासंग्रह, 26ललितलेखसंग्रह, 2 कवितासंग्रह आणि 4 नाट्य वाङ्मयाची पुस्तके आणि आत्मचरित्र अशी 51 स्वतंत्र पुस्तके व त्यांची 307 संपादित पुस्तके अशी त्यांची एकूण ग्रंथसंख्या 358 पर्यंत होते. याबरोबर 'रानजाई' नावाने त्यांनी शांताशेळके यांच्यासह केलेली दूरदर्शन मालिकाही लोकांचे लक्ष्य वेधणारीठरली. मराठी लोकसाहित्य संकलनाचे खूप मोठे काम सरोजिनी बाबरांनी केले. 'मराठीतील स्त्रीधन', 'स्त्रियांचे खेळ आणिगाणी', 'मराठी लोककथा', 'महाराष्ट्रःलोकसंस्कृती व साहित्य', 'लोकसाहित्य भाषा आणिसंस्कृती', 'लोकसाहित्य साजशिणगार' या त्यांच्या ग्रंथांचा आवर्जून उल्लेख करावालागेल. त्या पुस्तकांतून लोकसाहित्य विषयक मांडणी त्यांनी केली आहे. लोकसाहित्याच्या शास्त्रीय मांडणीकडे त्यांचे फार लक्ष्य नसले तरीवेगवेगळ्याठिकाणांवरील, वेगवेगळ्या जातीजमातींचे लोकसाहित्य संकलन करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले आहे. काळाच्या उदरात गडप होवू पाहणारे लोकसंचितशब्दबध्द करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले आहे.

❖ वेगवेगळ्या समितीवर कार्य

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या सामाजिक कार्याचा आवाकाच एवढा मोठा होता की त्यामुळे त्यांना अनेक समित्यांवर काम करण्याची संधी मिळाली. महाराष्ट्र लोकसाहित्य समितीच्या त्या अध्यक्षा होत्याच पण त्याचबरोबर त्यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सदस्यपदी काम केले. विश्वकोश कमिटी सदस्य, पुणे मराठी ग्रंथालय सदस्य, आकाशवाणीसल्लागार समिती सदस्य, अखिल भारतीय समाज कल्याण समिती सदस्य अशावेगवेगळ्या समित्यांवर सदस्य म्हणून त्यांनी यशस्वीपणे काम पाहिले.

❖ सन्मान व पुरस्कार

त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक कार्याची दखल अनेकसंस्थांनीघेऊन त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. अफाट लेखनव सामाजिक कार्याची प्रचंड ओढ या गुणांची कष्टाची समाज माध्यमांनी दखलघेतली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांना डी.लिट. पदवी प्रदान केली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणिसंस्कृतीमंडळातर्फे गौरव पुरस्कार, भद्रकाली ताराराणी पुरस्कार, रमाबाई ठाकरे सन्मानपत्र, गुरुवर्य बाबुराव जगताप पुरस्कार, विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार, पठ्ठे बाबुराव पुरस्कार, मराठा सेवासंघविश्वगौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले.

❖ स्त्रीयांविषयीची आत्मियता

लहानपणापासूनच त्यांना लोकसाहित्याची आवड होती. लोककथा, लोकगीत, म्हणी, उखाणेहे लहानपणापासूनच आज्या, आत्या, मावश्या आजूबाजूच्या बायाबापड्या यांच्याकडून त्यांना ऐकायला मिळत होते. डॉ. बाबर यांनी आपल्या पीएच.डी. चा विषय 'मराठी साहित्यातील स्त्रीयांचे योगदान' हाठेवलाहोता. लोकसाहित्याची अभिव्यक्ती प्रामुख्याने भारतीय कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीव तिच्या जीवनवाटचालीतून अविष्कृतहोते. "आपल्या संस्कृतीतविविधसण, उत्सव, कुलाचार, पारंपरिक चालीरितीवविधींना महत्त्वाचे स्थान आहे. या

लोकसंस्कृतीचे समग्रदर्शन डॉ. सरोजिनी बाबर यांच्या लोकसाहित्य विषयक लेखातूनघडते. डॉ. बाबर यांनी 'स्त्री' व 'लोकसंस्कृती' केंद्रस्थानी ठेवूनविविध वाङमय प्रकारातून लेखन केले आहे.'"[1]' असे प्रा. ज. भारती रेवडकर म्हणतात. संस्कृतीत असणारे स्त्रीयांना महत्त्व, स्त्रीमनातील लोकगीतातून व्यक्त होणाऱ्या भावभावना यामुळे स्त्रीमनातील व्यथा वेदनांची जाणीव त्यांना होती. पुरुषप्रधान संस्कृतीत असणारेस्त्रीजीवन त्यांनी पाहिले होते. त्यामुळेच त्याच्या लेखनात स्त्रीयाविषयी आत्मियता असल्याचे दिसते.

❖ डॉ. सरोजिनी बाबरांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष

डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकसाहित्य संकलन मोठ्या प्रमाणावर केले. त्यासाठी अपार मेहनत घेऊन आपला अमुल्य वेळदिला. लोकसाहित्य संकलन मोठ्या प्रमाणात केले असले तरी त्याकडे संशोधनात्मक दृष्टीने पाहून त्याची चिकित्सक मांडणी त्यांनी केली नाही असे म्हटले जाते पण काळाच्या उदरात गडप होवून जाणारेलोकसंचित त्यांनी शब्दबध्द केले. हे त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांनी संकलित केलेले लोकसाहित्य महत्त्वपूर्ण आहे.

हेसंकलन करताना त्यांनी स्वतः वेळ देऊन आदिवासी, स्त्री-पुरुष, खेड्यातीलवाड्यावस्त्या याठिकाणी जाऊन, तेथील त्यांचे सणवार, उत्सव, कार्यक्रमांमध्ये स्वतः सहभागी होऊन हालोकसंचिताचा अस्सलव दर्जेदारठेवा जमवला असल्याने तोरसरशीतव तेजस्वी आहे. शासनाच्या विविध समित्यांवर काम करताना मराठी भाषेची सेवा अधिकाधिक कशी करता येईल याकडे त्यांनी लक्ष्य दिल्याचे दिसते. त्यातूनच महाराष्ट्र लोकसाहित्य समितीच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी लोकसाहित्य संकलनाची खूप मोठे कार्य केले. महाराष्ट्र लोकसाहित्यमाला : एकूण 5भाग प्रकाशित केले यावरुनच त्यांची लोकसाहित्य विषयक तळमळ दिसून येते.

'मराठीतील स्त्रीधन', 'वनितासारस्वत', स्त्रियांचे खेळ आणिगाणी', 'स्त्रीशिक्षणाचीवाटचाल' यांसारख्या स्त्री विषयक लेखनातून त्यांची स्त्रीयांप्रती असणारी आत्मियता आपणास दिसते. 'मराठी संस्कृती' व 'स्त्री' विषयी त्यांना आस्थाहोती. म्हणूनच त्यांनी स्त्रीविषयक मांडणी आपल्या कथा, कादंबरीतून केलेलीदिसते.

वेगवेगळी अनेक मोठी राजकीय पदे, सन्मान भुषवूनही डॉ. बाबरह्या साध्याच राहिल्या. त्यांच्या या साधेपणामुळे लोकांच्यात त्या सहज मिसळत. लोकसाहित्य संकलन करतांना त्यांना याचा फायदा झाल्याचेदिसते. अपार कष्ट त्यांनी घेतलेच पण स्त्रीयांना आपलसं करण्याच्या त्यांच्या स्वभावामूळे आदिवासी, वाडीवस्तीवरील महिलांनाही त्यांनी बोलतं केल.

आदिवासी पाडे, वाड्यावस्तीवरील, गावखेड्यातीलसणवार, उत्सवव तेथील लोकसाहित्य वर्षानुवर्षे दुर्लक्षितहोतं. त्याला शब्दरुप देण्याची किमया सरोजिनी बाबरांनी केल्यामुळे ही मराठी माणसं आणि त्यांची संस्कृती सर्वासमोर येण्यास मदत झाली.

त्यांच्या लेखनाला सामजिक दस्तऐवजाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. 'कुलदैवत' या त्यांच्या संपादित ग्रंथात महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील दैवतांचा अतिसुक्ष्मपणेशोधघेतलेला आहे. हाग्रंथ बहुजन सर्वसामान्य माणसांची अस्मिता आणिश्रध्दा या दरम्यानचा शोधघेणारा आहे. अशाबाबरांच्या लेखन शैलीमुळे सामजिक दस्तऐवजाचे स्वरुप या ग्रंथाना मिळाले आहे.

साधी सोपी, सहज सुलभ ओघवती भाषा, स्त्रीमनातील हळुवार भावनांचे तरंग, लोकपरंपरेतील वलोकसंस्कृतीतीलविचारधारा, लोकसाहित्यातील वाङमयीन, सांस्कृतीक संदर्भ सहजपणे प्रकट करण्याचे सामर्थ्य हेसरोजिनी बाबरांच्या लेखनाचेविशेष आहेत.

संदर्भः-

1) प्रा. डॉ. भारती रेवडकर- लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. सरोजिनी बाबर- साधना साप्ताहिक 31 ऑगस्ट 19
2) डॉ. सरोजिनी बाबर- 'मराठी लोककथा' बहिः शाळाशिक्षण ग्रंथमाला- जून 1957
3) दुर्गा भागवत, लोकसाहित्याची रुपरेखा, वरदा प्रकाशन पुणे 1977

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत स्त्रियांचे योगदान

प्रमोद एस. मेश्राम
सहयोगी प्राध्यापक, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

प्रस्तावना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील सामाजिक व धार्मिक परिवर्तनाच्या चळवळीचे प्रमुख प्रणेते मानले जातात. धर्माच्या नावाने शेकडो वर्षे दडपल्या गेलेल्या तळागाळातील लोकांमध्ये स्वतःच्या हक्कासाठी जागृती निर्माण केली. महाड सत्याग्रह ते धम्मदीक्षेचा कालखंड या काळात त्यांनी समाजातील बहुसंख्य लोकांसाठी, मानवमुक्तीसाठी जे कार्य केले त्यास मानवमुक्तीचा कालखंड असे समजले जाते. आंबेडकरपूर्व चळवळीने आंबेडकरी चळवळींची पायाभरणी केली असली तरी आंबेडकर पूर्व बहुजनांच्या चळवळीत काहि मोजक्याच स्त्रियांचा सहभाग होता.

समाजात खऱ्या अर्थाने जागृती निर्माण करण्याचे कार्य महात्मा जोतिबा फुले, गोपाळ बाबा वलंगकर, वि. रा. शिंदे, शिवराम जानबा कांबळे, शाहू महाराज, किसन फागोजी बनसोडे, कालीचरण नंदागवळी इ.नी केले. त्यांच्या सभा-संमेलनाला अस्पृश्य पुरूषांबरोबर स्त्रियांही उपस्थित राहू लागल्या. या सभा-संमेलनामुळे स्त्रियांचे प्रबोधन होत असे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजकार्याला सुरूवात केल्यानंतर हळूहळू अस्पृश्य समाज त्याकडे आकर्षिला गेला. संपूर्ण महाराष्ट्रात अस्पृश्यांमध्ये जेव्हा नवचैतन्य निर्माण झाले त्यावेळी पुरूषांबरोबर स्त्रियांही सभा-परिषदांना मोठ्या संख्येने उपस्थित राहू लागल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या चळवळीमुळे अस्पृश्य स्त्रियांच्या जीवनाची कोंडी फुटण्यास सुरूवात झाली. स्त्रियांही पुरूषांप्रमाणे जागृत होऊ लागल्या. याचा परिणाम असा दिसून आला की, समाजातील अनेक प्रश्नांवर स्त्रियांनी आपली मते मांडायला सुरूवात केली. त्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुसंख्य समाजातील स्त्रियांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय दिला.

1) सामाजिक व्यवस्थेतील स्त्रीयांचे स्थान :

प्राचीन काळापासून समाजात अस्तित्वात असलेल्या चार्तुवर्ण्य व जाती-पातीच्या उतरंडीत समाजातील अस्पृश्यांचे फार मोठ्या प्रमाणत हाल झाले. तीच स्थिती जवळपास स्त्रियांची होती. सर्वच प्रकारचे अन्याय-अत्याचारास ती बळी पडलेली होती. पेशव्यांच्या काळात महात्मा जोतिबा फुले व सावित्राबाई फुले यांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी प्रकर्षाने कार्य केले. 25 डिसेंबर 1847 रोजी पुण्याच्या सभेत जोतिबा फुले म्हणतात की, 'स्त्रियांच्या सर्व दुःखाची मूळे कोणती असतील तर पितृसत्ताक पध्दती हे आहे. कुटुंबाची सत्ता व समाजातील सत्ता यांच्या संबंधात आहे. महिला हिन दर्जाच्या आहेत. हे त्यांनी केव्हाच ठरवून टाकलेले असते. हा पुरुषसत्ताक व्यवस्थेत पक्का झालेला सिध्दांत आहे. ब्रिटिशांच्या आगमनानंतर तर हिन विचारात थोडेसे परिवर्तन झाले असले तरी मूलगामी लोकशाही मूलतत्त्वे अजून या समाजात रूजली नाहीत. अबला, स्त्रिया व दुर्बल शूद्रातिशूद्र या बहुजन समाजावर मूळभर लोक प्रभुत्त्व गाजवितात. त्यांच्यावर नाना प्रकारचे अन्याय करतात.'[1]

स्त्रियांवरील अत्याचाराला उच्चभ्रू समाजाने मान्यता ही मनुस्मृतीच्या व अन्य धार्मिक ग्रंथांच्या आधारे दिल्यामुळे स्त्रियांच्या दुःखाला पारावार नव्हता. पेशवे काळात मनुस्मृतीतील नियमांची काटेकोर अंमलबजावणी होत होती. काही उच्च घराण्यातील मोजक्याच स्त्रियांना परंपरागत पध्दतीने शिक्षण दिले जात असे. मात्र समाजातील अन्य स्त्रियांच्या बाबतीत निर्णय वेगळा होता. स्त्रियांच्या बाबतीत अनेक अन्यायकारक पध्दती समाजात अस्तित्त्वात होत्या. मनुस्मृतीत स्त्रियांना परावलंबी व दुय्यम स्थान दिले होते. ज्यामध्ये,

'पिता रक्षती कौमारे, भर्त्ता रक्षती यौवने,
रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति'[2]

अर्थ - स्त्रीचे बालपणी पिता, तरूणपणी पति व वृध्दपणी मुले रक्षण करतात, तर स्त्री हि स्वतंत्र राहूच शकत नाही. अशी हि स्त्रियांची स्थिती समाजात अस्तित्त्वात असल्यामुळे स्त्रियांना समाजात कसलेही स्थान नव्हते.

2) समाजातील अस्पृश्य स्त्रियांची स्थिती :

भारतीय समाजाचा इतिहास संघर्षमय व गुंतागुंतीचा आहे. समाजामध्ये मानवी संबंध महत्त्वाचे असतात. या समाजात प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक परिवर्तने झालीत. सिंधु संस्कृतीच्या ऱ्हासानंतर आर्य व अनार्यांच्या संघर्षातून वर्णभेद जन्माला आला. प्रत्येक वर्णांची बंधने ताठर व चातुर्वर्ण्य पद्धतीनुसार कठोर होत गेली. याबाबत राम आहुजा म्हणतात की, 'कुछ विद्वानों का मानना है की, वर्ण व्यवस्था उतनी ही कठोर थी जितनी आज जाती व्यवस्था है।'[3] हळूहळू समाजात अस्पृश्यता वाढू लागली त्यामुळे समाजातील विषमतेची दरीही वाढू लागली. या वर्णव्यवस्थेत व जातीव्यवस्थेत ब्राह्मणांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'जोपर्यंत वर्णव्यवस्था कायम आहे तोपर्यंतच ब्राह्मण वर्गाचे श्रेष्ठपण कायम आहे.'[4] ही व्यवस्था ब्राह्मणांनी स्वतःच्या सोयीसाठी निर्माण केल्याचे मानले जाते.

उच्चभ्रू समाजात बहुपत्नीत्वाची पद्धत अस्तित्वात होती. राजघराण्यातील स्त्रिया अपवादात्मक शिक्षण घेत होत्या. समाजात दासप्रथा, सतिप्रथा व हुंडापध्दती अस्तित्वात होती. याशिवाय अनेक प्रथा समाजात अस्तित्वात होत्या. समाज व्यवस्थेतील अस्पृश्य स्त्रिया समाजाचे, व्यवस्थेचे काम काही प्रमाणात करीत असत. अस्पृश्य स्त्रियांच्या बाबतीत उर्मिला पवार व मीनाक्षी मून म्हणतात, 'महारात काहींना कोतवली वतने होती. काहीजणी ही वतने सांभाळीत. वाट्टेल ते काम करावे लागत असे. जळणाला लाकूड फोडण्यापासून ते मैताला लाकडे फोडून रचण्यापर्यंत पुरूष नसतील तेव्हा स्त्रियांना हे काम करावे लागत असे. मग ती म्हातारी असो, बाळंतीण असो वा आजारी असो.'[5] स्त्रियांना देखील गावाची सेवा करणे, तमाशामध्ये नाचणे, उदरनिर्वाहासाठी गवत कापून विकणे अशा प्रकारची कामे करावी लागत असत. त्यामुळे अस्पृश्य स्त्रियांना पूर्णपणे शिक्षणापासून वंचित रहावे लागले. असे असतानादेखील अस्पृश्य स्त्रिया कुटूंबात विनम्रता दाखवित असत. हळूहळू या स्त्रियांनी सभा-संमेलनात सहभाग नोंदवायला सुरूवात केल्याचे दिसून येते.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महाड सत्याग्रह चळवळीत स्त्रियांचे योगदान :

अस्पृश्य समाजाला जागृत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत यासारख्या वृत्तपत्रातून समाजप्रबोधन केले. स्वातंत्र्यपूर्व काळात देखील अस्पृश्यांची स्थिती अत्यंत दयनीयच होती. सर्वच ठिकाणी अस्पृश्यता फार मोठ्या प्रमाणात पाळली जात होती. अस्पृश्यांना पाण्यासाठी अनेक प्रकारच्या स्पृश्यांच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत होते. त्यासाठी त्यांनी कायद्याच्या चाकोरीत राहून महाड, नाशिक, पुणे, अमरावती व मुखेड येथे सनदशिर मार्गाने स्पृश्य समाजाचे हृदय परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.

अस्पृश्य समाजाला संघटीत करण्यासाठी व अस्पृश्यांची भिती नष्ठ करण्यासाठी सामाजिक विषमते विरूद्ध समानतेचे हक्क प्राप्त करण्यासाठी 19 व 20 मार्च 1927 साली इतिहास प्रसिद्ध चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. या परिषदेला पंच्याहत्तर वर्षांच्या वृद्धांपासून स्त्रियांही बहुसंख्येने उपस्थित होत्या. 20 मार्च 1927 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदारतळ्यावर स्वतःच्या ओंजळीने पाणी प्राशन करून आम्ही अस्पृश्य असल्याचे नाकारले. हे मनुवादी लोकांना सहन न झाल्यामुळे बाटलेले तळे 'पंचगव्य' टाकून तळ्याचे शुद्धीकरण केले. ही अपमानाची भरपाई करण्यासाठी 25 व 26 डिसेंबर 1927 रोजी महाडला पुन्हा सत्याग्रह परिषद घेण्यात आली. यावेळीच स्त्रियांना उद्देशून महत्त्वपूर्ण भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते. त्यासंबंधी चां.भं. खैरमोडे म्हणतात, 'डॉ. आंबेडकरांच्या भाषणांचा सभेस जमलेल्या स्त्री वर्गावर तत्कालीक परिणाम झाल्याचे दिसून आले. सकाळी आपआपल्या गावी परत जाण्यापूर्वी त्यांनी नखशिखांत आपल्या पेहरावात बदल केले.'[6]

या मानवमुक्तीच्या महाड सत्याग्रहासाठी सौ. भिखाबाई नागावकर व कु. हिराबाई नागावकर यांनी द्रव्य सहाय्य दिले असल्याचे दिसून येते. या सत्याग्रहासाठी खेड्या-पाड्यातील अनेक स्त्रियांनी आपला सहभाग उत्स्फूर्तपणे नोंदविला होता. या चळवळीतून अस्पृश्य समाजात जागृती होऊ लागली. महाडचा संघर्ष कायद्यानुसार दहा वर्षे चालला आणि 17 मार्च 1937 रोजी मुंबई हायकोर्टाने चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी भरण्याचा हक्क प्राप्त झाला.

महाड सत्याग्रहाचे दूरगामी परिणाम दिसून आले. अस्पृश्य वर्गात स्वाभिमानाची, स्वावलंबनाची व स्वातंत्र्याची क्रांतीकारी विचारसरणी वाढत गेली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वात झालेल्या या सत्याग्रह चळवळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

4) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नाशिक सत्याग्रह चळवळीत स्त्रियांचे योगदान :

महाडच्या सत्याग्रहानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वात नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी सत्याग्रहींनी 3 मार्च 1930 रोजी सुरूवात केली. सत्याग्रह कमिटीमार्फत काळाराम मंदिराच्या पंचांना नोटीस देण्यात आली. पंच कमिटीने त्यास पाच महिने उत्तर दिले नाही. म्हणूनच सत्याग्रह कमिटीने सत्याग्रह करण्याची घोषणा केली.

नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह 3 मार्च 1930 ला सुरू झाला असला तरी तो पुढे पाच वर्षांपर्यंत सुरू होता. 9 एप्रिलला रामनवमी असल्यामुळे रामाचा रथ स्पृश्य व अस्पृश्यांनी मिळून ओढायचा असे ठरले. मात्र सनातनी लोकांचा वेगळाच डाव होता. त्यानंतर सत्याग्रह परिसरात कलम 144 लागू झाल्यानंतर काही काळ अस्पृश्यांनी सत्याग्रह चळवळ बंद केली. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाऊसाहेब गायकवाडांना म्हणतात की, 'मंदिरात शिरून देवदर्शन घेणे हे आपल्या सत्याग्रहाचे ध्येय नाही. देवळात प्रवेश करणाऱ्या सवर्ण हिंदूना विरोध करून अस्पृश्यांनाही मंदिरात जाण्याचा हक्क आहे हे त्यांना मान्य करावयास भाग पाडणे हे या सत्याग्रहाचे ध्येय आहे.'[7]

2 मार्च 1930 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सभा घेवून आपली मागणी मान्य होईपर्यंत व सत्याग्रह चळवळ यशस्वी होईपर्यंत स्वयंसेवकांमार्फत लढा देण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली. त्यानुसार मंदिराच्या चारही बाजूंना सत्याग्रहींनी मंदिराच्या दारावर धरणे देवून तेथे ते बसून राहिले. विशेष महत्त्वाचे म्हणजे मंदिराच्या प्रत्येक दरवाजावर जवळपास 37 स्त्रियांनी त्यासाठी खंबीरपणे लढा दिला.

अस्पृश्यांनी सनदशिर मार्गाने देवाचे दर्शन घेण्यासाठी सत्याग्रह केला होता. तरिही सनातनी स्पृश्य मंडळींनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेश नाकारला. आतापर्यंत झालेल्या सत्याग्रहामुळे अस्पृश्य समाजामध्ये अतुलनीय जागृती झाली. विशेष महत्त्वाचे असे की, या वेळेपर्यंत झालेल्या सत्याग्रह चळवळीत स्त्रीयांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या सत्याग्रहामुळे, सभा-संमेलनामुळे स्त्रियांमध्येही अतुलनीय जागृती निर्माण झाली. अशिक्षित असलेल्या स्त्रियांनी सत्याग्रह चळवळीमध्ये भाग घेवून त्याप्रति आपली असलेली बांधिलकी जोपासली होती. स्त्रियांमध्येही जागृती निर्माण होऊन समाजाप्रति सद्भावना प्रेरित व्हायला सुरूवात झाली. या अशिक्षित स्त्रियांनी संघटितपणा अनुसरला होता.

अस्पृश्य हेही हिंदू म्हणून गणले जात होते मात्र हिंदूप्रमाणे त्यांना अधिकार दिले जात नसल्यामुळे त्या व्यवस्थेच्या विरोधात सत्याग्रह चळवळींचा मार्ग त्यांना अनुसरावा लागला. नाशिक काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह 1935 पर्यंत सुरू होता. पाच वर्षांच्या संघर्षानंतर सरकारच्या हस्तक्षेपामुळे नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले झाले. या सत्याग्रहानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिंदू धर्माप्रति असलेला आशावाद संपला.

5) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पर्वती मंदिर प्रवेशाच्या चळवळीत स्त्रियांचे योगदान :

महाड सत्याग्रहापासून अस्पृश्यांनी स्फूर्ती घेवून अस्पृश्यांनी अनेक ठिकाणी सत्याग्रह केले. पुण्यातील पर्वती मंदिरात प्रवेश करण्याचा सत्याग्रह दि. 13/10/1929 रोजी सुरू करण्यात आला. पुण्यातील पर्वती मंदिर बाळाजी बाजीरावांनी 180 वर्षांपूर्वी खाजगी खर्चाने बांधले असल्यामुळे ते सार्वजनिक नाही असा पवित्रा स्पृश्य वर्गाने घेतला. मात्र अस्पृश्य लोक ते खाजगी मंदिर असल्याचे मानत नसत. अस्पृश्यांचे असे मत होते की, मंदिराच्या पायऱ्यांचा खर्च सार्वजनिक उत्पन्नातून होत असेल तर ते मंदिर खाजगी कसे?

विश्वस्तांनी मंदिर खाजगी असल्यामुळे सत्याग्रह करू नये अशी भूमिका घेतली असली तरी मंदिरात प्रवेश करण्यासाठी अस्पृश्यांसमोर पर्याय राहिला नाही. 'सत्याग्रहींना अडविण्यासाठी ट्रस्टी मंडळींनी आदल्या दिवसापासूनच पर्वतीवरील सर्व देवालयाचे दरवाजे बंद करून त्यांना कुलूपे लावल्याने त्यात स्पृश्य अथवा अस्पृश्य यापैकी कोणाचाच तेथे प्रवेश होण्यासारखा नव्हता. पर्वतीवरील मुख्य जे श्री महादेवाचे देवालय त्याचे दरवाजे आतून अगदी बंद होते.'[8]

स्पृश्य वर्गांनी रस्त्यावर सर्वत्र गर्दी केली होती. सकाळी नऊ वाजल्यानंतर तीन ते चार हजार अस्पृश्य जनसमुदाय पर्वतीच्या खाली दिसू लागला. सत्याग्रही मंडळींनी पर्वतीचा मार्ग आक्रमण्यास बारा लोकांची तुकडी निवडली. त्यामध्ये चार स्त्रिया समाविष्ट होत्या. सत्याग्रही मंडळी हळूहळू वर येत आहेत याची जाणीव स्पृश्य वर्गाला झाली त्यावेळी 'ही महारे देवळात कशी घुसतात' अशा धमकावणीचे उद्गार कित्येकांच्या तोंडून निघत होते.

सत्याग्रहींना वर जाण्याचा मार्ग बंद केल्याने सर्वत्र अस्पृश्य वर्गाची कोंडी झाली. अनेक स्पृश्य अस्पृश्यांना मारहाण करीत होते.

अस्पृश्य समाजातील अशिक्षित स्त्रियांनी पर्वती सत्याग्रहात पुरूषांचे मनोबल वाढविले. याशिवाय त्या कार्यासाठी आपला सहभाग नोंदवला. त्यामुळे अस्पृश्यांतील पुरूषांचे मनोबल वाढले. पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही संसाराचा, समाजाचा भार आपल्या अंगावर घ्यायला सुरूवात केली.

20 जुलै 1942 रोजी नागपूर येथे आयोजित ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुईमेन्स कॉन्फरन्स भरली होती. त्यावेळी महिलांना उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'दलित वर्गाच्या प्रगतीची व कल्याणाची इच्छा बाळगणाऱ्या माणसाला हा स्त्रियांचा समुदाय पाहून जेवढा आनंद होईल त्यापेक्षा अधिक आनंद दुसऱ्या कोणत्याही प्रसंगी होणार नाही. तुम्ही इतक्या वीस ते पंचवीस हजारांच्या संख्येने येथे उपस्थित रहाल ही गोष्ट दहा वर्षापूर्वी कल्पना करून सुद्धा करण्यासारखी नव्हती. स्त्रियांच्या संघटनेवर फार मोठा विश्वास ठेवणारा मी माणूस आहे. त्यांना जर विश्वासात घेतले तर समाजाची सुधारणा करण्यासाठी त्या काय करू शकतात हे मी जाणतो. सार्वजनिक दोष नाहिसे करण्याची त्यांनी फार मोठी सेवा केलेली आहे. माझ्या स्वतःच्या अनुभवारूनही हे मी सिद्ध करून देईन. दलित वर्गामध्ये काम करण्यास जेव्हापासून मी सुरूवात केली तेव्हापासून पुरूषांबरोबर स्त्रियाही सहभागी झालेल्या आहेत. म्हणूनच आपल्या परिषदा मिश्र परिषदा आहेत, असे तुम्हास दिसून येईल. स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजित असतो.'[9]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुरूषाबरोबरच स्त्रियांनाही अनेक प्रकारच्या मानहानीयुक्त दुःखातून जीवन जगावे लागत आहे याची जाणीव होती. उच्चभ्रू स्त्रियांपासून ते बहुजन वर्गातील स्त्रियापर्यंत असलेल्या सर्वच स्त्रिया शोषित व पिडीत आहेत. याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे सामाजिक कार्याला सुरूवात केल्यानंतर महाड सत्याग्रह चळवळीबरोबरच इतर चळवळीत स्त्रियांचा सहभाग, कार्य व संघटन वाढल्याचे आपल्याला दिसून येते.

सारांश :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म समाजातील सर्वात खालच्या अस्पृश्य जातीत झाल्यामुळे त्या समाजातील सर्वच स्थितींची जाणीव त्यांना होती. समाजातील असमान पद्धती नष्ट करण्यासाठी सामाजिक, धार्मिक चळवळींच्या माध्यमातून न्याय मिळवणे हे त्यांच्या चळवळींचे मुख्य ध्येय होते. त्यासाठी स्त्रियांनीसुद्धा त्यांच्या चळवळीत आपला सक्रिय सहभाग नोंदवून चळवळीला उत्स्फूर्तपणे सहकार्य केले. महाडचे सत्याग्रह हे पहिलेच सत्याग्रह असले तरी जवळपास पाच हजार स्त्रियांनी त्यामध्ये भाग घेवून त्यांनीही चळवळीचा भार स्वतःच्या खांद्यावर घेतल्याचे दिसून येते. पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला दिलेले योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साचेबद्ध संकल्पना व संस्था यांचे चिकित्सक अन्वेषण करून समाज निर्मितीच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्याच लेखणीतून स्त्रियांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण झाली. यासाठी त्यांनी तथागत गौतम बुद्ध व महात्मा फुलेंचा वारसा जपलेला असल्याचे दिसून येते. त्यांच्याच प्रयत्नामुळे भारतीय स्त्रियांना आज स्वातंत्र्य मिळाले आहे आणि म्हणूनच आधुनिक काळातील स्त्रियांचा सर्वांगिण विकास झाल्याचे आपल्याला दिसून येते.

संदर्भसूची :

1) संपा. मंडळ, 'सावित्रीबाई फुले, काल आणि कर्तृत्व', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. 55
2) पण्डित हरगोविंद शास्त्री, 'मनुस्मृती, चौखाम्बा संस्कृत वाराणसी', द्वितीय संस्करण, 1965, पृ. 479
3) राम आहूजा, 'भारतीय समाज', रावत पब्लिकेशन जयपूर एवं नई दिल्ली, सन 2002, पृ. 13
4) मून वसंत (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक', उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती 1990, पृ. 184
5) पवार उर्मिला व मून मिनाक्षी, 'आम्हीही इतिहास घडविला', स्त्री-उवाच, मकरंद सहनिवास, माहिम, मुंबई, ऑक्टोबर 1989, पृ. 03
6) खैरमोडे चां. भ., 'डॉ. भिमराव रामजी आंबेडकर', खंड 3, सुगावा प्रकाशन, 562 सदाशिव पेठ, पुणे, तृतिय आवृत्ती, 2003, पृ. 188
7) कित्ता , पृ. 334
8) मून वसंत (संपा.), पूर्वोक्त, पृ. 339
9) संपा. मंडळ, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे', खंड 18, भाग 2, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. 426

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce,

Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November -2020

SPECIAL ISSUE

INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ.,Dist. BEED.

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

	Mr.Vithal Baburao Gunde	
20	Feminist literature **Sumitra Sangwa**	78
21	Feminist Concerns in Shashi Deshpande's Roots and Shadows **Dr. Sandeep G. Ladkar**	83
22	Women in ramayana – the lanka group **Dr. Vasudha. N**	86
23	Saint Eknath's 'Gondhal' : Yoking Feminism to Spirituality **Dr. U. D. Padamwar**	90
24	Wonen Empowerment _A Need of Time **Dr.Urmila Kshirsagar**	92
25	The Economic Expansion of Pisiculture in Rural Areas: Its Status, Issues and Challenges **K.R.Padma1, K.R.Don2**	95
26	Status of Women in the Vedic Age: A Case Study **Joygopal Singha**	101
27	Female Chief Minister In India **Shashikant Bhalchandra Patil**	103
28	Feminism andIndianTheatre: An Analysis **Dr.Chandrashekhar Bapurao Kanase**	109
29	A Study On Women In Bohra Community For Determining Relationship Between Bmi And Obesity **Mrs.Deepali Sawant, / Dr.Nilesh A. Lohar**	115
30	An analysis of gender equality and women empowerment in india **Budde Santhosha Kumar / Dr. Shilpa Bhimrao Gaonkar**	119
31	Feminist literature and Human dignity **Avishkar Kamble**	123
32	Gender inequality and women's participation in politics **Shinde V. M.**	125
33	Women and political representation in india: a gandhian view towards more equitable political order **Soumalya Ghosh**	132
34	Journey Of Women Entrepreneurs In Economic Development **Dr Mamata Jagannathji Rathi**	136
35	Laws and its implications about Women **Dr. Manesh Ramdas Khandagale**	148
36	Women as reflected in the inscriptions of the Chalukyas, Rashtrakutas, later Chalukyas, Shilaharas and Yadavas **Dr. Manjiri Bhalerao**	152
✓ 37	Dnyanjyoti Savitribai Phule As An Educator: A Review **Mr.Manohar Ramulu Kondagurle**	157
38	Women and the world of work at global level : A Study **Mr. P BalaMuralidhar**	161
39	Government Targets and Strategies for Rural Population Development in India : A Literature Review **Dr. Khade Sominath Sarangdhar**	167
40	An analysis of issues and challenges of women empowerment in Karnataka **Kiran Sudi / Dr. Siddhagangamma**	171

Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 260 (CCLX)
ISSN : 2278-9308
November, 2020

DNYANJYOTI SAVITRIBAI PHULE AS AN EDUCATOR: A REVIEW

Mr.Manohar Ramulu Kondagurle
Librarian, Shri. M. H. Khapane College of Arts and Commerce, Pachal
Tal. Rajapur, Dist. Ratnagiri – 416704
Mobile No. 9422590940. E-mail:- mkondagurle007@gmail.com

Abstract: -

The study is conducted to review the educational work of SavitribaiJyotiraoPhule as an Educator. She was prominent Indian reformer, Educationalist and poet. She played an instrumental role for women education and empowerment during the 19th Century. SavitribaiPhule is credited to establish first girl's school with help of JyotiraoPhule in Bhidewada Pune. Struggle of her life deserves to be appreciated in wider spectrum and need to be known to all among Indians.

Keywords: -SavitribaiPhule, Phule, First Women Teacher, Indian Educator, Women Educaton, Education.

Introduction:

When the concept of women education comes for discussion the names come as DnyanjotiSavitribaiPhule, Mahatma JyotibaPhule, Dr.BabasahebAmbedkar, MaharshiKarve etc. In this paper we review the contribution of DnyanjyotiSavitribaiPhule as an Educator, Educationist, and first women teacher. Hence DnyanjyotiSavitribaiPhulegot importance to contribute in education by adding glory to the mission of the modern social scenario. She inspired to downtrodden people to acquire education and thereby played crucial role in their emancipation and conducted many activities in various social field.

However many felt that the mainstream society was neglected to her contribution in society. But British government realised that the contribution of her in the education at the very beginning and honoured her. But after independent of India, her work was neglected and not honoured to her by social reformers, feminist, educationists, and human right activists. Life and struggle of her deserves to be appreciated by wider spectrum and need to be known among all the Indians. (Patel, 2017)

DnyanjotiSavitribaiPhule also known as Krantijyoti. Hence she brought revolution with the support of her husband JyotibaPhule contributed for establishing golden principle of humanity such as Equality, Liberty, Fraternity and Justice. Majority of Indian are not completely aware of the SavitribaiPhule's Greatness. She dared pursue the noble profession of teaching in the Dark Age. The time when she started women education considered as a punishable crime by Upper cast people in India. She had spoken against unpardonable boundaries imposed on women in Indian society and she also ignited millions of lives for that today's women or everyone must be grateful to her. I always question, the teacher day in India why does not celebrate on the birth anniversary of SavitribaiPhule. This is the lady who started first women school in India for downtrodden and was the first women teacher of India also. (Chimurkar, 2015)

Early Life:

SavitribaiPhule had born on 3rd January, 1831 in the Satara Districts' Naigaon Village of Maharashtra. KhandojiNevesePatil and Laxmi 'selder daughter wasSavitri. They belongs from Mali Community. At the age of Ninth, Savitribai married with JyotiraoPhule, he was thirteen year old. They had no child of their own so they adopted to Yashwantrao as son. Yashwantrao was born from Brahmin widow.

Savitribai was not been educated at the time of marriage. At the start Jyotirao also wasn't educated due to his caste but eventually was ready to enroll in Scottish missionary school and he studied grade seven. As per the record of government Jyotirao was only the responsible for Savitribai's education at home. She was completed two training programmes, first was at American missionary Institute, Cynthia Farrar, in Ahmednagar and second was at Normal School in Pune. The fact is that SavitribaiPhule was the first Indian women teacher and Headmistress. (Katke S. M., 2019), (Chimurkar, 2015)

Her Work:

Both SavitribaiPhule and JyotiraoPhulewas recognised that the central planks by which women and downtrodden classes could become empowered. They also hoped that to stand on an equal footing with the rest of the society. According to HariNarkhe, Mahatma JyotiraoPhule and SavitribaiPhule stand out as an extraordinary couple in the the social and educational history of India. Both were engaged in the passionate to build a movement for equality between men and women and for social justice. In 1854 to 1855 both they started the Literacy Mission in India. HariNarake said that they established SatyashodhakSamaj (Society for Seeking) for initiating the practice of Satyashodhak marriage with no dowry. SavitribaiPhule played important role in women's education and she also considered to be one of the Crusader of Gender Justice. She was published the paper on women in modern India and she was able to develop a voice and agency of her own at the time when women were suppressed and lived a subhuman existence.

In the Marathi Poem, she was written values like humanism, equality, liberty, brotherhood, rationalism and the importance of education in others. The poem entitled was *"Go Get Education"*. She wrote as following:

"Be Self-reliant, be industrious
Work, gather wisdom and riches,
All get lost without knowledge
We become animal without wisdom,
Sit idle no more, go, get education
End Misery of the oppressed and forsaken,
You've got golden chance to learn
So learn and break the chains of caste.
Throw away the Brahman's scriptures fast."

SavitribaiPhule Poem reflect that the anger of the modern Indian women who wanted to be treated as a human being and not just object of male lust. (Pande, 2015) (First Lady Teacher of India : Savitribai Phule, 2011)

Thinker Braj Raj Mani wrote"SavitribaiPhule struggled and suffered with the revolutionary husband JyotiraoPhule in an equal measure but remained neglected due to cast and gender difference. Apart from her identity as Jyotirao's wife she isn't known more in academia. She was first women teacher of modern India, a radical exponent of mass and

Scanned with CamScanner

femaleeducation, women's champion of liberation, a engaged poetry's pioneer, mass leader with courageous who who took on the forces of castes and patriarchy certainly had her independent identity and contribution. It is indeed a measure of ruthless of elite controlled knowledge production that a figure as importantasSavitribaiPhule fails to find mention in the history of modern India, her life and struggle need to be appreciated by wider spectrum and made known to non-Marathi people as well." (First Lady Teacher of India : Savitribai Phule, 2011) (Savaih, 2017)

Role in Women Education and Empowerment:

After completing the study of SavitribaiPhule they opened first women school in Bhidewada at Pune on 1st January, 1848 and she became very youngest women and only 17 year old teacher of modern India. Dnyanodayapublished an interview of Jyotiba, he stated "It did occur to me that the improvement that comes about in a child due to the mother is very important and good. So those that are concerned with the happiness and welfare of this country should definitely concentrate to the condition of girls and make every effort to impart knowledge to them if they need the country to progress. With this thought I started school for girls first." Savitribai started her school as a headmistress, It gives consideration to SavitriabaiPhule is well and first women teacher and her stepping across the people to teach the beginning of public life of the modern Indian women. At the beginning of the school, nine girls enrolled from different castes. (Patel, 2017) (Katke S. M., 2019)

Educational Thoughts of SavitribaiPhule:

DnyanjyotiSavitribaiPhule was a Philosopher at her times. She implemented many novel methods for spreading education. She prepared policies to prevent children dropping out of school. She also conducted parent-teacher meeting for involving the parents in the educational process that was the reason parents understand the importance of education and support to their children. The thought or massage of SavitribaiPhule was to "work hard, study well and do well". (Mani and Sardar, 1988)

Death:

Savitribai opened a clinic with her adopted son Yashwant for giving treatment to affected people by Bubonic Plague. Savitribai died a heroic death. She tried to save the son of PandurangBabajiGaekwad who contracted by Plague in settlement of Mahar in outside of Mundhwa. SavitribaiPhule rushed to his side and carried him on her back to hospital. Due to the reason, SavitribaiPhule infected by Plague and died at Nine Pm on 10th March 1897

Conclusion:

DnyanjyotiSavitribaiPhule had spent her whole life for voicing protest against caste and gender discrimination. She said that everyone's right is education. She also condemned killing of caste based which we seen today. Savitribai always said about how education is important. She wanted that every man and women in the India must educate and liberal. She knew that education is only the way to achieve independence. The work what she did in the field of education, social justice , eradication of caste and exposing the exploitative behaviour of the priestly class illuminated not only the past but also continues to illuminate the present.

References:-

Chimurkar, R. (2015, 12 11). *Savitribai Phule :The Mother of Modern Education*. Retrieved from Countercurrents.org: https://www.countercurrents.org/chimurkar111215.htm

Express, I. (2020, 01 03). *Explained Savitribai Phule's Impact on Women Education*. Retrieved from https://indianexpress.com/article/explained/explained-savitribai-phules-impact-on-womens-education-in-india-6198439/

First Lady Teacher of India : Savitribai Phule. (2011, Sept). Retrieved from Dr. B. R. Ambedkar's Caravan: https://drambedkarbooks.com/2011/09/03/first-lady-teacher-of-india-savitribai-phule/

https://www.mkgandhi.org/articles/women1.html. (n.d.). Retrieved November 15, 2020, from www.mkgandhi.org: https://www.mkgandhi.org/articles/women1.html

https://www.sippingthoughts.com/gandhiji-his-contribution-in-equality-for-women-in-india/. (2020, October 10). Retrieved November 15, 2020, from www.sippingthoughts.com: https://www.sippingthoughts.com/gandhiji-his-contribution-in-equality-for-women-in-india/

JYOTIBA PHULE AND SAVITRIBAI PHULE. (n.d.). Retrieved from http://epgp.inflibnet.ac.in/epgpdata/uploads/epgp_content/S000033SO/P000300/M015924/ET/146475552224ET.pdf

Katke, S. M. (2019). Savitribai Phule Contribution Towards Indian Socia Elements: A Study. *A JOurnal of Emerging Technologies and Innovative Research* , *6* (11), 25-32.

Katke, S. M. (2019). Savitribai Phule Contribution Towards Indian Social Elements _ A Study. *Journal of Emerging Technology and Innovative Research* , *6* (11), 25-32.

M.K.Gandhi. (n.d.). Collected Works of Mahatma Gandhi. *XXI* , 105.

M.K.Gandhi. (1946, April 7). Harijan.

Pande, R. (2015). Crusaders of female education in Colonial India: A Case study of Savitribai Phule. *International Journal od Innovative Social Science and Humanity Research* , 2 (1), 1.6.

Patel, A. (2017). Contribution of Savitribai Jyotirao Phule in Education Field. *Towards and Excellence an Indexed referred and Peer Reviewed Journal of Higher Education* , *9* (2), 39-46.

Savaih, T. (2017, 01 03). *Great Bahujan Revolutionary Women Krantijyoti Savitribai Phule*. Retrieved from https://countercurrents.org/2017/01/great-bahujan-revolutionary-women-krantijyoti-savitribai-phule/

Savitribai Phule. (2020, 11 12). Retrieved from https://en.wikipedia.org/wiki/Savitribai_Phule

Savitribai Phule: Teacher Activist and Mother of Indian Feminism. (2019, 12 11). Retrieved from https://www.shethepeople.tv/sepia-stories/savitribai-phule-feminism-teacher-activist-india/

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & CC CHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Di agiri

'B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

Impact Factor – 7.675
ISSN – 2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

JUNE - 2020
ISSUE No – CCXXXV (235)

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr. R.S.Satbhai
Executive Editor
Local Secretary
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya Ashti

Guest Editor

Dr. S.R.Nimbore
Principal
Adv.B.D.Hambarde
Mahavidyalaya Ashti

Dr. Satish Kadam
President,AMIP&
Head,Dept of History
YCM,Tuljapur

Dr. Shivraj Bokade
Secretary,AMIP&
Head,Dept of History
YC,Nanded

Aadhar International Publication

© All rights reserved with the authors & publisher

214	राज्यपालांचा हस्तक्षेप आणि संसदीय लोकशाहीस धोका प्रा डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल	954
215	महात्मा ज्योतिबा फुले यांच्या काळातील सामाजिक परीस्थीती प्रा. सुरेश देवशेट्टे	958
216	छ.संभाजी महाराजांच्या कोळातील वाकड येथील अप्रकाशित शिलालेख . काळ – इ. सन. १६८१ प्रणव विजयकुमार पाटील	961
217	मानव अधिकाराचे आंतरराष्ट्रीयकरण प्रा.श्रीरंग शामराव लोखंडे.	965
218	राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांच्या उद्धारासाठी केलेले शैक्षणिक कार्य प्रा. प्रमोद एस. मेश्राम	968
219	शिक्षणाचे तत्वज्ञान यावर स्वामी विवेकानंद यांचा दृष्टिक्षेप डॉ. विनायक उद्धवराव पाटील	972
220	प्राचीन भारतीय इतिहास का वैज्ञानिक विश्लेषण रू तथ्य तर्क आधारित सूक्ष्माग्राही विवेचन डॉ . शुचि	977
221	शिवराज्याभिषेक : सार्वभौमत्वाचा सोहळा डॉ. संजय तुकाराम वाघमारे	982
222	१९७५ ची आणीबाणी आणि वृत्तपत्रे प्रा.धनंजय राधाकिशन जवळेकर	988
223	डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता प्रा.सुमन लक्ष्मणराव केंद्रे	991
224	History Of Old Indian Currency Dr. Mangesh Shirsath	993
225	Gangavathi region – through the ages: Economic condition Bajrang bali	999
226	Relevance Of Mahatma Gandhi's Philosophy In Modern Context Dr. Vandana M. Mahure	1002
227	Cultural Effect in Indian History Dr. Priyanka Kumari	1005

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांच्या उद्धारासाठी केलेले शैक्षणिक कार्य

प्रा. प्रमोद एस. मेश्राम
सहयोगी प्राध्यापक, श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

प्रस्तावना:

महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने पुरोगामी बनविण्यासाठी अनेकांनी महत्वपूर्ण योगदान दिले. त्यामध्ये महत्वपूर्ण मानले जातात ते क्रांतिबा जोतिवा फुले, छ.शाहू महाराज, वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, इत्यादी या सर्वांनी मिळून बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी महत्वपूर्ण कार्य केले. बहुजन समाजाचे दारिद्र्य नष्ट करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा तरणोपाय नाही. जोपर्यंत त्यांच्यात शिक्षणाची कास निर्माण होणार नाही तोपर्यंत त्यांची प्रगती अशक्य आहे हा कळीचा प्रश्न महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारकांच्या पुढे आवासून उभा होता. त्या प्रत्येकांनी बहुजनांच्या विकासासाठी कृतीप्रविण कार्य केले. शिक्षणाशिवाय समाजाची कसलीही प्रगती होऊ शकत नाही. त्यामुळे शिक्षणाचा आणि समाजाच्या विकासाचा घनिष्ठ संबंध असल्याचे त्यांनी जानले होते आणि त्याच हेतूने त्यांनी कार्य केले.

महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या विकासासाठी खऱ्या अर्थाने महात्मा जोतिबा फुल्यांचे शैक्षणिक विचार राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कृतिप्रवीण केले. त्यांनी आपल्या २८ वर्षाच्या प्रशासकीय कारकीर्दीत बहुजन समाजाच्या विकासासाठी वेगवेगळी कामे केलीत. ज्यामध्ये प्रामुख्याने शिक्षण, स्त्रीमुक्ती, अस्पृश्यता निवारण, सामाजिक रूढी, ब्राम्हणोत्तर चळवळ इत्यादी कार्यातून बहुजन समाजाच्या प्रगतीचे खरे कार्य केले. म्हणूनच महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने पुरोगामी बनविण्याचे कार्य त्यांच्या हातून झालेले आहे. कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय सभेने छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून १९१९ साली राजर्षी ही पदवी वहाल केली. त्यांच्या वेगवेगळ्या कार्यातून बहुजन समाजाची प्रगती होत गेली. म्हणूनच बहुजन समाज बहुजनांचा उद्धारक, रयतेचा राजा अशा वेगवेगळ्या उपमांनी त्यांचा गौरव करीत आहेत.

१) बहुजनांची समाजातील स्थिती:

वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेमुळे समाज दुंभगला गेला. त्यामुळे प्रत्येक गावात सवर्ण व अवर्ण असे दोन वर्ग राहत असत. या दोन्ही वर्गामध्ये आचारविचार, राहणीमान, स्पृश्य-अस्पृश्य, जातिव्यवस्था, श्रेष्ठत्व कनिष्टत्वाच्या भावना विकसीत झाल्या होत्या. समाजातील प्रत्येक वर्गाचे कार्य ठरलेले होते. ब्राम्हणांचे कार्य जरी वेगवेगळे असले तरी सर्व व्यवस्थेवर त्यांचेच अधिक वर्चस्व होते. या बाबतीत अत्री म्हणतात, 'क्षत्र ब्राम्हण वह है जो युद्ध करके जीविका चलाता है, वैश्य ब्राम्हण वह है जो कृषी, पशुपालन एवं व्यापार करके जिविका अर्जित करता है, शुद्र ब्राम्हण वह है जो लाख, नमक, दुध, घी, शहद, मांस एवं विशेष प्रकार के रंग-रोगनों का विक्रय करता है और निषाद ब्राम्हण वह है जो चारों एवं दस्युयों के व्यवसाय को अपनाता है। फिर भी वे अपनी सामाजिक प्रतिष्ठा एवं विशेषाधिकारों से वंचित नही हुए।'(१) ब्राम्हणांचे व्यवसाय विभिन्न जरी असले तरी त्यांची समाजातील स्थिती उच्च होती.

समाजातील उच्चवर्णियांनाच फक्त शिक्षणाचा अधिकार होता. शिक्षणाची दारे समाजातील इतर खालच्या वर्गासाठी बंद होती. त्यांची इच्छा जरी असली तरी शिक्षणापासून वंचित राहावे लागत असे. स्वातंत्र्यपूर्व कालावधीपर्यंत ही व्यवस्था समाजात सुरू होती. १९व्या शतकात सुरूवातीला ब्रिटिश सरकारच्या प्रॉटेस्टंट ख्रिश्चन

मिशनऱ्यांनी याकडे आपले लक्ष वेधून समाज उपयोगी कार्यासाठी सुरूवात केली. याच भूमिकेतून १९व्या शतकाच्या उत्तरार्धात बाबा पद्मनजी, विष्णूबुवा ब्रम्हचारी, भिकोबा दादा चव्हाण, रामकृष्ण भांडारकर, कृष्णराव केळूसकर, सीताराम केशव बोले इत्यादींनी बहुजनांच्या उन्नतीसाठी कार्य केले. याच काळात महात्मा जोतिबा फुले व शाहू महाराजांचा अपवाद वगळता उच्च समाजातील नेत्यांचा भर फक्त स्पृश्यांच्या मतपरिवर्तनावर होता.

महात्मा जोतिबा फुले बहुजन समाजातील लोकांनी शिक्षण घ्यावे यासाठी अग्रेसर होते. म्हणूनच ते म्हणतात,

'विद्येविना मति गेली, गतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.'(२)

समाजातील बहुजनांना शिक्षणाची दारे बंद असल्यामुळे सर्वच दृष्टिने त्यांचा विकास झाला नाही. महात्मा फुलेंचे कार्य प्रत्यक्ष कार्यात उतरविण्याचे काम छत्रपती शाहू महाराजांनी केले.

२) छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

भारताच्या इतिहासात फारच कमी लोकांनी बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी आपले आयुष्य खर्ची घातले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज जनसामान्यांचे प्रतिनिधित्व करणारे राजे होते. त्यांच्या कार्याबद्दल यशवंतराव चव्हाण म्हणतात, 'कसब, गुण, कर्तुत्व या विषयी शाहू महाराजांना अतिशय आस्था होती आणि समाजातील रंजल्या, गांजल्याबद्दल कणव होती. त्यांचे शरीर जसे अवाढव्य होते तसे त्यांचे मनही होते. यामुळे समाजातील गुणी, कर्तृत्ववान लोकांना महाराजांचा आधार होता. तसाच आधार खेड्यातील लहानशा माणसालाही होता. सत्ताधारी हा असा असावा लागतो. लोहचुंबकाकडे लोखंडाचे कण धाव घेतात त्याप्रमाणे लोक त्यांच्याकडे धाव घेत. राजर्षी शाहू महाराज हे केवळ वारसा हक्काने राजे नव्हते तर ते लोकांचे राजे होते.'(३)

कोल्हापूरच्या संस्थानात मराठा राज्य असले तरी वर्चस्व त्यावर ब्राम्हणांचे होते. अशा आव्हानास्पद परिस्थितीत बहुजन समाजाच्या हितासाठी शाहू महाराजांनी अनेक कठोर निर्णय घेऊन संस्थानातील व्यवस्थेचा चेहरामोहराच बदलून टाकला होता. त्यातील सर्वच योजना विकासाच्या होत्या. बहुजन समाजाच्या प्रगतीच्या होत्या. तर काही योजना अस्पृश्य बहिष्कृत आणि आदिवासी समाजाच्या विकासाच्या होत्या. बहुजना समाजासाठी शिक्षण संस्था निर्माण केल्या. वसतिगृहांची उभारणी केली. मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची सुरूवात देशात पहिल्यांदा शाहू महाराजांनी केली. त्यांनी मागासवर्गीयांसाठी शासकीय सेवेत ५० टक्के आरक्षणाची सुरूवात केली. व्यवस्थेच्या विरोधात जाऊन जनसामान्य लोकांना धिरोदात्त बळ प्रदान केले. म्हणूनच आजही त्यांच्या कार्याचा गौरव अव्याहतपणे सुरू असल्याचे आपणास दिसून येते.

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाच्या अभावी बहुजन समाजामधील दुरावस्था पाहिली. त्यांनी शिक्षणाचे महत्व ओळखले होते. त्यामुळे २७ डिसेंबर १९१७ रोजी खामगाव येथे केलेल्या भाषणात म्हणतात, 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय होणार आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम, मुसद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. याबाबतीत आमचा गतकाल म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्यांच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी, त्या-त्या वेळच्या धेय्याला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचिले आणि कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले.(४) शाहू महाराजांच्या उपरोक्त विधानांवरून त्यांची बहुजनांच्या शिक्षणाच्या विषयीची असलेली तळमळ आणि कळकळ दिसून येते.

१९८१ च्या खानेसुमारीनुसार कोल्हापूर संस्थानातील बहुजन समाजाची परिस्थिती शिक्षणाच्या बाबातीत भयानक स्वरूपाची होती. साक्षरतेचे प्रमाण त्यांच्यात अत्यल्प होते. याची जाणीव त्यांना आलेली होती म्हणून त्यांनी शिक्षणाचे कार्य हाती घेण्यापूर्वी अनेक समाजसुधारकांशी विचारविनिमय केला होता. त्यानुसार त्यांनी शिक्षणात उपाययोजना घडवून आणलेल्या होत्या. त्यानुसार त्यानी शिक्षणाचा प्रसार केला व योजनांची कार्यवाही केली ती पुढीलप्रमाणे-

- 'शिक्षण सुधारणा समितीची स्थापना केली.
- प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांची संख्या वाढविली .
- बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या ,पारितोषिके दिली .
- शाळेतील अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यात आली .
- अस्पृश्यांच्या मुलांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद केल्या .
- हुशार विद्यार्थ्यांना परदेशी पाठविण्यात आले .
- प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले .
- मुलींना शैक्षणिक फी माफ केली.')५(

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले ही त्यांच्या शैक्षणिक कार्यातील लक्षणीय कामगिरी होय. समाजात शिक्षणाविना कोणतीही व्यक्ती वंचित राहू नये, ही कळवळा त्यामागे होती. वर्षभरात त्यांनी संस्थानात ९६ नव्या शाळा सुरू केल्या. त्या काळात शिक्षणावर एक लाख रूपये ते खर्च करीत होते. सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठी डायरेक्टर, एज्युकेशनल डायरेक्टर, मामलेदार, पाटील या सर्वांना सामील करून घेतले. त्यामुळे १९२१-२२ सालापर्यंत संस्थानातील शाळांची संख्या ४२० इतकी झाली होती. त्यामध्ये २२,००७ इतके विद्यार्थी शिक्षण घेत होते.

३) अस्पृश्यांसाठी शैक्षणिक कार्य-

शाहू महाराजांच्या काळात कमालीची अस्पृश्यता समाजात अस्तित्वात होती. सर्वत्र स्पृश्य व अस्पृश्यांच्या शाळा वेगवेगळया होत्या. अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासाठी प्रबोधन कार्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी जागृती निर्माण केली. यासाठी त्यांनी अस्पृश्यांमध्ये शैक्षणिक जागृती निर्माण केली. त्यामुळे १९१२ मध्ये अस्पृश्यांमध्ये कमालीची जागृती निर्माण होऊन २७ शाळा त्यांच्यासाठी निर्माण केल्या. अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी काही खास आदेश काढले. १९०६ साली भास्करराव जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्थापन केलेल्या अस्पृश्यांच्या वसतीगृहाच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध करून दिली. २४ नोव्हेंबर १९११ रोजी अस्पृश्यांसाठी अत्यंत महत्वाचा आदेश काढला होता. त्यानुसार सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. याव्यतिरिक्त अस्पृश्य वर्गाची दैनावस्था लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी पाट्या, पेन्सिली व पुस्तके मोफत देण्याची व्यवस्था केली.

२८ सप्टेंबर १९१९ रोजी महत्वाचा आदेश काढून संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्या. तो आदेश असा होता की, 'करवीर इलाख्यात, अस्पृश्य मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात. त्या सर्व शाळा येत्या दसऱ्यापासून बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळांतून, इतर लोकांच्या मुलांप्रमाणे दाखल करून घेण्यात यावे. सरकारी शाळेतून, शिवाशिव पाळायची नसल्याने, सर्व जातींच्या व धर्माच्या मुलांस एकत्रित बसविण्यात यावे.'(६) समाजात अस्तित्वात असलेली जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी त्यांचे या प्रकारचे योगदान अत्यंत महत्वाचे मानले जाते.

४) वसतिगृह चळवळीचे निर्मिते

खेड्यापाड्यातील बहुजन विद्यार्थी शिक्षणापासून परावृत्त होऊ नये यासाठी वसतिगृहांची निर्मिती केली. १९०८ पर्यंत करवीर संस्थानात त्यांच्यात पुढाकाराने सर्व जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी वीस वसतिगृहे स्थापन करण्यात आली. समाजात असलेली जातिव्यवस्था पराकोटिची असल्यामुळे त्यांनी जातवार वसतिगृहांची स्थापना केली. मुले शिकली म्हणजे हळूहळू जातीचे राजकारण नष्ट होईल अशी त्यांना अपेक्षा होती. याचे प्रत्यंतर कर्मवरी भाऊराव पाटील यांच्या उदाहरणावरून दिसून येते. संस्थानातील वसतिगृहात राहून महाराजांच्या प्रेरणेतून त्यांनी 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना केली.

राजर्षि शाहू महाराजांचे कार्य समाजासाठी चिरकाल प्रेरणा देणारे आहे, यात दुमत नाही. त्यांच्या कार्याचे गौरव करताना वि. भि. कोलते म्हणतात, 'छत्रपती राजर्षी शाहूंनी महाराष्ट्रातील बहुजन समाजाची मानसिक गुलामगिरी नष्ट केली. जन्मसिद्ध वर्णविषमतेची गुलामगिरी नष्ट केली. मनुष्याला मनुष्याप्रमाण वागविले पाहिजे अशी मानवतावादाची शिकवणूक दिली.'(७) त्यामुळे त्यांच्या कार्याचे गुणगाण आपल्यासमोर मानवतावदी, समाजउध्दारक राजा म्हणून उभी राहते.

सारांश-

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कृतीतून शैक्षणिक कार्याला सुरवात केली. त्यांच्या या कार्यापासून पुरोगामी विचारवंतांनी बहुजनांच्या उद्धारासाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी शिक्षण संस्थांची निर्मिती केली. त्यामुळे परिवर्तनाच्या चळवळीला अधिक गती मिळाली.. महाराष्ट्रात प्रथमच अस्पृश्य वर्गाला/बहुजनांना मानाचे स्थान प्राप्त झाले. आधुनिक महाराष्ट्रातील बहुजनांना नवसंजिवनी मिळाली: शिक्षणाला प्रथम स्थान दिल्यामुळे शतकानुशतके सर्व प्रकारच्या विकासापासून वंचित असलेल्या समाजाने ज्ञानसत्ता मिळविली. प्रशासकीय व्यवस्थेत त्यांनी २८ वर्षे समाजाची सेवा केली.

महात्मा फुलेंची बहुजन समाजात शैक्षणिक क्रांती झाली पाहिजे ही तळमळ राजर्षी शाहू महाराजांनी कार्यान्वीत केली. राजर्षी शाहू महाराजांचे स्वप्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गतिमान केले. त्यांनी भारतीय राज्यघटनेतून बहुजन समाजाच्या उद्धारासाठी वेगवेगळे कायदे अंमलात आणले. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे महाराष्ट्रावर चांगले परिणाम दिसून येतात. कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजासाठी वेगवेगळ्या संस्था स्थापन करून बहुजन समाजाच्या उद्धारासाठी कार्य केल्याचे दिसून येते.

संदर्भ-

१) अग्निहोत्री वी .के., 'भारतीय इतिहास', एलॉइड पब्लिशर्स लिमिटेड ;नई दिल्ली ,षष्ठम संस्करण २००१ ,पृ . ०७
२) फडके य .दि) .संपा(., 'महात्मा फुले समग्र वाड़मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ,मुंबई , पाचवी आवृत्ती १९९१ ,पृ .२५३
३) संगवे विलास ,'राजर्षी छत्रपती शाहू महाराज ,कार्य व प्रभाव' ,एक्स्प्रेस पब्लिशिंग हांऊस ,कोल्हापूर , २००१ ,पृ .३०
४) जाधव रमेश ,'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ' ,राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती ,महाराष्ट्र शासन ,मुंबई २०१६ ,पृ .८३८
५) संगवे विलास ,पूर्वोक्त ,पृ .३२
६) पवार जयसिंगराव)संपा ,(.'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर ,व्दितियावृत्ती २००७ ,पृ .६१

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANO… KHAPANE
COLLEGE O… PACHAL
…aypat… Ratnagiri

Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648
Impact Factor - 7.139
Indexed (SJIF)

12 April 2021
Special Issue- 40 Vol. I

Thoughts of Dr. B.R. Ambedkar


Life Should be
Great
rather than Long
B.R.Ambedkar

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal Dr. Kishan Pawar

39. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धर्माविषयीचे विचार 126
डॉ. संजय बाबुराव खाडप
40. सामाजिक न्यायाला न्याय देणारा युगकर्ता: डॉ. आंबेडकर 128
डॉ. श्वेता बाबूलाल चौधारे
41. "डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार" 130
डॉ.सुनंदा एकनाथराव आहेर
42. जलतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर 132
प्रा. डॉ. बुवा सूर्यभान रमेश
43. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदू कोड बील आणि महिला सक्षमीकरण 134
डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील
44. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार 137
डॉ.सुवर्णा उमाकांत टेंकाळे
45. डॉ. वावासाहेव आंवेडकर यांचे हिंदु कोड विल 139
स्वाती चेके
46. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारीता 142
प्रा. डॉ. विकास शंकर पाटील
47. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धार्मिकविचार आणि धोरणात्मक निर्णय. 145
प्रा.विलास सोमा पवार
48. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार 147
अमोल माणिकाराव घुगे
49. डॉ.वावासाहेव आंवेडकरांचे राजकिय विचार 149
प्रा.डॉ.लोखंडे बी.बी.
50. डॉ.भीमराव रामजी आम्बेडकरकीपत्रकारिता 152
डॉ.विवेकानंद लक्ष्मण चव्हाण
51. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार 156
प्रा. डॉ. दत्ता जाधव
52. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार 158
उज्वला मोहनराव शिंदे
53. Critical Analysis Of Nep 2020 With The Views Of Dr. Ambedkar On Hei 161
Dr. Nilesh A. Lohar

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 40 , Vol. 1
April 2021
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारीता

प्रा. डॉ. विकास शंकर पाटील
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय. पाचल , ता. राजापूर. जि. रत्नागिरी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता निवारणाचे मोठे कार्य केले. दलित समाजाला आत्मभान व सन्मान देण्याचे कार्य त्यांनी केली. बाबासाहेबांनी घटनेची निर्मिती केली. स्त्रीयांना सन्मान मिळावा यासाठी प्रयत्न केले. कामगारांसाठी अनेक कायदे व योजना आणल्या. त्यांनी अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांनी केलेल्या विविध क्षेत्रातील कामगिरीची नंतर विचारवंतांनी, अभ्यासकांनी व अनुयायांनी दखल घेतली व पुस्तकरूपाने त्यांचे कार्य जनतेसमोर आले. असे असले तरी बाबासाहेबांनी वृत्तपत्रीय क्षेत्रात केलेली कामगिरी दुर्लक्षीत राहिली. जांभेकर, टिळक, आगरकर, परांजपे, केळकर इत्यादी नावे मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रात नेहमी घेतली जातात पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा साधा उल्लेखही होताना दिसत नाही. ते अव्वल दर्जाचे पत्रकार होते. त्यांच्या मराठी लेखनाला वैचारिक गुणवत्तेबरोबरच वाड्मयीन गुणवत्ताही आहे. बाबासाहेबांनी प्रचंड ताकदीने वृत्तपत्रीय लेखन केलेले असले तरी त्यांच्या पत्रकारीतेची प्रस्थापित वर्गाकडून दखल घेतलेली दिसत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित वृत्तपत्रीय लेखन-

वृत्तपत्र हे आधुनिक विकासाचे आणि लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम होय. इंग्रजी राजवटीमुळेच वृत्तपत्र आपल्या देशात सुरू झाली. एकोणिसाव्या शतकातील मराठी वृत्तपत्रे ही बहुतांशी ब्राम्हण वर्गाच्या मालकीची होती. महात्मा जोतीराव फुले यांच्या विचार व चळवळीतून ब्राम्हणेत्तर पत्रांचा जन्म झाल्याचे दिसते. १ जानेवारी १८७७ साली कृष्णराव भालेकर यांनी सुरू केलेले 'दिनबंधू' हे ब्राम्हणेत्तरांचे पहिले पत्र होय. विपरीत आर्थिक परिस्थितीतून वाटचाल करतानाही या पत्राने ब्राम्हणेत्तरांच्या चळवळीला बळ देण्याचा प्रयत्न केला. पुढे १९१० मध्ये मुकंदूराव पाटील यांच्या संपादकत्वाखाली पुनर्जीवित झालेल्या 'दीनमित्र'ने बहुजन समाजाचा उध्दार हे लक्ष आपल्या समोर ठेवले. याबरोबरच पूर्वी ब्राम्हणेत्तरांची तीन महत्वाची व उल्लेखनीय पत्रे म्हणजे वालचंद कोठारी यांनी १९ जुलै १९१७ मध्ये सुरू केलेले जागरूक, भगवंतराव पालेकर यांचे २५ ऑक्टोबर १९१७ चे जागृती व श्रीपतराव शिंदे यांचे १ डिसेंबर १९१९ चे 'विजयी मराठा' ही होत. या तिन्ही वृत्तपत्रांनी सत्यशोधक समाजाच्या तत्वांचा पुरस्कार केला.

पहिले दलित पत्रकार गोपाळाबाबा वलंगकर-

गोपाळा बाबा वलंगकर हे अस्पृश्यातील पहिले समाजसुधारक आणि पहिले पत्रकार होत. अनार्यदोष परिहारक मंडळाच्या कार्यावर उमटवणाऱ्या अनेक विरोधी प्रतिक्रियांना त्यांनी 'दीनबंधू'च्या अंकातून उत्तर दिले आहे. गोपाळबाबांनी सार्वजनिक जीवनातील अडीअडचणी संबंधी वृत्तपत्रात लेखन केले व त्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. त्यांचे वृत्तपत्रीय लेखन म्हणजे दलित मनाचा आरसा होय. त्यांनी कधी प्रखरपणे, कधी सामंजस्याने तर कधी विनंतीअर्जाव्दारे आपले विचार वृत्तपत्रातून मांडले.

दलितांचे पहिले संपादक शिवराम जानबा कांबळे-

दलितांचे पहिले पत्रकार म्हणून जसे गापाळबाबा वलंगकर यांना मानले जाते त्याचप्रमाणे दलितांचे पहिले संपादक म्हणून शिवराम जानबा कांबळे यांना मानावे लागते. त्यांचे १ जुलै १९०८ साली जन्माला आलेले सोमवंशीय मित्र ह्या पत्रास दलितांचे पहिले पत्र म्हणून आजतरी मानावे लागते. आजतरी म्हणण्याचे कारण असे की, सोमवंशीय मित्र पूर्वीच किसन फागू बंदसोडे यांच्याकडे तीन वृत्तपत्राचे जनकत्व दिले गेले आहे. ....ही सर्व पत्रे प्रकाशित झाली किंवा नाही हे कळायला मार्ग नाही. आज तरी शिवराम जानबा कांबळे यांना पहिले संपादक म्हणून मान्यता द्यावी लागते.[1] असे डॉ. गंगाधर पानतावणे यांचे मत आहे. त्यांच्या मताप्रमाणे जोपर्यंत सोमवंशीय मित्र या पत्रापूर्वीची पत्रे उपलब्ध होत नसतील, त्याविषयी कोणतीही माहिती प्राप्त होत नसेल तर सोमवंशीय मित्र लाच आद्य दलितपत्राचा सन्मान दिला पाहिजे. किसन फागू बंदसोडे यांनीही गोपाळबाबा व शिवराम कांबळे यांच्या बरोबरीनेच वृत्तपत्रीय क्षेत्रात भरीव काम केले. निराश्रित हिंद नागरिक (१९१०), विराळ-विध्वंसक (१९१३) आणि मजूरपत्रिका (१९१८) ही पत्रे स्वतःच सुरू करून दलित पत्रकारितेच्या क्षेत्रात भरीव कार्य त्यांनी केले. गणेश आक्काजी गवई यांनी स्वतंत्रपणे १९१४ साली बहिष्कृत भारत या पाक्षिकपत्राची मुहूर्तमेढ रोवली. अस्पृश्यांच्या सर्वांगीण प्रश्नांची खल व अस्पृशोध्दाराचे कार्य हिच प्रमुख उद्दिष्ट्ये बहिष्कृत भारतची होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजेलेली वृत्तपत्रांची निकड-

भारतातील राजकीय स्थिती आणि राजकीय हक्कांची गरज पाहिल्यावर १९१७ साली सरकारने साऊथबेरो कमिशन हिंदुस्थानातील विविध जातीजमातींच्या मताधिकाराविषयक चौकशी करण्यासाठी नेमले. साऊथबरो कमिशनच्या निमित्ताने बाबासाहेबांच्या लक्षात आले की अस्पृशांच्या राजकीय हक्कांची मागणी व अस्पृशांची कैफियत अस्पृश्य प्रतिनिधीय जिव्हाळ्याने, जबाबदारीने व प्रभावीपणे मांडू शकतो. त्यांना जाणवले की अस्पृश्यांची कैफियत नीटपणे मांडली गेली नाही तर अस्पृश्यांना राजकीय हक्क प्राप्त होणे दृष्कर आहे. त्यासाठी त्यांची बाब सातत्याने मांडणारे साधन असणे जरूरीचे आहे. अस्पृश्यांच्या हिताहिताची चर्चा करणाऱ्या वृत्तपत्राशिवाय अस्पृशांचे भविष्य घडविता ये अशक्य आहे असे त्यांच्या मनाने घेतले आणि कितीतरी शतके मुक बनलेल्या समाजाला वाचा देण्यासाठी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक च पाक्षिक पत्राचा जन्म झाला.

मूकनायक- मूकनायकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकूण चौदा लेख लिहिले. सर्व जातींचे कल्याण होईल अशी सर्वसमावेशक भूमिका वृत्तपत्रांनी घेतली पाहिजे असे बाबासाहेबांचे मत होते. ५ जुलै १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लडला पुढील अभ्यासासाठी निघून गेले आणि मूकनायकचा कारभार श्री. ज्ञानदेव घोलप यांच्याकडे आला. मूकनायकचे कागदोपत्री संपादक म्हणून अस्पृश्य समाजातील आंतरजातीय विवाह करणारा तरूण पांडुरंग नंदाराम भटकर यांच्याकडे दिली होती. यां पाक्षिकाचा रजि.ना.बी.१४३० होता तर अंक शनिवारी (पाक्षिकरूपात) प्रकाशित होई.

मूकनायकच्या दर्शनी भागावर संत तुकारामाच्या गाथेतील

काय करूं आतां धरू निया भीड।
निःशंक हे तोंड वाजविले।।

नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण।
सार्थक लाजून नव्हे हित।।[२]

हा अर्थपूर्ण अभंग होता. तर अंक का. र. मित्र यांच्या मनोरंजन छापखान्यात छापण्यात येई. किरकोळ अंकांची किंमत दीड आणा होती. कठिण आर्थिक परिस्थितीत चालवलेले हे पाक्षिक बाबासाहेब विलायतेवरून परतण्याअगोदरच बंद झाले. स्वातंत्र्यविचाराने भारलेल्या कालखंडात समाजमनावर विविध नामांकित पत्रांनी आपली मांड पक्की केलेली असताना बाबासाहेबांनी आरंभिलेला मूकनायकचा प्रयत्न निश्चित कौतुकास्पद होता. दलित समाजात साक्षरतेचे असणारे अल्पप्रमाण आणि कठिण आर्थिक परिस्थिती अशा दोहो समस्यांना कवेत घेवून मूकनायकचे आव्हान डॉ. बाबासाहेब आबेंडकरांनी पेलले. मूकनायकमधून बाबासाहेबांनी दलित समाजालाच नाही तर अन्यायग्रस्त सर्वस्तरीय जनतेला प्रगतीचा मार्ग दाखविला. त्यांच्या विचारांचे द्रष्टेपण मूकनायकमधील अग्रलेखांमधून दिसते. समाज, धर्म, संस्कृती, इतिहास, शिक्षण, कायदा, अर्थ इ. विषयांचे चौफेर ज्ञान त्यांच्या संपादकीयांमध्ये आहे. फुले, रानडे, आगरकर यांच्या विचारांची ते दखल घेतात. तर टिळक, माटे, केळकर यांच्यातली विसंवादाची भूमिका दाखवितांना त्यांची लेखणी कचरत नाही. आपल्या विचारांवर ठाम राहण्याची व जनहिताची तळमळ त्यांच्या लेखणीतून व्यक्त होते. मुलगामी धर्मचिकित्सा, चतुरस्त्र प्रज्ञा, तर्ककठोर युक्तीवाद, स्पष्टवक्तेपणा, प्रवाही भाषा असे त्यांच्या लेखणीचे विशेष सांगता येतील.

बहिष्कृत भारत

मूकनायक बंद पडले. बाबासाहेबांनी वृत्तपत्राची निकड जाणली होती. त्यामुळेच मूकनायक बंद पडल्यावर आपले वृत्तपत्र नाही याची बोचणी त्यांच्या मनाला लागून राहिली होती. इंग्रजांनी आपली सत्ता भारतीयांकडे सोपविली तरी बहिष्कृत लोकांना निःपक्षपाती वागणूक त्यांच्याकडून मिळेल याची खात्री बाबासाहेबांना वाटत नव्हती. बहिष्कृतांची चळवळ अधिक भक्कम होण्यासाठी वृत्तपत्राची गरज होती. या गरजेतूनच ३ एप्रिल १९२७ रोजी बहिष्कृत भारत उदयास आले. या पत्राचे संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्याच बरोबर वृत्तपत्रासंबंधी सर्वच जबाबदारी त्यांनी उचलली होती. वार्षिक वर्गणी टपालखर्चासहित ३ रू. होती. याचा रजि. बी. २२५० असा रजिस्टर नबंर उजव्या बाजूला लिहिलेला होता. पहिल्या पानावर साखळदंडानी जखडबंद केलेले दोन रूबाबदार सिंह पहिल्या अंकात होते. दुसऱ्या अंकापासून सिंहाचे चित्र काढून टाकले गेले व त्याठिकाणी ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायातील ओवी क्र. १८९, १९० व १९१ यांची माडंणी केली.

आता कोदंड घेऊनि हाती। आरूढ पां इथे रथी।
देई आलिंगन वीरवृत्ती। समाधाने।।
जगी कीर्ति रूढवी। स्वधर्माचा मानुवाढवी।।
इया भारापासोनि सोडवी। मेदिनी हे।।
आता पार्था निःशंकु होई। या संग्रामा चित्त देई।
एथ हे वाचूनि काही। बोलो नये।।३।।[३]

या सूचक आणि अर्थपूर्ण ओळींची मांडणी करत कृष्णाने युध्दभूमीवर शांत व प्रसन्न मनाने क्षात्रवृत्तीचा अंगीकार करत युध्दाला सामोरे जाण्यास सूचविले आहे. पृथ्वीचा भार हलका करून स्वधर्मांची प्रतिष्ठा वाढवून जगी कीर्तिध्वज फडकवा असा आशावाद कृष्णाने व्यक्त केला आहे. बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजाने आपल्या न्याय हक्कासाठी लढून आपली प्रतिष्ठा पणाला लावून आत्मप्रतिष्ठा प्राप्त करावी. सन्मान मिळवावा. त्यासाठी कितीही संघर्ष करावा लागला तरी चालेल हेच सूचावायचे आहे. या पत्राचा सारा प्रपंच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच केला. त्यांनी यामध्ये अनमोल असे लेखन केले आहे. आपल्या विचारांनी अस्पृश्य समाजाला दिशा दिली. समाजसमतेचे विरोधक, आमची यत, हिंदुधर्माला नोटीसा, खोती ऊर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी, हिंदु महासभा व अस्पृश्यता यासारखे अग्रलेख लिहून समाजातील विषमतेचा समाचार घेतला. त्यांच्या अग्रलेखाबरोबरच प्रार्संगिक विचारही विचार करायला लावणारे आहेत.

बहिष्कृत भारतलाही आर्थिक विवंचना नेहमी राहिली. काहिवेळा अंक खंडितही झाला. या साऱ्या संकटांशी सामना करत बाबासाहेबांनी हे अंक चालवण्यासाठी खूप कष्ट घेतले. बहिष्कृत भारतचे २४-२४ रकाने एकट्याने लिहिण्याची किमयाही बाबासाहेबांनी केली. पण अखेर /११/१९२९ रोजी शेवटचा अंक प्रकाशित होऊन बहिष्कृत भारत बंद पडले.

जनता-

बहिष्कृत भारत हे पत्र बंद पडले आणि जनतेचा आवाज शब्दबध्द करण्यासाठी वृत्तपत्राची निकड पुन्हा भासू लागली. त्यामुळे २४ नोव्हेंबर १९३० रोजी जनताचा पहिला अंक प्रकाशित झाला. जनताच्या पहिल्या अंकावर रजिस्टर नंबर नाही. दुसऱ्या अंकावर मात्र रजि. नं. ७७९ असा निर्देश आहे. या पत्राचे संपादक म्हणून देवराव विष्णू नाईक यांची नियुक्ती करण्यात आली. विशेष म्हणजे त्यांनी समता व ब्राम्हण-ब्राम्हणेतर या पत्रांचे संपादक म्हणून काम केले होते. ते पुरोगामी व अस्पृश्यांच्या चळवळीत सक्रीय सहभागी होणारे ब्राम्हण कार्यकर्ते होते. या सुमारास बाबासाहेबांचा व्याप वाढल्याने स्वतः एखादे वृत्तपत्र चालवण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नव्हता. असे असले तरी जनता पत्रात त्यांनी अनेकवेळा लेखन केले आहे. जनता हे प्रारंभी पाक्षिक होते. नंतर ३१ ऑक्टोबर १९३१ रोजी त्याचे साप्ताहिकात रूपांतर झाले. या पत्राची वार्षिक वर्गणी दोन रूपये दहा आणे होती. शीर्षभागी डॉ. भीमराव आंबेडकर, एम. ए. पीएच.डी., डी.एससी. बार ॲट लॉ यांच्या नेतृत्वाखाली चालणारे जनहित प्रवर्तक पाक्षिकपत्र जनता असे छापलेले असे. जनताच्या अंकानंतर शीर्षभागी गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल असे ब्रीदवाक्य लिहिले जाऊ लागले. अस्पृश्यांना बंडखोरीचे तत्वज्ञान आणि संघर्षवृत्ती देण्यासाठीच जनताचा जन्म झाला असे म्हणावे लागेल. हे सत्य की कावा, बरे झाले, महात्मा गेला, माणूस राहिला, क्रांतीची उपासना का ध्येयाचे रक्षण, हिंदी राजकारणाचा विचका. यासारखे अनेक अंग्रलेख लिहून बाबासाहेबांनी आपले रोखठोक विचार मांडले. जनता पत्राचे आयुष्य पंचवीस वर्षांचे असले तरी अधूनमधून तेही प्रसिध्द होताना दिसते. अनेक संपादकांच्या संपादनाखाली या पत्राची वाटचाल झाल्याचे दिसते. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी जनता चे प्रबुध्द भारत असे नामांतर झाल्याचे दिसते.

प्रबुध्द भारत-

बाबासाहेबांनी बुध्द धर्माची दीक्षा घेण्यापूर्वीच आपल्या पत्राचे नामांतर केले. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले आणि त्यानंतर या पत्राचे संपादक म्हणून यशवंतराव आंबेडकर, मुकुंदराव आंबेडकर, दा. ता. रूपवते, शंकरराव [illegible]

र. कद्रेकर यांनी अनुक्रमे जबाबदारी सांभाळली. ३ ऑक्टोबर १९५७ हा अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यावर प्रबुध्द भारत हे या पत्राचे मुखपत्र बनले. पण पुढे १९६१ मध्ये हे साप्ताहिक बंद पडले. पत्रासाठी स्वतंत्र असे मुद्रणालय असूनही हे साप्ताहिक बंद पडले ही विचार करायला लावणारी घटना होती. १९२० सालापासून बाबासाहेबांनी सुरू केलेली वृत्तपत्रीय चळवळीची धडधड १९६१ ला थांबलेली दिसते. १९२० ते ६ डिसेंबर १९५६ या कालावधीत बाबासाहेबांनी आपल्या विचारांचा अनमोल ठेवा या वृत्तपत्रातून समाजाला दिला. त्यांचे हे ऋण कोणत्याच समाजाला विसरता येणार नाही. बाबासाहेबांनी मराठी भाषेत निर्माण केलेला हा विचारांचा ठेवा मराठी वैचारिक गद्याचा एक अनमोल ठेवा आहे.

निष्कर्ष -

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्राची निकड ओळखली होती व आपली सत्य बाजू मांडण्यासाठी वृत्तपत्राचा कसा हत्यार म्हणून वापर करता येतो त्याचे महत्व जाणले होते.
२) दलित समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे हे जाणून वृत्तपत्रनिर्मितीत असणारे आर्थिक अडथळे पार करूनही त्यांनी वृत्तपत्रांची चळवळ मोठ्या जिद्दिने पेलली.
३) बाबासाहेबांचे अग्रलेख म्हणजे त्यांच्या रोखठोक विचारांचा आलेख दिसत आहे.
४) त्यांच्या अग्रलेखांनी मराठी वैचारिक गद्य समृध्द केले आहे.
५) प्रासंगिक विचार, लेख, अग्रलेख, स्फूटलेखन असे विविधांगी लेखन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या विविध पत्रातून केले आहे.
६) ही सारी वृत्तपत्रे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनाचा प्रवासच आहेत.
७) समग्र समाजाला नवा विचार व नवी दृष्टी देण्याचे कार्य या पत्रांनी केल्याचे दिसते.
८) समाजातील सर्वच घटकांचा विचार करण्याची बाबासाहेबांच्या विचारांची व्यापकता या पत्रांमधून दिसते.
९) जुन्या सांकेतिकतेची चौकट मोडून समाजाच्या पुनर्बांधणीचा विचार यातून प्रकट होताना दिसतो.
१०) मूलभूत, मर्मभेदी, आत्मप्रत्ययी, बुध्दिप्रामाण्यवादी, चिंतनशाली, चिकित्सक, समाजातील रोगट प्रवृत्तींचे पाणी उपसून टाकून समाजाला नवविचारांचा क्रांतिकारक ठेवा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधन यातून प्रकटले आहे.

संदर्भ-

१) पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, व्दितीय आवृत्ती १९९६, पृ. क्र.२७
२) मूकनायक मधील विचारधन आणि लेखनशैली, डॉ. शशिकांत लोखंडे, मराठी संशोधन पत्रिका, फेब्रुवारी मार्च २०२१, पृ.क्र.३१
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२० ते १९५६ (खंड १९ व २०) संपादक, हरी नरके, एन.जी. कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रसाधने प्रकाशन समिती मुंबई, २००५

IQAC - Coordinator
hri- M. H. Khapane College of
ts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
GE OF ARTS & COM.PACHAL
,Tal- Rajapur,Dist-

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

‘ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार’ -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव

● Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC ● ISO मानांकन 9001:2015 ●

ता. तासगाव, जि. सांगली



लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे

[illegible] व [illegible]ाचे स्वरूप	डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम	२२६
[illegible] - 'तमाशा'	डॉ. वैशाली किरण औताडे	२३०
[illegible] लोक भाषेतील म्हणींचा अभ्यास	धनश्री विश्वास पाटील	२३४
[illegible] डाका (डहाका) कुंभाराचा	डॉ. एकनाथ शामराव पाटील	२३७
[illegible] विचार व विस्तार	डॉ.सुजय बाबुराव पाटील	२४०
[illegible] धनगर समाजाचे परंपरागत गजोनृत्य	डॉ.विकासशंकर पाटील	२४४
[illegible]: विधी व गाणी	डॉ.शकुंतला पिसाळ	२४७
[illegible]	डॉ.पोळ हणमंत रामचंद्र	२५१
[illegible] आविष्कार- लोककथा	डॉ. गवराम नाना पोटे	२५५
[illegible] : वासुदेव	डॉ. राजश्री बंडोपंत पोवार	२५८
[illegible] स्त्री-प्रतिमा	डॉ. नम्रता हत्तळगे	२६१
[illegible] सांस्कृतिक [illegible] लोकाविष्कार	डॉ. रफीक सूरज मुल्ला	२६४
[illegible] ग्रंथालय पर्यटन : एक अभ्यास	डॉ. राजेश शं. राजम	२६७
[illegible]	डॉ.सुनीता रोकडे	२७१
[illegible] रूप	डॉ. संजयकुमार मधुकर सरगड	२७५
[illegible] तत्त्वज्ञान	प्रविणसिंह बहादूरसिंह शिलेदार	२७८
[illegible]-डहाक	डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे	२८२

राजापूर तालुक्यातील धनगर समाजाचे परंपरागत ग

डॉ.विकास
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य
पाचल,तालुका-राजापूर,

धनगर समाजाचे व्यवसाय मेंढीपालन व शेती हेच राहिले आहे हा समाज मोठया प्रमाणात असल्याचे दिसून येते .इतर भागाप्रमाणे येथील भटकंती करणारा नसून तो स्थिर आहे.कोकणात राहणारा हा समाज आज सोयी-सुविधांपासून वंचित असल्याचे दिसून येते. डोंगरावर , उंच कड्या राहतांना दिसून येतात. आजही पाणी ,रस्ता,वीज या प्राथमिक गरजाही नाहीत.डोंगरावरही वस्ती एकाच ठिकाणी नसल्याने या सुविधा पूर्ण करताना दमछाक होताना दिसते.लांजा तालूक्यातील कांडगे गावी राष्ट्रीय सेवा माध्यमातून आमच्या स्वयंसेवकांनी पालटोक धनगरवाडा येथे दग किलोमीटरचा रस्ता बनविल्यावर तेथील नागरिकांनी आमच्या टीमचा पाहून विकासाच्या प्रवाहापासून वंचित राहिल्याची त्यांची वेदनाही सम व सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्ह्यात या समाजाची संख्या मोठी आहे.कोक येणाऱ्या पायवाटांची चांगली माहिती या मंडळीना होती म्हुनच आं सुरवातीला पायवाट इंग्रजांना दाखवणारे या समाजाचे पुरुष होते . स्मारकही तिथे आहे.या समाजाकडे कोकणातील दुर्मिळ व ओषधी वनस् आहे. या समाजाच्या अनेक आख्यायिका एकायला मिळतात .

राजापूर तालुक्यातील धनगर समाज

राजापूर तालुक्यातील अनेक धनगरवाडे पायदळी तुडव समस्यांची जाणीवझाली. वहातुकिच्या सोयी-सुविधांची असणारी वानवा संधी नाहीत ,वीज ,पाणी यांची वानवा ,शिक्षणासाठी करावीलागणारी या समाजाची दयनीय अवस्था या तालुक्यातही दिसून येते.या समाजातील निसर्गाशी संघर्ष करत असतात . ही मंडळी खूपच काटक व कष्टाळू बोडके ,झोरे, खरात,गोरे, एडगे, काळे, कोळपाटे, कोकरे, कोळपे आडनावावे असलेला समाज येथेआपणास दिसतो.आपल्या प्रथापरंपरा मंडळी आहेत.

गज्जोनृत्य-

धनगरी समाजाचे लोकप्रिय नृत्य म्हणजे गज्जोनृत्य होय.धनगरी समाजाच्या

आबालवृध्दाना ठेका धरायला लावणारे हे नृत्य आहे. माशाच्या पाण्यात पोहायला शिकवावे लागत नाही तसेच हेनृत्यधनगरी समा शिकवावे लागत नाही ती आपोआपच पाहून शिकतात. या नृत्यासाठी को संहिता नाही. त्याबरोबरच यामध्ये कोणतीही गीते गाईली जात नाहीत. वाद्याची साथ या नृत्याला लागत नाही.खूप कमी साहित्यात व फार

ISSN No.

[illegible] देते हा या नृत्याचा विशेष आहे.हेनृत्य दसऱ्याला हमखास केले [illegible] [illegible]चा नृत्याविष्कार आहे ही मानसिकता यासमाजाची असल्याने [illegible] सारे लोकवस्तीतील लोक जमा होतात.महिला व मुलेही हे [illegible] [illegible]तात. दसऱ्याबरोबरच म्हाळवस (म्हाळ) , दिवाळी इत्यादी [illegible] पूजाप्रसंगीही हे नृत्य केले जाते .

[illegible]

[illegible] शिवकालापासून सुरु असल्याचे जाणकार सांगतात . शिवकालात [illegible] चूकविन्याच्या कलेतून या नृत्याची निर्मिती झाल्याचे सांगण्यात [illegible] विशिष्ट पदन्यास करत नाचने असे या नृत्याचे स्वरूप आहे यावरून [illegible] हरकत नाही.

[illegible] -

[illegible] मोठी वाद्यवृदांचीसाथ आवश्यक नसते. ढोल,थाळा(ताटली) व [illegible] यासाठी आवश्यक असते.

[illegible] -

[illegible]ची वेशभूषा खुपचं वेगळी असते. ही वेशभूषा लक्ष्यवेधी आहे.या [illegible] पुरुष पांढऱ्या सुती कपड्याचा झगा परिधान करतात. यापांढऱ्या [illegible] रंगाच्या कपड्याची चंद्र, सूर्य व निसर्गातील काही प्रतिमांची [illegible] . निसर्गाच्या सानिध्यात अधिक काळ राहिल्यानेच चंद्र व सुर्य [illegible]. त्यामुळेच या प्रतिमा याझग्यावर आल्या आहेत.हा झगा अंगात [illegible] चाळ बांधले जातात. डोक्याला उपरणे बांधले जाते. ही मंडळी [illegible] [illegible]याचा झगा भक्तिभावाने जपून ठेवताना दिसतात.

[illegible] -

[illegible]च्या प्रारंभी सर्व कलावंत पांढरा झगा परिधान करतात .सर्वजण एकत्र [illegible] नावांचा जयघोष करतात . सुरवात आपल्या घरच्या व ग्रामदेवतांची [illegible]. चांगभलंचा गजर मोठया आवाजात, उत्साहात व आनंदात केला [illegible]च्या विशिष्ट लयीत नृत्याची सुरवात केली जाते.ढोलावरील ताल [illegible] चाल बदलली जाते.नृत्याला वेळेचे बंधन नाही.हे नृत्य आनंदाने [illegible] शेवटी पुन्हा सर्वजण एकत्र येऊन प्रारंभी केलेला चांगभलंचा गजर [illegible] नृत्य संपते.

[illegible] स्वरूप

[illegible] मोठया संख्येने सहभागी होताना दिसते.

[illegible]नृत्य करणारी जुनी पिढी ही विशिष्ट पदन्यास करत होती पण नवीन [illegible]ताना आपल्या कलाने नृत्य करते.त्यामुळे जुना नाच व तरूण पिढीचा [illegible] होताना दिसतो.

[illegible]पासून रोजगारासाठी शहरात गेलेला तरूण आपल्या प्रथापरंपरा जपताना [illegible] उत्साहाने तरुणयामध्ये सहभागी होताना दिसतो.या उत्साहातून त्याचा [illegible] [illegible]ताना दिसतो.

IQAC - Coordinator
M. H. Khapane College of
Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratna

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 40 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
April 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

peer

Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

12 April 2021 Special Issue- 40 Vol. I

Thoughts of Dr. B.R. Ambedkar

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal Dr. Kishan Pawar

Shaurya Publication, Latur

20. **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार व वर्तमान स्थिती**
डायरे अमोल राम 71

21. "डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कायदे विषयक विचार" 74
डॉ बाबासाहेब शेप

22. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विशयक विचार 77
प्रा.गायकवाड बाळू भिमराव

23. **'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घटनावादाबाबत विचार'** 79
डॉ. रार्जेद्र सुभाष नाडेकर

24. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामगार विषयक विचारांचे विवेचन 82
डॉ.तुकाराम एकनाथराव बोकारे

25. डॉ.बाबासाहेव आंवेडकर यांचे हिंदू कोड बिल -एक चिकित्सक अभ्यास 85
डॉ. वंदना राजेश शिंदे

26. **डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा मानवाधिकारा प्रति दृष्टिकोन व त्याचे तात्विक अधिष्ठान एक ऐतिहासिक अध्ययन** 89
प्रो. डॉ. गोपालसिंह बछिरे

27. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता 94
प्रा.डॉ.आंदे लता दिगंबर

28. **"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक चळवळ"** 97
प्रा. डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव

29. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, पुरस्कार व प्रकाशित साहित्याचा आलेख 99
प्रा. ज्योती शामराव मगर

30. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान 103
प्रा.कैलास माणिकराव मुटकूळे

31. भारतीय महिला सशक्तीकरणात डॉ. आंबेडकरांचे योगदान 105
प्रा. डॉ. लक्ष्मीकांत देशपांडे

32. **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार** **108**
मनिषा शरद इंगळे

33. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील दलित चळवळ 110
प्रा. निल नागभिडे

34. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निर्भीड लोक पत्रकारीता 113
डॉ. प्रमोद एस. मेश्राम, डॉ. उत्तम छा. राठोड

35. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांसाठी कार्ये 116
असो. प्रो. डॉ. गंगणे आर.व्ही.

36. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय शेती 119
प्रा.डॉ.राधाकृष्ण जोशी

37. महिला सशक्तीकरणात डॉ.आंबेडकरांची भूमिका 122
प्रा.डॉ.काशीद रामभाऊ देवराव

38. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारीता 124
प्रा. तळणीकर एस.जी.

Special Issue 40 , Vol. 1
April 2021
CURRENT GLOBAL REVIEWER
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निर्भीड लोक पत्रकारीता

डॉ. प्रमोद एस. मेश्राम
प्राचार्य
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय,
पाचल, जि. रत्नागिरी

डॉ. उत्तम छा. राठोड
उपप्राचार्य
नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी

प्रस्तावना -

भारतीय पत्रकारीतेत लोकपत्रकारांची संख्या कमी असली तरीही त्या पत्रकारितेने मानवी कल्याणाच्या मूल्यांची जोपासना केली. त्यामध्ये आगरकर, शिवरामपंत परांजपे, न. चि. केळकर, खाडिलकर, जांभेकर, कृष्णराव भालेकर, आचार्य अत्रे, नानासाहेब परूळेकर, शिवराय जानबा कांबळे, गोपाळबाबा वलंगकर, कालिचरण नंदागवळी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पत्रकारीतेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्त्वपूर्ण असूनदेखील त्यांचे कार्यकर्तृत्व जाणिवपूर्वक दुर्लक्षित केले गेले. त्यांची पत्रकारिता लोकाभिमुख असून देखील त्यांच्या कार्याला व्यवस्थेने डावलण्याचा प्रघात केला, त्यामुळे त्यांचे नुकसान झाले नाही, तर ते झाले मराठी वृत्तपत्रसृष्टीचे.

पत्रकारीतेची जडणघडण -

18व्या शतकाच्या उत्तरार्धात जेम्स ऑगस्टने हिकी नावाच्या पत्रकारितेला प्रारंभ केल्याचे दिसून येते. या पत्रकारीतेतूनच भारतीय व्दिभाषिक आणि त्यानंतर भाषिक वृत्तपत्रे विकसित झाली. इ.स. 1832 मध्ये जांभेकरांनी दर्पण हे व्दिभाषिक नियतकालिक सुरू केले. इ.स. 1832 ते 1877 या दरम्यानच्या वृत्तपत्रांतून भारतीय समाजाचे चित्रण प्रतिध्वनीत केले गेल्याचे दिसून येते. ज्यामध्ये भारतीय समाजाचे प्रबोधन, लोककल्याण व लोकजागृतीचे चित्रण केले असल्याचे दिसून येते. 24 सप्टेंबर 1877 रोजी महात्मा फुले यांच्या पासून प्रेरणा घेऊन कृष्णराव भालेकर या तरूण पत्रकाराने ग्रामीण संस्कृतीतील प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. यानंतर भालेकरांनी दिनमित्रांची सुरूवात नगर जिल्ह्यातील सोमठाण्यासारख्या एका लहानशा खेड्यातून केली. मुकुंदराव पाटील यांनी हे नियतकालिक पुढील पन्नास वर्षांपर्यंत संपादित करून ग्रामीण पत्रकारितेचा पाया भक्कमपणे रोवला.

त्यानंतर 'दिनबंधू, दीनमित्र, शेकऱ्यांचा कैवारी, अंबालहरी, विजयी मराठा, ब्राम्हणेत्तर, हंटर, सत्यवादी, पुढारी, समता, आदी वृत्तपत्रे आणि नियतकालिकांनी महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजापासून प्रेरणा घेवून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शेतकरी, कामगार, शेतमजुर आणि दलित, पददलितांच्या प्रश्नांची दखल घेतली आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला गतिमान केले.'[1]

दुसऱ्या प्रवाहातील नियतकालिकेतून आणि वृत्तपत्रातून प्रेराणा घेवून गोपाळबाबा लवंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडे यांनी पत्रकारितेला सुरूवात केली. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांनी समाजात जागृती निर्माण करून आंबेडकरी चळवळीची पायाभरणी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणीतून साकारलेली पत्रकारिता-

आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. वृत्तपत्र हे समाजाच्या विकासाचे प्रभावी माध्यम आहे हे त्यांनी ओळखले होते. **वृत्तपत्रीय लेखन सर्वप्रथम छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळेच मूकनायकाचा जन्म 31 जानेवारी 1920 रोजी झाला.** मूकनायकाचा जन्म म्हणजे आंबेडकरी चळवळीचा आरंभ होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात चार वृत्तपत्रे काढली. त्यांची नावेही त्या-त्या वेळी अनुरूप ठेवण्यात आली होती. अशा या मूकनायकाची सुरूवात 31 जानेवारी 1920 रोजी त्यांनी केली. मूकनायक सर्व अंगानी परिपूर्ण होते. त्या वृत्तपत्राच्या निर्मितीच्या भूमिकेसंबंधी ते म्हणतात, 'आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविल्यास तसेच त्यांची होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविल्यास तसेच त्यांची भावी उन्नती तिचे मार्ग त्यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे न्याहाळून पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट जातींचेच हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातींच्या हिताची त्यांना पर्वा नसते. इतकेच नव्हे तर केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रताप निघतात. दीनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी मराठी, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका वगैरे पत्रांतून बहिष्कृत समाजाच्या प्रश्नांची चर्चा वारंवार होते. परंतु ब्राम्हणेतर या संज्ञेखाली मोडत असलेल्या अनेक जातींच्या प्रश्नांचा ज्यात खल होतो, त्यात बहिष्कृतांच्या प्रश्नांचा सांगोपांग उहापोह होण्यास पुरेशी जागा मिळणे शक्य नाही. हेही उघड आहे. त्यांच्या अतिबिकट स्थितीशी संलग्न असलेल्या प्रश्नांची चर्चा करण्यास एक स्वतंत्र पत्र पाहिजे हे कोणीही कबूल करील. ही उणीव भरून काढण्यासाठी या पत्राचा जन्म आहे.'[2] अशी ही मूकनायक पत्राच्या निर्मितीची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केली होती. त्यांचे स्पष्ट मत होते की, वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाजात परिवर्तन होते, परंतु वरील वृत्तपत्रातून बहिष्कृत जाती-जमातींच्या समाजाची प्रगती होत नाही असे स्पष्ट व परखड मत त्यांचे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूकनायकातून समाजजागृतीची ध्येयनिष्ठा प्रतिबिंबीत होते. ही ध्येयनिष्ठा सामाजिक बांधिलकीच्या तत्वातून झालेली असल्याचे आपणाला दिसून येते. त्यांनी या वृत्तपत्राच्या माध्यमातून बहिष्कृतांना, मुक्या माणसांना बोलण्यासाठी प्रवृत्त केले. ज्यामधून अनेक महत्त्वपूर्ण सामाजिक कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण झाल्याचे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक पत्रापासून आपल्या वृत्तपत्रीय लेखनाच्या प्रवासाची सुरूवात केली. बहिष्कृत भारतातून त्यांचे लिखाण विशाल रूप धारण करताना दिसून येते. 3 एप्रिल 1927 पासून बहिष्कृत भारताची सुरूवात झाली. '(...) बहिष्कृत भारतामधून साकार झालेले लेखन हे क्रांतिकारी आशयाचे आहे. हे लेखन वरपांगी सुधारणा अथवा पोकळ डागडुजी करणारे नव्हे. येथील प्रस्थापित समाजरचनेमध्ये मूलगामी परिवर्तन घडवून आणणे हे या लेखनाचे जीवित ध्येय होय. महाड येथे बाबासाहेबांनी जो चवदार तळे मुक्तीचा धर्मसंग्राम उभारला, त्या निमित्ताने त्यांनी जनप्रबोधनाची प्रक्रिया दलित वर्गाच्या अंतर्मनापर्यंत नेऊन पोचवली. अस्पृश्य वर्गाला शेकडो वर्षापासून गुलाम करणाऱ्या धर्मकल्पनांविरूध्द ते रान उठवितात. येथील धर्मकल्पनांचा खोटारडेपणा ते शास्त्रशुध्द चिकित्सेतून सिध्द करतात.

जातीयता, विषमता व अस्पृश्यता निर्माण करणाऱ्या धर्मग्रंथांचा ते खरपूस समाचार घेतात. हा समाचार खरपूस असला तरी तितकाच वास्तवदर्शी होता. अस्पृश्यतेची ही एक स्पृश्य लोकांची लहर आहे हे सप्रमाण सिध्द करून दाखवितात. पिढीजात अस्पृश्य वर्ग हिंदुस्थानाशिवाय जगाच्या पाठीवर अन्यत्र कोठेच नसल्याचे ते प्रतिपादन करतात. या अस्पृश्यतेला नष्ट करण्याचे प्रस्थापित धर्मनिष्टांचे प्रयत्न त्यांना पोरखेळ वाटतात. अस्पृश्य वर्गाची गुलामगिरी वरिष्ठ वर्गाच्या प्रयत्नाने दूर होणार नसून ती अस्पृश्य वर्गाच्याच प्रयत्नाने नष्ट होऊ शकेल. याबद्दल बाबासाहेबांना पुर्ण खात्री आहे. म्हणूनच ते समस्त अस्पृश्य वर्गाला या लेखनाच्या माध्यमातून जागृत व जीवंत करु इच्छितात.'[3]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारतातून अस्पृश्य वर्गाला खितपत ठेवणाऱ्या प्रथा-परंपरांचा सखोल विचार करून पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या या वृत्तपत्रामधून लिखाण केले. ज्यामध्ये प्रथा-परंपरा, वतनपध्दती, सामाजिक संरचना, वेठबिगारी, गुलामगिरी, इत्यादी बाबीसंबंधातील त्यांचे लेखन अत्यंत महत्वपूर्ण आहे. बहिष्कृत भारतातील त्यांचे लेखन समाजजीवनाच्या संपूर्ण बाजूंना स्पर्श करणारे आहे. त्यांच्या लिखाणात प्रगतशील ध्येयनिष्ठतेचा ताठ कणा आहे. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांच्या वेदना, तळमळ या वृत्तपत्रातून त्यांनी सांगितलेली आहे. माणूस म्हणून जीवन जगताना कोणत्याही व्यक्तीस मुलभूत स्वातंत्र्यांचे हक्क असावे लागतात. म्हणूनच त्यांनी समताधिष्ठीत हक्कांचा पुरस्कार, हिरिरीने करून नंतरच्या काळात भारतीय संविधानात त्या तत्वांचा पुरस्कार करतात. नैतिकता हा वृत्तपत्रांचा कणा असावा असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्याच हेतूने त्यांनी आपली वृत्तपत्रे चालविली असल्याचे दिसून येते.

'बहिष्कृत वर्गात विचारप्रबोधन होण्याच्या निकडीने त्यांनी केलेले लेखन प्रबोधक, बुध्दिप्रामाण्यवादी, तर्कशुध्द, परखड आणि अंतर्मुख करणारे आहे. हिंदू धर्म व समाजचिकित्सा करताना हिंदू समाजातील रूढी-परंपरांनी हिंदू समाजाचे आणि अस्पृश्यांचेही प्रचंड नुकसान झाल्याचे मत त्यांनी मांडले. अन्याय व जुलूम हे उभय समाजाची विवेकशक्ती नष्ट करतात. हे त्यांचे म्हणणे स्विकारावेच लागेल आणि म्हणून अस्पृश्यांमध्ये आत्मजागृती व्हायची असेल तर आत्मभान व आत्मसन्मान यावर त्यांनी भर दिला. त्यासाठी आंदोलनेही उभारली. स्पृश्यांना कर्तृत्वाची जाणीव अस्पृश्यांना अधिकाराची जाणीव करून दिली.'[4]

बहिष्कृत भारतातून समाजाला जागृत केले. त्यांचे अधिकार त्यांना मिळवून दिले. त्यासाठी अस्पृश्यांना संघर्ष करण्यासाठी प्रेरीत केले. याचा भूमिकेतून सत्याग्रह केले गेले. या सत्याग्रहाच्या माध्यमातून पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजात जागृती निर्माण झाली. हिंदूनी आपला दुराग्रह सोडून अस्पृश्यांना त्यांचे हक्क आणि अधिकार दिले नाही तर अस्पृश्य समाजातील तरूण पिढी धर्मत्याग करील अशा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडरांनी 4 नोव्हेंबर 1927 च्या बहिष्कृत भारतातून दिला होता. ते म्हणतात की, 'स्पृश्य हिंदू समाज अस्पृश्यांना सुखाने, ऐषोआरामाने नांदू देत नसेल तर त्यांनी परधर्माचा अवलंब करावा हेच बरे. अस्पृश्यांना स्पृश्य लोकात कांकणभर देखील इतमानाने राहू देत नाहीत. याचे कारण हिंदू धर्मात अस्पृश्यांचा दर्जा खालचा आहे. दर्जा वाढल्याखेरीज अस्पृश्यांना आपला दर्जा वाढवून घेण्यास मार्ग नाही.'[5]

हिंदू समाजातील अस्पृश्य समाजाला दर्जा प्राप्त करून देण्यासाठी, अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चार वृत्तपत्रे काढली. त्यांनी चालविलेल्या वृत्तपत्रांची नावेही अनुरूप होती. अस्पृश्य समाज हा मुका असल्याने त्याला तोंड असून बोलता येत नसल्यामुळे आपल्या पहिल्या वृत्तपत्राचे नाव त्यांनी 'मूकनायक' ठेवले. अस्पृश्य समाज हा बहिष्कृत असल्यामुळे दुसऱ्या पत्राचे नाव 'बहिष्कृत भारत' ठेवले. जेव्हा समाजात जागृती निर्माण झाली तेव्हा आपल्या वृत्तपत्राचे नाव 'जनता' ठेवले व जेव्हा त्यांनी बौध्द धम्म स्वीकारण्याचे निश्चित केले तेव्हा आपल्या वृत्तपत्राचे नाव 'प्रबुध्द भारत' ठेवल्याचे दिसून येते. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी सामाजिक कार्याची बांधिलकी स्वीकारून ती कार्यान्वीत करून प्रगतीच्या उच्च ठिकाणी केंद्रीत केली. त्यामुळे त्यांच्या कार्याची प्रेरणा ही मानवतावादी होती ती दलित आणि पददलितांच्या हिताची व मानवतावादाची होती.

बहिष्कृत भारतानंतर 24 नोव्हेंबर 1930 रोजी 'जनता' वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला. या वृत्तपत्राचे संपादक देवराव विष्णु नाईक होते. जनता वृत्तपत्र सुरूवातीला पाक्षिक होते नंतर ते साप्ताहिकात रूपांतर झाले. जनता वृत्तपत्रात पददलितांची दुःखे मांडण्यावर अधिक भर दिला गेला असल्याचे दिसून येते. याच वृत्तपत्रात 'गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल' असे ब्रीदवाक्य लिहिले जाऊ लागले. यावरून असे लक्षात येते की, पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना बंडखोरीचे तत्त्वज्ञान आणि संघर्षवृत्ती देण्यासाठीच जनता वृत्तपत्राची निर्मिती झाली असल्याचे ध्वनित स्पष्ट होते. या वृत्तपत्राच्या धोरणाविषयी कद्रेकरांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'आपल्या स्वावलंबनाच्या व भावी राजकीय हक्कांच्या लढ्यासाठी आपले वर्तमानपत्र आपणास भरभराटीस आणले पाहिजे. जनता पत्राची आज जरी तुम्हास किंमत वाटत नसली तरी त्याची खरी जाणीव होण्याचा काळ लवकरच प्राप्त होणार आहे.'[6] आपल्या पंचवीस वर्षाच्या प्रवासात अनेक प्रकारचे अडथळे हे वृत्तपत्र चालविताना संपादकांना आले. तरिही प्रबळ नेतृत्वावर हे वृत्तपत्र सुरू होते. या जनता वृत्तपत्राचे नामांतर 4 फेब्रुवारी 1956 साली झाले. बौध्द धम्म स्वीकारण्याचे निश्चित झाल्यावर दीक्षेपूर्वीच त्यांनी जनता वृत्तपत्राचे नाव प्रबुध्द भारत केल्याचे आपणास दिसून येते.

14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो बांधवासह बौध्दधम्म दीक्षा नागपूर येथे घेतली, मात्र अल्पावधीत त्यांचे महापरीनिर्वाण झाले. तेव्हाही प्रबुध्द भारत समस्त बहुजनांना बौध्द धम्माविषयीचे मत प्रदर्शित करीत होता. डॉ.

वाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर प्रवुध्द भारताच्या संगोपनासाठी संपादक मंडळाची निर्मिती करण्यात आली. ज्यामध्ये यशवंतवराव आंबेडकर, मुकुंदराव आंवेडकर, दा. ता. रूपवते, शंकरराव खरात आणि भा. र. कर्देकर यांनी जवावदारी सांभाळली. 1957 ला अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर प्रवुध्द भारत रिपब्लिकन पक्षाचे मुखपत्र वनले. 1961 साली हे मुखपत्र बंद झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक ते वहिष्कृत भारत या वृत्तपत्रांच्या माध्यमातून मूकनायकांना नायक वनविले. त्यामुळे त्यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाजाचे केलेले प्रवोधन ही काळाची गरज होती. या वृत्तपत्रांच्या माध्यमातून देशातील विविध चळवळींच्या घडामोडींची अचूक मांडणी केली जात होती. अंधारात चाचपडणाऱ्या, पुर्वाश्रमीच्या अस्पृश्य, वहिष्कृत समाजाला नवा आयाम देण्याचे कार्य या वृत्तपत्रानी केले. समाजजीवनात वृत्तपत्रांच्या प्रबोधनानतून समाज जागृती केली. त्यामुळे वृत्तपत्रांच्या माध्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे झुंजार व्यक्तिमत्व दिसून येते.

संदर्भसूची-

1) संपादक मंडळ, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, दादर, मुंबई प्रथामावृत्ती, 25 डिसेंवर 1923, पृ. 512
2) संपादक मंडळ, 'डॉ. वाबासाहेब आंवेडकर यांची पत्रकारिता', 1920-1928, डॉ. बाबासाहेव आंवेडकर चरीत्र-साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्रथमावृत्ती 2005, पृ. 25
3) कित्ता पृ., 28
4) संपादक मंडळ, 'लोकराज्य, पानतावने गंगाधर यांचा लेख डॉ. बाबासाहेव आंवेडकर यांची पत्रकारिता', महाराष्ट्र शासन मुंबई, ऑक्टोबर 2006, पृ. 47
5) संपादक मंडळ, 'बहिष्कृत भारत, आजकालचे प्रश्न, 4 नोव्हेंबर 1927, वर्ष 1 ले अंक, पृ. 14, 15, 16
6) पानतावने गंगाधर, 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर', प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, व्दितीयावृत्ती 1996, पृ. 69

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College o
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

Aayushi
International Interdisciplinary
Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue No.71

Significance Of Fairs And Festivals In Human Life

Chief Editor

Pramod P. Tandale

IMPACT FACTOR

SJIF 6.293

For details Visit our website

www.aiirjournal.com

Sign in to edit and save changes to this...

Significance Of Fairs And Festivals In Human Life (Special Issue No. 71)

Sr. No.	Name of the Researcher	Title of The Paper	Page No.
150	Dr. Uttam Ramchandra Patil	Other Sides of Fairs and Festivals	511
151	Miss. Rohini Shivaji Salunkhe	Fair-Festivals and Print Media (News Paper	514
152	Dr . P. L. Harale	Importance of Fairs and Festivals in India	520
153	Dr.Vidula Dnyaneshwar Vyavahare	Role of Trade Fairs in Creating Employment Opportunities among the Self-Help Group Members- A Case Study	522
154	डॉ. तेजस्विनी बी. मुडेकर	भारतातील 29 राज्यांमधील प्रमुख उत्सव व त्यांचे आर्थिक महत्व	527
155	अनिल मोतीलाल वळवी	भिल्ल जमातीतील होळी उत्सव	533
156	प्रो.बी. एस्. पाटील	जीवनातीलविविध सन, उत्सवातून ताणाचे व्यवस्थापन	536
157	डॉ. धनश्री पांडे	सण-उत्सव व लोककला, साहित्य आणि शास्त्रीय संगीत	540
158	डॉ. केपाटील .डी .	सण उत्सवांचे-ग्रामीण विकासात व शेती कार्यातील महत्व	544
159	डॉ.श्रीमती सुजाता चं.पंडित	विद्यार्थ्यांच्या जीवनात सण व उत्सवांचे महत्व	549
160	सौ. सविता नामदेव नांदवडेकर	हिंदू धर्मातील सण व उत्सव यातील स्त्रियांचे स्थान	551
161	प्रा. मच्छिंद्रनाथ मारुती सुर्यवंशी	सण - उत्सव व राष्ट्रीय एकात्मता	556
162	प्रा नासीर एमपठाण .	सण उत्सवातुन अंधश्रध्दा, प्रदूषण आणि आजची तरुणाई	559
163	डॉ. शकुंतला प्र. चव्हाण	वारली सणसमारंभ : एक ऐतिहासिक सांस्कृतिक अभ्यास	563
164	प्रा. शशिकांत एस. संघराज	भारतीय प्रजासत्ताक दिन एक राष्ट्रीय सण	568
165	प्रा.डॉ. सुजय बाबूराव पाटील	श्री क्षेत्र जोतिबा 'खेट्याची' यात्रा	570
166	प्राविकास शंकर पाटील.डॉ.	पाचलला शिमगोत्सवात केले जाणारे लोकप्रिय घुमटनृत्य	572

Sign in to edit and save changes to this...

पाचलला शिमगोत्सवात केले जाणारे लोकप्रिय घुमटनृत्य

प्रा.डॉ.विकास शंकर पाटील
श्री. मनोहर हरी खापणे कला व
वाणिज्य महाविद्यालय पाचल,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

कोकणात शिमगा हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शिमगोत्सवाला येथील लोकजीवनात एक वेगळे स्थान आहे. व्यवसाय, नोकरीच्या निमित्ताने मुंबई वा देशातच नव्हे तर सातासमुद्रापार गेलेला कोकणी माणूसही शिमगोत्सवात आपल्या गावी येतो व आपल्या ग्रामदेवतांचे दर्शन घेतो अशी येथील लोकांची श्रद्धा आहे. कोकणातील या शिमगोत्सवाचे वेगळेपण प्रत्येक गावाने जपले आहे. गावोगावी वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम या शिमगोत्सवात असतात.

पाचल परिसर हा सिंधुदूर्ग रत्नागिरी व कोल्हापूर अशा तीन जिल्ह्यांच्या सिमेवरील परीसरात आहे. येथील शिमगोत्सवही विविध उपक्रमांनी साजरा होतो. पाचल परिसरातील करक गावी देवीची पालखी खुणा शोधतांना दिसते तर रायपाटण गावचे मानकरी मानाचा नारळ वाचवितांना दिसतात. पाचलला तर होळीच्या मांडावर घुमटनृत्य होताना दिसते

शिमगोत्सवात लोककलांचे सादरीकरण होताना दिसते. पाचल परिसरच नव्हे तर रत्नागिरी जिल्ह्यातील लोकप्रिय लोककला प्रकार म्हणजे जाखडीनृत्य होय. या जाखडी नृत्याबरोबरच पाचल परिसरात विशेष लोकप्रिय. असणारे कलाप्रकार म्हणजे घुमटनृत्य गज्जोनृत्य, गोफनृत्य, इ. होत. घुमटनृत्य हे विधीशी संबंधित आहे हे नृत्य परंपरेने ठराविक घराण्यातीलच लोक करतात. गज्जोनृत्य हे धनगर समाजाचे लोक करतात. गोफनृत्य हा मनोरंजक व प्रबोधनपर प्रकार आहे यामध्ये गाफे विनत विनत पुन्हा गीत म्हणत तो गोफ सोडवला जातो. ही तिन्ही लोकनृत्ये पाचलला विशेष लोकप्रिय आहेत. ही तिन्ही नृत्ये शिमगोत्सवात केली जातात. गज्जोनृत्य व गोफनृत्य ही कलाकारांनी आपल्या इच्छेने करावयाची असतात. ती होळीच्या मांडावर सादर केली जातील असे नाही पण घुमटनृत्य मात्र होळीच्या मांडावर रोज रात्री होतेच शिमगोत्सवात साधारणतः आठ ते दहा दिवस हे लोकनृत्य सादर केले जातेच

घुमटनृत्य -

घुमटनृत्य हे पाचल परिसरात केले जाणारे एक लोकप्रिय नृत्य आहे हे पाचल, रायपाटण इत्यादी ठिकाणी सादर केले जाते. हे विधीशी संबंधित नृत्य आहे शिमगोत्सवात प्रामुख्याने हे नृत्य केले जाते.

या नृत्यामध्ये प्रामुख्याने पुरूषच सहभागी होतात तर एक स्रीपात्र असते. पाचलला हे स्त्री पात्र करण्याचा मान सरवणकर घराण्याकडे आहे. या पुरुष पात्राला हुबेहुब स्त्रीपात्र वाटावे इतकी वेशभूषा

Sign in to edit and save changes to this...

हे नृत्य जुन्या मांडावार प्रथम केले जाते तेथून ते पालखी मांडावर स्थिर झाल्यानंतर तेथे सादर केले जाते. यातील घुमटही वैशिष्ट्यपूर्ण असतात मातीच्या मडक्याला तोंडाकडील बाजूस चामडे लावलेले असते. बऱ्याचवेळा मडक्याला दोन बाजूला तोंडे काढलेली असतात दोन्ही बाजूला चामडे लावलेले असते. घुमटवाले विशिष्ट पदन्यास करत गात असतात. राधा (स्त्री वेषातील पुरुष पात्र) मधील बाजूस नृत्य करीत असते पालखीच्या फेऱ्या झाल्यावर पालखी मांडावर विसावते. त्यानंतर जोजतारी हे डफली नृत्य, त्यानंतर घुमट नृत्य सादर केले जाते यावेळीच पूर्वी सोंगे ही सादर केली जात. मध्ये मध्ये ही सोंगे येत असत पण अलिकडे ही सोगांची संख्या कमी झाली आहे. शिमग्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत हे नृत्य मांडावर होत राहते शिमग्याची सांगताही या नृत्यातून होते. यामध्ये घुमट वाजवत गात नृत्य करणाऱ्यांची संख्या चारपेक्षा जास्त असते हे घुमटनृत्य करीत असताना प्रथम फाग गायला जातो. त्यानंतर झुलवा म्हटला जातो.

फाग -

प्रथमतः फागमधून गणेशाचे स्तवन केले जाते.

प्रथम नमू देव गणेशा, चौदा विद्येचा परिपाट
त्याने मती द्यावी, त्याने मती द्यावी।
त्याने मती द्यावी सर्वास शिमगा खेळाया बाहेर।
फाल्गुन मास हो। फाल्गुन मास हो।
फाल्गुन मास पौर्णिमेचा नी खांब धावला होळीचा।

असे गणेशाचे स्तवन या फागातून केले जाते. प्रथम गणेशाला वंदन केले जाते. चौदा विद्येच्या या दात्याने सर्वास शिमगा खेळायची बुद्धी द्यावी. फाल्गुन मासातील पौर्णिमेस होळीच्या मांडावर यावे असे आवाहन केले जाते.

झुलवा -

प्रत्येक फाग म्हटला की, त्यानंतर झुलवा हा म्हटला जातोच.

राधे गोपीचंद राधे, बंगाले नाम राधे।
हाती गोधनाचा भार, गोपी चंदन सरदार।.

फागानंतर येणारा हा झुलवा कृष्ण, राधा, गोकूळ याविषयी माहिती देतांना दिसतो. झुलव्यातून कृष्णलीलांचे वर्णन येताना दिसते. या झुलव्यातून राधाकृष्ण यांचे वर्णन आले आहे अशी फाग व त्यानंतर म्हणावयाची झुलव्यांची संख्या अशी बरीच असते.

घुमट नृत्याची सांगात -

शेवटच्या दिवशी रंग उतरवतांना म्हणावयाचा फाग व झुलवा मात्र ठरलेला असतो.

या या वाटेनी जाती नारी त्यांच्या उरपाट्या घागरी।
उरपाट्या घागरी नी त्यांच्या उरपाट्या घागरी।
या या वाटेने जातो पुरुष, नारी फुकट गळा पडती
फुकट गळी पडती, नारी फुकट गळा पडती।।

Sign in to edit and save changes to this...

साजणी कुणा मी रंग शिमगा खेळू कुणाच्या संगे साजणी।
शिमग्याचा मोठा महिमा, शिमगा खेळू नगरच्या नारी साजणी।।धृ।।

हा झुलवा झाल्यानंतर घुमट नृत्याची सांगता होते त्याप्रमाणे येथील शिमगोत्सवाचीही सांगता होते. यामध्ये सहभागी असणारे शिमगोत्सवात मात्र हजर राहतात. साधारणतः दहा दिवसापर्यंत हे घुमटनृत्य रोज रात्री मांडावार केले जाते विशेष म्हणजे वर्षभरात हे लोक ही गीते कधीही गात नाहीत. त्याला लिखीत परंपरा नाही मात्र मांडावर घुमट उतरल्यावर मात्र ही गीते आपल्याला आपोआप सुचत जातात, ती आठवतात हा देवी प्रसाद असल्याचे हे लोक मानतात.

अशाप्रकारे घुमट नृत्य हे या परिसरातील एक महत्वाचे व लोकप्रिय असे विधींशी संबंधीत नृत्य आहे. हे श्रध्देने केले जाते.

हा नृत्य प्रकार पाचल परिसरात खूपच लोकप्रिय आहे कोकणी माणूस हा परंपरा व रूढी जपणारा, देवाला मानणारा असल्याने या घमटनृत्यात सहभागी होण्यासाठी हे कलाकार शिमगोत्सव काळात घुमट घेऊन हजर राहतात. शिमगोत्सवातच हे नृत्य केले जाते वर्षभर हे मातीचे घुमट या मंडळींना सांभाळावे लागतात. या घुमटांची देखभाल ही मंडळी श्रध्देने करतात. आजच्या विज्ञानयुगात अनेक लोककला ऱ्हास पावत असताना घुमटनृत्य मात्र याला अपवाद ठरताना दिसते यामध्ये पुढच्या पिढीचेही तरूण श्रध्दाभावनेने सहभागी होताना दिसतात. त्यामुळे यामध्ये म्हणावयाच्या फाग, झुलव्याच्या मौखिक गीतांची परंपरा जपली जात आहे. जुन्या नव्या लोककलावंताचा अनोखा संगम यात साधला जात आहे. ही लोककला जतन होताना दिसते आहे ही एक समाधानाची बाब आहे. हे लोकनृत्य विधीशी संबंधीत असल्याने जनमाणसातही या लोकनृत्याविषयी आत्मियता आहे

घुमट नृत्याचे विशेष-

१) यामध्ये सहभागी असणाऱ्या कलावंतांचा हा परंपरागत मान असतो. मनात आले म्हणून यात कोणीही सहभागी होऊ शकत नाही.
२) यामध्ये राधा हे स्त्री पात्र पुरूषच स्त्रीवेषात करतो.
३) गायन, वादन, नृत्य यांचा तिहेरी संगम या घुमट नृत्यात दिसून येतो
४) हे विधीशी संबंधीत नृत्य आहे.
५) यामधील घुमट हे इतरत्र न दिसणारे असे वाजवण्याचे अनोखे साधन आहे.
६) यातील घुमट वाजविणाऱ्यांची संख्या चारपेक्षा अधिक असते.
७) यामध्ये प्रथम फाग व नंतर झुलवा असे क्रमाने गायीले जाते.
८) शेवटच्या दिवशी म्हणावयाचे फाग व झुलवा हे इतर दिवसांपेक्षा वेगळे असतात.
९) याला कोणतीही लिखित परंपरा नाही.
१०) हे नृत्य विधी संबंधीत असल्याने कलावंत व रसिक या दोहोंकडून ते श्रद्धेने केले व पाहिले जाते.

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAP
COLLEGE OF ARTS & COM
/P Raypatan,Tal- Rajapur,Dis

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

Rayat Shikshan Sanstha's
Prof. Dr. N. D. Patil Mahavidyalaya, Malkapur (Perid)

One Day National Interdisciplinary Conference
On

Recent Trends and Issues in Languages, Social Sciences and Commerce

Saturday, 4th January, 2020

Organized by

Department of English, Hindi, Marathi,
Economics, History, Commerce and IQAC

‘लोक माझे सांगाती’ समकालीन प्रेरणादायी आत्मकथा

प्रा.डॉ.विकास शंकर पाटील
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय,
पाचल,ता. राजापूर, जि. रत्नागिरी

महाराष्ट्रात नव्हे तर भारत देशाच्या राजकारणातील एक प्रेरणादायी, यशस्वी व सर्वपरिचीत असा चेहरा म्हणजेच शरद पवारसाहेब होत. दिल्लीच्या राजकारणात महाराष्ट्राचा ठसा ताकतीने व शक्तीने उमटवणारे नेते म्हणून त्यांची ओळख आहे. चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद व तीन वेळा केंद्रीय मंत्रीपद त्यांनी भूषवलं आहे. राजकारण, समाजकारण अर्थकारण ,क्रीडा, विज्ञान, कृषी, शिक्षण साहित्य ,तत्वज्ञान या सर्वांची जाण असणारे व या सर्वात यशस्वी ठरलेले नेते म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे.

सक्रीय राजकारणात ५० वर्षापेक्षा जास्त काळ काम करणारे व आपल्या कार्याचा ठसा सर्वच क्षेत्रात उमटवणारे पवारसाहेब नेहमीच कुतूहलाचा विषय राहिले आहेत. राजकारणातील त्यांच्या या प्रदीर्घ राजकीय वाटचालीचा इतिहास त्यांनी ‘लोक माझे सांगाती’ या आत्मकथेत मांडला आहे.

आत्मकथा /आत्मचरित्र एक वाङ:मय प्रकार

मराठी वाङ़:मयात आत्मचरित्र वाङ़:मय प्रकार अव्वल इंग्रजी कालखंडापासून आपल्याकडे रुढ झाला. प्राचीन मराठी वाङ़:मयात नाना फडणविसांचे आत्मचरित्र ,गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे आत्मचरित्र अशी दोन गद्य आत्मचरित्र दिसतात .संत साहित्यातही नामदेव, तुकाराम,बहिणाबाई इत्यादी संतांच्या काळात स्व विषयीची माहिती आल्याचे दिसते. असे असले तरी आत्मचरित्र लिहिणे ही संतांची भूमिका दिसत नाही. गंगाधरशास्त्री पटवर्धन आपल्या आत्मचरित्रात प्रारंभी “स्मरणात जो सत्य व्यवहार आहे तो लिहून देतो” असे म्हणतात. यावरुन आत्मचरित्र लिहिणे ही त्यांची भूमिका नव्हती. जो भाग आज त्यांना आठवतो पण खरा आहे, तोच मी सांगतो असे ते म्हणतात.

म्हणूनच मराठीत आत्मचरित्र हा प्रकार इंग्रजीसाहित्याच्या वाचनातूनच निर्माण झाला. आत्मचरित्रातूनच आत्मकथनाकडे हा मार्गप्रवास मात्र मराठी साहित्यात झालेला आपणास दिसतो. आत्मचरित्र व आत्मकथन यातील फरक स्पष्ट करताना डॉ. सदा क-हाडे म्हणतात “आत्मचरित्र इतिहासाच्या अंगाने लिहिले जाते, तंर आत्मकथन कथेच्या अंगाने लिहिले

जाते. कालानुक्रमाने लिहिलेल्या आत्मचरित्रात सलगपणा येतो, तर आत्मकथनात घटना, प्रसंग सांगत असतांना कालनुक्रमाने उल्लंघन होते.''[२] क-हाडेंच्या मते, आत्मचरित्रात सलगपणा आलेला असतो तर आत्मकथनात प्रसंग पुढे मागे झालेले दिसतात. डॉ जयंत मनोहर यांनी 'दलित स्वकथने' या लेखात 'स्वकथन' ही संज्ञा दलित आत्मपर लिखाणाला प्रथमच योजलेले आढळते. अलिकडे आत्मचरित्र ही संकल्पना आत्मकथन, आत्मकथा, आत्मनिवेदन, स्वकथन अशा विविध संज्ञानी आढळते आत्मचरित्र या संकल्पनेच्या विविध व्याख्या आभ्यासकांनी केल्या आहेत.

"स्वजीवन तटस्थपणे न्याहाळुन त्यातुन आवश्यक बाबींची निवड करुन त्यांचे प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यातून 'स्व' चे चित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्र होय.''[३]अशी आत्मचरित्राची व्याख्या विमल भालेराव यांनी केली आहे. तर डॉ. सदा क-हाडे यांनी "स्वतःच्या जीवनाचे दुरस्थपणाने सिंहवलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजल निवेदन म्हणजे आत्मचरित्र''[४]

दोन्ही व्याख्यांमधून स्वतःविषयीची माहिती, प्रांजळ निवेदन, तटस्थपणा यांना महत्व असल्याचे दिसते. या बरोबरच सत्यान्वेषी भूमिकेतून लेखन केले पाहिजे हे महत्वाचे आहे. या सा-या व्याख्यांचा परामर्ष घेऊन आत्मकथा याविषयी असे म्हणता येईल की "कोणताही आडपडदा न ठेवता आपल्या जिवनाचा घटनाक्रम जसाच्या तसा शब्दरुपात मांडणे म्हणजे आत्मकथा ."

मराठीत आत्मचरित्र ही मोठ्या प्रमाणात लिहिली गेली आहेत. पुरुषांच्या बरोबरीने स्त्री आत्मचरित्रांची संख्या आहे . रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले. लक्ष्मीबाई टिळक यांच्याबरोबरच मेहरुनिसा दलवाई, कमलाबाई देशपांडे, हंसा वाडकर, माधवी देसाई, सुभा करंदीकर अशा अनेक स्त्रीयांनी आत्मचरित्र लिहिली आहेत.

दलित आत्मकथनातील मराठी साहित्यात स्वतःचे स्थान निर्माण केले. दया पवार, शंकरराव खरात, लक्ष्मण माने, उर्मिला पवार अशा अनेक लेखकांनी आत्मकथनाचा प्रांत समृद्ध केला आणि मराठीत आत्मकथनांची मोठी परंपरा सुरु झाली. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, सिनेमा, खेळ असे कोणतेही क्षेत्र बाजूला राहीले नाही प्रत्येक क्षेत्रात काम करणा-या व्यक्तीने आपल्या जीवनाच्या वाटाचालीतील भलेबुरे अनुभव शब्दबद्ध केले. आपल्या शब्दातून आपल्याच पूर्व जीवनाचा आलेख मांडतांना आपण काम करत असलेल्या क्षेत्रातील खाचखळगे निदर्शनास आणून दिले. समाजाला अनभिज्ञ असणा-या अनेक गोष्टींची मांडणी करुन समाजातील परंपरागत समाजाला धक्के दिले.

लोकांना यशस्वी झालेल्या लोकांची कहाणी त्यांच्याच शब्दात वाचता यायला लागली. 'लोक माझे सांगाती' हे शरद पवारसाहेब यांचे आत्मकथन हे लोकांना या अवलियाची पन्नास वर्षांपेक्षा अधिक वर्षांची राजकीय कारकिर्द दर्शिविणारे आत्मकथन आहे.

'लोक माझे सांगाती'

शरद पवार यांच्या राजकीय जीवनाची ही आत्मकथा राजहंस प्रकाशनाने डिसेंबर २०१५ रोजी प्रकाशित केली. त्याची सहावी आवृत्ती फ्रेब्रुवारी २०१६ रोजी निघाली. यावरुन या. आत्मकथनाची लोकप्रियता लक्षात येते. अर्पण पत्रात काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतच्या प्रत्येक भारतीयास विनम्र सादर असे म्हटले आहे. यावरुन त्याचा आवाका लक्षात येतो. प्रत्येक भारतीयाला अर्पण असाच याचा अर्थ आहे. पवार साहेबांनी आपल्या राजकीय जीवनाचा आलेख यातून मांडला आहे.

एकुण नऊ प्रकरणातून या आत्मकथनाची मांडणी करताना त्यांनी प्रत्येक प्रकरणात आणखी उपप्रकरणांची मांडणी केलेली दिसते. दुस-या आणि तिस-या प्रकरणात प्रत्येकी नऊ उपप्रकरणे आहेत. प्रत्येक उपप्रकरणात त्यांनी आपल्या जीवनातील एका टप्प्याचे वर्णन केले आहे शालेय जीवनातच पवारांचे नेतृत्वगूण उठून दिसत होते. हे त्यांच्या पहिल्या दोन प्रकरणातून स्पष्ट होते .सुर सापडला या प्रकरणापासून म्हणजे १९६० नंतर ते पूर्ण वेळ राजकारणात सक्रिय झाल्याचे पहायला मिळते.

दुस-या प्रकरणात त्यांनी मंत्रीपदाची घेतलेली पहिल्यांदा शपथ ते त्यांनी केलेले कॉंग्रेस विरोधी बंड 'पुलोद' सरकार स्थापून मुख्यमंत्री ते इंदिरा गाधींचा खून, राजीव गांधीचा राजकारणात प्रवेश ते शरद पवारांना पुन्हा कांग्रेसवासी व्हायला लावण्या पर्यंतचा (राजीव गांधीनी) प्रवास आला आहे. यासाठी नऊ उपप्रकरणे त्यांनी खर्ची घातली आहेत.

तिस-या प्रकरणातही नऊ उपप्रकरणातून शरद पवारांचे कॉंग्रेस मधून पुन्हा मुख्यमंत्रीपदी विराजमान होणे, कॉंग्रेसमधील वाद 'एन्रान' आयोध्या प्रकरण, महिला धोरणे असे भाग आले आहेत. पवारांचा कॉंग्रेसमध्ये झालेला पुन्हा प्रवेश ते त्यांना कॉंग्रेस मधून निलंबित करण्यापर्यंतचा भाग आला आहे. यामध्ये त्यांनी महाराष्ट्राबरोबरच दिल्लीत मंत्री म्हणून केलेले काम व त्याबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी घेतलेल्या कणखर भूमिकांची मांडणी यामध्ये केली आहे. देशपातळीवर, आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचं काम किती मोठं होतं याच दर्शन त्यांच्या निवेदनातून घडते.

चौथ्या प्रकरणातील दोन उपप्रकरणातून दिल्लीत घडलेल्या घाडामोडी, त्यातून त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची केलेली स्थापना या विषयी माहिती देताना लोकांच्या मनात

असणा-या अनेक कुतूहलांना त्यानी निवेदनातून उत्तर दिलेले आहे. पाचव्या प्रकरणातील तीन उपप्रकरणातून त्यांनी संयुक्त पुरोगामी आघाडी केंद्रात कशी अस्तित्वात आणली व तिच्या माध्यमातून कारभार कसा चालविला या विषयी माहिती देताना देशाचे कृषीमंत्री म्हणुन भारतीय शेती ,शेतकरी यांच्या समस्या सोडविण्यासाठी कसे प्राधान्य क्रम देऊन काम केले या विषयी माहिती दिली आहे. त्याचबरोबर सरकारमधील इतर मंत्र्याच्या कारभाराची मांडणी केली आहे.

सहाव्या प्रकरणातही तीन उपप्रकरणे आहेत यामधून त्यांनी कर्करोगासारख्या आजाराशी दोन हात कसे केले? त्यावेळी लोकांनी केलेली मदत, त्याचबरोबर ‘संपुआ’ सरकारची कामगिरी व राजकारणा पलिकडे पवारसाहेबांनी केलेली कामगिरी त्यांनी सांगितली आहे. कब्बडी, क्रिकेट अशा कितीतरी खेळाविषयी त्यांनी केलेले कार्य अनमोल आहे. त्याविषयी साहेबांनी माहिती दिली आहे.

सात, आठ, नऊ प्रकरणात त्यांनी समारोप केला आहे. व्यक्ती आणि प्रकृती या सातव्या प्रकरणात त्यांनी त्यांच्या जीवनात पाहिलेली, अनूभवलेली सहवासाने शिकता आलेली माणसे, त्यांचे स्वभाव,त्यांचे कार्य उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.बारामतीची यशोगाथा या प्रकरणात बारामतीच्या प्रगतीचा आलेख उलघडला आहे. येत्या काळात डोकावताना या नव्या प्रकरणात पुढील काळातील समस्यांची मांडणी केली आहे.

पवारसाहेबांचे हे नऊ प्रकरणातून असणारे राजकीय जीवन त्यांनी आपल्या शब्दात सांगितले आहे. पन्नास वर्षांपेक्षा अधिकचा काळ सांगतांना त्यांनी घटनाक्रम मागेपुढे केला आसला तरी त्या घटानाप्रसंगाना थोडक्या शब्दात मांडण्याचे त्यांचे कौशल्य अनेक ठिकाणी दिसते. प्रसंग कितीही मोठा असला तरी तो मोजक्या शब्दात व वाचकाला समजेल अशा भाषेत ते व्यक्त करतात.

निष्कर्ष –

१. पवारसाहेबांनी आपल्या राजकीय जीवनाचा पन्नास वर्षांपेक्षा अधिकचा कालखंड शब्दांकीत करतांना मोजक्या शब्दात खूप मोठा कालखंड सांगितला आहे.

२. शरद पवार यांनी आपल्या राजकीय जीवनाचीच मांडणी यातून केली आहे. राजकारणाशी संबंधितच अधिकांश भाग यात आला आहे.

३. पवार साहेबांनी राजकीय व्यक्तींची मांडणी करताना त्या संबंधीत व्यक्तीचे कार्य, स्वभाव,त्यांचे कर्तृत्व उलगडुन दाखविले आहे.

४. या आत्मकथेत पवारसाहेबांच्या राजकीय जीवनातील अनेक कसोटीचे प्रसंग आले आहेत. संबंधीत प्रसंगी आपली भूमिका कशी बरोबर होती याविषयीची पवारांनी आपली मते नोंदवलेली आहेत.

५. शरद पवारांच्या कार्यांची उंची या आत्मकथनातून समजते. स्वतःविषयीची राजकीय परखड मते व्यक्त करताना कोठेही त्यांचा अहंकार वा आत्मस्तुती येत नाही.

६. हे आत्मकथन राजकारणात राहुनही स्वतःची तत्वे जपना-या एका अवलियाचे आहे. पवारसाहेबांनी वेळप्रसंगी घेतलेल्या भूमिकांचे परखड दर्शन घडविणारे आहे.

७. राजकारणात राहूनही राजकारणाच्या पलिकडे जाऊन मैत्री कशी जपावी हे पवार साहेबांच्या या आत्मकथनातून शिकता येते.

८. एका यशस्वी राजकारणाची ही आत्मकथा वाचकालाही अंतर्मुख करणारी आहे.

९. मोजक्या शब्दात वस्तुनिष्ठ मांडणी हे या आत्मकथेचे बलस्थान आहे.

१०.आजच्या राजकारण्यांना हे आत्मकथन खूप काही शिकवणारे आहे.

संदर्भ –

१. प्राचीन मराठी वाङ:मयाचा इतिहास -ल. रा. लसिराबादकर
२. चरित्र, आत्मचरित्र - डॉ.सदा.क-हाडे
३. आधुनिक मराठी वाङ:मयातील स्त्रीयांची आत्मकथने –विमल भालेराव
४. चरित्र, आत्मचरित्र - डॉ.सदा.क-हाडे

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

Indian Council of Social Science and Research

(ICSSR)Western Regional Centre, Mumbai

and

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS AND COMMERCE, PACHAL

At/post- Rayapatan, Tal- Rajapur, Dist- Ratnagiri

Email-mhkcollegepachal@gmail.com

Re-Accrediated 'B' Grade by NAAC

Jointly Organized

One Day National Level

Multi Disciplinary Conference

On

"Impact of Migration on Rural and Urban Area in India"

On Saturday 29th February 2020

Dr. K. M. Kotwal	**Dr. A. D. Patil**
Principal	Conference Co-ordinator

[illegible] कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc; Without prior permission.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638x
Special Issue No.73

Disclaimer

सन 2011च्या जनगणनेनुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दर हजारी पुरूषामागे 1123 आणि सिंधुदूर्गमध्ये 1036 एवढी स्रीयांची संख्या आहे. त्यासाठी स्त्रीयांना रोजगाराच्या विविध संधी निर्माण केल्या तर येथील स्थलांतराचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. त्यासाठी शासन व स्वयंसेवी संस्थांनी महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी उपक्रम राबविणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने रत्नागिरी जिल्ह्यात माणदेशी फांऊडेशन व डाऊ केमीकल यांनी काम सुरू केले आहे. त्यांनी अनेक गावातील शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेटी देवून महिलांना जागृत केले आहे त्याचा जास्तीत जास्त फायदा घेण्याची गरज आहे. या संस्था महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देवून त्यांना यशस्वी उद्योजिका बनविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी दोन्ही जिल्ह्यातील महिलांचा सहभाग वाढणे गरजेचे आहे. प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना किंवा त्यांच्या गटाला अर्थसहाय्य मिळविणे, कमीत कमी खर्चात उत्पादन सुरू करणे, उत्पादित वस्तू किंवा सेवा यांचे वितरण करणे, बाजारपेठा मिळवून देणे, अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन देणे इ. मदत केली जाते. याचा फायदा महिला बचत गटांनी घेणे गरजेचे आहे. याशिवाय व्यवसाय मार्गदर्शन केंद्रामार्फत अनेक उपक्रम राबविले जातात. त्यांनाही महिला गटांनी सकारात्मक प्रतिसाद दिला तर त्यांना आपले गाव सोडून शहरात धाव घेण्याची गरज भासणार नाही.

कृषी क्षेत्राचा सर्वांगिण विकास

कोकणातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. देशातील अन्नधान्य पिकविणारा शेतकरी सध्या अभूतपूर्व स्थितीतून वाटचाल करत आहे अशा वेळी कोकणातील शेतकऱ्यासमोर अनेक समस्या उभ्या आहेत. त्या सोडविण्यासाठी सरकारने पुढे येणे गरजेचे आहे. पारंपरिक शेती सोडून त्याने आधुनिक पध्दतीने शेती करावी यासाठीचे मार्गदर्शन अपुरे पडत आहे. कोकणासाठी स्वतंत्र बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ दापोली येथे स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापिठाच्या विस्तार विभागाचे काम अपुरे पडत असल्याने जिल्ह्यामध्ये फळबाग लागवड, दुग्धव्यवसाय, पशुपालन, भाजीपाला लागवड, इ. उत्पादनाला जगाच्या बाजारपेठेत चांगली मागणी आहे. आंबा निर्यातीसाठी शासनाने मॅगोनेट योजना सन 2014-15 पासून सुरू केली आहे. या योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांचा आंबा युरोप, अमेरिका व जपानला निर्यात केला जातो. नोंदणी दरम्यान शेतकरी

कोणत्या देशात हापूसची निर्यात करणार आहे त्याची माहिती ऑनलाईन नोंदवून त्या देशाच्या सुचनेनुसार उत्पादन घेतले जाते. सन 2014-15 मध्ये या योजनेत 1706 शेतकरी सहभागी झाले होते. यावर्षीपर्यंत 4336 शेतकरी त्यामध्ये सहभागी झाले आहेत. अशा योजनांचा जास्तीत जास्त फायदा शेतकऱ्यांनी घेतला तर त्यांना चांगली बाजारपेठ मिळेल. काजू आणि इतर पिकांसाठी अशा प्रकारच्या बाजारपेठा मिळवून देण्याच्या योजना सुरू करणे गरजेचे आहे. त्यामुळे शहराकडे जाणारा शेतकरी गावात राहून शेतीकडे लक्ष देईल

संदर्भ -

1. Social Problem in India - Purushottama G. S., Himalaya Publishing House, Mumbai.
2. मराठी विश्वकोष (ऑनलाईन) - महाराष्ट्र राज्य राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ मुंबई.
3. www.un.org, Migration Information.
4. Financing Small Scale Industry - Patra, Mishra & Lall, Discovery Publishing House, New Delhi.
5. वृत्तपत्रे - दै. पुढारी, सकाळ, लोकमत
6. वाटा समृद्धीच्या - सकाळ वर्धपान दिन विशेषांक

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

सक्तीच्या स्थलांतराची दुःखरी नस - झाडाझडती

प्रा. डॉ. विकास शंकर पाटील,
श्री. एम. एच. खापणे कॉलेज, पाचल

प्राचीन काळापासून माणसाचे स्थलांतर सुरू आहे. मानव हा इतर प्राण्यांपेक्षा बुध्दीमान असल्यामुळेच मानव प्राणी शेती करू लागला. इतर प्राण्यांसारखे त्याचे स्थलांतर थांबले. तो एकत्र राहू लागला. मानवाने बुध्दीच्या बळावर विज्ञान, तंत्रज्ञानाच्या साहयाने स्वतःची प्रगती केली. मानव एकत्र वस्ती करून राहू लागला. त्यातूनच गावे, खेडी, शहरे निर्माण झाली. ग्रामीण भागातून शहरीभागात नोकरी, व्यवयास, शिक्षणाच्या निमित्ताने लोक येऊ लागले. यातूनच स्थलांतर सदैव होतच राहिले. विशेषकरून कोकणातून नोकरीच्या निमित्ताने मुंबईला होणाऱ्या स्थलांतराची संख्या मोठी आहे. कोकणात यामुळे खेडी ओस पडत आहेत. ही स्थलांतराची समस्या कोकणात खूपच मोठी आहे. नोकरी, शिक्षण, व्यवसाय यासाठी जसे स्थलांतर होते त्याप्रमाणे मानवाने आपल्या विकासासाठी अनेक व्यवसाय, उद्योग निर्माण केले. शेतीविकासासाठी अनेक नव्या योजना आणल्या. बारमाही शेती ओलीताखाली रहावी म्हणून त्याने धरणांची निर्मिती केली. धरणांच्या निर्मितीतून खूप मोठा जमिनीचा भाग पाण्याखाली आला. उत्पन्न वाढले. पण जमिनीतून भरघोस पिक मिळवायचे असेल तर आधी काही दाण्यांना स्वतःला जमिनीत गाडून घ्यावे लागते. त्याप्रमाणेच धरण बांधत असताना अनेक गावांना या धरणाच्या क्षेत्रात गाडून घ्यावे लागले. लोकांना जमिनीवर तरारून आलेले पिक दिसते पण जमिनीत गाडून घेणारे दाणे दिसत नाहीत. त्याप्रमाणेच धरणांमुळे ओलिताखाली आलेली जमिन आपणाला दिसते पण त्या धरणाच्या पोटात गडप झालेल्या गावातील लोकांच्या व्यथा वेदना मात्र कोणाला दिसत नाहीत. दुसऱ्यांचे भाग्य उजळण्यासाठी सक्तीने या लोकांना स्थलांतरीत व्हावे लागते. आपला गाव, आपली गावपांढरी सोडून दुसऱ्यांच्या गावी या लोकांना परागंदा व्हावे लागते तेथील गावाच्या बाहेर ही धरणग्रस्तांची वस्ती असते. आयुष्यभर धरणग्रस्त म्हणून हेटाळणी या लोकांच्या भाळी लिहिली जाते. यांचे स्थलांतर होत असताना शासकीय पातळीवर होणारी या गोर गरीब जनतेची पिळवणूक, लालफितीत अडकलेला शासकीय कारभार आणि अधिकाऱ्यांची माजोरी, गावातील राजकारण आणि त्यातच तपलेले अर्थकारण, स्वार्थाने गाठलेली परिसिमा व मानवी मनातील भावभावनांचे प्रत्ययकारी दर्शन या धरणग्रस्तांच्या पुनर्वसनातून आपणास दिसते. शासनाने मानवी विकासासाठी निर्माण केलेल्या व आणलेल्या योजनात गोरगरीब जनतेची कशी होरपळ होते, त्यातून या लोकांचे कसे स्थलांतर होते याचे दर्शन अनेक मराठी कादंबऱ्यातून घडते. धरणग्रस्तांच्या दुःखाचा आलेख मांडणारी 'झाडाझडती' ही अशीच एक कादंबरी आहे की जी धरणग्रस्तांच्या जीवनाची झाडाझडती घेते.

- **विश्वास पाटील यांचा स्थलांतराशी संबंध -**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागात आय.ए.एस. अधिकारी म्हणून यशस्वीपणे काम करणारे विश्वास पाटील हे मराठीतील प्रतीतयश लेखक आहेत. अंबी, पांगिरा, क्रांतिसूर्य, पानिपत, झाडाझडती, महानायक यांसारख्या कादंबऱ्या लिहून मराठी वाडमयात आपला वेगळा ठसा त्यांनी उमटवला आहे

शासकीय सेवेत काम करतांना सामान्य माणसांच्या प्रश्नांची जटिलता व ती सोडवण्याची त्यांची असणारी तळमळ ही त्यांच्या 'झाडाझडती' कादंबरीच्या लेखनातून दिसून येते. १९९१ साली त्यांची 'झाडाझडती' कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीने सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्व पातळ्यांवर ग्रामीण जीवनाशी, मातीशी जुळलेले नाते आणि ते तुटत असताना सामान्य माणसांची होणारी तगमग चित्रित केली आहे. धरणग्रस्तांच्या मुक्या वेदनांना धारधार शब्दांनी प्रकट करण्याचे सामर्थ्य विश्वास पाटलांनी यातल्या पात्रांना दिले आहे. अनेक धरणग्रस्तांच्या स्थलांतराच्या प्रश्नाला भिडण्याचे काम या कादंबरीने केले आहे.

शासकीय सेवेत काम करताना सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असल्यामुळेच विश्वास पाटलांनी विविध ठिकाणांच्या धरणग्रस्तांची माहिती घेऊनच या कादंबरीचा पट उलगडला आहे. धरणग्रस्त या शब्दातील सदैव दुखरी नस त्यांनी अचूक पकडली आहे.

- **झाडाझडती-स्थलांतरीतांच्या दुःखाची सदैव दुःखरी नस**

'झाडाझडती' कादंबरीच्या शिर्षकाप्रमाणेच विश्वास पाटलांनी धरणग्रस्तांच्या दुःखाची, व्यथा-वेदनांची, होणाऱ्या फरफटीची झाडाझडती घेतली आहे. एखादे पूर्ण झालेले धरण बघतांना आपणास खूप मोठे समाधान वाटते. त्या धरणातील जलसाठा आणि धरणाच्या क्षेत्रातील ओलिताखाली आलेली जमीन पाहिल्यावर आपणास समाधान वाटते पण याच धरणाकडे पाहताना आपल्या पूर्वाआयुष्याचा पट डोळ्यासमोर येऊन, आपले अस्तित्वच संपवून टाकणाऱ्या त्या धरणाकडे घृणास्पदपणे नेत्रकटाक्ष टाकून त्या आठवणींनीपासून दूर जगणारा धरणग्रस्त, सर्वसामान्यांपासून, या धरणग्रस्तांच्या दुःखात स्वतःचे हात ओले करून घेणाऱ्या, समाजातील सर्वच घटकांना डोळ्यासमोर उभा करण्याचे काम विश्वास पाटलांनी उत्तम प्रकारे केले आहे.

जांभळी गाव धरणामुळे उठणार आहे हे समजताच जांभळीकरांचा संघर्ष सुरू होतो शासनाच्या कोणत्याही योजनेस प्रकल्पबाधितांचा जसा विरोध होतो, त्याप्रमाणेच येथेही विरोध होतो. जातीने हरिजन असणारा पण पेशाने शिक्षक असणारा वसंता खैरमोडे या साऱ्यांचे नेतृत्व करतो गावची जागृत देवता काळूबाई आपल्या लढ्याला यश देईल या आशावादाच्या बळावर गावकरी मोठा संघर्ष उभा करतात. खासदारांना विकासाच्या नावाखाली हा प्रकल्प रेटायचा आहे. त्यामुळे ते ही खैरमोडे गुरूजींना विकासासाठी कोणीतरी झीज सहन करायला पाहिजे अशा शब्दांत विणवितात. खासदार व शासनाकडून प्रकल्पाचा रेटा सुरू होतो. जांभळीवासीय सर्व सामर्थ्यानिशी या प्रकल्पाला कडाडून विरोध करून हा प्रकल्प न लादण्याची विनंती करतात. परंतु मायबाप सरकार सामान्य माणसांच्या विकासाच्या नावाखाली सर्वसामान्य माणसांनाच नागवतात. शासकीय यंत्रणेचा सढळ हाताने वापर करत साध्योभोळ्या जांभळीवासीयांना सरकारी सापळ्यात अडकवले जाते.

खैरमोडे गुरूजींचा संघर्ष हा सर्वसामान्य माणसांना न्याय मिळावा यासाठी आहे. त्या वेळी गावच्या या संघर्षात केंद्रस्थानी राहून गावकऱ्यांना न्याय देण्यासाठी ज्याने प्रयत्न करायला हवेत तो सरपंच मात्र या संघर्षात आपला कसा फायदा होईल या विचाराने आपल्या तुंबड्या भरून घेण्यात गर्क असल्याचे दिसते. धरणग्रस्तांना जमीनी देतांना मोठा भेदभाव झाल्याचे आपणास दिसते. सरपंच आणि त्याच्या चेल्यांना चांगला लाभ होतो. खासदारांचा मुलगा सर्जेराव आपणास हवी ती जमिन सरकारी अधिकाऱ्यांना विविध प्रलोभने दाखवून आपल्या पदरात पाडून घेतो. या जमीनवाटपात परवड होते ती निरक्षर, अज्ञानी, साधेभोळे दरिद्री, मोलमजुरी करून जगणाऱ्यांची.

'धरणग्रस्त' होणे म्हणजेच आपल्याच मुलखातून आपण परागंदा होण्यासारखे आहे. आपला संसार, जनावरं, आपले देव, संस्कृती आपल्या पाठीवर घेऊन भटकत राहणे. हे जीवन असे आपल्याच पिढीच्या नाही तर पुढील कित्येक पिढ्यांच्या वाट्याला येणे या वास्तवाची जाणिव असल्याने चिवट खैरमोडे गुरूजी संघर्ष करत राहतात. गावकऱ्यांच्या मनातील स्वाभिमान जागवत राहतात. त्यांच्यातील संघर्षाची ज्योत तेवत ठेवतात पण त्यांच्यावरच खोटेनाटे आरोप लावून त्यांनाच अटक केले जाते. गुंडाकरवी मारहाणीचेही प्रकार होतात. पण कोणत्याही धाकधपटशहांना न घाबरता गुरूजी गावकऱ्यांसाठी संघर्ष करत राहतात. त्यांनाही कौटुंबिक पातळीवर सुख नाही. देखण्या मुलीच्या लग्नाच्या काळजीने ते अस्वस्थ होतात. स्वतःच्या तत्वाविरोधी जावून मुलीच्या लग्नात हुंडा देतात. तरीही ती दोन लेकरांसह माघारी येते. सत्ता, संपत्ती याने माजोर झालेले लांडगे तिच्यावर बलात्कार करतात पण थकल्या गात्रात रग असूनही लेकीच्या अब्रुपायी मास्तरांना गप्प बसावे लागते. आता आपल्याला शिक्षणच या बुडण्यापासून वाचवू शकेल तेव्हा तुम्ही खूप शिका असा मुलांना पोटतिडकीने सल्ला देणारा हा हाडाचा शिक्षक झोपेतच गतप्राण होतो. त्यांच्या प्रेतालाही स्मशानात खोळंबावे लागते. ही खूप मोठी शोकांतिका त्यांच्या वाट्याला येते.

हैबती, सुभानराव यासारखी पात्रे संघर्ष करताना दिसतात. आपल्या नोकरीसाठी हेलपाटे मारणारा हैबती शेवटी आपल्या वाट्याच्या जमिनीसाठी संघर्ष करतो. धनदांडग्याच्या अहंकारातून त्याला मारले जाते. त्याच्या नशिबी दवाखानाही येत नाही. मध्येच त्याचा मृत्यू होतो सुभानरावासारखा संघर्ष करणारा तरूण नियती बनून धनदाडग्यांनी उभ्या केलेल्या संकटासमोर गुडगे टेकतो व परिस्थितीला शरण जाताना दिसतो. मुलाच्या मृत्यूचं दु:ख पचवूनही साऱ्या जांभळीवासीयांना न्याय मिळावा म्हणून आपल्या दु:खण्यातून उठून कणखरपणे संघर्ष करण्यासाठी पुढे येणारी आवडाई गुरूजीनंतर धरणग्रस्तांना बळ देतांना दिसते तरणाबांड गडी शिवा डोझरखाली चिरडला जातो. जीवंत असतानाही आपल्याच सावत्र सरपंच मुलाने तिला मृत दाखवून तिचे पैसे हडपल्याने बनुबाई म्हातारपणी वनवासी होते. पांडू येताळाच्या मास्तर मुलाने मन सासूरवाडीला गहाण टाकल्याने रडणारा पांडू येताळ दु:खी दिसतो देशमुख साहेबांसारखा कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी भ्रष्ट आणि लाचार व्यवस्थेला कामातला अडथळा वाटतो. वंशपरंपरेने सत्ताकेंद्र आपल्या घरात रहावे म्हणून तडफडणारे दत्तू सरपंच, सर्जेराव, लाला जाधव यासारखे सत्तापिपासू येथे दिसतात. कमी कष्टात जास्त कमाई करण्याचे तंत्र अवगत असलेले व हे करत असतांना प्रसंगी एखाद्याचा जीव घेण्याची तयारीही असलेले राघू भिवा, ताया कांबळे यांच्यासारखे दलालही येथे दिसतात.

शेवंतावर होणारा बलात्कार, आवडाईच्या डोळ्यासमोर हैबतीचं जाणं, शिवाच्या जाण्यानं जमीनीसाठी वणवण भटकणारी नकुसा ही सारीच स्त्री पात्र अस्वस्थ करणारी आहेत. गावाची जागृत देवता जशी बिनमंदिराची आहे तसेच दु:ख या स्त्रीयांच्या वाट्याला येताना दिसते. हैबतीच्या जाण्याने आवडाई व तिची सून यांचे छत्र हरवते. गुरूजींच्या जाण्याने शेवंताचे तर शिवाच्या जाण्याने नकुसा एकाकी होते. येथील स्त्री जीवनही खूपच दयनी आहे.

झडती म्हणजे सूक्ष्म तपासणी, धांडोळा तर झाडाझडती म्हणजे कवडीकवडीचा हिशेब घेणे, जाब विचारणे होय. याप्रमाणेच विश्वास पाटलांच्या समर्थ लेखनशैलीतून धरणग्रस्तांच्या वेदनांचा सूक्ष्म आलेख मांडला गेला आहे. स्थलांतराचे दु:ख किती मोठे असते याचे वास्तव मांडले आहे. दुसऱ्याच्या भूमीत आपण गेल्यावर तिथले भूमीपुत्र व ढोंगी, कावेबाज, स्वार्थी लोक या स्थलांतरीतांना कसा त्रास देतात याची मांडणी केली आहे. आपली

भूमी सोडून आपण जेव्हा दुसऱ्यांच्या गावात वास्तव्य करतो त्यावेळी कधीही न साधला जाणारा सांधा अलिप्तपणा कसे कायम रहाते, हे सांगितले आहे. या स्थलांतरणाने 'धरणग्रस्त' ही नवी जातच जन्माला घातल्याचे लेखकाने निदर्शनास आणून दिले आहे. हा विकास वाटत असला तरी तो विनाशही आहे. याविषयी आशा सावदेकर असे म्हणतात, "अगतिक अशा सामान्य माणसांची, शोषितांची त्यांना गिळू पाहणाऱ्या अधिकार धुंद माणसांशी चालणारी ही एकांगी, एकाकी अशी झुंज आहे. अर्थसत्ता, राजसत्ता आणि अधिकार वापरून निसर्गाला पायदळी तुडवायला निघालेली बकासुरी वृत्ती आता भूमीलाच गिळायला निघालेली दिसते त्यातून जन्माला येते खऱ्या भूमीपुत्रांची सामूहिक शोकान्तिका, जिची कारणे बदलणाऱ्या संस्कृतीत दडलेली असतात. माणसे, त्यांची जमीन, पिके, जनावरे आणि त्यांना एकसूत्रात बांधणारे, निसर्ग पूजणारे मन या उतरंडीचाच विनाश या नव्या वातावरणात दडलेला असतो."[१] एका बाजूला सत्ता, सत्तेचा चढलेला माज, त्यातून आलेली अहंकारी वृत्ती आणि जगण्यासाठी संघर्ष करणारा व परंपरा जीवापाड जपू पाहणारा समाज यांच्यात संघर्ष हा होतच राहतो. दुर्दैवाने सारी व्यवस्थाच गिळंकृत करू पाहणाऱ्या या व्यवस्थेचाच विजय होताना दिसत आहे त्यामुळे त्यांचा हा विजय सर्वांनाच नाशाकडे घेऊन जाणारा आहे असे सावदेकरांना वाटते.

एकंदरीतच या कादंबरीच्या प्रारंभी जमीनीचा मालक असणारा हा मुळ मालक कादंबरीच्या शेवटाला मात्र याच जमिनीवर उभारल्या गेलेल्या धरणावर, धरण परिसरात होणाऱ्या उद्योगधंद्यावर, त्यांच्या मालक लोकांच्या बंगल्यावर चपराशी, शिपाई म्हणून काम मिळावे भविष्यात अशी आशा धरावी लागणारी हीच या भूमीची लेकरं "अजून खूप लढायचं होतं, झगडायचं होतं, प्रश्नांचे डोंगर शिल्लक होते. झाडाझडती काय एवढ्या लवकर संपणार आहे?"[२] या प्रश्नाने कादंबरी संपते. म्हणजे स्थलांतराचे प्रश्न हे कधीही न संपणारे आहेत हेच लेखकाने अधोरेखित केलेले आहे. पैसा हा सर्वच नाती संपवताना येथे दिसतो. त्यालाच कोण विकास म्हणतं, कोण झाड सोसणं म्हणतं तर कोण जीवन घडवणं म्हणतं. लेखकाने या कादंबरीचा विशाल पट उलगडून वाचकांना अस्वस्थ करणारा अनुभव दिला आहे.

निष्कर्ष -

१) झाडाझडती ही धरणग्रस्तांच्या स्थलांतरणातून स्थलांतरीतांच्या न संपणाऱ्या प्रश्नांचा आलेख मांडते.

२) झाडाझडतीतून स्थलांतरामुळे आपल्याच गावच्या लोकसंस्कृतीला पारखे झालेले लोक, त्यांची वेदना समजते.

३) स्थलांतरीत झालेल्या ठिकाणाचे लोक धरणग्रस्तांना आपल्या गावचे घटक मानायला तयार होत नाहीत. उलट त्यांनी जमिनी बळकावल्या ही कटूता वाढते.

४) धरणग्रस्तांना आपल्या संस्कृतीबरोबरच स्थलांतर झालेल्या गावचीही संस्कृती आपलीशी करावी लागते.

५) स्वतःची गावपांढरी सोडून येतानाचे दुःख आणि पुन्हा त्या गावपांढरीकडे परकेपणाने पाहताना धरणग्रस्तांच्या मनाची होणारी घालमेल वाचकांनीही अस्वस्थ करणारी आहे.

६) धरणग्रस्तांचे पुनर्वसनात होणारे हाल, पुनर्वसनासाठी करावा लागणारा संघर्ष हा न संपणारा आहे.

७) स्थलांतरणात शासकीय व्यवस्थेशी जुळवून घेणारे आपले स्वार्थ साधतात तर संघर्ष करणाऱ्यांच्या वाट्याला दुःख आणि वेदना यापलीकडे काही येत नाही.

८) पायाचा दगड जसा दिसत नाही तसे धरणासाठी स्थलांतरीत झालेले लोक व त्यांचे प्रश्न या निगरगट्ट व्यवस्थेला दिसत नाहीत.

९) धरणग्रस्तांचे होणारे हे स्थलांतर सक्तीचे असल्याने येथे धरणग्रस्तांच्या संघर्षाला शासकीय यंत्रणेच्या दबावाला बळी पडावे लागते.

१०) धरणग्रस्त स्त्रीयांच्याही वाट्याला न संपणारे दुःख आणि वेदना येताना दिसतात धरणग्रस्त संघर्षात स्त्रीयाही पुरूषांच्या पेक्षा जास्त संघर्ष करताना दिसतात.

संदर्भ -

१) मराठी कादंबरी आस्वाद यात्रा, संपादक - विजया राजाध्यक्ष, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पान नं. 324
२) झाडाझडती - विश्वास पाटील, राजहंस प्रकाशन, पुणे.

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPA
COLLEGE OF ARTS & COM.P
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

National Conference on Impact of Migration on Rural and Urban Area in India
Organized By :- Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerece , Pachal

Feb. 2020

भारतातील स्थलांतराची कारणे आणि उपाय योजना

प्रा.डॉ. सुधीर सोपान वाघमारे
श्री.मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य
महाविद्यालय पाचल -रायपाटण
ता.राजापूर जि.रत्नागिरी

१.१ सारांश :-

स्थलांतर हि पूर्णतः मानवी घटकाच्या परिवर्तनाचा परिपाक असुन मानवी समूहाच्या सामाजिक व आर्थिक दृष्यात जे भेद असतात. त्यांना दिलेला मानवी प्रतिसाद असतो.म्हणजेच स्थलांतर हि एक नैसर्गिक प्रक्रिया असल्यामुळे जगातील सर्वच देशांमध्ये ती आढळते.एवढेच नव्हे तर स्थलांतर आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो.मनुष्य प्राण्यांमध्ये अगदी इतिहास पूर्व काळापासून स्थलांतर आढळून आले आहे.स्थलांतराचा ऐतिहासिक आढावा घेतल्यास असे दिसून येते कि, मानव स्थलांतर करीत पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात गेल्याचे पुरावे उपलब्ध आहेत.किंबहुना स्थिर वस्ती करून राहणे हि सांस्कृतिकउत्क्रांतीमानली जातेआर्य टोळ्यांचे उत्तर युरोपातून दक्षिणेस व नंतर पूर्वेस आशियात झालेले स्थलांतर (इ.पू.तिसरे सहस्र),इजिप्तमधून हिब्रू गुलामांचे उत्तरेकडे झालेले स्थलांतर(इ.पू.तेरावे शतक)हि स्थलांतराची काही महत्वाची उदाहरणे सांगता येतील.विशेषतः अंतर्गत स्थलांतरामुळे शहरात मोठ्या प्रमाणात मजुरांचा पुरवठा होऊन उत्पादनाला गती मिळते. परंतु तेच स्थलांतर अति प्रमाणात झाल्यास त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासास खीळ बसते.त्याचबरोबर भाषा,प्रांत व इतर वाद वाढत जातात.म्हणूनच संबधित शोधनिबंधामध्ये भारतातील स्थलांतराची स्थिती,कारणे,लक्षणे,निर्माण होणाऱ्या समस्या व त्यावर उपाय योजना इत्यादीवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न संशोधन कर्त्याने या लेखात केला आहे.

१.२ प्रस्तावना:-

गेल्या तीन शतकांमध्ये प्रत्येक देशात कमी अधिक प्रमाणात औद्योगीकीकरण होत आहे.औद्योगिक केंद्राजवळ नगरांचीची वाढ होणे आणि ग्रामीण भागातून अशा नगरांकडे स्थलांतराचा वाढत असलेला ओघ आढळणे हे विसाव्या शतकातील सार्वत्रिक दृश्य आहे.स्थलांतराचे वाढते प्रमाण हे देशाच्या आर्थिक प्रगतीचे निर्देशक आहे.असे म्हटले तर वावगे ठरू नये.कारण स्थलांतर हि एक नैसर्गिक प्रक्रिया असल्यामुळे जगातील सर्वच देशांमध्ये ती आढळते.शिवाय स्थलांतराला ऐतिहासिक आधार आहे.आर्य टोळ्यांचे उत्तर युरोपातून दक्षिणेस व नंतर पूर्वेस आशियात झालेले स्थलांतर (इ.पू.तिसरे सहस्र),इजिप्तमधून हिब्रू गुलामांचे उत्तरेकडे झालेले स्थलांतर (इ.पू.तेरावे शतक) हि स्थलांतराची काही महत्वाची उदाहरणे सांगता येतात.

एखाद्या प्रदेशात बाहेरून किती लोक रोजीरोटीसाठी येतात म्हणजेच स्थलांतराच्या आकडेवारीचा पडताळा शहरी बेरोजगारीच्या प्रमाणाशी करून पहिला तर त्या प्रदेशातील रोजगारक्षम शहरे कशी वाढताहेत याचाही अंदाज येतो.देशाच्या आर्थिक सर्वेक्षणातील केवळ काही पानांच्या अभ्यासातून या अंदाजाला बळकटी मिळते.स्थलांतरामुळे लोकसंखेच्या आकारात,स्वरुपात घडून येणारा बदल हा फार जलद असतो.अर्थात हे स्थलांतराच्या प्रमाणावर व प्रवृत्तीवर निर्भर असतेआपल्या देशातील एकूण लोकसंख्या वाढीचा असलेला जास्त वेग व त्यामुळे निर्माण झालेली बेरोजगारीची समस्या,देशाच्या कामगार संख्येत दरवर्षी पडत असलेली १ कोटी २० लाख उमेदवारांची भर,रोजगारनिर्मितीची निकड,बेकारीमुळे तरुणांमध्ये असलेला असंतोष,मागील काही वर्षामध्ये देशामध्ये घडून आलेला रोजगाराविना विकास यामुळे भारतात स्थलांतराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत

चालले आहे. हे आपणाला भारतातील दिल्ली,मुंबई,अहमदाबाद,सुरत,पुणे,बंगळूर अशा शहरातील सद्य स्थितीवरून आपल्या लक्षात येते.शिवाय अति स्थलांतरामुळे त्या शहरातील विविध सामाजिक समस्यांचेप्रमाणही वाढले आहे हे नाकारून चालणार नाही.

१.३ संशोधनाचा उद्देश

१ स्थलांतर हि संकल्पना समजून घेणे. २ भारतातील काही राज्यातील स्थलांतराची स्थिती जाणून घेणे.
३ स्थलांतराची कारणे समजून घेणे. ४ स्थलांतरामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा आढावा घेणे.
५ स्थलांतर रोखण्यासाठी उपाय सुचविणे.

१.४ तथ्य संकलन पद्धती :- प्रस्तुत शोधनिबंधाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे.त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ,मासिके, संशोधनपेपर, इंटरनेट इत्यादीचा वापर करून तथ्य संकलन करण्यात आले आहे.

१.५ स्थलांतर संकल्पना :- मानवाच्या गतिमानते पैकी दिशिष्ठ प्रकारची गती 'स्थलांतर' या संकल्पनेत अंतर्भूत होते.लोकसंख्याशास्रीयदृष्ट्या स्थलांतर म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होणारे मानवाचे स्थलांतर असा अर्थ असला तरी स्थलांतर या संकल्पनेत दोन ठिकाणातील अंतर,हेतूव कालावधी यांना महत्वाचे स्थान असते.

व्याख्या:-

"स्थलांतर म्हणजे विशिष्ट कालावधीत एका भौगोलिक स्थानातील अथवा प्रदेशातील निवास सोडून त्या स्थाना व्यतिरिक्त इतर स्थानाकडे कींवा प्रदेशात वास्तव्यासाठी प्रयाण होय"

कींवा

"दिविध कारणास्तव आपले राहते घर कींवा प्रदेश सोडून इतर परक्या प्रदेशामध्ये वास्तव्यास जाणे या प्रकारास स्थलांतर असे म्हणतात.

१.६ स्थलांतराची लक्षणे :-

१.स्थलांतर या प्रक्रियेत तरूण गटाचा सहभाग अधिक असतो.
२. स्थलांतरामध्ये पुरुषांचे प्रमाण अधिक असते.
३.स्थलांतरामध्ये आर्थिक उत्पादन करण्याची क्षमता असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आढळते.
४. देशांतर्गत स्थलांतरामुळे आर्थिक प्रगतीचा वेग वाढतो.
५. स्थलांतरीतांचे वास्तव्य बहुधा शहरी विभागात असल्याने त्यांच्या मुलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अधिक आढळते.

१.७ भारतातील स्थलांतराची स्थिती :-

भारत हा एक विकसनशील देश असुन भारतातील जि विविध राज्ये आहेत. त्या राज्यांमध्ये आपणाला प्रादेशिक विषमता आढळते.म्हणजेच काही राज्ये विकसित आहेत तर काही मागासलेली आहेत. त्यामुळे मागास राज्यांमधून विकसित राज्यांमध्ये रोजगारासाठी स्थलांतर होते.भारतातील आणि राज्यातील स्थलांतराचे २००१ ते २०११ या काळातील देशातील एकूण स्थलांतर आणि तामिळनाडू, महाराष्ट्र, हरियाना,गुजरात,पंजाब,केरळ,कर्नाटक व प.बंगाल या आठ अधिक विकसित राज्यांचा अभ्यास केला असता. २००१ ते २०११ या दहा वर्षामध्ये भारताच्या लोकसंख्येत प्रत्यक्ष वाढ १७.६४% तर नैसर्गिक वाढ १४.७% होती.म्हणजेच देशामध्ये गेल्या १०

वर्षात २.६४% इतके स्थलांतर झाले हे स्पष्ट होते.तर राज्यातील स्थलांतराची स्थिती आपणाला खालील तक्त्यात दर्शविता येते.

राज्यातील स्थलांतर आणि बेरोजगारी (२००१-२०११)

राज्य	लोकसंख्या प्रत्यक्ष वाढ	लोकसंख्या नैसर्गिक वाढ	स्थलांतर	शहरी बेरोजगारी
तामिळनाडू	१५.६	८.५	७.१	३.२
महाराष्ट्र	१६.०	१०.४	५.६	३.२
हरियाना	२०.०	१५.३	४.७	२.५
गुजरात	१९.२	१४.६	४.६	१.८
पंजाब	१३.७	९.४	४.३	४.८
केरळ	४.९	८.२	-३.३	७.३
कर्नाटक	१५.७	११.७	४.०	२.७
प.बंगाल	१३.९	१०.१	३.८	४.०

संदर्भ - १ आर्थिक सर्वेक्षण २०१३-१४ पृ. २७६,२७७
२सर्व आकडे टक्केवारी दर्शवितात.
३ बेरोजगारी २००९-१० मधील आहे.

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते कि, तामिळनाडू मध्ये स्थलांतराचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्याखालोखाल महाराष्ट्रात स्थलांतराचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेने जास्त आहे.तर केरळ हे अपवादात्मक राज्य दिसते. या राज्यातील लोक(कामगार) मोठ्या संख्येने राज्य सोडून कामासाठी इतर राज्यात किंवा परदेशात जात आहेत. असे स्पष्ट दिसते.कारण लोकसंख्येची प्रत्यक्ष वाढ नैसर्गिकवाढी पेक्षा कमी आहे. शिवाय तेथे शहरी बेरोजगारीचे प्रमाण ७.३% (भारतात सर्वात जास्त) आहे. इतर राज्यातील

बेरोजगारीचा विचार केला असे दिसते,की ग्रामीण-शहरीस्थलांतराचा दर हा शहरी निर्मिती पेक्षा जास्त असतो. त्यामुळेच आपणाला सर्वच राजांमध्ये बेरोजगारी असल्याचे दिसते.

१.८ स्थलांतराची कारणे:-

स्थलांतराचे सामाजिक-सांकृतिकसंदर्भ महत्वपूर्ण असल्याने स्थलांतरासंबंधी सर्व साधारण व सर्व मान्य नियम किंवा सिद्धांत ठरवणे अजूनहीशक्य झालेले नाही.भारतासारख्या विकसनशील देशाचा विचार केल्यास देशांतर्गत स्थलांतर विशेषतः ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होते. त्याची कारणे आपणाला खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) ग्रामीण भागात रोजगारीचा अभाव.
२) वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीचे विभाजनहोवून अल्पभूधारक व भूमिहीनांचे वाढते प्रमाण.
३) अधिकचांगलेआर्थिकभवितव्य.
४) शहरीभागात असणाऱ्या रोजगारांच्या संधी आणि उच्च वेतन दर.
५) अन्नाचा तुटवडा.
६) ग्रामीण भागातील अल्प मजूरीव दारिद्रय.
७) प्राथमिक गरजांच्या पूर्णतेचा अभाव.

८) जीवनावश्यक सेवांचा लाभ.
९) शहरातील सुयोग्य वातावरण.
१०) शहरी भागातील उच्च शिक्षण आणि आरोग्य सुविधा.
११) व्यवसायाच्या मोठ्या प्रमाणातील संधी.
१२) धार्मिक विटंबना व छळ.

इत्यादी अनेक विविध कारणे स्थलांतरामागे आढळतात. स्थलांतर ही प्रक्रिया सामाजिक, सांस्कृतिक,मानसिक,आर्थिक,भौगोलिक अशा विविध घटकांच्या आंतरक्रियाचा परिपाक असते.

१.९ स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या समस्या :-

ग्रामीण -शहरी कींवा एका राज्यातून दुसऱ्याराज्यांमध्ये होणारे स्थलांतर सुरवातीस पोषक ठरत असले तरी अति स्थलांतरामुळे संबधित प्रदेशात मोठ्या प्रमाणात समस्या उद्भवतात.त्या खालीलप्रमाणे

१.झोपडपट्ट्यांच्या संख्येत वाढ
२. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर ताण
३. शिक्षण,आरोग्य,पाणी पुरवठा इ.सामाजिक सेवा आणि सुविधांवर ताण
४.भाषा व प्रांत वादामध्ये वाढ
५.आगमन प्रदेशात संपदा(साधनसामग्री) -मानव गुणोत्तर बदलते.
६. नियोजनामध्ये अडथळे निर्माण होतात.
७. निर्गमन क्षेत्रात आर्थिक परावलंबन वाढते.मनुष्य बळ कमी झाल्याने आर्थिक उत्पादनात घट होते.
८. चोरी,दरोडे,खंडणी,अपहरण,यासारख्या गुन्ह्यात वाढ होते.
९.शहरी बेकारी,दारिद्र्य यात वाढ होते.
१०. शहरांची अनियोजित वाढ होते.
११. अल्पसंख्याक -बहुसंख्यांक असा वाद वाढत जातो

१.१० स्थलांतर रोखण्यासाठी उपाय योजना :-

स्थलांतरहे आर्थिक विकासास पोषक असले, तरी अति स्थलांतरामुळे वरील अनेक समस्या उद्भवतात.त्यामुळे सामाजिक एकता,ऐक्यता याला बाधा येऊन समाजात अशांतता पसरते.त्याचा विपरीत परिणाम आर्थिक विकासावर होऊन आर्थिक विकासाचा वेग मंदावतो.म्हणून स्थलांतर रोखण्यासाठी खालील उपाय योजना करणे गरजेचे आहे.

१. स्थानिकांना विश्वासात घेऊन उद्योगांची उभारणी करावी.
२. स्थानिक कच्या मालाची उपलब्धतता विचारात घेऊन लघु उद्योगांची उभारणी करावी.
३. स्वयं-सहायता गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासाला चालना द्यावी.
४. शेती आणि शेती पूरक व्यवसायाच्या विकासाला चालना द्यावी.
५.वाहतूक दळणवळण सुविधांत वाढ करावी.
६ स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.
७.ग्रामीण संस्थात्मक पतपुरवठ्यात वाढ होण्याच्या दृष्टीने वित्तीय संस्थांची उभारणी करावी.
८. उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण सुविधात वाढ करावी.

समारोप:-

स्थलांतर हे विसाव्या शतकातील सार्वत्रिकदृश्यआहे.शिवायस्थलांतरनैसर्गिक प्रक्रिया असल्यामुळे त्यामध्ये सातत्य हे असणारच, म्हणजेच स्थलांतर हे एक असे वास्तव आहे कि, जे नाकारता येत नाही.म्हणूनच प्रादेशिक भावनांना खतपाणी घालून परराज्यातल्या लोकांविषयी द्वेष वाढवून कोणत्याही राजकीय पक्षाने स्थलांतराचे राजकारण करण्यापेक्षा स्थलांतर हा घटनेने प्रत्येक नागरिकाला दिलेला हक्क आहे.याची जाणीव ठेवून राज्य,देश यांच्या विकासाच्या दृष्टीने आणि सामाजिक ऐक्य,एकता दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची

१. प्रा.सोनटक्के & प्रा.देवराव (२०१४)-'आर्थिक वृद्धी आणि विकास -शेठ प्रकाशन, मुंबई
२.प्रा.अहिरराव,प्रा.अलीझाड (२००१)- 'लोकसंख्या'-निराली प्रकाशन, पुणे
३.डॉ.देसाई आणि डॉ.भालेराव (२०१३)-'भारतीय अर्थव्यवस्था' -निराली प्रकाशन, पुणे
४. आर्थिक पाहणी अहवाल (२०१३-१४)-भारत सरकार
५.http://vishwakosh.marathi.gov.in
६. http://www.majhapaper.com (online Marathi paper)
७. दि.१/०४/२०१४, दैनिक लोकसत्ता मधील लेख (स्थलांतर,रोजगार&विकास)

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.P
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist-

National Conference on Impact of Migration on Rural and Urban Area in India
Organized By :- Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerece , Pachal
29th Feb. 2020

स्थलांतरीत श्रमिकांच्या आर्थिक, सामाजिक समस्या व उपाययोजना

प्रा. संग्राम विश्वास चव्हाण
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य
महाविद्यालय,पाचल
ता - राजापूर, जि, रत्नागिरी

सारांश -

प्रस्तुत शोधनिबंधात रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून होणाऱ्या श्रमिकांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या कुटुंबाला भोगाव्या लागणाऱ्या समस्यावर प्रकाश टाकला आहे. हे श्रमिक पोटाची खळगी भरण्यासाठी त्याना दारोदारी भटकंती करावी लागत आहे. यामध्ये काही कुटुंब रोजीरोटीसाठी मुंबई,पुणे कोल्हापूर,नाशिक व काही परराज्यात अशा नगरामध्ये व्यवसाय ,मुलांचे शिक्षण, रोजगार व नोकरी, अशा संधीच्या शोधात आहेत. त्यांना पोटाची खळगी भरण्यासाठी कायमचे व हंगामी स्वरूपाचे स्थलांतर करावे लागते. स्थानिक ठिकाणी व स्थलांतराच्या ठिकाणी अनेक समस्यांना सामारे जाऊन अतोनात कष्ट करावे लागतात. यांतील काही कुटुंबेही भूकंपग्रस्त, धरणग्रस्त, पूरग्रस्त, अभयारण्य पुनर्वसन,अशा स्वरूपातील आहेत. की ज्यांना आपल्या हक्काची घरे,शेतजमिन, सोडून दारोदारी निवारा व मजुरीसाठी फिरत आहेत. अशा अनेक समस्यांना अभ्यास करून स्थलांतर रोखण्यासाठी काही उपाय योजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

१.१ प्रस्तावना

रत्नागिरी जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील(राजापूर, लांजा,रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण,खेड, गुहागर,मंडणगड, दापोली) स्तलांतरित श्रमिक कुटुंबांची पाहणी करीत असताना कुटुंबांचे राहणीमान, दारिद्र्य, शिक्षण, संघटन, धर्म, आरोग्य, विवाह, व्यवसाय व नोकरी, जात इत्यादी निर्देशकेसमोर ठेवून अध्ययन करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला आहे. त्यावरून असे दिसून येते की जिल्ह्यातील बहुतांश स्थलांतरीत कुटुंबे अतिशय निम्म स्तरावरील जीवन जगत आहेत. तेथील स्थलांतर हे विविध श्रेत्रात रोजगार मिळविण्यासाठी झालेले आहे. यामध्ये प्रामुख्याने श्रमिक हे सुतारकाम, लोहारकाम, कुंभारकाम, बांधकाम, उसतोडणी कामगार, वीट निर्मिती आणि इतर व्यवसाय व नोकरी यासाठी स्थलांतर झालेले आहे. इतर व्यवसायामध्ये शहरातील नोकरी निमित्त उद्योगधंदे, कारखान्यामध्ये,मॉल, उत्पादित कंपन्या, कापड दुकाने, औषधे दुकाने, इलेक्ट्रिकल, किराना दुकाने, दवाखाने, ऑटोमोबाईलसारख्या विविध दिकाणी काम करण्यासाठी श्रमिक स्थलांतर करत आहेत. स्थलांतर करताना ज्ज्या श्रेत्रात जास्त पैसा मिळेल जेणेकरून राहण्याची सोय,मुलांचे शिक्षण,विवाह, कौटुंबिक जबाबदारी पूर्ण होईल अशा ठीकाणी स्थलांतर होताना दिसत आहेत. श्रमिक आपल्याला जो व्यवसाय सोयीचा वाटेल त्या व्यवसायाची निवड करतात. तरीदेखील या श्रमिक कुटुंबांची दारिद्रय, बेरोजगारी,कुपोषण, विवाह यासारख्या समस्या पूर्ण कमी होऊ शकल्या नाहीत.

१.२ संशोधन उद्दिष्ट्ये-

१) स्थलांतरही संकल्पना समजून घेणे.
२) रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिक कुटुंबांच्या स्थलांतर विषयी समस्यांचे अध्ययन करणे.
३) रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिकांचे विविध व्यवसायात झालेल्या स्थलांतराचा अभ्यास करणे.
४) रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिक कुटुंबांच्या स्थलांतराची स्थिती जाणून घेणे.

५) श्रमिक कुटुंबांच्या स्थलांतराची कारणे समजाजून घेणे.
६) श्रमिक कुटुंबांना स्थलांतरामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा आढावा घेणे.
७) श्रमिक कुटुंबांचे स्थलांतर रोखण्यासाठी उपाय सुचविणे.

१.३ गृहीतके -

१) रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिक कुटुंबांना शहरी ठिकाणी स्थलांतर करावे लागते.
२) रत्नागिरी जिल्ह्यात रोजगार मिळविण्यासाठी शाश्वती नसल्यने शहरी ठिकाणी जास्त पगार व रोजगार मिळत असल्याने स्थलांतर होते.
३) पुरुषांबरोबर स्त्रियांनाही स्थलांतर करावे लागते ही पिढ्यान-पिढ्या चालत आलेली प्रथा आहे.
४) युवकांना नोकरी बरोबर विवाहासाठी शहरी ठिकाणी स्थलांतर होते.

१.४ संशोधन पद्धती -

प्रस्तुत सशोधनात प्राथमिक व द्वितीय साधन सामग्रीचा वापर केला असून प्राथमिक स्वरुपात काही श्रमिक कुटुंबाशी चर्चा केली आहे. द्वितीय साधन सामग्रीत विविध संदर्भग्रंथ, अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे, वेबसाईट यांचा आधार घेण्यात आलाआहे.

१.५ रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिकांचे विविध ठिकाणी झालेले स्थलांतर:-

रत्नागिरी जिल्हा महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यांपैकी एक जिल्हा असून त्याचे क्षेत्रफळ ८,२०८ चौ. किमी व लोकसंख्या १६,९६,७७७(२००१) इतकी आहे .त्यापैकीशहरी लोकसंख्या ११.३३% इतकी आहे. शेती हा प्रमुख व्यवसाय असून तांदळाची शेती प्रामुख्याने केली जाते. शेती व्यवसाय सुद्धा परंपरागत तुकडा पद्धतीने करत असल्याने मिळणारे वार्षिक उत्पन्न फार कमी आहे. त्यामुळे तेथील स्थानिक युवक वर्ग हा आर्थिक उत्पनाच्या शोधात शहरी भागात स्थलांतर होत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिकांचे विविध ठिकाणी झालेले स्थलांतर तक्ता

अ. क्र	स्थलांतर ठिकाण	स्थलांतरीत कुटुंबांची शेकडा प्रतिशत प्रमाण
१)	तालुक्याच्या ठिकाणी	०८
२)	जिल्ह्याच्या ठिकाणी	१५
३)	जिल्ह्याच्या बाहेर(शहरी) ठिकाणी	७२
४)	परराज्यात	०५

संदर्भ - रत्नागिरी टाईम्स पेपर दि: २५/०३/२०१५

वरील सारणीत रत्नागिरी जिल्ह्यातील श्रीमिकांना रोजगार व मजुरीसाठी तालुका, जिल्हा. जिल्ह्याबाहेर,व परराज्यात स्थलांतर करावे लागत आहे. जिल्ह्याच्याबाहेर मुंबई,,पुणे, यासरख्याशहरी ठिकणी श्रमिकांना अधिक वेतन व मजुरी मिळते त्यमुळे होणारे स्थलांतर हे जास्त आहे.

१.६ रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिकांचे विविध व्यवसायात झालेले स्थलांतर:-

रत्नागिरी जिल्यातील नऊ तालुक्यामधून ३५० कुटुंबांच्या सर्वेक्षणातून जी स्थिती जाणवली ती खालील तक्त्यात दर्शवली आहे.

विविध व्यवसायात श्रमिकांचे झालेले स्थलांतर तक्ता

अ.क्र	व्यवसायप्रकार	स्थलांतरित श्रमिक कुटुंबांची संख्या	प्रतिशत प्रमाण
१)	नोकरी व व्यवसाय	११९	३४
२)	बांधकाम	१२३	३५.१४
३)	वीटनिर्मिती	२७	०.७.४१
४)	इतर	८१	२३.१५
	एकूण	३५०	१००

संदर्भ - क्षेत्रीय पाहणी

वरील सारणीत असे दिसून येते कि नोकरी व व्यवसायाच्या शोधात श्रमिकांचे स्थलांतर हे अधिका आहे. त्याचबरोबर शहरांचा होत आलेला जलद विकास आणि घरांचीवाढती संख्या इत्यादीलुळे बांधकामश्रेत्रात श्रमिकांस जे स्थलांतर होत आहे.

१.७ रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिकांची स्थलांतराची कारणे -

१) ग्रामीण भागात रोजगाराचा अभाव.
२) कमालीची गरिबी वदारिद्रय.
३) उत्पन्नमिळविण्याचे स्रोतः कमी.
४) कुटुंबातीलसदस्य संख्या अधिक त्यामुळे शेतीचे विभाजन होऊन अल्प भूधारक व भूमिहीन वाढते प्रमाण.
५) शहरी भागात रोजगाराच्या संधी व अधिक वेतन दर.
६) ग्रामीण भागात अल्प काजुरी
७) प्राथमिक गरजांच्या पुर्ततेचा अभाव.
८) शहरी भागात उच्य शिक्षण व आरोग्य सेवा.
९) कामाची शाश्वती.

१.८ श्रमिकांच्या स्थलांतरामुळे निर्माणझालेल्यासमस्या -

१) वयोवृद्ध व्यक्तीकडे दुर्लक्ष
२) मुलांच्या शिक्षणाकडे व आरोग्याकडे दुर्लक्ष
३) व्यसनाची सवय लागणे.
४) कुटुंबातील विस्कळीतपणा.
५) शेतीकडे दुर्लक्ष
६) मजुरांचा तुटवडा

१.९ श्रमिकांचे स्थलांतर रोखण्यासाठी उपाययोजना -

१) जिल्ह्यात ग्रामीण भागात उद्योगधंदे व व्यवासाय सुरु करणे.
२) शेती पूरक व्यवसायाच्या विकासाला चालना.
३) जिल्ह्यातील पर्यटनक्षेत्रावर जास्तीत -जास्त भर देणे.
४) रोजगार हमी योजनांची प्रभावी अंमलबजावणी.

५) वाहतूक व दळणवळणाच्या सुविधेत वाढ करणे.
६) स्वयंम सहाय्यता गटांच्या माध्यमातून लघु उद्योग निर्मितीकरणे
७) उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण सुविधेत वाढ करणे.
८) संघटना निर्माण करणे.

संदर्भ सची -

१) रत्नागिरी जिल्हय सामाजिक व आर्थिक समालोचन २०१४-१५
२) रत्नागिरी टाईम्स पेपर दि: २५/०३/२०१५
३) पुढारी दि .१५/५ /२०१८
४) https://vishwakosh.marathi.gov.in

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM
aypatan,Tal- Rajapur,Dist-

स्थलांतराचा भारतातील ग्रामीण व शहरी भागावरील परिणाम

संशोधक
प्रा. बी. ए. कश्यप (सहा.प्राध्यापक)
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय
पाचल-रायपाटण

भारत देशाचा पूर्वइतिहास हा स्थलांतरावर आधारीत आहे. उपजीविकेसाठी व्यक्तींचे, माणसांचे मग टोळ्यांचे स्थलांतर होऊ लागले. मग अधिकाधिक सुसह्य जीवनाच्या आशेने अधिकच स्थलांतर होऊ लागले. स्थलांतराने काहि टोळ्या स्थिरावल्या तर काहि पुन्हा स्थलांतर करू लागल्या. स्थिर वस्त्यांच्या स्वरूपात मानव स्थिर होऊ लागला. त्यातून मानवी संस्कृती बरोबरच कृषी संस्कृतीचा विकास झाला अतिरीक्त कृषी उत्पादनाचा व्यापार सुरु झाला या व्यापाराच्या निमित्ताने मानव स्थलांतर करून लागला. स्थलांतर हे अल्पकालीन, दीर्घकालीन व कायम स्वरूपी अशा प्रकारचे दिसून येते. भारतातील मूलनिवासी त्यातील स्थलांतरीत विकासाच्या दिशेने गेले तर काही अजूनही जंगलामध्ये आदिवासी स्वरूपात राहत आहेत. पूर्वीच्या काळी भारताच्या नैसर्गिकदृष्ट्या विकसीत व संपन्न भूमीच्या आकर्षाने स्थलांतरीत हे भारतीय होऊन राहिले. स्थलांतरीतामध्ये शहरी, ग्रामीण, आंतरराज्य व आंतरदेशीय देखील दिसून येते. कौटुंबिक गरजांच्या पूर्ततेसाठी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर झालेले दिसते तर व्यापार व व्यवसायाच्या निमित्ताने आंतरराज्य स्थलांतर दिसते तर उच्चभ्रू जीवन, प्रतिष्ठा व अधिक पैसा मिळविण्याच्या उद्देशाने एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतर झालेले दिसते. वर्षानुवर्षाच्या कालखंडात जगण्याच्या दिशा आणि गरजांचा क्रम बदलत गेल्याने स्थलांतराचा प्रवास सातत्याने सुरूच राहिला. स्थलांतर म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे स्थलांतरामध्ये सुरक्षिततेलाही अधिक महत्व दिल्याचे दिसते. तसेच जीवनावश्यक गरजेलाही महत्व दिल्याचे दिसते. स्थलांतर याचा शब्दशः अर्थ जरी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे असा असला तरी स्थलांतर या लोकसंख्या शास्त्रीय संकल्पनेत दोन ठिकाणातील अंतर, जाण्याचा हेतू व कालावधी या तीन बाबतीत महत्व दिसते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आणि विशेषतः आर्थिक नियोजनाची सुरूवात झाल्यापासून भारतामध्ये ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे किंवा ज्या ठिकाणी काम मिळेल अशा ठिकाणी स्थलांतर करणे नित्याचे झाले आहे. स्थलांतर हा लोकसंख्येच्या आकारात व रचनेत बदल घडवून आणणारा महत्वाचा घटक आहे. लोकसंख्येतील जलद गतीने होणारी वाढ व दरडोई जमिनीच्या उपलब्धतेत होणारी घट यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी कमी झाल्यात व अनेक वर्षापासून ग्रामीण भागातून नागरी भागाकडे विविध कारणाने स्थलांतर वाढले.

व्यापार व व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतर झालेल्यामध्ये ठळक उदाहरण दिसते ते गुजरात या राज्याचे. या राज्यातील गुजराती, मारवाडी हे जीवनावश्यक वस्तू, कापड व्यवसाय, बांधकाम व्यवसाय, सोने व हिरे व्यापारानिमित्ताने मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात स्थलांतर झालेले दिसतात. राजस्थानमधील महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेले हे बांधकाम व बांधकामाशी संबंधीत वस्तूंच्या व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतरीत झालेले दिसतात. कर्नाटकातील स्थलांतरीत हे हॉटेल व्यवसायासाठी तर बिहार व उत्तरप्रदेशातील स्थलांतरीत हे मजुरीसाठी स्थलांतरीत झालेले दिसतात.

दुसऱ्या महायुध्दानंतर ज्या राष्ट्रांचे अतोनात नुकसान झाले तेथील लोक हे सुरक्षितता व उदरनिर्वाहासाठी दुसऱ्या देशाच्या सिमा ओलांडून स्थलांतरीत होऊ लागले म्यानमारमधील रोहिंग्या मुसलमान स्थलांतरीतांचा प्रश्न अजूनही अधांतरीतच आहे. भारतातून विदेशात शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने स्थिरावलेल्या बुद्धीवंताना तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी या चिमण्यानो परत फिरारे अशी घातलेली साद हि आपण पाहिली. थोडक्यात स्थलांतर हा जगाला भेडसावलेला प्रश्न आहे. सध्या केंद्र सरकारने आणलेला CAA व NRC हा वादादीत मुद्दा आहे. तो आंतरदेशीय स्थलांतरीतांशी संबंधीत आहे. CAA हा अफगाणिस्थान, बांगलादेश व पाकिस्थानमधून भारतामध्ये झालेल्या स्थलांतरीतांशी संबंधीत आहे. तर NRC हा भारतामध्ये झालेले स्थलांतरीत शोधून काढण्याशी संबंधीत आहे.

गेल्या दशकात भारतात विविध क्षेत्रातील स्थलांतरामध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. स्थलांतर ही वाढत जाणारी चक्राकार स्वरूपाची अर्धवट किंवा पूर्णतः अस्थिर स्वरूपाची असते भारतातील जनगणनेच्या आकडेवारीनुसार देशात स्थलांतरीतांची संख्या अंदाजे ३.३ दशलक्ष एवढी दिसते. भारतामध्ये मूळ गावातून शहरात स्थलांतर झालेली संख्या ४५.३६ कोटी आहे. त्यातील ५४ टक्के लोक सुमारे १० वर्षापूर्वी त्यांच्या मूळ गावात राहायला आलेले दिसतात. भारतीय वित्तीय सर्वेक्षण २०१६-१७ नुसार एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतर करणाऱ्यांची संख्या सहा कोटी तर आंतरजिल्हा स्थलांतरीतांची संख्या आठ कोटी इतकी आहे. हे स्थलांतरीत सतत प्रवास करणारे व चक्राकार अशा स्वरूपाचे आढळतात. नाईक आणि रॅडॉलान यांच्या मतानुसार स्थलांतरामुळे गावे आणि शहरांवर निश्चित परिणाम होतो. मागील दहा वर्षामध्ये भारत देशामध्ये बेकारी वाढली आहे. केंद्रसरकारने केलेल्या सर्वेक्षणानुसार २०१७-१८ या वर्षात बेकारीचा दर हा ६.१ टक्के इतका होता. बेकारीचा परिणाम जीडीपीवर होतो व जीडीपीचा परिणाम रोजागारावर होतो व रोजगाराचा परिणाम स्थलांतरावर होतो.

व्याख्या -

"स्थलांतर म्हणजे माणसांच्या ठिकाणांमध्ये कायमस्वरूपी किंवा एका विशिष्ट कालावधीसाठी झालेला बदल होय."

स्थलांतराची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील-

१) उच्चशिक्षणासाठी शहराकडे होणारे स्थलांतर.
२) रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर.
३) मनुष्यबळाअभावी शेतजमिनी ओसाड पडल्याने शहराकडे होणारे स्थलांतर.
४) पाश्चात्य संस्कृति व शहरी आकर्षणामुळे होणारे स्थलांतर
५) वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे उदरनिर्वाहासाठी होणारे स्थलांतर
६) शासनाने धरण, तलाव, इ. प्रकल्पासाठी जमिनी भूसंपादित केल्यामुळे झालेले स्थलांतर.
७) शिक्षण, आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य दिल्याने होणारे स्थलांतर.
८) जागतिकीकरण व खाजगीकरणामुळे खाजगी उद्योगात होणारी व त्यांना लागणारे कुशल व अकुशल मनुष्यबळासाठी होणारे स्थलांतर.
९) नोकरी व व्यवसायाच्या संधीमुळे होणारे स्थलांतर.
१०) कौशल्य व ज्ञानाला मिळणाऱ्या योग्य ठिकाणच्या संधीमुळे होणारे स्थलांतर.
११) भूकंप, चक्रीवादळ, इ. नैसर्गिक आपत्तीमुळे जगण्यासाठीचे सर्व मार्ग हिरावून घेतल्याने होणारे स्थलांतर

१२) शहराच्या ठिकाणी असलेले औद्योगिक क्षेत्र व तेथे उपलब्ध असलेला रोजगार.

स्थलांतराचे होणारे विविध परिणाम -

१) ग्रामीण स्थलांतराचा परिणाम ग्रामीण उत्पन्नावर होतो.
२) स्थलांतरीत गावामध्ये, भागामध्ये दरडोई उत्पन्न घटते.
३) स्थलांतरीत ठिकाणी विकासाला मर्यादा येतात.
४) ग्रामीण भागातील कृषि उत्पन्न घटते.
५) शेतीतील नवनवीन प्रयोग नाहिसे होतात. शेतीतील भांडवली गुंतवणूक कमी होते
६) वाढत्या अकुशल मनुष्यबळामुळे शिक्षितांचे प्रमाण व शिक्षणाचा दर्जा खालावतो
७) स्थलांतरीत शहरांमध्ये, वसत्यामध्येशिक्षण, आरोग्य, पाणी, गुन्हेगारी यांच्या भयंकर समस्या निर्माण होतात.
८) ग्रामीण उद्योजकता घटते.
९) नवउद्योजक (Entrepreneur) घडत नाहीत. त्यामुळे किमान कौशल्याकडे वळावे लागते.
१०) शहराच्या ठिकाणचे गर्दीचे नियोजन करताना ताण येतो.
११) ग्रामीण भागातील मजुरीचे दर वाढतात.
१२) ग्रामीण भाग ओस पडल्याने ग्रामीण संस्कृती ऱ्हास होण्याच्या मार्गावर.
१३) शहरांच्या आकर्षणामुळे ग्रामीण भाषा ऱ्हास होण्याच्या मार्गावर.
१४) शहरी व पाश्चात्य संस्कृतिमुळे भारतीय ग्रामीण जीवन आधुनिकतेच्या नावाखाली दिशाहिन होत अहे.
१५) ग्रामीण भागामध्ये शहरी पध्दतीच्या इमारती उभ्या राहत आहेत.
१६) नोकरी व रोजगारात हमी, सातत्य व सुरक्षितता नसल्याने मानसिक ताणतणाव व नैराश्यात वाढ होत आहे.
१७) बेरोजगारांचा रोजगार खंडीत पध्दतीचा असल्याने आत्महत्यांचे वाढते प्रमाण.
१८) छोट्या उद्योग व्यवसायामध्ये गुंतवणुकीपेक्षा आधुनिक राहणीमानामध्ये गुंतवणुकीचा कल
१९) ग्रामीण भागातील शेतजमिनी ओसाड पडल्याने टेरेस शेती ही संकल्पना उदयास येत आहे.
२०) झटपट बाजारपेठ काबीज करण्यासाठी ग्रीन हाऊस संकल्पना वाढीस लागतेय.
२१) एकर व हेक्टरमध्ये शेती होत नसल्याने बचतगटामार्फत गटशेतीकडे वाढता कल.
२२) पुरूष स्थलांतरीत गावामध्ये जन्मदर कमी होताना दिसतो.
२३) रोजगारासाठीच्या स्थलांतरामुळे शिक्षणातील गळतीचे प्रमाण वाढून उच्चशिक्षितांची संख्या घटतेय
२४) देशाला अन्नधान्य आयात करावे लागतेय.
२५) ब्रेन-ड्रेन (Brain-Drain)व्दारे विदेशात स्थलांतरीत झालेल्यांच्या ज्ञानाचा, बुध्दीचा उपयोग देशाला होत नाही.
२६) स्थलांतरामुळे बौद्धीक संपदा कमी होत आहे.
२७) शहरांचा विस्तार होत आहे व झोपडपट्ट्या वाढताहेत

२८) शिक्षण, आरोग्य, पाणी, वहातूक, सुरक्षितता, प्रदुषण, महिला सुरक्षितता, इ. प्रश्न गंभीर बनताहेत.
२९) ग्रामीण भागात उच्चशिक्षणाच्या सुविधा कमी होत आहेत.
३०) स्थलांतरीत विदेशी नागरीकांमुळे देशाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो

स्थलांतर रोखण्यासाठी काही उपाय -

१) देशाची खरी संस्कृति ही ग्रामीण भागामध्ये आढळते. त्यासाठी ग्रामीण पुनर्रचना योजना आखणे.
२) ग्रामीण भागामध्ये शासकीय बँका स्थापन करून सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी चालना देणे.
३) सहकारी संस्था प्रक्रिया उद्योगाला चालना देणे.
४) शाळा व शालेय अभ्यासक्रम अद्ययावत करणे व गुणवत्तापूर्ण रोजगारक्षम नैतिक मूल्याधारीत शिक्षण देणे.
५) जलसिंचनाच्या योजना राबविणे. त्यासाठी शून्य टक्के व्याजदराने कर्जपुरवठा करणे.
६) चोवीस तास वीज व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे.
७) रस्तेबांधणी आधुनिक पध्दतीने व मजबूत करणे.
८) पर्यटनदृष्ट्या शक्य असणाऱ्या ठिकाणांचा विकास करणे.
९) नवउद्योजक निर्मितीसाठी मोफत मार्गदर्शन व शून्य टक्के व्याजदराने भांडवल पुरवठा करणे
१०) आरोग्याच्या सर्व सुविधा आधुनिक पध्दतीने व उपचार मोफत तसेच कमी खर्चात ग्रामीण भागातील सर्व शासकीय रूग्णालयात उपलब्ध करून देणे.
११) कृषिपीक खरेदीसाठी शासन आपल्या दारी योजना राबविणे.
१२) लोकल टू ग्लोबल संकल्पना विकसित करणे.
१३) CSR फंडाचा वापर करून आधुनिक तंत्रज्ञानाचा सदुपयोग ग्रामीण भागात करून देणे
१४) शासकीय सेवेमध्ये समाविष्ट होण्यासाठीचे स्पर्धात्मक शिक्षण शालेय स्तरापासून मोफत देणे.
१५) ग्रामीण भागातील संस्कृति जपणाऱ्या उद्योग व्यवसायाला चालना देणे.
१६) आवश्यकतेनुसार प्रशिक्षित अधिकारी वर्गाचे मार्गदर्शन दर तीन महिन्यातून एकदा प्रत्येक गावात राबविणे.
१७) नवीन पिढीला भारतीय संस्कृतिची ओळख करून देणारे मेळावे आयोजित करणे.
१८) शेतीपुरक उद्योगाला चालना देणे.
१९) ग्रामीण भागामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे शेती करण्याचे प्रशिक्षण देणे व तशी योजना राबविणे.
२०) दुष्काळग्रस्त भागातील स्थलांतर रोखण्यासाठी त्या भागात शासकीय सहभागातून मोठमोठे प्रकल्प उभारावेत. त्यासाठी सामुहिक रोजगार योजना कार्यक्षमपणे राबविणे.
२१) प्रत्येक राज्याने राज्यातील जनतेसाठी रोजगारक्षम प्रकल्प उभारल्यास एका राज्यातून दुसऱ्या राज्यातील स्थलांतर थांबेल.
२२) देशातील बुद्धीवंतांना योग्य तो मोबदला व सन्मान देऊन देशाच्या विकासासाठी त्यांच्या ज्ञानाचा आधार घेतल्यास ब्रेन-ड्रेन थांबेल.

२३) मूलनिवासी नागरीकांचे नागरीकत्व कायद्याने अबाधित ठेवून परकीय नागरीकांना नागरीकत्वाचे नियम कडक केल्यास देशात होणाऱ्या स्थलांतराला आळा बसेल.

समारोप -

स्थलांतर हा हजारो वर्षापूर्वीपासूनचा गंभीर प्रश्न आहे पहिल्या व दुसऱ्या महायुध्दानंतर चटके बसलेल्या देशांनी स्वतःला सावरण्यासाठी व त्या देशातील जीडीपी वाढविण्यासाठी देशाच्या सीमातंर्गत जी पावले सक्षमपणे उचललीत. तसेच या पिडीत देशांना सावरण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्याप्रमाणे विविध संघटना निर्माण झाल्या तसे आंतरराष्ट्रीय स्थलांतर रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एक संघटना निर्माण व्हावी. स्थलांतराने मनुष्यबळाची विभागणी होते. ती थांबविणे शक्य आहे. त्यासाठी त्यांना बौध्दिकदृष्ट्या, शारिरीकदृष्ट्या, वैचारीकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठीच्या उपयोजना आखल्या जाव्यात. भारतामध्ये स्थलांतरांचा सर्वे करण्यापलीकडे हा प्रश्न सरकारने गांभीर्याने घेतलेला नाही. देशातील विविध संशोधनसंस्था, एन.जी.ओ., पर्यावरणीय क्षेत्रात कार्यरत तज्ञ, शासकीय-खाजगी क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती व सामाजिक शास्त्राचा अभ्यास असणारे विचारवंत या सर्वाच्या एकत्रित सहभागातून स्थलांतर या गंभीर विषयावर उपययोजना शोधल्या जाव्यात.

संदर्भ :

1. चाणक्य मंडल, पुणे, डिसेंबर 2019
2. अर्थसंवाद, एप्रिल- जून 2019 खंड 43 अंक 1
3. डॉ. जी एन झांबरे, भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरेअंडक. पब्लिशर्स , नागपूर
4. https://migrationdataportal.org/themes/int
5. cincus of india 2001

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHA
COLLEGE OF ARTS & CO
A/P Raypatan,Tal- Rajapur,

दक्षिण कोकणातील पूर्वास्पृश्य महार व बौद्धधम्म दीक्षितांचे स्थलांतर

प्रा. प्रमोद एस. मेश्राम
सहयोगी प्राध्यापक
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल,
तां. राजापूर, जि. रत्नागिरी.

प्रस्तावना :

समाजातील वेगवेगळ्या समूहातील लोकांचे स्थलांतर ही घटना अत्यंत महत्वपूर्ण मानली जाते स्थलांतराची अनेक कारणेसमाजात अस्तित्वात दिसून येतात. स्थलांतर ही प्रक्रिया सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, आर्थिक व भौगोलिक अशा विविध कारणांमुळे घडून येणारी प्रक्रिया असल्याचे मानले जाते. स्थलांतराची घटना मानवाच्या आर्थिक विकासाला चालना देणारी घटना आहे. भारतामध्ये वर्ण व जातिव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये समाजातील खालच्या समूहाची स्थिती अतिशय हलाखीची बनलेली होती. त्यामुळे आपल्या उदरनिर्वाहासाठी शहरी भागाकडे किंवा काम मिळेल अशा ठिकाणी खालच्या वर्गाला फार मोठ्या प्रमाणात स्थलांतर करावे लागले.

प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत समाजात स्थलांतराची प्रक्रिया घडून आल्याचे दिसून येते. स्थलांतरामुळे त्या-त्या समाजाची परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होऊन त्या समाजाचा विकास जरी होत असला तरी त्या भागात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. शहरांची वाढ घडवून आणण्यात स्थलांतराचा वाटा मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे शहरांची लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते लोकसंख्येच्या वाढीमुळे चांगले व वाईट परिणाम घडून येत आहेत. देशातील अनेक महत्वाची शहरे शहरीकरणाच्या विळख्यात अडकली आहेत.

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

स्थलांतराची व्याख्या :

अनेक समाजधुरिणींनी स्थलांतराच्या व्याख्या केलेल्या आहेत. स्थलांतर म्हणजे काय? हे समजून घेण्यासाठी त्या महत्वाची भूमिका बजावतात.

अ) स्थलांतर म्हणजे विशिष्ट कालावधीत एका भौगोलिक स्थानातून वास्तव्य सोडून त्या स्थानाव्यतिरिक्त इतर प्रदेशात वास्तव्यासाठी जाणे होय:[1]

आ) एका विशिष्ट समाजाने आपल्या आर्थिक किंवा सामाजिक परिस्थितीतील बदलामुळे कायमस्वरूपी किंवा काही कालावधीसाठी आपल्या अधिवासात केलेला बदल म्हणजे स्थलांतर होय.[2]

इ) स्थलांतर म्हणजे रहिवासात झालेला बदल होय. याठिकाणी स्थलांतरिताच्या व्यवसायात झालेला बदल मान्य नाही.[3]

वरील व्याख्येतून त्या-त्या समाजाने कुठल्याही कारणांसाठी इतर ठिकाणी जाऊन आपला स्वतःचा विकास घडवून आणला. अशा स्थलांतराचे वेगवेगळे प्रकार आहेत. या स्थलांतरामध्ये आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील/समूहातील दुर्बल मजूर, मागासवर्गीय लोकांचे प्रमाण अधिक आहे.

स्थलांतराची कारणे :

समाजातील लोकांचे समूहाचे स्थलांतर घडून येण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असल्याचे मानले जाते त्यामध्ये समाजाची प्रवृत्ती, भौगोलिक, नैसर्गिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक घटकांचे परिणाम स्थलांतरावर होत असतात. स्थलांतर ही गुंतागुंतीची प्रक्रिया असल्याचे मानले जाते ब्रिटिश काळापासून बेरोजगारीचा प्रश्न समाजात निर्माण झाला, समाजातील अन्यायी पद्धतीच्या जाचाला कंटाळून अनेकांनी ग्रामीण भागातून शहरांकडे स्वतःचे स्थलांतर केले.

१९८१ च्या जनगणनेनुसार भारतातील २२.४४ दशलक्ष लोक स्थलांतरित होते. या लोकांनी बिगर आर्थिक घटकांमधून व आर्थिक घटकांमुळे स्वतःचे स्थलांतर केले होते. यासंबंधात लोविस हा शास्त्रज्ञ म्हणतो की, 'ग्रामीण भागातील श्रमिक शहरी भागाकडे केवळ जिवंत राहण्यासाठी स्थलांतर करीत असतात.'

समाजातील अस्पृश्यांची स्थिती :

भारतीय समाजाचा इतिहास संघर्षमय व गुंतागुंतीचा आहे. वर्ण व जातिव्यवस्थेमुळे समाजातील अस्पृश्यांचे जीवन नरकयातनेसारखे झाले होते चातुर्वर्ण्य पद्धतीमुळे कामाची विभागणी झाली प्रत्येकाला त्यानुसार कामे देण्यात आली. वर्णव्यवस्थेमुळे समाजात श्रेष्ठ, कनिष्ठाची भावना विकसित झाली. ही व्यवस्था दोषमुक्त होती. वर्णव्यवस्थेप्रमाणेच जातिव्यवस्थाही महत्वाची मानली गेली. या जातींनी समाजाला विभक्त केले. समाजाच्या उतरंडीनुसार कामाची विभागणी करण्यात आली होती. यासंबंधी राम आहूजा म्हणतात, 'गुप्त काल तक जातिव्यवस्था बहुत कठोर हो गई तथा अन्य सभी जातीयों के ऊपर ब्राम्हणों का वर्चस्व स्थापित हो गया।'[४]

वर्णव्यवस्थाप्रमाणेही जातिव्यवस्था कठोर असल्यामुळे असंतुलित समाजव्यवस्था तयार झाली होती या व्यवस्थेबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, हिंदू समाजात हा एक मनोरा आहे व एक-एक जात म्हणजे त्याचा एक-एक मजलाच होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, या मनोऱ्यास शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला इसम मग तो कितीही लायक असे त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची आज्ञा नाही.'[५]

समाजात अस्तित्वात असलेल्या वर्णव्यवस्थेचा, जातीपद्धतीचा व अस्पृश्यतेचा अभ्यास अनेक समाजशास्त्रज्ञांनी केला. याच व्यवस्थेचा फायदा घेऊन समाजातील उच्चभ्रू समाजाने अस्पृश्यांवर अन्याय-अत्याचार केले. अशा अस्पृश्य जातींची संख्या ४२५ एवढी होती. अस्पृश्यांनी समाजात कसे राहावे याची एक आचारसंहिताच स्पृश्यांनी तयार केली होती त्यामुळे जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या काळापर्यंत या समाजाला अन्याय-अत्याचाराशिवाय काहीही मिळाले नाही. समाजात अस्तित्वात असलेल्या नियमांचा भंग केला, तर गुन्हा समजला जात होता. उदरनिर्वाहाची सर्व साधने स्पृश्यांकडे उपलब्ध होती त्यांच्यासारखे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन अस्पृश्यांकडे उपलब्ध नव्हते त्यामुळे स्पृश्यांनी टाकलेल्या शिळ्या अन्नावर त्यांचा उदरनिर्वाह सुरू होता. अस्पृश्यांनी कसल्याही प्रकारचा धनसंचय करू नये, असाही नियम होता. अस्पृश्य समाज त्यामुळे कनिष्ठपणाचे जीवन जगत होता. प्रशासकीय व्यवस्थेत त्यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण होते. सदर समाजाला स्वतःच्या

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638x www.aiirjournal.com

उदरनिर्वाहासाठी उद्योग व व्यवसाय करण्याची मुभा होती. तसे व्यवसाय किंवा उद्योग अस्पृश्यांना करता येत नव्हते.

अस्पृश्यांच्या प्रशासकीय कामाबाबत महार वतनातून काही जमीन जरी दिली जात असली तरी ती जमीन कसदार नव्हती. महारांनी अनेक प्रकारची समाजाची, गावाची, प्रशासनाची कामे केली जात तरी तो निर्धन होता. चोवीस तास राबूनही त्यांना सुख कधी मिळालेच नाही. कोकणात प्रचलित असलेल्या जातिव्यवस्थेने अस्पृश्यांवर अनन्वित अन्यायअत्याचार केले. ही स्थिती त्यांच्यासाठी असाह्य होती. याही परिस्थितीत ते जीवन जगत होते.

पूर्वास्पृश्य महार व बौद्धधम्म दीक्षितांचे स्थलांतर

पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांची सर्वांगिण स्थिती दयनीय असल्यामुळेच नाईलाजास्तव त्यांना स्वतःचे गाव सोडून शहरांकडे स्थलांतर करावे लागले. कोकणातील बरीच कुटुंबे मुंबई व इतर ठिकाणी स्थलांतरित झाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांमध्ये शिक्षणाची कास निर्माण केल्यामुळे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांनी व बौद्धधम्म दीक्षितांनी शिक्षणासाठी, नोकरीसाठी मोठ्या शहरांकडे स्थलांतर केले होते. बौद्धधम्म दीक्षेपूर्वी शिक्षण घेऊन नोकरीनिमित्त ते शहरात जाऊन राहायला लागले. गावच्या स्पृश्य समाजाकडून होत असलेला अन्यायअत्याचार सहन करण्यापेक्षा मुंबईसारख्या ठिकाणी जाऊन मिळेल ते काम करीत असत. राणीची बाग, हॉपकीन, म्युनिसीपालिटी, कापड गिरण्या, गोदरेज कंपनी यासारख्या ठिकाणी कामे करायला सुरवात केली.

कमी शिकलेल्या पूर्वाश्रमीच्या अनेक लोकांनी ब्रिटिशांची नोकरी पत्करून, सैनात मोठमोठ्या पदांवर कामे केली. कोकणातील १०३० लोक ब्रिटिशांच्या सैन्यामध्ये नोकरीला होते. आजही कोकणातील प्रत्येक कुटुंबातील एक तरी माणूस नोकरिनिमित्त शहराच्या ठिकाणी वास्तव्यास होते.

सारांश :

स्पृश्य समाजाच्या अन्यायकारक वर्तवणुकीमुळे अस्पृश्यांना फार मोठ्या प्रमाणात स्थलांतरित व्हावे लागले. ही स्थलांतराची प्रक्रिया त्यांच्या विकासाठी अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते त्यामुळे त्यांच्या आर्थिक जीवनात महत्वाचे परिवर्तन झाल्याचे दिसून येते. या लोकांनी व्यवसायात आपली नैपुण्यता निर्माण केली. खाजगी व सरकारी अशा दोन्ही प्रकारच्या नोकऱ्या त्यांनी स्वीकारल्या आहेत. स्थलांतरामुळे त्यांचा जीवन जगण्याचा स्तर लक्षणीय उंचावला आहे.

ISSN 2349-638x
www.aiirjournal.com

संदर्भ :

१) अहिरराव वा. र.,'लोकसंख्या', निराली प्रकाशन, जोगेश्वरी मंदिर मार्ग, पुणे, पृ. २२८
२) मेहता बी. सी. व कोही अनुज, 'रूरल टू अर्बन', डे..............मायग्रेशन मॉडेल, राजस्थान, १९९१, पृ. ८७
३) थेरोडोर कॅपोली, 'द सोसालाजी ऑफ वर्क', द युनिव्हिसिटी ऑफ मीन्नेसोना प्रेस, १९९१, पृ. ११
४) आहूजा राम, 'भारतीय समाज', रावत पब्लिकेशन जयपूर, २००२, पृ. १४
५) मून वसंत (संपा.),'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक', उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती १९९०, पृ. ०४

IQAC - Coordinator
Shri M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM. PACHAL
A/P Raipatan, Tal. Rajapur, Dist- Ra...

मराठी कादंबरीतून व्यक्त झालेले स्थलांतराचे प्रश्न

प्रा.डॉ.बळवंत तुकाराम दाभाडे
सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग,
श्री.मनोहर हरी खापणे,
कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल,
ता.राजापूर, जि.रत्नागिरी - ४१६७०४

प्रस्तावना :-

इ.स.१९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला व त्यानंतर महाराष्ट्रामध्ये विकासाचे, परिवर्तनाचे वारे जोरात वाहू लागले. खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला अग्रेसर राज्य बनविण्यासाठी महाराष्ट्रातल्या नेत्यांनी कंबर बांधली त्यामुळे दळणवळण, औद्यौगिकीकरण, शहरीकरणामध्ये वाढ, धरणांमध्ये वाढ, बांधकामे इत्यादी सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न झाले. अशा सर्व सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक होती ती शेतीची उपलब्धता. शेतीच्या विकासाच्या नावावर व कायद्याची भिती दाखवून सुरु झालेले अधिग्रहण, शासकीय भावानुसार शेतकऱ्यांना मोबदला मिळाला असेल तरी तो बाजारभावापेक्षा अत्यल्पच होता. विकासासाठी शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत झाल्यानंतर त्यांच्यासमोर उपजिविकेचे प्रश्न निर्माण झाले. महाराष्ट्राचा विकास जसजसा होत गेला तसतसे शेतकऱ्यांचे प्रश्न वाढायला लागले. २१ व्या शतकात प्रवेश केल्यानंतर 'सेझ' च्या नावाखाली शेतकऱ्यांना देशोधडीलाच लावायचे यासाठी प्रयत्न सुरु झालेत. पिढयानपिढया ज्यांनी आपली आयुष्य शेतीत घालविली अशा त्या पोशिंद्याची जमीन शासन आज भांडवलदारांच्या घशात घालू पाहात आहे. औद्योगिकीकरण, दळणवळण, बांधकामे, धरणे, सेझसारखे प्रकल्प इत्यांदीसाठी शासनाने कायदे करून शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्यामुळे शेतकरी कुटुंबे विस्थापित झाली व मग त्यांच्या हालअपेष्टांना पारावार राहिला नाही.

साहित्य आणि समाजमन :-

महाराष्ट्र शासशाने कायदे करुन जमिनी घेतल्यानंतर व अशा समस्येचा विचार केल्यानंतर अनेक प्रश्न निर्माण होतात. मी माझी शेती देणार नाही किंवा मी शेती देईन पण मला जेवढा मोबदला पाहिजे तेवढा मिळाला तरच देईन असे म्हणण्याचा अधिकार शेतकऱ्याला नाही का? मानवाने जन्म घेतल्यानंतर त्याला काही अधिकार प्राप्त होतात. संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार घोषणेतही प्रत्येक नागरीकाला तीस प्रकारचे अधिकार प्राप्त होतात असे म्हटले आहे. असे अधिकार शेकऱ्यांच्या वाटयाला नाहीत का? मानवाला समाजामध्ये सन्मान आणि सुरक्षा पुरविणे ही जबाबदारी शासनाचीच आहे. प्रत्येक माणसास अन्न, वस्त्र, निवारा, रोजगार उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. याउलट शासनाने शेतकऱ्यांना वेगळी वागणूक देऊन दूरच ठेवले आहे. परिणामी जीवन जगण्यासाठी जमिनीच्या कुशीत राबणारे शेतकरी पोटासाठी राबराब राबणारे मजूर, स्वत:च्या हक्कासाठी बंदुकीच्या गोळया आंदोलक, शेतकरी अशा कितीतरी घटना घडतात. रक्ताचे पाणी करुन पिकविलेल्या मालाला बाजारात कवडीमोल भाव मिळतो तेव्हा त्यांच्या उत्पादन खर्चानुसार रास्त भाव मिळावा यासाठी आंदोलन केल्यास त्यांना गोळया घालण्यात येतात त्यांच्यावर केसेस चालविल्या जातात. शेवटी प्रश्न उरतो तो शेतकऱ्यांना जगण्याचा खरोखरच अधिकार आहे का? समाजामध्ये शेतकऱ्यांना फसविणारे, लुबाडणारे, खूप आहेत, त्यामुळे त्याला जगणे दुरापास्त झाले आहे. सावकारकीमुळे अनेक शेतकरी उध्वस्त झाले आहेत.

विस्थापित झाले आहेत. त्याचबरोबर धरणे, खाणी कारखाने, उर्जानिर्मिती, रस्ते, असे अनेक प्रकल्प अंमलात आणण्यासाठी दरवर्षी १०० लक्ष लोकांना उपजिविकेसाठी आपल्या गावाबाहेर पडावे लागते. उदरनिर्वाहासाठी त्यांना दुसरा पर्याय शिल्लकच राहत नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना उपजिविकेसाठी अनिच्छने आपल्या गावाबाहेर पडावे लागते. भारतामध्ये दरवर्षी अंदाजे ५ लक्ष लोक स्थलांतरीत होतात. याबाबत मेघा पाटकर म्हणतात, 'कोणत्याही प्रकल्पामुळे स्थलांतर व्हावे लागणे म्हणजे फक्त एक साधी नकारात्मक घटना नसते तर विस्थापितांचे आयुष्य उध्वस्त होऊन जाते. त्यांच्या जीवनावर, मानसिकतेवर परिणाम होतात' याचा अर्थ असा की, विकासकामांमुळे काही लोकांच्या जीवनामध्ये खरी सुखं येणार असली तरी विस्थापितांना आपल्या सुखाचा बळी द्यावा लागतो.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्य व समाजाचा परस्पर संबंध असतो. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विस्थापितांच्या प्रश्नांना साहित्यात स्थान मिळाले का? याच प्रश्नांचा शोध घ्यावयाचा आहे. मराठी कादंबरीतून जगाच्या पोशिंद्याच्या या सर्व व्यथावेदना साहित्यातून प्रतिबिंबीत झाल्या आहेत हे साहित्याच्या आधारे खालीलप्रमाणे सांगता येईल.

अशा समस्यांचे चित्रण कादंबरीतून उभे करणे म्हणजेच हा एक प्रकारे अन्यायच आहे, हे दाखविणे व त्यामधून विस्थापितांच्या अधिकाराची जाणीव करून देणे असे मला म्हणावेसे वाटते. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य चळवळ म्हणजे आम्हीही माणसेच आहोत. दलित काय किंवा शेतकरी वर्ग काय या सर्वांना माणूस म्हणून काही अधिकार आहेत, सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. हे लेखकाला उभ्या केलेल्या प्रसंगांच्या माध्यमातून सांगावयाचे असते.

मराठी कादंबरीतून आलेले स्थलांतराचे चित्रण :-

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यानंतर समाज विकासाच्या नावाखाली अशा विविध प्रश्नांचा जोर वाढला. मराठी साहित्यातील नामवंत साहित्यिक श्रीराम कामत यांनी १९७३ मध्ये त्यांच्या 'भिष्माचा डोंगर' या कादंबरीतून समाजाच्या विविध स्थरांमध्ये होणारे बदल तसेच औद्योगिकीकरणामुळे स्थिर व नैतिक जीवन जगणाऱ्या ग्रामीण समाजामध्ये कशी अवकळा पसरते याचे चित्रण या कादंबरीत उभे केले आहे. मैगनीज खाणीसाठी डोंगर सपाट केले जातात, झाडे नष्ट होतात, परिणामी बऱ्याच शेतकऱ्यांवर आपापली शेती सोडून देण्याचा योग येतो. अशावेळी उद्योगांमुळे गावाचा खरोखरच विकास झाला की त्याची उधोगती झाली हा प्रश्न या कादंबरीतून उपस्थित केला आहे.

अशोक व्हटकर यांनी १९८४ मध्ये 'बगाड' हया कादंबरीतून रेल्वेमार्गासाठी जमिनीचे होणारे अधिग्रहण व त्यातून निर्माण होणारे विविध प्रश्न उपस्थित केले आहेत. हंबीर या व्यक्तीने ज्या जमिनीसाठी नवस केला होता तीच जमिन रेल्वेच्या रुळाखाली जाणार ही कल्पना हंबीरला सहन होत नाही अशा वेळी तो म्हणतो, 'रामराव तु आम्ही पयल्यांदा हयो गाव वसवला तवा सपनात तरी इथे असलं आक्रीत हुतं आपल्या? जिमिन राबून पोट भराय साटनच आलतो नव्हं, आईच्या आंगाला झटावं तवा कोर दोन कोर भाकरी पोटाला भेटायची. पन रामराव मला त्यो जुना वकुत अजून आकाशी नजरे म्होरं येतूया खरचं रं लय सुकात हुतो आमी, नाही?' अशाप्रकारे जमिनीला आई मानणारा हंबीर जमीन आणि त्याचा जीव वेगळा मानतचं नाही. लोण्याच्या गोळयासारखा जमिनीवर खडी पसरल्या जातील, झाडे तोडली जातील म्हणून त्याचा जीव तीळमीळ तुटतो अशा

29th Feb. 2020

प्रकारे ही होणारी वाताहत व शेतकऱ्यांवर होणारा अन्याय अशोक व्हटकर यांनी आपल्या 'बगाड' या कादंबरीतून समाजासमोर ठेवला आहे.

सन १९७९ मध्ये चंद्रकुमार नलगे यांच्या 'देवाची साक्ष' या कादंबरीतूनही धरणग्रस्त गावाच्या वाताहतीची कथा सांगितली आहे. धरण होणार आणि त्यामुळे आपले गाव उठणार यामुळे तुका नाना, आबा आणि इतर अनेक माणसे हवालदिल होतात. भटक्या लोकांच्या सारखे उघडया रानावर राहण्याची वेळ येते. विकासाच्या नावाखाली धरणासारखे अनेक प्रकल्प राबविले जातात त्यामुळे एखादे गाव कसे नाहीसे होते याचे वास्तव चित्र मांडले आहे.

विश्वास पाटील यांनी सन १९९१ मध्ये 'झाडाझडती' या कादंबरीतून धरणग्रस्तांच्या विविध समस्या अत्यंत वास्तवतेचे भान ठेवून चित्रित केली आहे. धरणामुळे गावेच नाहीसी झाली नाहीत तर माणसेही उध्वस्त झाली. काही पूनर्वसनाच्या वळचणीला येऊन कायम उपरे म्हणून जगू लागले तरी काही पूनर्वसनाच्या आशेने जीव जगवीत राहिले. धरणग्रस्त शेतकरी आणि आदिवासींच्या वेदना पुढारी व सरकारी अधिकाऱ्यांच्या दुपट्टी कागदी धोरणे, आपापसातील मतभेद, संधी साधुंची राजकारणे अशी अनेक बाबींची लेखकाने केलेली बारकाईने वर्णने इतकी रेखीव आहेत की, आजच्या कादंबरीकारांपुढे 'झाडाझडती' ही कादंबरी एक आदर्श ठरावी. या कादंबरीतून शेतकऱ्यांच्या समस्या व त्यांच्या जीवनात दुःखाचे प्रसंग, यातना समाजापुढे ठेवल्या आहेत.

स.ग.यादव यांनी सन १९८६ मध्ये 'बुडणारा गाव' या कादंबरीतून शिराळा तालुक्यातील चांदोली परिसरातील धरणग्रस्त, शेतकऱ्यांच्या गावांची वाताहत कशी होते याबाबत वास्तव भूमीका मांडली आहे. त्याचबरोबर वामन पात्रीकरांनी सन १९८९ मध्ये 'जगबुडी' या कादंबरीतून धरणे व उद्योग धंदे यांमुळे उध्वस्त होणारे ग्रामीण विश्व उभे केले आहे. देऊळगाव परिसराचे उद्योगिकरण व धरण यामुळे राघवचे ग्रानविश्व नाहीसे होते. पिके उगवायची तिथे आता विविध कारखाने उभे राहणार, धरणे होणार या भितीने राघव हैराण होतो. राघव सारखेच इतरही या सर्वांची होणारी मानसिक कुंचबना स.ग.यादव या कादंबरीतून मांडले आहे.

इ.स.२००६ पासून सेझचा कायदा झाल्यावर विशेष आर्थिक क्षेत्रासाठी जमिनीचे अधिग्रहण शासनाच्या देखरेखीखाली सुरु झाले. या कायद्यात नापिक, पडिक जमिनीवर औद्योगिक क्षेत्र उभे करावे असे म्हटले गेले. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी न होता शेतकऱ्यांच्या चांगल्या जमिनी ताब्यात घेतल्या गेल्या. उरण, पनवेल, अलिबाग याशिवाय इतरही अनेक ठिकाणी सेझ प्रकल्प स्थापन करावयाचा असल्यामुळे योग्य तो मोबदला देऊन जमिनी ताब्यात घ्यायच्या त्यामुळे शेतकऱ्यांचे पारंपरिक जीवन पूर्णत नष्ट होणार, बागायती जमिनी नष्ट होणार, निसर्गाची संपन्नता नष्ट होणार असे सगळे अनर्थ केवळ स्वार्थापोटी होणार, काही लोकांची मने जपण्यासाठी याचा अर्थ असा की, भांडवलशाही व्यवस्थेला खतपाणी घालण्याचे काम शासनाने त्यांच्या बाजूने केले आहे. त्यामुळे अनेक शेतकरी स्थलांतर होणार, त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आणि मग त्यातून संघर्ष होणार व असे दुःख कादंबरीकारांनी आपापल्या कादंबरीतून मांडले आहे.

शंकर सखाराम यांची २००७ मध्ये 'इसईझेड' ही कादंबरी सप्टेंबर २००७ साली प्रकाशित झालेली आहे. ही कादंबरी बहुचर्चित विषयांवरील वास्तववादी कादंबरी आहे ही कादंबरी समकालीन मानवी जीवनातील सत्य वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करते. ग्रामीण साहित्यातील अनेक कलाकृतींनी कृषिव्यवस्थेतील विविध समस्यांवर, विषयांवर विचारमंथन करुन विचार व भावना यांना वाट मोकळी करण्याचा एक प्रयत्न केला आहे 'गोतावळा','पाचोळा' 'धग' अशा कितीतरी कलाकृतीची नावे घेता येतील 'गोतावळा' कादंबरीत यंत्राच्या,

आधुनिकतेच्या व व्यापारी विचाराने धास्तावलेला उध्वस्त होऊ पाहणाऱ्या ग्रामजीवनाचे नारबासारख्या कृषीसंस्कृतीशी एकरुप निगडीत असलेल्याचे जीवनचित्रण आले आहे.

व्यापारीकरण यातून जुनी ग्रामव्यवस्था नाहिसी होणार हे समोर वास्तव असतानाही आर्थिक विकासाच्या नावाखाली सेझसारखे प्रकल्प ग्रामजीवन उध्वस्त करीत आहेत. याचे कोणालाही काही नाही, ही शोकांतिका आहे. ही शोकांतिका 'एसईझेड' कादंबरीत रेखाटली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात उद्‌योगधंदयांना महत्व देण्यासाठी व उद्‌योगाच्या माध्यामातून बेकारी कमी करुन आर्थिक विकास साध्य करण्यासाठी त्याचबरोबर आणखी अनेक हेतूंनी देशाच्या विविध भागात औद्‌योगिक वसाहतींची स्थापना झाली. त्यासाठी हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी हस्तांतरीत करण्यात आल्या त्यामुळे अनेकजन विस्थापित झाले. पूर्नवसनाचे प्रश्न अनेक वर्षे सुरु राहिले. विकासाच्या नावाखाली स्थिरस्थावर समाजाला त्याच्या नैसर्गिक जीवनापासून विस्थापित करणे न्याय्य आहे असे वाटत नाही. विकासाच्या नावाखाली भूसंपादन करुन अनेक उद्‌योगपतींनी आपली साम्राज्य निर्माण केली. 'एसईझेड' ही कादंबरी प्राध्यापक शंकर सखाराम यांच्या लेखनितून अवतरलेली एक कथा आहे. कादंबरीचे निवेदन तृतीय पुरुषी आहे निवेदनातून कृषी संस्कृती, ग्राम संस्कृती, आदिम संस्कृती यांच्यावर होणाऱ्या सेझच्या कायद्‌याचा परिणाम निवेदक व्यक्त करतो. या कादंबरीच्या कथानकामध्ये एका सुशिक्षित बेरोजगाराची जीवन व्यवस्था आहे, याशिवाय कादंबरीत कोकणच खारेपाटीतील जीवनपट सांगितला आहे. भूमिपुत्रांच्या आंदोलनात निवेदक कार्यकर्ता सहभागी नाही म्हणून या कादंबरीचे कथानक समकालीन व वास्तव आहे.

समारोप :-

मराठी कादंबरीकारांनी विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून अधिग्रहण केलेल्या शेतजमिनी व त्यातून उद्‌भवलेल्या समस्यांचे बरेचसे वास्तव चित्र आपल्या कादंबऱ्यांतून साकारालेले आहे. या जमिनी अधिग्रहीत करत असताना शेतकऱ्यांना नाही म्हणण्याचा अधिकार नाही का? हेच प्रश्न कादंबरीकारांनी आपापल्या कादंबरीतून उभे केले आहेत. धरणे, दळणवळणाचे मार्ग, औद्योगिकीकरण इत्यादींसाठी शेतकऱ्यांना बडगा दाखवून घेण्यात येणाऱ्या जमिनीमुळे शेतकरी कुटुंबांवर अन्याय झाला आहे त्यांच्या हालअपेष्टा, त्यांचे दुःख, त्यांच्या राहण्याचा प्रश्न इत्यादींचे चित्रण स्थलांतर झाल्यानंतर किती भयावह असते याचे चित्रण आपापल्या कादंबरीतून मांडले आहे.

संदर्भ :-

१) रविंद्र ठाकूर - मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, व्दितीय आवृत्ती २००१.
२) अशोक व्हटकर - बगाड, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १ ली आवृत्ती १९८४.
३) शंकर सखाराम - एसईझेड, सामंत पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती ४ थी, २००९

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

स्थलांतर का संस्कृति और भाषा पर प्रभाव

प्रा. संजय वसंत निंबाळकर
हिंदि विभाग प्रमुख,
श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय
पाचल-रायपाटण

आज के गतीमान युग में विश्व एकदम सिकुडसा गया है। भौतिक सुविधाओं की उन्नती और यातायात के साधनों के प्रगती के कारण गाँव और शहर एक सा हो गया है। रोजगार, पर्यटन के कारण लोग अपने प्रदेशों को छोडकर दूसरे प्रदेशों में जाने और बसने लगे है। यह प्रक्रिया गाँव से लेकर देश और विदेशतक फैल गयी है। एक जमाना था कि लोग अपने गाँव तथा प्रदेश को छोडकर कही नहीं जाते थे। मगर आज अपनी उन्नति के सपने देखनेवाले जनमानस की मानसिकता में बदलाव आया है। यह बदलाव कुछ मजबुरी तो कुछ बड़ी उडान लेने की मानसिकता का परिणाम है। आज भारत जैसे खेतीप्रधान देश में भी खेती के उत्पादन की अनिश्चितता के कारण और जनसंख्या के विस्फोट के कारण लोग गाँवों को छोडकर शहरों में रोजीरोटी के लिए जाना पसंद करते है। इस कारण आज गाँव शहरों से और शहर गाँवों से जुड गये है। परिणामता वे सब एक दुसरे की संस्कृति और भाषा से प्रभावित होने लगे है।

स्थलांतर का सांस्कृतिक प्रभाव -

स्थलांतर के कारण दो समुहों के सांस्कृतिक के प्रभाव के कारण एक दुसरे का खान्पान, पेहराव, रहन-सहन, त्योहारों से लोग प्रभावित हो रहे है। इन प्रभावों के कारण नगरों मे तो किसी व्यक्ति की संस्कृति से उसका क्षेत्र या प्रदेश को पहचनना कठीण हो गया है। स्थलांतरीतों के कारण स्थानिक लोग स्थलांतरीतों के संस्कृति से प्रभावित होते है तो स्थानिक लोगों के कारण स्थलांतरितों की संस्कृति भी प्रभावित होती है। जैसे आज गुजरात का दांडिया और बंगाल का दुर्गापूजन महाराष्ट्र की भी संस्कृति बनी है। आज गाँवोगाँवों में भी दुर्गा की स्थापन और दांडिया चलता है। नगरों की तो बात ही अलग है। देड सौ साल अंग्रेजोने हमपर राज किया। उनके चले जाने के बाद भी हम उनकी संस्कृति से इतने प्रभावित है की आझादी के सत्तर साल बाद भी हम भारतीय बनने के लिए तयार नहीं है। आज मुंबई जैसे महानगर तो इन स्थलांतर की समस्या के कारण ही 'खिचडी संस्कृतिवाला नगर' बना है। परिणाम ऐसे नगरों में खान-पान, पेहराव, रहन-सहन, इनमें स्थित प्रादेशिक विशेषतः नष्ट होकर एक नयी नागरी संस्कृति निर्माण हो रही है जो आज पाश्चात्य संस्कृति से भी प्रभावित हुई है। स्थलांतर के प्रभाव के कारण आज सांस्कृतिक दृष्ट्या हमारा नागरी समाज नयी खाल ओढ़ रहा है। आज मुंबई के कुछ इलाके चोबीस घंटे व्यापार के लिए खुले रखने का शासन का निर्णय पाश्चात्य संस्कृति के प्रभाव का ही परिणाम है।

जैसे नगरो में स्थलांतरितों के कारण परिवर्तन आ रहा है। वैसा ही असर गाँवोंपर भी दिखाई देता है। आज रोजगार के कारण जो लोग स्थलांतरीत होकर ग्रामीण क्षेत्र में आये है उनके कारण गाँव के लोग भी सांस्कृतिक दृष्ट्या प्रभावित हो रहे है। और स्थलांतरितों को तो स्थानियों से प्रभावित होना ही होना है। आज राजस्थानी मजदूर रोजगार के लिए पुरे महाराष्ट्र में फैल रहै है। तो गुजराती समाज भी अपने व्यापार के कारण

गाँवो तक पहुँचा है। परिणाम यह है कि गुजराती और राजस्तानी संस्कृति से महाराष्ट्र की ग्रामीण जनता का परिचय हो रहा है। साथ ही ये दोनों समुदाय महाराष्ट्र के ग्रामीण क्षेत्रीय संस्कृति से प्रभावित हो रहे है। आज वे होलिकोत्सव तथा गणपती उत्सव महाराष्ट्रीयनों की तरह मनाने लगे है। परिणाम से सारे समाज एक दुसरे के खान-पान से परिचित होकर उनका अनुकरण करने लगे है। आज गुजरात का खाकरा, छोले भटुरे महाराष्ट्रीय लोक भी पसंद करने लगे है। यही बात पोशाख को लेकर भी हो रही है। आज समारोहों में महाराष्ट्रीय महिलायें गुजराती साडी परिधान करती है। तो पंजाब के महिलाओं का सलवार-कुरता सुविधाजनक होने के कारण संपूर्ण भारतीय महिलाओं ने अपना लिया है। यह सांस्कृतिक आदान-प्रदान इन समुदायों में दिनो-दिन बढने ही लगे है।

स्थलांतर का भाषिक प्रभाव -

स्थलांतरीत समुदाय जिस प्रदेश में जाता है वहाँ लोगों से संपर्क स्थापित करने के लिए उन्हें ऐसी भाषा का प्रयोग करना पडता है कि वे दोनों समुदाय उसे समझे। ऐसे समय जादा तर जिस प्रदेश में स्थलांतरीत हो जाते है जादातर उन समुदाय की भाषा ही उन्हें सीखनी पडती है। या दोनों समुदायों को आत्मसात है ऐसी किसी दूसरी भाषा को अपनाना पडता है। परिमाण वहाँ स्थलांतरीतों को दूसरी भाषा सीखनी पडती है। याने उनकी भाषापर स्थानीक भाषा का प्रभाव पडता है। या दोनों किसी ऐसी भाषा को अपनाते है जो उनकी नहीं है परंतु दोनों समझते है, जैसे हिंदी या अंग्रेजी। तो ऐसी भाषाएँ उन्हीं दोनों समुहों की भाषा को प्रभावित करती है। कभी-कभी इसका ऐसा परिणाम होता है की इन दो समुदायों के कारण जो भाषा उपयोग में लाई जाती है वह इनकी मूल भाषाओं के कारण इतनी प्रभावित होती है कि कोई दूसरी ही भाषा जन्म लेती है। जैसे मुंबई में दिविध स्थानों से आये लोगोव्दारा हिंदी भाषा का प्रयोग करने के कारण हिंदी भाषा का 'बंबईया हिंदी' वाला नया रूप जन्म लेता है। यही स्थिती दिल्ली, मद्रास, बेंगलोर जैसे शहरों में बसनेवाले लोगोव्दारा वहाँ की भाषा की हुई है। याने स्थलांतरीत लोगों के कारण भाषा के मूल रूप में परिवर्तन हुआ दिखाई देता है।

स्थलांतर के कारण अब व्यक्ती बहुभाषिक बनने लगी है। बडे नगरो में स्थलांतरीतों के बच्चे अपनी मातृभाषा के साथ-साथ आसपास के बहुभाषिक लोगों से प्रभावित होकर उनकी भाषाओं को अपनाकर बहुभाषिक बनने लगे है। हिंदी, अंग्रेजी और अपनी मातृभाषा के साथ-साथ बच्चे अपने दोस्तों के संपर्क के कारण बाकी भाषाओं से भी परिचित हो रहे है। दप्तर, स्कूल, बाजार ऐसे स्थान और पडोसियों के संपर्क का यह परिणाम है कि आज अनेक भाषाओं का ज्ञान इन स्थलांतरितों को और मूल निवासिओं को भी होने लगा है। इस का उपयोग उन्हें अपने दैनिक काम और व्यापार में होता है। व्यापारीयों को तो अपने ग्राहकों से अच्छा रिश्ता निर्माण करने के लिए इन बहुभाषिकता का बहुत फायदा होता है। अमरिका में एक दूरभाषा कंपनीने यह प्रयोग किया था कि ग्राहकों की भाषा के अनुसार उनके कर्मचारी उनसे संवाद स्थापित करते थे। ऐसी भाषाओं का प्रयोग करने से ग्राहकों के साथ एक अपनापन का रिश्ता स्थापित होता है। इस दृष्टि से देखा जाय तो स्थलांतरियों के लिए यह बहुभाषा का वरदान बहुत फायदेमंद हो रहा है।

निष्कर्ष -

निष्कर्ष में यह कहा जा सकता है कि स्थलांतर यह आज के युग में अपने उन्नती के लिए आवश्यक है। यह व्यक्ति की मजबूरी है कि उन्हें अपना प्रदेश रोजी-रोटी के कारण छोडना पडता है। इन स्थलांतरितों को नये प्रदेश में जाकर वहाँ की संस्कृति और भाषा को अपनाना पडता है। परिणाम स्थलांतर के कारण

स्थलांतरित और स्थानिय समुहो में सांस्कृतिक आदान-प्रदान होती है। भाषा, पोशाख, रहन-सहन, खान-पान इन बातों में यह समुदाय एक दुसरे से प्रभावित होते है। परिणाम आज नगरों में एक नयी संस्कृति जन्म लेने लगी है, जौ सभी संस्कृतियों का एक मिला-जुला रूप है। भाषा भी ऐसी ही मिली-जुली एक अपना अलग अस्तित्व दिखाती है।

संदर्भ :-

१. स्थलांतराचेसमाजशास्त्र - सं. प्रकाशजगताप
२. दैनिक लोकसत्ता - दिनांक०१ अप्रैल, २०१४
३. लोकसंख्याशास्त्र - सौ. तारा कानिटकर, सौ. सुमति कुलकर्णी
४. मानवाचेस्थलांतर- मराठी विश्वकोश, प्रथमावृत्ती

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypaten,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

Impact Factor - 6.293
ISSN-2349-638x

Aayushi
International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue No.71

Significance Of Fairs And Festivals In Human Life

Chief Editor

Pramod P. Tandale

IMPACT FACTOR

SJIF 6.293

For details Visit our website

www.aiirjournal.com

Sr. No.	Name of the Researcher	Title of The Paper	Page No.
167	डॉसुनिल सुखदेव लोखंडे .	भारतीय सण व पर्यावरण	575
168	डॉ.नेताजी विश्वास पोवार डॉ.रमजान फत्तुखान मुजावर	भारतीय सण - उत्सवांचे महत्व	577
169	डॉ अशोक ज्ञानदेव पाटील .	मराठेकालीन होळीच्या सणातील सामाजिक मनोरंजन	581
170	प्रा. डॉ. छाया शंकर माळी	त्योहार-उत्सव तथा राष्ट्रीय एकात्मता (हिंदी दिवस के परिप्रेक्ष्य में)	584
171	प्रा. डी. आर. पाटील	गणेशोत्सवाच्या बदलत्या स्वरुपाचा ऐतिहासिक अभ्यास	586
172	प्रा. डॉ. सतेज दनाने	कोकणातील जत्रा उत्सव	589
173	डॉ.कमल सतेज दनाने	धनगर समाजातील सण-उत्सव व लोकगीते	592
174	प्रा.शुभदा गणपतराव चांदवले	लोकजीवनाचा आरसाः मराठीतील लोकसाहित्य	596
175	डॉ. सुनिल भावराव देसले	खानदेशातील सण उत्सव व त्यातील लोकसाहित्य	601
176	डॉ.सौ. सुनिता एस. राठोड	सण, उत्सव आणि पर्यावरण	605
177	डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील	सण, उत्सव व स्त्रियांचे आरोग्य - एक चिकित्सक अभ्यास	608
178	डॉ.गिरीश मोरे	'फकिरा' मधील जोगणीची यात्रा	611
179	डॉ. हेमराज बिरारीस	आदिवासी कोकणांच्या लोकवाड्.मयातील सण उत्सवाचे प्रतिबिंब	614
180	प्रा.डॉ.माधुरी गोपाळ तानवडे	सण उत्सवामधील महिलांची भूमिका व योगदान	617
181	प्रा सौ.मानसी संभाजी शिरगांवकर	हमारे उत्सव त्यौहारों तथा पर्वों को मनाने में वैज्ञानिक कारण तथा महत्व मानवी जीवन के संदर्भ में	620

मराठेकालीन होळीच्या सणातील सामाजिक मनोरंजन

प्रा.डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील
श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय
पाचल, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

प्रस्तावना -

मराठेकालीन समाजाचे मनोरंजन करणाऱ्या विविध साधनांचा अभ्यास करताना धार्मिक मनोरंजनाच्या साधनांचाही विचार करणे आवश्यक ठरते. कारण धार्मिक कार्यक्रमाच्या प्रसंगी सादर होणाऱ्या कार्यक्रमांचा उद्देश हा जरी आध्यात्मिक असला तरी त्यामधूनही सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन होत होते. असे आध्यात्मिक उन्नतीचे व मनोरंजनाचे कार्यक्रम प्रामुख्याने सण, समारंभ व उत्सवाच्यावेळी होत असत. त्यामुळे मनोरंजनाची साधने आणि तत्कालीन सण, समारंभ व उत्सव यांचा घनिष्ठ संबंध होता. हे स्पष्ट होते. सण समारंभाच्या निमित्ताने समाजाच्या सर्व थरातील लोक एकत्र येऊन आनंद व्यक्त करीत, त्यामुळे त्यांचे मनोरंजन होत होते. मराठा काळात दसरा, होळी, रंगपंचमी, मकरसंक्रांती इत्यादी प्रमुख सण आणि गणपती उत्सव, गोकुळाष्टमी, महाशिवरात्री, रामनवमी, हनुमानजयती यासारखे धार्मिक उत्सव साजरे केले जात होते. राज्यकर्ते म्हणजे पेशवे जेव्हा एखादा मोठा विजय मिळवून येत त्यावेळी विजयी पेशव्यांचे स्वागत करण्यासाठी मिरवणूक काढली जात होती. त्यावेळी साजरा होणारा विजयोत्सव हा सर्वसामान्यांना आनंद देणारा व त्यांच मनोरंजन करणारा होता. मराठे काळात महाराष्ट्रामध्ये मुस्लीम लोकांची संख्यादेखील बरीच असून तेसुद्धा आपल्या धर्माप्रमाणे सण साजरे करत होते. त्यांच्या सणामध्ये हिंदू लोक सहभागी होत असल्यामुळे दोन्ही धर्मियात सामंजस्याचे वातावरण राहण्यास मदत होत होती. मराठेकालीन धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडविणारा उपरोक्त सण, समारंभ व उत्सवापैकी होळी किंवा शिमगा हा एक महत्वाचा सण होय. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये हा सण कसा साजरा केला जात होता याचे विवेचन करण्यात आले आहे.

मराठेकालीन होळीच्या सणाची परंपरा -

आधुनिक काळामध्ये होळी अथवा शिमगा या सणाला अत्यंत विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे शिवीगाळी सारख्या ग्राम्य प्रकारांना ऊत आल्यामुळे या सणाचे सांस्कृतिक महत्व कमी झालेले आहे त्यामुळे सणातील सामर्थ्य आणि सुख पार लोप पावले आहे याउलट मराठेकालीन राज्यकर्ते आणि प्रजा यांचा धर्म एक व सुखदु:खही एक त्यामुळे एकमेकांबद्दल आदर व आपलेपणा असल्याचे जाणवते. त्यामुळे सर्वांच्या घरोघरी आणि सार्वजनिक पध्दतीने आपआपल्या समजुतीप्रमाणे हा सण साजरा केला जात होता. होळी हा सण फाल्गुन महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो. मराठेकाळात हा सण छत्रपति, पेशवे, श्रीमंत, गरीब, सरंजामदार, सरदार, आबालवृद्ध अशा सर्व थरांतून मोठ्या आनंदाने साजरा केला जात होता. खेड्यातील लोक तर हा सण मोठ्या उत्सहाने साजरा करीत असत. कारण शेतातील कामे संपवून समाजात एक प्रकारची शांतता व सुबत्ता निर्माण झालेली असते त्यामुळे पाच दिवस हा सण अतिशय मौजमजेत साजरा करण्याची प्रथा त्यावेळी निर्माण झाली होती.

गावाच्या मध्यभागी मैदानावर होळी पेटवली जात असे. गावचा प्रमुख पाटील व ब्राम्हणाच्या हस्ते होळीची पुजा करून तिला पुरण पोळीचा नैवेद्य दाखविला जाई त्यानंतर रात्रभर होळीभोवती नाचगाण्यांचा कार्यक्रम चालत असे. दुसरा दिवस धुळवड म्हणून साजरा केला जाई कोकणातील प्रत्येक गावामध्ये होळीचा मांड या निश्चित केलेल्या जागेवर होळी साजरी केली जाई. होळीनिमित्त ग्रामदेवतेची पालखी गावातील प्रत्येक घरामध्ये वाजत-गाजत जात असे.[1] या पालखीसोबत गावातील सर्व मानकरी आणि गावकरी सहभागी होत. तसेच पालखीसोबत असणारे खेळे नृत्य गायन करून लोकांचे मनोरंजन करण्याचे काम करीत. रात्रीच्या वेळी पालखी मांडावर आणून तेथे होळीभोवती नाचविली ज़ाई. पालखी नाचविल्यानंतर मनोरंजनाचा कार्यक्रम चालत असे. अशाप्रकारे चालणाऱ्या या उत्सवाची समाप्ती 'शिंपणे या कार्यक्रमाने होई. शिंपणे हा रंगपंचमी सारखाच कार्यक्रम होता. कोकणाव्यतिरिक्त इतर महाराष्ट्रात पाचव्या दिवशी रंगपंचमीच्या कार्यक्रमाने होळी या सणाची समाप्ती होत असे. या सणामध्ये पुरूषाबरोबर स्त्रीयादेखील सहभागी होत होत्या.[2] इ.स. १७८६मध्ये पेशवे दरबारात होळीचा सण साजर करण्यात आला. तेव्हा स्वतः श्रीमंतांची स्वारी सायंकाळी होळीच्या दर्शनाला आली होती. त्यावेळी अनेक मनोरंजनाचे कार्यक्रम झाले होते. त्यामध्ये पहिल्या दिवशी जेठीची झोंबी, वाघ बकरीचा खेळ, सायंकाळी डफ गाणे, पोऱ्याचा नाच, कळसूत्री बाहुल्यांचा खेळ अनेक सोंगे, नाच गाणे, तमाशा अशा कार्यक्रमांचा समावेश होता.[3] या सणाच्या निमित्ताने दरबारामध्ये मोठ्या धुमधडाक्यात बिदागी व कापडाचे वाटप केले जात असे.

मराठेकालीन होळी सणाबाबतचे ऐतिहासिक दाखले -

होळीच्या सणाचा शेवटचा दिवस म्हणजे रंगपंचमीच्या दिवस होय. हा सण मराठ्यांच्या दरबारात मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जात असे. होळीमध्ये रंगोत्सव साजर करण्याची पध्दत पेशव्यांच्या काळात उत्तर भारतातून आली. उत्तरेतील रजपूत राजे आपल्या राण्यांबरोबर आणि दास-दासींबरोबर या आनंदोत्सवात सहभागी होत असते. त्यावेळी गरीब-श्रीमंत, जेष्ठ-कनिष्ठ, उच-नीच असा भेदभाव केला जात नव्हता. रजपूत राजे आपल्या राजवाड्याच्या गच्चीवरून, खुल्या मैदानामध्ये किंवा घोड्यावर बसून रंग खेळत असत.[4] रजपुतांचा हा रंगोत्सव शिंदे आणि होळकरांनी आपआपल्या संस्थानामध्ये सुरूवातीला आणला होता. मेजर ब्राऊटन याने शिंद्यांच्या छावणीत साजरा झालेल्या उत्सवाचे बहारदार वर्णन केले आहे. तो लिहितो की, 'एका खास उभारलेल्या तंबुमध्ये शिंदे आणि त्यांच्या सरदारांचे आगमन झाले त्यावेळी त्यांच्याबरोबर नर्तकीसुध्दा होत्या. सर्वांना रंग खेळण्यासाठी आबीर आणि वेगवेगळ्या रंगांच्या पाण्याची भांडी भरून ठेवण्यात आली होती. प्रथम शिंद्यानी पाहुण्यांच्या अंगावर लाल रंग उडवून या रंगाच्या क्रीडेला सुरूवात केली आणि नंतर सर्वांनी त्यांचे अनुकरण केले. या उत्सवामध्ये नृत्य करणाऱ्या नर्तकींनी कार्यक्रमाची शोभा वाढविली होती विविध रंगाच्या छटांनी भरून जाणारा आसमंत आणि लोकांच्या उत्साहाला आणि आनंदाला आलेले उधान असे दृश्य आपण यापूर्वी कधीही पाहिलेले नाही.'[5]

उत्तरेत साजऱ्या होणाऱ्या रंगोत्सवाची पध्दत महादजी शिंदे यांनी महाराष्ट्रामध्ये आणली तेथे साजरा होणाऱ्या रंगोत्सवाचे रसभरीत वर्णन जेव्हा महादजीने पेशव्यांच्या दरबारात केले, तेव्हा पेशव्यांनी असा उत्सव करण्यास परवानगी दिली. यावेळी फाल्गुन महिना उलटून गेला असल्यामुळे तो चैत्र शुद्ध प्रतिपदेला सवाई माधवराव, नाना फडणीस, रास्ते, विंचुरकर औंढेकर, राजे बहाद्दर इत्यादींच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. त्याचे वर्णन पेशवे बखरीत पुढीलप्रमाणे आढळते-

'शिंदे यांनी रंगाची तयार केली. रस्तोरस्तीच्या लोकांना रंगाची तयारी करण्याची आज्ञा दिली, जागोजागी हौद भरून ठेवले. गुलालाची तयारी झाली. सरदार, मानकरी, पथके, शिलेदार, मुत्सदी असे तयार होऊन वाड्यापाशी आले. वाड्यापाशी रंग खेळण्यास प्रारंभ झाला. हजारो गुलाल गोटे उडू लागले. रंगाचे बंब चालू लागले. तसाच गुलाल खंड्याचे खंड्या वाड्यात उडाला .... दोन घटकापर्यंत रंगाचा मारा झाला. रंगाच्या योगाने रस्त्यात चिखल झाला. शेकडो पल्ले गुलाल उधळला. .... मग स्वारी बानवडीस दाखल झाली. मग तिथे श्रीमंतासह सर्व कचेरीत येऊन बसले. दोन घटिकापर्यंत नाच व गाणे झाले. नंतर रंग खेळण्यास प्रारंभ झाला. रंग खेळता खेळता रंगाचे पाट नदीस मिळाले. असा रंग द्वापारयुगी श्रीकृष्ण भगवान खेळले, तसा कलियुगी श्रीमंत सवाई माधवराव खेळले. असा कोणी पुढे खेळावयाचा नाही व मागेही कोणी खेळला नाही. स्नाने झाल्यानंतर मग श्रीमंतास शिंदे यांनी पोशाख, जवाहिर, शिरपेच दिला. इतरांना पोशाख वाटून नंतर पानसुपारी, अत्तर, गुलाब, हारतुरे, गरजे दिले.'[६]

अशाचप्रकारचा रंगाचा खेळ पानिपतवर जाण्यापूर्वी साजरा करण्यात आला होता. त्यानंतर सदाशिवराव भाऊ पानिपतावर जाण्यास निघाले होते. ग्वाल्हेरजवळ असताना तिथे साजऱ्या केलेल्या रंगपंचमीचा वृत्तांत कृष्णाजी नाईक गायकवाड याने कळविला आहे[७] अशाप्रकारे होळी व रंगपंचमी साजरी केल्याची अनेक उदाहरणे तत्कालीन कागदपत्रामध्ये आढळतात. रंगपंचमी साजरी करण्यासाठी सर्व सरदार, मानकरी, पथके, शिलेदार, कारकून या सर्वांना आमंत्रण दिले जाई.

मराठेकालीन होळी सणाबद्दल माल्मक लिहितो, 'लोक आठाहून अधिक दिवस होळीच्या सणात मौजमजा करीत.'[८] एलफिस्टन होळी सणाबद्दल म्हणतो, 'होळी या क्रीडोत्सवात सर्व प्रकारचे लोक भाग घेतात. हा उत्सव वसंत ऋतूच्या गौरवार्थ असून सर्व लोक एकत्र येतात. यावरून यावेळी होळीचा सण हा लोकांना आनंद देणारा सण होता हे दिसून येते. या सणानिमित्त मनोरंजन करणाऱ्या लोकांना आपली कला सादर करून पैसा मिळविण्याची संधी मिळत होती. रंगाच्या सणामध्ये समाजातील सर्व लोक एकत्र येऊन उत्सवात भाग घेत असल्यामुळे सामाजिक ऐक्य आणि एकोपा निर्माण होण्यास मदत होत होती.'

संदर्भ साधने -

१) दैनिक प्रहार - दि. २७/०२/२०१३, पृ. ४
२) पोतदार द. वा. (संपा.) - भा. इ. सं. म. १९२२-२३ खंड ३, अंक १, पृ. ३४-३५
३) बॉम्बे स्टेट गॅझेटर, पुणा डिस्ट्रिक्ट- व्हॉ.२०, पृ. १३८
४) टोड जेम्स - अलन अँड अक्टीव्हिटीज ऑफ राजस्थान, व्हॉ.२, पृ.६६२
५) ब्रॉऊटन टी. डी. -लेटर्स रिटर्न इन मराठा कॅंप इयुअरींग द ईयर १८०९, पृ.६७-६८
६) प्रा. कुलकर्णी वि. म., प्रा. कुलकर्णी अ. रा., प्रा. कुलकर्णी अ. ना.(संपा.) - पेशव्यांची बखर (कृष्णाजी सोहनीकृत), पृ. १२० ते १२२
७) जोशी श. ना. - भाऊसाहेबांची बखर, पृ. ९७
८) सरदेसाई गो. स. - पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ४१, पृ.२९४-२९५

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPAN
COLLEGE OF ARTS & COM
A/P Rayapatan Tal. Raja

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)

"GROWING STEPS OF BPO AND KPO: NEW HORIZONS FOR FUTURE GROWTH"



Prin. Dr. Khandu Mahadu Kotwal
(M.Com. D.H.Ed., M.Phil., Ph.D.)
Shri Manohar Hari Khapane Arts & Com. College, Pachal, Raipatan
Tal. Rajapur, Dist. Ratnagiri (Maharashtra)

1.1 INTRODUCTION:

Before independence era India used foreign goods which were imposed by British people. So, our treasury become empty from that period. Dadabhai Nauroji propounded a theory of 'Money-Drain.' After independence our population become over. We have facing the problem of unemployment. The country's unemployment is estimated to have risen to 18.6 million in 2018. In percentage the unemployment rate for India is 3.5%. The educated, skilled and intellectual people in India search out the high pay jobs in the developed countries e.g. doctors, advocates, researchers, scientists are settled in America, Germany, Russia, France, Australia, Japan, Norway, Sweden. Philippines, Mexico, China etc. So the new problem create of 'Brain-Drain'. We lose quality human resource. The developed countries are getting benefits from that people by way of 'Intellectual Property Rights'(IPR's). Then, we also loose the industrial as well as economic growth.

Due to globalization the world economy become open. In globalization every country has equal opportunity in the world trade. The number of Multi –National Corporations and Transnational Corporations has been started and Joint Venture, Foreign Collaboration contracts are made among the various countries. Therefore, Business Process Outsourcing (BPO) and Knowledge Process Outsourcing (KPO) become more popular at the Worlds level. Developed countries are demanding such services from the developing and under developing countries. India is one of them a dominant country in the World.

1.2 RATIONAL OF BPO AND KPO:

After globalization BPO and KPO activities extended in a large quantum. In the developed countries there is a scarcity of skilled manpower and the cost of employment is higher than the developing as well as underdeveloped countries the example is cited in different countries in US dollars are as follow:

Table No. 1.1 - Call Centre Employee Cost

Sr. No.	Name of the Country	Cost (USD/YR)	Percentage
1	USA	19,000	100%
2	Australia	17,000	89.00%
3	Philippines	9,050	48.00%
4	India	7,500	40.00%

As per the above table No. 1.1 prevails that, the cost of Call Centre Employee is lowest in India. India has qualified and skill staff in a large number. This cost in percentage in USA is 100%, in Australia it is 89%, in Philippines it is 48% and in India it is 40% only. As compare with above four countries India's Call Centre Cost is rather cheap. So, the developed countries are demanding the employees from India.

Table No. 1.2 - Expansion of Global Market

Sr. No.	Year	Size of (USD/Bh)	Percentage
1	2000	119	24%
2	2005	234	47%
3	2008	310	62%
4	2018 (Estimated)	500	100%

As per the above table No. 1.2 indicate that, the size of global market is growing at the rate of more than 10% per annum. The global market has extended. The global market has extended four fold from 2000 to 2018. That means there is much scope for every country.

India has encouraged many firms to start outsourcing their high-end knowledge work as well. Cost savings, operational efficiencies, access to a highly talented workforce and improved quality are the resources for off-shoring, process in India. India has a large pool of knowledge workers in various sectors. This talent is soon being discovered and tapped by leading business across the globe resulting in the high end process to lower-wage destination.

1.3 Objectives of the Study:

I. To study the concepts of BPO and KPO.
II. To understand the rational of BPO and KPO.
III. To get knowledge about present situation and scope of BPO and KPO.
IV. To find out the causes of - Why India has more opportunity in BPO and KPO?
V. The study the challenges before India in BPO and KPO.
VI. To get additional knowledge about future prospects in BPO and KPO.
VII. To suggest remedies to overcome the barriers in BPO and KPO.

1.4 Business process outsourcing (BPO):

"Business Process Outsourcing (BPO) is the contracting of a specific business function such as customer support, marketing etc. The BPO firm provides the required service to the for agreed consideration to the outsourcing firm."

The first type of outsourcing is 'Offshore Outsourcing', in a distant country e.g. India to USA. The second type is 'Nearshore Outsourcing', for countries that are located close to the contracting companies e.g. Mexico to USA. The third type if 'Onshore Outsourcing', within the same country but a different city or location e.g. Kolkata to Delhi, Mumbai to Bangalore etc.

1.4.1 Scope of BPO:

- Supply of Skilled Force / Human Resource Services
- Consultancy and Project Report
- Software Development
- Banking Finance and Insurance Services
- Business Accounting and Auditing
- Data Collection and Analysis
- Clinical Research Services

3.3.3

- Medical Billing and Services
- Legal Transactions and Services
- Annual Maintenance Contract
- Canteen Facilities and Hospitality
- Housing Society Maintenance and Security Services
- Research and Development
- Information Technology Services
- Quality Assurance
- Packaging and Forwarding
- Logistic Management or Supply Chain

1.5 Knowledge Process Outsourcing (KPO):

"Knowledge Process Outsourcing (KPO) involves more specialized and knowledge based work. KPO calls for the application of specialized knowledge of high level. The KPO industry handles more skilled human resource."

"Knowledge Process Outsourcing (KPO) involves off shoring of knowledge intensive process that require specialized domain expertise."

1.5.1 Scope of KPO:

- Pharmacy
- Bio Technology
- Education and Training
- Research and Development
- Information Technology
- Market Research
- Learning Solution
- Medicine and Medical Services
- Law – Paralegal Content
- Engineering and Automation
- Advanced Web Application
- Content Development and Writing
- Financial Consultancy Services
- Intellectual Property Right (IPR's)
- Data Analysis

1.6 Present Situation of BPO and KPO:

VIII. The overall BPO services sector generated revenues of %144.9 billion in 2017.
IX. BPO is the faster growing sector in IT, present growth rate is 20%.
X. Global market for outsourcing is growing by 15% as against the BPO sector has grownup of India is 35%.
XI. BPO industries current size is about $35 billion.
XII. The total number of employees engaged in BPO are 7 lakhs. It is 35% of the worldwide market.
XIII. Technology, Telecom, Travel and Transportation provide opportunities worth $20 billion.
XIV. The Indian KPO industry have revenue $20 billion.

1.7 Why India has more opportunities in BPO and KPO?

I. India has large number of skilled workforce to undertake the various activities to BPO and KPO e.g. The Western legal firms are outsourcing in larger volumes, quality services by highly skilled professionals of India.

II. The use of latest technologies enable Indian BPO and KPO firms to provide cost effective quality services to foreign firms. India has made tremendous progress in Computer, Information Technology, Automation and Trainings in Human Resource, Management Philosophy etc.

III. The key employee can concentrate on core value activities like customer relationship, product development, production marketing, research and development, after sale services, automation, computer, IT services etc.

IV. Outsourcing firm obtained specialized services from expert's e.g. legal, consultancy, fundamental projects, research and development, opportunities in new business or industrial field. Indian legal system provide legal knowledge to foreign firms.

V. A company may pay lower amount to third party to provide services. The security services can be outsourced at lower costs. The fees charged by Indian BPO and KPO firms are lower than the firms in USA and Europe.

VI. The entrepreneurs may come with innovative ideas to complete the outsourcing work. The outsourcing firm may benefit of quality services.

VII. The premises are owned by the BPO and KPO owners. The outsourcing firms need not invest in certain fixed assets.

VIII. The outsourcing firm can deliver the goods and services to the KPO and BPO owner on time in the market.

IX. Customer satisfaction is the outcome of the correlation between quality of goods and services and customer expectation.

X. The overall improvement in the efficiency enable the firm to serve its customers more effectively, thereby it failing the challenges of the competitors. The firm can increase the demand for its goods and services at national as well as international market.

XI. The outsourcing firm to improve performance thereby enhancing the image of the firm in the minds of stakeholders.

XII. The companies accessing KPO and BPO services can be assured of the security of data which they share with Indian BPO and KPO firms.

1.8 Challenges of Barriers in BPO and KPO:

I. The outsourcing firms may not understanding the culture of the BPO and KPO service provider and this may lead to poor communication and less effective or lower productivity. Communication can be a challenge due to legal formalities, different languages and cultural barrier.

II. If we decide to enter in the market of new country, the sales team of our country have a problem of different languages. Without effective communication it is not so easy to impart the BPO and KPO services at the international level. The employee might be highly skilled, but mistakes due to miscommunication can turn out to be very costly.

III. Outsource to India is a premier outsourcing company that has extensive in BPO and KPO services to companies across the globe. Our BPO and KPO departments offer customized services that cover a wide range of industry verticals. All of our services are cost competitive, helping you make significant cost saving and focus on core competencies.

IV. The Outsourcer may also have to spend a lot of times and efforts in getting the contract signed and renewed. Hidden costs and legal problems also arise if the outsourcing terms and conditions are not clearly defined.

3.3.3

V. The service provider might be catering to the needs of several companies, they will not be able to give every company 100% attention. The BPO and KPO employees may not be well versed with product functioning. As per the feedback taken from the customer, they have complaint regarding product operations.

VI. India has face to stiff competition at the world level. The another countries like Japan, China, Mexico, Philippines, also join in BPO and KPO activities. In case the more number of countries participate in BPO and KPO activities leads to increase the competition. In future India has a problem is that, how to face the competition?

VII. To get a proper estimation of the real cost, you have need to consider the cost of your management team's money and time spent on picking the right vendor.

VIII. The BPO and KPO service providers may not be driven by the same mission and standards as usual the outsiders firm. The service providers more driven to make a profit rather than focusing on the quality standards. The company is likely to lose contact with the consumers as direct marketing is often outsourced.

IX. In the Western World, security is a very major problem it is less so in the developing countries. Hence, you have to be careful about what system previleges you are giving to the outsourced company, or invest more money in exchange for a more expensive company.

X. There is a possibility of misuse of outsourcing company's sensitive or important information. The third party service provider may leak information about the firm's processes to competitors. There is a risk that the company's secrets might be leaked out.

1.9 Future Prospects of BPO and KPO:

XI. India continues to retain as the top BPO and KPO destination because it has abundant, skilled manpower.

XII. In financial and environment services India would act as hub.

XIII. Large BPO and KPO services providers are expected to move to multi – location delivery Centre's.

XIV. India will develop foreign trade relations with the developed countries and it improves the growth of trade at the international level.

XV. The global BPO and KPO industry is estimated to the worth around 300 billion dollars, of this the share of Indian companies around 10% of offshore product and services.

XVI. In the developed countries e.g. Us, European 50% companies are using outsourcing in multiple activities. So, India has winder scope for increase in BPO and KPO activities.

1.10 Conclusion or self-opinion:

India is enough supply provider of skilled manpower to the world. It has advanced and update technology. The intellectual experts and consultants are engaged in various sectors. The Government of India also has given more initiatives to the private entrepreneurs for starting BPO and KPO activities. The developed countries in the World are always required and depend upon the developed and underdeveloped countries. So, in future India has bright prospects in BPO and KPO.

India offer custom-designed BPO and KPO services that are based on specific business requirements. With our cost effective services, timely deliveries and guaranteed quality, our companies can make informed business decisions and get ahead of the competition. In present situation BPO and KPO has challenge before India but if it has use the remedies for overcoming the barriers in these sectors than, definitely India will succeed in BPO and KPO. By this way with exploring the BPO and KPO activities India will develop its trade relations in the international market and it also will get the benefits of Multinational Companies, Transnational Companies, Joint Ventures and Foreign Collaborations. Then, India will become enrich in industrial as well as economic development.

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACH
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnag